
राधेय
रणजीत देसाई

# रणजित देसाई

**जयंती : ८ एप्रिल, १९२८**
**स्मृतिदिन : ६ मार्च, १९९२**



उमद्या, दिलदार मनाचा एक थोर साहित्यिक. रणजित देसाईंचे साहित्य म्हणजे वाचकांशी उच्च भावनिक स्तरावर साधलेला कलात्मक संवाद. महाराष्ट्रातील या थोर, सर्जनशील, प्रतिभावान साहित्यिकाचा जन्म कोल्हापुरातील कोवाड येथील एका संपन्न खानदानी कुटुंबात झाला. शिक्षणानंतर कोवाडला स्थायिक झाल्यावर तिथल्या निसर्गरम्य वातावरणात त्यांनी लेखन-वाचन हा छंद जोपासला. १९४६ मध्ये 'प्रसाद' या मासिकात प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या 'भैरव' या पहिल्याच कथेला पारितोषिक मिळाले. १९५८ साली त्यांचा 'रूपमहाल' हा पहिला कथासंग्रह प्रकाशित झाला. त्याच सुमारास 'बारी' ही कादंबरी लिहून त्यांनी कादंबरीक्षेत्रात पहिले पाऊल टाकले. त्यांनी ऐतिहासिक, सामाजिक, पौराणिक या विषयांबरोबरच चरितकहाणी हा कादंबरीचा नवा प्रकार हाताळला आणि आपल्या समर्थ लेखणीने तो लोकप्रियही केला. चरित्रकादंबरीसाठी त्यांनी निवडलेल्या व्यक्ती सर्वसामान्य वर्गात न बसणाऱ्या, असामान्य कर्तृत्व असलेल्या आहेत. 'स्वामी' या त्यांच्या कादंबरीला अफाट लोकप्रियता मिळाली. या कादंबरीत त्यांनी थोरले माधवराव पेशवे व त्यांच्या पत्नी रमाबाई यांच्यातील कोमल भावबंध लोकांसमोर मांडला. या कादंबरीवर लोकांनी जिवापाड प्रेम केलेच, त्याचबरोबर रणजित देसाई यांना 'स्वामीकार' हा किताबही बहाल केला. कथालेखन करताना देसाई यांनी प्रथमच जाणीवपूर्वक प्राणिकथा लिहिल्या. या कथांमधून निसर्ग, माणूस आणि प्राणी यांचा अतूट संबंध त्यांनी फारच प्रभावीपणे मांडला.

'स्वामी' या एकाच कादंबरीला राज्य पुरस्कार, ह.ना. आपटे पुरस्कार आणि साहित्य अकादमी पुरस्कार मिळाले. रणजित देसाई यांनी अनेक प्रादेशिक साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद भूषविले. साहित्यक्षेत्रातील त्यांच्या अमूल्य योगदानाबद्दल केंद्र शासनाने

त्यांना ‘पद्मश्री’ हा किताब बहाल करून सन्मानित केले.

# रणजित देसाई यांची साहित्यसंपदा

**कादंबरी**

* स्वामी * श्रीमानयोगी * अभोगी * राधेय * पावनखिंड * माझा गाव * समिधा * बारी * राजा रविवर्मा * प्रतिक्षा * शेकरा * लक्षयवेध

**कथासंग्रह**

* रुपमहाल * मधुमती * कमोदिनी * आलेख * गंधाली * मोरपंखी सावल्या * कातळ * मेघ * आषाढ * वैशाख * प्रपात * संकेत * बाबुलमोरा * मेख मोगरी

**नाटके / एकांकिका**

* स्वामी * वारसा * हे बंध रेशमाचे * रामशास्त्री * धन अपुरे * गरुडझेप * श्रीमानयोगी * लोकनायक * संगीत तानसेन * कांचनमृग * पंख जाहले वैरी * पांगुळगाडा * तुझी वाट वेगळी * सावली उन्हाची

**ललित**

*स्नेहधारा * संचित

All rights reserved along with e-books & layout. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted in any form or by any means, without the prior written consent of the Publisher and the licence holder. Please contact us at **Mehta Publishing House** , 1941, Madiwale Colony, Sadashiw, Peth, Pune 41 1030. (phon) +91 020-24476924 / 24460313

Email: info@mehtapublishinghouse.com
production@mehtapublishinghouse.com
sales@mehtapublishinghouse.com

Website: www.mehtapublishinghouse.com

◆ या पुस्तकातील लेखकाची मते, घटना वर्णने ही त्या लेखकाची असून त्याच्याशी प्रकाशक सहत असतीलच असे नाही.




# राधेय

रणजित देसाई

मेहता पब्लिशिंग हाऊस

**RADHIEYA** by RANJEET DESAI

**राधेय : रणजित देसाई / कादंबरी**

© सौ. मधुमती शिंदे व सौ. पारु नाईक

प्रकाशक : सुनील अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१
सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे - ४११०३०.

प्रकाशनकाल : १९७३ / १९७६ / १९७६ / १९८२ / १९८६ / १९९० / १९९५ / १९९७ / १९९९ / २००० / २००२ / २००४ / २००५ / २००६ / २००७ / मार्च, २००८ / नोव्हेंबर, २००८/ फेब्रुवारी, २०१० / सप्टेंबर, २०१० / ऑगस्ट, २०११/ एप्रिल, २०१२ / फेब्रुवारी, २०१३ / मार्च, २०१४ / जुलै, २०१५ / पुनर्मुद्रण : सप्टेंबर, २०१६

P BOOk. ISBN 978817766 7462

E BOOk. ISBN 9788184988055

E Books available on : play.google.com/store/books
m.dailyhunt.in/Ebooks/Marathi

# आठवण

'स्वामी' नंतर मी 'राधेय'चा संकल्प सोडला; पण त्या आधी 'श्रीमान योगी' पुरे झाले. या दहा वर्षांत कर्ण तसाच मनात राहिला.

आज 'राधेय' पुरे होत आहे. 'राधेय' लिहीत असता ज्या ग्रंथांनी सोबत केली, ज्या मित्रांचे सहकार्य लाभले, त्या सर्वांचीच आज आठवण होत आहे.

'राधेय'च्या निमित्ताने कै. बाळशास्त्री हरदास, कै. इरावतीबाई कर्वे यांच्या बरोबर चर्चा करण्याचे भाग्य लाभले. माझे मित्र प्रा. नरहर कुरुंदकर यांच्या संगतीत 'राधेय' साकारला. प्रा. पां. ना. कुलकर्णी, श्रीमती शान्ताबाई शेळके, प्रा. रा. शं. वाळिंबे यांनी 'राधेय' निर्दोष व्हावा, म्हणून अनेक महत्त्वाच्या सूचना केल्या. हा स्नेह मला मोलाचा वाटतो.

माझे गुरु ती. श्री. वि.स.खांडेकर यांचे आशीर्वाद व मार्गदर्शन मला सदैव लाभले.

माझ्या मित्रांनी मला अखंड साथ दिली. श्री. राजाभाऊ मराठे, श्री.डी.जी.देशपांडे, श्री. शंकरराव कुलकर्णी, श्री. दौलत मुतकेकर यांच्यासारख्या मित्रांनी मला 'राधेया'त गुंतवून ठेवले. श्री. एम्. एन्. शिंदे यांचा वडीलकीचा धाक सदैव जाणवत राहिला. कु. शैलजा गवळे यांनी टिपणे काढण्यात मदत केली. श्री. पांडुरंग कुंभार यांनी न कंटाळता 'राधेय'ची नक्कल तयार केली. या सर्वांचे पाठबळ नसते, तर ही कलाकृती पुरी झाली नसती.

'राधेय'साठी अनेक दुर्मीळ ग्रंथ, महाभारताच्या प्रती मला माझ्या मित्रांनी उपलब्ध करून दिल्या. श्री. बाळासाहेब काळे (जमखंडी), श्री. सुरेश पांडुरंग गिंडे (बेळगाव) यांचा त्यातला वाटा मोठा आहे.

कै. नाना हेरवाडकर व कै. शाहीर गव्हाणकर या दोन मित्रांची आठवण आज होत आहे. ते आज असायला हवे होते.

वाचकांचा प्रेमभाव पंचवीस वर्षे लाभला आहे. ते प्रेम व अगत्य अखंड राहो, हीच एक नम्र विनंती.

'राधेय' आपल्या हाती देत असता श्रीज्ञानेश्वरांच्या वचनाची आठवण होते.

**तऱ्ही न्यून तें पुरतें | अधिक ही सरतें**
**करूनि घेयावें हें तुमतें | विनविलें मियां**

**रणजित देसाई**

बाईंना कर्ण मुळीच आवडायचा नाही. त्यांना अर्जुन आवडे. मी कर्णाबद्दल बोलू लागलो की, त्या म्हणत, 'मी तुझा कर्ण मुळीच वाचणार नाही.'
आज बाई असत्या, तर माझ्या प्रेमापोटी त्यांनी कर्ण वाचला असता. कुणास माहीत, कौतुकही केलं असतं!
आज बाई नाहीत, म्हणून काय झालं? ही कर्णकहाणी त्यांनाच अर्पण.

**सौ. इरावतीबाई कर्वे**
यांना सादर सप्रेम अर्पण.

ही कादंबरी हिंदी व गुजराथी भाषेतही भाषांतरित झाली आहे.

राधेय!
हे कर्णचरित्र नव्हे.
प्रत्येकाच्या मनात एक दडलेला
कर्ण असतो. माझ्या मनातल्या
कर्णाची ही कहाणी. भावकहाणी.
याची सत्यता शोधायची झाली,
तर त्यासाठी महाभारताची पाने
चाळण्याचे काहीच प्रयोजन नाही.
कदाचित आपल्या मनाची चार पाने
उलटलीत, तर त्यात हा कर्ण दिसेल .

कुरुक्षेत्राची विस्तीर्ण, विशाल रणभूमी उदास, उजाड वाटत होती. आकाशी सूर्य तळपत असूनही, त्या भूमीचे तेज ओसरले होते. ज्या भूमीवर एवढा घनघोर रणसंग्राम झाला, त्या भूमीवर वीरांच्या चिता रचल्या जात होत्या. विजयाच्या आकांक्षेने, जन्ममृत्यूचे भय न बाळगता, शत्रुरुधिराच्या तहानेने रणभूमीवर सदैव वावरणारे जीव विजय संपादन करूनही, त्याच रणभूमीवर नतमस्तक होऊन धारातीर्थी पडलेल्या आपल्या वीरांचा शोध घेत होते. जय-पराजयांचा अर्थ केव्हाच संपला होता. ज्यांच्या चाकांच्या भेदक वेगाने रणभूमीला लक्षावधी चाकोऱ्या पडल्या, त्या भग्न रथांच्या राशी त्या रणांगणावर एकत्रित केल्या जात होत्या. आपल्या गंभीर मंत्राने अचेतनामध्येही जीव ओतणाऱ्या रणनौबतींना तडे गेले होते. आपल्या दीर्घ नादाने विजयाचा विश्वास देणारे शंख, बाणांच्या सड्यांनी आच्छादलेल्या भूमीवर विखुरले होते. आता रणवाद्यांच्या राशीत तेही विसावले गेले. रणांगणावर छाया फिरत होती अतृप्त गिधाडांची. रणांगणाच्या चिंतेने सदैव अस्वस्थ असणारे पाच पांडव, धौम्य, संजय, विदुर, युयुत्सु यांच्यासह सेवकांच्या मदतीने वीरांचे दहनकर्म पार पाडीत होते. एक एक चिता अग्निशिखांमध्ये धडाडू लागली. धरतीवर पुण्य अवतरावे, म्हणून एके काळी जी भूमी सुवर्णनांगराने नांगरली गेली होती, त्या कुरुक्षेत्रावर उठलेले धुराचे शेकडो काळेकभिन्न लोट आकाशाला भिडले होते .
वीरांच्या दहनाची व्यवस्था लावून, सारे खिन्न मनाने गंगेकडे चालू लागले. मध्याह्नीचा सूर्य पश्चिम क्षितिजाकडे ढळला होता. गंगेचा विशाला, निळाशार प्रवाह त्या सूर्यकिरणांत तळपत होता. तापल्या वाळूवरून गंगेकडे जाणाऱ्यांना, गंगेच्या दर्शनाने ना प्रसन्नता लाभली होती, ना पायांखालच्या दाहाची जाणीव होत होती. विजयी पांडव आणि पराजित कौरव दोघांच्याही जय-पराजयांच्या ऊर्मी दहनभूमीच्या अंगारात जळून गेल्या होत्या. गेल्या जीवांच्या वियोगाने व मागे राहिलेल्यांच्या खंतीने साऱ्यांची मने पोखरून गेली होती.
गंगेच्या वाळवंटावर तात्पुरते शिबिर उभारले होते. नतमस्तक झालेले, खिन्न वदनाने आणि मंद पावलांनी गंगेकडे जाणारे वीर दिसताच त्यांच्या वाटेकडे लक्ष देऊन बसलेल्या शिबिरातील राजस्त्रिया आपल्या परिवारासह उठल्या आणि नदीकडे चालू लागल्या.
युधिष्ठिर गंगेच्या प्रवाहामध्ये जाऊन गुडघाभार पाण्यात उभा होता. नदीकाठच्या एका कातळावर राजमाता कुंती बसली होती. तिच्या शेजारी द्रौपदी अधोवदन उभी होती. त्या दोघींच्या मागे तटस्थपणे कृष्ण उभा होता... भीम, अर्जुन, नकुल, सहदेव आपल्या स्वकीयांच्या समूहात वाळूकिनाऱ्यावर व्यथित मनाने बसले होते. पराक्रमाचा अहंकार नव्हता, प्रतिज्ञांची जाणीव नव्हती, विजयाचा आनंद नव्हता. बाहुबलाचे तेज केव्हाच सरले होते. आठवण होती फक्त विजयासाठी रणांगणी बळी गेलेल्या वीरांची!
नदीपात्रात उभा असलेला युधिष्ठिर एकेका वीराचे नाव घेऊन तिलांजली देत होता. त्या उच्चारल्या जाणाऱ्या नावाबरोबर आठवणींचे उमाळे येत होते. दाटलेले अश्रू गालांवरून निखळत होते .
साऱ्या वीरांना तिलांजली दिली गेली .
युधिष्ठिराने मागे न पाहता विचारले,
'विस्मरणानं कोणी वीर राहिलाय् का?'
सारे एकमेकांकडे पाहत होते. मनात नावे आठवत होते, कोणी राहिल्याचे स्मरत नव्हते.
राजमाता कुंतीच्या मनात त्या शब्दांनी एकच भावनांचा कल्लोळ उसळला. बसल्या जागी तिचे सारे शरीर कापू लागले, ओठ कोरडे पडले. तिचे शुष्क नेत्र अज्ञात जिव्हाळ्याने भरून आले. कुंतीने आशेने कृष्णाकडे पाहिले .

कृष्ण तसाच एकाग्रपणे गंगेच्या प्रवाहाकडे पाहत होता. त्याच्या नेत्रकडांवर अश्रू गोळा झाले होते.
युधिष्ठिर वळणार, हे पाहताच सारे बळ एकवटून कुंतीने हाक मारली,
'कृष्णा ऽ!'
कृष्णाने कुंतीकडे पहिले.
'कृष्णा, तु तरी ऽ ऽ'
कुंतीला पुढे बोलवले नाही .
सारे कृष्णाकडे पाहत होते.
कृष्णाने उभ्या जागी एक दीर्घ श्वास घेतला आपले उत्तरीय सावरले आणि तो गंगेच्या दिशेने चालू लागला.
युधिष्ठिर वळतोय्, हे ध्यानी येताच कृष्णाने दूरुनच हाक दिली,
'थांब, धर्मा, वळू नकोस.'
गंगेच्या प्रवाहात उभ्या असलेल्या युधिष्ठिराजवळ जात असता आपले वस्त्र सावरण्याचेही भान कृष्णाला राहिले नाही.
कृष्ण जवळ जाताच युधिष्ठिराने विचारले,
'कृष्णा, साऱ्यांना तिलांजली दिल्या गेल्या...?'
नकारार्थी मान हलवीत कृष्ण म्हणाला,
'नाही! धर्मा, अद्याप एक तिलांजली द्यायला हवी.'
'अशक्य! कृष्णा, पराजयात साऱ्यांचंच विस्मरण होतं; पण विजय आपल्या वीरांना कधीही विसरत नाही. या मिळवलेल्या विजयाची निरर्थकता या तिलांजली-प्रसंगानं मला पुरेपूर समजलीय्. ते दु:ख आणखी वाढवू नकोस. असा वीर कोण आहे, की ज्याचं मला विस्मरण व्हावं!'
कृष्णाने उभ्या जागी आवंढा गिळला. आपल्या भावना शक्य तो आवरण्याचा प्रयत्न तो करीत तो म्हणाला,
'धर्मा, ज्याच्या तिलांजलीला आग्रहक्क द्यावा असा तो वीर; तुमच्या विजयासाठी ज्यानं स्वेच्छेनं मृत्यूचं आव्हान पत्करलं, तो वीर; तुम्ही ज्याला शत्रू मानत होता, पण तुमचा ऋणानुबंध ज्याला सदैव ज्ञात होता, असा तो एकच वीर आहे...'
कृष्णाच्या बोलण्याने धर्म भयव्याकूळ झाला. तो कष्टाने उद्गारला,
'पितामह भीष्माचार्य! अशक्य, ते तर उत्तरायणाची वाट पाहत आहेत. त्याखेरीज ते देह ठेवणार नाहीत. उत्तरायणास अद्यापि अवधी आहे. असा अपमृत्यू..'
'नाही, युधिष्ठिरा, मी पितामहांबद्दल बोलत नाही. मी बोलतोय् महारथी कर्णाबद्दल...'
'कर्ण! राधेय..?' युधिष्ठिराचा सारा संताप त्या एका नावाबरोबर उफाळला. तो निश्चयपूर्वक म्हणाला, 'नाही, कृष्णा, माझ्या शांत स्वभावालासुध्दा मर्यादा आहेत. माझ्या नीतीचे बंध निश्चित आहेत. ज्याला मी शत्रू मानलं, त्याला मी तिलांजली देत नसतो.'
'तो तुझा आप्तस्वकीय असला, तर...?'
'कृष्णा, एक वेळ मी कौरव-वीरांसाठी तिलांजली देईन. पण कर्ण! त्या राधेया...'
'शांतपणे ऐक!' कृष्णाचा आवाज शुष्क बनला होता, 'महारथी कर्ण तुझा ज्येष्ठ भ्राता आहे.'
कृष्णा...!'
'तो राधेय नाही. कौंतेय आहे.'

'खोटं ऽ खोटं ऽ ऽ!' म्हणत युधिष्ठिराने कानांवर हात ठेवले.
कृष्णाचे नेत्र अश्रूंनी भव्हन आले.
धर्माने मोठ्या आशेने कुंतीकडे पाहिले.
तिची मान गुडघ्यांत गेली होती.
बसलेले चारी पांडव आश्चर्यचकित होऊन उभे राहिले होते, कृष्णाचे शब्द कानांवर पडत होते.
'युधिष्ठिरा, मन स्थिर कर! शांत हो! नियतीपुढं कुणाचंही काही चालत नाही. महारथी कर्ण साक्षात सूर्याचा पुत्र होता. माता कुंतीला कुमारी अवस्थेत मिळालेलं ते वरदान आहे. कर्ण ज्येष्ठ अन् श्रेष्ठ कौंतेय आहे. त्याला तिलांजली देणं तुझं कर्तव्य आहे. मी सांगतो, ते सत्य आहे. धर्मनिष्ठ युधिष्ठिरा, कौंतेय म्हणून आदरनं, ज्येष्ठ म्हणून नम्रतेनं, दाता म्हणून कृतज्ञतेनं कर्णाला तिलांजली दे.'
साक्षात संयम असा लौकिक असणाऱ्या युधिष्ठिराचे बळ त्या शब्दांनी खचत होते.
त्याने कष्टाने गंगेची ओंजळ उचलली.
'अज्ञानाच्या आवरणात, आणि विजयाच्या उन्मादात सदैव तुझ्या मृत्युची इच्छा करणारा मी युधिष्ठिर, हे महारथी कर्णा, ज्येष्ठ अन् श्रेष्ठ कौंतेया... आज तुला...' पुढचे शब्द उच्चारण्याचे बळ युधिष्ठिराला राहिले नाही. थरथरणाऱ्या ओंजळीतील जल सुटले. गंगेच्या विशाल प्रवाहात एक नाजूक खळगा क्षणभर दिसला आणि युधिष्ठिर पाण्यात ढासळला.
त्या धक्क्यातून सावरलेल्या पांडवांच्या मनांत एकच शोक उसळला.
अर्जुनाच्या मनाचे बांध फुटले. तप्त वाळूवर अंग झोकून देऊन, आपल्या हाताने वाळूचे तोबरे घेत तो मूक रुदन करीत होता. सारे मन गुदमरून गेले होते. नौबत झडावी, तसा अखंड नाद मनात उठत होता.
'कर्ण... राधेय नव्हे, कौंतेय!! वैरी नव्हे, बंधू!
'शस्त्रस्पर्धेच्या वेळी याच कर्णाचा राधेय, सूतपुत्र म्हणून मी अपमान केला होता. सरोवरात पडलेल्या प्रतिबिंबाला पाहून चंद्राला गारगोटी समजलो होतो.
'हाच तो कर्ण! द्रौपदीस्वयंवराच्या वेळी मत्स्यभेद करूनही अपमानित बनलेला. शौर्यामुळं नव्हे... कीर्तीमुळं नव्हे... खोट्या कुलाभिमानामुळं. निमूटपणं!
'हाच ना तो वीर, ज्याला द्रौपदीवस्त्रहरणाची सारी दूषणं दिली! ती दूषणं तरी खरी होती का?
'हे महाबाहो, अभिमन्यूच्या वधात तुझा हात नव्हता, हे फार उशिरा कळलं. पण त्याआधी तुझ्या पुत्राचा वध मात्र मी सूडभावनेनं केला होता. ते पाहत असूनही तुझ्या मुखातून शाप का बाहेर पडला नाही, हे आज समजून तरी काय उपयोग?...'
जवळ येणाऱ्या पावलांच्या आवाजाने अर्जुन भानावर आला. त्याने दचकून वर पाहिले.
कृष्णाची सावली त्याच्यावर पडली होती. मागे सूर्य असल्याने त्या आकृतीचे रूप दिसत नव्हते. ती कृष्णच्छाया पुढे सरकत होती.
अर्जुन पुन्हा सावध झाला. मूर्तिमंत तिरस्कार त्याच्या चेहऱ्यावर प्रकटला. कृष्ण अधिक जवळ येत आहे, हे ध्यानी येताच पडल्या जागेवरून खुरडत दूर जात तो कष्टाने उठला. मागे सरकत तो ओरडला,
'थांब, कृष्णा! माझ्याजवळ येऊ नकोस. तुझ्या पापी हातांचा स्पर्श माझ्या शरीराला करू नकोस. अरे, कुणी सांगितलं होतं आम्हांला असलं कलंकित राज्य हवं, म्हणून! जन्माला येताच दैवी वनवास घेऊन आलेले आम्ही, असला शापित विजय मिळण्याऐवजी आयुष्यभर आनंदानं वनवास पत्करला असता. साक्षात अग्नीकडून जे गांडीव धनुष्य हस्तगत केलं, ते का मोठ्या

भावाच्या वधासाठी? तुला हे नातं माहीत होतं. तुला आमच्या ऋणानुबंधाची जाण होती. तरीही या अक्षम्य पातकाचा धनी बनवलंस! कृष्णा, तुझ्यावर निष्ठा ठेवली, त्याचं हे फळ दिलंस! तूच असा आमच्या आधोगतीला कारणीभूत होशील. असं स्वप्नातही वाटलं नव्हतं. धिक्कार असो...'

अश्रू ढाळणारा, दु:खाने संतप्त बनलेला अर्जुन कृष्णाकडे पाठ फिरवून जात होता.

कृष्णाकडे न पाहता शोकव्याकूळ पांडव अर्जुनामागून जात होते.

कुणाला अडवण्याचे सामर्थ्य कृष्णाच्या ठायी नव्हते. त्याची दृष्टी कुंती-द्रौपदींकडे वळली.

द्रौपदी सुन्न होऊन निश्चल उभी होती. ओठ थरथरत होते. आरक्त नेत्रांत अश्रू गोळा झाले होते. आपला उजवा तळहात सामोरा धरुन ती तो तळहात स्थिर दृष्टीने निरखीत होती. हळूहळू तो तळहात तिच्या कपाळाकडे जाऊ लागला.

द्रौपदीचा कुंकवाकडे जाणारा तो हात पाहताच कृष्ण पुढे झाला आणि त्याने तो हात पकडला.

मनगटावर पकडलेल्या मिठीच्या स्पर्शाने द्रौपदी सावरली गेली. तिचे आश्रुपूर्ण व्याकूळ डोळे कृष्णाच्या डोळ्यांना भिडले.

'कृष्णा, हवं, ते हरवणं आपल्या दैवी सदैव लिहिलं आहे का, रे?'

राजमाता कुंती कष्टाने उठत होती.

दौपदीने आपला हात सोडवून घेतला आणि कुंतीला आधार देण्यासाठी ती धावली.

द्रौपदीच्या आधाराने उभी राहत असलेल्या कुंतीने कृष्णाकडे पहिले.

तिच्या डोळ्यांत सारे भाव तरळून गेल्याचा भास कृष्णाला झाला.

कुंतीसह द्रौपदी निघून गेली.

त्या शांत गंगातटाकी आता कोणी उरले नव्हते.

एकटा कृष्ण त्या कातळावर उभा होता. अस्ताचलाला जाणाऱ्या तिरप्या सूर्यकिरणांत गंगेचा प्रवाह पाहत तो उभा होता, एकटा...

# १

**मा**ध्यावरचा सूर्य थोडा कलला होता. त्या सूर्यदाहात सारी भूमी होरपळत होती. पण त्या सूर्यकिरणांची तमा न बाळगता कर्ण अपराह्ण काळी आपली सूर्योपासना पुरी करीत होता. गंगेच्या पाण्यात उभा राहुन, दोन्ही हात उंचावून तो पूजामंत्र म्हणत होता. पैलतीरावर त्याची दृष्टी स्थिरावली होती. पूजारंभी आलेले सूर्यकिरण माथ्यावरून पाठीमागे परतले, तरी त्याचे भान कर्णाला नव्हते. तेजस्वी गौर वर्णाचा, सुदृढ बांध्याचा कर्ण एकाग्रपणे आपली नित्य सूर्योपासना पुरी करीत होता. रूपसंपन्न कर्णाच्या रूपाने साक्षात सूर्याची प्रतिमा गंगाजलावर प्रकटल्याचा भास होत होता.

कर्णाने आपली सूर्योपासना पुरी केली. नित्य सरावाप्रमाणे गंगेची ओंजळ हाती घेतली आणि त्याची घनगंभीर हाक उठली,

'कोणी याचक आहे?'

तीन वेळा कर्णाने हाक दिली. पण पाठीमागून साद आला नाही.

कर्णाने हाती घेतलेले जल गंगेत सोडले. गंगाजल नेत्रांना लावून तो वळला. नदीकाठावर ठेवलेली आपली वस्त्रे परिधान केली, पादत्राणे घातली आणि उत्तरीय सावरून तो चालू लागला.

अचानक त्याची पावले थांबली. गंगेच्या किनाऱ्यावर भर उन्हात तळपणाऱ्या सुवर्णरथावडे कर्णाचे लक्ष वेधले.

आपल्या सूर्योपासनेसाठी येताना कर्ण आपला रथ नेहमी नदीपासून दूर अंतरावर वृक्षराईत उभा करीत असे. दान मागण्यासाठी येणाऱ्या कोणाही याचकाला कसलाही संकोच नसावा, याची तो दक्षता घेत असे, एवढेच नव्हे, तर सूर्योपासना झाल्यावर दानासाठी उभा राहत असताही नदीतटाकडे पाठ करून तो उभा राही. याचकाने दान मागितले आणि कर्णाने ते मान्य केले की, कर्ण याचकाचे दर्शन घेत असे. शत्रू जरी याचक म्हणून आला, तरी दान देत असता खेद वाटू नये, यासाठी नेहमी तो सावधागिरी बाळगत असे. त्यामुळे नदीतीरावर उभा असलेला तो सुवर्णरथ पाहून कर्णाचे कुतूहल वाढले. अशा भर उन्हाच्या वेळी कोण आले असावे, याचा विचार करीत कर्ण त्या रथाकडे जात होता. दुर्योधनाच्या आठवणीने त्याच्या चेहऱ्यावर स्मित उमटले. युवराज दुर्योधनाची भेट होऊन फार दिवस झाले होते.मित्रभेटीचा आनंद कर्णाच्या मुखावर प्रकटला.

कर्णाने आपली पावले उचलली, तो रथाच्या दिशेने जात होता. कर्णाची दृष्टी रथावर स्थिरावली होती.

रथाचे छत व्याघ्रचर्माने मढवले होते, रथ प्रशस्त व देखणा होता.

कर्णाचे लक्ष रथाच्या ध्वजाकडे गेले.

रथावर भगवा ध्वज गरुड-चिह्नासह तिरप्या सूर्यकिरणांत झळकत होता.

दुर्योधनाचे रथाचिह्न रत्नजडित गज होते. गरुड-चिह्न पाहून कर्णाची उत्सुकता वाढली.

कर्ण रथाजवळ येत आहे, हे पाहताच रथसेवक सामोरा आला. कर्णाला प्रणाम करून त्याने सांगितले,

'द्वारकाधीश कृष्णमहाराज आपली वाट पाहत आहेत.'

कृष्णाबद्दल कर्णाने खूप ऐकले होते. सम्राट कंसाचे कंदन यानेच केले होते, रुक्मिणीहरण करणारा, द्वारकानगरी वसवणारा कृष्ण आपणहून कर्णभेटीसाठी येतो, यावर कर्णाचा विश्वास बसत नव्हता. त्याचे सावळे रूप, त्याचा पराक्रम, त्याच्या ठायी वसणारा दैवी गुणसंपन्नभाव यांची वर्णने कर्णाने ऐकली होती.

कृष्णभेटीच्या कल्पनेने कर्णाचे मन मोहरून उठले. काय करावे, कृष्णाला कसे सामोरे जावे, हे त्याला सुचेना. त्याचे पाय जागच्या जागी खिळून राहिले. अधीर डोळे रथाच्या सावलीत स्थिरावलेले कृष्णरूप शोधण्यात गुंतले होते.

कर्णाला फार काळ वाट पाहावी लागली नाही.

रथातून कृष्ण उतरला.

कृष्णाच्या मस्तकी रत्नखचित सुवर्णकिरीट शोभत होता. पीतांबर धारण केलेल्या कृष्णाच्या खांद्यावर हिरवे रेशमी उत्तरीय होते. त्या मेघ-सावळ्या रूपात एक वेगळेच देखणेपण लपले होते. काळ्याभोर विशाल नेत्रांत मोहकता होती.

मुखकमलावर विलसणारे स्मित अपरिचितालाही विश्वास देत होते.

कर्ण ते कृष्णरूप निरखीत होता. नरवेष धारण करून साक्षात परमेश्वरच पृथ्वीतलावर अवतरलल्याचा भास कर्णाला झाला.

कर्णाकडे पाहत कृष्ण जवळ येत होता.

कर्ण तालवृक्षासारखा उंच होता. सिंहासारखी त्याची शरीराकृती बळकट होती.

कृष्णाची दृष्टी कर्णाच्या कवच-कुंडलांवर स्थिरावली होती. गौर कांतीवर सुवर्ण-तेज प्रकाशित व्हावे, तसे ते भासत होते. अंगावरचे उत्तरीय भर उन्हाच्या घामामुळे भिजून शरीराला चिकटले होते; पण त्यामुळे कवचाचे अस्तित्व लपत नव्हते. कवच धारण करणाऱ्या कर्णाचे रूप सहज कुंडलांनी अधिकच सुशोभित झाले होते.

कृष्ण जवळ येताच कर्णाने नम्रतेने प्रणाम केला.

आपले बाहू पसरून कर्णाला आपल्या मिठीत घेऊन कृष्ण म्हणाला, 'अंगराज, कदाचित आपणच माझ्यापेक्षा वयानं मोठे असाल. समवयस्काबरोबर मैत्री करावी. औपचारिकपणा तिथं नसावा. तुम्ही मला अभिवादन करण्याची मुळीच गरज नव्हती.'

कृष्णाच्या मिठीत कर्णाचे उरलेसुरले भान हरपले.

या कृष्णावर गोपी भाळल्या, त्यात नवल ते काय?

बासरीचा आवाजही फिका पडावा, अशी शब्दांची माधुरी...

कर्ण त्या मिठीतून बाजूला होत म्हणाला,

'आपल्या दर्शनानं मी धन्य झालो. वयानं कदाचित मोठा असेन; पण बालवयातच कालियामर्दन केलं, असा आपला पराक्रम. मानवाचं मोठेपण वयानं सिद्ध होत नसतं. ते त्याच्या कर्तृत्वानं सिद्ध होतं. आपलं यश, कीर्ती, सामर्थ्य यांचं गुणगान मी वीरांच्या, नृपांच्या तोंडूनच नव्हे, तर साधुसंतांच्या मुखांतून ऐकलंय्. द्वारकाधीशापुढं नतमस्तक होण्यास मला धन्यता वाटते.' कर्णाने थोडी उसंत घेतली आणि संकोचाने तो म्हणाला, 'माझ्या भेटीसाठी आपण आलात, हे मी माझं भाग्य समजतो. पण त्यासाठी आपल्याला या उन्हात तिष्ठावं लागलं, हा दाह सहन करावा लागला, याचा खेद होतो. आपण मला

निरोप. ...'

'खेद वाटण्याचं काहीच कारण नाही, अंगराज. प्रथम मी तुमच्या प्रासादात गेलो, तिथं माझा यथोचित सत्कार झाला. तिथं कळलं की, तू सूर्योपासनेसाठी नदीतटाकी गेला आहेस. ते कळताच मोह अनावर झाला अन् म्हणूनच तुझं रूप पाहण्यासाठी मी इथवर आलो.'

'माझं रूप?'

'हो! तुझ्या रूपाची कीर्ती मी ऐकली होती. त्यापेक्षा तुझ्या जन्मजात कवच-कुंडलांची. ती पाहण्यासाठी मी आतुर होतो. तुझी कुंडलं केव्हाही दृष्टीस पडली असती. पण तुझं कवचधारी रूप पाहायला हीच वेळ गाठायला हवी होती. तुला भेटत असता, त्या दिव्य कवचाचा जाणवलेला स्पर्श, त्यामुळं तुझ्या अभेद्य मनाची पटलेली साक्ष मी कधीही विसरणार नाही.'

कर्णाच्या मुखावर एक व्यथा तरळून गेली. खिन्नपणे हसून तो म्हणाला,

'कवचकुंडलं! जन्मजात लाभलेली ही सहज कवचकुंडलं. पण याची साक्ष जन्मदात्या मातेला सहन झाली नाही- जन्माला येताच कोणत्या अपराधास्तव त्या अज्ञात मातेनं मला जलप्रवाहात सोडून दिलं, ती कोण होती? तिनं तसं का केलं? त्या मातेचा शोध माझं मन सदैव घेतं. दर्पणामध्ये रूप न्याहाळत असता, ही कवचकुंडलं पाहत असता, माझ्या डोळ्यांसमोर एक वेगळीच आकृती उभी राहते, रूपसंपन्न तेजस्वी माता! पण तिचं रूप दिसत नाही. धुक्याच्या अवगुंठनाखाली ते सदैव झाकलेलं असतं. ज्याला आईनं टाकलं, त्याला कवचकुंडलांचं बळ काय लाभणार? कृष्णा, ती कवचकुंडलं शापित आहेत. प्रवाहावर तरंगत राहणं एवढंच माझ्या दैवी लिहिलं आहे.'

कृष्णाने आपला उजवा हात कर्णाच्या खांद्यावर ठेवला.

कर्णाने पाहिले, अंत:करणाचा ठाव घेणाऱ्या त्या डोळ्यांत कारुण्य प्रगटले होते.

'कर्णा, ते दु:ख मीही जाणतो. त्याची व्यथा मलाही माहीत आहे. कुणाला नदीप्रवाहावर सोडून दिलं जातं, कुणाला नदी ओलांडून पैलतीर गाठावा लागतो. कुणी गवळ्याचं पोर म्हणून नंदाघरी वाढतं, तर कुणाला सूतकुलात आश्रय लाभतो. मातृवियोग दोघांच्याही भाळी सारखाच लिहिलेला. सुटल्या किनाऱ्याची ओढ धरून जीवनाचा प्रवास कधी होत नसतो, अंगराज!'

'कृष्णा, आपल्या जीवनात ते एक स्वप्न आलं होतं, आलं, तसंच ते विरूनही गेलं. आपलं जन्मरहस्य कधीही रहस्य राहिलं नाही, पण मी... मी कोण? मला का टाकलं गेलं? माझ्या मनातून हा विचार कधीच सुटत नाही. पोरकेपणाची व्यथा भारी तीव्र असते.'

कृष्ण काही बोलला नाही. कृष्णाने आपल्या उत्तरीयाने घाम टिपला आणि सूर्याकडे पाहत तो म्हणाला,

'अंगराज, सूर्यदाह सहन करण्याची साधना तुला प्राप्त झाली आहे. ती तुझी तपश्चर्या आहे. माझं तसं नाही. गाई चारण्यासाठी मी रानावनांतून भटकलो, तरी वृक्षसावलीतच मी वाढलो. आपण प्रासादाकडंच जावं, हे बरं, असं वाटत नाही का?'

'क्षमा!' कर्ण गडबडीने म्हणाला, 'माझ्या ध्यानी ते आलं नाही. चलावं.'

कृष्ण व कर्ण दोघे कृष्णरथाच्या जवळ आले. कर्ण म्हणाला,

'आपण पुढं व्हावं. माझा रथ वृक्षराईत ठेवला आहे. तो घेऊन मी आपल्या

मागोमाग येईन.’

‘तुझा रथ माझा दारुक घेऊन येईल. आपण मिळूनच जाऊ.’

कृष्णाने दारुकाला आज्ञा केली.

कृष्णसारथी दारुक आज्ञापालनासाठी वृक्षराईकडे जाऊ लागला.

कृष्णाने कर्णाला रथारूढ होण्याचा संकेत केला.

कर्ण हसला. तो म्हणाला,

‘आपण सारथ्य करणार अन् मी रथात बसणार? ते योग्य होणार नाही. ज्याच्या दैवी ते लिहिलं असेल, तो धन्य होय. आपली कृपा असेल, तर सारथ्य करण्याची अनुज्ञा व्हावी.’

स्मितवदनाने कृष्ण रथामध्ये घातलेल्या शुभ्र आसनावर विराजमान झाला. कर्णाने अश्ववेग हाती घेतले. रथ संत गतीने चालू लागला. रथाला वेग आला. रथाला लावलेल्या घुंगुरमाळांचा आवाज टापांच्या आवाजात मिसळत होता. कृष्णरथाचे जातिवंद उमदे घोडे एका चालीने धावत होते.

चंपानगरीत प्रवेश होताच कृष्णाची दृष्टी चंपानगरीचे सौंदर्य पाहण्यात गुंतली होती.

ती नगरी विस्तीर्ण खंदकाने आणि भव्य तटाने सुरक्षित केली होती. अनेक गोपुरांनी सजलेली भवने दृष्टिपथात येत होती.

रुंद मार्गावर रथ जात असता, चंपानगरीचे प्रजाजन अत्यंत नम्र भावाने व आनंदित मुद्रेने कृष्ण-कर्णांना अभिवादन करीत होते.

कर्णप्रासादाच्या विस्तीर्ण आवारात दोन्ही रथांनी प्रवेश केला. सेवकांची धावपळ उडाली. प्रासादासमोर रथ येताच सेवकांनी अश्वांच्या ओठाळ्या पकडल्या. कृष्णापाठोपाठ कर्ण उतरला.

कृष्ण कौतुकाने म्हणाला,

‘कर्णा, तुझं सारथ्य खरोखरच अप्रतिम आहे. या रथाचे घोडे शैब्य आणि सुग्रीव जातीचे आहेत. सूक्ष्म संकेतही त्यांना कळतो. ते शिक्षण त्यांना दिलं आहे. तुझ्या हातांच्या ओढीत थोडा जरी नवखेपणा जाणवला असता, तरी ते या अश्वांनी ओळखलं असतं. रथ आवरला गेला नसता.’

‘त्यात माझं कसलं कौतुक!’ कर्णाने हसून साथ दिली. ‘आपलं अलौकिक सारथ्य ही आपण आत्मसात केलेली कला आहे. मी तर सूतकुलात वाढलेला. सारथ्य आणि रथपरीक्षा हे दोन्ही आमचे सहजस्वभावच बनलेले असतात.’

‘तेही भाग्य मोठंच! कर्णा, वासनांचे अश्व जीवनाच्या रथाला जुंपले असता, तो रथ सदैव कह्यात ठेवणं ही सामान्य गोष्ट नव्हे.’

कृष्णाची दृष्टी प्रासादाच्या पायऱ्यांकडे गेली.

त्या पायऱ्यांवर रौप्यकलश घेऊन दासी उभ्या होत्या. त्यांच्या मागे पूजेचे तबक घेऊन वृषाली उभी होती.

कृष्ण पायऱ्यांनजीक जाताच दासींनी कृष्णाच्या पायांवर पाणी ओतले. वृषालीने कृष्णाला कुंकुमतिलक लावला.

कर्णपत्नी वृषालीला आशीर्वाद देत कृष्ण म्हणाला,

'या उपचारांची काही गरज नव्हती.'

वृषाली स्मितवदनाने म्हणाली,

'आपण अचानक आलात, त्या वेळी आपलं स्वागत मनाजोगं घडलं नाही. ते मनाला लागून राहिलं होतं.'

'परकेपणा मनात असता, तर आमंत्रित नसता, पूर्वपरिचय नसता आलोच नसतो.'

कर्णासह कृष्ण पायऱ्या चढत असता, पायऱ्यांवर एक चार वर्षांचा कुमार उभा होता. कर्णाने पाहताच त्याच्या चेहऱ्यावर हास्य विलसले आणि तो कर्णाकडे धावला.

कर्ण म्हणाला,

'वसू, महाराजांना वंदन कर.'

लहान वृषसेनाने एक वेळ कृष्णाकडे पाहिले आणि धीटपणे पुढे होऊन त्याने आपले मस्तक कृष्णचरणांवर ठेवले.

प्रेमभराने वृषसेनाला उचलून घेत कृष्ण म्हणाला,

'अंगराज, ही तर आपली प्रतिमा दिसते! नाव काय?'

'वृषसेन!'

उचललेल्या वृषसेनाकडे कौतुकाने पाहत कृष्णाचे शब्द उमटले,

'अंगराज! हा तुमच्या वळणावर गेला, तरी एक उणीव आहे. तुमच्यासारखी कवचकुंडलं याला नाहीत.'

कर्णाने हसून उत्तर दिले,

'ज्याला मातापित्यांचं छत्र नसतं, त्याला कवचकुंडलं रक्षणार्थ मिळतात.'

'खरं आहे! आपल्यासारख्या पराक्रमी वीरपित्याचं छत्र लाभलं असता, तो कवचकुंडलं मागेल कशाला? अंगराज, आपली पुत्रसंपदा?'

'दोघे हस्तिनापुरात असतात.'

'हस्तिनापूर?'

'हो! ज्यांनी माझं संगोपन केलं, मला वाढवलं, ते अधिरथ-राधाई हस्तिनापुरात राहतात. ते पुत्रहीन होते. त्यांना मी गंगेच्या प्रवाहावरून वाहत जाताना सापडलो. मी सापडल्यानंतर राधाईला पुत्रप्राप्ती झाली, अधिरथ-धृतराष्ट्रमहाराजांचा जुना स्नेह आहे. हस्तिनापुराच्या रथशाळेची जबाबदारी तेच पेलतात.'

'तुम्ही मला तुमच्या मुलाबद्दल सांगत होतात.'

'तेच सांगत आहे. माझ्या प्रथम पत्नी ऊर्मिलेला दोन पुत्र. शत्रुंजय आणि वृषकेतु. पण वृषकेतु लहान असतानाच ऊर्मिलेनं या जगाचा निरोप घेतला. माझा वृषालीशी विवाह झाला. त्यानंतर मी या नगरीच्या रक्षणार्थ इकडं आलो. पण वृषकेतु राधाईनं ठेवून घेतला. माझी आठवण, म्हणून.'

'आणि शत्रुंजय?'

'तो युवराज दुर्योधनपुत्रांच्या सहवासात वाढत आहे.'

बोलत-बोलत कर्णासह कृष्णाने कर्णप्रासादात प्रवेश केला.

अनेक दासदासींनी गजबजलेला तो प्रासाद नानाविध उपचारसंभाराने सज्ज होता.

कृष्णाला कर्णाच्या सहवासात प्रसन्नता लाभत होती.

क्षेमकुशल चालले असता कर्णाने विचारले,

'द्वारकेपासून एवढया दूरवर आपण फक्त माझ्यासाठी...'

'नाही, अंगराज, तसं मुळीच नाही. तपश्चर्येसाठी मी कामरूप देशी गेलो होतो. त्याच भूमीचा हा भाग. या अंगदेशाला पूर्वी कामाश्रय असं नाव होतं. शिवाच्या क्रोधानं भस्मीभूत होऊ, या भीतीनं पळणाऱ्या मदनानं जिथं आपलं अंग टाकलं, तो हा अंगदेश. सोळा महाजनपदांपैकी अंग हे एक महाजनपद आहे. या उपेक्षित, पण पुण्यभूमीला तुझ्यामुळं परत समृद्धता लाभली.'

'द्वारका मी पाहिली नसेल, पण तिचं वैभव मी ऐकलं आहे. चंपानगरी त्यापुढं सामान्यच.'

'वैभवानं नगरीला शोभा येत नसते, कर्णा! गुणसंपन्न माणसांच्या वास्तव्यानं भूमी पुनीत होते. तुझी कीर्ती भूमीच्या साऱ्या परिसरात पसरली आहे. ज्या भूमीत याचकांची दुर्लभता आहे, तो खरा समृद्ध प्रदेश. तुझ्यामुळं वैद्यनाथपासून भुवनेश्वरापर्यंत पसरलेला हा अंगदेश यात्रेचा प्रदेश बनला आहे.'

कर्णाच्या मुखावर एक वेगळेच स्मित प्रगटले. त्याने विचारले,

'माझ्यासारख्या सूतकुलात वाढलेल्यानं पुण्यसंचयासाठी तपश्चर्या करावी. पण आपण तर जन्मजात देवगुणसंपन्न. आपण तपश्चर्या करण्याचं कारण?'

'राधेया, तपश्चर्या टळलीय् कुणाला? या पृथ्वीतलावर जन्माला येणाऱ्या प्रत्येक प्राणिमात्राचा उद्धार होतो, तो तपश्चर्येमुळंच. धनुर्विद्या शिकावी, तर द्रोणाचार्यांकडं. रथ सज्ज करावा, तर अधिरथांनी. मल्लविद्या पाहावी, तर जरासंधाकडं. ही कीर्ती कशामुळं लाभली? त्या विद्येची अखंड कास हेच कारण नाही का? तपश्चर्या म्हणजे तरी दुसरं काय? पराक्रम, कीर्ती, यश यांचं बळ तपश्चर्येतच लपलेलं असतं. महान तपस्वी रावणाचं बळ तपश्चर्येतच दडलेलं होतं, सूर्यचंद्रांसह अंतरीक्षातील ग्रह अंकित करूनही त्याची नित्योपासना कधी ढळली नाही.'

'एखादा ग्रह अंकित झाल्यावर नित्योपासनेची गरज काय?'

'हाच प्रश्न एका ऋषिवरांनी रावणाला विचारला होता. एके दिवशी संध्यासमयी एक ऋषिवर रावणाला भेटावयास गेले. त्या वेळी अस्ताचलाला जाणाऱ्या सूर्याला रावण वंदन करीत होत. ते पाहून त्या ऋषिवरांना आश्चर्य वाटलं व त्यांनी हाच प्रश्न रावणाला विचारला. रावण म्हणाला,

“महामुनी, या तपश्चर्येत जेव्हा खंड पडेल, तेव्हा रावणाचं यशही संपेल. सुरुवातीला माझी तपश्चर्या चालू होती. तिचा लौकिक हळूहळू त्रिभुवनात पसरत होता. माझी लंका सुवर्णमय झाली. प्रजाजन तृप्त झाले, तरी तपश्चर्या अखंड चालूच राहिली. एकदा मी पाताळावर स्वारी केली व पाताळ जिंकलं, ती वार्ता स्वर्गात पोहोचली. स्वर्गीय देव म्हणाले, 'रावण तपस्वी आहे. पाताळावर राज्य करणं त्याचा अधिकार आहे. त्याच्या सत्तेखाली पाताळ सुरक्षित आहे.'

माझी तपश्चर्या तशीच चालू होती. काही वर्षांनी मी पृथ्वी जिंकली. स्वर्गीच्या देवांनी त्यालाही मान्यता दिली. ते म्हणाले, 'रावण महातपस्वी आहे. पृथ्वीवर राज्य करण्याचा त्याचा अधिकार आहे.'

'माझ्या तपश्चर्येत खंड नव्हता; अन् एके दिवशी स्वर्गीचे देव कारण नसता भयभीत झाले. मी स्वर्गावर स्वारी करणार, अशी वदंता उठली होती. अमृतपानात मग्न असलेले देव खडबडून जागे झाले. युद्धाची तयारी चालू झाली; पण मी स्वर्गावर चढाई केली

नाही. देवांनी नि:श्वास सोडला. असं दोन-तीनदा घडलं अन् एकदा अचानक हाती होतं, ते सैन्य घेऊन मी स्वर्गावर चाल केली. स्वर्गीचे देव त्या वार्तेनं पुरे घाबरले. स्वर्गात लढाई करण्याचा प्रसंगच उद्भवला नाही. लपलेल्या देवांना शोधून काढणं एवढंच मला करावं लागलं.'

'ती रावण-पराक्रमकथा ऐकून ऋषिवरांना शंका उद्भवली. त्यांनी विचारले, 'वीर रावणा, याचा अर्थ तुझा पराजय केव्हाच होणार नाही का?'

"रावणाला त्या प्रश्नाचं कौतुक वाटलं. तो क्षणभर विचारात पडला. निश्चयी स्वरात त्यानं उत्तर दिलं,

"महाराज, या पृथ्वीतलावर जन्मलेले सारेच नाशवंत. त्यांच्या पराजयाचा एक दिवस निश्चित झालेला असतो. माझा पराजय जरूर होईल; पण तो देवांच्या हातून नव्हे. ज्यांनी धार्ष्ट्य गमावलं आहे, त्यांना परत उभं राहायचं बळं कुठलं? माझा पराजय हे देव करणार नाहीत. केव्हा तरी कोणा सामान्य माणसालाच माझं मोठेपण असह्य होईल. स्वत:चा विश्वास धरून तो रावणाला आह्वान देईल. त्या वेळी साध्या माकडांच्या मदतीनंही तो वीर या रावणाचा सहज पराभव करील."

कृष्णाने रावणकथा संपवली व तो म्हणाला,

'अन् घडलंही तसंच. एका क्षुद्र मोहापोटी महान तपस्वी रावणाचा तोल गेला. त्यामुळंच रावणाचा वध घडला. तोही देवांच्या हातून नव्हे. त्यासाठी देवालासुद्धा सामान्य मानवरूपच धारण करावं लागलं अन् वानरांच्या साहाय्यानंच ते अघटित घडलं. तपश्चर्येचा प्रभाव एवढा बलाढ्य असतो.'

कृष्णाच्या बोलण्याने मुग्ध झालेल्यांना वेळकाळाचे भान राहत नव्हते. कृष्णसहवास हे परमेश्वरी वरदान वाटत होते.

चंपानगरीत नवचैतन्य प्रगटले होते. कृष्णाबरोबर आलेल्या रक्षकदळाच्या आतिथ्यात सारी चंपानगरी गुंतली होती. भोजनासाठी नाना तऱ्हेची मृगया राजप्रासादात नित्य येत होती. नृत्यगायनाने कृष्णाचे मनोरंजन केले जात होते. वृषसेन तर कृष्णामागून छायेसारखा वावरत होता.

भल्या पहाटे कर्णाला जाग आली. एक मंत्रमुग्ध करणारा नाद त्या वातावरणात भरून राहिला होता. कर्णाने कानोसा घेतला. सारे मन आनंदाने मोहरून उठले. कर्णाने पाहिले, शेजारी वृषाली शांतपणे झोपी गेली होती.

कर्णाने हळुवार हाताने तिच्या गालांना स्पर्श केला.

वृषालीला जाग आली. मंदस्मित करीत तिने कर्णाचा हात पकडला आणि आपल्या गालावर ठेवून घेतला. तृप्ततेने तिने नेत्र घेतले.

कर्णाने हाक मारली,

'वसू ऽ ऽ'

'अं!'

'जागी हो, वसू. जेव्हा भाग्य दाराशी येतं, तेव्हा माणसानं झोपू नये.'

त्या शब्दांनी वृषाली खडबडून जागी झाली. उठत तिने विचारले,

'कसलं भाग्य?'

'ऐक!'

दोघेही ऐकत होते. त्या नादाने दोघांची मने भरून गेली होती.

पहाटेचा प्रकाश फैलावू लागला होता. महालातील समईचा उजेड मंदावत होता. वृषालीने विचारले,

'वृषसेन कुठं आहे?'

वृषसेनाची जागा रिकामी होती.

कर्ण हसला. आपले उत्तरीय घेत तो म्हणाला,

'चलऽ ऽ'

कर्णापाठोपाठ वृषाली जात होती. कृष्णमहालानजीक जात असता तो आवाज स्पष्ट होत होता. कृष्णमहालाच्या दाराशी उभे असलेले सेवक अदबीने बाजूला झाले. कर्ण-वृषालीची पावले द्वाराशीच खिळली.

महालात शय्येवर कृष्ण बसला होता. डोळे मिटून तो बासरी वाजवीत होता. त्याच्यासमोर वृषसेन एकाग्रपणे ऐकत होता. अमृतधारा वर्षाव्यात, तसे ते सूर झरत होते.

बासरीचा सूर थांबताच कर्ण भानावर आला.

कृष्णाचे शब्द कानांवर पडले,

'अंगराज, दाराशी उभे का? या. आत याऽ ऽ. माझ्या बासरीनं तुम्हांला जागं केलं, वाटतं!'

नादमुग्ध जरूर केलं. जागं केलं, की नाही, ते माहीत नाही.'

कृष्णाने वृषसेनाला जवळ ओढले. त्याला जवळ घेत त्याच्या कुंतलांवरून हात फिरवीत तो म्हणाला,

'हा वृषसेन मोठा गोड आहे. आज बासरी वाजवली, ती त्याच्यामुळंच. काल वस्त्रं काढण्यासाठी संदूक उघडली. त्यातली बासरी यानं पाहिली. ती वाजवण्याचा हट्ट धरला. कोणी जागे नसता मी वाजवीन, असं वचन दिलं. पण याचा ध्यास मोठा. भल्या पहाटे यानं जागं केलं.'

'आपल्याला त्रास दिला नं?' वृषाली म्हणाली.

'त्रास नाही. आनंद दिला. लहानपणी गाई राखीत रानावनांतून फिरत असे, तेव्हा ते एकाकीपण घालवण्यासाठी ही बासरी हाती घेतली. अजाणता सूर लाभले. निरागस मनांना आनंद देता आला. आता बासरी हाती घ्यायला उसंतच राहिली नाही. घेतली, तरी आता निरागस श्रोता लाभत नाही.'

'भान हरपावं, असा निरागस गोडवा त्या बासरीत भरलेला आहे.'

'नाही, अंगराज!' बासरी उंचावत कृष्ण म्हणाला, 'या बासरीत काही नाही. ही एक शुष्क वेळूची पोकळ नळी. छिद्रांकित. कुणीतरी सावधपणे फुंकर मारावी लागते. छिद्रांना जपणाऱ्या हळुवार बोटांनी पेलावी लागते. तेव्हाच मनातले सूर उमटतात. या बासरीत काही नसतं.'

कृष्णाच्या चेहऱ्यावर एक स्वप्न तरळून गेलं.

'कर्णा, मानवी जीवन तरी काय असतं? या देहाच्या बासरीत हळुवार मनाची नाजूक फुंकर घातली, की हृदयांतरीच्या व्यथादेखील नादमुग्ध बनून जातात.'

वृषसेन कृष्णाजवळ गेला. त्याच्याकडे कृष्णाची दृष्टी वळताच तो म्हणाला,

'महाराज, मला बासरी वाजवता येईल?'

कृष्णाने वृषसेनला जवळ घेतले. त्याच्या केसांवर हात फिरवीत कृष्ण म्हणाला,

'नको. वृषसेन, या बासरीचा हट्ट धरू नकोस. या बासरीत फुंकलेल्या फुंकरीनं श्वास अधुरा बनतो आणि उमटलेल्या सुरांना वेगळीच व्यथा लाभते.'

कृष्णाच्या बदललेल्या भावाने सारेच चकित झाले.

कृष्णाचे लक्ष महालात आलेल्या सूर्यकिरणांकडे गेले. वृषसेनाला दूर करीत तो उद्गारला,

'सूर्यवंदन राहिलं!'

- आणि एवढं बोलून सूर्यवंदनासाठी तो सज्जाकडे जाऊ लागला.

# २

**दो**न प्रहर टळत असता कृष्णाला जाग आली. दासींनी दिलेल्या जलाने मुखप्रक्षालन करून कृष्ण माघारी वळला. उद्यानाच्या बाजूने हसण्याचा आवाज कानांवर आला. त्या आवाजाच्या रोखाने कृष्ण सज्जाकडे गेला. सज्जावर उभा राहून कृष्णाने पाहिले. प्रासादाच्या जवळच उद्यानामध्ये एका जागी त्याची दृष्टी स्थिरावली.

उद्यानात एका मोकळ्या जागी एक वेताचा मोर उभा होता. त्याच्यापासून थोड्या अंतरावर वृषसेन आपले लहान धनुष्य घेऊन आकर्ण प्रत्यंचा खेचीत होता. त्याच्या मागे महाबाहू कर्ण उभा होता.

बाण सुटला आणि वेताच्या मोराच्या मानेतून आरपार गेला.

वृषसेनाच्या चेहऱ्यावर विजयाचे हास्य पसरले. त्याने आनंदाने कर्णाकडे पाहिले.

त्याच वेळी सज्जातून कृष्णाचा आनंदोद्गार उमटला,

'धन्य धन्यऽ ऽ'

कर्ण-वृषसेनांनी एकाच वेळी वर पाहिले, कृष्णाला पाहताच कर्ण माघारी वळला. ते पाहुन कृष्णाने सज्जावरून हाक दिली,

'अंगराज, थांबा! मीच खाली येतो.'

कृष्ण उद्यानात आला, तेव्हा कर्ण त्याला सामोरा गेला.

कर्ण म्हणाला,

'क्षमा असावी. आपली निद्रा झाल्याचं ध्यानी आलं नाही.'

'क्षमेची काहीच गरज नाही. उलट, वृषसेनाला देत असलेलं शिक्षण पाहून कौतुक वाटलं. हा जरा मोठा झाला की, आश्रमात जाऊ लागेल. तोवर शस्त्रविद्येत काही शिकण्याजोगं राहणार नाही.'

'वृषसेनाला त्याची विद्या त्यालाच मिळवावी लागेल. त्याला हवी ती विद्या त्याला कधीच शिकवली जाणार नाही.' कर्ण तुटकपणे म्हणाला.

'का? द्रोणाचार्यांच्या हाती तुम्ही विद्या मिळवली. तशीच हा कुणातरी श्रेष्ठ गुरूच्या हातून मिळवील.'

'ते मी अनुभवलंय्. अधिरथ धृतराष्ट्र महाराजांचे स्नेही. त्यांच्या कृपेमुळं राजपुत्रांसह आश्रमात जाण्याचं भाग्य मला लाभलं. एकदा पोपटाचं लक्षय समोर ठेवलं होतं. गुरुदेवांनी डोळा टिपण्याची आज्ञा दिली. एका रेषेत उभ्या असलेल्या आम्हां मुलांवर गुरुदेवांची दृष्टी फिरली. मी माझं धनुष्य सरसावून उभा होतो. गुरुदेव मला मागे होण्याची आज्ञा करीत म्हणाले,

"राधेया, मागं हो! सूतपुत्रांना एकाग्रता लाभत माही. युवराजांचा लक्षयभेद नीट बघ. त्यांचं अनुकरण कर. त्यातच कल्याण आहे."

कर्णाच्या चेहऱ्यावर त्या आठवणीने संताप प्रगटला होता. त्याने आपले धनुष्य हाती घेतले. वेताच्या मोराकडे बोट दाखवीत कर्ण म्हणाला,

'तो डोळा पाहा.'

कर्णाने आपले धनुष्य पेलले. बाण लावून प्रत्यंचा खेचली. कर्णाच्या दंडावरच्या रत्नजडित केयूरावर हेलावणारा मोत्याचा गोफ स्थिर झाला. 'सप' असा आवाज करीत बाण घोंगावला आणि मोराच्या डोळ्याचा छेद घेऊन आरपार गेला. कर्ण समाधानाने मोराकडे जात होता.

कृष्णाचे कुतूहल जागृत झाले. दोघे मोराजवळ गेले.

मोराच्या दोन्ही डोळ्यांचा बरोबर छेद बाणाने घेतला होता.

त्या डोळ्यांकडे बोट दाखवीत कर्ण म्हणाला,

'या डोळ्यानं खूप शिकवलं. या पृथ्वीतलावर ज्ञान फक्त तपश्चर्येच्याच द्वारा मिळतं. गुरुकृपा आम्हांला अवगत नाही. सूतपुत्रांना गुरुकृपा कधी लाभत नाही. गुरुजनांची विद्या फक्त राजपुत्रांनाच दिली जाते. रावणकथा सांगितलीत ना! तीच खरी. सूतपुत्रांना तपश्चर्येच्या द्वारे ज्ञानाची कवाडं उघडली जातात. द्रोणाचार्यांनी ब्रह्मास्त्र शिकविण्याचं नाकारलं, म्हणून मी गुरुदेव परशुरामांकडं गेलो. ज्ञानासाठी असत्याची कास धरली. भृगुकुलोत्पन्न ब्राह्मणपुत्र म्हणून त्यांनी माझा स्वीकार केला. ब्रह्मास्त्र मिळालं; पण त्याचबरोबर गुरुसेवेसाठी पाळलेल्या संयमातून दोन उग्र शाप नशिबी आले. एकलव्याला विद्या मिळालीच नाही, पण मानलेल्या गुरुभक्तीमुळं त्याला आपल्या अंगठ्याला मुकावं लागलं. नाही, महाराज, या वृषसेनाला विद्या मिळवायचीच असेल, तर स्वत:च्याच बाहुबळावर ती प्राप्त करून घ्यावी लागेल.'

थोडी उसंत घेऊन आपल्या बोलांनी चकित झालेल्या कृष्णाकडे खिन्नपणे पाहत कर्ण म्हणाला,

'कोरड्या विहिरीत पडलेली राजपुत्रांची विटी बाणानं बाहेर काढून देऊन द्रोणाचार्यांनी कौरव-राजसभेत मानाचं स्थान मिळवलं असेल; पण ज्याच्या जीवनाची विहीर जातीच्या, स्नेहाच्या ओलाव्याअभावी कोरडी असेल, त्याच्या मनाची विटी बाहेर काढायला समर्थ असा गुरू या धरणीवर मिळत नाही, ते कष्ट त्यानंच घ्यायला हवेत.'

'अंगराज, द्रोणाचार्यांनी शिकवलं नसेल, म्हणून तुझं ज्ञानार्जन थोडंच थांबलं? गुरूचा जिव्हाळा मिळाला नसेल; पण अजोड मित्रप्रेम लाभलं ना? त्याच मित्रप्रेमापोटी आज तू हे अंगराज्य भोगतोय्स ना? तिथं तर तुझं सूतकुल आडवं आलं नाही?'

कृष्णाच्या शब्दांनी कर्णाचा सारा अहंकार जागा झाला. आपले नेत्र कृष्णावर स्थिरावीत तो म्हणाला,

'दुर्योधनाच्या मैत्रीचा मला अभिमान वाटतो... अन् का न वाटावा? शस्त्रस्पर्धेच्या वेळी सारे युवराज स्पर्धेमध्ये भाग घेत होते. त्यांचं वारेमाप कौतुक होत होतं अन् मी ते सारं पाहत मागं उभा होतो. वीरत्वाची उणीव होती, म्हणून नव्हे, ते वीरांचं रिंगण होतं; अशी माझी समजूत होती अन् म्हणूनच मी अर्जुनाला आह्वान दिलं. अर्जुनाच्या साहाय्याला त्या अन्नाचे मिंधे असलेले कृपाचार्य धावले आणि सर्वांदेखत त्यांनी मला माझ्या कुलाचा उच्चार करावयास सांगितला. मला माझ्या कुलाची लाज वाटली नाही. पण कृपाचार्यांनी केलेल्या वर्तनाचा मला संताप आला होता. ज्या अधिरथांच्या कुलात मी वाढत होतो, ते कुल साऱ्या हस्तिनापुराला माहीत होतं. आश्रमात प्रवेश करतानाच युवराजांनाच नव्हे, तर आश्रितांनाही कुलोच्चार करावा लागतो. एका युवराजाच्या प्रतिष्ठेसाठी शिष्याची अप्रतिष्ठा करू पाहणारे गुरू कसले?

ज्या वेळी सारे माझा तेजोभंग आनंदानं पाहत होते, तेव्हा दुर्योधन धावला अन् त्या क्षणी त्यानं अंगदेशाचा अभिषेक करून मला राज्य दिलं.'

'ते मित्रप्रेम मीही जाणतो. कुणीही तृप्त व्हावं, असंच हे प्रेम आहे.'

'नाही. या कर्णानं आजवर कुणाचंच दान घेतलं नाही. अंगराज्य प्राप्त होऊनही मी ते पद कधी स्वीकारलं नाही. दुर्योधनासह मी चित्रांगदेच्या स्वयंवराला गेलो असता माझ्या संकेतानं दुर्योधनानं राजकन्येचं हरण केलं. तेव्हा तिथं जमलेल्या नरशार्दूलांच्या विरोधाला मी एकटा सामोरा गेलो. जरासंधाचं मल्लद्वंद्वाचं आह्वानही मी स्वीकारलं. मी विजयी झालो, तेव्हा जरासंधानं आपली मालिनी नगरी मला अर्पण केली. तीच ही चंपानगरी. स्वपराक्रमानं जेव्हा मिळवलं, तेव्हाच मी अंगदेशाचं आधिपत्य स्वीकारलं.'

'तोही पराक्रम मी ऐकलाय्.' कृष्ण म्हणाला, 'ज्या जरासंधाच्या आक्रमणाच्या भीतीनं मी यादवांसह मथुरा सोडली अन् द्वारका वसवली, त्याच जरासंधाशी द्वंद्वातून सख्या मिळवणं हा सामान्य पराक्रम नव्हे.'

कृष्णस्तुतीने कर्णाचे उद्विग्न मन थोडे शांत झाले. त्याचे मन संकोचले. गडबडीने विषय बदलीत तो म्हणाला,

'एक विनंती आहे...'

'बोला.'

'आपल्या मनात माझ्याबद्दल स्नेहभाव असेल, तर कृपा करून मला बहुमानार्थी संबोधू नये.'

'ठीक.'

'अन् माझ्याबरोबर चंपानगरीच्या फेरीला आपण यावं.'

'फेरी?'

'हो! आपण नगरीत आल्याचं साऱ्यांना कळलंय्! नगरवासी आपल्या दर्शनाला उत्सुक आहेत. त्याचबरोबर रथशाला, गोधनही आपल्याला पाहता येईल.'

'आनंदानं येईन! राजासह प्रजा पाहण्याचा आनंद कोण सोडील?'

कर्णरथ सज्ज झाला होता. मागे-पुढे रक्षक अश्वदल दौडत होते, कर्ण रथाचे सारथ्य करीत होता. कृष्णदर्शनासाठी राजरस्ते माणसांनी फुलून गेले होते.

कृष्णाने कर्णासह चंपानगरीचे दर्शन घेतले. रथशाला, गोधन पाहिले.

माघारी येत असता कर्णाचा रथ एका जुन्या वास्तूसमोर थांबला. त्या वास्तूच्या दाराशी रक्षक उभे होते. कर्णापाठोपाठ कृष्ण उतरला. रक्षकांनी तत्परतेने द्वार उघडले. आत जाताच भव्य चौक दृष्टीस पडला. त्या चौकात मध्यभागी पारिजात फुलला होता. वृक्ष जुनाट वाटत होता. चौकाच्या समोर घोटीव खांबांनी साकारलेला प्रशस्त सोपा होता. कर्ण पायऱ्या चढून सोप्यावर गेला. सायंकाळच्या वातावरणात सारा परिसर गूढ वाटत होता. कृष्णाचे लक्ष त्या सोप्यावर ठेवलेल्या सुबक, पण आकाराने लहान अशा रथावर खिळले होते. त्या रथाच्या आरीपासून मेघडंबरीपर्यंत प्रत्येक भाग नक्षीने कोरला होता.

कृष्णाला राहवले नाही. त्याने विचारले,

'कर्णा, ही वास्तू कुणाची?'

आपल्याच तंद्रीत गुंग असलेला आणि कृष्णाचे अस्तित्वही विसरलेला कर्ण त्या प्रश्नाने भानावर आला. मागे वळून तो उद्गारला,

'अं?'

'ही वास्तू कुणाची?'

'आमची! कृष्णा, याच जागेत माझं बालपण गेलं. सूतांची नगरी म्हणून या चंपानगरीचा लौकिक. नदीप्रवाहावर मी वाहत आलो असेन; पण राधाईच्या प्रेमामुळं मला केव्हाच पोरकेपण जाणवलं नाही. माता-पित्यांचं प्रेमसुद्धा त्यापेक्षा काही मोठं असेल, असं मला वाटत नाही. मी सापडल्यानंतर राधाईला मुलं झाली, पण या जिव्हाळ्यात उणेपणा पडला नाही.'

हे सांगत असता कर्ण त्या रथावरून हात फिरवीत होता. कर्ण भरल्या आवाजात म्हणाला,

'मी लहान असताना तातांनी हा रथ माझ्यासाठी घडवला होता. केव्हा माहीत आहे? मी शिक्षणासाठी आश्रमात गेलो. माझा वियोग तातांना, राधाईला सहन होईना. भरला संसार असूनही ते माझ्याविना एकाकी बनले. ते मन गुंतवण्यासाठी तातांनी उत्कृष्ट कारागीर बोलावले. तातांच्या देखरेखीखाली रथाचं काम सुरू झालं, रथ तयार झाला; पण एक फार मोठी चूक झाली.'

'कोणती?'

कर्ण हसला.

'बालवयाच्या कर्णाचं रूप डोळ्यांसमोर ठेवून त्याच्याकरता केलेला रथ. मी आश्रमातून आलो, तो मोठा होऊन. आमच्यांतला हा नेहमीचाच थट्टेचा भाग होऊन राहिलाय्.'

कर्ण बोलता-बोलता परत गंभीर झाला. त्याचे हास्य विरले. नेत्र पाणावले.

'पण हा रथ इथं असाच राहिला. तातांनी स्वतःच्या मुलांनाही तो वापरू दिला नाही. तातांची, राधाईची आठवण झाली की, मी इथं येतो. ही वास्तू होती, तशी जतन करण्यासाठी मी जपतो.'

ती रथाची कथा ऐकून कृष्णही अस्वस्थ झाला. कर्णाच्या खांद्यावर हात ठेवीत तो म्हणाला,

'कर्णा, या जीवनात साऱ्या इच्छा-आकांक्षा यांचं हेच होतं. त्यांची स्वप्नं उराशी बाळगून असेच सुबक देव्हारे आपण मनात तयार करीत राहतो; पण त्या इच्छा-आकांक्षा साकार होतात, तेव्हा त्यांनी वेगळाच आकार धारण केलेला असतो. त्यांच्यासाठी मनात कोरलेले देव्हारे पार अपुरे ठरतात. त्या देव्हाऱ्यांना शेवट अडगळीचंच स्वरूप येतं.'

कर्णाने कृष्णाकडे पाहिले आणि तो म्हणाला,

'सत्य असलं, तरी पचवणं भारी कठीण जातं. अंधार पडू लागला. जाऊ आपण.'

'दिवेलागणीच्या वेळी कृष्णासह कर्ण प्रासादावर आला.

रात्री भोजन झाल्यावर कृष्णाने दुसऱ्या दिवशी प्रयाणाचा बेत सांगितला.

कर्ण-वृषाली ते ऐकून चकित झाली.

कर्ण म्हणाला,

‘आपल्या आदरातिथ्यात काही उणीव पडली असली, तर क्षमा करावी, पण आपला सहवास अधिक लाभावा, असं वाटतं.’

‘कर्णा, राजैश्वर्यानं युक्त असलेल्या तुझ्या प्रासादात उणीव कसली? तुमचा सहवास मला प्रियच आहे. पण द्रुपदानं आपल्या कन्येचं स्वयंवर मांडलंय्. द्रुपद माझा स्नेही. त्या स्नेहभावासाठी मला तिकडं जाणं आवश्यक आहे. स्वयंवराचं आमंत्रण तुलाही असेल ना?’

‘हो!’

‘मग तू येणार नाहीस?’

‘नाही.’

‘कारण?’

‘द्रुपदाचा माझा स्नेह नाही... अन् वीरांनी स्वयंवराला जावं, ते जिंकण्यासाठी.’ वृषालीकडे पाहत कर्ण म्हणाला, ‘त्यासाठी आता स्वयंवर धुंडण्याची मला गरज नाही. मी माझ्या जीवनात तृप्त आहे.’

कृष्ण प्रसन्नपणे हसला.

वृषाली लाजली.

कर्णाने विचारले,

‘पण उद्याच...’

‘हो! मी स्वयंवरासाठी जात नाही. स्वयंवराच्या तयारीसाठी मला आधी जावं लागेल.’

‘द्रूपदराजकन्या सुंदर आहे?’

‘सुंदर हा शब्द फार अपुरा! ती कन्या द्रुपदाची नव्हे. द्रुपदानं केलेल्या यज्ञातून उद्भवलेली ती तेजस्वी कन्या आहे.’ वृषालीकडे पाहत स्मित करीत कृष्ण म्हणाला, ‘वृषाली, यानं बेत बदलला, तरी याला स्वयंवराला पाठवू नकोस. ती याज्ञसेनी कदाचित याच्या रूपावर, कवच-कुंडलांवर भाळून जाईल. कर्णा, मी जातो, म्हणून वाईट वाटून घेऊ नकोस. भेट, किती कालाची घडली, यापेक्षा, ती कोणत्या भावनेनं घडली, याला महत्त्व असतं. तुमचा हा जिव्हाळा माझ्या मनातून कधीच सरणार नाही.’

दुसऱ्या दिवशी पहाटेच्या वेळी प्रासादसौधावर कृष्ण, कर्ण, वृषसेन, वृषाली उभे होते. प्रासादासमोर कृष्णदळ सुसज्ज उभे होते. पूर्वक्षितिजावर रुपेरी कड दिसू लागली.

कृष्ण म्हणाला,

‘कर्णा, आता निरोप दे.’

‘आपल्याबरोबर मी थोडं अंतर येतो ना!’

‘नको! नरोप कधीही मंद गतीनं घेऊ नये. त्यानं दु:ख वाढतं. निरोप शक्य तेवढ्या लौकरच संपवावा. तुम्ही प्रासादाच्या द्वारीही येऊ नका. इथंच उभे राहा. तुझा निरोप घेत असता बराच काल तुम्हांला पाहता येईल. मग मी येऊ?’

कृष्णाच्या त्या बोलण्याने कर्णाचा कंठ दाटून आला. दोन दिवसांचा अल्प सहवास, पण अनेकानेक वर्षांच्या दाट मैत्रीसारखा तो भासत होता.

कर्ण म्हणाला,

'कृष्णा, मी काय सांगणार? राहा, म्हटलं, तर अधिकार गाजवल्यासारखं होतं; जा, म्हटलं, तर उपेक्षा भासते; मनाला येईल, तसं कर, म्हटलं, तर उदासीनता दिसते. एवढंच सांगावंसं वाटतं की, आपण कुठंही असलो, तरी जेव्हा केव्हा आपल्याला एकमेकांची आठवण येईल, तेव्हा ती चांगल्या भावनेनं यावी. त्या आठवणीनं भेटीचा आनंद वाढावा.'

कृष्णाने कर्णाला एकदम मिठीत बद्ध केले. त्याच्या पाठीवरून हात फिरवीत तो म्हणाला,

'तसंच होईल. तसंच घडेल.'

मिठीतून दूर होताच वृषालीने वंदन केले.

कृष्णाचा हात उंचावला गेला; पण शब्द उमटले नाहीत.

वृषसेन पुढे झाला. त्याने कृष्णचरणांवर मस्तक ठेवले.

कृष्णाने त्याला उचलून घेतले. त्याला आपल्या छातीशी लपेटत तो म्हणाला,

'मित्रा, याला जप.'

वृषसेनाला खाली ठेवून कृष्णाने हातावरचा शेला सावरला. सुवर्णधाग्यांनी चित्रांकित झालेला निळा रेशमी शेला कृष्णाने हाती घेतला. तो कर्णाच्या हाती देत कृष्ण म्हणाला,

'हा शेला एका श्रेष्ठ कलाकारानं विणला आहे. माझी आठवण म्हणून हा राहू दे. मी येतो.'

कृष्ण वळला आणि चालू लागला.

त्याच्या पाठमोऱ्या रूपाकडे कर्ण-वृषाली पाहत होते. काही बोलण्याचे भान कर्णाला नव्हते.

थोड्या वेळाने गंभीर शंखनाद त्या परिसरात उठला. पाठोपाठ टापांच्या आवाजासह उठलेला रथांच्या चाकांचा घरघराट ऐकू आला.

कर्णाने पाहिले, तो आपल्या दळासह कृष्णाचा सुवर्णरथ राज-प्रासादाबाहेर जात होता. नकळत कर्णाचे हात जोडले गेले.

उगवत्या सूर्याच्या किरणांत कृष्णाचा रथ दिसेनासा झाला.

एक दीर्घ निःश्वास सोडून कर्ण वळला आणि मूर्तिमंत भीती त्याच्या मुखावर उमटली.

कर्णाची दृष्टी जेथे स्थिरावली, तिकडे वृषालीचे लक्ष गेले.

क्षणभर तीही जागच्या जागी खिळून उभी राहिली.

वृषालीने कर्णाला हाताने इशारा केला आणि तिने हाक मारली,

'वसूऽ'

वृषसेनाने वळून पाहिले.

त्याच्या चेहऱ्यावर हसू होते. वाऱ्याने कुंतल हेलावत होते. वृषालीच्या दृष्टीला त्याची दृष्टी भिडली होती. वृषाली आपली दृष्टी न हलवता सरळ वृषसेनाकडे गेली आणि त्याला हाताला धरून घेऊन माघारी आली.

कर्णाने निःश्वास सोडला. त्याने विचारले,

'भीती नाही वाटली?'

'कसली? तो माझ्याकडं पाहीपर्यंतच भीती होती, नंतर वाटली नाही. तो हलणार नाही, याची खात्री होती.'

‘या डोळ्यांची एवढी ग्वाही?’

‘तो धाक डोळ्यांत नसेल, तर आई होता येत नाही.’ वृषाली म्हणाली.

कर्ण मिस्किलपणे हसून म्हणाला,

‘नाही. तसा तो धाक आम्हांलाही परिचयाचा आहे. त्याला तर आम्ही नेहमी भितो.’

वृषालीने कृत्रिम कोपाने कर्णाकडे पाहिले.

कर्ण मोठ्याने हसला. त्याने वृषसेनाला उचलून घेतले.

कर्णाचे लक्ष बाहेर गेले.

दूरवर धुळीचे लोट उठताना दिसत होते.

कृष्णाच्या आठवणीने परत तो गंभीर बनला.

‘वृषाली, कृष्णभेटीचा आनंद एवढा असेल, हे मला स्वप्नातही जाणवलं नव्हतं. त्याच्या रूपानं या सूर्यासारखंच सारं जीवन उजळून गेल्याचा भास होतो....’

# ३

कर्ण दोनप्रहरी आपल्या महालात विश्रांती घेत होता. शेजारी वृषसेन बसला होता.

'तात.'

'हं!'

'कृष्णमहाराज केव्हा येणार?'

'कृष्णाच्या नावाबरोबर कर्णाने वृषसेनाकडे पाहिले.

कृष्ण जाऊन आठ दिवस झाले होते, तरी त्या बालमनातून कृष्णाची आठवण जात नव्हती.

कर्णाची अवस्थाही तीच झाली होती.

'सांगा ना, तात!'

'वसू, ज्या वेळी आपल्या दैवी आनंद लिहिलेला असतो, त्याच वेळी अशा माणसांचं दर्शन, सहवास घडतो... अन् दैवी काय लिहिलं, ते कोण सांगणार?'

वृषसेनाला काही समजले नाही. तो काही विचारणार, तोच त्याचे लक्ष मागे वळले.

दारातून वृषाली आत येत होती. ती कर्णशय्येजवळ येत म्हणाली,

'आपल्या भेटीसाठी कुणीतरी आलंय्'.

'कोण?'

'सांगा, पाहू!'

'हस्तिनापुराहुन शत्रुंजय आला असेल.'

'अंहं!' नकारार्थी मान हलवीत वृषाली म्हणाली.

'मग वृषकेतु!'

'नाही.'

'मग उत्तर देणं फार सोपं आहे. माझा मित्र, सखा चक्रधर आला असेल.'

वृषाली थक्क झाली. तिने विचारले,

'आपण कसं ओळखलंत?'

'मला न भेटता सरळ तुझ्यापर्यंत पोहोचणारे तिघेच. आपले दोन पुत्र आणि चक्रधर. कुठं आहे चक्रधर?'

दाराआड उभा असलेला चक्रधर आत आला.

कर्णाने उठून त्याला मिठी मारली. चक्रधर हसत, नम्रतेने नमस्कार करीत म्हणाला,

'अंगराज, आपला सेवक आपल्याला वंदन करतोय्.'

'वत्सा, तुला अभय आहे. पण, मित्रा, तू आलास, हे फार बरं झालं.'

'चांगली बातमी घेऊन आलो नाही मी.'

'काय झालं?'

'काल रात्री तस्कर फार मोठ्या संख्येनं आले आणि त्यांनी सारं गोधन चोरून

नेलं.’

वृषालीने विचारले,

‘सर्व गोधन?’

‘हो! एकही गाय शिल्लक राहिली नाही. रात्रीचा समय असल्यानं आपल्या दळाला पाठलागही करता आला नाही.’

‘तुम्ही गेला नाहीत?’ वृषालीने विचारले.

‘मी सांगितलं ना, वहिनी! रात्रीची वेळ होती. वैरातक मद्यानं धुंद असलेला मी पाठलाग कसा करणार?’

कर्ण मोठ्याने हसत होता.

वृषाली संतापाने म्हणाली,

‘आपलं गोधन लुटलं अन् हसता काय?’

‘आपलं हसू आवरीत कर्ण म्हणाला,

‘या माणसाच्या बोलण्यावर भरवसा ठेवू नकोस. गोधन लुटलं गेलं असतं, तर हा सांगायला आला असता का? दुसरं गोधन लुटून आणून मगच ती वार्ता सांगायला तो इथं अवतरला असता.’

चक्रधर आणि कर्ण दोघेही हसत होते.

वृषाली कृत्रिम रागाने म्हणाली,

‘असली कसली थट्टा!’

‘थट्टा हा तर त्याचा जन्मजात स्वभाव! वृषाली, आश्रमात याच्या भट्टेनं! सारे त्रासून जायचे. एकदा आम्ही रानात गेलो होतो. परत येताना हा पुढं आला अन् राधाईला मी विहिरीत पडलो, म्हणून सांगितलं.’

‘अन् मग?’

‘राधाईनं आकांत मांडला. तशी ही स्वारी भ्याली; पण तेव्हा सारं हातांबाहेर गेलं होतं. तो प्रकार चालू असता मी तिथं गेलो. साऱ्यांच्या ध्यानी खरा प्रकार आला अन् नंतर आपल्या गुणांमुळं तातांकडून चाबकाचा मार या वीरानं सोसला; पण तरीही सवय सुटली नाही.’

वृषाली मोकळेपणे हसली.

‘वहिनी, आज आम्ही निघणार.’

‘कुठं?’

‘गोधन पाहायला. आता आठवडाभरात जनावरं चराईला बाहेर पडतील. ती यानं पाहायला हवीत.’

‘चक्रधर, तू असता मी कशाला पाहायला...’

‘अंहं! माझ्यासाठी नव्हे; पण गोधन-रक्षणासाठी जे असतात, त्यांना वर्षातून एकदा तरी राजाचं दर्शन घडायला हवं. या निमित्तानं मृगयाही होईल.’

कर्णाने निःश्वास सोडला. तो वृषालीला म्हणाला,

‘याच्यापुढं इलाज नाही. पण, मित्रा, एवढ्या तातडीनं निघणं होणार नाही. उद्या पहाटे आपण निघू.’

‘मी येऊ?’ वृषसेनाने विचारले.

‘तिथं आईचं बोट धरून चालायचं नसतं. घोड्यावरून दौड करावी लागते, म्हटलं,’

चक्रधराने वृषसेनाला चिडवले.

‘त्या मुलाला कशाला रडवतोस?’ कर्ण वृषसेनाला जवळ घेत म्हणाला, ‘वसू, तू मोठा झालास, की तुला नेईन हं.’

वृषसेनाने मान डोलावली आणि तो कर्णाला अधिकच बिलगला.

## ४

**क**र्ण-प्रासादात एकच गडबड उडाली होती. दुर्योधनाच्या सेवेसाठी सारे गुंतले होते. राजप्रासादासमोर दुर्योधनाचा गजध्वजांकित सुवर्णरथ उभा होता. दुर्योधनाचे रक्षकदळ प्रासादासमोरच्या विस्तीर्ण उद्यानात विखुरले होते.

सूर्योदयानंतर कर्ण दुर्योधनभेटीसाठी दुर्योधनाच्या महाली गेला.

कर्णाने नम्र भावाने दुर्योधनाला वंदन केले; पण ते पुरे होण्याआधीच कर्णाला जवळ घेत दुर्योधन म्हणाला,

'हा औपचारिकपणा सोडून दे. तू अंगराज आहेस. माझा मित्र आहेस.'

'त्या दोन्हीही आपल्याच कृपा.'

'केव्हा आलास?'

'निरोप मिळताच निघालो. रात्री आलो, तेव्हा आपण निद्राधीन झाला होता. आपण अचानक आलात, त्यामुळं आपल्या स्वागताला...'

'काही कमतरता पडली नाही. घर मला परकं का आहे?'

दोनप्रहरी भोजन झाल्यानंतर कर्णमहालात कर्ण, दुर्योधन, वृषाली एकत्र बसली असता दुर्योधनाने विषय काढला.

'कर्णा, फक्त तुझ्या भेटीस्तव मी इथवर आलो नाही. मी तुला नेण्यासाठी आलोय्.'

'जशी आज्ञा!'

'कुठं, म्हणून विचारलं नाहीस?'

'तो माझा अधिकार नाही.'

'तुझा पराक्रम दाखवण्याची एक संधी आपल्या पावलानं चालून आलीय्.'

'पराक्रम?'

'हो! मी तुला स्वयंवराला नेण्यासाठी आलोय्.'

'द्रूपदराजकन्येच्या?'

'बरोबर! तुला आमंत्रण आलं असेलच ना!'

'होय! कृष्णानंही सांगितलं होतं.'

'कृष्ण!'

'सांगायचं राहूनच गेलं. आठ दिवसांपूर्वी द्वारकाधीश कृष्ण इथं आले होते.'

'इथं आले होते? कशासाठी?'

'यांना भेटायला.' वृषाली म्हणाली, 'ते दोन दिवस फार चांगले गेले.'

'अस्सं?' दुर्योधन विचारात गुंतला.

'का? मित्रा, कसला विचार करतोस?' कर्णाने' विचारले.

'कृष्णाचं काही काम होतं?'

'मुळीच नाही! ते कामरूपदेशी तपश्चर्येला गेले होते. परतताना अचानक त्यांनी इथं वास्तव्य केलं.'

दुर्योधन हसला. आपल्या मांडीवर थाप मारीत तो म्हणाला,

'या जगात अचानक असं काही घडत नाही. आपल्याला मागचा-पुढचा काही संदर्भ माहीत नसतो, म्हणून ते अचानक भासतं. मी सांगतो, कृष्ण का आला होता, ते.'

'का?'

'कारण एकच! जरासंधाची भीती. कामरूप, अंगदेश यांवर सत्ता त्याची. तो कृष्णाचा वैरी. त्या जरासंधाचा पराभव करून सख्य जोडणारा फक्त तू एकटाच आहेस. तुझी मैत्री सहज घडली, तर कृष्णाला हवी होती, म्हणून त्यानं वाकडी वाट केली.'

कर्ण त्यावर काही बोलला नाही.

दुर्योधनाने मूळ विषयाला हात घातला.

'कर्णा, मग स्वयंवराला येणार ना?'

'नाही.'

'का? पण अवघड आहे, म्हणून?'

'कसला पण?'

'महादुर्घट पण आहे. द्रूपदानं मत्स्ययंत्र उभारलंय्, ते भेदण्याचं सामर्थ्य फक्त तुझंच आहे.'

'युवराज, हा हट्ट सोडा! तुमच्या कृपेमुळं मला सत्ता, ऐश्वर्य प्राप्त झालंय्. दासदासींनी संपन्न असलेल्या या प्रासादात वृषालीसारख्या सहधर्मिणीसह मी तृप्त आहे. या प्रासादात आणखी एका राज्यकन्येची आवश्यकता नाही.'

'आपल्या दुबळेपणाला झाकण्यासाठी केवढं सुंदर कारण सांगितलंस! व्वा! मित्रा, मी प्रसन्न आहे.'

'दुबळेपणा झाकण्यासाठी?'

'नाहीतर काय? त्या मत्स्ययंत्राचं नाव ऐकताच कौरवसभेतल्या एकेका वीरांनी अनेक कारणं सांगून माघार घेतली. पण एवढं सुरेख कारण मी ऐकलं नव्हतं.'

'मी त्या मत्स्ययंत्राला भ्यालो नाही.'

'तेच!'

'असले अनेक मत्स्यभेद करण्याचं सामर्थ्य माझं आहे.'

'तेच!'

'मित्रा, मी नुसती द्रोणाचार्यांकडूनच दुरून संथा घेतली नाही. भगवान परशुरामांकडं मी शस्त्रविद्या शिकलोय्.'

'बस्स कर, कर्णा!' दुर्योधनाचा आवाज चढला, 'ऐन वेळी ज्या गुणांचा वापर करता येत नाही, त्या गुणांची कुळकथा कशाला सांगावी! माहीत आहे, त्या द्रुपदानं मला काय निरोप पाठवलाय्, तो? तुमच्या राजसभेत कोणी वीर असेल, तर मत्स्यभेदाचं आह्वान स्वीकारायला त्या वीरासह या. तसं झालं नाही, तर निदान माझं आतिथ्य स्वीकारायला या. ठीक आहे. घरी उपास घडतो, म्हणून अन्नसेवनासाठी द्रुपदाच्या घरी कौरवयुवराजानं जायला काहीच हरकत नाही.'

'मित्रा!'

'कर्णा, मित्र या शब्दाची लाज बाळगण्याची वेळ आली आहे. कौरव राजसभेचा तेजोभंग होण्याची वेळ आली असता, कसली कारणं सांगतोस?'

'मित्रा, तू कष्टी होऊ नकोस. मी येईन. मत्स्यभेद करीन. स्वयंवर जिंकीन. मी

आहे, तोवर तुला अपमानित होण्याचा प्रसंग येणार नाही.'

दुर्योधनाच्या चेहऱ्यावर आनंद विलसला. त्यानं उठून कर्णाच्या पाठीवर थाप मारली. वृषालीकडे पाहत तो म्हणाला,

'वहिनी, तुमची हरकत नाही ना?'

'मुळीच नाही! राजकन्येचं या घरी स्वागत करण्यात मला आनंदच वाटेल.'

प्रयाणाच्या दिवशी कर्ण आपल्या महालातून बाहेर पडत असता वृषालीने आठवण दिली,

'मग स्वयंवराला नक्की जाणार ना?'

आपली दृष्टी रोखीत कर्ण म्हणाला,

'निश्चित!'

'स्वयंवरात भाग घेणार?'

'निश्चित! वृषाली, मी जेव्हा स्वयंवराला जातो, तेव्हा ते जिंकण्यासाठीच! तिथं अपयश नसतं. माघारी येईन, ते राजकन्या घेऊनच.'

'मी वाट पाहते. तुम्हां दोघांचं स्वागत करण्यात मला आनंदच वाटेल.'

'जरूर वाट बघ.'

वृषालीला आपल्या मिठीत घेत कर्ण गुदमरलेल्या आवाजात म्हणाला,

'प्रिये, सवत कल्पनेइतकी कधी चांगली नसते, म्हणतात.'

कर्णाच्या मिठीतून सोडवणूक करून वृषाली म्हणाली,

'तो विश्वास नसता, तर राजकन्या घरी आणायला मी अनुमती दिलीच नसती. तेवढी भोळी नाही मी.'

वृषालीच्या बोलण्याने कर्ण तेथेच थबकला. हर्षित मनाने त्याने वृषालीकडे पाहिले आणि तो म्हणाला,

'चल. युवराज तिष्ठत असतील.'

'आपल्याबरोबर कोण येतंय्?'

'चक्रधर आहे ना!'

वृषाली हसून म्हणाली,

'उगीच विचारलं. ते न विचारताही मला समजायला हवं होतं.'.

# ५

द्रुपदराजकन्येच्या स्वयंवराची तयारी द्रुपदाकडून भव्य प्रमाणात उभारण्यात आली होती. स्वयंवरासाठी येणाऱ्या नृपांच्या वास्तव्यासाठी भव्य शिबिरे आयोजित केली होती. पांचाल देशीचे निष्णात कारागीर ती नगरी सुशोभित करण्यासाठी, अलौकिक असा स्वयंवर-मंडप तयार करण्यासाठी कैक महिने अहोरात्र मेहनत घेत होते. त्या नगरीला यक्षनगरीचे रूप प्राप्त झाले होते.

नगरीत येणाऱ्या नाना देशींच्या नृपांना पाहण्यासाठी प्रजाजनांची राजरस्त्यांवर अखंड गर्दी दिसत होती. कामरूप, मगध, गांधार, सौराष्ट्र, आनर्त, कांबोज वगैरे देशींचे राजे आपल्या ऐश्वर्यासह नगरीत आले.

एके दिवशी दुर्योधन कर्णासह द्रुपदनगरीत प्रवेश करता झाला.

सर्व आमंत्रित नृपांचे आगमन झाल्याचे पाहून द्रुपदाने स्वयंवराचा दिवस निश्चित केला. त्या दिवसाकडे साऱ्यांचे लक्ष वेधले होते.

स्वयंवराचा दिवस उजाडला. नगराच्या ईशान्येला सभामंडप उभारला होता. प्रवेशद्वारी गगनाला भिडलेले गोपुर उभे केले होते. रत्नांकित सुवर्णासनांनी, तोरणांनी सभास्थान अलौकिक बनले होते. द्रुपदांची सचिव मंडळी आलेल्या नृपांचे स्वागत करीत होती.

दुर्योधनासह कर्ण सभामंडपात आला.

कर्णाला पाहताच जरासंध आपल्या आसनावरून उठून सामोरा आला. दुर्योधनाला वंदन करीत जरासंध म्हणाला,

'कौरवाधिपती युवराज दुर्योधन महाराजांचा विजय असो.'

आपली मान नम्रतेने झुकवीत दुर्योधन म्हणाला,

'आशीर्वाद असावेत.'

जरासंधाने कर्णाचे अभिवादन स्वीकारले. जरासंध प्रेमाने, म्हणाला,

'अंगराज, क्षेम आहे ना!'

'आपली कृपा!'

'आता स्वयंवराची चिंता नाही. युवराज, या अंगराजांच्या उपस्थितीनं स्वयंवराचा निर्णय निश्चित झाला आहे. अंगराज, तुमची मनोकामना पूर्ण होवो!'

दुर्योधनासह कर्ण आसनस्थ झाला.

कर्णाचे लक्ष साऱ्या नृपांवरून फिरत असता कृष्णावर स्थिरावले.

बलरामाच्या शेजारी बसलेला कृष्ण कर्णाकडेच पाहत होता.

कर्णाने बसल्या जागेवरून आपले मस्तक नम्र केले.

कृष्णाने स्मितवदनाने त्या अभिवादनाचा स्वीकार केला.

कर्णाचे लक्ष मत्स्ययंत्राकडे वळले.

सभास्थानाच्या मध्यभागी जागा मोकळी होती. तेथे मत्स्ययंत्र टांगलेले होते.

यंत्राच्या मध्यभागी एक छिद्र होते. यंत्रावर एक मत्स्याकृती फिरत होती. मत्स्ययंत्राखाली एक द्रवाने भरलेले सुवर्णपात्र ठेवलेले होते. त्या पात्रात मत्स्ययंत्र प्रतिबिंबित झाले होते.

सभागृहात शांतता पसरली.

कर्णाने पाहिले, द्रुपदराजा मत्स्ययंत्राजवळ येत होता. हात जोडून तो उभा राहिला. त्याचे शब्द सर्वांच्या कानांवर पडू लागले.

'वीरहो! द्रौपदी ही यज्ञकुंडातून उत्पन्न झालेली माझी तेजस्वी अशी कन्या असून, तिला मी वीर्यशुक्ला ठरवलं आहे. तरी या यंत्राजवळ ठेवलेलं धनुष्य सज्ज करून, जो या मत्स्याचा वेध घेईल, त्याला माझी सुता वरील. स्वयंवरासाठी तोच माझा पण आहे.'

पण ऐकताच राजे लोकांत कुजबूज सुरू झाली. साऱ्यांचे लक्ष त्या मत्स्ययंत्राकडे व नंतर तेथे ठेवलेल्या धनुष्याकडे जात होते.

अचानक कुजबूज थांबली.

सभागृहात राजकन्या प्रवेश करीत होती. द्रुपदपुत्र धृष्टद्युम्न पुढे चालला होता. त्यामागून राजकन्या जात होती.

मत्स्ययंत्राजवळ चौरंग मांडला होता. द्रौपदी हाती वरमाला घेऊन त्या आसनावर उभी राहिली.

कर्ण राजकन्येकडे पाहत होता.

तिच्या रूपाबद्दल जे ऐकले होते, त्यात तसूभरही कमतरता नव्हती. किंबहुना त्या वर्णनातच कमतरता होती. द्रौपदीच्या त्या सावळ्या रूपाने साऱ्यांनाच भारावून टाकले.

तिचे नेत्र कमलदलासारखे होते. धनुष्याशी स्पर्धा कराव्यात, अशा वक्र भुवया तिला लाभल्या होत्या. साक्षात दुर्गा मानवी रूपाने प्रगटली, की काय, असा भास साऱ्यांना होत होता.

स्वयंवर सुरू झाले. मत्स्यभेदाचे आह्वान स्वीकारायला एखादा नृप उठला की, तिचा भाऊ धृष्टद्युम्न उच्चरवाने त्या राजाची, त्याच्या शौर्याची ओळख करून देत असे.

अनेक राजे उठले, पण त्या महाधनुष्याला प्रत्यंचाही त्यांना जोडता आली नाही. स्वयंवराचा पण पुरा होतो, की नाही, याची शंका सर्वांना वाटू लागली. अग्रभागी बसलेल्या तापसांच्या, ब्रह्मवृंदांच्या चेहऱ्यांवरून चिंतेचे ढग सरकू लागले.

दुर्योधनाने कर्णाकडे पाहिले.

कर्ण उठून उभा राहिला.

'राजकन्ये, तुझ्यासाठी स्वयंवर जिंकण्यासाठी उठलेला जो वीर आहे, त्याच्या पराक्रमाला या पृथ्वीवर तोड नाही. आपल्या पराक्रमानं त्यानं अनेक नृपांना जिंकलंय्. ज्याच्या अलौकिक दातृत्वाची ख्याती त्रिखंडात पसरली आहे, असा अंगराज महारथी कर्ण मत्स्ययंत्राचा भेद करण्यासाठी सभास्थानात अवतरत आहे.'

नृपाचे नाव ऐकताच, मान वर न करता चोरून पाहणारी द्रौपदी, कर्णाचे नाव ऐकताच धीट दृष्टीने कर्णाकडे पाहू लागली. तिच्या डोळ्यांत वेगळाच अंगार उसळला. हातची वरमाला थरथरू लागली. ती जवळ येणाऱ्या कर्णाकडे पाहत होती.

कर्णाने एकदा द्रौपदीकडे पाहिले आणि त्याने धनुष्याला हात घातला.

द्रौपदीच्या साऱ्या अंगावर काटा उभा राहिला- जणू त्या हाताचा स्पर्श तिलाच

होत होता. द्रौपदीचे डोळे विस्फारले गेले.

जे धनुष्य अनेकांना पेलता आले नाही, ते कर्णाने लीलया उभे केले होते. वायुवेगाने तालवृक्ष लवावा, तसे कर्णाने धनुष्य वाकवले आणि प्रत्यंचा चढवली. सभागृहातून कौतुकाचे शब्द उमटू लागले; पण कर्णाचे लक्ष तिकडे नव्हते. त्याने ते धनुष्य उचलले. आसनावर ठेवलेला बाण घेऊन, तो धनुष्यावर ठेवून, कर्णाने बैठक घेतली. पात्रातल्या प्रतिबिंबाकडे तो पाहत असता धनुष्य उंचावले जात होते. क्षणभर त्या प्रतिबिंबात दिसणाऱ्या याज्ञसेनीचे दर्शन त्याला झाले. कर्णाच्या चेहऱ्यावर स्मित उमटले. उजवा गुडघा भूमीवर रोवून, डाव्या गुडघ्यावर हाताचा कोपरा स्थिर करून कर्णाने धनुष्याची पकड घेतली आणि बाणासहित प्रत्यंचा आकर्ण खेचून, एकाग्र मनाने तो मत्स्ययंत्राचा वेध निश्चित करू लागला. मत्स्ययंत्रावर टांगलेला मत्स्य वेगाने फिरत होता.

प्रत्यंचा आकर्ण ताणली गेली. साऱ्यांचे श्वास अवरोधले गेले असता, बाण सुटण्याआधीच, त्यापेक्षाही वेध घेणारे तीक्ष्ण शब्दरव राजमंडळात उठले :

'मी सूतपुत्राला वरणार नाही.'

कर्णाच्या कानांत ते शब्द तप्त रसासारखे पडले. खेचलेल्या प्रत्यंचेचे बळ सरले. कर्णाने संतापाने द्रौपदीकडे पाहिले.

द्रौपदीच्या मुद्रेवर तेवढाच संताप स्थिरावला होता.

चकित झालेल्या धृष्टद्युम्नाने विचारले,

'राजकन्ये, तू काय म्हणालीस?'

'हो!' निश्चयी सुरात द्रौपदी उद्गारली, 'सूतपुत्राला मी वरणार नाही, असं सांगितलं. असले दहा मत्स्यभेद यानं केले, तरी मी त्याला कधीही प्राप्त होणार नाही. दादा, सांग त्याला. म्हणावं, कावळ्यानं राजहंसीकडं पाहू नये.'

कर्ण उठून उभा राहिला. हातचे धनुष्य त्याने फेकून दिले. आपली घायाळ दृष्टी त्याने उंचावली. सूर्यदर्शन घडताच, क्रोधाने जळत असताही त्याच्या मुखावर एक विकट हास्य प्रगटले. तो सूर्याकडे पाहून हसला. ते हसणे त्याच्या क्रोधाहून तीव्र होते.

द्रौपदीकडे न पाहता कर्ण माघारी येत होता.

त्या घटनेने साऱ्या सभेचे भान हरपले होते.

कृष्ण, जरासंध आपापल्या आसनांवरून उठून उभे राहिले होते. दुर्योधन आपले खड्ग सावरीत आवेशाने सामोरा आला.

कर्णाने आपला डावा हात भक्कमपणे दुर्योधनाच्या खड्गावर ठेवला आणि त्याला बरोबर येण्याची खूण केली. पाहता-पाहता कर्ण दुर्योधनासह स्वयंवर-मंडपाच्या बाहेर आला. शक्यतो लौकर त्या जागेपासून जितक्या दूर जाता येईल, तेवढे जावे, असे कर्णाला वाटत होते.

कर्णामागून येणाऱ्या दुर्योधनाने कर्णाला गाठले. त्याच्या हाताला धरून त्याला थांबवीत दुर्योधन म्हणाला,

'मित्रा, कशासाठी मला बाहेर काढलंस? त्या राजकन्येचं हरण...'

'युवराज, ते मला नकोय.'

'कर्णा, माझं ऐक! अजूनही वेळ गेली नाही. या राजसभेत जरासंधासारखे माझे अनेक मित्र आहेत. हे स्वयंवर उधळून लावता येईल.'

'सांगितलं ना, युवराज? मला तसं काही करायचं नाही. ती राजकन्या कुणालाही माळ घालो, मला त्याची चिंता नाही.'

कर्णाच्या उद्गारांनी दुर्योधनाला काय बोलावे, हे सुचेना. तो म्हणाला,

'मित्रा, मी काय करू?'

'खूप करता येईल. या नगरीत क्षणभरही थांबण्याची माझी इच्छा नाही. मी चंपानगरीला जातो. तेवढी परवानगी द्या. मला आता एकांताची गरज आहे. मी येतो.'

दुर्योधनाला वंदन करून चक्रधर कर्णामागोमाग जाऊ लागला.

त्यानंतर थोड्याच वेळात एक सुवर्णरथ आपल्या अश्वदलासह द्रुपदनगरीतून बाहेर जाताना दिसला.

# ६

कर्ण आल्याचे कळताच वृषाली धावत प्रासादद्वारी गेली.

प्रासादासमोर उभा राहिलेला रथ मोकळा होता. कर्ण महालात गेल्याचे कळताच वृषाली तिकडे वळली.

महालात कर्ण आणि चक्रधर उभे होते.

वृषालीला पाहताच कर्णाच्या मुखावर उसने हास्य उमटले.

वृषालीने विचारले,

‘स्वयंवर झालं?’

‘हं!’

‘मग एकटेच आलात?’

‘दुर्योधन मागं राहिलाय्.’

‘दुर्योधनांबद्दल विचारीत नाही मी.’

‘मग कुणाबद्दल?’

‘राजकन्या घेऊन येणार होता ना?’

‘जमलं नाही.’

‘पण अवघड होता?’

चक्रधर पुढे सरसावला.

‘वहिनी, त्याला विचारू नका. मला विचारा, काय झालं, ते.’

‘चक्रधर!’ कर्णाने दटावले.

पण चक्रधराने तिकडे लक्षही दिले नाही. तो बोलत होता.

‘वहिनी, पण अवघड होता. मत्स्ययंत्राचा भेद करायचा होता. पणाचं धनुष्य पेलण्याचं बळ एकाही राजाला लाभलं नाही. मग प्रत्यंचा जोडून मत्स्यभेद दूरच राहिला.’

‘यांनी भाग घेतला नाही?’

‘घेतला तर! हा सरळ धनुष्याजवळ गेला. धनुष्य सहज उचललं. समर्थपणानं वाकवून प्रत्यंचा जोडली.’

‘खरं?’ कौतुकाने वृषालीने विचारले.

‘हो! अन् वेध घेत असतानाच धनुष्य जिथल्या तिथं फेकून हे महाराज माघारी आले... मत्स्यभेद न करता.’

‘का?’

‘का? कारण भेद याचाच झाला होता. मत्स्ययंत्राच्या भेदाच्या आधीच याच्यावर घाव घातले गेले.’

‘घाव?’ वृषालीच्या चेहऱ्यावर भीती तरळली.

‘हां! कधीही न बुजले जाणारे! वहिनी, यानं धनुष्य पेललं अन् ती उन्मत्त रूपगर्विता भरसभेत कडाडली, ‘मी सूतपुत्राला वरणार नाही. कावळ्यानं राजहंसीकडं पाहू नये."

चक्रधराच्या मुठी आवळल्या गेल्या. कंठ दाटला होता.

वृषालीचा चेहरा प्रेतवत पांढरा फटफटीत पडला होता.

‘सांगा, भाऊजी, पुढं काय झालं?’

‘खूप झालं. या तुझ्या पतीनं सारं चुपचाप ऐकून घेतलं. वेध घेण्यासाठी प्रत्यंचा खेचलेलं धनुष्य तसंच जमिनीवर टाकून हे स्वयंवर-मंडपातून बाहेर निघून आले. इथवर येईपर्यंत त्यानं मागंही पाहिलं नाही.’

कर्ण ताठरल्या अंगाने सर्व ऐकत होता.

वृषाली त्याच्याकडे धावली.

तिने विचारले,

‘खरं हे?’

‘अं...?’

एक विकल स्मित करीत कर्ण म्हणाला,

‘त्यानं सांगितलं, ते अक्षरन् अक्षर खरं आहे. त्यात खोटं असं काहीच नाही.’

वृषालीचा सारा संताप उफाळला. केतकी रंगाचा गौरवर्ण असलेली ती मुद्रा तप्त बनली. धारदार नासिकेचा अग्रभाग, कानाच्या पाळ्या तांबड्या बुंद बनल्या. सदैव हसणाऱ्या डोळ्यांत अगतिकतेची लाट उसळली.

‘कशासाठी हे सारं सहन केलंत? असला अपमान सहन करून परतण्यापेक्षा ते स्वयंवर उधळून, त्या उन्मत्त राजकन्येला फरफटत इथवर घेऊन आला असता...’

‘वहिनी, युवराज दुर्योधनांनी हेच सुचवलं; पण तेसुद्धा यानं मानलं नाही.’

‘चक्रधर, वृषाली... ते मला करायचं असतं, तर त्यासाठी युवराजांच्या मदतीची मला काहीच गरज नव्हती. वृषाली, विसरू नकोस, चित्रांगद राजाची राजकन्या माझ्या सल्ल्यानं दुर्योधनानं स्वयंवर-मंडपातून पळवून नेली, तेव्हा मी एकट्यानं सर्व नृपांना थोपवून धरलं होतं. तो पराक्रम मी एकदा केलाय्. मनात असतं, तर मी तो याही वेळी केला असता.’

‘मग थांबलात का? त्या राजकन्येचं हरण का नाही केलंत?’

‘तिचं मी हरण केलं असतं, तर ती माझी स्वामिनी बनली असती; तिची ती योग्यताच नव्हती.’

‘मी समजले नाही...’

‘त्यात समजायचं काय अवघड आहे? द्रौपदी मला रूपसंपन्न भासली खरी; पण ती फक्त रूपसंपन्नच होती. पुरुषार्थापेक्षा कुलाचा आणि गुणापेक्षा रूपाचा जिला मोह आहे, त्या स्त्रीला माझ्या जीवनात जागा नाही. या घरची दासी म्हणूनसुद्धा तिची येण्याची पात्रता नव्हती. म्हणूनच तो संयम पाळावा लागला.’

## ७

महालात संपूर्ण शांतता नांदत होती. उंच समयांच्या ज्योतींचा शांत, मंद प्रकाश पसरला होता. समयांच्या काही ज्योती हळूहळू शांत होत होत्या. त्या महालात जाग होती फक्त कर्णाला. कर्णाची वाट पाहून थकलेली वृषाली आपल्या प्रशस्त शय्येवर केव्हाच निद्राधीन झाली होती. कर्ण एकटा मंचकावर बसून होता. दीर्घ, उष्ण नि:श्वास त्याच्या नासिकेतून बाहेर पडत होते. मंचकासमोर रौप्य आसनावर मद्याची झारी ठेवली होती. स्फटिकपात्रातून कर्ण मद्यप्राशन करीत बसला होता. अर्धी रात्र केव्हाच उलटून गेली होती; पण वेळाकाळाचे भान कर्णाला राहिले नव्हते.

मध्येच कर्णाने मान वर केली. त्याची दृष्टी समईवर स्थिरावली.

समईची एक ज्योत थरथरत होती. त्या ज्योतीकडे कर्णाचे लक्ष वेधले.

ज्योत!

थरथरणारी ज्योत. .

ही याज्ञसेनी! यज्ञातून उद्भवलेली ही ज्योत!

थरथरणारी!

दाहक!

आपल्या तेजानं दुसऱ्याच्या मनात दाह निर्माण करणारी, स्पर्शानं पेटवणारी ही ज्योत!

याज्ञसेनी! द्रौपदी!

यज्ञ करताना द्रुपदानं यज्ञात कशाची आहुती दिली होती? कोणते मंत्र उच्चारले होते? अस्मिता, अहंकार यांच्या मंत्रांनी आणि काम, क्रोध, मद, मत्सर यांच्या समिधांनी का तो यज्ञ संपन्न झाला होता? नाहीतर त्या यज्ञातून द्रौपदीसारखी भयानक ज्योत कशाला उपजली असती?

'मी सूतपुत्राला वरणार नाही!'

कोण म्हणतं हे! तर याज्ञसेनी!!

द्रौपदी, माझ्या कुलाचा उच्चार करण्याचा तुला काय अधिकार? हे रूपगर्विते, तुझं तरी कुल कोणतं? तू का द्रुपदराजकन्या?

आपल्या गुरुबंधूच्या- द्रोणाचार्यांच्या नाशास्तव द्रुपदानं योजलेल्या यज्ञाच्या राखेतून उद्भवलेलं एक दान. त्या दानानं माझ्या कुलाचा उच्चार करावा कशासाठी?

कर्णाने झारीतले मद्य पात्रात ओतून घेतले. आंबट, उग्र वास दरवळला. ते मद्य ओठांना लावीत तो आसनावर किंचित कलला. डोळे मिटूनही दिसायचे थांबत नव्हते.

मत्स्यभेद करण्यासाठी मी सरसावलो, ते तुझ्या लावण्यानं दिपलो, म्हणून नव्हे. तुझ्या शय्यासुखाचं स्वप्न मनाशी धरून धनुष्याची प्रत्यांची मी खेचली नव्हती. माझ्या जीवनात भोगांना मी फाजील महत्त्व कधीच दिलं नाही.

मग ते आह्वान का स्वीकारलं?

कर्णाचे डोळे खाडकन उघडले. त्या विचाराने तो अस्वस्थ झाला. त्याची दृष्टी त्या थरथरणाऱ्या ज्योतीकडे गेली.

मग ते आह्वान का स्वीकारलं?
द्रौपदी सुंदर होती, म्हणून नव्हे. दुर्योधनासाठी मी उभा राहिलो. काम जागृत व्हावा, असं रूप तिला लाभलं होतं, म्हणूनही नव्हे. ते सौंदर्याचं आह्वान नव्हतं. पराक्रमाला ते आह्वान होतं; ते स्वीकारणं माझा धर्मच होता. पराक्रमाबद्दल मिळणाऱ्या मोलापेक्षा पराक्रम मला प्रिय होता, म्हणून मी ते आह्वान स्वीकारलं. कुलाचा तिथं काही संबंध असता, तरी मी ते आह्वान स्वीकारलं नसतं. सूतकुलाची अप्रतिष्ठा मी माझ्या हातून करवून घेतली नसती. तो अपमान केवढा तीव्र असतो, ते मी अनुभवलं होतं. तीच चूक परत घडू देईन कसा! पण घडलं ना?
हां! घडलं! त्यात माझा काय दोष?
मग कुणाचा?
द्रौपदीचा?
वर कोणात निवडावा, हे ठरविण्याचा अधिकार तिचा नव्हता काय?
नव्हता! लाख वेळा सांगेन, नव्हता, म्हणून. ते असतं, तर मत्स्यभेदाचा पण लावण्याचं काहीच कारण नव्हतं. द्रुपदानं स्पष्टपणे सांगितलं होतं. द्रौपदी वीर्यशुक्ला होती. जो पराक्रम करील, त्यालाच ते मोल मिळणार होतं.'

कर्णाने झारीतले मद्य ओतले. ते मद्य घटाघटा पिऊन त्याने ते पात्र आसनावर ठेवले.

माद्यानं बुद्धी मंद होते, म्हणे! अपमानाचा विसर पडतो, असं म्हणतात. मग आज या मद्याला झालंय् काय? मद्यही आपला गुण विसरलं, की काय!!
भर सभेत असा अपमान अन् तोही एका स्त्रीच्या हातून?
स्त्री! स्त्रीसुलभ संकोच तिला वाटला नाही... अन् वीराचा प्रकोप माझ्या ठायी जागृत झाला नाही. कशासाठी मी तो अपमान सहन केला? कोणत्या प्रतिष्ठेपायी? हे घडलं कसं?'

कर्णाने आसनावरचे मद्यपात्र उचलले. मद्य संपवून ते पात्र आसनावर ठेवीत असता कर्णाचा तोल गेला. आसनाच्या आधाराने कर्णाने तोल सावरला.

'हे घडलं कसं?
कसं घडलं?'

त्या विचारचे कर्णाला हसू आले.

द्रौपदी! बोलून चालून याज्ञसेनी. आग लावण्याखेरीज तिला काय येणार? तो तर तिचा धर्मच मुळी!
आणि मी... मी पाण्यावर तरंगणारा, जलात सापडलेला, सोसण्यापलीकडं मी दुसरं काय करणार? सोसणं! येईल, तो अपमान सोसणं... त्याचंच नाव अंगराज... राधेय... सूतपुत्र.
सूतपुत्र...
सूतपुत्र म्हणवून घेण्यात मला अपमान वाटत नाही. त्याचा मला अभिमान आहे. संताप येतो, तो सूतकुलाला हीन समजणाऱ्यांचा! श्रेष्ठ कुलाची केवढी प्रतिष्ठा!
श्रेष्ठ कुल. .
हे श्रेष्ठ कुल, म्हणजे आहे तरी काय?
श्रेष्ठ कुलाचा जन्म म्हणजे राजाच्या पोटी जन्म, असा का अर्थ समजायचा? श्रेष्ठ कुलात जन्म, म्हणजे ब्राह्मण कुलातला जन्म, असं का म्हणायचं? बस्स! एवढाच का कुलाचा अर्थ!! यापेक्षा दुसरा अनर्थ कोणता?
ज्या घरात, परंपरेनं सुसंस्कार येतात, चारित्र्य, नीती आणि व्यवहार यांची अखडं सांगड पिढ्यान् पिढ्या घातलेली असते, ते घराणं कुलवंत. करायचा झालाच, तर त्यांनाच कुलाचा उच्चार करायचा अधिकार .
ही श्रेष्ठ कुलाची कसोटी लावायची झाली, तर किती लोकांना कुलचा उच्चार करण्याचं बळ येईल? असल्या अर्थहीन कुलाची प्रतिष्ठा सांगण्यापेक्षा आपल्या परंपरागत उद्योगानं आपली जात सांगणारे सूत, सारथी, कुंभार अधिक प्रामाणिक नाहीत का? पुत्रप्राप्तीसाठी परक्याचा आश्रय घेऊन संतती प्राप्त करून घेऊन कुल राखणाऱ्यांनी तरी श्रेष्ठ कुलाचा उच्चार करू नये.

मद्य घेण्यासाठी कर्णाने झारी उचलली. ती संपूर्ण कलती केली, तरी एकही थेंब पात्रात पडला नाही.

त्या रिकाम्या झारीकडे पाहत कर्ण उठला. त्याचे लक्ष समईकडे गेले.

ती ज्योत अद्यापिही थरथरत होती.

कर्णाने संतापाने ती झारी समईवर फेकली. भिंतीवर आदळून ती रौप्य झारी आवाज करीत जमिनीवर कोसळली.

त्या आवाजाने दचकून जागी झालेली वृषाली शय्येवर उठून बसली. तिने पाहिले, तो कर्ण महालात ताठरल्या डोळ्यांनी उभा होता, समईवर लक्ष खिळवून.

कर्णाचे ते विकल रूप पाहून वृषालीचा जीव गुदमरला. तिला हुंदका फुटला. मुसमुसून ती रडू लागली.

त्या रडण्याच्या आवाजाने कर्ण सावध झाला. त्याने वळून पाहिले.

'वृषालीऽऽ, वसू! रडतेस? माझ्यासाठी? माझा अपमान झाला, म्हणून?' कर्ण तोल सावरीत एक-एक पाऊल पुढे येत होता.

त्या शब्दांनी वृषालीला अधिकच उमाळा फुटला.

आपला तोल सावरीत, कष्टाने स्थिर होत, कर्ण मोठ्याने ओरडला,

मदनिकाऽऽ, मदनिकाऽऽ...'

महालाचे दरवाजे उघडले गेले, महालाच्या द्वारी पेंगत बसलेली रूपसंपन्न दासी

आत आली. तिच्या डोळ्यांतील झोप उडाली होती. उत्तरीय सावरण्याचेही भान तिला राहिले नव्हते. कंचुकी परिधान केलेली, अर्धवस्त्र नेसलेली मदनिका आपल्या मालकाकडे पाहत होती. तिचे उफाडद्याचे तारुण्य, तिचा सुडौल बांधा तिच्या लावण्यात भर घालीत होता. तिच्याकडे बोट दाखवीत कर्ण गरजला,

'बघ, वृषाली! या मदनिकेचं सौंदर्य बघ. ही मदनिका का कमी लावण्यवती आहे? त्या याज्ञसेनीपेक्षा ही मला शतपटीनं सुंदर भासते. अशा अनेक दासी या प्रासादात आहेत. माझ्या स्पर्शानं ही धन्यता मानील, म्हणून का मी हिला स्पर्श करू? नाही, वृषाली, या कर्णानं दान स्वीकारलं नाही- स्वेच्छेनं दिलेलंही. जा, मदनिके, झोप जा. निश्चिंत मनानं झोप जा.'

मदनिका दरवाजा लावून घेऊन महालाबाहेर गेली.

कर्ण शय्येजवळ आला. आपले थकले शरीर त्याने शय्येवर झोकून दिले. डाव्या हाताने त्याने वृषालीला जवळ ओढले. वृषाली कर्णावर कलंडली. आपले मस्तक कर्णाच्या छातीवर विसावून ती अश्रू ढाळू लागली. कर्णाचा हात तिच्या मस्तकावरून फिरत होता. कर्णाच्या उघडद्या छातीवर वृषालीचे अश्रू सांडत होते. कर्ण बोलत होता :

'वसू... रडू नकोस, वसू. माझ्यासाठी एवढी कष्टी होऊ नकोस. तुझा हा पती महापराक्रमी आहे. जिंकण्यानं, विजयानं पराक्रम सिद्ध होत नसतात. पराजय सोसण्यातही पराक्रम असतो. त्याला फार मोठं निर्लज्ज मन अन् धाडस लागतं. गुरुदेव भगवान परशुरामांनीच मला वर दिला आहे. माझ्यासारखा क्षत्रिय योद्धा त्रिखंडात होणार नाही. तो वर खोटा कसा ठरेल? जन्मजात सहज कवचकुंडलं लाभली, ती माझी रक्षणकर्ती आहेत. नाहीतर या द्रौपदीच्या घावानं ही छाती केव्हाच उसवली असती. तिच्या त्या दाहक शब्दांनी कान त्याच वेळी फाटले असते. मी योद्धा आहे. जखमांची क्षिती बाळगून भागायचं नाही. जन्माबरोबर सुरू झालेलं हे युद्ध अखेरच्या क्षणापर्यंत मला चालवलं पाहिजे. येईल, तो अपमान सोशीत राहायला हवं. त्यातच माझ्या जीवनाचं यश सामावलं आहे. वसू, तू माझ्यासाठी... माझ्यासाठी... अश्रू...'

वृषालीने मान उंचावली,

बोलता-बोलताच कर्ण झोपी गेला होता.

८

थंडीचे दिवस संपले. नाजूक पावलांनी वसंत अवतरला. सर्व सृष्टीचे रूप नव्या पालवीने बहरले. अंगबोचरा गारवा विरून गेला. पहाटेच्या गार वाऱ्याने प्रसन्नता लाभू लागली.

आपली! नित्योपासना संपवून नदीकिनाऱ्यावरून परतत असता कर्ण ते बदलणारे सृष्टिरूप पाहत होता.

कर्ण प्रासादात आला, तेव्हा सामोऱ्या आलेल्या वृषालीने चक्रधर आल्याची बातमी सांगितली. त्याने कर्णाच्या मनाची प्रसन्नता आणखीच वाढली.

महालात येताच कर्ण चक्रधराला भेटला. त्याने विचारले,

‘मित्रा, केव्हा आलास?’

‘तुमच्या पुढं थोडा वेळ.’

‘गोशाला...’

‘सर्व क्षेम. फक्त एक बैल या क्षणी कमी आहे.’

‘म्हणजे’

‘तो तुमच्या समोर उभा आहे.’

वृषाली, कर्ण हसले. कर्ण म्हणाला,

‘बैलाबरोबर स्वत:ची तुलना करणं हे शहाणपणाचं नव्हे.’

‘थोरांचं अनुकरण माणसानं करावं.’

‘कोण थोर?’ कर्णाने विचारले.

‘सारेच!’

चक्रधर अर्धवट बोलत होता. हसू आवरण्याचा प्रयत्न करीत होता.

वृषाली म्हणाली,

‘भाऊजींच्या मनात काहीतरी खुपतंय्!’

‘काही नाही.’

‘बोल, मित्रा! एकदा सांगून टाक.’

‘त्या द्रुपद राजकन्येचं काय झालं, माहिती आहे?’

द्रौपदीच्या आठवणीबरोबर कर्ण सावध झाला. उत्सुकता न दाखवता त्याने विचारले,

‘काय झालं?’

‘आपण स्वयंवर-मंडपातून बाहेर पडल्यानंतर एका विप्रानं मत्स्यभेद केला. द्रौपदीनं त्याला वरलं.’

‘विप्र!’

‘ती तर गंमत आहे. तुला आठवतं? स्वयंवराच्या मंडपात अग्रभागी ऋषिजनांच्या बरोबर ब्राह्मण मंडळी बसली होती. त्यांत पाच ब्राह्मणांचा एक मेळ होता. ते ब्राह्मण दुसरे कोणी नसून, पाच पांडव होते.’

'काय सांगतोस!' कर्णाच्या चेहऱ्यावर आश्चर्य प्रकटले.

'हो! आपल्या रथशाळेचा दंडक दुर्योधन महाराजांना हस्तिनापूरला पोहोचवायला गेला होता. तो माघारी आला आहे. त्यानंच ही इत्थंभूत माहिती आणली आहे.'

'पण पांडव तर लाक्षागृहात भस्मसात झाले, असं दुर्योधन सांगत होता.'

'साऱ्यांची ती समजूत होती; पण पांडव त्यातून सुरक्षित बाहेर पडले. आपला शोध लागू नये, म्हणून ब्राह्मणवेषानं ते फिरत होते.'

'अन् मत्स्यभेद केला कुणी?'

'त्या अर्जुनाखेरीज दुसरं कोण करणार?'

चक्रधर परत हसू लागला. किंचित संतापाने कर्ण बोलला,

'त्यात हसण्यासारखं काय आहे? अर्जुनासारखा वीर धनुर्धर पती लाभला, हे खरोखर द्रौपदीचं भाग्य!'

'तिचं भाग्य त्याहूनही मोठं! एका पुरुषाशी संसार करून ती सुखी होईल कशी?'

कर्ण संताप आवरत उठला. आपली दृष्टी चक्रधरावर रोखीत त्याने बजावले,

'चक्रधर! द्रौपदी परिणीता आहे. परस्त्रीबद्दल असले उद्गार तुला शोभत नाहीत. मला खपत नाहीत.'

'पण तिला खपतात ना! त्याला मी काय करणार?'

'चक्रधर! पुरे कर. एक शब्दही बोलू नकोस. थट्टेलासुद्धा मर्यादा असतात.'

चक्रधरावर त्याचा यत्किंचितही परिणाम झाला नाही. उलट, त्याचे हसू वाढले. न आवरता येणाऱ्या त्या हसण्याने त्याच्या डोळ्यांत पाणी उभे राहिले होते.

कर्ण आणि वृषालीवर आश्चर्य करण्याची पाळी आली होती.

'हसतोस का? कशासाठी?'

'सांगतो...' हसू आवरत चक्रधर म्हणाला, 'ऐक, मित्रा, आजवर कधी कुठं घडलं नाही, असं अघटित ऐक. स्वयंवर जिंकल्यानंतर पांडव ज्या कुंभाराच्या आश्रयानं राहत होते, तिथं द्रौपदीसह गेले. अर्जुनानं बाहेरूनच माता कुंतीला हाक दिली, 'माते, आम्ही भिक्षा आणली आहे.' घरकार्यात मग्न असलेल्या मातेनं भिक्षा न पाहताच ती पाच जणांत वाटून घेण्याची आज्ञा केली.'

'आणि?' कर्णाने विचारले.

'आणि आज्ञाधारक बालकांनी पाच जणांत भिक्षा वाटून घेतली.'

'खोटं!'

'अगदी खरं! पांडव प्रकट झाले असून, द्रौपदीनं पाची पांडवांबरोबर विवाह केला आहे.'

'द्रौपदी पाच पांडवांची पत्नी!' कर्णाच्या चेहऱ्यावर खिन्नता पसरली. 'पराक्रमाचा अपमान केवढं भयानक पाप असतं. अखेरीस याज्ञसेनी द्रौपदी पाच पांडवांची भिक्षा ठरली.'

'भिक्षेची सारी कथा बनावट आहे. असं बोललं जातं की, द्रौपदीचं सौंदर्य पाहताच पांडवांचा काम उफाळून आला. तो अनर्थ टाळावा, म्हणून माता कुंतीला ती आज्ञा करावी लागली.'

'ते काहीही असो; पण ती पाचांची पत्नी बनली, हे खरंच ना! पांडव हस्तिनापुरालाच आहेत?'

'नाही. त्यांचं वास्तव्य इंद्रप्रस्थात आहे.'

'इंद्रप्रस्थ?'

'द्रुपदाच्या घरी पांडव प्रकट झाल्याचं कळताच धृतराष्ट्र महाराजांनी विदुरांना त्यांच्याकडं पाठविलं. विदुरासह पांडव हस्तिनापुरात आले. कौरवेश्वरांनी पांडवांना खांडवप्रस्थासह अर्धं राज्य दिलं. खांडवप्रस्थामध्ये पांडवांनी जी नगरी उभारली, त्या नगरीचं नाव इंद्रप्रस्थ आहे. त्या वैभवशाली नगरीमध्ये पांडव, माता कुंती, द्रौपदी राहत आहेत.'

कर्णानं तो वृत्तांत ऐकून दीर्घ नि:श्वास सोडला. का, कुणास ठाऊक, त्याचे मन अशांत बनले. कर्णाच्या डोळ्यांसमोर दुर्योधन दिसत होता. कर्ण उद्गारला,

'हे घडत असता, मी हस्तिनापुरात असायला हवं होतं, निदान दुर्योधनानं तरी मला हे कळवलं असतं, तर फार बरं झालं असतं.'

# १

**चं**पानगरी सुखाने नांदत होती. कर्णासारख्या दातृत्वशील राजाच्या आधिपत्याखाली नागरिक तृप्त होते. आपल्या प्रजेचे कल्याण चिंतणारा कर्ण राज्यकारभारात मग्न होता, पण उलटणाऱ्या वर्षांबरोबर त्याचे समाधान ढळत होते. हस्तिनापुराहून येणाऱ्या वार्तांनी तो गोंधळात पडत होता. पांडवांनी इंद्रप्रस्थ नगरी उभारली होती. मयसभेसारख्या अलौकिक सभेचे वर्णन कर्णाच्या कानांवर येऊन गेले होते. वर्षे उलटत होती. हे सारे घडत होते. पण हस्तिनापूरची वार्ता कळत नव्हती. दुर्योधनाचा कोणताच निरोप कर्णाला आला नव्हता.

या चिंतेने ग्रस्त असतानाच एके दिवशी पांडवदळ अंगराज्यावर चालून येत असल्याचे कर्णाला समजले. कर्णाने आपली सारी सेना गोळा केली. रथशाळेतून घरघराट करीत रथ बाहेर धावू लागले. चंपानगरीच्या राजरस्त्यांवरून टापांचा आवाज करीत अश्व धावू लागले. आपल्या कुटुंबीयांचा निरोप घेऊन नाना शस्त्रे धारण करणारे वीर आपापल्या दळात सामील होऊ लागले.

आपल्या सेनेसह कर्ण अंगदेशाच्या सीमेवर उभा राहिला. जेव्हा त्याला पांडवसेनेचे दर्शन घडले, तेव्हा कर्णाच्या आश्चर्याला सीमा राहिल्या नाहीत. ग्रीष्मकाळात धरतीवर मेघांची सावली फिरावी, तसे पांडवांचे चतुरंग अफाट दळ पुढे सरकत होते. ज्यांनी इंद्रप्रस्थ निर्माण करून काही वर्षे झाली नाहीत, तेच पांडव एवढ्या सैन्यानिशी येतात, यावर कर्णाचा विश्वास बसत नव्हता.

दोन्ही दळे एकमेकांना भिडली आणि तुंबळ युद्ध सुरू झाले. हत्तींचा चीत्कार, चाकांचा आवाज, शंख व रणनौबतींच्या आवाजाने पृथ्वी धुंदावून गेल्याचा भास होत होता.

कर्ण रथदळाच्या अग्रभागी उभा होता. आपल्या सेनेचा पराक्रम तो पाहत असता कर्णाचे सारथ्य करणारा चक्रधर म्हणाला,

'कर्णा, ते बघ.'

कर्णाची दृष्टी वळली. सूर्योदयाला आरक्त सूर्यबिंब क्षितिजावर प्रकटावे आणि पाहता-पाहता त्याने पूर्ण आकार धरावा, तसा एक सुवर्णरथ दौडत कर्णदिशेने येत होता. ते सिंहचिन्ह पाहताच तो भीमाचा रथ आहे, हे कर्णाने ओळखले, कर्णाचा रथ भीमाला सामोरा गेला.

भीमाचा रथ कर्णाजवळ आला. भीम आपल्या रथात सारथ्यामागे उभा होता. रथाच्या हालचालींबरोबर तोल सावरीत असलेला भीम आपल्याच गर्वात उभ्या जागी डुलणाऱ्या मत्त हत्तीसारखा भासत होता. तप्त सुवर्णाप्रमाणे शुद्ध गौर वर्णाचा, विशाल व दीर्घ स्कंध असलेला आणि पुष्ट व दीर्घ बाहूंचा तो भीम कर्णाकडे पाहत होता.

कर्णाने आपल्या धनुष्याला बाण जोडलेला पाहताच, त्वेषाने भीमाने त्याचे अनुकरण केले आणि तुंबळ युद्धाला सुरुवात झाली.

सूर्यास्तापर्यंत ते भयानक युद्ध सुरू होते; पण जय-पराजयाची निश्चिती सांगता येत

नव्हती.

सूर्यास्त होताच दीर्घ शंखनाद रणभूमीवर उमटला आणि त्या दिवसाचे युद्ध थांबले.

भीमाने तिरस्काराने कर्णाकडे दृष्टिक्षेप केला आणि तो गरजला,

'राधेया... सूतपुत्रा... उद्या रणभूमीवर तुला एवढे कष्ट पडणार नाहीत. स्वगृही जाऊन विश्रांती घे, पृथ्वीतलावरची शेवटची विश्रांती मनसोक्त भोग.'

हेच ते शब्द. शस्त्रस्पर्धेच्या वेळी याच भीमाने असाच उपहास केला होता. वयाबरोबर रूपात फरक पडला, पण वृत्ती तीच राहिली- असंयमी, संतापी, गर्विष्ठ.

कर्णाने चक्रधराला रथ वळवायला सांगितले. रथ चंपानगरीच्या दिशेने दौडत होता.

कर्ण प्रासादात आला, तेव्हा पालिते घेतलेले सेवक धावले. प्रासादात जाताच हस्तिनापुराहून अश्वत्थामा आल्याचे कळले.

त्या बातमीने कर्णाच्या उद्विग्न मनाला थोडी शांतता लाभली. अधीऱ्या पावलाने तो अश्वत्थाम्याला सामोरा गेला. दोघांची भेट झाली.

'गुरुबंधो! हे घडतंय् तरी काय? काही अपराध नसता पांडवांचं सैन्य माझ्या राज्यावर चालून येतं आणि कौरवेश्वर गंमत पाहत बसतात.'

'मी ऐकलं की, युद्ध सुरू झालं.'

'हो! ज्याचा निर्णय, हेतू निश्चित नाही, असं युद्ध करून मी माघारी परत आलो.'

'निर्णय, हेतू?'

'नाहीतर काय! ज्या पांडवांचं धृतराष्ट्र महाराजांनी स्वागत केलं, खांडवप्रस्थासह अर्धं राज्य दिलं, त्या पांडवांवर मी शस्त्र धरू? भीमाचा पराभव झाला, तर त्याबद्दल माझं कौतुक केलं जाणार होतं, की निंदा, हे सांगणार कोण?'

'मी सांगतो, अंगराज! त्या भीमाचा पराभव केलात, तर तुम्ही दोषी ठराल.'

'अं...?'

'अपेक्षेपेक्षा मला थोडा वेळ झाला. नाहीतर आजचं रणांगणही चुकलं असतं. कौरवांचे मुख्य मंत्री, सल्लागार विदुर अन् पितामह भीष्मचार्यांचा आज्ञेनं मी इथं आलो आहे.'

'काय आज्ञा आहे.'

'कौरवांशी एकनिष्ठ असलेल्या राजांनी पांडवांना विरोध करू नये. पांडव राजसूय यज्ञ करण्याच्या इच्छेनं करभार गोळा करीत आहेत. दिग्विजयासाठी ते पाच वाटांनी निघाले आहेत. तेव्हा सर्वांनी पांडवांना करभार द्यावा, सख्य राखावं, अशी आज्ञा आहे.'

'अन् युवराज दुर्योधन...'

'ते या मसलतीत नाहीत.'

'म्हणजे! काही मतभेद झाले?'

'मला माहीत नाही.'

'गुरुबंधो! असत्य भाषण करू नकोस. युवराज दुर्योधनाचा तू माझ्याइतकाच जवळचा मित्र.'

अश्वत्थामा त्या उद्गाराने चपापला; पण आपला आवाज स्थिर ठेवीत तो म्हणाला,

‘मला काही माहीत नाही. सेवकाला आज्ञापालन एवढंच माहीत असतं. मी जातो.’

‘अशा अपरात्री?’

‘मित्रा, जे तुझं घडलं, तेच इतरांचं, पांडवांच्या प्रचंड ताकदीला रानाच्या आश्रयानं राहणारे हे राजे कसे सामोरे जाणार? ते घडण्याच्या आधी जेवढ्यांना सावध करता येईल, तेवढं केलं पाहिजे. तू सामोपचार कर. येतो मी.’

कर्ण अश्वत्थाम्याला पोहोचवायला राजप्रवेशद्वारी गेला. द्वारापाशी पावले थांबली. तो वळला.

‘मित्रा, दूताचं कर्तव्य संपलं. हस्तिनापुराला सारं क्षेम आहे. युवराज दुर्योधन तुझ्याविना एकाकी आहे. अन्...’

‘आणि...’

‘अधिरथ, राधाई तुझी आठवण काढतात. येताना काही निरोप असला, तर पाहावा, म्हणून गेलो होते. तेव्हा अधिरथांनी एक निरोप सांगितला.’

‘कोणता?’

‘ते म्हणाले, आम्ही थकलो. फार पाहावंसं वाटतं.’

‘एवढाच....’ कर्णाला बोलवले नाही.

‘हो! शक्य झालं, तर सहकुटुंब ये, म्हणून सांगितलंय्.’

अश्वत्थाम्याने कर्णाचा निरोप घेतला.

फरफरणाऱ्या पालित्यांच्या उजेडात अश्वत्थाम्याचा रथ रात्रीच्या काळोखात दिसेनासा झाला. टापांचा आवाज त्या शांततेत बराच वेळ एकू येत होता.

# १०

भल्या पहाटेची वेळ होती. अद्यापि सूर्योदयाला बराच वेळ होता. सर्वत्र नीरव शांतता पसरली होती. रणवेश परिधान केलेला कर्ण आपल्या रथात आरूढ झाला होता. चक्रधर रथ चालवीत होता. कर्णाने चक्रधराला संकेत केला आणि रथ चालू लागला. रथाच्या पाठोपाठ अश्वदळ दौडत होते.

कर्णाचे शिबिर दिसू लागले. शिबिरावर असंख्य शेकोट्या पेटल्या होत्या. कर्णाचे दळ त्या पहाटेच्या काळोखात सज्ज होत होते. पांडवसेनेचा तळ तिथून दिसत होता. रानामध्ये वणवा लागावा, तशी त्या शेकोट्यांची मालिका दिसत होती.

सूर्योदयाची वाट पाहत कर्ण त्या शेकोटीजवळ उभा होता. त्याच्या मुखावर ज्वालांचा उजेड खेळत होता. उठणाऱ्या ज्वालांवर धरलेल्या हातांच्या बोटांची चाळवाचाळव होत होती. ज्वालांचा दाह त्या बोटांना झाला की, हात मागे येत होते. ज्वालांचे ते अग्निनृत्य कर्ण एकटक पाहत होता.

पहाटेचा उजेड फाकू लागला. दोन्ही दळांतून नौबती वाजू लागल्या.

तळावर एकच धावपळ सुरू झाली. हळूहळू सूर्योदयापूर्वीच दळ सज्ज झाले.

'अंगराजऽऽ'

'अं...' कर्णाने वळून पाहिले.

चक्रधर उभा होता.

दीर्घ निःश्वास सोडून कर्ण म्हणाला,

'चल.'

कर्ण रथारूढ झाला. पण नेहमीप्रमाणे रथात ठेवलेले धनुष्य त्याने हाती घेतले नाही. दळांच्या मध्यभागी रथ उभा राहिला. हळूहळू सूर्यबिंब क्षितिजावर उमटले आणि भीमाच्या रथातून शंखनाद उमटला; पण कर्णरथातून त्याला प्रत्युत्तर गेले नाही. चक्रधराने पाहिले, तो कर्ण शांतपणे रथात उभा होता. भीमाचे परत आह्वान आले आणि कर्ण म्हणाला,

'मित्रा, भीमाच्या भेटीला आपण जाऊ.'

सारे सैन्य सोडून एकाकी कर्णरथ येताना पाहून भीमाला नवल वाटले. रथ नजीक येताना पाहताच भीमाने आपल्या धनुष्याला प्रत्यंचा जोडली. कर्णरथ स्पष्ट दिसू लागला. कर्णाच्या हाती धनुष्य नव्हते. शस्त्ररहित तो रथामध्ये उभा होता. रथ जवळ येताच भीमाच्या कानांवर शब्द पडले :

'पंडुपुत्र भीमाचा विजय असो. अंगराज कर्ण आपलं स्वागत करीत आहे.'

भीमाने ते अपेक्षिले नव्हते. कर्णाचा अहंकार, त्याचे रौद्र रूप भीमाला माहीत होते. सावधपणे त्याने विचारले,

'कोणत्या हेतुनं हे स्वागत होत आहे?'

'राजसूय यज्ञाच्या पवित्र कार्यास्तव बाहेर पडलेल्या वीरांना मी विरोध करीत नसतो.'

'हे काल सुचलं असतं, तर पटलं असतं. अंगराज, पराजयाची भीती वाटली?'

'मुळीच नाही.' आपला संताप आवरीत कर्ण म्हणाला, 'आपण राजसूय यज्ञाचं आमंत्रण देण्यासाठी आला आहात ना?'

'हो! जे करभार देऊन सत्ता मान्य करतात, त्यांना आमंत्रण दिलं जातं अन्...'

'आणि काय?'

'आणि जे मान्य करीत नाहीत, त्यांचा पराजय करून राजसूय यज्ञाला येण्याची आज्ञा दिली जाते. आपल्याला आमंत्रण हवं, की आज्ञा, ते आपणच ठरवावं. दोन्हीला माझी तयारी आहे.'

'आपल्याला इच्छित करभार देऊन आपल्या राजसूय यज्ञाच्या सोहळ्यात भाग घेण्यात मला आनंद वाटेल.'

'पराजय स्वीकारलात ना?'

'त्यामध्येच समाधान असेल, तर तसं मानावं. मी आपल्याला चंपानगरीला न्यायला आलो आहे.'

'आपली इच्छा!'

कर्ण आपल्या रथातून उतरला. भीमाच्या रथावर आरूढ होण्याआधी त्याने भीमाच्या सारथ्याला उतरण्यास सांगितले. सारथी उतरताच कर्णाने त्याची जागा घेतली. आश्चर्यचकित झालेला भीम म्हणाला,

'अंगराज, आपण सारथ्य करणार?'

मागे वळून न पाहता कर्ण म्हणाला,

'आपण चंपानगरीत येणार. आपलं सारथ्य मी करणं अधिक योग्य आहे. अधिक सुरक्षित आहे.'

भीमाच्या रथापाठोपाठ कर्णाचा मोकळा रथ आणि भीमाचे रक्षकदळ येत होते. कर्णाच्या तळावर कर्णाचे रक्षकदळ रथाच्या अग्रभागी दौडू लागले. चंपानगरीच्या दिशेने धुरळ्याचा लोट दिसू लागला.

चंपानगरीच्या भक्कम तटांच्या द्वारात रथ थांबला. खंदकावर फळ्या सोडण्यात आल्या. कर्णासह भीमाने चंपानगरीत प्रवेश केला.

भीम चंपानगरीच्या सौंदर्याने चकित होऊन गोपुरे, पुष्करणी, उद्यानांनी नटलेली ती चंपानगरी पाहत होता. रुंद राजरस्त्यांवरून अश्वदळापाठोपाठ रथ दौडत होता. एरवी कर्णरथ दिसताच कर्णदर्शनाने आनंद होऊन त्याला वंदन करणारे लोक राजरस्ता टाळण्याच्या प्रयत्नात गुंतलेले दिसत होते. त्या सुंदर वैभवसंपन्न नगरीतील ते खिन्न रूप भीमाला जाणवले. तो न राहवून म्हणाला,

'अंगराज, यक्षनगरीसारखी तुमची सुंदर नगरी आहे; पण यक्षनगरीचा भोग घेण्याइतके आपले प्रजाजन अद्याप सुजाण झालेले दिसत नाहीत. त्यांची उदासीनता...'

कर्ण खिन्नपणे हसला. तो म्हणाला,

'हे महाबाहो भीमा, सर्वसामान्य माणसाला पराजय सहजपणे पचवता येत नसतो.'

भीमाच्या भुवया वक्र झाल्या. त्याने उत्तर दिले,

'खरं! अगदी खरं! पराजय पचवायला मन कोडगं असावं लागतं. आपली ताकद त्या

सर्वसामान्यांत असेल कोठून!'

कर्णाने मागे पाहिले नाही. त्याच्या हातातला असूड उंचावला गेला. आसुडाच्या वेदनेबरोबर रथ उधळला, रथाच्या खांबाचा आधार घेऊन उभा असलेला भीम मोठयाने हसत होता.

प्रासादामध्ये सुवर्णासनावर भीम बसला होता. कर्णाचे सचिव त्याच्या मागे उभे होते. भीमासमोर उंची मद्याची सुरई, पेला ठेवला होता, पण भीमाचे तिकडे लक्ष नव्हते. भीम बसल्या जागेवरून कर्णप्रासादाचे वैभव निरखीत होता. तो काय बोलतो, इकडे सर्वांचे लक्ष लागले होते, भीम परत मोठयाने हसला व म्हणाला,

'अंगराज, तुमचा प्रासाद मला आवडला. ही भूमी एवढी संपन्न असेल, असं मला वाटलं नव्हतं.'

'परमेश्वरकृपेनं ही भूमी आजवर सुरक्षित होती.'

'पुढंही राहील... आमच्या कृपेनं. अंगराज, हा प्रासाद तुम्हीच बांधलात की, पूर्वी होता?'

'मी बांधला.'

'सुरेख! अंगराज, तुम्ही तो पराक्रम केला नसता, तर कदाचित आज मी या चंपानगरीचा स्वामी बनलो असतो.'

'कसला पराक्रम?'

'जरासंधाचा मल्लयुद्धात तुम्ही पराभव केला होता ना! त्यानंच ही नगरी तुम्हांला दिली ना?'

'हो!'

'त्याच तुमच्या मित्राचा- जरासंधाचा युद्धात वध करून मी दिग्विजयासाठी बाहेर पडलोय्.'

'जरासंधाचा वध झाला? युद्धात...'

'हो, मी केला. मल्लयुद्धाचं, त्याचं आह्वान मी स्वीकारलं. त्यातच त्याचा वध झाला.'

जरासंधाच्या मृत्यूच्या बातमीनं कर्णाच्या मनाला वेदना झाल्या. मनमोकळा, औदार्यशाली जरासंध कर्णाच्या डोळ्यांसमोर उभा राहिला. शेवटची पेट घडली होती द्रौपदीस्वयंवर प्रसंगी. कर्णाला पाहताच प्रेमभराने त्याने स्वागत केले होते.

'का? बोलत का नाही?' भीमाने विचारले.

'वार्धक्यापुढं इलाज नसतो.'

भीम मोठयाने हसला. सारा महाल त्याच्या हसण्याने भरून गेला.

'अंगराज! आपण जेव्हा मल्लयुद्धाचं आह्वान स्वीकारलंत, तेव्हा जरासंध तरुण नव्हता. तो वृद्धच होता.'

'ते मला माहीत होतं, म्हणूनच मी त्याला सोडलं, पंडुपुत्रा! मानवाच्या वाढत्या जीवनाबरोबर त्याच्या इच्छा-आकांक्षा वाढत जातात. फक्त दोनच गोष्टींचं भान त्याला कधी येत नाही.'

'कोणत्या?'

'वार्धक्य! त्याची जाणीव त्याला केव्हाही होत नाही.'

'आणि?'

'मृत्यू! तो अटळ आहे. केवढाही दिग्विजय केला, तरी एक ना एक दिवशी सारं मिळवलेलं जिथल्या तिथं टाकायला लावणारा. निर्जीव बनवणारा तो मृत्यु! त्याचं अस्तित्व कधीच जाणवत नाही.'

मृत्यूच्या भीतीने भीमाचे अंग शहारले. विजयी हसणे मावळने, तो रूक्षपणे म्हणाला,

'जन्म-मृत्यूच्या निर्णय ऐकायला पाठशाला, आश्रम उदंड आहेत. त्यासाठी आम्ही इथं आलो नाही. अंगराज, आमचा करभार...'

'सर्व व्यवस्था केली आहे.'

सचिवांनी तबकांवरची आच्छादने काढली. अनेक सुवर्णतबकांत नाना तऱ्हेची रत्ने ठेवली होती. त्या रत्नांवर दृष्टी ठरत नव्हती. भीमाला काही बोलायला सुचत नव्हते.

कर्ण म्हणाला,

'पंडुपुत्र, आपलं समाधान होतं नसेल, तर आणखी...'

'नको! एवढयावर मी तृप्त आहे. ठीक आहे. आम्ही येतो. माझ्या भ्रात्यांच्या वतीनं मी आमंत्रण देत आहे ते स्वीकारावं.'

'ही विनंती, की आज्ञा?'

भीमाला उत्तर सुचले नाही. त्याने पाहिले. कर्णाच्या नजरेत एक वेगळाच शांत भाव प्रगटला होता. त्या दृष्टीला दृष्टी भिडवण्याचे सामर्थ्य भीमाच्या ठायी नव्हते. भीम अगतिक बनला. कर्णाची नजर चुकवीत तो म्हणाला,

'अंगराज, मी विनंती करतोय् आम्ही येतो.'

'क्षमा!' कर्ण म्हणाला, मध्याह्नकाळ जवळ येतोय् इथंच आपलं भोजन झालं, तर...'

पुढे कर्णाला बोलावे लागले नाही. पाठमोऱ्या भीमाचे शब्द स्पष्टपणे कानांवर आले,

'शरणागताच्या गृही क्षत्रिय अन्नग्रहण करीत नसतात.'

# ११

**क**रभार घेऊन भीम निघून गेला आणि त्याबरोबर कर्णाच्या मनाची शांतताही हरवली. अकारण झालेल्या अपमानाने त्याचे मन पोळून निघाले. उलटणारा दिवस अधिकच मनस्तापाचा जात होता

नित्यसूर्योपासनेसाठी कर्ण नदीकडे जायला सिद्ध झाला होता. रथ सज्ज करण्याची त्याने आज्ञा दिली होती. वृषालीने विचारले,

'अजून पुष्कळ वेळ आहे.'

'मानलं, तर आहे, मानलं, तर नाही. वसू, हरवलेली मन:शांती परत मिळवायला एवढी एकच वाट आता या कर्णाजवळ आहे. ईश्वरचिंतनात मन हलकं होतं.'

वृषाली काही बोलली नाही.

कर्णरथ प्रासादाबाहेर पडला. राजरस्त्याने रथ जात होता. वाटेने काही घरांसमोर माणसांचे थवे गोळा झालेले दिसत होते. त्या घरांतून उठणारा रडण्याचा आवाज कानांवर येई. रथाचा आवाज ऐकून घरापुढे गोळा झालेले लोक मागे वळून पाहत आणि परत त्यांची दृष्टी खाली वळे. नगरीत नांदणारी चमत्कारिक शांतता कर्णाला सहन करणे अशक्य झाले. त्याने आपल्या सारथ्याला रथाला वेग देण्याची आज्ञा केली. रथ भरधाव सुटला. नदीकाठी वृक्षराईत रथ थांबताच कर्ण रथातून उतरला व नदीकडे चालू लागला.

नदीकाठी त्याची पावले थांबली.

नदीचे विस्तृत वाळवंट अगदी मोकळे होते. सूर्यकिरणांच्या दाहात सारे वाळवंट प्रखर बनत होते. त्या प्रवाहातून वाहणाऱ्या नीलवर्णीय प्रवाहाचे तेवढे सुख नेत्रांना वाटत होते. त्या गूढ शांततेत कर्णाचे मन शांत झाले.

कर्णाची पावले करकरत, वाळूत रुतत पुढे जात होती.

नदीजवळ जाताच कर्णाने पादत्राने काढून ठेवली, हातातले कोरडे अंतरीय आणि अंगावरचे उत्तरीय वाळूवर ठेवून त्याने जलात प्रवेश केला. पायाच्या तळव्यांना तो गार स्पर्श सुखकारक वाटत होता. कर्णाने सूर्याला वंदन केले. किरणांनी सूर्याचे मुख उजळले होते. कर्ण थोडे अंतर चालत गेला आणि त्या प्रवाहित जलाशयात आपले शरीर त्याने झोकून दिले. एक कासावीस करणारी शिरीशरी त्याच्या अंगावर उमटली; पण क्षणभरच. कर्ण अगदी मोकळ्या मनाने नदीत पोहत होता. मनसोक्त पोहून होताच तो काठावर आला आणि जलात उभा राहून, हात उंचावून तो सूर्योपासनेत मग्न झाला. पाहता-पाहता त्या चिंतनात त्याचे भान हरपून गेले.

त्याची सूर्योपासना संपली, तेव्हा सूर्याचे किरण त्याच्या पाठीवर आले होते. लांब मानेवर रुळणारे काळेभोर केस कोरडे होऊन त्याच्या मानेवर चिकटले होते. सूर्यकिरणांनी त्याचे अंग कोरडे केले होते.

कर्णाने शांतपणे गंगेतील जल हाती घेतले आणि त्या पाठोपाठ त्याचा आवाज प्रगटला,

‘कोणी याचक आहे?’

मागून प्रतिसाद आला नाही.

कर्णाने समाधानाने परत विचारले,

‘कोणी याचक आहे?’

‘आहे’ कोमल आवाज आला.

कर्णाच्या चेहऱ्यावर स्मित उमटले. तो मागे न वळता म्हणाला,

‘हे याचका, माझा धर्म आणि माझं पौरुष वगळून जे तुझं मनोवांछित असेल, ते पूर्ण करण्यास मी वचनबद्ध आहे.

‘कर्णाने हातांतले जल साडले आणि तो याचकाचे दर्शन घण्यासाठी वळला.

नदीकाठावर एक चंद्रकळा नेसलेली एक स्त्री उभी होती. काळे वस्त्र परिधान केलेली ती स्त्री अधोवदन उभी होती. माथ्यावरचा पदर पुढे ओढल्याने तिचे रूप दिसत नव्हते.

कर्णाने विचारले,

‘माते! तुझी इच्छा बोल. ती पुरी करण्यात मला धन्यता वाटेल.’

पण ती आकृती काही बोलली नाही.

‘बोल, माते, संकोच करू नकोस. आजवर कोणत्याच याचकानं संकोच दाखवला नाही, ना माझ्या दातृत्वावर अविश्वास दाखवला. तुला काय हवं?’

‘माझा पुत्र मला हवा.’ शुष्क शब्द उमटले.

‘पुत्र! मी समजलो नाही, माते!’

‘कालच्या रणांगणावर माझा मुलगा अकारण बळी गेला, तो माझा एकुलता एक मुलगा मला हवाय्.’

‘माते ऽ ऽ’

‘आपल्या दातृत्वाबद्दल मी खूप ऐकलंय्... कोणीही याचक विमुख माघारी जाता नाही, असा आपल लौकिक.’

‘पण माते याचनेलाही रूप असावं लागतं.’

‘कसलं रूप?’

‘घन रूप! रात्रीचा अंधार आणि दिवसाचा प्रकाश मागितला, तर तो देणं कसं शक्य आहे? त्या घटना फक्त सूर्यतेजाला बद्ध असतात, जन्म-मृत्यू, मानवाच्या अधीन नसतात.’

‘पण कारण अधीन असतं ना! माझ्या मुलाच्या अपमृत्यूला तुम्हीच कारण नाही का?’

‘मी?’ कर्ण उद्गारला.

‘हो! क्षमा असावी, राजन्. पुत्रहीन संकोच पाळता येत नाही...’

‘माते, स्पष्ट बोल. केवढंही कटू असेल; पण ते सत्य असेल, तर मी ते आनंदानं शन करीन. ‘

‘ते सत्य आहे. रणांगणावर माझ्या मुलाचा मृत्यू घडला.’

‘रणांगणाचा निर्णय कुणी सांगावा!’

‘तेही मी जाणते. रणांगणावर जाणाऱ्या वीरास मृत्यूचं आह्वान स्वीकारावंच लागतं; पण माझ्या मुलाचा मृत्यू एका वांझोटचा, असफल रणांगणी झाला, त्याचं मला दुःख

आहे!’
‘असफल ?’
‘हां! राजा, तुझ्याच आज्ञेनं ते रणांगण घडलं ना! ज्या रणभूमीवर जय अथवा पराजय याचा निर्णय लागणार नव्हता, त्या रणभूमीवर माझ्या मुलाला पाठवण्याचा अधिकार काय होता? करभार द्यायचाच होता, तर ते युद्ध कशासाठी केलं? हौस म्हणून, की प्रजानिष्ठेचा भार कमी व्हावा, म्हणून?’
अपराहण काळाच्या उन्हापेक्षाही ते शब्द दाहक होते.
‘त्यात माझा दोष नव्हता.’
‘हां, मग माझ्या मुलाचा दोष? खरं आहे... दोष त्याचाच. राजा म्हणून निष्ठा ठेवली, योग्य-अयोग्य याचा विचार न करता, दाखवला तो शत्रू मानला आणि कर्तव्याचं पालन करण्यासाठी अखेरच्या क्षणापर्यंत तो लढला. दोष त्याचा. आपला नाही. आपल्या निष्ठेपायी बळी जाणारे गेले आणि ज्यांनी ते बळी घेतले, त्यांना करभार देऊन आपण संकटापासून स्वत:ला सुरक्षित राखलंत.’
‘बोल, माते! थांबलीस का? गेले दोन दिवस जे माझ्या मनात खुपत आहे, तेच तू बोलते आहेस. ते सारं मला ऐकू दे.’
‘मला काही मला माझा मुलगा हवाय्.’
‘मा! ढळलेली मन:शांती, हरवलेलं स्वप्न आणि गेलेला जीव प्रयत्नसाध्य नसतो.’
‘तो विचार मी कशाला करू? दानाला उभं राहणाऱ्यानं तो करावा, जिवाचं मोल द्यायला वीर रणांगणावर जातात. राजाचा विश्वासघात ते जाणत नाहीत.’
त्या शेवटच्या वाक्यानं कर्णाचं अंग काष्ठवत झालं. निश्चयी स्वरात तो म्हणाला,
‘ठीक आहे मते तुझा पुत्र तुला मिळेल. यापूढं रणांगणी जो वीर गेला, त्याचं नाव कर्ण होतं. तुझा मुलगा यापुढं माझ्या रूपानं जिवंत आहे, असं समज.’
‘मातेच्या मनाला फसवणूकीची फुंकर घालता येत नाही.’
‘ही फसवणूक नाही, माते! मला दोन दिवसांचा अवधी दे. या दोन दिवसांत चंपानगरीचा दुसरा अधिपती बनेल आणि मी कर्ण तुझ्या घरी, तुझा पुत्र म्हणून सेवेला येईन. तुझ्या मुलानं जे सुख दिलं असेल, तेच सुख अखंड देण्यासाठी मी माझी सारी तपश्चर्या पणाला लावीन, यात तिळमात्र शंका धरू नकोस. ती प्रतिज्ञा...’
कर्णाच्या त्या शब्दांबरोबर ती व्यक्ती भर वादळात एखादी वेल थरथरावी, तशी कापू लागली पाळलेला संयम, कठोरता कुठच्या कुठे गेली ती किंचाळली,
‘नको! राजन् ती प्रतिज्ञा करू नका. माझं दु:ख मी सहन करीन. पुत्रहीन मातेपेक्षा पुत्रवान मातांचं संरक्षण करायला तुझ्यासारखा राजा मिळायचा नाही.’
उभ्या जागी ती स्त्री अश्रु ढाळू लागली.
कर्णाचे मन त्या बोलांनी विद्ध झाले. तो शांत पावले टाकीत तिच्या समोर गेला. आपल्या निश्चयी हातानी त्याने अवगुंठन उचलले.
त्या रूपदर्शनाबरोबर कर्णाचा चेहरा फटफटीत पडला. चक्रधराची पत्नी अवंती समोर उभी होती
‘अवंती! तू S S, तुझा कौस्तुभ....!’
‘भाऊजी S S, माझा कौस्तुभ हरवला. कायमचा...’

अवंती बोलता-बोलता वाळूवर ढासळली.

कर्ण पुढे झाला. हातांच्या आधाराने त्याने अवंतीला कष्टाने उभे केले.

अवंतीचे सांत्वन करायला कर्णाजवळ अश्रुंखेरीज काहीही राहिले नव्हते.

अवंतीला सावरून तिला आधार देत तिच्यासह कर्ण रथाजवळ आला. अवंतीला स्वगृही पोहोचवून कर्णाचा रथ प्रासादाकडे वळला.

आपल्याच विचारात प्रासादाच्या पायऱ्या चढून कर्ण आत प्रवेश करणार, तोच त्याची पावले दाराशी थांबली. आतून हसण्याचा आवाज येत होता. कोणीतरी धावत येत होते.

महालाच्या आतल्या द्वारातून चक्रधर धावत बाहेर आला. त्याच्या पाठोपाठ वृषसेन धावत येत होता. वृषसेन उंबऱ्यावर येताच त्याने धनुष्याला प्रत्यंचा जोडल्याचा आविर्भाव केला. बाण सुटताच चक्रधर महालात कोसळला व हसत म्हणाला,

'मेलो S S'

'व्वा!' वृषसेन नाराजीने म्हणाला. 'एका बाणानं कधी मरतात का?'

पडल्या जागेवरून डोळे किलकिले करीत चक्रधर म्हणाला,

'युवराज! शेकडो बाण लागले, तरी जीव जातो एकाच बाणानं... जो काळजात घुसतो, त्यानं.'

त्याच वेळी संतापलेली वृषाली आत आली.

'हे काय, भाऊजी, लहान का आहात मुलाबरोबर खेळायला!'

चक्रधर गडबडीने अंग झटकीत उठला आणि त्याचे लक्ष दारात उभ्या असलेल्या कर्णाकडे गेले.

कर्ण धावला.

चक्रधर त्याच्याकडे पाहत होता.

कर्णाच्या काळ्याभोर नेत्रांत, खडकातून पाझर फुटावा, तसे पाणी गोळा झाले आणि क्षणात पापण्यांवरून ते गालांवर ओघळले. गुदमरलेल्या स्वरात कर्ण म्हणाला,

'मित्रा S S'

कर्णापासून दूर होत चक्रधर म्हणाला,

'मित्रा, बाण आरपार निघून गेला. विसरलोच, बघ. हस्तिनापुराला जाण्यासाठी रथ आणि दल तयार आहे. केव्हाही मुहूर्त ठरव. येतो मी.'

चक्रधर तसाच निघून गेला.

वृषाली जवळ आली.

कर्ण आपले डोळे टिपीत होता.

वृषालीने विचारले,

'काय झालं?'

'वसू S S, चक्रधराचा कौस्तुभ परवाच्या रणांगणावर हरवला. कायमचा...'

- आणि वृषसेनाला छातीशी कवटाळून कर्णाने आवरलेल्या अश्रूंना वाट करून दिली.

## १२

हस्तिनापूर दिसू लागले, तसा वृषसेनाचा आनंद वाढला. आसुसल्या नजरेने तो नगरी पाहत होता. दोनप्रहराच्या वेळी गंगेच्या विशाल प्रवाहाच्या काठावर हस्तिनापूर शुभ्र कमळाप्रमाणे उमलले होते. त्या नगरीची गोपुरे, आकाशात उंचावलेली भवने कमलदलासारखी भासत होती.

कर्ण वृषसेनाला म्हणाला,

'वसू ती बघ कौरवेश्वरांची राजधानी हस्तिनापूर.'

'तात, तिथं खूप गंमत असेल, नाही?'

'खूप!' निराळेच स्वप्न कर्ण पाहत होता. 'तिथं तुझे आजोबा, आजी वाट पाहत असतील. तुझे भाऊ शत्रुंजय अन् वृषकेतु तुझी आठवण काढीत असतील. अन् तुझा काका द्रूम, तू केव्हा येतोस अन् आपल्या रथातून तुला केव्हा प्रासादावर नेतो, असं त्याला झालं असेल.'

'प्रासादावर?'

'हो! तुझा काका दुर्योधन महाराजांच्या बरोबर असतो ना?'

कर्णाचे मन राधाई-अधिरथांना पाहण्यासाठी उतावीळ झाले होते.

हस्तिनापूच्या द्वारात रक्षकांचे अभिवादन स्वीकारून कर्णाचा रथ प्रवेश करता झाला. अधिरथाच्या वाड्यासमोर कर्णरथ थांबला. वाड्यातून वृषकेतु बाहेर आला. कर्णाला रथात पाहताच तो तसाच माघारी वळला आणि वाड्यात एकच धावपळ उडाली.

कर्ण, वृषाली, वृषसेन वाड्यात आले. शत्रुंजय, वृषकेतु पुढे झाले. त्यांनी कर्णाला वंदन केले. द्रूम सामोरा येताच कर्णाने त्याला वंदन करण्यासही अवसर दिला नाही. त्याला आपल्या मिठीत घेतले. सर्वांनी वाड्यात प्रवेश केला. द्रुमपत्नीची भेट झाली. कर्णाची नजर आतल्या द्वारातून येणाऱ्या राधाईवर स्थिरावली. कर्ण पुढे झाला. मातृवंदना करून उठत असता राधाईचे शब्द कानांवर पडले,

'बरं झालं, आलास, ते. फार पाहावंसं वाटत होतं...'

कर्ण वार्धक्याने थकलेल्या राधाईकडे पाहत होता. राधाई म्हणाली,

'केवढा उंच झाला आहेस, रे! जरा वाक ना!'

कर्ण वाकला. राधाईने त्याच्या कानशिलांवरून बोटे उतरून माया घेतली. ती शुष्क बोटे कट्कट् वाजली. राधाईने कर्णाला मिठीत घेतले. साऱ्यांच्या चेहऱ्यांवर हसू होते. कर्ण म्हणाला,

'आई, सारे हसतात, बघ.'

'हसू देत! ती काय बेडकीसारखी आकाशातुल पडली होती काय? मायेखालीच तीही मोठी झालीत.'

'हो, पण दादा मोठा झालाय् ना!' द्रुमाने राधाईला चिडवले.

'गप, रे. माहीत आहे मोठा! मला तेवढाच आहे तो.'

राधाईचे लक्ष वृषसेनाकडे गेले. तिने वृषसेनाला जवळ ओढले.

साऱ्या घरात एकच आनंद वावरत होता. घर गजबजून उठले होते. पण कर्णाचे मन

अस्वस्थ होते. तो उठत म्हणाला,

'आई, तात कुठं आहेत?'

'रथशाळेत गेलेत.'

'मी तातांना भेटून येतो.'

'अरे, पण येतील ना एवढ्यात...'

'नको. मी भेटून येतो.'

कर्ण जायला निघाल्याचे पाहताच द्रुम उठला. द्रुम सारथ्य करीत होता. कर्णाला साऱ्या घटना सांगत होता. रथशाळेकडे रथ धावत होता.

चारी बाजूंनी तटांनी बद्ध झालेली रथशाळेची भव्य वास्तू दिसू लागली. रथशाळेच्या द्वाराशी कर्ण, द्रुम उतरले आणि त्यांनी रथशाळेत प्रवेश केला. आत मोठा, भव्य उघडा चौक होता. डाव्या हाताला घोड्यांची भव्य पागा लागत होती. पागेतून नाना लाकडांच्या राशी एका भागात रचल्या होत्या. समोर दूरवर रथशाळा दिसत होती. रथशाळेकडे जात असता अर्धवट राहिलेले काही रथ नजरेत येत होते.

कर्ण चकित होऊन रथशाळेचे रूप पाहत होता. पूर्वी याच रथशाळेत शेकडो कारागिरांची वर्दळ असे. नाना आवाजांनी ही शाळा गजबजून गेलेली असे. याच रथशाळेत आता आश्रमाची शांतता नांदत होती. कर्णाने तो विचार झटकला. त्याचे लक्ष जवळ येणाऱ्या रथशाळेकडे लागले होते.

रथशाळेसमोर एक सुवर्णरथ एका चाकावर उभा होता. दुसरा भाग लाकडी ओंडक्यावर स्थिरावला होता. रथापासून थोड्या अंतरावर जमिनीत रोवलेल्या कण्यावर एक सुरेख रथचक्र फेरे घेत होते. त्या फिरत्या चाकाजवळ एक व्यक्ती बसली होती. शुभ्र, विरळ केस मानेवर पसरले होते. सावळ्या छातीवर शुभ्र उत्तरीय विसावले होते. आपल्या तीक्ष्ण नजरेने ती व्यक्ती ते फिरते चाक पाहत होती. कर्ण जवळ आल्याचे भानही त्या व्यक्तीला नव्हते.

'तात!'

'अं!' म्हणत त्या वृद्धाने मान वर केली.

कर्णाला पाहताच ती व्यक्ती हर्षाने उठली.

कर्ण वंदन करून उठत असतानाच अधिरथाने त्याच्या पाठीवरून हात फिरवीत विचारले,

'कर्णा, केव्हा आलास?'

'थोडा वेळ झाला.'

'क्षेम आहे ना!'

'आपल्या आशीर्वादानं...'

'एकटाच आलास?'

'नाही. आम्ही सर्वजण आलो आहोत.'

अधिरथाने त्याच्याकडे पाहिले आणि सेवकांना म्हटले,

'चक्र रथाला जोडा.'

चक्र रथाला जोडले गेले.

अधिरथासह कर्ण तो सुवर्णरथ पाहत होता. रथ दृष्ट लागण्याइतका सुरेख सज्ज झाला होता.

कर्णाने विचारले,

'कुणाचा रथ?'

'दुर्योधन महाराज राजसूय यज्ञाला जाणार आहेत ना! त्यांच्यासाठी रथ मुद्दाम तयार केलाय्'

'रथ अप्रतिम झालाय्.'

'मनाजोगं काम करायला उसंत मिळते, म्हणून एवढं सुबक काम करता येतं'

'आता रथाचं काम फारसं दिसत नाही.'

'असलं, तर दिसणार! पूर्वीचे सज्ज झालेले रथ विपुल आहेत. त्यांची मोडतोड पाहणं एवढंच काम आता आहे. जुने जाणकर कलावंत आहेत. त्यांच्यासाठीच विदुरांनी रथशाळा चालू ठेवली आहे, म्हटलं, तर फारसं वावगं होणार नाही.'

'पण इथं तर शेकडो कारागीर होते. आपल्या चंपानगरीहूच...'

'ते सारे इंद्रप्रस्थाला आहेत. नवी राजधानी उभारली जाते ना! पांडवांची रथशाळा सज्ज करण्यासाठी भीष्माचार्यांनी त्यांना इंद्रप्रस्थाला पाठवलंय् पांडवांनी उभारलेल्या राजधानीमुळं हस्तिनापुराच्या साऱ्या कलावंतांना, शिल्पकारांना चांगले दिवस आलेत.'

'इंद्रप्रस्थ एवढं भव्य आहे?'

'त्यापुढं हस्तिनापूर काहीच नाही. रथशाळा सज्ज करण्यासाठी मीच गेलो होतो ना! कर्णा, पांडवांनी उभारलेली मयसभा पाहून तू थक्क होशील. देवांनीसुद्धा हेवा करावा, अशी ती मयसभा आहे. आपली गजशाला त्याच कामावर होती.'

'गजशाला?'

'नाहीतर एवढा भव्य प्रासाद, गोपुरं, मयसभेसारखी सभागृहं उभी करायची, तर त्याला लाकूड नको? देवदार, साग, तालवृक्षांचे प्रचंड सोट ओढून आणणं हे का माणसांचं काम? त्यासाठी आपली गजशाळाच नव्हे, तर आपलं चतुरंग दळही राबत होतं. कर्णा, आकाशात सूर्य-चंद्र शोभावे, तसं हस्तिनापुर आणि इंद्रप्रस्थ या भूमीवर शोभतात.'

रथाचं चाक रथाला जोडलं होतं. उमदे अश्व रथाला जुंपले होते. रथ तयार झालेला पाहून अधिरथ कर्णाला म्हणाला,

'चल, कर्णा! रथाची परीक्षा पाहू अन् मग घरी जाऊ.'

कर्ण रथारूढ झाला. अधिरथाने वेग हाती घेतले. मंदगतीने रथ रथशाळेबाहेर आला. रथाबरोबर द्रूम सेवकांसह आला होता. अधिरथ कर्णाला म्हणाला,

'कर्णा, उतर.'

'मी येतो ना!'

'कर्णा, हा युवराजांचा रथ आहे. त्याची जोखीम मोठी. कौरवसाम्राज्याच्या युवराजांचा रथ सर्व गुणानी श्रेष्ठ असला पाहिजे. या रथाची परीक्षा वेगळी आहे.'

'वेगळी?'

'हो! रथ समतोल धावला पाहिजे. ते पाहायचंच झालं, तर रथाला वेग देण्याआधी मी रथाच्या कुण्या काढून घेतो अन् रथ पळवतो. दोन्ही चाकांच्या समतोल वेगानंच

रथाला आवळणी लागायला हवी. चाक न सोडता रथ धावायला हवा. तू उतर. बघ.'

कर्ण उतरला. अधिरथांनी क्षणभर डोळे मिटले. रथाला वंदन केले. वेग हाती घेऊन ते रथावर उभे राहिले. समोर दूरवर गेलेला रस्ता निरखला आणि सेवकांना आज्ञा केली,

'कुण्या काढा.'

रथाला लावलेल्या कुण्या काढल्या गेल्या. कर्णाचा श्वास रोखला गेला. आसुडाचा आवाज उठला. रथ भरधाव सुटला. काही वेळातच वळणावर रथ दिसेनासा झाला.

त्या मोकळ्या रस्त्याकडे कर्णाचे लक्ष लागले होते.

हळूहळू रथाचा आवाज ऐकू येऊ लागला. रथ दिसू लागला. भरधाव वेगाने रथ दौडत येऊन थांबला. घोड्यांची ओठाळी फेसाळली होती.

अधिरथ समाधानाने खाली उतरला व अभिमानाने म्हणाला,

'रथ सिद्ध झाला.'

'कुण्या काढून रथ कुणालाही चालवता येईल?'

अधिरथ हसला,

'कुणालाही नव्हे! ज्याला रथपरीक्षा आहे, त्यालाच हे जमेल. अन् कर्णा, कुण्या काढून रथ चालवणं हा काही रथाचा गुण नव्हे. ती परीक्षेची पद्धत आहे माझी.'

सेवकांनी रथ रथशाळेत नेला अन् कर्ण-द्रूमांसह अधिरथ आपल्या रथातून स्वगृही परतला.

# १३

स काळी कर्ण राधाईबरोबर बोलत बसला असता, द्रुम गडबडीने आत आला. तो म्हणाला,

‘दादा, दुर्योधनमहाराज आलेत.’

कर्ण उठण्याआधीच दुर्योधन आत आला. त्याने राधाईला वंदन केले. संकोचलेली राधाई म्हणाली,

‘आयुष्यमान व्हा.’

कर्ण म्हणाला,

‘युवराज!’

कर्णाकडे पाहत दुर्योधनाने म्हटले,

‘मी तुझ्याशी मुळीच बोलणार नाही.’

कर्ण गालांत हसला. तो शांतपणे म्हणाला,

‘अन् हे सांगण्यासाठी युवराज दुर्योधन महाराज सेवकाच्या अंत:पुरापर्यंत धावत आले, वाटतं?’

दुर्योधनाने कर्णाकडे रोखून पाहिले आणि मोठ्याने हसत त्याने कर्णाला मिठी मारली. दोघेही हसत होते. दुर्योधन म्हणाला,

‘मित्रा, काल आलास अन् भेट नाही.’

‘तसं नाही. पण बऱ्याच वर्षांनी आलो, तेव्हा....’

‘ठीक! चल. लवकर तयार हो. मी तुला प्रासादावर नेण्यासाठी आलोय्.’

‘जशी आज्ञा!’

कर्ण तयार होताच दोघे रथातून प्रासादाकडे निघाले.

पांढऱ्या शुभ्र आणि शेंदरी दगडांनी बांधलेल्या भव्य प्रासादासमोर रथ येऊन उभा राहिला. स्फटिकाच्या पायऱ्यांवरून चढत असता रक्षक दुर्योधनाला वंदन करीत होते. अनेक महालांनी सज्ज असलेल्या ऐश्वर्यसंपन्न प्रासादातून दोघे जात होते. अनेक महाल ओलांडून दोघे राजमहालात आले. द्वारावरचे रक्षक अदबीने बाजूला झाले. राजमहालात धृतराष्ट्रमहाराज नक्षीदार उच्च सुवर्ण-आसनावर बसले होते. मस्तकावर त्यांनी रत्नांकित मुकुट धारण केला होता. राजभूषणे, राजवस्त्रांनी त्यांच्या रूपाला वेगळीच भव्यता लाभली होती. डोळे मिटल्यासारखे दिसत होते. महाराजांचे अंधत्व माहीत असूनही ते डोळ कोणत्याहा क्षणी उघडले जातील, असे वाटत होते.

धृतराष्ट्रमहाराजांच्या मागे दोन दासी मंद गतीने चवऱ्या ढाळीत उभ्या होत्या. धृतराष्ट्राच्या उजव्या हाताला त्यांच्या सिंहासनाखाली एका चंदनी आसनावर विदुर बसले होते.

गोल चेहरा, शांत दृष्टी, कपाळावर गंधाची मुद्रा असणाऱ्या विदुरांचे लक्ष महालात येणाऱ्या दुर्योधनाकडे गेले; धृतराष्ट्रमहाराजांच्या डाव्या बाजूला आसनस्थ

झालेल्या भीष्मांकडे त्यांनी पाहिले.

भीष्माचार्यांनी आपली मान फिरवली.

त्यांच्या रूपाने हिमालयच फिरल्याचा भास झाला.

मस्तकावरून अर्ध्या पाठीपर्यंत उतरलेले पांढरे शुभ्र केस, वक्षभागापर्यंत आलेली श्वेत दाढी, पांढऱ्या भुवयांत जडावलेले रत्नांसारखे डोळे, साक्षात भव्यता या रूपाने साकारल्याचा भास होत होता.

वयोवृद्ध, तपोवृद्ध भीष्मांनी दुर्योधनाला येताना पाहिले आणि ते म्हणाले,

'राजन्, युवराज दुर्योधन येत आहेत.'

कर्णासह दुर्योधन पुढे झाला. वंदन करीत तो म्हणाला,

'तात, दुर्योधन वंदन करीत आहे.'

'कल्याण असो!'

कर्ण वंदन करीत म्हणाला,

'सूतपुत्र राधेय वंदन करीत आहे.'

धृतराष्ट्राच्या चेहऱ्यावर किंचित स्मित विसावले. ते शांत आवाजात म्हणाले,

'अंगराजा, तू केव्हा आलास?'

'काल सायंकाळी.'

धृतराष्ट्र काही बोलणार, तोच खडावांचा आवाज उमटला. द्रोणाचार्य राजमहालात येत होते.

द्रोणाचार्य उंचपुरे होते. तपश्चर्येचे तेज त्यांच्या मुळातल्या गौरवर्ण, पण रापलेल्या शरीरावर दिसत होते. पांढरा शुभ्र जटाभार त्यांना शोभत होता. पांढरी दाढी छातीवर रुळत होती.

द्रोणाचार्य येताना दिसताच विदुराने सांगितले,

'द्रोणाचार्य...'

धृतराष्ट्राने आज्ञा दिली.

'विदुरा, आचार्यांना मृगाजिन दे.'

विदुराला कष्ट ध्यावे लागले नाहीत. सेवकांनी आचार्यांना आसन दिले.

द्रोणाचार्यांची दृष्टी वळताच दुर्योधन-कर्णांनी वंदन केले.

आशीर्वादाचा हात उंचावून धृतराष्ट्राकडे पाहत द्रोणाचार्य म्हणाले,

'राजन्! एकशे एक आश्रमांची जागा पाहून मी आलोय्. भीष्ममहाराजांनी जागा पाहून संमती दिली की, आश्रमकार्य सुरू होईल.'

'मी पाहण्याची आवश्यकता नाही.' भीष्म म्हणाले, 'आपण निवडलेली जागा निश्चित योग्य असणार!'

धृतराष्ट्रांनी त्याला अनुमती दिली. त्याने सुखावलेले द्रोण तृप्ततेने म्हणाले,

'राजन्, आणखी काही वर्षांत ही नगरी साक्षात ज्ञानपीठ बनेल. हिचा लौकिक त्रिखंडात पसरेल. ज्ञानासारखं पवित्र या पृथ्वीतलावर काहीच नाही. राजन्, राजसूय यज्ञाहून येताच मी हे कार्य हाती घेईन.'

'अद्याप राजसूय यज्ञाला अवधी आहे ना?'

'अवधी कुठला! युवराज नकुल स्वतः आमंत्रण देण्यास आले असता त्यांनी परत परत सांगितलंय्... भीष्म, विदुर अन् मी तिथं आधी जाणं आवश्यक आहे. ऐन वेळी

जाऊन कसं चालेल?'

द्रोणाचार्यांचा आवाज किंचित वाढलेला लक्षात येताच धृतराष्ट्र घाईने म्हणाले,

'हो! तुम्ही लौकर जाणंच इष्ट! प्रयाणाचा मुहूर्त केव्हा?'

'उद्याच निघावं लागणार!'

'जशी आपली इच्छा!' धृतराष्ट्रांनी आपली संमती दिली.

दुर्योधनाने कर्णाकडे पाहिले, नजरेने खुणावले आणि सर्वांना वंदन करून दोघे महालाबाहेर आले.

दुर्योधनाच्या महालात जाताच दुर्योधनपत्नी भानुमतीने कर्णाचे स्वागत केले.

'या, भाऊजी! केव्हा आलात?'

'कालच! आमच्या मित्राला चोरलंत. त्यामुळं यावं लागलं.'

'चोरलं?'

'नाही तर काय? स्वयंवर झाल्यापासून आमची आठवण विसरलेत तुमचे पतिराज!'

क्षेमकुशल विचारून भानुमती निघून गेली.

महालात फक्त कर्ण आणि दुर्योधन उरले होते. दुर्योधनाची बेचैनी त्याच्या मुखावर प्रकटली होती. कर्णाने विचारले,

'मित्रा, सर्व क्षेम आहे ना?'

दुर्योधन हसत म्हणाला,

'राधेया, क्षेमाखेरीज दुसरं काहीही उरलेलं नाही. पाहिलंस ना, तातांनी केवढ्या प्रेमभरानं माझं स्वागत केलं, ते! केव्हातरी भेट घडते, पण ती अशी!'

'केव्हातरी'

'हो, मध्यंतरी तातांचा माझ्याबद्दल गैरसमज झाला होता.'

'गैरसमज? कशाबद्दल?'

'लाक्षागृहात पांडव जळून मेले, ती करणी माझी होती, असा तातांचा समज करून दिला होता. समज कसला, सत्यच होतं ते. पांडवाच्या सुदैवानं अन् माझ्या दुर्दैवानं तो बेत फसला. पण, मित्रा, पांडव जळून मेले, हे कळताच पितामह भीष्माचार्य, महात्मा विदुर अन् द्रोणाचार्यांना केवढा शोक झाला, म्हणून सांगू! ते पाहायला तू हवा होतास.'

'बरं झालं, पांडव वाचले, ते! पांडव वाचल्याचा मलाही आनंद आहे.'

'आनंद! तू माझा मित्र ना?'

'युवराज, दुर्दैवानं पांडव लाक्षागृहात जळून मेले असते, तर आयुष्यभर शय्यागृहात निद्रेस्तव जाताना भीती वाटली असती. पराक्रमानं शत्रू जिंकावा, घातानं नव्हे.'

'ते जाऊ दे! ऐक. मला पुष्कळ सांगायचं आहे. ते जतुगृहप्रकरण झालं आणि त्याची संधी आमच्या ब्रह्मदेवांनी उचलली. तिन्ही मुखांनी सदैव माझ्यावर आग पाखडली जात होती. मी सांगतो, कर्णा, पांडव वाचले, ते त्यांच्या दैवामुळं नव्हे- आमच्याच घरभेदेपणानं. पांडव सुरक्षित आहेत, म्हणून समजलं, तेव्हापासून थोडी धार मंदावली. यापूर्वी तातांच्या दर्शनालासुद्धा जायला भीती वाटत असे.'

'पण आता सारं निवळलं ना! त्यातच समाधान...'

'समाधान! या हस्तिनापुरात समाधान पूर्णतया नांदत आहे. ज्या नगरीत भीष्माचार्यांसारखे अजातशत्रू प्रमुख आहेत, महात्मा विदुरांसारखे नीतीचे आदर्श जपणारे सचिव आहेत, ज्ञान आणि वैराग्य बाळगणारे द्रोणाचार्यांसारखे सल्लागार

आहेत, तोवर कमतरता कसली? सध्या कौरवसाम्राज्याचा कारभार त्या तिघांच्या हातून चालला आहे. तू ऐकलं नाहीस? आता या राज्यात ज्ञानदान करणारे शेकडो आश्रम निघणार. कौरवेश्वरांची राजधानी हस्तिनापूर ज्ञानपीठ बनणार! एका नव्या विचारानं, नव्या भव्य स्वप्नानं सारे भारले गेले आहेत.' दुर्योधन हसला. 'तुला माहीत नाही, कर्णा, राजप्रासादाच्या प्राणिसंग्रहालयात गोळा केलेले वाघ, सिंह, अस्वले अरण्यात सोडून देण्यात आली आहेत.'

'कारण?'

'त्यांच्या उपजीविकेसाठी दररोज निष्पाप जनावरांची हत्या करावी लागते ना! आता विदुरांनी दंडक घातला आहे. गरजेइतकीच मृगया केली जाते. आता हस्तिनापूरवासीच नव्हे, तर समस्त प्राणिमात्रांत हे समाधान सुखेनैव नांदत आहे. सारे तृप्त आहेत.'

'अन्, मित्रा, तू...'

'माझ्या नशिबी हे सुख नाही. या कुरुसाम्राज्याचा मी वारस. मला शांती लाभेल कशी? या साम्राज्याचं वैभव वाढावं, सत्ता वाढावी, हे राज्य बलशाली व्हावं, इथल्या नागरिकाला निर्भयपणे, स्वाभिमानानं जगता यावं; इथल्या वीरांच्या बाहूंत वज्राचं बळ साठवलेलं असावं, असं इच्छिणारा मी. माझ्या मनाला समाधान कुठलं! मित्रा, मी एकाकी पडलोय्. साऱ्यांनी मला टाकलंय्. मन रमविण्यासाठी मृगयेला जरी गेलो, तरी नौबतीच्या आवाजांनी चौखूर उधळणारी श्वापदं मला भिऊन पळताना दिसतात. एखादं श्वापद गाठलं अन् मारलं, तरी त्याच्या जागी मी दिसू लागतो. मृगयेचा आनंदही उरत नाही.'

दुर्योधनाचे ते व्याकूळ बोलणे ऐकून कर्णाचे मन द्रवले. दुर्योधनाचे असले घायाळ रूप कर्णाने कधी पाहिले नव्हते.

कर्ण म्हणाला,

'मित्रा, तू असा भयग्रस्त होऊ नकोस. एक काम प्रथम कर.'

'काय?' आशेने दुर्योधनाने विचारले.

'त्या कृष्णाची मैत्री संपादन कर. त्याला आपलासा करून घे.'

दुर्योधन उद्विग्नपणे हसला.

'त्याची आता आशा करू नकोस. कृष्ण पांडवांचा बनलाय्. राजमाता कुंती त्याची आत्या आहे. एवढंच नव्हे, तर कृष्णाची बहीण सुभद्रा अर्जुनानं वरलीय्. सर्व राजांकडून करभार गोळा करण्यासाठी कृष्णाची चतुरंग सेना पांडवांच्या मागं उभी होती.'

'ठीक आहे. त्याचा आपण विचार करू.'

'मित्रा, तू तरी माझा आहेस का?' दुर्योधनाच्या नेत्रांत अश्रू तरळल्याचा भास झाला.

'या कर्णाच्या जीवनात तुझ्या मित्रत्वाइतकं मोठं, काही नाही. मित्रा, मी बोलतो, त्यावर विश्वास ठेव. जोवर कर्ण जिवंत आहे, तोवर स्वत:ला एकटा समजू नकोस. तुझी इच्छा पुरी करण्यासाठी हा तुझा मित्र सदैव तुझ्या पाठीशी उभा आहे, याचा विसर पडू देऊ नकोस.'

'वचन!'

'सज्जनाचा, वीराचा आणि तपस्व्याचा शब्द हाच ग्राह्य धरावा. तेच वचन

समजावं.’

दुर्योधनाने प्रेमभराने कर्णाचा हात हाती घेतला.

त्या हाताची पकड कर्णाला जाणवत होती.

दुर्योधनाचा निरोप घेऊन कर्ण जायला निघाला असता त्याने दुर्योधनाला विचारले,

‘युवराज, राजसूय यज्ञाला मी यायलाच हवं का?’

‘का?’

‘जाऊ नये, असं वाटतं.’

‘मला का जाण्याची इच्छा आहे? पण जावं लागणारच! तू तसं काही मनात आणू नकोस. तू राजसूय यज्ञाला आला नाहीस, तर साऱ्यांच्या ध्यानी तुझी अनुपस्थिती येईल. चर्चेचा विषय होईल अन् आमच्या राजमंडळात त्याबद्दल तुझ्यावर कोप होईल.’

‘जशी आज्ञा!’

‘उद्या पितामह, आचार्य आणि महात्मा राजसूयाला जात आहेत. आपण मागाहून मिळून जाऊ.’

दुर्योधनाला होकार देऊन कर्ण स्वगृही आला; पण राजसूय यज्ञाचा विचार मनातून जात नव्हता.

# १४

खांडवप्रस्थ म्हणजे कौरव युवराजांची मृगयेची भूमी. घनदाट अरण्यांनी आणि नाना वन्य श्वापदांनी संपन्न असलेला तो भूभाग. त्या जागेवर पांडवांनी उभारलेली राजधानी पाहून दुर्योधनाबरोबर गेलेला कर्ण चकित झाला. यमुनेच्या किनाऱ्यावर ती नगरी उभी होती. मंदिरे, राजवाडे, गोपुरे यांची शिखरे आकाशात झाळाळत होती. भव्य तटाच्या प्रवेशद्वारातून इंद्रप्रस्थात जात असता त्या द्वाराशीच एकशे एक हत्ती स्वागतासाठी उभे होते. चंद्राप्रमाणे शुभ्रधवल हवेल्या त्या नगरीचे सौंदर्य वाढवीत होत्या. यज्ञासाठी पाचारण केलेल्या राजांसाठी प्रासाद उपलब्ध होते. चारी वर्णांसाठी मोठमोठ्या अतिथिशाला निर्माण केल्या होत्या. त्यांच्या मनोरंजनासाठी नट-नर्तकांचे, वादक-गायकांचे वास्तव्य त्या नगरीत घडवले होते.

यज्ञशाळेच्या द्वारी मंगल वाद्ये वाजत होती. या यज्ञभूमीत मध्यभागी कुशल शिल्पकारांच्या साहाय्याने श्रेष्ठ यज्ञवेदी स्थापिली होती. कुंडे आणि यज्ञशाला सिद्ध झाल्या होत्या.

यज्ञभूमीचे सर्व व्यवहार यथासांग व्हावेत, म्हणून युधिष्ठिराने कामे वाटून दिली होती. यज्ञसमारंभावर लक्ष ठेवण्याचे काम द्रोणाचार्यांवर सोपवले होते. भोजनविभाग दु:शासन सांभाळीत होता. यज्ञासाठी आलेल्या ब्राह्मणांचा व नृपांचा सत्कार अश्वत्थामा आणि संजय करीत होते. दक्षिणा कृपाचार्यांच्या हस्ते दिली जात होती. यज्ञासाठी होणाऱ्या अफाट खर्चावर विदुरांचे लक्ष होते आणि दुर्योधन करभार घेण्यात गुंतला होता.

शेकडो ब्राह्मणांच्या तोंडून मंत्रोच्चार उठत होते. यज्ञातल्या आहुतींनी तृप्त झालेल्या यज्ञकुंडातून उठणारे धुराचे लोट आकाशात चढत होते.

इतर सर्व यज्ञकर्मे पार पाडल्यावर शेवटी सोमयागाचा दिवस उगवला. अग्रपूजेचा मान कोणाला जातो, इकडे सर्व नृपांचे लक्ष लागले होते. भीष्मांनी वसुदेवपुत्र कृष्णाला अग्रपूजेचा मान दिला. युधिष्ठिराने कृष्णपूजा केली. ते पाहून शिशुपाल संतापला. भर सभेत त्याने कृष्णाची नालस्ती केली. कृष्णाने खूप संयम दाखविला, पण शिशुपालाने मर्यादा ओलांडताच कृष्णाने आपल्या सुदर्शनाने शिशुपालाचा वध केला. यज्ञभूमीत झालेला तो वध पाहून साऱ्या राजांची मने भीतीने थरारली.

याज्ञाच्या शेवटच्या दिवशी नृपांची एकच पंगत बसली होती. चंदनअगरूचा सुवास सर्वत्र दरवळत होता. शेकडो सुवर्णासनांनी ती पंगत सुशोभित केली होती. पंक्तीच्या अग्रभागी भीष्म, द्रोण दिसत होते. विदुरांच्या शेजारी कर्ण बसला होता. पंक्तीमधून कृष्ण फिरत होता. पंक्तीमध्ये वाढण्यासाठी आलेल्या दासीसमुदायाच्या अग्रभागी द्रौपदी दिसत होती.

विदुर कर्णाला म्हणाला,

'राधेया, जीवनाचं सार्थक झाल्यासारखं वाटलं.'

'कशामुळं?'

'असा अलौकिक यज्ञ योजणं आणि पार पाडणं ही का सामान्य गोष्ट आहे! पूर्वसंचिताखेरीज ही गोष्ट घडत नाही. तू कधी असा यज्ञ पाहिला होतास?'

'दुर्योधनामुळंच हा यज्ञ पाहण्याचं भाग्य लाभलं.'

'पूर्वपुण्याई! दुसरं काय!'

कर्णाच्या पानाजवळ सुकुमार पावले आली, नकळत कर्णाची दृष्टी वर गेली. समोर द्रौपदी उभी होती. दोघांची दृष्टी एकमेकांना भिडली होती. द्रौपदीच्या हाती पक्वान्नांचे तबक होते. पदर ढळला होता. तो ध्यानी येताच वाढण्यासाठी वाकलेली द्रौपदी न वाढताच उभी राहिली. कर्णाची दृष्टी पानाकडे वळली आणि त्याच वेळी त्याच्या कानांवर शब्द आले,

'याचकानं दात्याकडं पाहू नये,'

कर्णाने संतापाने मान वर केली.

द्रौपदी पंक्तीमधून भरभर जात होती.

कृष्ण सामोरा आला होता. कृष्णाच्या चेहऱ्यावरचे आश्चर्य कर्णाला क्षणभर दिसले, कारण दुसऱ्या क्षणी कृष्ण द्रौपदीच्या पाठोपाठ जात होता.

द्रौपदी हातांतील तबक सावरीत पंक्तीबाहेर आली. तिने आतल्या महालात प्रवेश केला, तोच तिच्या कानांवर हाक आली,

'द्रौपदी ऽऽ'

द्रौपदीने मागे वळून पाहिले, कृष्णाला पाहताच तिच्या चेहऱ्यावर स्मित उमटले.

'कृष्णा, मला हाक मारलीस?'

'हो!' कृष्णाने आजूबाजूला कोणी नाही, याची खात्री करून घेतली. तो म्हणाला, 'त्या कर्णाचा असा अपमान करण्याची काही आवश्यकता होती का?'

'मग त्यानं पाहावं कशाला?'

'तुझा पदर ढळला, हा त्यांचा दोष नव्हे. तो आपला अतिथी आहे, एवढंही भान तुला राहू नये?'

'कृष्णा, त्याला पाहिलं, की माझा संताप उसळतो. का, कुणास ठाऊक!'

कृष्ण कठोर हसला. म्हणाला,

'तुला कारण माहीत नसलं, तरी मला आहे. पदर ढळला, तो दोष तुझा; पण पातक त्याच्या माथ्यावर. गुन्हा काय, तर त्यानं दृष्टी उंचावली. कृष्णे, रूपाच्या गर्वानं आणि कुलाच्या खोटया अहंकारापायी एक चूक केलीस, त्याचं पातक त्याच्या माथी कशाला घालतेस? तो पती लाभला नाही, याचा आता पश्चात्ताप होतो ना?'

'कृष्णा S S' द्रौपदी ओरडली; पण तिचे बोलणे ऐकायलाही कृष्ण थांबला नाही.

कृष्ण पंगतीत आला, तेव्हा पंगत उठत होती. जाणारा कर्ण कृष्णाला पाठमोरा दिसला. कृष्ण जवळ गेला आणि त्याने हाक मारली,

'राधेया S S'

कर्ण वळला.

कृष्णदर्शनाबरोबर त्याच्या चेहऱ्यावर आनंद उमटला.

कृष्णाने विचारले,

'मुक्काम आहे ना?'

'नाही! आज आम्ही जाणार! युवराज दुर्योधन अन् शकुनिमहाराज थोडे दिवस राहून

येणार आहेत.’

‘भोजन व्यवस्थित झालं ना?’

‘अगदी व्यवस्थित! मी तृप्त आहे. पक्वान्नांनी पोट भरलं, तरी ज्या हातांनी पक्वान्नांचा स्वाद घेतो, त्या हातांना उच्छिष्ट लागतंच. तेच धुवायला निघालो होतो.’

डाव्या हाताने उत्तरीय सावरीत कर्ण चालू लागला.

कृष्ण पाठमोऱ्या कर्णाकडे पाहत होता. मुखावर चिंता प्रगटली होती.

# १५

दुर्योधन आपल्या महालात येरझारा घालीत होता. महालातल्या आसनावर दुर्योधनाचे मामा शकुनि बसले होते व आपल्या घाऱ्या डोळ्यांनी दुर्योधनाची हालचाल पाहत होते. इंद्रप्रस्थाहून येताच दुर्योधनाने कर्णाला आणण्यासाठी आपला रथ पाठाविला. कर्णाची भेट घेण्यासाठी तो उतावीळ बनला होता. रथाचा आवाज कानी येताच सौधाकडे धावत तो म्हणाला,

'आला, वाटतं.'

प्रासादासमोर उभ्या असलेल्या रथातून उतरणारा कर्ण पाहून दुर्योधनाला समाधान वाटले. तो महालात येत म्हणाला,

'मामा, कर्ण आला.'

'युवराज, तुम्ही आज्ञा केल्यावर कोण येणार नाही?'

कर्ण महालात प्रवेश करताच दुर्योधन म्हणाला,

'ये, मित्रा, मी तुझीच वाट पाहत होतो.'

'केव्हा आलात?'

'आम्ही नुकतेच आलो.'

'अन् तातडीनं मला बोलावलंत?'

'तुला भेटावंसं वाटलं, हा काय गुन्हा? तसं वाटलं असलं, तर बोलावल्याबद्दल क्षमा कर.'

दुर्योधनाचे ते उद्गार ऐकून कर्णाला आश्चर्य वाटले. दुर्योधनाजवळ जात तो म्हणाला,

'मित्रा, तुला भेटण्यात मला आनंद नाही का? तातडीनं बोलावलं, म्हणून मी चिंतेत होतो, त्यामुळं मी विचारलं.'

दुर्योधनाचा राग थोडा शांत झाला. तो म्हणाला,

'बैस.'

कर्णाची दृष्टी शकुनीकडे गेली. शकुनीला वंदन करीत कर्ण म्हणाला,

'क्षमा असावी. मी आपल्याला पाहिलं नाही. प्रवास चांगला झाला ना?'

'उत्तम!'

'अन् इंद्रप्रस्थाचं वास्तव्य?'

'अप्रतिम!' शकुनि म्हणाला. 'कर्णा, तुमच्यापेक्षा आम्ही सुदैवी. तुम्ही लौकर निघून आलात; पण आम्हांला आग्रहामुळं राहावं लागलं.'

'बरं झालं, राहिलात, ते. युवराजांवर करभार स्वीकारण्याची जबाबदारी असल्यानं यज्ञ संपेपर्यंत त्यांना विश्रांती नव्हती. अनायासं श्रमपरिहार झाला असेल.'

'झाला, तर! कर्णा, पांडवांनी बांधलेली मयसभा या पृथ्वीवरचं आश्चर्य आहे. अरे, पाणी म्हणून वस्त्रं सावरून चालावं, तो पाणी नसून स्फटिकभूमी आहे, हे ध्यानी येई. स्फटिकभूमी म्हणून निःशंकपणे पाय टाकावा, तो पाण्यात गटांगळ्या खाण्याचा प्रसंग

यायचा. दरवाजा समजून जायला लागावं अन् भिंतीवर आदळावं. भिंत समजून थांबावं, तो तिथंच द्वार असावं. छे, छे! कर्णा, तू ती मयसभा पाहायला हवी होतीस.'

'त्यासाठी ती मयसभा कशाला हवी, मामा! हे जीवन हीच एक मयसभा नाही का? स्नेहाचा ओलावा शोधायला जावं, तिथं स्नेहाऐवजी कटुता पदरात पडावी, ज्याला मित्र मानावं, तोच वैरी बनावा, वरासाठी तपश्चर्या करावी अन् पदरात शाप पडावेत, भाग्याचा दिवस समजावा अन् तोच जीवनाचा अंत ठरावा. या जीवनाच्या मयसभेचा प्रत्यय हरघडी येत असता त्या मयसभेला कसलं महत्त्व!'

शकुनि हसत म्हणाले,

'कर्णा तुझ्या मित्राचं हेच झालं! ती मयसभा पाहायला गेलं असता वस्त्रं भिजली, पाय घसरून ते पडले, भिंतीवर आदळले.'

'मामा!' दुर्योधनाने दटावले.

'हे एकटेच नव्हे. माझी पण तीच अवस्था होती; पण त्यामुळं पांडवांची भरपूर करमणूक झाली.'

दुर्योधन काही बोलणार, तोच महालात विकर्ण आला. साऱ्यांचे लक्ष त्याच्यावर खिळले. आपल्या भावाला- दुर्योधनाला- तो नम्रतेनं म्हणाला,

'दादा, तातांनी बोलावलंय्.'

'आता?... आम्ही तर नुकतेच आलो!'

'ते तातांना कळलं आणि त्यांनी मला पाठवलं.'

'तिथं कोण आहे?'

'कोणी नाही. फक्त पितामह आचार्य आणि विदुरकाका आहेत.'

खिन्नतेनं हसत दुर्योधन म्हणाला,

'आणखी कोण असायला हवं! ठीक आहे, येतो; म्हणावं.'

विकर्ण गेला.

दुर्योधन म्हणाला,

'बहुतेक नवे प्रमाद हातून घडले असावेत.'

'कुणाच्या हातून?' कर्णाने विचारले.

'दुसऱ्या कुणाच्या? माझ्या! नाहीतर तातांनी एवढया तातडीनं माझी आठवण काढली नसती.'

'दुर्योधना, चुकतोस तू.' शकुनि म्हणाला, 'सम्राटांचं तुझ्यावर केवढं प्रेम आहे, हे मी जाणतो. ते अंधळे असतील; पण डोळस दृष्टीला ते समजायला हवं.'

'ते मलाही माहीत होतं. ते दिवस गेले, मामा. ते दिवस परत यायचे नाहीत.'

'मला तसं वाटत नाही. त्यांचं तुझ्यावरचं वेडं प्रेम मी जाणतो.'

'मग माझ्याबरोबर चलता?'

गडबडीने उठत शकुनीने विचारले,

'कुठं?'

'तातांकडं! त्या प्रेमाचा प्रत्यय तुम्हांलाही येईल.'

'आलो असतो. पण हा प्रवास... भारी थकवा आलाय्.'

'तेच! आपण विश्रांती घ्या! कर्णा, तू येणार?'

'जशी आज्ञा!'

दुर्योधन क्षणभर थांबला. त्याने महालातली संदूक उघडली, त्यातला एक कंठा हाती घेऊन संदूक बंद केली. कर्णासह तो धृतराष्ट्रांच्या दर्शनाला जाऊ लागला.

महालात समया पेटवण्यात सेवक गर्क झाले होते...

# १६

रा जगृह अनेक समयांच्या उजेडात उजळले होते. धृतराष्ट्रमहाराजांच्या समोर विदुर बसले होते. त्यांच्यापासून जवळच भीष्माचार्यांचे आसन मांडलेले होते. द्रोणाचार्यांची बैठक मृगाजिनावर स्थिर झालेली होती. अनेक दासदासी आज्ञेसाठी उभ्या जागी तिष्ठत होते.

दुर्योधन आणि कर्ण महालात येताच द्रोणाचार्य म्हणाले,

'राजन्! युवराज दुर्योधन राधेय कर्णासह येत आहेत. या दोघांची मैत्री अभेद्य आहे.'

दुर्योधनाला ते ऐकून समाधान वाटले.

एरवी दुर्योधन येताच गंभीर मुद्रा धारण करणाऱ्या भीष्म, विदुर, द्रोण यांच्या मुखांवरचे प्रसन्न भाव पाहून दुर्योधनाचे मन मोकळे झाले.

सर्वांना वंदन करून होताच धृतराष्ट्राने विचारले,

'दुर्योधना, तू आल्याचं समजलं अन् राहवलं नाही. मी तुझ्यावर कितीही रागावलो असलो, तरी या अंधळ्या पित्याच्या मनातलं तुझं रूप सदैव मला सुखावतं. तुझा आवाज ऐकून खूप दिवस झाले, म्हणून तुला तातडीनं बोलावलं.'

'तात, आपल्याला माझी आठवण झाली, यात सार्थक वाटतं.'

'ते जाऊ दे! तुझा प्रवास चांगला झाला ना? यज्ञाच्या वातावरणात तुझं मन रमलं ना?'

'कुणाचं रमणार नाही! तात, असा अलौकिक यज्ञ मी पाहिलाच नाही. योगानं आणि तपश्चर्येनं सिद्ध बनलेल्या शेकडो विद्वानांकडून यज्ञाची देखरेख होत होती. हजारो ब्राह्मणांच्या मुखांतून उठणाऱ्या मंत्रांनी भूमीच नव्हे, तर सारी सृष्टी भारली जात होती. त्या यज्ञभूमीच्या दर्शनासाठी तिथं शेकडो श्रेष्ठ नृपांची रीघ लागली होती.'

'युवराज सांगतात, ते काहीच खोटं अथवा अतिरंजित नाहीं.' भीष्माचार्य म्हणाले, 'त्या यज्ञाच्या रूपानं साक्षात पुण्य भूतलावर अवतरलं होतं,'

'बाबा, रे, मी आता निर्धास्त झालो.' धृतराष्ट्र म्हणाले, 'तुझा संतापी, संशयी स्वभाव. तुला तो यज्ञ खपतो, की नाही, याची भीती वाटत होती. तुम्हांला कसली कमतरता पडली नाही ना?'

'कमतरता पडली तर!'

भीष्म, विदुर, द्रोणाचार्यांनी एकदम एकाच वेळी दुर्योधनाकडे पाहिले.

दुर्योधनाच्या चेहऱ्यावरचे स्मित तसेच होते.

'कमतरता पडली, ती आमच्याच बळाची. तात, तो यज्ञ पांडवांनी घडवला, तरी पार पाडला आम्हीच. सारी जबाबदारी आमच्यावरच होती. विदुरकाकांच्या हाती सारा खर्च होता. पितामह आणि आचार्य यांच्यावर सर्व यज्ञसमारंभावर लक्ष ठेवण्याचं काम होतं, भोजनविभाग दु:शासनानं सांभाळला होता. कृपाचार्य दक्षिणादान करीत होते.'

'अन् तुमच्या...'

'माझ्या... सर्व नृपांनी आणलेला करभार स्वीकारता-स्वीकारता मी थकून गेलो.'

सारे मोकळेपणी हसले.

'कर्णा, तुला कोणतं काम दिलं होतं?' धृतराष्ट्रांनी विचारले.

'मला काही काम नव्हतं, महाराज. त्यामुळं या सर्वांपेक्षा मलाच अधिक यज्ञसमारंभ उपभोगायला मिळाला.'

'महाराज!' द्रोणाचार्य म्हणाले, 'कर्ण तिथं युवराजांचा स्नेही म्हणून गेला नव्हता. अंगराज म्हणून तो आमंत्रित होता.'

विदुरांचे मन आनंदले होते. ते म्हणाले,

'बाळा दुर्योधना, मी आज सुखी झालो. तुमच्या अन् पांडवांच्या मनांतलं किल्मिष या यज्ञानं नाहीसं झालं. यज्ञभूमीत घडलेलं तापसांचं दर्शन, मंत्रांचं श्रवण अन् सु-संगत यांचा परिणाम टळेल कसा!'

दुर्योधन पुढे झाला. हातातला कंठा धृतराष्ट्राच्या मांडीवर ठेवीत तो म्हणाला,

'महाराज, येताना युधिष्टिरांनी हा कंठा आपणांसाठी दिला आहे.'

तेजस्वी टपोऱ्या नीलमण्यांचा तो कंठा चाचपीत धृतराष्ट्र म्हणाले,

'कंठा?'

'हो! अत्यंत मौल्यवान अशा नीलमण्यांचा तो कंठा आहे.'

'त्यांच्या मनांतला प्रेमभाव हाच मोठा. हा कंठा पाठविण्याची काही आवश्यकता नव्हती.'

'तात!'

'बोल!' धृतराष्ट्रांनी आज्ञा केली.

'यज्ञभूमी पाहून आल्यापासून मलाही एव इच्छा झाली आहे.'

'कसली?'

'असा राजसूय यज्ञ करावा, असं वाटतं.,'

द्रोणाचार्यांच्या हसण्याने दुर्योधनाने मागे वळून पाहिले.

द्रोणाचार्य आपल्या मांडीवरचा हात उंचावून हसत होते.

हसू आवरून होताच दुर्योधनाने विचारले,

'काही चुकलं का, आचार्य?'

'युवराज, राजसूय तुम्हांला कसा करता येईल?'

'का?'

'युवराज, धृतराष्ट्रमहाराज सम्राट असताना तो यज्ञ तुम्हांला करण्याचा अधिकार नाही. राजसूय सम्राटपदासाठी करराचा यज्ञ आहे.'

'दुसरा तसलाच भव्य यज्ञ करता येईल ना?'

'जरूर!' द्रोणाचार्यांनी संमती दिली.

'पण, दुर्योधना!' भीष्म म्हणाले, 'एवढया लौकर यज्ञ करण्याचं मनात आणू नकोस.'

'का?'

'राजसूय यज्ञात साऱ्यांनी करभार दिला आहे. ते निर्धन झाले आहेत. त्यांना परत करभार सोसणार नाही.'

दुर्योधनाच्या चेहऱ्यावर वेगळेच हास्य प्रकटले. द्रोणाचार्यांना तो म्हणाला,

'आचार्य, राजसूयाचा हेतू काटा असतो, म्हणालात?'

‘सम्राटपद!’

‘अन् तो यज्ञ पांडवांनी केला? आचार्य, सम्राट किती असतात?’

‘सम्राट एकच!’

‘मग धृतराष्ट्रमहाराज कोण? करभार देणारे पांडवांचे अंकित?’

‘युवराज!’

‘प्रश्नांची उत्तरं द्या, आचार्य! संतापू नका.’

द्रोणाचार्य त्या प्रश्नाने गडबडले. अनपेक्षित आलेला तो प्रसंग कसा टाळावा, हे त्यांना सुचेना. ते कसेबसे म्हणाले,

‘युवराज, गैरसमज होतोय्. खांडवप्रस्थासह अर्धं राज्य त्यांना धृतराष्ट्रमहाराजांनी तोडून दिलं, त्या राज्याच्या आधिपत्यासाठी तो यज्ञ केला.’

‘अन् त्यासाठी कौरवसाम्राज्याशी जे जे राजे एकनिष्ठ होते, त्यांच्यावर हल्ले करून करभार वसूल केला!’

‘यज्ञाच्या पवित्र कार्यासाठी तो करभार दिला होता.’ विदुर म्हणाले.

विदुरकाका, बसल्या जागी न्यायनीतीच्या वल्गना करून न्यायनीतीचा विस्तार होत नसतो. कैक वेळा त्याच बुरख्याखाली अनीती नांदत असते. ती आक्रमण करते.’

‘युवराज, कुणाला बोलता हे?’ धृतराष्ट्र म्हणाले.

‘तात, शांतपणे ऐका.’ विदुरावर दृष्टी स्थिरावत दुर्योधनाने मागे उभ्या असलेल्या कर्णाकडे बोट दाखविले, ‘काका, या अंगराजावर भीम का चालून गेला? ते करीत असताना पांडवांना हा माझा मित्र आहे, कौरवांचा अंकित आहे, हे माहीत नव्हतं, असं का म्हणाराचं आहे?’

‘सर्व राजानी करभार द्यावा, विरोध करू नये, असं आम्हीच कळवलं होतं, कुणी आज्ञाभंग केला असला, तर त्याचं प्रायश्चित्त...’

द्रोणाचार्यांना आपलं वाक्य पुरं करता आलं नाही.

दुर्योधन म्हणाला,

‘आचार्य, फार उशिरा निरोप पाठवलात. तोवर तुमचं अर्धं राना कृष्णाच्या चतुरंग सेनेच्या पाठबळानं पांडवांनी जिकलं होतं, कौरव साम्राज्याच्या निष्ठेपायी ज्यांनी आपल्या सामर्थ्याचा विचार न करता शस्र हाती धरलं, त्या राजांना अपमानित पराजय सोसावा लागला. पांडवांच्या आज्ञेनं करभार घेऊन यशाला यावं लागलं. राजसूय यज्ञ यापुढं कौरवांना कधीच करता येणार नाही.’

भीष्माचार्य संतापाने उग्र बनले.

‘युवराज, अमंगळ विचारानी तुम्ही भयाव्याकुल झाला आहात. कौरव सम्राज्याचं श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी यज्ञाची गरज नाही. हे साम्राज्य स्वयंभू आहे, ते सर्वांना ज्ञात आहे.’

‘एवढं श्रेष्ठ साम्राज्य आहे हे?’ औपरोधिकपणे दुर्योधन म्हणाला, ‘मला माहीत नव्हतं, पितामह असलत अर्थहीन शब्दांच्या नादात तातांना डोलवत ठेवलंत. मी अंधपुत्र असलो, तरी डोळस आहे. दिसतं, ते कळण्याइतपत मला शहाणपण निश्चित आहे.’

‘युवराज!’ धृतराष्ट्र शुष्कपणे म्हणाले.

‘ताल, क्षमा! पण विचारा पितामहांना. राजसूय यज्ञात त्या कृष्णाला त्यांनी

अग्रपूजेचा मान दिला. कुरुराज्याचा अभिमान त्या वेळी कुठं गेला होता? कुरुसम्राज्याचा युवराज त्यांच्या दृष्टीला का दिसला नाही?'

'अग्रपूजेचा मान बलानं तोलला जात नाही. तो अधिकार धारण करणाऱ्या पुरुषांच्या ठायी सत्वगुणांचा अधिकार असावा लागतो.' द्रोणाचार्यांनी निर्णय दिला.

'अन् तो त्या कृष्णाच्या ठायी तुम्हांला दिसला? आचार्य, त्या सभेत कृष्णाचा पिता वृद्ध वसुदेव होता; कृपाचार्यांची आठवण व्हायला हवी होती. भीष्मकासारखे अनेक राजे योग्यतेचे होते. त्यांची योग्यता तुमच्या ध्यानी आली नाही. अन् तो कृष्ण ऋत्विज नसता, आचार्य नसता व राजाही नसता त्याला अग्रपूजेचा मान देऊन मोकळे झालात.'

'दुर्योधना, त्या महापुरुषाला तू ओळखलं नाहीस. तो दैवी गुणांनी संपन्न आहे. तो भगवान आहे. तो ईश्वरी अवतार आहे.' द्रोणाचार्यांनी सांगितले.

दुर्योधनाच्या हसण्याने सारे सभागृह दणाणून गेले. तो म्हणाला,

'आचार्य, हा साक्षात्कार केव्हा झाला? ही तुमच्या अंतर्ज्ञानाची साक्ष, वाटतं! केव्हापासून कृष्ण भगवान झाला? तुमचा, पितामहांचा अन् त्याचा परिचय केव्हापासून? केव्हापासून त्याच्या अलौकिक गुणांची साक्ष तुम्हांला पटली? शिशुपालवधापासूनच ना?'

'हं!' विदुर खिन्नपणे हसले, 'तो शिशुपाल असंच काहीतरी यज्ञसभेत बोलत होता.'

'अन् त्याच कारणास्तव सर्व राजांच्या देखत शिशुपालाचा वध झाला... अन् साऱ्यांनी तो उघड्या डोळ्यांनी पाहिला.'

'तुला विरोध करायला कुणी हरकत केली होती?' भीष्म गरजले.

'एकाला ठेच लागली की, पाठीमागच्यानं शहाणं व्हावं. तेवढं शहाणपण बाळगलं, म्हणून बरं झालं. नाहीतर शिशुपालाचं जे झालं, तेच माझं घडलं असतं. पितामह, मी विरोध केला नाही, त्याचं. एक कारण होतं, कौरवान्नवर पोसलेले तुम्ही सारे त्या पांडवांचे लाचार होता...'

'दुर्योधना!' संतप्त भीष्माचार्य उभे राहिले.

'स्वस्थ बसा.' दुर्योधनाचा आवाज तेवढाच चढला, 'ही पांडवसभा नाही. कौरवांची सभा आहे. साम्राज्याच्या युवराजाला बोलण्याचं इथं काहीच प्रयोजन नाही. लाचार म्हटलं, म्हणून राग येतो? लाचार नाही तर काय? कोणत्या मानानं त्या यज्ञाला गेलात, ते तरी आठवा! सम्राट धृतराष्ट्रमहाराजांना यज्ञाचं आमंत्रण द्यायला स्वतः युधिष्ठिरानं यायला हवं होतं; पण आमंत्रण पाठवलं नकुलाच्या हस्ते. तो अपमान जाणूनबुजून केला होता. तुमचा नव्हे, कौरवसाम्राज्याचा!'

'दुर्योधना, शांत हो! संयमाला विसरू नकोस.' धृतराष्ट्र म्हणाले,

'संयमाच्या कक्षा यानीच ओलांडल्या, तिथं मी त्यांचं पालन काय करणार? ज्या जरासंधाचं पाठबळ सदैव कौरवांच्या पाठीशी होतं ज्याच्या पराक्रमापुढं कृष्णाला हार घेऊन द्वारकेला पळालं लागलं, त्या जरासंधाचा वध कपटानं एकाकी गाठून त्या कृष्णानं करवला... अन् ज्या शिशुपालानं भीमाच आपल्या राज्यात स्वागत केलं, आदरानं करभार दिला, त्याचा सत्यावक्तेपणापायी गेलेला बळी या आमच्या थोर महात्म्यानं पाहिला. कौरवांच्या प्रतिष्ठेपायी चेदिराज शिशुपालावा वध झाला अन् कौरवांच्या साम्राज्याची धुरा वाहणाऱ्यात या आपल्या तिघां सल्लागारांनी ते चुपचाप सहन केलं. पांडवांच्या साम्राज्यपदाला आचार्य द्रोणांनी आशीर्वाद दिले. कौरवसभेत अभिमानानं,

निष्ठेनं प्रवेश करणाऱ्या आपल्या राजांनी नतमस्तक होऊन आणलेला अपमानित करभार या कौरवांच्या युवराजानं स्वीकारला अन् कौरवांच्या महामंत्र्यानं नि महात्मा विदुरानं तो करभार पांडवाच्या प्रतिष्ठेसाठी खर्च केला. धन्य त्या पांडवांची आणि त्यांच्या बुद्धीची! कौरवश्रेष्ठांकडूनच आपला राजसूय यज्ञ पार पाडणारे पांडव खरोखरच धन्य होत. तात, त्या पांडवांच्या यज्ञकुंडात कौरवांच साम्राज्य जळत असताना पाहिलं.'

'काय बोलतोस तू हे!' धृतराष्ट्र पुरे बेचैन होऊन म्हणाले.

'त्या दाहानं माझ्या डोळ्यांतले अश्रू केव्हाच आटून गेले. तुमचे नेत्र कधीच उघडणार नाहीत अन् तुमच्या या सल्लागारांचे उघडे डोळे तुमच्यासाठी द्रवून कधीच मिटणार नाहीत. कृष्णाच्या नादानं अन् पांडवाच्या प्रीतीनं धुंदावलेल्या या भुंग्यांनी कौरवसाम्राज्य केव्हाच पोखरून टाकलंय्. ते कोलमडून पडताना तुम्हांला पाहावं लागणार नाही, एवढंच तुमचं भाग्य आहे. त्या भाग्याचा मला हेवा वाटतो.'

'बस्स कर, दुर्योधना. वाटलं, म्हणून हवं ते बोलू नकोस. ज्या पितामहांनी अपरंपार कष्ट घेऊन हे साम्राज्य उभं केलं, ज्या विदुरानं आपलं बुद्धिसामर्थ्य ज्या राज्याच्या वैभवासाठी वेचलं, ज्या या हातांनी सारी शस्त्रविद्या तुम्हांला दिली, त्यांच्या सेवेबद्दल एवढे अनुदारपणाचे उद्गार! साधी कृतज्ञता तरी बाळग!' द्रोणाचार्य म्हणाले, 'म्हणे, आम्ही साम्राज्य पोखरून टाकलं!'

'हो तुम्ही अन् तुमच्या सद्भावानं. एक पडले पितामह. त्यांना दोघे सारखेच. दुसरे महात्मा, आम्ही सदैव जवळ असतो, म्हणून आमचे दुर्गुण त्यांना अधिक दिसतात अन् पांडव दूर असल्यानं ते सद्गुणी भासतात. तुमचा तर प्रश्नच नाही. तुम्ही सदैव धर्मनिर्णयालाच बसलेले. तुम्हां तिघांच्या थोरपणात साम्राज्य तेवढं ढासबलं.'

'काय झालं साम्राज्याला?' भीष्मांनी विचारले.

'काय झालं उघड्या डोळ्यांनी पाहा ना! श्राद्ध-पक्षांसाठी पिंड घालावेत, तसे साम्राज्याचे तुकडे केलेत. माझा विरोध मानला नाहीत. तातांना घरी बसवून त्या युधीष्ठिरावर राजमुकुट चढविला असता, तरी साम्राज्य एकसंध राहिलं असतं. स्वत:च्या हातून तुकडे पाडायचे अन् नंतर भेद घडला, म्हणून हळहळायचं.'

'संघर्ष टाळायला तेवढा एकच उपाय होता.' विदुर म्हणाले, 'राज्य तोडण्याची कुणाला हौस नव्हती.'

'राज्य वाटून देऊन शत्रू तृप्त होत नसतात, पण तुम्हांला तसं वाटलं. कुरुसाम्राज्याची प्रतिष्ठा असा लौकिक असणारी ही हस्तिनापूर नगरी. शत्रूंना भयभीत करणारी, वीरांना आह्वान देणारी तुमच्या खोटचा स्वप्नापायी या नगरीला निस्तेज, निष्प्रभ करून टाकलंत. ज्या नगरीच्या आश्रमांतून शस्रविद्येचे धडे दिले जायने, भूमिरक्षणार्थ वीर तयार व्हावयाचे, जी भूमी खऱ्या अर्थानं वीरप्रसू बनायची, त्या आश्रमांतून तुमची ज्ञानगंगेची सत्रं सुरू झाली. जितेपणी मृत्यूनंतरच्या स्वर्गाची चित्रं रंगविण्यात वीरांची मनं रमली. रथशाळांतून नवे नवे तेजस्वी रथ निर्माण होण्याऐवजी त्या निष्णात कलावंतांकडून शत्रूची घरंदारं उभी केलीत. ज्या मत्त गजांनी सुवर्ण-अंबाऱ्या तोलल्या ज्यांच्या पावलांनी रणभूमीला धडकी भरली त्या गजेंद्रांना सागाचे सोट वाहून आणण्याचं काम दिलंत. शांतीच्या वेडापोटी तुमचं साम्राज्य चिरशांतीची वाटचाल करति आहे हे कसं तुम्हांला दिसत नाही?'

'याला उपाय...' कंपित सुरात धृतराष्ट्रांनी विचारले.

'मी शोधला आहे.' दुर्योधन म्हणाला.

'कोणता?'

'आत्मघात!'

'आत्मघात?' धृतराष्ट्र उद्गारले.

'हो! आत्मघात! त्याखेरीज दुसरा मार्ग नाही. तात, तो विचार मनात आला, तरी मनातच ठेवा. त्याचा उच्चार करू नका. या तुमच्या विश्वसनीय राजसभेत बोलली जाणारी प्रत्येक गोष्ट पांडवांच्या महालात प्रतिध्वनीच्या रूपानं उमटते. इथं तुमच्या बाजुचं कोणीच नाही. ज्यासाठी तुमचा माझ्यावर कोप झाला होता, ती गोष्ट आज मी सांगतो. राज्याची वाटणी अटळ दिसली, तेव्हा मीच पांडवांना जतुगृहात जाळून मारण्याचा कट रचला. पुरोचनाकरवी मी लाक्षागृह उभारलं, पण ज्या दिवशी पांडव त्या घरात प्रवेश करते झाले, त्याच दिवशी त्यांना सावध करणारे संदेश याच प्रासादातून गेले.'

'युवराज!' विदुर कासावीस झाले.

त्यांच्याकडे पाहत दुर्योधन हसला.

'काका! मी तुम्हांला काही बोललो नाही. माझ्या योजनेनुसार लाक्षागृह पेटलं; पण घरभेद्यांच्या साहाय्यानं पांडव सुरक्षित राहिले. भररात्री गंगेच्या काठी एक सुसज्जा नौका पांडवांना तारण्यासाठी उभी होती. काका, आपल्या ज्ञानचक्षूंना भूत-वर्तमान दिसत असेल. तेवढी माझी शक्ती नाही; पण मी युवराज आहे. युवराजाची दृष्टी गरुडासारखी तीक्ष्ण असते. जेव्हा ती वेध घेते, तेव्हा सावज निश्चितपणे पंजात सापडलेलं असतं. तात, येतो मी.'

'निघालास कुठं?'

'कुठंही! पण या भूमीतून दूर... जिथं मानानं जगता येईल, युवराजपदाचा विसर पडेल, तिथं. पांडवांनी टाकलेल्या भिक्षेला साम्राज्य समजून जगण्याचं बळ माझं नाही.'

दुर्योधनाने पाहिले.

बेचैन झालेले धृतराष्ट्र हातातल्या कंठयाशी चाळवाचाळव करीत होते.

'ताल, हा कंठा नीलमण्यांचा आहे. जातिवंत मणी आहेत ते. ते आपला गुण दाखविल्याखेरीज राहणार नाहीत. तुम्ही तो कंठा जरूर परिधान करा. नागाच्या विळख्यासारखा तो शोभून दिसेल. नीलमण्यांचा गुणप्रत्यय पाहाराला फार काळ वाट पाहावी लागणार नाही. दीड प्रहर, दीड दिवस, दीड सप्तकात तो प्रत्यय येतो. नील प्रसन्न झाला, तर साम्राज्य पायी चालत येतं, नाहीतर साम्राज्याची धूळधाण उडून जाते. आता साम्राज्य नाहीच. यायचं झालं, तर कदाचित या कंठ्याच्या गुणानंच येईल. जरूर त्याची परीक्षा बघा. येतो, तात!'

दुर्योधनाने पाठ फिरवली अन् तो महालाबाहेर निघून गेला.

कर्ण त्याच्या पाठोपाठ जात होता.

दुर्योधन-कर्ण निघून गेले आणि राजसभेत एकच शांतता पसरली. काही बोलण्याचे कुणाला भान राहिले नाही. घसा खाकरून विदुराचे शब्द उमटले,

'भारीच संतापी, असंयमी. असलत वर्तनाचा परिणाम...'

'विदुर, थांब! काही बोलू नकोस.' धृतराष्ट्रांचा आवाज उमटला.

विदुराने पाहिले, तो धृतराष्ट्र थरथरत उभे होते. त्यांचे ओठ क्षणभर थरथरले.

आणि शब्द उमटले,

'एकदा तरी मला सत्य ऐकू दे S S'

हातातला नीलमण्यांचा कंठा धृतराष्ट्राने फेकून दिला. अंधहाताने फेकलेला तो कंठा स्फटिकाच्या फरशीवरून दूरवर जाऊन भिंतीला आदळला.

धडपडत धृतराष्ट्र चालत होते. त्यांना आधार देण्यासाठी दासी धावत होत्या...

# १७

**दु**सऱ्या दिवशी सायंकाळी दुर्योधन-महालात दुर्योधन, शकुनि आणि कर्ण आले होते. दुर्योधनाचा संताप निवळला नव्हता. तो कर्णाला म्हणाला,

'मित्रा, तुझ्या चंपानगरीमध्ये मला आश्रय मिळेल?'

'युवराज, नगरी आपली आहे. तिथं आश्रय शोधण्याचं काहीच कारण नाही. पण संतापाच्या भरात....'

'संतापाच्या भरात नव्हे. या नगरीत मला आता राहावंसं वाटत नाही.'

'पण एवढी निरवानिरवीची भाषा कशाला?' शकुनीने विचारले.

'आणखी काय व्हायचंय्? काल काय प्रकार झाला, माहीत आहे ना?'

'आहे! साऱ्या प्रासादात तीच चर्चा चालू आहे.'

'ती चर्चा अखंड चालली, तरी मला त्याचं सोयर-सुतक नाही.' दुर्योधन उद्विग्न होऊन म्हणाला, 'साध्या निद्रेलादेखील मी मुकलोय्. स्वप्नातही तो यज्ञ, ती मयसभा उभी राहते. अनर्थाला तुम्ही कारणीभूत झाला आहात, मामा.'

'मी? भले... हा चांगला न्याय!'

'हो, तुम्ही! तरी मी, या राजसूयाला जाऊ नये, असं म्हणत होतो; पण तुम्ही आग्रह केलात अन् अपमान सोसण्याची पाळी आली. नजरेआड काहीही घडलं असतं, तरी त्याचं दु:ख एवढं वाटलं नसतं.'

'दुर्योधना, शांत हो!' शकुनि म्हणाले, 'मी तुझा संताप जाणतो; पण सत्याकडं दुर्लक्ष करू नकोस. तू राजसूयाला गेला नसतास, म्हणून तुझ्याविना तो यज्ञ थांबणार होता? शत्रुपक्षाच्या बळाकडं डोळेझाक करून चालत नाही. ते उघडचा डोळ्यांनी अन् सावध मनानं पाहावं लागतं. राजसूय यज्ञात त्यांनी घडवलेलं आपल्या सत्तेचं दर्शन तुला घडलं नाही का? आजवर जे राजे कौरवेश्वरांच्या पुढं नमले होते, तेच राजे युद्धिष्ठिरावर सुवर्णपुष्पं उधळीत होते ना? सत्तेचं बळ आणि सुडाची इच्छा नसती, तर मयसभेत तुझी-माझी फजिती करण्याचं धाडस त्यांचं झालं नसतं. दुर्योधना, युधीष्ठिरानं राजसूय यज्ञ करून तुमच्या कौरव-साम्राज्याला आह्वान दिलंय्.'

'कौरवांचं बाहुबळ अजून त्यांना माहीत नाही.' दुर्योधन उसळला.

'बाहुबळ खरं, पण कुणाचं शकुनि उजव्या हातातल्या अंगठचा डाव्या हाताच्या बोटांनी चाळवीत म्हणाले, युधीष्ठिरावर छत्रचामरं ढाळली गेली. सर्व राजांनी आपल्या वैभवानिशी पांडवांपुढं मान झुकवली. पितामहांनी कृष्णाला अग्रपूजेचा मान दिला. नाही, दुर्योधना, या घटकेला तरी बाहुबळ त्यांचंच आहे.'

कर्ण शांतपणे म्हणाला,

'शकुनिमहाराज, आपण एक गोष्ट विसरता. त्या यज्ञानं आपण दिपला असाल, पण त्यामुळं कौरवांना दुबळे समजण्याचं काहीच कारण नाही. भीष्मांनी अग्रपूजेचा मान कृष्णाला दिला किंवा द्रोणाचार्यांनी यज्ञभूमीची सांगता केली, म्हणून एवढं भ्यायला नको. उद्या प्रसंग आलाच, तर हेच भीष्माचार्य, द्रोणाचार्य, विदुर, कृपाचार्य प्राणपणानं

आमच्या बाजूला उभे राहतील, यात मला यात्किंचितही संशय नाही. सम्राट धृतराष्ट्रमहाराजांच्या नुसत्या आज्ञेनंही...'

शकुनि शांतपणे म्हणाले,

'फार लहान आहेस तू. अशी आशा करू नका. कौरवसम्राट अंध आहेत... अन् राजमातेनं पतिनिष्ठेची पट्टी डोळ्यांवर बांधली आहे.'

म्हणून कौरवपुत्र अंधळे आहेत थोडेच?' दुर्योधनाने विचारले.

'उत्तर हवं?' शकुनीने विचारले.

'हो!'

'कोरवपुत्रांच्या डोळस चालीला विदुरांच्या निःसत्त्व नीतीचे लगाम घातलेत अन् अंध सम्राटांचा राजरथ विंदुरांच्या सारथ्यानं शतकौरवांच्या अश्वांनी ओढला जातो.'

'मामा!' दुर्योधन उठत म्हणाला.

'थोडं मद्य पी! राग शांत होईल. युवराज, संतापानं काही सिद्ध होत नाही. पांडवांच्या राजसूय यज्ञात, त्यांच्या कोषागाराची रत्नं मोजण्यात हे हात गुंतले होते, तेव्हा तो संताप व्यक्त व्हायला हवा होता. मयसभेत पाया घसरून पडला अन् पांडवस्त्रियांचं हसणं उठलं, तेव्हा भिजल्या वस्त्राची लाज वाटायला हवी होती.

'अंधपुत्रांनो' म्हणून भीमानं वाट दाखवली तेव्हा डोळे उघडायला हवे होते...'

'मामा, तुम्हीसुद्धा...'

'नाही, दुर्योधना, ते दुःख मला तुझ्याइतकंच सलतंय्.'

'याला काहीच का उपाय नाही?' वैतागाने दुर्योधनाने विचारले.

'शोधला, तर आहे. जरूर आहे.'

'कोणता?'

'सांगतो.'

शकुनीने तीन मद्यपात्रे भरली. आपले मद्यपात्र उचलून त्यचा आस्वाद घेतला. आपल्या तांबूस-पातळ ओठांवरून जीभ फिरवीत शकुनि म्हणाला,

'मद्य सुरेख आहे घे!'

दोघांनी पेले उचलले.

कर्णाने विचारले,

'युद्ध?'

'नाही.'

'सामोपचार?'

'नाही.'

'घात?' मूर्तिमंत भीती कर्णमुखावर तरळली.

'नाही.'

'सांगा, मामा!' दुर्योधन उतावीळपणे म्हणाला, 'हे तीन मार्ग सोडून कोणताही उपाय सांगा.'

'मी खूप विचार केला. एकच उपाय मला दिसतो.'

'बोला.'

'द्यूत!' शकुनीने सांगून टाकले.

'द्यू!' कर्ण-दुर्योधन एकाच वेळी उद्गारले आणि एकमेकांकडे पाहू लागले.

'असे पाहता काय?' फासे खेळवावेत, तसा हातांचा चाळा करीत शकुनि म्हणाले, 'दुर्योधना, तो पांडवश्रेष्ठ युद्धिष्ठिर द्यूताचा व्यसनी आहे. त्याला द्यूताचं आह्वान दे. तो क्षत्रिय आहे... अन् क्षत्रिय द्यूताचं आह्वान कधीही टाळीत नाही.'

'पण कोणत्या निमित्तानं?'

'त्यात विचार कसला पुण्यप्राप्तीसाठी एखादा यज्ञ कर. त्या निमित्तानं मयसभेसारखं सभागृह उभार. धृतराष्ट्रमहाराज त्याला जरूर अनुमती देतील. द्यूताचा पट मांडला जाऊ दे अन् मग शकुनीचं कौशल्य बघ.'

'महाराज! क्षमा असावी.' कर्ण म्हणाला, 'आपण वयानं मोठे. आपण पुष्कळ पाहिलेले, अनुभवलेले... हस्तिनापुरापासून गांधार देशापर्यंतच्या अमोल वस्तुंचं मूल्यमापन, व्यापार करण्यात आपण निष्णात. माणसांची परीक्षा आपल्याइतकी दुसऱ्या कुणाला! तरीही या द्यूताचा विश्वास...'

'निश्चित बाळगा.' आपले उत्तरीय सावरीत शकुनि उभा राहिला. त्याच्या वेधक घाऱ्या डोळ्यांत एक वेगळाच आनंद प्रगटला. 'राधेया, मी नुसता व्यापारी नाही. मी सुबल राजाचा पुत्र- गांधार देशाधिपती आहे, हे विसरू नकोस. हस्तिनापुरापासून गांधार देशापर्यंत मी जो प्रवास करतो, तो व्यापारासाठी नव्हे. द्यू हेच ते कारण आहे.'

'द्यूतासाठी प्रवास?' दुर्योधन म्हणाला.

'हो, द्यूतासाठी! या भूतलावरच्या सम्राटांची, ऐश्वर्यसंपन्न लोकांची रत्नघरं अधिक संपन्न करण्यासाठी, वस्त्रलंकारांची दीप्ती वाढविण्यासाठी, भूलोकीची रत्नं, तलम वस्त्रं, सुवर्णाचे सुबक नक्षीदार नाजूक दागदागिने, रूपवती दासी यांच्यासह या देशात येणाऱ्या व्यापाऱ्यांचे तांडे यांची वर्दळ गांधार-हस्तिनापुरच्या बिकट वाटेनंच होते.'

कर्ण-दुर्योधन शकुनीकडे पाहत होते. शकुनीचा अति-गौर वर्ण अधिकच उजळला होता. कृश अंगलटीची ती उंच व्यक्तिरेखा आपल्या तंद्रीत मग्र होती. डाव्या खांद्यावरचे रेशमी उत्तरीय डाव्या मनगटावर पटबंध होऊन रुळत होते. त्याच्याशी चाळा करीत शकुनि बोलत होता :

'हिमालयाच्या पर्वतदऱ्यांच्या, कडेकपारींच्या अरुंद वाटेनं हा प्रवास जातो. मौल्यवान नाना वस्तूंच्यत ओझ्यांनी लादलेल्या उंटांच्या अखंड रांगा या वाटेवरून चालत असतात. चोरांच्या भीतीनं सदैव सावध असणारे धनुष्यबाण, खड्गधर रक्षक डोळ्यांत तेल घालून आजुबाजूच्या प्रदेशांवरून टेहळणी करीत असतात. सायंकाळी सुरक्षित जागा पाहुन मुक्काम पडतो. पाली, राहुटया उभारल्या जातात. सेवकांची धावपळ, उंटांचं ओरडणं, घोडयांची खिकाळीणी यांच्या आवाजानं वातावरण गजबजून उठतं, शेकोटया प्रज्वलित होतात अन् प्रकाशानं रात्र उजाडते. दिवसभराच्या प्रवासानं थकलेले जीव शेकोटयांच्या उबाऱ्यात अन् पर्वतराईवरून येणाऱ्या अंगबोचऱ्या गारव्यानं सावध होतात. उंची मद्याच्या सेवनानं आरक्त बनलेल्या नेत्रकडांवर एक वेगळीच धुंदी प्रगटते... अन् मग द्यूताचा पट मांडला जातो.'

'द्यूत... बोलून चालून जुगार. त्याचा भरवसा कुणी द्यचा? कर्ण उद्विग्न होऊन म्हणाला.

कर्णा, मी सावध द्यूती नाही. या नाना देशींच्या द्यूतींबरोबर मी फासे घोळवले आहेत. प्रियकराला आपल्या सखीची अंगप्रत्यंगं जशी जाणवतात, तशा फाशांवर

कोरलेल्या मुद्रा माझ्या सरावलेल्या हातांना रात्री अंधारातही जाणवतात.'

'द्यूतात यश मिळेल?' दुर्योधनाची आशा प्रगटली.

शकुनि उत्तर देणार, तोच कर्ण म्हणाला,

'युवराज, जुगाराज्या साहाय्यानं यशाची आकांक्षा फक्त मूर्ख आणि व्यसनीच बाळगतात. जुगार हा करमणुकीचा खेळ आहे. मनोरंजनासाठी त्याचा वापर व्हावा, राजकारणात त्याला वाव नाही. राजकारणात बुद्धी अन् बाहुबलाचाच पराक्रम हे विजयाचं साधन असतं. वीरांनी त्याचाच अवलंब करावा, हे ठीक.'

'राधेया, योग्य तेच बोललास, तुझं अगदी बरोबर आहे.' शकुनि म्हणाला, 'राजकारणात बुद्धी आणि बाहुबलच श्रेष्ठ. तू योद्धा आहेस. वीर आहेस, बुद्धिमान आहेस. राजसूय यज्ञात पांडवांच्या मागे उभी राहिलेली कृष्णाची चतुरंग सेना तू पाहिलीस. हजारो नरेंद्र आज आपल्या बळानिशी पांडवांचं सामर्थ्य वाढवीत आहेत. जरासंधासारख्या कौरवांच्या शक्तींचा पराभव झालायू आज पांडवांचा रणांगणातला पराजय तुला सहजसाध्या वाटतो? वाटला, तरी त्याला धृतराष्ट्रमहाराज संमती देतील? येणाऱ्या प्रत्येक घटकेबरोबर पांडवांचं बळ वाढतंय्, हे न समजण्याइतका का तू मूर्ख आहेस? आता राहिली बुद्धी. तिचाच उपयोग करायला हवा.'

'महाराज, बुद्धीची दानंसुद्धा परहातांनी पडत नसतात.' कर्ण स्पष्टपणे म्हणाला, 'दुबळ्या अन् अस्थिर हातांनीच फासे खेळले जातात.'

शकुनीने कर्णाकडे रोखून पाहिले. त्याच्या नेत्रांत निराळाच विश्वास उमटला. आपले हात उंचावत, ते हात निरखीत शकुनि म्हणाला,

'दुबळे हात! हे हात दुबळे? या हातांची किमया माहीत नाही, म्हणूनच हे उद्गार तुझ्या मुखातून निघाले. या शकुनीच्या हस्तलाघवावर विश्वास ठेव. मद्यानं अस्थिर बनलेल्या या हाती जेव्हा फासे धरले जातात ना, तेव्हा ते पर्वतासारखे स्थिर बनतात. हे हात साधे जुगारी नाहीत, या हातांचा लौकिक कृतहस्त, अतिदेवी असा आहे. द्यूत म्हणजे अठरा व्यसनांतील सर्वश्रेष्ठ व्यसन. बाहुबलाइतकंच श्रेष्ठ. या हस्तस्पर्शात करकरणारे फासे पटावर घरंगळून तक थै नाचू लागतात, तेव्हा राजसभागृहात नृत्य करणाऱ्या नर्तकीच्या पदन्यासाची आठवण होते. एकदा का ते पिंगट रंगाचे फासे पटावर फेकले जाऊन त्यांचा पदन्यास सुरू झाला की, एखादी जारिणी स्त्री अनिवार ओढीनं संकेतस्थळी यावी, तशी जुगाऱ्याच्या मनाची अवस्था होते. तो जुगारी युधिष्ठिर या फाशांच्या नादावर आपलं भान हरेल... अन् सर्वस्व पणाला लावून मोकळा होईल. हे तू लक्षात ठेव.'

'या फाशांचा भरवसा एवढा देता?' दुर्योधनाने विचारले.

'मी ब्रह्मास्त्र जाणणारा कर्णासारखा योद्धा नाही, की ज्यानं कवचकुंडलांच्या भरवशावर शत्रूंना सामोरं जावं. वीरांचा रथ हवा तसा नेऊन शत्रू गाठण्याइतपत माझं सारथ्य नाही. तुला मदत करण्यास फक्त हीच विद्या माझ्याजवळ आहे. माझ्या जीवनात ज्याचा विश्वास देता येईल, अशी एकच कला मला ज्ञात आहे. तिचा लाभ घ्यायचा, की नाही, हे तू ठरव.'

'फाशंचं सामर्थ्य एवढं बलवत्तर असतं?'

'बलवत्तर ? युवराज, हे फासे पडतात खाली; पण फुरफुरतात सर्वांवर. यांना हात नाहीत, तरी हात असणाऱ्या पुरुषांना ते दीन बनवतात. भूलोकीच्या पटावर विखुरणारे हे

फासे दिव्य लोकींचे निखारेच असतात. हस्तस्पर्शाला शीतल करणारे हे फासे प्रतिपक्षांचं काळीजच थंड करवून टाकतात. यांचं बळ रणांगणावरच्या योद्ध्यापेक्षा, प्रबळ शस्त्रापेक्षा अमोघ आहे. दुर्योधना, त्या द्यूलंपट युधिष्ठिराला द्यूताचं आह्वान दे आणि या हातांचं लाघव बघ. राजसूय यज्ञानं प्रमत्त झालेल्या त्या पांडवांचे पाची राजमुकुट माझ्या द्यूताच्या सोंगट्या करून, त्यांचं विस्तारलेलं राज्य तुझ्या पायांखालचा पट केला नाही, तर या शकुनीला विचार!'

'अन् हेच त्या युधिष्ठिरानं केलं, तर!'

'अशक्य!' तेवढ्याच खंबीरपणे शकुनीने सांगितले, 'राधेया, या द्यूतात तू नवखा आहेस. अनभिज्ञ आहेस. चार बाण सोडता आले, खड्गाचे चार वार जमले की, साऱ्यांनाच आपण योद्धे आहो, असं वाटू लागतं; पण ते धैर्य रणांगणावर टिकत नाही. नौबतींच्या आवाजानं, रणभूमीच्या दर्शनानं अशा वीरांचा थरकाप होऊन जातो. योद्ध्याला मृत्यूचं भय असून चालत नाही. मृत्यूला समोर पाहताच त्याला वाढावं लागतं. तो संस्कार त्याला जपावा लागतो. रणनौबतीच्या आवाजानं योद्ध्याला स्फुरण चढतं. मृत्यूचा विचार न करता तो शत्रूला भिडतो, ते त्यानं जोपासलेल्या संस्कारानं. पंचकल्याणी उमद्या घोड्यावर दुबळा जीव कधी स्वार होईल का? या फाशांना संस्कार असतात. मी अक्षविद्येत निपुण आहे. असलेलं घालवण्यापेक्षा गमावलेलं जिंकण्याची ज्याची बलवत्तर इच्छा असते, त्यालाच हे फासे वश होतात. पापपुण्याची मडकी शोधीत पोट भरणाऱ्या या दुबळ्या युधिष्ठिराला या द्यूतात यश कसं लाभेल? ते माझंच आहे.'

कर्ण निरुत्तर बनलेला पाहून आनंदाने दुर्योधनाने विचारले,

'मामा, पण तात याला संमती....'

'कालच्या तुझ्या पराक्रमानं त्यांचे डोळे उघडले आहेत. कदाचित ते संमती देतीलही; पण कोणत्याही परिस्थितीत ही सारी गोष्ट तू तुझ्या पित्याच्या कानांवर घालणं इष्ट आहे. त्यांची अनुमती मिळाली, की जय आपलाच!'

दुर्योधन सलगीने म्हणाला,

'मामा, आता तुमच्याखेरीज आधार नाही. तुम्हीच ही गोष्ट तातांच्या कानांवर घाला. आपल्याला ते चांगलं सांगता येईल. मला पटवून देणं कठीण जाईल.'

'ठीक आहे. तू चिंता करू नकोस. यज्ञ अन् द्यूत राजमान्य आहेत. राजनीतीला ते धरूनही आहे. धृतराष्ट्रमहाराज त्याला निश्चितपणे संमती देतील. ते काम तू माझ्यावर सोपव. उद्या सूर्योदयानंतर त्यांच्या सल्लागारांनी त्यांना भेटण्याआधी तुला सम्राटांचं बोलावणं येईल, तेव्हा तू जरूर तिथं ये. त्या वेळी द्यूताची भूमिका मी तयार करून ठेवलेली असेल.'

दुर्योधनाला आश्वासन देऊन शकुनि निघून गेला.

दुर्योधनाने समाधानाने कर्णाकडे पाहिले.

कर्ण सचिंत दिसत होता.

'मित्रा...'

कर्णाने वर पाहिले. उठत तो म्हणाला,

'युवराज, हा द्यूत मला पटत नाही. हा मार्ग वीराचा नव्हे.'

'दुसरा काही मार्ग सुचतो?' दुर्योधनाने विचारले.

'सुचला असता, तर द्यूताचा सल्ला मी ऐकत बसलोच नसतो; पण सांगावंसं वाटतं, परत एकदा विचार कर. संपूर्ण विचाराखेरीज यात पाऊल टाकू नकोस. जुगार अन् चारित्र्य या अशा दोन गोष्टी आहेत की, यांत पाय टाकण्याआधी विचार करावा. नंतर पाय माघारी घेता येत नाही. येतो मी.'

दुर्योधनाचा निरोप घेऊन कर्ण स्वगृही गेला, तरी द्यूताचा विचार त्याच्या मनातून जात नव्हता.

## १८

सूर्याचे तेज आकाशात चढत होते. हस्तिनापूरच्या दिशेने दुर्योधनाच्या रथातून कर्ण दुर्योधनभेटीसाठी जात होता. शकुनीने सुचवलेला आणि दुर्योधनाने मानलेला द्यूताचा बेत रहित व्हावा, असे कर्णाला वाटत होते. सम्राटांना पुत्रप्रेम असले, तरी विदुरांच्या सल्ल्याखेरीज ते निर्णय घेत नाहीत, हे कर्णाला पुरते ठाऊक होते. विदुर द्यूताला कधीही संमती देणार नाही, याची खात्री होती. कदाचित द्यूताचा बेत राधेय फसल्याने दुर्योधनाने रथ पाठविला असण्याची शक्यता होती.

रथ राजप्रासादाच्या उद्यानात शिरला. उद्यानातून फिरणारे मोरांचे तांडे, झाडीतून उठणारे त्यांचे आवाज कर्णाला मोहवीत नव्हते. रथ राजप्रासादासमोर थांबला.

कर्ण उतरला.

पाहतो, तो दुर्योधन प्रसन्न मुद्रेने प्रासादाच्या पायऱ्यांवर उभा होता.

कर्ण रथातून उतरताच तो भरभर पायऱ्या उतरून कर्णाजवळ आला. कर्णाचा हात धरीत तो म्हणाला,

'मित्रा, चल खूप बोलायचंय्.'

कर्णासह दुर्योधन महालात आला. सर्व दासदासींना त्याने बाहेर घालवले आणि तो म्हणाला,

'मित्रा तातांनी द्यूताला संमती दिली.'

'खरं?'

'एवढंच नव्हे तर, वैभवशाली, अलौकिक असं द्यूतगृह उभारण्याची त्यांनी आज्ञा दिली आहे.'

'या बेताला विदुरांनी संमती दिली?'

'छान! काका याला कधी संमती देतील? त्यांच्यापासून हा बेत तर संपूर्ण गुप्त राहायला हवा. सर्व सिद्धता होईल, तेव्हाच ते त्यांना कळेल.'

'युवराज, माझं थोडं ऐकता का?'

'सांग! मला माहीत आहे, तू विरोध करणार. तेही ऐकायला माझी तयारी आहे.'

'ठीक आहे. मी काही बोलणार नाही.'

'हे विरोधापेक्षाही भयानक आहे. एवढा राग माझ्यावर करू नकोस.'

'नाही, युवराज. माझा राग नाही; पण असल्या चोरवाटांचा आश्रय वीरांनी घेऊ नये, असं वाटतं.'

'चोरवाट कसली? मित्रा, द्यूत राजमान्य आहे.'

'संपत्तीचा मोह सोडून, ती उधळण्याची ताकद यावी, इतपतच. राजांनी द्यूत जिंकण्यासाठी खेळायचा नसतो. करमणूक व्हावी, आश्रितांना धनलाभ व्हावा, एवढाच त्याला अर्थ. त्यापलीकडं जाऊ नये.'

'ठीक आहे. आपण द्यूताचा बेत रद्द करू.'

कर्ण आनंदला. त्या उत्तराची त्याची अपेक्षा नव्हती.

'युवराज, मला तुमचा अभिमान वाटतो.'

'निदान एका मित्राला तरी असं वाटावं, हे का थोडं झालं? आता त्यापुढं त्यावरच समाधान मानायला हवं. पांडवांची सत्ता हळूहळू वाढत जाईल. ते आपण उघड्या डोळ्यांनी पाहू अन् त्यांच्या वाढत्या सामर्थ्याबरोबर कौरवसाम्राज्य ग्रासलं जाईल, तेव्हा निर्लज्जपणे, पर्वणी आली, असं समजून पदरी पडलेलं दान घेऊन तृप्त होऊ. आपल्या दोघांच्या पराक्रमाची, बलवत्तर इच्छेची तीच सांगता असेल, तर त्याला पायबंद घालणार कोण?'

'पण द्यूताखेरीज दुसरा काही उपाय नाही का?'

'तू सांगतोस? तुला दिसतो?'

'नाही, हे खरं; पण तरीही हा जुगार मला पटत नाही.'

'कमकुवत मनाला जुगार नेहमीच भेडसावतो.'

'कमकुवत मन? माझं?' कर्ण छाती रुंदावत म्हणाला, 'मित्रा, अजून या कर्णाची पारख झाली नाही! मित्रा, सांग की, त्या इंद्रप्रस्थावर चालून जायचं, म्हणून. बरोबर दळ किती आहे, याचा विचार माझ्या मनात येणार नाही. शत्रू प्रबळ आहे, हे मी ध्यानी घेणार नाही. हा कर्ण शत्रूवर तुटून पडला, एवढंच तुला दिसेल.'

दुर्योधन हसत होता.

कर्णाने संतापून विचारले,

'का ? खोटं वाटतं?'

'नाही. खोटं नाही वाटत!'

दुर्योधन गंभीर झाला,

'पण, मित्रा, जुगार आणखी काय वेगळा असतो?'

'जुगार?'

'नाहीतर काय? शत्रू बलवत्तर असताही त्यावर तुटून पडणं हा जुगार नाही?'

कर्ण चकित झाला होता.

'मित्रा, या जीवनात अशी कोणती गोष्ट आहे की, जी जुगार नाही? रणांगणात कोणता शत्रू समोर येणार आहे, त्याच्या खेचलेल्या प्रत्यंचेला कोणता अघोरी बाण जोडला आहे, हे का माहीत असतं? जय-पराजय माहीत नसता, शत्रूवर वीर चालून जातो, तो जुगार नसतो? तुझा जन्म होताच तुडच्या मातेनं तुला जलप्रवाहावर सोडून दिलं, तो तुझ्या जीवनातील खेळलेला जुगारच नव्हे का? संसारात जोडलेली पत्नी, मानलेला मित्र, तोडलेला संबंध हा हरघडी खेळल्या जाणाऱ्या द्यूताचाच भाग नाही का? मित्रा, उभं आयुष्य पावलोपावली जुगार खेळण्यात जातं. ती दानं टाकत जाण्यात भय वाटत नाही. पटावरच्या जुगाराचं भय वाटतं?'

'युवराज, बोलूनचालून जुगार. त्याचं दान कुणाच्या बाजूनं पडणार, याची ग्वाही कोण देणार?'

'अरे, जुगार म्हणजे जिंकणं, नाहीतर हरणं. या दैवाच्या फाशांनी हरवलेलं

जिंकू किंवा असलेलं हरू. दोन्हीलाही माझी तयारी आहे.'

'ठीक! द्यूत, तर द्यूत!' कर्ण म्हणाला.

'तू चिंता करू नकोस. या द्यूतात जय आपलाच आहे. आता लौकरात लौकर द्यूतगृह कसं उभारलं जाईल, तिकडं लक्ष द्यायला हवं. हे द्यूतगृह मयसभेपेक्षा श्रेष्ठ असेल. तिथं

पाणी दिसत असता पाणीच राहील, भूमी असणार नाही. भिंत दिसत असता द्वार राहणार नाही. स्फटिकभूमी स्फटिकाचीच राहील. त्यावर पाय ठेवला असता जलस्पर्श घडणार नाही.' दुर्योधनाच्या डोळ्यांत सूडाचे तेज प्रगटले होते. चेहऱ्यावर हसू होते. 'कर्णा, त्या मत पांडवांना माझ्या द्यूतगृहात पाय टाकू दे. डोळ्यांसमोर पाणी दिसत असता आपल्या पावलांनी गटांगळ्या खाव्या लागतील. भिंत माहीत असून तीवर मस्तक फोडून घ्यावं लागेल. स्फटिकभूमीवर उभं राहूनही पायांचं बळ सरल्यानं त्याच भूमीवर ढासळावं लागेल. चल, मित्रा, आता अवधी फार थोडा आहे. द्यूतगृहाची जागा मामांनी निश्चित केली आहे. ते पुढं गेले आहेत. ती जागा पाहायला आपल्याला जायचंय्.'

दुर्योधनासह कर्ण द्यूतगृहाची संकल्पित जागा पाहायला गेला.

रात्री कर्ण आपल्या शय्यागृहात मद्यपान करात बसला होता. अधीरथाबरोबर द्रुम, वृषकतु, शत्रुंजय यांच्याशी मनसोक्त गप्पा मारल्याने कर्णाच्या मनावरचे दडपण खूप कमी झाले होते. तोच वृषाली शय्यागृहात आली. कर्णाने तिच्याकडे पाहिले.

कर्णाने विचारले,

'वेळ झाला?'

'हो! सासूबाईंचे पाय चेपीत होते.'

'आई झोपली?'

'नाही. जाग्या आहेत.'

'मग झोपेपर्यंत थांबायचं, की नाही?'

'त्याच नको म्हणाल्या.'

'का? आई काय म्हणाली?'

वृषाली उभ्या जागी लाजली.

कर्णाने कलते होऊन वृषालीचा हात पकडला. तिला आपल्या शेजारी बसवीत त्याने विचारले,

'सांग ना!'

'अं हं!' वृषाली आणखी लाजली.

'सांगावं लागेल!' कर्णाने हट्ट धरला. 'काय म्हणाली आई?'

वृषालीचा चेहरा गोरामोरा झाला. ती कष्टाने म्हणाली,

'त्या म्हणाल्या... तो वाट पाहत असेल.'

कर्ण मोठ्याने हसला आणि वृषाहलीला जवळ आढात असता धक्का लागून मंचकावरचा मद्याचा पेला कलंडला. मद्य सांडले.

वृषाली म्हणाली,

'पेला सांडला ना?'

'जुगारातला एक पेला सांडला, म्हणून झारी रिती होत नाही.'

'कसला जुगार?'

'साराच जुगार! तुझा-माझा विवाह हाही एक जुगारच!'

'काय बोलता?'

'आजच मला ते ज्ञात झालं.' कर्ण हसून म्हणाला, 'वसू, आपण शय्यागृहात हसतो

आहोत. आनंदात आहोत. आणखी काही वेळानं भांडणार नाही कशावरून? हा जुगारच नाही का?'

'फार ऐकलं. उठा! 'वृषाली म्हणाली, 'रात्र फार झाली.'

कर्ण उठत म्हणाला,

'जुगाराचं काय?'

'त्याचा विचार तुम्ही करू नका.' वृषाली हसून म्हणाली, 'शय्यागृहात फासे स्त्रीच्या हाती असतात. पुरुषाका नव्हे.'

कर्णाने पाहिले.

वृषाली शय्यागृहाची समई शांत करीत होती. उजेड मंदावत होता....

# १९

**दु**र्योधनाच्या संकल्पित यज्ञाच्या आणि द्यूतगृहाच्या कामाला सुरुवात झाली. राजप्रासादासमोर पांडवांचा यज्ञमंडप फिका पडावा, असा भव्य मंडप उभारण्यासाठी काम सुरू झाले. राजप्रासादाच्या विस्तीर्ण उद्यानाच्या एका भागात द्यूतगृहाच्या उभारणीला सुरुवात झाली. शेकडो निष्णात कारागीर, शिल्पी त्या कामावर होते. द्यूतगृहाच्या कामावर लक्ष ठेवण्यासाठी हुशार आणि तत्पर सेवकांची नेमणूक झाली होती. दुर्योधनाला त्याखेरीज काही सुचत नव्हते.

द्यूतगृह तयार झाले. शेकडो कोरीव स्तंभांनी ते द्यूतगृह तोलले होते. त्यांच्या कमानींवर सुवर्णामध्ये वैडूर्यरत्ने जडवून चित्रविचित्र वेलपत्ती चितारली होती. त्या सभागृहाला अनेक द्वारे आणि अनेक वातायने ठेवली होती. सभागृहाचे महाद्वार रत्नांकित सुवर्णाने मढवले होते. द्यूतगृहाच्या भिंतींवर द्यूतपटाची सुबक चित्रे चितारली होती, प्रवेशद्वारावर द्यूत खेळतानाचे शिवपार्वती चितारले होते. सभागृहाच्या बैठकीची जागा अर्धचंद्राकृती आयोजली होती. सभागृहाच्या जमिनीपासून थोड्या उंचीवर ती बैठक होती. त्या बैठकीवर शेकडो सुवर्णासने चढत्या पायऱ्यांनी मांडली होती. मध्यभागी सम्राटांसाठी मोतीलगाचे छत्रचामर असलेले, रत्नजडित सुवर्णसिंहासन ठेवले होते. चढत्या पायरीने मांडलेली ती अर्धचंद्राकृती बैठक अशी होती की, कोणत्याही स्थानावरून द्यूतगृहात मांडलेला पट स्पष्ट दिसावा. सभागृहात जाताच सम्राटांच्या सिंहासनामागे स्फटिक-भिंतीवर चितारलेले भव्य चित्र डोळ्यांत भरे. त्या चित्रात पंख पसरून नागावर झेपावणारा गरुड दाखविला होता.

त्या अर्धचंद्राकृती बैठकीच्या समोर चकचकीत स्फटिकभूमीवर हस्तदंती, कोरीव काम केलेली, नक्षीदार, मोठी आसने ठेवलेली होती. चंदनाचे चौरंग ठेवले होते. त्यांवर पसरलेले द्यूतपट, सोंगट्या, फासे दिसत होते.

द्यूतगृह आता पुरे झाले होते.

दुर्योधन कर्णासह समाधानाने ते द्यूतगृह पाहत होता. ते द्यूतगृह पाहत असताना दुर्योधनाच्या चेहऱ्यावरचे समाधान स्पष्टपणे दिसत होते. तो कर्णाला म्हणाला,

'कर्णा, या द्यूतगृहात काही कमतरता वाटते?'

'नाही, युवराज! द्यूतगृह सर्वार्थानं परिपूर्ण आहे. द्यूतगृहाबद्दल माझ्या मनात मुळीच आकर्षण नाही; पण हे द्यूतगृह पाहिल्यावर आपणसुद्धा फासे घोळवावेत,असं वाटतं.'

दुर्योधन हसला.

'आता फार काळ वाट पाहावी लागणार नाही. मामांनी सप्तमीचा मुहूर्त निवडला आहे.'

'एवढ्या नजीकचा?'

'त्यात काय अवघड आहे? यज्ञाची सर्व तयारी झालीच आहे. कालच तातांनी विदुरांना इंद्रप्रस्थाला जाऊन पांडवांना घेऊन यायला सांगितलं आहे.'

‘विदुरांच्या करवी आमंत्रण?’

‘हो, राजसूय यज्ञात पांडव थकले आहेत. इथं येतील, चार दिवस राहतील. त्यांचा श्रमपरिहार होईल... नृत्य, गायन, द्यूत यांत त्यांचं मनोरंजन होईल.’

मागे पावलांचा आवाज झाला.

दुर्योधनाने वळून पाहिले. दुर्योधनबंधू विकर्ण आत येत होता. त्याने सांगितले,

‘महात्मा विदुरकाका येत आहेत.’

दुर्योधनाने कर्णाकडे पाहिले,

‘पाहिलंस, मित्रा, आमच्या काकांना केवढं आयुष्य आहे, ते!’ विकर्णाकडे वळून दुर्योधन म्हणाला, ‘येऊ देत; पण इंद्रप्रस्थाला ते जाणार आहेत ना?’

‘हो! सर्व तयारी झाली आहे. मीही बरोबर जात आहे; आज भोजन झाल्यानंतर...’

विकर्णाला पुढे बोलता आले नाही.

महाद्वारातून विदुर आत येत होते. विदुरांचा चेहरा चिताक्रांत होता.

दुर्योधनाने वंदन केले.

कर्णाने दुर्योधनाचे अनुकरण केले.

दुर्योधन म्हणाला,

‘काका, बरं झालं, तुम्ही आलात, ते! तुम्ही एकदा हे द्यूतगृह पाहायला हवं होतं.’ विदुरांचा हात धरून अर्धचंद्राकृती सभास्थानापुढे नेत तो म्हणाला, ‘पाहा, काका! या सर्व सुवर्णसिंहासनांवर आमंत्रित राजे बसतील. कौरवश्रेष्ठ असतील. समोर पायऱ्यांवर मध्यभागी जे सिंहासन दिसतं ना, तिथं सम्राट बसतील. त्यांच्या जवळच्या सुवर्णसिंहासनावर भीष्माचार्य असतील. तुमच्यासाठी मात्र नेहमीची तातांच्या जवळची जागा ठेवली नाही. द्यूत स्पष्ट दिसावा, म्हणून द्यूतालगत हे सुवर्णासन मंडल आहे...’

थकलेले विदुर म्हणाले,

‘युवराज, धृतराष्ट्रमहाराजांनी पांडवांना आमंत्रण देण्यास मला आज्ञा केलीय्.’

‘ते मला माहीत आहे, काका! किंबहुना मीच तो आग्रह धरला. मी तातांना आवर्जून सांगितलं की, तुमच्याखेरीज दुसऱ्या कुणाला पाठवू नका.’

‘असल्या गोष्टीत मला रस नाही.’

‘का? रस नसायला काय झालं? पांडवांच्या राजसूयात तर तुमचा आनंदरस ओसंडत होता. इथंही यज्ञ होणार आहे. मयसभेऐवजी द्यूतगृह आहे.’

‘हा तुमचा द्यूत आणि यज्ञ खरा असता, तर मी हर्षानं इंद्रप्रस्थाला गेलो असतो.’

‘मग हा खरा यज्ञ नाही? ऐक, कर्णा, काका काय म्हणतात, ते!’ दुर्योधन हसला.

विदुर म्हणाले,

‘दुर्योधना, माझं ऐक. हा द्यूत तू घडवू नकोस. निदान पांडवांना इथं आणण्याचं मला सांगू नकोस.’

‘काका, मी तुम्हांला कोण सांगणार? तातांनी सांगितलं. मी नुसतं सुचविलं.’

‘तेच ते! पण हा माझा आग्रह कशाला धरतोस?’

काका, तुम्हांला आमच्यापेक्षा पांडवांचं प्रेम अधिक. तुम्ही त्यांचे पाठीराखे.’

‘मी कसली पाठराखण करणार?’

दुर्योधनाचे हास्य क्षणभर विरले; पण क्षणभरच.

‘वा, काका! तुम्ही पाठीशी नसता, तर लाक्षागृहातून ते वाचले नसते. तुम्ही

नाव ठेवली नसती, तर ते गंगापार कसे गेले असते? मला सगळं माहीत आहे, काका!'

'अन् तरीही मला पाठवतोस?'

'हो! जसे तुम्ही पांडवांचे हितकर्ते, तसेच तातांचे सल्लागार. तुम्ही पांडवांपासून काही लपवून ठेवणार नाही... अन् माझ्यावर विश्वासघाताचा आरोप येणार नाही.'

'कर्णा, हा सल्ला तुझा का?' विदुरांनी विचारले.

'त्याचा काही यात संबंध नाही, काका.'

'कर्णा, हा तुझा सल्ला का?' परत विदुरांनी विचारले. 'अन् हो म्हणून उत्तर दिलं, तर!'

विदुर मान हलवीत म्हणाले,

'मला पटायचं नाही तू असा द्यूताचा मार्ग अवलंबणारा नव्हेस. तू युद्ध पत्करशील; पण द्यूत...'

'मग मला कशाला प्रश्न विचारलात?' कर्ण म्हणाला.

'काका, तातांनी सांगितल्यप्रमाणं तुम्ही इंद्रप्रस्थाला जा. सम्राट युधिष्ठिरांना सर्व सांगा. द्यूताचं आमंत्रण द्या. त्यांना म्हणावं, यज्ञ हे निमित्त आहे. द्यूत हे आह्वान आहे. यज्ञभूमीतल्या सुग्रास भोजनासाठी त्यांना बोलावलं नसून, द्यूत खेळण्यासाठी त्यांना पाचारण केलंय्. त्यांना सांगा, म्हणावं, सुबलपुत्र गांधारदेशाधिपती शकुनि महाराज द्यूताला बसणार आहेत. अक्षविद्येत निपुण अशी त्यांची कीर्ती आहे. ते कृतहस्त म्हणजे आपल्या इच्छेनुसार फासे टाकण्यात निपुण आहेत. अतिदेवी-म्हणजे मर्यादेचं उल्लंघन करून द्यूत खेळणारा- असाही त्यांचा लौकिक आहे. त्यांच्याबरोबर द्यूत खेळणं म्हणजे साक्षात पराजय भोगणं. हे सारं त्या युधिष्ठिराला सांगा आणि द्यूताचं आमंत्रण द्या. सन्मानानं त्या सर्वांना घेऊन या.'

दुर्योधनाच्या बोलांनी कर्ण आश्चर्यचकित झाला होता. दुर्योधनाने द्यूताचे सारे रहस्यच विदुरांना सांगितले होते. तो न राहवून म्हणाला,

'युवराज, असा निरोप पाठविला, तर कोणता सुज्ञ द्यूत खेळायला आपणहून येईल!'

'सुज्ञ येणार नाही; पण तो येईल. आपल्या हातानं आपलं सर्वस्व हरेल. हरावंच लागेल. कारण तो द्यूताचा व्यसनी नव्हे, तर खोटा सम्राटही आहे. त्या सम्राटपदासाठी तरी त्याला द्यूतात उतरावंच लागेल.'

'सम्राटपदाचा काय संबंध?'

'काय संबंध? मित्रा, तो युधिष्ठिर एकदा हे आह्वान नाकारू दे... अन् मौज बघ. क्षत्रिय कधीही द्यूताचं आह्वान नाकारीत नाही... अन् जो क्षत्रिय नाही, त्याला सम्राट बनण्याचा अधिकार नाही. नाही, मित्रा, त्या युधिष्ठिराला यावंच लागेल.'

दुर्योधन मोठ्याने हसत होता. विदुर द्यूतगृहाबाहेर जाईपर्यंत तो हसतच होता...

# २०

**दु**र्योधनाचे भाकीत खरे ठरले. इंद्रप्रस्थाहून विदुराबरोबर पांडव आपल्या परिवारासह हस्तिनापुराला आले. कौरवांच्या राजप्रासादातच पांडवांचे वास्तव्य होते. यज्ञासाठी आलेल्या राजांना पांडव-कौरवांचे ते सख्य पाहून समाधान वाटत होते. पांडवांच्या सुखसोयींत कोणतीच कमतरता ठेवली नव्हती. सुग्रास भोजनाच्या सामुदायिक भव्य पंक्ती, नृत्यगायनांची करमणूक यांत पांडव सुखी होते.

यज्ञाची सांगता झाली आणि त्या रात्री पांडव आपल्या शयनगृहात सुश्राव्य गायन ऐकत शय्येवर पडून राहिले. स्त्रियांच्या सहवासात त्यांनी ती शुभ रात्र सुखाने घालवली.

उषःकाली वैतालिक स्तुतिपाठ करू लागले असता पांडव जागे झाले. आह्निक आटोपून ते धृतराष्ट्राच्या भेटीसाठी राजगृहात गेले. राजसभेत भीष्माचार्य, द्रोणाचार्य, विदुर यांखेरीज दुर्योधन, विकर्ण तेथे होते. क्षेमकुशल झाल्यानंतर धृतराष्ट्र म्हणाले,

'युधिष्ठिरा, युवराज दुर्योधनानं या यज्ञाबरोबरच तोरणस्फटिका नावाचं द्यूतगृह उभारलं आहे. त्या द्यूतगृहात जाऊन आज त्या सुखाचा आस्वाद घ्या.'

युधिष्ठिराने संमती देत म्हटले,

'आपली आज्ञा! द्यूतगृहाबद्दल मीही ऐकलंय्. द्यूताचं आमंत्रण स्वीकारूनच मी इथं आलोय्.'

जेव्हा युधिष्ठिराच्या समवेत धृतराष्ट्र द्यूतगृहात गेला, तेव्हा तेथे सारे राजे, मानकरी, प्रतिष्ठित नागरिक सभेमध्ये आपापल्या आसनांवर बसले होते. धृतराष्ट्राचा हाता धरुन संजय त्यांना सभाग्रहात नेत होता, द्युगृहाची रचना समजावून सांगत होता. द्यूतगृहात अनेक कुशल द्यूतकार तो द्यूत पाहण्यासाठी गोळा झाले होते. या सर्वांचा परिचय युधिष्ठिराशी करून देण्यात आला.

धृतराष्ट्रमहाराज सिंहासनावर बसताच सारे परत आपआपल्या जागी बसले. द्यूतगृहात शांतता पसरली.

दुर्योधन उभा राहिला आणि म्हणाला,

'तात, आपल्या आशीर्वादानं द्यूतगृह द्यूतासाठी सिद्ध झालं आहे. हा अलौकिक द्यूत पाहण्यासाठी आमंत्रित राजे, राजनगरीचे प्रतिष्ठित नागरिक, कौरववीर गोळा झाले आहेत. या द्यूतात भाग घेण्यासाठी राजसूय यज्ञ करून सम्राट बनलेले युधिष्ठिर महाराज आपल्या बांधवांसह इथं आले आहेत. या द्यूताला आशीर्वाद देण्यासाठी पितामह भीष्म, महात्मा विदुर, द्रोणाचार्य, कृपाचार्यांच्यासारखे श्रेष्ठ इथं आले आहेत. द्यूताला अधीर बनलेल्या या सभागृहाला आपली आज्ञा व्हावी.'

धृतराष्ट्रचा गंभीर स्वर उमटला,

'मुलांनो, द्यूत म्हणजे कलहाचं मूळ आहे. मृत्यूचं द्वार आहे, असं मला अनेकांनी सांगितलंय्. पण द्यूत राजमान्य, धर्ममान्य असल्यानंच मी या द्यूताला अनुमती दिली

आहे. तेव्हा स्नेहबुद्धीनं आणि मोकळ्या मनानं हा द्यूत खेळा.'

दुर्योधनाची दृष्टी युधिष्ठिरावर गेली.

युधिष्ठिर उभा राहिला. त्याने दुर्योधनाला विचारले,

'माझं द्यूत कुणाशी होणार व मी जिंकलेल्या पणाची हमी कोण देणार, हे प्रथम मला समजायला हवं. त्यानंतर मी द्यूतगृहात उतरेन.'

दुर्योधनाने स्पष्ट शब्दांत सांगितले,

'हे भूपते, तुला आधीच सांगितल्याप्रमाणं माझे मातुल सुबलपुत्र गांधारदेशाधिपती शकुनिमहाराज आपल्यासह द्यूत खेळतील अन् आपण द्यूतात जे पण जिंकाल, ते मी पुरवीन. या माझ्या वचनाला ही सभा साक्ष आहे.'

शकुनि आपल्या आसनावरून उठले. ते युधिष्ठिराला म्हणाले,

'युधिष्ठिरा, मी तुझ्यासह द्यूत खेळायला तयार आहे. सर्व सिद्धता झाली आहे.'

युधिष्ठिराने एकदा सभेवरून दृष्टी फिरवली. तो म्हणाला,

'शकुनिमहाराज, सम्राटांनी सुरुवातीलाच सांगितलंय् की, द्यूत हे पापाचं मूळ आहे. द्यूतकार नेहमीच कपटाचा अवलंब करतात.'

शकुनि हसले,

'राजा, तू ज्ञानी आहेस. या जगातलं आह्वान असंच असतं. विद्वान अविद्वानाला, अस्त्रज्ञ अकृतास्त्राला अन् बलवान दुर्बलाला असंच आह्वान देत असतो. तुला माझी भीती वाटत असेल, तर याच वेळी द्यूतातून परावृत्त हो!'

क्षणात युधिष्ठिराची मान ताठ झाली. आपले उत्तरीय सावरीत तो पायऱ्या उतरत द्यूतपटाकडे जात असता म्हणाला,

'मी द्यूताला तयार आहे.'

शकुनीच्या चेहऱ्यावर विजयाचा आनंद प्रगटला आणि तोही पटाकडे चालू लागला.

सभास्थानासमोर ठेवलेल्या द्यूतपटाकडे सर्वांचे लक्ष वेधले होते. जेथे द्यूतपट मांडला होता, ती भूमी उर्णावस्त्राने आच्छादलेली होती. युधिष्ठिराने आपली जागा घेतली. त्याच्यामागे भीम, अर्जुन, नकुल, सहदेव चिंताक्रांत मुद्रेने बसले. पटाच्या दुसऱ्या बाजूला शकुनीने जागा घेतली.

शकुनीने एकदा सभास्थान निरखले. युधिष्ठिरावरची नजर न काढता शांतपणे आपल्या बोटांतील अंगठ्या काढल्या आणि त्या जवळच्या आसनावर ठेवल्या. सभास्थानाच्या खाली पटानजीक बसलेल्या विदुरांकडे पाहून पटावरचे फासे हाती घेतले. उलटी मांडी घालून शकुनीने फासे घेतलेले हात कानाजवळ नेले आणि ते फासे हातात घोळवू लागला. शकुनीचा आवाज उमटला,

'बोल, राजा, तुझा पण बोला...'

युधिष्ठिराचा हात गळ्याशी गेला होता. त्या हाताचा स्पर्श गळ्यातल्या अमूल्य हाराला झाला. युधिष्ठिर म्हणाला,

'हा मूल्यवान हार मी पणाला लावतो.'

शकुनीने फासे घोळवले आणि पटावर फेकले. साऱ्यांचे डोळे पटाला भिडले आणि शकुनीचा आवाज उठला,

'राजा, मी डाव जिंकला...'

दुर्योधनाच्या मुखावर विजयी स्मित उमटले.

त्याने जवळ बसलेल्या कर्णाकडे पाहिले.

कर्णाचे कुतूहल वाढले होते. त्याच्या चेहऱ्यावर स्मित प्रगटले होते.

पर्वतावरून शिलाखंड सुटावा आणि पर्वतउतारावरून जात असताना अनेक शिलाखंड त्याने सोबत न्यावेत, तसे गळ्यातल्या हारापाठोपाठ दास, दासी, गोधन, ऐश्वर्य, यांसह आपले राज्यही हरून युधिष्ठिर मोकळा झाला; पण तिथे त्याचे पतन थांबणारे नव्हते. सारे हरल्यावर युधिष्ठिराची दृष्टी आपल्या पाठीशी बसलेल्या भ्रात्यांवर खिळली आणि एकापाठोपाठ पणाला लावलेले नकुल, सहदेवही जिंकले गेले. युधिष्ठिराला काय पणाला लावावे, हे सुचेना. शकुनि म्हणाला,

'राजा, थांबलास का? सावत्र भावांना पणाला लावलंस आणि भीम, अर्जुन सुरक्षित ठेवलेस. हाच तुझा धर्म?'

युधिष्ठिर त्या बोलांनी संतापला आणि भीम-अर्जुनांनाही पणाला लावून मोकळा झाला; पण ते जिंकताच शकुनि म्हणाला,

'राजा, तू सारं हरलास.'

'नाही, मी सर्वस्व हरलो नाही. अजून मी इथं आहे. या देहानं आणि मनानं फक्त धर्मच आचरला आहे. आता मी स्वत:ला पणाला लावतोय्. माझ्या पूर्वपुण्याईवर मी द्यूतात गमावलेलं परत मिळवीन.'

पण तीही युधिष्ठिराची भ्रांतच ठरली. द्यूताचे फासे युधिष्ठिराच्या विरुद्ध पडले होत.

ते पाहून सभेत खळबळ निर्माण झाली. सभागृहाला भरपूर वातायने असूनही प्रत्येकाचा जीव कासावीस होऊ लागला.

हताशपणे युधिष्ठिर त्या फाशांकडे पाहत होता.

'राजा!' शकुनि म्हणाला, 'तुझ्याजवळ तुझं धन शिल्लक असता, ते तसं राखून ठेवून स्वत:ला पणाला लावायला नको होतं. ते पाप आहे.'

'माझं धन हरवलंऽ ऽ... काही शिल्लक नाही...'

'नाही कसं? अद्याप तुझी प्रिय भार्या अवशिष्ट राहिली आहे ना? ती पांचाली तुझं धन नाही?'

साऱ्यांचे श्वास जिथल्या तिथे थांबले. खोटी प्रतिष्ठा आणि ईर्ष्या यांना बळी पडलेला युधिष्ठिर ते एकून सरसावला. आपल्या रूक्ष आवाजात त्याने विचारल,

'पांचाली...?'

'हां? ती अजून शिल्लक आहे. ती पणाला लावलीस आणि तू पण जिंकलास, तर, राजा, तू आमच्या दास्यातून मोकळा होशील. आम्ही पण जिंकला, तर द्रौपदी आमची दासी होईल. आहे मान्य?'

देहभान विसरलेला युधिष्ठिर म्हणाला,

'हां! आहे मान्य! ऐक, शकुने, जिचे नेत्र शरदऋतूतील कमलदलासारखे आहेत, जिच्या अंगाला शरत्कालीन कमलांचा गंध येतो, जिचे काळे व कुरळे केस विपुल व सुदीर्घ आहेत, जिचा मध्यभाग यज्ञवेदीप्रमाणे रेखीव आहे अन् जिच्या अंगावर विरळ

केस आहेत, अशा बुद्धिमती, कलंकविधुरा सर्वांगसुंदर द्रौपदीचा पण लावून मी तुझ्याशी द्यूत खेळतो.'

युधिष्ठिराच्या त्या बोलण्याने साऱ्या सभेला घृणा आली आणि सभेचा संकेत लक्षात न घेता 'धिक्कार असो' असे तिरस्काराचे शब्द सभेमध्ये उमटू लागले. भीष्म, द्रोण, कृप यांच्या अंगांना दरदरून घाम सुटला. विदुर दोन्ही हातांत मस्तक धरून बसला. चेतनाशून्य झाल्याने त्याच्या नेत्रांत अश्रूही दिसत नव्हते.

शकुनीचे हात उंचावले गेले आणि भयाण शांतता पसरली.

दुर्योधन उठून उभा राहिला होता.

प्रलयासाठी आतुर झालेल फासे शकुनीच्या बोटांच्या पिंजऱ्यात करकरत होते...

# २१

**घ** रंगळत जाणारे फासे द्यूतपटावर स्थिरावले. हताश पांडवांच्या बरोबरच शकुनीची आसक्त नजर फाशांवर स्थिरावली.

शकुनीच्या कृतहस्ताचाच विजय झाला होता.

दान कौरवांच्या बाजूनेच पडले होते.

पांडव द्रौपदी हरले होते.

राजसभेतील शांतता असह्य होऊन अंधळ्या धृतराष्ट्राने अधीऱ्या मनाने शेजारी बसलेल्या संजयाला विचारले,

'मी काय जिंकलं? काय जिंकलं?'

संजयाला त्याचे उत्तर द्यावे लागले नाही. नि:श्वासाबरोबर बाहेर पडलेल्या युधिष्ठिराचे शब्द ऐकू आले,

'मी हरलो.'

'जिंकलं! जिंकलं!!' म्हणत हर्षाने उन्मादित झालेल्या शकुनीने द्यूताचा पट उधळला.

कौरवसभेत एकच आनंद उसळला. 'पांडव द्रौपदी हरले,' हा एकच आवाज सभागृहात फिरत होता.

द्रौपदी दासी झाली.

आकाशीचा चंद्र पृथ्वीवर उतरला. सूर्यकिरणाने काळोख पसरला. अग्नीने जलधारांत स्नान केले. अमृताला मद्याची ग्लानी आली. वायू अचल बनला. वज्राची एकतारी झाली. द्रौपदी कौरवांची दासी झाली. पांडवांच्या हाती गमवायला आणि कौरवांना मिळवायला काहीही शिल्लक राहिले नाही.

आनंदभरित राजसभेकडे समाधानाने पाहत शकुनि उभा राहिला. वार्धक्यामुळे आणि झालेल्या हर्षाने त्याची मान हलत होती. त्यामुळे शिरोभूषणातले रत्नजडित शिरपेच अधिकच झगमगत होते. आपल्या डाव्या मनगटावर विळखा घालून अधांतरी रुळणाऱ्या पीतवर्ण शेल्याच्या शेवाने शकुनि वारा घेत होता. ती उंच, शेलाटी, गौरवर्ण आकृती आपल्या भेदक घाऱ्या डोळ्यांनी पराजित पांडवांची दयनीय स्थिती निरखीत होती.

शकुनीने मंचावरच्या आपल्या अंगठ्या उचलल्या. शांतपणे त्या बोटांत पूर्ववत चढवल्या आणि पांडवांकडे अंगुलिनिर्देश करून क्षणभर तसाच उभा राहिला.

त्या कृतीने सभेतला आवाज विरला.

पसरलेल्या शांततेची उसंत घेऊन शकुनीचा आवाज त्या सभेमध्ये उठला,

'कौरवश्रेष्ठहो! द्यूतामध्ये ऐश्वर्यासह राज्य गमावून आधीच एकवस्त्र बनलेले हे पांडव आता पणामध्ये द्रौपदी हरून अर्धवस्त्र बनले आहेत. या दानानं द्रौपदी कौरवांची दासी झालीय्. या क्षणापुढं कृष्णेच्या दैवाचे फासे फक्त कौरवांच्या इच्छेवर अवलंबून आहेत.'

दुर्योधनाच्या शेजारी बसलेला कर्ण हे शांतपणे पाहत होता.

दुर्योधनाच्या हाताचा स्पर्श होताच कर्णाने त्याच्याकडे पाहिले.

दुर्योधनाचे समाधान त्याच्या मुखावर प्रगटले होते.

त्याच वेळी विदुर सभेमध्ये उभे राहिले.

दुर्योधनाचे समाधान नाहीसे झाले, त्याच्या कपाळी सूक्ष्म आठी पडली.

साऱ्या सभेचे लक्ष विदुरांकडे गेले. कौरवसभेत विदुर स्पष्टवक्ता म्हणून साऱ्यांना परिचित होते. त्यांच्या मनातली पांडवप्रीती, कृष्णस्नेह साऱ्यांना ज्ञात होता. त्यामुळे विदुर काय बोलणार, याची उत्सुकता साऱ्यांना लागून राहिली होती. विदुरांची शांत दृष्टी शकुनीकडे वळली.

'शकुनिमहाराज, आज आपल्या द्यूतनैपुण्यानं आपण पांडवांना जिंकलं. द्यूतामध्ये आपला अतिदेवी म्हणजे मर्यादेचं उल्लंघन करून द्यूत खेळणारा अन् कृतहस्त म्हणजे आपल्या इच्छेप्रमाणे फासे टाकण्यात निपुण असा आपला लौकिक आजच्या द्यूतपटावर आपण सिद्ध केला. आपण बोलून-चालून कृतहस्त. त्यापुढं पांडवांचं राज्य अन् ऐश्वर्य आटून गेलं... अन् अतिदेवी लौकिक सिद्ध करण्यासाठीच की काय, आपण त्या द्यूतप्रिय युधिष्ठिराला द्रौपदी पणास लावण्यासाठी उद्युक्त केलंत; पण द्यूत हा मनोरंजनासाठीच व्हावा. भंजनासाठी, आत्मघातासाठी नव्हे. आपण व्यापारात निष्णात, अशीही आपली ख्याती आहे. या जगात जरीबासनांचा, तलम वस्त्रांचा, नेत्रदीपक रत्नांचा व्यापार होतो. मत्त गज, सुलक्षणी अश्व, सुरेख लव असणारे उंट यांचा व्यवहार, विक्रय होतो. त्याची पारख असणारे आपल्यासारखे जाणकार दुर्मीळ; पण हा विक्रय जसा होतो, तसा माणसांचा व्यापार द्यूताच्या फाशांवर नसतो. द्यूतात दास बनले, म्हणून पांडव दास ठरत नाहीत. स्वपराक्रमानं राजसूय यज्ञाची सांगता करणारे ते वीर आहेत, हे दृष्टीआड करून कसं चालेल? द्रौपदी दासी बनली असली, तरी ती स्त्री आहे, हे इथं बसलेल्या राजसभेला अन् त्या सभेतल्या धर्मगुरूंना विसरता येणार नाही. जी मर्यादा आपण सहज ओलांडलीत, ती ओलांडून निदान आम्हांला तरी जमणार नाही. ती अमर्यादा आहे.' कर्णाकडे पाहत विदुर म्हणाले, 'या जगात राज्य देऊन कुणी राजा होत नाही, ना राज्य हिरावून घेऊन कुणी दास. द्रौपदी ही जन्मजात राजकन्या असून, इंद्रप्रस्थाची महाराणी आहे'

मर्माघात झालेला कर्ण त्या शेवटच्या वाक्याने अधिकच संतापला. आसनावरून खाडकन उठून तो गरजला,

'कोण महाराणी? द्रौपदी? मग राजमाता गांधारीदेवी कोण? कौरवकुलाचं अमात्यपद भोगणाऱ्या विदुरांना सम्राट धृतराष्ट्रमहाराजांचा विसर पडलेला दिसतो. नाहीतर या कौरवसभेत सम्राटांची उपस्थिती असता पांडवाच्या सम्राटपदाचा उच्चार करण्यास ते धजले नसते. राजनीतीला अन् धर्मनीतीला द्यूत मान्य आहे, उसनं धारण केलेलं राज्य पांडवांनी गमावलंय्. जिथं ते राजे राहिले नाहीत, तिथं राणी कुठली?'

कर्णाला दुजोरा देण्यासाठी दुर्योधन सरसावला,

'कर्णा, दासाची कड दासीपुत्रानंच घ्यायची. त्यात नवल कसलं? विदुर म्हणजे साक्षात पांडवांचा पक्षपाती. तो आमच्या बाजूनं बोलेल कसा?'

दुर्योधनाचा संताप पाहून विदुर क्षणभर स्तब्ध झाले, समर्थन करण्याचा प्रयत्न करीत ते म्हणाले,

'युवराज! आपला संताप मी जाणतो. ज्या कुलाच्या अन्नावर माझं पोषण झालं, त्या कुलाचा मी अपमान कसा करीन! उलट, संतापाच्या भरात या कुलाला कलंक लागेल, असं वर्तन होऊ नये, म्हणूनच माझी धडपड. हे पांडव आपल्या घरी आमंत्रित आहेत. आपल्या अभ्यागताचा सत्कार... सन्मान...'

'सन्मान? या पांडवांचा?' दुर्योधन उसळला, 'या द्यूतानं त्यांचा योग्य तो सन्मानच केलाय्. घरी आलेल्या अभ्यागताला कसं वागवावं, हे त्यांनीच मला शिकवलंय्. राजसूय यज्ञाच्या प्रसंगी यांनी उभारलेली मयसभा आमच्याइतकी दुसऱ्या कुणी उपभोगली? आमचा अपमान करताना घरी आलेल्या अभ्यागताची जाणीव यांना नव्हती? अन्, विदुरकाका, हे लक्षात ठेवा की, इथं पांडव जरूर आमंत्रित आहेत; पण ते आमच्या पाहुणचारासाठी नव्हे... द्यूतासाठी! तुमच्याकरवीच दिलेलं द्यूताचं ते आह्वान स्वीकारून ते इथं आलेले आहेत. शकुनि अक्षविद्येत निपुण आहेत, हे त्यांना तुम्हीच सांगितलं होतं ना? ज्वाला चुकविण्यासाठी भुयारं खोदता येतात, पाण्यावर तरंगण्यासाठी नौका उभी करता येते, पण दैव चुकविण्यासाठी काही करता येत नाही, हे तुम्हांला आता समजलं असेल. विदुरकाका, या पांडवांच्या दुर्दशेला तुम्हीच कारणीभूत आहात! अर्धवट राहिलेलं काम तुम्हीच पुरं करा. असेच अंत:पुरात जा अन् जिच्या असामान्य लावण्याची स्वत: युधिष्ठिरानं ख्याती वर्णिली आहे, त्या पांचालीला या राजसभेत घेऊन या. हे काम करण्यास तुम्हीच अधिक योग्य दिसता.'

दुर्योधनाची ती आज्ञा ऐकताच विदुराच्या पायांतले बळ सरले. ते आपल्या आसनावरून ढासळले. त्यांची अवस्था पाहून दुर्योधनाच्या चेहऱ्यावर स्मित उमटले.

दुर्योधनाचा सूत प्रतिकर्मा याला दुर्योधनाने आज्ञा केली,

'प्रतिकर्मा, या भेकडाच्या हातून हे काम होणार नाही. हा विदुर नेहमीच आमची निंदा आणि पांडवांची स्तुती करीत आला आहे. कौरवांची सत्ता काटा असते, हे एकदा त्याला उघड्या डोळ्यांनी पाहू दे. तू असाच अंत:पुरात जा अन् आमच्या त्या दासीला आमची परिचर्या करण्यासाठी इथं घेऊन ये.'

प्रतिकर्मा दुर्योधनाची आज्ञा पाळण्यासाठी गेला.

दुर्योधनाच्या त्या आज्ञेने सभेत कुजबूज सुरू झाली.

भीष्म, द्रोण आणि कृप यांना स्वत:ला सावरणे कठीण झाले.

काही वेळाने प्रतिकर्मा एकटाच राजसभेत आला.

दुर्योधनाने विचारले,

'प्रतिकर्मा, पांचाली कुठं आहे?'

प्रतिकर्म्याने सांगितले,

'महाराज, द्रौपदी या सभेत येण्याच्या परिस्थितीत नाही.'

'कारण?'

'ती एकवस्त्रा... रजस्वला आहे. मी आपली आज्ञा सांगताच त्या राजकन्येनं मलाच एक प्रश्न विचारायला सांगितलंय्.'

'कसला प्रश्न?' नकळत दुर्योधन बोलून गेला.

युधिष्ठिराजवळ जाऊन प्रतिकर्मा म्हणाला,

'राजा युधिष्ठिरा, द्रौपदीनं तुलाच प्रश्न विचारलाय्. तू द्यूतामध्ये स्वत:ला हरवून घेतल्यानंतर द्रौपदीचा पण लावलास की, आधी... असा तो प्रश्न आहे.'

द्रौपदीचा प्रश्न एकून युधिष्ठिर निश्चेष्ट व संज्ञाशून्य झाला. उतावीळ झालेला दुर्योधन म्हणाला,

'हे सूता! तू त्याला काय विचारतोस? तू असाच माघारी जा अन् त्या द्रौपदीला इथं घेऊन ये. जे प्रश्न विचारायचे, ते सभेत येऊन विचारू दे. तो संवाद ऐकण्यात आमचीही करमणूक होईल.'

प्रतिकर्म्याला ते कठोर कर्म नको वाटत होते. युधिष्ठिर काहीतरी बोलेल, सभा काहीतरी निर्णय घेईल, असे वाटत होते.

सावध झालेल्या युधिष्ठिराने प्रतिकर्म्याकडे पाहिल आणि त्याने उभ्या असलेल्या आपल्या दूताला सांगितले,

'हे दूता, तूच द्रौपदीकडं जा. तिला माझा निरोप सांग, प्रश्न विचारून संकट हरण होण्याची ही वेळ नव्हे. तिला म्हणावं, तू एकवस्त्रा, रजस्वला असलीस, तरी असशील, त्या स्थितीत या राजसभेत ये. तू राजपुत्री राजसभेत तशा अवस्थेत आल्यावर रक्तलांछित स्थिती पाहून तरी या कौरवांच्या मनांत आमच्याबद्दल अनुकंपा निर्माण होईल.'

पती म्हणवून घेणाऱ्या युधिष्ठिराचे भाषण ऐकून कौरवसभेतले भीष्म, द्रोण, कृपाचार्य हताश झाले.

कर्णाला युधिष्ठिराची घृणा आली.

उत्साहित झालेला दुर्योधन दुःशासनाला आज्ञा करता झाला,

'दुःशासना, उभा काय राहिलास? अंतःपुरात जा अन् त्या दासीला इथं घेऊन ये. सरळपणे ती यायला तयार झाली नाही, तर बळजबरीनं फरफटत तिला इथं घेऊन ये; पण एकटा माघारी येऊ नकोस.'

दुःशासन आसनावरून उठला आणि तो भावाची आज्ञा पाळण्यासाठी सभागृहाबाहेर निघून गेला.

द्रौपदी राजसभेत आणली जाणार, या कल्पनेने सारी सभा भयग्रस्त झाली होती. मनातली आसुरी उत्सुकता शिगेला पोहोचली होती. सभागृहाबाहेर उठलेल्या धडपडीच्या आवाजाने साऱ्यांचे लक्ष प्रवेशद्वाराकडे लागले आणि काही क्षणांतच द्रौपदीच्या केसांना धरून सभागृहात प्रवेश करणाऱ्या दुःशासनाकडे सर्वांचे लक्ष गेले. द्रौपदीचे शब्द कानांवर पडले.

'सोड, पाप्या, सोड ऽ'

विहिरीतून मोट खेचून आणावा आणि पाटात रिती करावी, तसे दुःशासनाने द्रौपदीला खेचीत राजसभेच्या मध्यभागी आणून सभास्थानासमोर एका हिसड्याने सोडले.

राजसभेत द्रौपदी ढासळली होती. तिचे नीलवर्ण कुरळे केस उर्णावस्त्रावर विखुरले होते.

त्या पडलेल्या द्रौपदीकडे बोट दाखवून दुःशासन म्हणाला,

'कौरवदासी राजसभेमध्ये उपस्थित झाली आहे.'

दुःशासनाचे ते शब्द द्रौपदीच्या कानी पडले. ती भानावर आली. तिने निश्चयपूर्वक आपली मान वर केली. एका हाताने केस सावरीत दुसऱ्या हाताने अपुऱ्या वस्त्रातील लज्जा झाकण्याचा प्रयत्न करीत ती उभी राहिली. कौरवसभेवरून तिची दृष्टी फिरत

होती. तिची घायाळ दृष्टी दीनवाणे बसलेल्या आपल्या पतींवर क्षणभर स्थिरावली. त्यांच्या दर्शनाने तिची असहायता कुठल्या कुठं गेली. तिच्या नेत्रांत संताप उसळला. पाहत तिचे शब्द उमटले,

'पितामह, तुम्ही तरी मला न्याय द्या! ज्याला द्यूतातलं काही ज्ञान नाही, अशा माझ्या पतीला अक्षविद्येत निपुण असलेल्यानं आह्वान द्यावं आणि त्याचं सर्वस्व हिरावून घ्यावं, हे योग्य आहे का?'

दुर्योधन उभा राहिला. तो गरजला,

'त्याचं उत्तर पितामहांनी द्यायचं काहीच कारण नाही. ते उत्तर माझा दास बनलेला युधिष्ठिरच देईल. दास्य आलं, तरी त्याची धर्मबुद्धी अजून जिवंत असेल.'

सारे युधिष्ठिराकडे पाहू लागले. त्याने आपली मान वर केली. तो शांतपणे म्हणाला,

'पांचाली, हे म्हणतात, ते सत्य आहे. मी द्यूतामध्ये माझ्या हातानं सर्वस्व गमावलं आहे.'

पतिवचनाने द्रौपदीचा आणखी एक आधार सुटला. निराश न होता तिने धैर्याने भीष्मांना विचारले,

'पितामह! या सभागृहात मला बळजबरीनं आणण्यापूर्वी मी जो प्रश्न केला होता, तो याचसाठी. सर्व हरल्यावर, स्वतःला पणाला लावून, जो स्वतःच दास बनला आहे, त्याला त्यानंतर पत्नीला पणाला लावण्याचा काय अधिकार? पितामह! जिथं माझे पराक्रमी पती दुबळे, निःसत्त्व बनले, त्या या अनार्य सभेत तुम्हीच माझे त्राते. या पणानं मी हरले आहे का, याचा निर्णय तुम्हीच द्या.'

ज्याने जीवनात त्याग आणि पराक्रम यांखेरीज काही जाणले नाही, पितृवचनासाठी ज्याने आपल्या आयुष्यातील साऱ्या महत्त्वाकांक्षांना बंध घातले, ज्याला जीवनात स्वार्थ कधीहा शिवला नाही, त्या भीष्माचार्यांना द्रौपदीचा प्रश्न धर्मसंकटासारखा वाटला.

सारे भीष्णाचार्यांकडे पाहत होते.

भीष्म आसनावरून उठले. मनाचे सारे आवेग संयमित करीत ते म्हणाले,

'हे सुभगे! तुझा प्रश्न मोठा गहन आहे. समर्थ पुरुष ज्याला धर्म म्हणतो, तोच खरा धर्म, असं जग मानतं. मीही त्याच धर्माला बद्ध आहे. मनात असूनही तुला अनुकूल उत्तर मला देता येत नाही, याचं मला अतीव दुःख आहे. हरल्यानंतर दुसऱ्याला पणाला लावण्याचा अधिकार उरत नाही, हे तुझं वचन सत्य आहे; पण, पांचाली, तू पांडवांची धर्मानं अर्धांगी आहेस अन् त्यामुळं जेव्हा पांडव हरले, तेव्हाच तूही हरली आहेस. दासाची भार्या ती दासीच होय. हा युधिष्ठिर स्वमुखानंच, मी पराभूत झालो, असं मानतो. तिथंच स्वतःचं दास्य त्यानं मान्य केलंय्. त्यामुळं तुझ्या प्रश्नाचं उत्तर तूच शोध. त्याचा निर्णय सांगण्यास मी असमर्थ आहे.'

घनमेघाने सूर्य झाकावा, तसा भास द्रौपदीला झाला. भीष्माच्या उत्तराने दुर्योधन-कर्ण आनंदित झाले. विदुर-विकर्णासारख्या सज्जनांनी द्रौपदीची बाजू घेतली; पण भीष्मनिर्णयामुळे ते समर्थन कौरवसभेत दुबळे ठरले. भर समुद्रात, वादळात सापडलेल्पा नौकेच्या एकुलत्या एका शिडाच्या चिंध्या व्हाव्यात आणि दैवगतीच्या लाटांवर लक्षयहीन नाव हेलकावे घ्यावी, तशी पांचालीची अवस्था झाली.

भीष्म आसनस्थ होताच दुर्योधन उठला. तो द्रौपदीला म्हणाला,

'द्रौपदी, तुला आता माझ्याखेरीज त्राता नाही. हा युधिष्ठिर तुझा स्वामी नाही, असं तू म्हण; मी तुला दास्यातून मोकळं करतो. या युधिष्ठिराचं द्यूतकर्म खोटं म्हण; मी तुला संकटातून जरूर वाचवीन.'

द्रौपदीला ते म्हणण्याचे बळ नव्हते. द्रौपदीची मान खाली गेली.

दुर्योधनाचे विजयी हास्य सभागृहात घुमले. प्रथमपासून विदुराबरोबर द्रौपदीची कड घेणाऱ्या विकर्णाला भावी संकटाची जाणीव झाली. निश्चयपूर्वक तो उठला.

'हे नरेंद्रहो! धर्म, वाकवावा, तसा वाकतो. राजसभेत स्त्रीला आणणं हाच मुळी अधर्म, कपटानं जिंकलेल्या द्यूतात साध्वीचा छळ व्हावा, यासारखं घोर पातक नाही. ही पांचाली द्रुपदकन्या आहे. द्रौपदी जिंकली गेली नाही, असं माझं निश्चित मत आहे.'

विकर्णाचे बोलणे संपताच कर्ण उठला. आपले सुंदर बाहू उभारून तो म्हणाला,

'विकर्णा! धर्म, नीती यांचा निर्णय करण्याइतका अजून तू मोठा झाला नाहीस. बलाच्या आधारावरच राजनीती आपला निर्णय देते, ते तुला माहीत नाही. ही द्रौपदी तुला पतिव्रता वाटावी, यासारखं अज्ञान कोणतं? अरे, देवानं स्त्रिचा एकच पती नियत केला असता, अनेक पुरुषांना भोग देते, ती पतिव्रता कसली? ही दुराचरणी एकवस्त्रा अथवा विवस्त्रा असली, तरी बिघडतं कुठं? विकर्णा, ही द्यूतसभा आहे, धर्मसभा नव्हे.' द्रौपदीकडे पाहत कर्ण म्हणाला, 'हे याज्ञसेनी, तू आमची दासी झाली आहेस. धर्माचा आधार शोधण्यापेक्षा ज्याची दासी बनली आहेस, त्या दुर्योधन महाराजांच्या अंत:पुरात जा आणि आपल्या सेवेनं आपल्या स्वामींना प्रसन्न करून घे. त्यातच तुझं हित आहे. तोच तुझा धर्म आहे.'

'माझा धर्म?' युधिष्ठिराकडे पाहत द्रौपदी म्हणाली, 'माझ्या धर्माला जागा राहिली नाही.'

'द्रौपदी, तुझी जागा इथं आहे, बघ!' म्हणत दुर्योधनाने कर्दळीच्या स्तंभाप्रमाणे सर्व लक्षणयुक्त, वज्रासारखी दृढ असलेली आपली मांडी उघडी करून द्रौपदीला दाखवली.

सारी भूमी सूर्यदाहात होरपळत असता आसमंत भेदून मेघनाद उमटावा, तसा भीम गर्जला,

'नरेंद्रहो! माझी प्रतिज्ञा ऐकून ठेवा. ज्या दु:शासनानं द्रौपदीच्या केसांना स्पर्श केला, त्याचं वक्षस्थळ नखाग्रांनी फोडून मी त्यांच रक्त प्राशन करीन अन् उन्मत्तपणं भरसभेत उघडी मांडी दाखवणाऱ्या दुर्योधनाची मांडी मी माझ्या गदेनं छिन्नविछिन्न करून टाकीन, तव्हाच माझी प्रतिज्ञा पुरी होईल.'

भीमाच्या त्या घोर प्रतिज्ञेनं साऱ्या सभेचा थरकाप उडाला.

दुर्योधनाच्या अपमानाने कर्णाचा संताप उसळला; पण त्याला थोपवीत दुर्योधनाचे शब्द उमटले,

'प्रतिज्ञा! माझ्या सभेत माझे दास माझ्या पराजयाची प्रतिज्ञा करतात? अद्यापि या दासांच्या शरीरांवर राजभूषणं, राजवस्त्रं आहेत ना! त्याचमुळं त्यांना आपल्या अवस्थेची पुरी जाणीव झालेली दिसत नाही. हे वृकोदरा, तू माझा दास आहेस. हे दासा, स्वामींच्या उघडचा मांडीचं दर्शन दासीला घडलं, तर तो तिनं सन्मान समजावा; पण दासानं तिकडं दृष्टीही वळवू नये. तो प्रमाद घडला, तर काय होते, हे आताच तुला कळेल.' दुर्योधनाचा आवाज चढला. पांडवांकडे बोटे दाखवीत तो ओरडला, 'सेवकांनो,

पाहता काय; त्या उन्मत्त दासांची भूषणं, वस्त्रं काढून घ्या!'

त्या आज्ञेने सारी सभा जागच्या जागी थिजून गेली. दास पुढे सरसावलेले पाहताच युधिष्ठिराने आपली राजभूषणे उतरवली. वस्त्रे सोडून ठेवली, इतर पांडवांनी त्याचे अनुकरण केले. पतींची ती केविलवाणी अवस्था पाहून द्रौपदीने डोळ्यांवर हात घेतले.

द्रौपदीच्या त्या कृतीने कर्णाचे लक्ष तिच्यावर खिळले. त्याने दु:शासनाला आज्ञा केली,

'दु:शासना! हे दास जसे विवस्त्र झाले, तसेच या पांचालीला विवस्त्र कर! राजहंसी कशी असते, ते आज या सूतपुत्राला पाहायचंय्. सामान्य स्त्रीपेक्षा राजस्त्री केवढी वेगळी असते, हे जाणून घ्यायला मी उत्सुक आहे. पाहतोस काय? त्या एकवस्त्रेला विवस्त्र कर!'

आधीच चेतनाशून्य बनलेले भीष्म, विदुर त्या शब्दांनी दचकून भानावर आले. भयचकित द्रौपदीचे डोळे विस्फारले गेले. दु:शासनाने पुढे टाकलेले पाऊल पाहताच भयव्याकूळ झालेली द्रौपदी मागे सरकू लागली.

दु:शासन पुढे जात असतानाच संतापाने थरथरणारे भीष्म उभे राहिले,

'थांब, दू:शासना, पुढं पाऊल टाकू नकोस.'

साऱ्या सभेत नि:स्तब्ध शांतता पसरली. भीष्माचार्यांची तेजपुंज मूर्ती पांढरी फटफटीत पडली होती. अतिदाहात लोह शुभ्र बनावे, तशी. अग्निस्फुलिंग वर्षावेत, तसे त्यांचे शब्द कौरवसभेवर पडू लागले,

'अरे, धिक्कार असो या सभेचा! इथल्या सज्जन, पराक्रमी म्हणवून घेणाऱ्या नरेंद्रांचा! या राजसभेत पौरुष सरलं का? ही राजसभा आहे, की साक्षात अधर्मसभा? राजनीतीचा भाग म्हणून आतापर्यंत मी हा सारा प्रकार पाहत आलो आहे; पण तुमच्या अधोगतीला सीमा दिसत नाहीत. सूतकुलात जन्मलेल्या, हीन वृत्ती धरणाऱ्या पुरुषाला मी दोष देत नाही; पण त्याच्या सल्ल्यानं अघोरी कृत्याला उद्दीप्त झालेल्यांचा विवेक गेला कुठं? ही या सभेची अमर्यादा आहे. जोवर हा भीष्म इथं उभा आहे, तोवर अबलेला विवस्त्र करण्याचं धाडस कुणीही करू नये. दु:शासना, मागं फीर ही माझी आज्ञा आहे.'

दु:शासन तसाच उभा राहिला. त्याने दुर्योधनाकडे आशेने पाहिले.

दुर्योधनाने स्वत:ला सावरले. आपला संताप आवरीत त्याने विचारले,

'पितामह, ही आज्ञा कशाच्या बळावर देता आहात?'

'काय विचारतोस?' भीष्म चकित होऊन म्हणाले.

'ही आज्ञा कशाच्या बळावर देता?' दुर्योधनाने शांतपणे पुन्हा विचारले.

'माझ्या बळाबद्दल तू विचारतोस?' भीष्माचा संताप सुटला, 'कुठून आलं हे बळ? मूर्खा, ज्या नावानं तू मला संबोधतोस, तेच माझं बळ आहे. मी भीष्म पितामह आहे. या राज्याचा खरा वारस. माझ्या त्यागामुळं तुम्ही हे राज्य भोगता आहात. तू मला आह्वान करतोस? दुर्योधना, दुष्ट संगतीनं तू अधोगतीच्या परिसीमेवर उभा आहेस. त्यापेक्षा जास्त ढासळू नकोस.'

आपल्या प्रहाराने तेजोभंग होईल, या कल्पनेने पाहणाऱ्या भीष्माचार्यांना दुर्योधनाच्या चेहऱ्यावर उमटलेले हास्य पाहून अचंबा वाटला. आपला आवाज स्थिर राखण्याचा प्रयत्न करीत दुर्योधन म्हणाला,

'पितामह! आपल्या दातृत्वाचा उल्लेख करून तुम्हाच स्वत:ची पायरी उतरला

आहात. क्रोधाच्या आहारी जाऊन आणखी ढासळू नका, हे सांगण्याची पाळी माझ्यावर यावी, हे मी माझं दुर्दैव समजतो.'

दुर्योधनाच्या प्रत्याघाताने भीष्म सुन्न झाले. हिमशिखरावर तप्त किरण पडावेत आणि हिमखंड घसरू लागावेत, तशी त्या कुरुश्रेष्ठाची अवस्था झाली. सारा आवेश ढासळला. तेज सरले. सर्वांगाला कंप सुटला. दुर्योधनाने मर्माघात केला होता.

'युवराज, कटू असलं, तरी सत्य सांगितलंत! वेळीच सावध केलंत. या भीष्माच्या दैवी आता पायऱ्या उतरण्याखेरीज काहीही राहिलं नाही.'

भीष्माचार्यांनी आपल्या खडावा चढवल्या आणि राजसभेच्या पायऱ्या उतरून ते जाऊ लागले. त्यांना अडवण्याचे बळ विदुरांना राहिल नव्हते. स्फटिकभूमीवरून खडावांचा आवाज उठत होता. त्या जाणाऱ्या आवाजाबरोबर द्रौपदीचा उरलासुरला आधार निघून गेला.

दुर्योधनाच्या मनावरचे दडपण नाहीस झाले. त्याने दुःशासनाला संकेत केला.

सारी सभा स्तब्ध होती. दुःशासन आत्मविश्वासाने पुढे झाला आणि त्याने द्रौपदीच्या पदराला हाती घेतले. बसल्या जागी कर्णाच्या अंगाला कंप सुटला. घशाला कोरड पडली. जे घडावे, असे वाटत होते, ते पाहण्याचे धाडस कर्णाला राहिले नाही.

कर्णाचे नेत्र नकळत मिटले गेले...

# २२

द्रौपदीच्या वस्त्राला दु:शासनाने हात घातला आणि सभागृहात विचित्र शांतता पसरली. श्वास अवरोधले गेले; पण ती भयाण शांतता तशीच टिकून राहिली. नग्नतेच्या भीतीन आपल्या तटपुंज्या वस्त्राला आणि कंचुकीला कवटाळून उभ्या असलेल्या द्रौपदीला ती शांतता जाणवली. नव्या संकटाच्या भीतीने तिने डोळे उघडले. तिची दृष्टी समोर गेली. साऱ्या सभेत डोळे महाद्वाराकडे लागले होत. दु:शासनाचा पदरावरचा हात ढळला होता. जिकडे सारे पाहत होते, तिकडे द्रौपदीचे लक्ष वळले.

सभागृहाच्या दारात कृष्ण उभा होता.

द्रौपदीचा डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. तिची दृष्टी कृष्णावर खिळली होती.

कृष्ण धीमी पावले टाकीत सभागृहात येत होता.

रेशमी पीतांबर, अंगावर रेशमी उत्तरीय, मस्तकी धारण केलेला सुवर्णकिरीट, कृष्णाचे रूप तेच होते. तेच मानेवर रुळणारे केस. तेच विशाल नेत्र. त्या सावळ्या रुपात उणीव होती, ती फक्त ओठांवर सदैव विलसणाऱ्या स्मिताची. डोळ्यांत विलक्षण शांत भाव प्रगटला होता, लाटाहीन समुद्र दिसावा, तसा.

कृष्णाला पाहताच द्रौपदीच्या मनाचे सारे बांध फुटले. पुढे येणाऱ्या कृष्णाकडे ती धावली आणि पाहता-पाहता कृष्णाच्या मिठीत ती बद्ध झाली. पाठीवरून फिरणारे कृष्णाचे हात तिला अभय देत होते.

त्या हातांच्या विश्वासाने द्रौपदी सावरली गेली. अश्रू पुसून ती कृष्णाला म्हणाली,

'कृष्णा, कशाला आलास इथं? साक्षात पुरुषार्थ असा लौकिक असणारे माझे पती भीम, अर्जुन, त्यांची अवस्था बघ. धर्मबुद्धी युधिष्ठिराची ही द्यूतलंपटता बघ. द्यूतामध्ये माझ्या पतींनी ऐश्वर्य, राज्य आणि स्वत:ला हरवलं, याचं मला दु:ख नाही; पण स्वत:च्या पत्नीला पणाला लावून आपला पुरुषार्थ गमावला, याचं मला मरणप्राय दु:ख आहे... अन् ज्यांच्याकडून अभय अपेक्षावं, तेच माझं वस्त्रहरण पाहायला उत्सुक झाले आहेत. यांतल्या एकाही धर्मज्ञाला माझ्या स्त्रीत्वाची जाणीव झाली नाही. ना एकाही वीराला माझ्या अनुकंपनीय स्थितीची लाज वाटली. हे सर्व घडत असता एकच समाधान वाटत होतं, निदान तू तरी ही विटंबना पाहायला इथं नाहीस. हेच ते समाधान होतं; पण तेवढंसुद्धा माझ्या नशिबी लिहिलं नाही का, रे? कशाला आलास इथं? ही विटंबना पाहायला?'

'शांत हो, द्रौपदी!'कृष्णाने तिचे अश्रू पुसले, 'विटंबना पाहण्यासाठी मी इथं आलो नाही. या द्यूताची मला कल्पना नव्हती. मी आवर्त देशातून दूर गेलो होतो. स्वदेशी मी असतो, तर वेळीच येऊन हा द्यूत घडू दिला नसता. हे कृष्णे, तू भयग्रस्त होऊ नकोस. वस्त्रहरण इतकं सोपं नाही. प्रत्येक मानवी जीवन विधात्याच्या अनेक सुंदर वस्त्रांनी विभूषित झालेलं असतं. या मानवी जीवनाची लज्जा अनेक सुक्ष्म वस्त्रांनी वेढलेली आहे. ती वस्त्रं महावस्त्रं असतात. माता-पिता, बंधु-भगिनी, पति-पुत्र, गुरु-मित्र,

अशा अनेकांच्या स्नेहांनी विणलेली ती वस्त्रं- त्यांनीच जीवनाची खरी लज्जा झाकली जाते. तुझे वीरबाहू पती तुझं रक्षण करण्यास असमर्थ ठरले असतील. या सभेतल्या महायोग्यांचं बळ अपुरं पडलं असेल; पण त्यामुळं भयव्याकूळ होऊ नकोस. मी आलोय् ना! निदान माझ्यावर तरी विश्वास ठेव.'

कृष्णाच्या त्या बोलण्याने द्रौपदीचे मन शांत होण्याऐवजी अधिकच भडकले. ती नकारार्थी मान हलवीत म्हणाली,

'कृष्णा, फार उशीर झाला. जे घडू नये, ते केव्हाच घडून गेलंय्. मी एकवस्त्रा, पण पुरुष म्हणवून घेणाऱ्यांनी ती अवस्था जाणली नाही. प्रत्यक्ष पतींनीच मी अशा अवस्थेत राजसभेत यावं, असा आग्रह धरला. त्या दु:शासनानं अंत:पुरात प्रवेश करून माझ्या केसांना धरून फरफटत आणलं. कृष्णा, मी यज्ञसेन द्रुपदकन्या. मला या सभेत ओढून आणलं जातं अन् त्याची लाज कुणालाही वाटत नाही!' आपले मृदू, नीलवर्णीय कुरळे केस डाव्या हातात धरून ते कृष्णासमोर दाखवीत द्रौपदी म्हणाली, 'मधुसूदना, या केसांची लाज तू बाळग. दु:शासनानं ओढलेला हा केशपाश कधीही विसरू नकोस. कृष्णा, या सभेत काय घडलं नाही? या सभेत नेत्रसंकेत झाले. उघडी मांडी दाखवली गेली. अपशब्द ऐकले. एवढंच नव्हे, तर माझ्या पदरालाही हात घालण्याचं धाडस झालं. यापेक्षा आणखी कोणती विटंबना शिल्लक राहिली? स्वाभिमानानं जगता येण्यासारखं या तुझ्या अभागी भगिनीजवळ काहीही शिल्लक राहिलं नाही.'

द्रौपदीच्या करून बोलांनी कृष्णाच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. आपला थरथरता हात त्यानं द्रौपदीच्या केसांवरून फिरवला. कृष्णाच्या कंठ दाटून आला. आपले आरक्त नेत्र उंचावत तो म्हणाला,

'कृष्णे, पृथ्वीतलावर जे जे घडतं, ते फक्त ईश्वराच्या इच्छेनं, आज्ञेनं. दुष्टांचा विनाशकाल यायचा झाला, तरी पापांच्या राशी उभारण्याला संधी मिळावी लागते. तू या सुटल्या केसांसाठी कष्टी होऊ नकोस. तुझ्या पदराला स्पर्श झाला, म्हणून खंत बाळगू नकोस. अपशब्द ऐकून घ्यावे लागले, म्हणून दु:खी होऊ नकोस. या सभेतील ज्यांनी ज्यांनी हा प्रकार केला, पाहिला, सोसला, त्या सर्वांचा रणांगणावर विदारक मृत्यू पाहूनच मी देह ठेवीन. साऱ्या कौरवस्त्रिया अशाच आपल्या सुटल्या केसांनी आणि मोकळ्या कपाळांनी शोक करीत जाताना तुला दिसतील. ते घडेपर्यंत माझ्या मनाला शांती लाभणार नाही. त्यासाठीच या सभेला साक्ष ठेवून मी प्रतिज्ञाबद्ध होत आहे.'

दु:शासन आवेशाने पुढे झाला.

'कृष्णा, आमंत्रण नसता येणं हाच मुळात असभ्यपणा अन् त्यात असल्या प्रतिज्ञा...'

कृष्णाची जळजळीत दृष्टी वळताच दु:शासनाचे शब्द गळ्यातच राहिले. तिरस्कारयुक्त आवाजात कृष्णाचे मोजकेच शब्द प्रगटले,

'सामर्थ्यशाली पुरुषाला दुर्बलांच्या सभेत प्रवेश करण्यास आमंत्रणाची आवश्यकता नसते.'

कृष्णाने आपले उत्तरीय सावरले आणि तो सभेकडे वळला.

सारी सभा कृष्णाच्या आकस्मिक आगमनाने व त्याच्या बोलण्याने कासावीस झाली होती.

द्रौपदीला सोडून कृष्णाची पावले अर्धचंद्राकृती सभेच्या दिशेने येत होती. सभा

निरखीत तो चालत होता. स्तब्ध बनलेल्या सभेत त्याच्या पावलांचा तेवढा आवाज ऐकू येत होता. कृष्णाच्या आवाजानेच त्या शांततेचा भंग केला-

'कौरवश्रेष्ठहो! या सभेत आमंत्रण नसता माझ्या आगंतुक येण्यानं तुम्ही विचलित होऊ नका. तुम्ही केलेला यज्ञ अन् ज्यापुढं पांडवांची मयसभा निष्प्रभ ठरावी, असं हे ऐश्वर्यसंपन्न द्यूतगृह- तोरणस्फटिका पाहण्यासाठीच मी इथं आलोय्. या तुमच्या सुवर्णासनांनी युक्त असलेल्या रत्नजडित तोरणस्फटिकेत उभा असता साक्षात गंधर्वनगरीचा भास मला होतोय्. तुमच्या आनंदात भाग घेण्यासाठीच मी इथवर धावत आलोय्.'

कृष्ण सभास्थानाच्या समोर आला होता. साऱ्या सभेवरून दृष्टी फिरवून तो म्हणाला,

'सज्जनहो! ही सभा अलौकिक आहे. नेत्रांनी अंध असूनही, ज्याच्या ज्ञानचक्षूंनी कधीही विश्रांती घेतली नाही, असे कुरुश्रेष्ठ सम्राट धृतराष्ट्रमहाराज या सभेत सिंहासनस्थ झाले आहेत. आपल्या त्यागानं पतिनिष्ठेचा परमोच्च आदर्श निर्माण करणाऱ्या माता गांधारीचे सुपुत्र ही सभा भूषवीत आहेत. ही सभा द्रोणाचार्य, कृपाचार्यांसारख्या ज्ञानयोग्यांनी सिद्ध आहे. आपल्या प्रतिज्ञेसाठी आणि दिल्या वचनासाठी या कुरुराज्यावरील आपला हक्क सोडणाऱ्या पितामह भीष्मचार्यांचं मोकळं आसन त्यांच्या त्यागाचंच प्रतीक बनलं आहे. कृतहस्त, अतिदेवी असा लौकिक असणारे द्यूतनिपुण शकुनि या तोरणस्फटिकेचे साक्षात तोरण बनले आहेत. प्रतिकर्मा, दु:शासनासारखे कर्तव्यकठोर आज्ञापालक कार्यसिद्धीस सामर्थ्य देत आहेत. ज्यांच्या पराक्रमाची तुलना साक्षात सूर्याशी करावी, अशा वीर दुर्योधनाची ही सभा आहे. देवांचाही अभिमान कमी ठरावा, अशा आपल्या दातृत्वानं त्रिखंडात कीर्ती संपादन करणाऱ्या महारथी कर्णासारख्या अनेक क्षात्रांच्या तेजानं ही सभा प्रकाशमान झालीय्. या सभेत विदुरांच्या उपस्थितीनं साक्षात विवेक प्रगटला आहे. पंचनद्यांच्या उदकानंसुद्धा जे पुण्य लाभत नाही, ते या सभेच्या दर्शनानं लाभावं, अशी ही भयहारिणी, पुण्यमय सभा आहे. या सभेच्या दर्शनानं मी धन्य झालो.

'पांडवांनी इंद्रप्रस्थाला राजसूय यज्ञ केला. त्यांनी आपल्या पराक्रमानं केलेल्या दिग्विजयाची ती सांगता होती. त्या महायज्ञात वीर दुर्योधन, महारथी कर्ण, शकुनि महाराज यांच्यासारखे अनेक कौरववीर उपस्थित होते. तो महायज्ञ, त्याप्रीत्यर्थ घडलेली महादानं, मनोरंजनासाठी उभारलेली मयसभा पाहून सारे तृप्त झाले; पण तुम्ही मात्र अतृप्तच राहिलात. हे लक्षण तुमच्या वाढत्या पराक्रमाचं, तुमच्या भावी उत्कर्षाचंच होय. तृप्त आत्मे कधीही दिग्विजयी बनत नसतात.'

न राहवून दु:शासन बोलला,

'स्तुत्य! एकदम स्तुत्य बोललात.'

पण सभेतून कुणी त्याला दुजोरा दिला नाही. आपले काही तरी चुकले, याची जाणीव त्याला झाली. कृष्णाने त्याच्याकडे पाहिलेही नाही. तो बोलत होता :

'पांडवांनी राजसूय करून स्वत:ला अभिषेक करून घेतले असतील; पण तुम्ही जन्मजात सम्राटपद भोगता आहात. सम्राट धृतराष्ट्र महाराजांना ते सिद्ध करण्यासाठी नव्या यज्ञाची गरज नव्हती. तुमचं ऐश्वर्य, सत्ता जाहीर असता ही नेत्रदीपक सभा उभारण्याचं काहीच प्रयोजन नव्हतं.

'तुम्ही यज्ञ केलात, ते योग्यच झालं. पुण्यसंचय वाढतो. त्यासाठी यज्ञ केलात ना? तुम्ही सम्राट आहा, सत्ताधीश आहा, हे परत सांगण्यासाठीच यज्ञ केलात ना? यज्ञात पडलेल्या आहुतींनी आणि उठणाऱ्या मंत्रोच्चारानं ही पृथ्वी पावन व्हावी, म्हणूनच हा यज्ञ केलात ना? मग त्या यज्ञाची होमकुंडं तृप्ततेनं शांत होण्याआधीच या अबलेला भरसभेत विवस्त्र करण्याचं धार्ष्ट्य आलं कुठून? ही भूमी आपल्याच हातांनी विटाळण्याचा सर्वनाशी मोह तुम्हांला का झाला?'

दुर्योधनाची खाली गेलेली मान उंचावली. डोळे कृष्णाला भिडले; पण क्षणभरच. तो दाह त्याला सहन करता आला नाही. तुच्छतेनं दुर्योधनाकडे पाहत कृष्ण म्हणाला,

'प्रजापालन हा सम्राटपदाचा प्रथम गुण. सम्राटांना प्रजा ही मुलासारखी. तुमच्या मनात पांडवांबद्दल वैरभाव असेल; पण ज्या क्षणी ते द्यूतात हरले, दास बनले, तेव्हा ते तुमचे प्रजानन झाले नाहीत का? ही द्रौपदी दासीच नव्हे, प्रजानन आहे, हे तुमच्या कुणाच्याच कसं ध्यानी आलं नाही? जे सम्राट प्रजेला नग्न करू इच्छितात, ते सम्राट कसले?'

कृष्णाचा आवाज परत संथ बनला. गृहावरची नजर न काढता त्याची पावले त्या अर्धचंद्राकृती राजसभेतून फिरत होती; पण शब्दांची धार क्षणाक्षणाला वाढत होती,

'वीरहो! मी असं ऐकलंय् की, पुण्यसंचयासाठी यज्ञ योजला जातो, तेव्हा यज्ञाचा नाश करण्यासाठी दुष्ट राक्षस आकाशातून अवतरतात. त्या यज्ञभूमीचा नाश करतात; पण आज ते खोटं असावं, असं वाटतं. यज्ञामध्ये मंत्रोच्चाराबरोबर जी तुपाची धार धरली जाते, यज्ञकुंडात जी सुगंधी काष्ठं प्रज्वलित होतात, त्या समिधा अग्निरूप घेत असतात. धुराचे लोट उठतात. त्यातूनच अहंकाराचे राक्षस उद्भवतात. वासनेची आसक्ती, ऐश्वर्याचा मद अन् सत्तेचा अहंकार यांनीच तुमच्या ज्ञानयज्ञाचा नाश झाला आहे, हे सत्य इथं बसलेल्या द्रोणाचार्यांनी, कृपाचार्यांनी तुम्हांला सांगायला हवं होतं, पण ज्यांच्या विवेकावर दास्याची पुटं चढली आहेत, त्यांची जिव्हा हा मंत्र सांगावयास धजेल कशी?

'यज्ञ करण्याआधी यज्ञाचं प्रयोजन तरी ध्यानी घ्यायचं होतंत! दिग्विजयासाठी बाहेर पडलेल्या वीरांच्या मनांत सदैव असूया भडकत असते. नवी भूमी पादाक्रांत करण्याची स्वामित्वाची भावना बळावत असते. अंकित बनलेल्या नरेंद्राच्या दर्शनानं अहंकार उफाळतो. रणवाद्यांच्या आवाजानं कान भारलेले असतात. शत्रुरुधिरानं न्हालेली भूमी पाहून यशाची ग्लानी चढलेली असते. असा दिग्विजय करून परतल्यानंतर मुद्दाम यज्ञ केले जातात.

'ऐश्वर्याचा अहंकार राहू नये, म्हणून याचकांना विपुल दानं दिली जातात. कीर्तनांच्या रूपानं सुविचारांची पखरण केली जाते. यज्ञभूमीच्या प्रसन्न वातावरणात ज्याच्या आशीर्वादानं यश लाभलं, त्या परमेश्वराचं स्मरण केलं जातं, त्यामुळं स्वामित्वाची भावना लुप्त होते. योजलेल्या अधिकारी व्यक्तींनी केलेले वाद एकाग्र मनात सेविले जातात. त्यायोगानं अज्ञानाची जळमटं नाहीशी होतात. यज्ञांसाठी पाचारण केलेल्या तापसांच्या दर्शनानं जीवन शुद्ध होतं. यज्ञाच्या, तपश्चर्येच्या उत्तुंग शिखरांच्या दर्शनानं अहंकार जाऊन, त्या जागी सात्त्विक भाव जागृत होतो. यज्ञाच्या निमित्तानं एकत्रित केलेल्या आप्त-स्वकीय, इष्टमित्र जनसमूहातून सख्यभावना निर्माण होऊन आत्मनिवेदनानं जीवन उजळून जातं, तेव्हाच यज्ञाची खरी सांगता होते.

'यज्ञ करणाऱ्यांच्या ठायी सत्त्वगुणांचा अधिकार असावा लागतो. न्याय, नीती, दातृत्व, विवेक अन् धर्म यांनी संपन्न असलेल्या पुरुषांनीच यज्ञ करण्याचा पराक्रम करावा. तुम्ही तर काम, क्रोध, मद, मत्सर, लोभ, यांनी लिप्त असलेले! तुम्हांला दया, क्षमा, शांती आठवेल कशाला! या दुर्गुणांनी तुम्ही अंध बनलात अन् म्हणूनच एका रजस्वलेला राजसभेत आणून जीवन विटाळलंत. राजसूय यज्ञात ज्या युधिष्ठिरावर भूलोकीच्या नरेंद्रांनी छत्रचामरं ढाळलेली पाहिलीत, तोच हा युधिष्ठिर, हस्तलाघवाच्या नीच करामतीनं द्यूतामध्ये हरल्यावर साक्षात धर्म म्हणवून घेणाऱ्याच्या अंगावरची वस्त्रं हिरावून घेण्याइतके तुम्ही क्षुद्र बनलात! तुम्हांला सम्राट कोण म्हणेल! या माणुसकीला काळिमा लावणाऱ्या कृतीनंच तुम्ही राज्याधिकारास योग्य नाही, हे सिद्ध केलंय्.

'पांडवांनी मनोरंजनासाठी उभारलेली मयसभा करमणुकीसाठी होती. यज्ञाचा शीण घालवण्यासाठी ती उभारली होती. ती मयसभा खरोखरीच अलौकिक होती. ज्यांवर मानवाचा संपूर्ण विश्वास, ते कान, नाक व डोळे किती फसवे आहेत, हे ती मयसभा दाखवून देत होती; पण ही तोरणस्फटिका म्हणजे विश्वासघाताचं मूर्तिमंत प्रतीक. या द्यूतगृहाला नरकातसुद्धा जागा नाही. एका रजस्वलेच्या दर्शनानं रक्तलांछित झालेली ती तोरणस्फटिका कसली, ती तर साक्षात रौरववर्तिका! आपल्या क्षुद्र, हीन, दुर्बल मनोवृत्तीचं तोरण आपल्याच हातानं त्या यज्ञवेदीवर चढवताना लाज कशी वाटली नाही?'

दुर्योधनाने संतापाने कृष्णाकडे पाहिले. त्या दृष्टीला दृष्टी भिडवत कृष्ण म्हणाला,

'माझ्या बोलण्याचा संताप येतो?' बसलेल्या पांडवांकडे बोट दाखवीत तो म्हणाला, 'धर्मबुद्धी युधिष्ठिर, पुरुषोत्तम पार्थ, शक्तिशाली भीम आपल्या पराक्रमाला आवर घालून, येईल तो अपमान सोशीत या सभेत बसले आहेत, ते तुमच्या विजयाचं फळ नाही. त्यांनी राजसूय यज्ञानं मिळवलेल्या विवेकाचं ते लक्षण आहे. ते पाळीत असलेल्या विवेकानं, तुम्ही देत असलेल्या आह्वानांचा स्वीकार ते करीत आहेत, हे मूढांनो, तुमच्या ध्यानी कसं येत नाही? पांडवांच्या असूयेतून उद्‌भवलेला तुमचा यज्ञ आणि कुटिल हेतूनं आयोजित केलेली ही सभा, यांतून पुण्यप्रभाव उगवणार कसा?'

कृष्णाने दोन पावले टाकली अन् शकुनीने विजयाने उधळलेल्या पटावरचा एक फासा कृष्णाच्या पायाखाली आला. कृष्णाने क्षणभर त्या फाशाकडे पाहिले. पायाशी ओंगळवाणा किडा यावा आणि तो लाथेने उडवावा, तसा तो फासा कृष्णाने ठोकरला.

'जुगार! क्षत्रियत्वाच्या वृत्तीला आह्वान देण्यासाठीच तुम्ही युधिष्ठिराला द्यूताचं आमंत्रण दिलंत ना? अन् त्यानं हे आह्वान स्वीकारलं, तेही त्याच अहंकारापोटी. द्यूताचं आह्वान क्षत्रिय कधीही नाकारीत नाही, हे खरं! जुगार हा तर क्षत्रियत्वाचा प्रमुख गुण; पण तो जुगार म्हणजे पटावर मंतरलेल्या फाशांचं दान नव्हे. क्षत्रियत्वाचे जुगाराचे फासे आकाशीच्या सूर्य-चंद्रांचे बनलेले असतात. पृथ्वीसकट साऱ्या ग्रहांना फेरे देण्याची शक्ती त्यांच्यामध्ये सामावलेली असते.

'वीर नरेंद्रांनी व्यापलेल्या स्वयंवर-मंडपातून राजकन्येचं हरण करण्यात तो जुगार व्यक्त होतो. दान जिंकलं, तर राजकन्या घरी येते. फासे उलटे पडले, तर राजकन्या झुरून मरते, असा लौकिक जुगार, तो क्षत्रियानं खेळावा, रणांगणाच्या पटावर सामोऱ्या येणाऱ्या बलवत्तर शत्रूवर हातातल्या आयुधांचंही भान न बाळगता जन्म-मृत्यूच्या

कवड्यांची दानं टाकीत जाण्यात क्षत्रियांचा द्यूत रंगतो. जिंकलं, तर पृथ्वीचं राज्य भोगता येतं, फासे उलटे पडले, तर स्वर्गीचे देव हाताचा पाळणा करून न्यायला येतात. असा हा जुगार क्षत्रियांनी खेळावा. हा कसला द्यूत अन् कसली राजसभा!!

'अरे, ती राजसभा, की जिथं विवस्त्र गेला, तरी सवस्त्र होऊन बाहेर येईल. ती राजसभा, की जिथं पतितेलाही पावनतेचा स्पर्श व्हावा. जिथं अबला सबला बनाव्यात, अशी जी ती राजसभा. ही राजसभा कसली? जिथं न्याय अंधळा आहे, साहस दुबळ्यावर मात करू पाहतं, पराक्रम असह्य बनतो, धर्माला ग्लानी येते, ती का राजसभा? जिथं व्यभिचार घडतो, तिथं पुण्य कसं अवतरेल?

'आह्वान देऊन तुम्ही पांडवांना रणांगणात जिंकलं असतंत, तर ते तुमच्या पराक्रमाला शोभलं असतं; पण तुम्ही मांडलात द्यूत- जो कपटनीतीनं भरलाय्. शकुनि, म्हणे, कृतहस्त, अतिदेवी आहेत. त्याचमुळं हवे ते फासे टाकून या पांडवांना जिंकलंत अन् या द्रौपदीला अशा अवस्थेत भर राजसभेत आणून माणुसकीची मर्यादा ओलांडलीत. त्या शकुनीच्या क्षुद्र करामतीनं मिळवलेला विजय- त्याला तुम्ही विजय मानता! त्यात तुम्ही आनंद मानता! हा आनंद निश्चित क्षत्रियाचा नव्हे.

'एका दुबळ्या, रजस्वलेला, एकवस्त्रेला तुम्ही अभय दिलं असतंत, तर तुमच्या चारित्र्याला एक तेजस्वी भूषण चढलं असतं; पण तुम्ही एकवस्त्रेला विवस्त्र करण्याची हीन इच्छा धरलीत. नाही, तुम्ही सम्राट नाही... राजेपणाची तुमची योग्यता नाही. एवढंच नव्हे, पण सामान्य मानव म्हणूनी जगण्याची तुमची योग्यता नाही, एवढंच तुम्ही तुमच्या द्यूतानं अन् राजसभेनं सिद्ध केलंत. हे पातक तुम्ही कसं धुऊन काढणार आहात, हे परमेश्वरसुद्धा सांगू शकणार नाही.'

कृष्णानं उसंत घेतली. आपले बोट उंचावत तो म्हणाला,

'स्वत:ची स्तुती करून घेणं हा माझा स्वभाव नाही; पण या अंधसभेत माझी ओळख करून देणं मला प्राप्त आहे. सम्राट म्हणवून घेणाऱ्या अन्यायी कंसाचं कंदन ज्यानं केलं, तोच मी कृष्ण! बलाढ्य जरासंधाचा मीच वध करवला. राजसूय यज्ञात उन्मत्त शिशुपालाचा तुम्हां सर्वांदेखत मीच शिरच्छेद केला. मी माझं सामर्थ्य व्यक्त करायचं ठरवलं, तर त्यासाठी दु:शासनासारख्या विवेकशून्याचं अथवा चतुरंग सैन्याचं बळ मला घ्यावं लागणार नाही. आज या राजसभेत द्रौपदी उभी आहे. ती माझी भगिनी आहे. तिचं रक्षण करण्यासाठी मी इथं उभा आहे, हे कृपा करून दृष्टीआड करू नका. ते धाडस तुम्ही केलंत, तर यानंतर जे घडेल, त्याचा दोष तुम्ही मला देऊ नका.

'हे अंधपुत्र कौरवांनो! तुमच्या सभेत येऊन मी माझी काया अन् वाचा भ्रष्टविली आहे, असा मला भास होतो. तुमच्या अवनतीची परिसीमा कुठवर जाते, हे पाहण्यासाठी मी उत्सुक आहे. सभा तुमच्या पुण्यप्रद कार्यासाठी मोकळी आहे. बंधुबळ लाभलेली, निर्भय बनलेला माझी भगिनी तुमच्या निर्णयाची वाट पाहत आहे.'

कृष्ण थाबला.

शांतता पसरली.

कृष्णाला आसन देण्याचेही कुणाला भान राहिले नाही.

शांततेचा भंग केला विदुराने. आपल्या आसनावरून तो उठला. पश्चात्तापाच्या अश्रूंनी ज्याचे गाल भिजल आहेत, अशा त्या विदुराने कृष्णाला आपले आसन दिले.

काही न बोलता कृष्णाने त्या आसनाचा स्वीकार केला.

## २३

कृष्णाच्या ओजस्वी भाषणाने सारे सभागृह भारावून गेले. दुर्योधन, कर्ण यांच्या अंगी कृष्णाकडे मान वर करून पाहण्याचेही त्राण राहिले नाही. धृतराष्ट्राची अवस्था तर अत्यंत शोचनीय बनली. भरसभेत कृष्णाने केलेला कौरवांचा उपहास, तेजोभंग यांतून कसे सुटावे, हे त्याला कळत नव्हते. कृष्णाने उभारलेल्या भावी विनाशाच्या भीतीने त्याचे मन कातर बनले.

राजसभेचा उत्साह केव्हाच सरला होता. सर्व नरेंद्रांना तेथून केव्हा बाहेर जातो, असे झाले. जो तो एकमेकांकडे पाहत, बसल्या जागी कुढत होता.

'कृष्णा!' धृतराष्ट्र आपल्या उत्तरीयाने घाम टिपीत म्हणाला, 'तुझं सत्यवचन ऐकून मी कृतार्थ झालो. पुत्राच्या आग्रहाखातर मी या द्यूताला माझ्या मनाविरुद्ध संमती दिली. हा एक मनोरंजनाचा भाग होईल, असं मला वाटत होतं. त्या निमित्तानं आप्तेष्टांच्या भेटीगाठी होतील, या मुलांचं गुणदर्शन घडेल, असं मला वाटलं. या द्यूताचा परिणाम एवढा घोर होईल, असं मला वाटलं असतं, तर मी हा द्यूत कधीच घडू दिला नसता. कृष्णा, तू योग्य वेळी इथं आलास. मला अन् माझ्या मुलांना या पापापासून वाचवलंस, त्याबद्दल समाधान वाटतं.'

धृतराष्ट्राने हाक मारली,

'द्रौपदी!'

द्रौपदीने धृतराष्ट्राकडे पाहिले.

कृष्णाकडे पाहिले.

कृष्णाने मान तुकवताच ती म्हणाली,

'आज्ञा!'

'मुली, आज्ञा कसली? तो अधिकार आता राहिला नाही. हे राजस्नुषे, तू माझ्यावर रुष्ट होऊ नकोस. या सभेत जे काही घडलं, त्याचं मला मरणप्राय दु:ख आहे. जन्मजात अंधत्वानं अन वृद्धापकाळामुळं या माझ्या उन्मत्त पुत्रांच्या सभेत तुझं रक्षण करण्यासाठी मी दुबळा ठरलो, म्हणून मला दोष देऊ नकोस. तू मला माझ्या स्नुषेइतकीच प्रिय आहेस. तुझ्यावर झालेल्या अन्यायाचं परिमार्जन करण्यास मी समर्थ आहे. द्रौपदी, तुला हवा असेल, तो वर मागून घे.'

द्रौपदीने पाहिले.

कृष्णाच्या मुखावर संतापाचे एकही चिन्ह राहिले नव्हते. ओठांवर सदैव विलसणाऱ्या स्मिताने परत जागा घेतली होती.

द्रौपदीने आपल्या पतींकडे परत पाहिले. तिचा संताप परत प्रगटला,

'पूज्य भरतश्रेष्ठा! आपल्या अभयामुळं मी निश्चिंत झालेय्. द्यायचाच असेल, तर एक वर द्या. धर्माचं अनुवर्तन करणारे माझे सर्व पती अ-दास होवोत. माझी मुलं दास्यातून मुक्त होवोत.'

सारी सभा त्या वराने चकित झाली. धृतराष्ट्र म्हणाला,

‘तसंच होवो! हे भद्रे, तू योग्य तोच वर मागितलास. मी प्रसन्न आहे. आणखी वर माग. तू एका वराला योग्य नाहीस, म्हणूनच मी तुला दुसरा वर मागण्यास सांगत आहे.’

‘पाचीं पंडुपुत्र आपापले रथ, शस्त्रं यांसह कौरवांच्या दास्यातून मुक्त होवोत.’

‘तथास्तु! पण, याज्ञसेने, वर मागून घेताना संकोच कसला करतेस? तुमचं राज्य, ऐश्वर्य सारं मागून घे. मी तुला आनंदानं ते देईन. त्यासाठी मी तुला तिसरा वर देत आहे. माग.’

‘महाराज, आपली कृपादृष्टी आहे, तीच मला पुष्कळ आहे. मला आणखी काही मागायचं नाही. अतिलोभ धर्माच्या नाशाला कारणीभूत होतो. मला तिसरा वर नको.’ आपल्या पतींकडे दृष्टीक्षेप करीत द्रौपदी म्हणाली, ‘या माझ्या पतींच्या ठायी काही पुरुषार्थ असेल, तर आपलं गमावलेलं राज्य, ऐश्वर्य, धनसंपदा शस्त्रबळावर ते परत मिळवून घेतील. तसं झालं, तर त्यांना ऐश्वर्यासह राज्याची, लक्ष्मीसह गृहलक्ष्मीची योग्यता कळेल. आपण जे दिलं, त्यात मी तृप्त आहे.’

द्रौपदीच्या त्या शब्दांनी ती सारी सभा थक्क झाली होती.

दयनीय स्थितीतही द्रौपदीचा तो आवेश, तिची निष्ठा पाहून कर्णाला राहवले नाही. तो म्हणाला,

‘द्रौपदी, तू धन्य आहेस! तुझं क्षात्रतेज अलौकिक आहे. तुझ्यामुळंच आज हे पांडव वाचले. दास्यातून मुक्त झाले. हे पांचाली, या विपत्सागरात नौकाहीन बुडत असलेल्या या पंडुपुत्रांना तारणारी तू नौका झाली आहेस. धन्य! खरोखरीच धन्य!!’

धृतराष्ट्राच्या आज्ञेने पांडवांनी वस्त्रे परिधान केली. धृतराष्ट्र म्हणाला,

‘हे युधिष्ठिरा, तुम्ही निर्विघ्नपण परत जा. आपलं सर्व धन व परिवार यांसह जाऊन सुखानं राज्य करा. एक वृद्ध अंध या नात्यानं एवढंच सांगावंसं वाटतं की, जे घडलं, त्याची कटुता मनात ठेवू नका. माझ्या मुलांबद्दल दुष्टावा बाळगू नका, दुर्योधनादी भ्रात्यांवर तुझं प्रेम अखंड राहो! अन् तुझं मन सर्वथा असंच सर्वांत स्थिर राहो.’

कृष्ण उठला. तो पांचालीजवळ गेला.

द्रौपदीला उजव्या हाताचा आधार देऊन तो तिला सभागृहाच्या बाहेर नेत होता.

कृष्ण द्रौपदीसह जाताना पाहून दुर्योधन सावध झाला. महाकष्टाने आखलेला डाव कृष्णाच्या येण्याने पुरा उधळला गेला होता.

दुर्योधन संतापाने उभा राहिला. त्याचवेळी कृष्णाने मागे वळून पाहिले.

ती दाहक दृष्टी पाहताच दुर्योधन नकळत उठला, तसा परत आसनावर बसला.

त्याची दृष्टी परत जेव्हा सभागृहाच्या द्वाराकडे गेली, तेव्हा तेथे कृष्ण व द्रौपदी नव्हती.

राजद्वार मोकळे होते.

# २४

**कृ**ष्ण द्रौपदीसह सभागृहातून जाताच थकलेला धृतराष्ट्र संजयाच्या, सेवकांच्या मदतीने सभागृहाबाहेर निघून गेला. सभागृहात एकच कुजबूज सुरू होती. कृपाचार्य, द्रोणाचार्य कुणाशी काही न बोलता सभागृहातून चालू लागले.

आतल्या आत संतापाने धूमसणाऱ्या दुर्योधनाने उठलेल्या शकुनीला खुणावले आणि शकुनीसह दुर्योधन गडबडीने गेला.

हळूहळू सारे सभागृह मोकळे झाले.

सभागृहात कर्ण शांतपणें आपल्या आसनावर बसून होता.

कसला तरी आवाज सुरू झाला.

कर्णाने पाहिले, तेव्हा कृष्ण बसलेल्या आसनावरून आपला थकला हात फिरवीत विदुर उभा होता.

विदुराने कर्णाकडे पाहिले आणि तोही सभागृहाच्या बाहेर निघून गेला.

त्या तोरणस्फटिकेत एकटा कर्ण उरला होता.

ते रत्नजडित सभागृह, ती सुवर्णासने, ते भव्य सिंहासन कर्ण पाहत होता. कर्ण आपल्या आसनावरून उठला.

ऐश्वर्यसंपन्न असलेले ते सभागृह भयावह वाटत होते. एक वेगळीच उजाड उदासीनता त्यावर पसरली होती.

हे ऐश्वर्य, ही मोकळी सुवर्णासनं, हे सिंहासन आणि हे धारण करणारी ही भूमी अशीच मोकळी राहणार! केव्हा ना केव्हा तरी हे घडणार आहे. ते अटळ आहे. मग ही ईर्ष्या, हा मत्सर, हा अपमान कशासाठी? यानं जन्ममृत्यूचं आह्वान टळणार आहे का?

कर्ण त्या विचाराने कासावीस झाला. त्या सभागृहातून बाहेर पडण्यासाठी तो राज-आसनांच्या मालिकेतून पायऱ्या उतरला. सभास्थानासमोरची भूमी चित्रवर्ण उर्णावस्त्राने आच्छादली होती. त्या मऊ वस्त्रावर पाऊल ठेवताच कर्णाची दृष्टी द्यूतपटाकडे गेली.

शकुनीने विजयाने उधळलेला द्यूतपट तसाच पडला होता. फासे विखुरले होते.

पायांनजीक पडलेल्या फाशांवर कर्णाचे लक्ष गेले. त्या फाशांवर कोरलेली हस्तमुद्रा त्याच्या डोळ्यांत भरली.

हस्तमुद्रा! ज्या मोकळ्या हातांनी फाशांची दाने टाकली, ते हात सारे जिंकूनही मोकळेच राहिले. ज्या हातांनी द्यूतचा पट मांडला, तो द्यूत जिंकताच त्याच हातांनी तो पट उधळून दिला होता. आता द्यूतपट साधी लाकडी फळी बनली होती. फाशांना हस्तिदंती सोंगट्यांखेरीज काही अर्थ उरला नव्हता.

पण याखेरीज फाशांना रूप लाभत नाही का?

मानवी बुद्धीने रचलेला द्यूतत किती सहजपणे उधळला गेला!

कोणत्या इच्छेने?

ऐन वेळी कृष्ण कसा आला?

कर्णाच्या चेहऱ्यावर एक खिन्न स्मित उमटले.

ज्याला आईनं टाकलं, त्याला हे विधात्याचं भाकीत कळणार कसं?

पडलेला फासा उचलण्यासाठी कर्ण वाकला. फासा धरण्यासाठी पुढे केलेला हात एकदम मागे आला.

तृणांकुरात लपलेला चेंडू उचलायला जावे आणि तेथे फणा काढून बसलेल्या भुजंगाचे दर्शन व्हावे, तशी कर्णाच्या चेहऱ्यावर साक्षात भीती उमटली होती. मंतरल्यासारखी त्याची दृष्टी त्या फाशावर जडली होती.

त्या हस्तिदंती फाशावर एक नीलवर्ण, लांब, कुरळा केस डुलत होता.

त्या सूक्ष्म केसाच्या दर्शनाने एक सूक्ष्म, पण अत्यंत तीव्र अशी वेदना कर्णाच्या मनात विजेसारखी खेळली.

अपमानाच्या संतापात विवेक एवढा ढळावा! द्रौपदी विवस्त्र केली गेली असती, तर ते रूप पाहण्याचं धार्ष्ट्य झालं असतं का? यज्ञामध्ये समिधांवर तुपाची धार सोडतानादेखील ती धार उंचावून सोडावी लागते. ते अवधान राहिलं नाही, तर त्या धारेबरोबर प्रज्वलित होणाऱ्या अग्निशिखांनी हात होरपळून जातो. अपमानाच्या अग्नीवर वासनांची धार सोडताना ते अवधान कुठं गेलं? कसं हरवलं?

वासना? छे! वासनेचा लवलेशही नव्हता.

मग काय होतं?

त्या प्रश्नाचे उत्तर कर्णाला सापडले नाही. त्या केसाला स्पर्श करण्याची ताकद कर्णाच्या ठायी राहिली नव्हती. कष्टाने आपली नजर वळवून तो सभागृहाबाहेर जाऊ लागला. त्या सभागृहात आता क्षणभरही थांबण्याची त्याची इच्छा नव्हाती.

कर्ण सभागृहाच्या बाहेर आला. सभागृहाच्या विस्तीर्ण पायऱ्यांवरून जाणाऱ्या पाठमोऱ्या विदुराकडे त्याचे लक्ष गेले. पायऱ्यांखाली एक सुवर्णरथ उभा होता. त्या रथाकडे जाणाऱ्या कृष्णापाठोपाठ विदुर त्याला गाठण्यासाठी भरभर जात होता. कर्ण जेव्हा अर्ध्या पायऱ्या उतरला, तेव्हा रथाजवळ गेलेल्या कृष्णाला विदुराने मारलेली हाक ऐकू आली.

कृष्ण थांबला, त्याने वळून पाहिले.

जवळ येणाऱ्या विदुराबरोबर दूर पायऱ्यांवर उभा असलेला कर्णही कृष्णाच्या नजरेत आला.

जवळ गेलेल्या विदुराला कृष्ण म्हणाला,

'विदुरा, काही सांगण्याची आवश्यकता नाही. मी दोष देत नाही. पण घडलं, ते बरं झालं नाही. अदृष्टातला विनाश मला स्पष्टपणे दिसत आहे. या भूमीत आता क्षणभरही थांबावं, असं वाटत नाही. येतो मी.'

कृष्ण आपला शेला सावरून रथारूढ झाला. रथापुढे सज्ज असलेले अश्वदळ दौडू लागले आणि कृष्णाच्या रथाला गती लाभली.

रथाचा दूर जाणारा आवाज ऐकू येत असता विदुर मागे वळला. त्याची दृष्टी पायऱ्यांवर उभ्या असलेल्या कर्णावर क्षणभर स्थिरावली; पण दुसऱ्याच क्षणी ती पायाकडे वळली.

विदुर सावकाश पायऱ्या चढत होता. कर्णाला टाळण्यासाठी कर्णाजवळून भरभर पायऱ्या चढत असता त्या वयोवृद्धाचा आपल्याच वस्त्रात पाय अडकला व तोल गेला. विदुरांकडे पाहत पायऱ्या उतरणाऱ्या कर्णाच्या ते ध्यानी आले. तो धावला. कर्णाच्या हातांनी विदुर सावरला गेला. कर्णाच्या बाहूंतून आपली सुटका करून घेत विदुर म्हणाला,

'ठीक आहे! मी ठीक आहे, कर्णा!! दासीपुत्राचा तोल सावरला जात नाही. त्याला सदैव ठेचकळावं लागतं. कारण... कारण त्यानं परिधान केलेली वस्त्रं त्याच्या अंगामापाची नसतात.'

उत्तराची अपेक्षा न करता विदुर पायऱ्या चढत होता.

कर्ण पायऱ्या उतरत होता. कर्णाच्या मनात एकच विचार होता :

'सुतपुत्राचा तरी तोल कुठं सावरला जातो?'

कर्ण प्रासादासमोर आला.

कृष्ण गेला, त्या वाटेवर दूर धुळीचे लोट दिसत होते. रथ दिसत नव्हता. दिसत होत्या, त्या गेला वाटेवर पडलेल्या रथाच्या चाकोऱ्या.

कर्णाचा रथ सामोरा आला. कर्ण रथारूढ झाला आणि सारथ्याने रथ हाकारला. कृष्ण गेलेल्या चाकोऱ्यांतूनच कर्णाचा रथ जात होता.

द्यूतगृहातून कर्ण स्वगृही परतला. दारातच द्रुम उभा होता. द्रुम सामोरा आला. त्याने विचारले,

'दादा, ऐकलं, ते खरं?'

कर्णाने द्रुमाकडे पाहिले.

'द्रुमा, तू काय ऐकलंस, ते मला माहीत नाही; पण मी फार थकलोय्.'

कर्ण सरळ आपल्या शय्यागृहाकडे गेला. शय्यागृह मोकळे होते. कर्ण काही वेळ तसाच उभा होता. त्या जागेचे मोकळेपणही त्याला भेडसावत होते. तो तसाच सौधाकडे गेला.

उन्हाच्या उभ्या किरणांत हस्तिनापूर तळपत होते. दूरवर प्रासादापर्यंत गेलेला राजरस्ता नजरेत येत होता. लांबवर झाडीतून उठलेले राजप्रासादाचे सज्जे दिसत होते. राजरस्त्यावर तुरळक वर्दळ दिसत होती.

मागे पावलांचा आवाज आला आणि कर्णाने मागे पाहिले. महालात वृषाली येत होती. कर्ण माघारी वळला. महालात येत असता वृषालीने विचारले,

'द्यूतसभा संपली?'

'हो!'

'कृष्ण आले होते?'

'तुला कसं समजलं?'

'काही वेळापूर्वी कृष्णांचा रथ वाड्यासमोरून गेला.'

'हं!'

कर्णाची ती वृत्ती पाहून वृषाली काही बोलली नाही.

काही वेळाने तिने म्हटले,

'जेवण तयार आहे.'

'मला भूक नाही.' कर्ण शय्येकडे जात म्हणाला.

'एक विचारू?'

'विचार ना!'

'आज द्रौपदीवस्त्रहरण झालं, म्हणे!'

'झालं नाही. सुदैवानं टळलं.'

'कुणाच्या?'

तिच्या नव्हे, आमच्या सुदैवानं! तिच्या नशिबी सदैवच कृष्णाचं सुदैव आहे.'

'त्याचसाठी कृष्ण आले होते?'

'हो! ऐन वेळी कृष्ण आला अन् कलंक टळला,'

'कलंक? कसला कलंक?'

'वसू, अनावृत स्त्रीला पाहण्याचा अधिकार फक्त दोघांचाच- एक पती अन् दुसरा पुत्र. यांखेरीज अन्य पुरुषांना तो अधिकार नाही. क्रोधाच्या आहारी जाऊन ते पातक घडत होतं, पण कृष्ण अवतरला अन् ते पातक टळलं.'

'कृष्ण आले नसते अन् ते वस्त्रहरण झालं असतं, तर...'

'तर! खरंच काय झालं असतं!' कर्णाचे अंग उभ्या जागी शहारले. वृषालीकडे पाहत तो निश्चयी स्वरात म्हणाला, 'घडलं असतं, तर तुझ्या माथी वैधव्य आलं असतं. मला आत्मघाताखेरीज दुसरा मार्ग राहिला नसता.'

वृषालीचा हात भीतीने ओठांवर गेला.

शय्येवर अंग झोकून देत कर्ण म्हणाला,

'जा, वृषाली. असेल, ते मद्य घेऊन ये. भरपूर.'

वृषाली मद्य आणण्यास गेली.

जेव्हा मद्याची झारी घेऊन ती माघारी आली, तेव्हा कर्ण झोपी गेला होता.

कर्ण दचकून जागा झाला. शय्येजवळ वृषाली उभी होती. कर्णाचे सारे अंग घामाने भिजले होते. धाप लागल्यासारखी त्याची रुंद छाती वर-खाली होत होती. हाताने घाम पुशीत तो म्हणाला,

'कसलं भयानक स्वप्न पडलं!'

'स्वप्न?'

'हां! बरं झालं, जागा झालो, ते! वसू, मी स्वप्नात पांडव वनवासाला जात असताना पाहिलं!'

'खरं?'

'राजरस्ते माणसांनी भरले होते. एक काळाकभिन्न डोंब विकट हास्य करीत ढोल बडवीत पुढं जात होता. त्याच्या मागून पाची पांडव, द्रौपदी खाली माना घालून चालत होते.'

'आश्चर्य आहे! घडत असलेलं स्वप्नात दिसत नाही, असं म्हणतात!'

'घडत असलेलं?'

'हो! या क्षणी द्यूतात हरलेले पांडव वनवासास जात आहेत.'

'भ्रम झाला, की काय तुला? पांडव इंद्रप्रस्थाला गेलेले पाहनूच मी आलो.'

'नाही! भ्रम नाही. सत्य आहे. ऐका S S'

कर्णाने सज्जाकडे पाहिले. गर्दीचा आवाज ऐकू येत होता.

‘राजरस्ता प्रजाजनांनी दुथडी भरला आहे. पांडव इंद्रप्रस्थाला निघाले होते; पण अर्ध्या वाटेतून त्यांना परत बोलावण्यात आलं. द्यूताचं आह्वान स्वीकारून परत युधिष्ठिर आले.’

‘अन् परत आपलं राज्य, ऐश्वर्य सारं गमावलं, असंच ना!’

‘नाही. एकच पण लावला होता : बारा वर्षं वनवास, अन् एक वर्ष अज्ञातवास, पांडव हरले,’

‘ते सांगायची गरज नाही. तरीच युवराज शकुनीसह गडबडीनं बाहेर गेले.’

‘काय म्हटलंत?’

‘काही नाही.’

बाहेरचा आवाज वाढत होता. वृषाली सज्जाकडे निघालेली पाहताच कर्ण म्हणाला,

‘नको, वृषाली. ते पाहायला तू जाऊ नकोस. इंद्रधनुष्य प्रगटताना पाहावं, मावळताना पाहू नये.’

कर्णाने उद्विग्नपणे मद्याची झारी उचलली आणि मद्याचे पात्र भरले.

# २५

भरपूर मद्य प्राशन करूनही कर्णाचे मन स्थिरावले नव्हते. काळोख पडला होता. महालातल्या समया केव्हाच प्रज्वलित करण्यात आल्या होत्या. कर्ण उठला; त्याने आपले उत्तरीय घेतले. दारातच वृषालीची गाठ पडली. कर्णाच्या खांद्यावरचे उत्तरीय पाहून वृषालीने विचारले,

'बाहेर जाणार?'

'हो!'

'पण सकाळपासून आपण उपाशीच...'

'एका दिवसाच्या उपवासानं काय होतं? बारा वर्षांचा वनवास पत्करतात, तिथं एका दिवसाच्या उपवासानं काय होतं? वृषाली, माझा रथ आणायला सांग.'

वृषाली गेली. कर्ण पायऱ्या उतरून खालच्या सोप्यावर आला. सोप्यावरच्या बैठकीवर अधिरथ बसला होता. त्याच्या जवळच द्रुमही होता. शत्रुंजय, वृषकेतु उभे होते. दाराशी राधाई होती. वृषकेतु सांगत होता,

'सीमेपर्यंत सारे पोहोचवायला गेले होते. सारे रडत होते.'

'आणि, आजोबा, पांडव रडत नव्हते. युधिष्ठिर महाराजांनी साऱ्यांची समजूत काढली अन् सर्वांचा निरोप घेतला.'

अधिरथाने दीर्घ श्वास सोडला. तो म्हणाला,

'दैव, दुसरं काय! अरे, ज्यांनी थोड्याच दिवसांपूर्वी दिग्विजय करून राजसूय केला, तेच पराक्रमी पांडव द्यूतात हरतात काय अन् वनवासाला जातात काय!'

'पुरुष सोसतील... पण बिचारी राजकन्या!' राधाईने डोळे टिपले.

कर्ण खाकरला. साऱ्यांचे लक्ष तिकडे गेले. कर्ण पुढे झाला. अधिरथाने विचारले,

'बाहेर निघालास?'

'हो! प्रासादाकडं!'

'जरूर जा; पण येताना माझं एक काम कर.'

'काय?'

'येताना ते फासे जरा बघायला घेऊन ये. मला त्यांचं दर्शन घ्यायचंय्.'

'तात!'

'राधेया! अरे, परमेश्वरापेक्षाही मोठे आहेत ते. आता या भूमंडळात तेवढाच पराक्रम उरला आहे.'

'तात!'

'नको, कर्णा, मला ती हाक मारू नकोस. तू मला नदीपात्रावर सापडलास. तुला मी ईश्वरप्रसाद म्हणून घरी आणलं. माझं पुत्रहीन जीवन तुझ्या पावलांनी सफल झालं, असं वाटलं. तू आलास अन् हा द्रुम जन्माला आला. तुझ्या गुणानं कुळी उद्धरली, असं आम्हांला वाटलं; पण ते सारं खोटं होतं. कर्णा, तुझ्या या कृत्यानं आम्हांला तोंड दाखवायलाही जागा राहिली नाही.'

'माझं कृत्य! काय केलं मी?'

'काय केलं? आज सारी नगरी तेच बोलत आहे. धार्ष्ट्य असलं, तर ऐक जा- तुझ्या सल्ल्यांन तो द्यूत घडला. तू तो घडवून आणलास, असं सारे बोलतात.'

'खोटं! तात, मी युद्धाचा सल्ला दिला होता. या द्यूतात माझा कसलाही हात नव्हता.'

'पण लोकांना ते पटत नाही.'

'त्याला मी काय करणार?'

'अन् त्यांचं खोटंही नाही. तू आग्रह धरला असतास, तर युवराज द्यूत खेळले नसते.'

'युवराज एवढे आज्ञाधारक केव्हापासून बनले?' कर्ण हसत म्हणाला.

'राधेया, मी जेवढा तुला ओळखतो, तेवढाच युवराजांनाही. तुझा विरोध सहन करण्याची ताकद युवराजांना नाही, हे मला पूर्णपणे माहीत आहे... अन् हे सारं तू उघड्या डोळ्यांनी पाहिलंस, घडू दिलंस. हेच तुझं पातक आहे. कर्णा, जगाला फसवता येईल, पण मनाला... ते जमणार नाही... मद्यानंही...'

'मी येतो.'

कर्ण भरभर पायऱ्या उतरला. वाड्यासमोर रथ उभा होता. रथाचे पलिते वाऱ्यावर फरफरत होते. कर्णापाठोपाठ द्रुम धावला. कर्ण रथावर चढत असता द्रुम म्हणाला,

'दादा, मी येतोय्.'

'नको!'

कर्णाने वेग हाती घेतले. सेवकांनी घोड्यांच्या ओठाळ्या सोडल्या. आसूड घेतलेला कर्णाचा हात उंचावला. त्या आवाजाबरोबर रथ उधळला.

राजप्रासादात गेल्यावर दुर्योधन तोरणस्फटिकेत असल्याचे कर्णाला समजले. कर्णाने रथ तसाच तोरणस्फटिकेत हाकारला.

तोरणस्फटिका मशालींच्या प्रकाशात प्रकाशली होती. कर्णाचा रथ थांबताच सेवकांनी रथ धरला. कर्ण रथातून खाली उतरला.

कर्णाने विचारले,

'युवराज!'

'आत आहेत.'

'आणखी कोण आहे?'

'शकुनिमहाराज...'

'आणि...'

'कोणी नाही.'

कर्णाच्या चेहऱ्यावर तशा स्थितीतही एक स्मित उमटले.

तो भरभर पायऱ्या चढून गेला. सभागृहाच्या द्वाराशीच कर्ण थांबला.

सारे सभागृह समयांच्या उजेडात प्रकाशमान झाले होते. सभास्थानासमोर स्फटिकभूमीवर तांबडी लोकरी बैठक पसरली होती. त्यावर चंदनी चौरंग द्यूतपट म्हणून उभा होता. त्यांच्या दोन्ही बाजूंना पुरुष उंचीच्या समया तेवत होत्या.

शकुनि आणि दुर्योधन मद्याचा आस्वाद घेत द्यूत खेळत होते.

दुर्योधनाने फासे घोळवून पटावर टाकले. तो ओरडला,

'मामा, मी जिंकलं!'

'होय, युवराज, मी माझी वैडूर्याची अंगठी हरलो आहे.' शकुनि म्हणाले.

दुर्योधन समाधानाने मोठ्याने हसला. त्याने मद्यपात्र रिते केले. मागे उभ्या असलेल्या दासीने तत्परतेने मद्यपात्र परत भरले. आपल्या ओठांवरून तळहात फिरवीत दुर्योधनाने विचारले,

'तो मूर्ख युधिष्ठिर कसा हरला, ते कळत नाही.'

'युवराज, द्यूताला हाताचा गुण असावा लागतो. तो तुमच्या हातात आहे. युवराज, उचला फासे. आज ते तुम्हांला वश आहेत.'

'मामा, पण बोला.'

आपल्या गळ्यातला हार स्पर्शीत शकुनि म्हणाले,

'माझा हा मूल्यवान हार मी पणाला लावतो. युवराज, याबद्दल तुम्ही काय लावणार?'

'मी!' आत प्रवेश करीत कर्ण म्हणाला, 'युवराजांच्या गळ्यातला हार.'

दुर्योधन-शकुनींनी एकाच वेळी कर्णाकडे पाहिले.

दुर्योधन धडपडत उठला. कर्णाकडे जात तो म्हणाला,

'ये, मित्रा! मी आज आनंदात आहे. ते पांडव बारा वर्षं वनवास अन् एक वर्ष अज्ञातवासात गेले. या मामांच्यामुळं ते साध्य झालं.'

'पण, युवराज, हा दुसरा द्यूत घडला कसा? मला कसं माहीत नाही?'

दुर्योधन हसला. मद्याचा पुष्कळ अंमल झाला होता. तो म्हणाला,

'ते गुपित आहे. मामांनीच सांगितलं की, तुला त्यात घेऊ नका, म्हणून. तू विरोध केला असतास ना?'

कर्णाने होकारार्थी मान डोलावली.

'बरोबर! मामा कधी चुकायचे नाहीत. ते पांडव गेले अन् मामा अन् मी तातांकडं गेलो. तातांनी परत संमती दिली. पांडवांना परत आह्वान दिलं, अन् मूर्ख युधिष्ठिरानं स्वीकारलं. पुढं कारभार झटपट. एकच पण मामांनी लावला अन् पांडव हरले कायमचे...'

दुर्योधनाने कर्णाच्या खांद्यांवर हात ठेवले. त्याच्यासह कर्ण द्यूताकडे जात होता. द्युताकडे लक्ष जाताच दुर्योधन म्हणाला,

'अरे कर्णा, आज मी मामांबरोबर द्यूत खेळलो. मी हरलो नाही. मामा हरले, मी जिंकलं.'

'युवराज कधी हरत नसतात.' कर्ण म्हणाला.

'खोटं वाटतं? विचार मामांना...' दुर्योधन म्हणाला.

'अंगराज, युवराज म्हणतात, ते खरं आहे. आज त्यांना फासे वश आहेत.'

'वा! एका दिवसात बरीच प्रगती झाली, म्हणायची. युवराज, असेच खेळत राहाल, तर बारा वर्षांत आपलाही कृतहस्त अन् अतिदेवी असा लौकिक सहज होऊन जाईल.'

दुर्योधन हसला. तिकडे लक्ष न देता कर्ण म्हणाला,

'युवराज, आता एकच कमतरता आहे.'

'कसली?' दुर्योधनाने विचारले.

'आपल्या राज्यात मद्यशाला सुरू करायला हव्यात. द्यूतगृह तयार आहेच. त्याला पुरेल, एवढं मद्य निर्माण व्हायला हवं.'

दुर्योधनाने कर्णाकडे रोखून पाहिले. तो म्हणाला,

'चेष्टा करतोस?'

'युवराजांची चेष्टा मी कशी करीन? आता भ्यायचं काही कारण नाही. बारा वर्षांत आपण द्यूतात निष्णात बना, जरी पांडव परत आले, तरी केव्हाही परत बारा वर्षं त्यांना पाठवून देता येईल.' कर्णाने दासीकडे पाहिले. तो दासीला म्हणाला, 'दासी, यापुढं युवराजांच्या मद्याचं पात्र रिकामं ठेवीत जाऊ नकोस. भर ते पात्र.'

दासी पुढे झाली. तिने पात्र भरून युवराजांच्या हाती दिले. संतापाने ते पात्र फेकून देत दुर्योधन ओरडला,

'मित्रा, समाधानाचा एक दिवसही भोगण्याचा माझ्या दैवी नाही का, रे?'

'उद्यापासून आपल्याला त्रास होणार नाही, युवराज!'

'उद्या काय?'

'मी चंपानगरीला जातोय्. ती अनुज्ञा मागण्यासाठीच मी अपरात्री आलो.'

कर्णाच्या दंडावर दुर्योधनाची पकड आवळली गेली. दंडात ती बोटे रुतत होती.

'नाही, मित्रा, मला सोडून तुला कुठंही जाता येणार नाही.'

'का? पांडव परत येतील, अशी तुला भीती वाटते?'

'भीती?' दूर होत दुर्योधन म्हणाला, 'तेवढा एकच शब्द मला माहीत नाही.'

'अंगराज! एवढं अशुभ चिंतू नये. अंगावरच्या वस्त्रांनिशी पांडव चालत गेलेले तू पाहिलं नाहीस, वाटतं?' शकुनीने विचारले.

'अन् त्यांच्या पाठोपाठ नगरसीमेपर्यंत सारं हस्तिनापूर अश्रू ढाळीत जात होतं, ते तुम्ही पाहिलं नाहीत?' कर्णाने उलट विचारले,

'आज रडतील. उद्या हसतील.'

'कुणाला?'

'काय म्हटलंस?' शकुनीने विचारले.

'शकुनिमहाराज, जुगार एकदाच जिंकला जातो. बारा वर्षं हां हां म्हणता सरतील आणि पांडव जेव्हा माघारी येतील, तेव्हा हेच रडणारे लोक त्यांना हसत खांद्यांवरून घेऊन येतील. कारण तोवर तुमच्या जुगारी अड्ड्यांनी अन् मदिरेच्या गुत्त्यांनी प्रजा त्रस्त झालेली असेल!'

'अंगराज!' संतापाने उठत शकुनि म्हणाला.

'मामा, पांडवांना वनवासाला पाठवून संकट टळत नाही. तुम्हांला ते नको

असतील, तर त्यांचा वनवास संपण्याच्या आधी जनमानसात त्यांचं जे सिंहासन आहे, ते उलथवून टाका.'

'आम्ही तेही करू.' दुर्योधन म्हणाला.

'कशाच्या बळावर? फाशांच्या? ती कला अजून शकुनींनाही अवगत झाली नाही. युवराज, स्वतःचं रूप फाशांच्या पटावर विसरू नका. भर स्वयंवरातून राजकन्येचं हरण करण्याचं ज्याचं धार्ष्ट्य आहे, मित्रासाठी अंगदेशाचं राज्य फेकण्याचं ज्याचं औदार्य आहे, ज्याच्या हातातली गदा बलरामकृपेनं अजोड आहे, तो कौरवराज्याचा युवराज द्यूतपटामध्ये गुंततो, याखेरीज दुर्दैव कोणतं? शकुनींच्या हस्तलाघवानं राज्यं सांभाळली

जात नाहीत. रणांगणावरचा जुगार निश्चितपणं द्यूतपटावर ठरवला जात नाही.'

'बस्स कर, अंगराज! यापुढं एका शब्दाचाही उपमर्द मी सहन करणार नाही. ज्याच्यामुळं हा दिवस दिसला, त्याच्याबद्दल ही कृतज्ञता! युवराज, तुम्हांला निवड करावीच लागेल. हा राधेय किंवा मी.'

दुर्योधन दोघांकडे पाहत होता. काय उत्तर द्यावे, हे त्याला सुचत नव्हते.

कर्ण पुढे झाला,

'युवराज, मी शकुनि महाराजांची क्षमा मागतो.'

शकुनि त्या बोलण्याने सुखावले.

कर्णाने दुर्योधनाला विचारले,

'युवराज, तुमचं खड्ग कुठंय्?'

'रात्री द्यूतगृहात आराम करीत असता खड्ग कोण बाळगतं?' दुर्योधनाने उत्तर दिले.

'युवराज, आपला किरीट?'

'ही काय राजसभा आहे किरीट चढवायला?'

'निदान आपल्या छातीवर कवच तरी हवं होतं,' कर्ण म्हणाला.

दुर्योधनाला हसू आवरणे कठीण गेले. तो म्हणाला,

'मित्रा, मद्य जास्त झालेलं दिसतंय्! कवच रणांगणात वापरता, की द्यूतगृहात?'

'तेच सांगतोय् मी, युवराज! गरजेनुसार शस्त्र, अस्त्र, वस्त्र, भूषण धारण केलं जातं. रणांगणात शस्त्र उपयोगी पडलं, म्हणून शय्यागृहात कुणी सशस्त्र वावरत नाही. ती शस्त्रं शस्त्रागारातच टाकावी लागतात. युवराज, फार अवधी आता राहिला नाही. बारा वर्षं हां हां म्हणता जातील. त्या आधी शस्त्रशाळा, गजशाळा पूर्ववत व्हायला हव्यात. राज्य सुरक्षित बनायला हवं.'

'योग्य सल्ला दिलास, मित्रा!' दुर्योधनाने शकुनीकडे पाहिले. पटावरचे फासे उचलून फेकून देत तो म्हणाला, 'मित्रा, मी तुला वचन देतो. यापुढं मी या फाशांना स्पर्श करणार नाही. त्यांचा आधार घेणार नाही.'

संतापाने आपले उत्तरीय सावरीत शकुनि म्हणाले,

'युवराज, येतो मी! आज्ञा?'

'थांबा! मामा, मी तुमचा सदैव कृतज्ञ आहे. जेव्हा काही गरज भासेल, तेव्हा कौरवांचं कोषागार तुमच्यासाठी मोकळं राहील. तुम्हांला कोणी अडवणार नाही.'

शकुनीच्या पाठोपाठ कर्ण दुर्योधनासह तोरणस्फटिकेच्या बाहेर आला.

दुर्योधनाला राजगृही सोडून कर्ण स्वगृही परतला.

अर्धी रात्र उलटून गेली होती. दार उघडले गेले. दारात हाती मशाल घेऊन अधिरथ उभे होते. अधिरथांनी मशाल पूर्ववत खांबावर लावली. दार लावले.

'तात, तुम्ही अजून जागे?'

'तुझी वाट पाहत होतो.' अधिरथाचा आवाज कंपित झाला. 'वसुषेण, तू रागावला नाहीस ना? तू जन्मल्यापासून कधी तुला कटू बोललो नाही. पण...'

कर्णाचे उभे अंग त्या हाकेने पुलकित झाले. अधिरथांनी कर्णाचे नाव वसुषेण ठेवले होते.

अधिरथांना मिठी मारीत कर्ण म्हणाला,

'नाही, तात! केव्हा तरी मुलांना रागवावं. त्यानं मुलं सुखावतात. विश्रांती घ्या. उद्यापासून तुमच्यावर खूप ताण पडणार आहे.'

'ताण?'

'हो! आता रथशाळा, शस्त्रशाळांना वेग येणार आहे.'

अधिरथांच्या चेहऱ्यावरचे समाधान पाहायला कर्ण तेथे थांबला नाही.

# २६

कर्णाने सांगितले, ते काही खोटे नव्हते. हस्तिनापुरात नवा उत्साह संचारला होता. रथशाळा-शस्त्रशाळा सुरू झाल्या. राज्याबाहेर विखुरलेले कारागीर परत हस्तिनापुरात बोलावण्यात आले. रथशाळेत सुदृढ रथांची निर्मिती सुरू झाली. शस्त्रशाळेत खड्ग, तोमर, प्रास, नाराच बाण तयार होत होते. गजशाला, अश्वशाळेत सुलक्षणी जनावरांची जोपासना होत होती. आश्रमातून शस्त्रविद्येत निपुण असे वीर तयार होत होते. दुर्योधन, कर्ण यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील अठरा कारखाने अहोरात्र काम करताना दिसू लागले.

वृषसेन दुर्योधनपुत्रांबरोबर आश्रमात जात होता. दुर्योधनासह कर्ण राज्यकारभार पाहत होता. उलटणाऱ्या वर्षांचंही भान त्यांना राहिलं नव्हतं.

दुर्योधन-महालात कर्ण आणि दुर्योधन बसले होते. रात्रीची वेळ होती. दुर्योधन म्हणाला,

‘मित्रा, सुवर्णकारांनी गजशाळेचे हौदे, अंबाऱ्या चांगल्या केल्यात. नाही?’

‘युवराज, तुमच्यासारखा कलेचं कौतुक करणारा धनी असल्यावर कारागिरांना आपोआप हुरूप चढतो.’

‘कर्णा, रथशाळा, शस्त्रशाळा, आश्रम पाहून आता कंटाळा आला. दररोज तेच तेच!’

‘युवराज, आता दिवस चांगले आहेत. आपलं मन रमवायला मृगयेला जायला काहीच हरकत नाही. हे दिवस मृगयेचेच.’

‘छान कल्पना सुचवलीस. खरंच, आपण मृगयेला जाऊ या. तेवढाच बदल बरा वाटेल.’

सेवक महालात आला. त्याने सांगितले,

‘शकुनि महाराज येत आहेत.’

कर्ण-दुर्योधन उभे राहिले. शकुनीचे स्वागत दोघांनीही केले.

शकुनि स्थानापन्न होताच दुर्योधनाने विचारले,

‘मामा, अलीकडं आपलं दर्शन दुर्मीळ झालंय्.’

‘दुर्योधना, अरे, आम्हांला द्यूताखेरीज काही येत नाही. तू द्यूत खेळत नाहीस. मग भेट घडणार कशी?’

कर्ण उठला. शकुनीकडे जात तो म्हणाला,

‘महाराज, या कर्णावर एवढा राग नसावा. एकदा क्रोधाच्या आहारी जाऊन बोललो; पण ते आपल्या मनातून जात नाही. मोठ्यांनी क्षमा करायची नाही, तर कुणी करायची?’

शकुनीने उठून कर्णाच्या खांद्यावर हात ठेवला.

‘नाही, अंगराज, मी सहज थट्टा केली. माझ्या मनात काही नाही. तुम्ही दोघे निश्चयानं उभे राहिलात, म्हणूनच हस्तिनापूर परत राजधानी भासू लागली. सारे

प्रजाजन तुमचं कौतुक करतात. पांडवांची आठवणही त्यांच्या मनांत राहिली नाही.'

'बिचारे पांडव!' दुर्योधन हसून म्हणाला, 'कुठं रानावनांत फिरत असतील, कोण जाणे!'

'युवराज! वनवासी पांडव सध्या आपल्या राज्याच्या द्वैतवनातच वनवास भोगीत आहेत.' शकुनि म्हणाले.

'द्वैतवनात? पण, मामा, हे तुम्हांला कुणी सांगितलं?' कर्णाने विचारले.

'अंगराज, आज धृतराष्ट्र महाराजांच्या दर्शनाला गेलो होतो. तिथं एक कथेकरी ब्राह्मण आला होता. त्यानं पांडवांचा वृत्तांत सम्राटांना सांगितला. वनवासातल्या पांडवांचे कष्ट ऐकून सम्राटांना खूप दुःख झालं.'

'मग तातांनी त्यांना बोलावलं, की काय?' दुर्योधन उद्गारला.

'नाही! उलट, ते म्हणाले, पांडवांना त्यांच्या संपत्तीचा अल्पांशही देणार नाही.'

'खरं?' आनंदी होऊन दुर्योधनाने विचारले.

'हो! पण पांडवांची बातमी ऐकून सम्राट चिंतेत पडले आहेत, पांडवांच्या हातून कौरवांचा नाश होईल, अशी त्यांना भीती वाटत आहे.'

'तातांची भीती व्यर्थ आहे.' दुर्योधन म्हणाला, 'पांडव वनवास संपवून येतील, तेव्हा हस्तिनापुरचं सामर्थ्य शतपटींनी वाढलेलं असेल.'

'युवराज, आपण मृगयेला जाणारच आहो. इतरत्र जाण्यापेक्षा द्वैतवनातच आपण गेलो, तर...'

'द्वैतवनात?'

'हां! पांडव तिथं आहेत. सर्व वैभवासह आपण त्या वनात मृगयेला जाऊ. वनवास भोगणाऱ्या, वल्कलं नेसलेल्या, कंदमुळं खाऊन जगणाऱ्या त्या पांडवांना आपलं ऐश्वर्य पाहून निश्चितपणे खेद होईल. शत्रूच्या मनाचा जळफळाट पाहण्यात वेगळा आनंद सामावलेला असतो.'

'ते खरं!' दुर्योधन विचारात पडला. 'पण तात याला संमती देणार नाहीत.' शकुनीने विश्वास दिला,

'युवराज, त्याची चिंता करू नका. द्वैतवनातच आपलं गोधन आहे. त्या निमित्तानं आपल्याला सम्राटांची परवानगी मिळेल. ते काम माझ्यावर सोपवा.'

दुसऱ्या दिवशी कर्ण व दुर्योधन धृतराष्ट्रांपुढे गेले. शकुनि तेथे आधीच गेले होते. क्षेमकुशल चालले असता त्या ठिकाणी पूर्वसंकेताप्रमाणे संगम नावाचा बल्लव आला आणि त्याने धृतराष्ट्राला गोधनाचे वृत्त सांगितले.

शकुनीने कर्णाकडे पाहिले. कर्ण पुढे झाला. तो म्हणाला,

'महाराज, एक विनंती आहे.'

'राधेया, बोल!'

'सध्या मृगयेचा काळ आहे. युवराजही राज्यकारभारात थकलेत. आपण आज्ञा केली, तर द्वैतवनात आम्ही जाऊ. गौळीवाडे पाहू. खिल्लारांचं वय, जाती, वर्ण, इत्यादी गणना करू. ते करणं आवश्यक आहे. मृगयेबरोबर तेही काम होऊन जाईल.'

'नाही, राधेया, मी अनुमती देऊ शकत नाही.'

‘का?’ दुर्योधनाने विचारले.

‘कारण तिथं पांडवांचं वास्तव्य आहे.’

शकुनि म्हणाला,

‘महाराज, त्या पांडवांशी आमचं काहीच काम नाही. आम्ही मृगया करू. गोधन पाहू.’

धृतराष्ट्र विचारात पडलेले पाहून तेथे बसलेले भीष्माचार्य न राहून म्हणाले,

‘शकुनि, मृगया करावयाची आहे, तर अनेक अन्य जागा उपलब्ध आहेत. तिथं पांडव आहेत, तिथं तुम्ही जावं, असं मला वाटत नाही. तो धोका सम्राटांनी घेऊ नये.’

‘कसला धोका?’ दुर्योधन म्हणाला, ‘ते वनवासी. ते आमचं काय करणार? अन् पांडवांची चिंता वाटत असेल, तर ती करू नका. निःशस्त्रावर वार करण्याची आमची रीत नाही. आम्ही तर आमच्या परिवारासह जाणार आहोत. आम्ही त्या पांडवांकडं पाहणारसुद्धा नाही. मृगया करून वासरांची मोजणी करून आम्ही परतू.’

‘असं असेल, तर तुम्ही जाऊ शकता.’ धृतराष्ट्रांनी परवानगी दिली.

घोषयात्रेसाठी जाण्याचा बेत निश्चित झाला. त्या यात्रेची तयारी सुरू झाली. दुर्योधन आपल्या वैभवासह घोषयात्रेला निघाला. त्याच्याबरोबर शकुनि, कर्ण, इत्यादी राजे होते. कौरवस्त्रियाही बरोबर होत्या. दळासहित सर्व परिवार घेऊन दुर्योधन द्वैतवनाकडे जात होता.

हत्तींच्या आणि रथांच्या घरघराटानं तो मार्ग भरून गेला.

# २७

**द्** वैतवनाकडे गेलेल्या कौरवांच्या बातम्या दररोज हस्तिनापुराला येत होत्या. त्या ऐकून धृतराष्ट्राला समाधान वाटत होते. शकुनि, कर्ण यांच्यासह दुर्योधन गोधन पाहत होता. खिल्लारे मोजली जात होती.

घोषयात्रा पुरी करून दुर्योधन आपल्या परिवारासह द्वैतवनाकडे वनसंचारासाठी निघाला होता.

धृतराष्ट्राचे ते समाधान फार काळ टिकले नाही.

एके दिवशी जी वार्ता राजप्रसादात आली, तिने धृतराष्ट्र, विदुर, भीष्म, द्रोणाचार्य यांची मने चिंतेने भरून गेली.

कौरव वनात गेले असता गंधर्वांनी त्यांच्यावर हल्ला केला होता. त्यात दुर्योधनासह कौरवस्त्रिया गंधर्वांनी पकडून नेल्या होत्या. सुदैवाने तेथून जवळच राहणाऱ्या पांडवांना ते कळले आणि संकटात सापडलेल्या कौरवांच्या मदतीला अर्जुन धावला. गंधर्वाने पकडून नेलेला दुर्योधन व दुर्योधनपरिवार अर्जुनाने सोडवून आणला. त्या घटनेमुळे धृतराष्ट्र संतप्त बनले होते.

विदुर, भीष्म, द्रोण अर्जुनाच्या मोठ्या मनाचे, शौर्याचे, मुक्त कंठाने कौरवराजसभेत गुणगान गात होते.

दुर्योधनाच्या आगमनाकडे साऱ्यांचे लक्ष लागले असता, एके दिवशी सायंकाळी दुर्योधन घोषयात्रेवरून माघारी आला. त्याला राजप्रसादात सोडून कर्ण घरी आला.

घरात चमत्कारिक वातावरण होते. कर्णपुत्र, अधिरथ, राधा, कर्णबंधू- सारे कर्णाची दृष्टी चुकवीत होते.

रात्री महालात प्रवेश करताच उभ्या असलेल्या वृषालीकडे कर्णाची दृष्टी गेली. तिचा चेहरा पाहताच कर्ण हसला. तो म्हणाला,

‘आज वातावरण संतप्त दिसतंय्!’

‘नाही! मुळीच नाही.’ वृषाली म्हणाली.

कर्ण मोठ्याने हसला.

‘आनंद आहे.’

‘हसता काय?’ वृषाली उफाळली. ‘बाहेर तोंड दाखवायला जागा राहिली नाही.’

‘का?’

‘आपला पराक्रम कळला. साऱ्यांना ठाऊक झालंय् ते.’

‘वसू जय आणि पराजय यांचं एका गोष्टीत मात्र मोठं साधर्म्य आहे. दोन्हींच्याही कथा अतिरंजित असतात.’

‘घोषयात्रेत घडलं, ते खोटं?’

‘खोटं नव्हे! अतिरंजित!’ कर्ण वृषालीजवळ गेला. तिचा हात धरून पलंगाकडे गेला. शय्येवर बसत कर्ण म्हणाला, ‘वसू, आम्ही घोषयात्रा आटोपली. मृगया करीत

समाधानानं आम्ही द्वैतवनाकडं जात होतो. जलक्रीडेसाठी सरोवरांच्या जागा सुसज्ज करण्यासाठी सेवक पुढं गेले होते. दुर्दैवानं त्याच वेळी त्या सरोवरात एक गंधर्व आपल्या स्त्रियांसह जलक्रीडा करीत होता. गेलेले दूत गंधर्वानं माघारी पाठविले. द्वैतवन ही कुरुराज्याची भूमी. त्या भूमीत सेवकांचा झालेला अपमान दुर्योधनाला सहन झाला नाही. तो युद्धाला उभा राहिला. युवराज ऐकत नाहीत, हे लक्षात येताच मी सैन्यासह गंधर्वावर चालून गेलो.'

'अन् मग?'

'मग काय; व्हायचं तेच झालं! गंधर्व आकाशयुद्धात प्रवीण. आम्ही वनात प्रवेश केला नाही, तोच आकाशातून चारी बाजूंनी शरवर्षाव होऊ लागला. बाण वृक्षराईतून येतात, की आकाशातून, हेच कळेना. समोर शत्रू दिसत नव्हता. आमचे सैनिक मात्र घायाळ होत होते. साऱ्या गंधर्वांनी आम्हांला त्या निबिड वनात घेरलं. माझा रथ हळूहळू दुबळा बनत होता. छत्र, धुरा, ध्वज, ईषा तुटत होत्या. शेवटी रथ सोडून विकर्णाच्या आधारानं जीव वाचवता आला...'

'अन् युवराज...'

'मी व विकर्ण जखमी अवस्थेत मिळेल त्या वाटेनं सुरक्षित जागी पोहोचलो. सारं कौरवसैन्य वनात तसंच विखुरलं होतं, युद्ध थांबल्याबरोबर सारे गोळा होत असता, युवराजांची कथा कळली. माझा पराभव झालेला पाहताच युवराज मोजक्या सैन्यानिशी गंधर्वांवर तुटून पडले आणि प्रबळ गंधर्वांनी स्त्रीपरिवारासह युवराजांना पकडून नेलं. ते वनवासी पांडवांना समजलं अन् अर्जुनानं दुर्योधनाची सुटका केली. युवराज स्त्रीपरिवारासह सुखरूप माघारी आले.'

'पण इथं तर सारे तुम्हांलाच दोष देतात.'

'मला?'

'हो! युवराजांना एकाकी सोडून तुम्हीच रणांगणातून माघार घेतलीत, असं बोललं जातं.'

'वसू, जे रणांगणावर लढतात, ते कधी त्याबद्दल बोलत नाहीत; आणि ज्यांनी रणांगण पाहिलेलं नसतं, ते सदैव रणांगणाच्या कथा सांगण्यात रमतात. म्हणून तर त्या कथांना एवढा रंग चढतो. वसू, रणांगणाचा रंग गुलाबी नसतो. तो थिजल्या रक्ताचा गर्द तांबडा रंग आसतो. विजयाबरोबर तिथं हास्य प्रगटत नाही. घायाळ वीरांच्या वेदनांनी ती रणभूमी आक्रोशत असते. विजयानंतरही त्या भूमीवर तो मृत्यू घोटाळत असतो, त्याच्या शांत पावलांचा आवाज फक्त विजयी वीरालाच ऐकू येत असतो.'

कर्ण उठला. त्याच्या डोळ्यांसमोर ते रणांगण दिसत होते. चेहऱ्यावर वेगळीच छाया प्रगटली होती. वृषालीकडे न पाहता कर्ण बोलत होता,

'वसू, पौरुषाचा अहंकार हा माझा स्थायिभाव. वेदना सोसणं हा तर स्वभाव. मृत्यूच्या वल्गना मी सदैव करीत असे; पण त्या रणभूमीत एक क्षण असा आला की, चारी बाजूंनी पावसाची टपोरी सर उतरावी, तसा शरवर्षाव होऊ लागला. काही दिसेनासं झालं. ऐकू येत होतं गंधर्वांचं विजयी हास्य, त्या निबिड अरण्यात साक्षात मृत्यू उभा असल्याची जाणीव झाली अन् सारा अहंकार, बळ कुठच्या कुठं गेलं. दिसेल त्या मार्गानं मी जीव वाचवण्यासाठी धावत सुटलो. ज्या रथाचा मी आधार घेतला, तो विकर्णाचा रथ होता, हे फार मागाहून मला कळलं.'

कर्ण वळला. वृषालीच्या नेत्रांत अश्रू तरळत होते. तिच्याकडे बोट करीत कर्ण म्हणाला,

'वसू हेच ते अश्रू; ज्यांनी तुझ्या पतीला मृत्यूचं भय शिकवलं.'

वृषालीने वर पाहिले. तिच्या डोळ्यांकडे पाहत कर्ण म्हणाला,

'जेव्हा शत्रूनं वेढलं, चारी दिशा व्यापल्या, अटळ पराजय समोर दिसू लागला, त्याच वेळी, वसू, साक्षात तूच समोर उभी राहिलीस अन् एका तुझ्या आठवणीबरोबर जीवनाची सारी आसक्ती उफाळून वर आली. पुरुषत्वाचा अहंकार, स्वाभिमान, अस्मिता साऱ्यांचा क्षणात विसर पडला. जीवनाची सारी आसक्ती तुझ्या रूपानं प्रगट झाली. माझ्या एकाकी जीवनातला एक ओलावा एवढा प्रबळ आहे तर ज्यांच्या जीवनांत उदंड स्नेह उदंड ऐश्वर्य असेल, त्या वीरांचं काय होत असेल? वसू, माझ्या जीवनातील तुझं स्थान किती मोठं आहे, हे मला त्या मृत्यूच्या रेषेवर उभं असता प्रथमच जाणवलं.'

वृषाली कर्णाच्या मिठीत बद्ध होत गुदमरल्या स्वरात म्हणाली,

'नाथ, मला सारं मिळालं, सारं मिळालं...'

बाहेर शुभ्र चांदणे पडले होते.

## २८

**दु**सऱ्या दिवशी सायंकाळी विकर्ण कर्णाकडे आला. तो म्हणाला, 'अंगराज, आपल्याला प्रासादावर बोलावलंय्.'

'कुणी? युवराजांनी?'

'नाही; सम्राटांनी!'

क्षणात कर्णाच्या सारे ध्यानी आले. त्याने शांतपणे विचारले,

'तिथं पितामह, विदुर, आचार्य असतीलच.'

विकर्ण खिन्नपणे हसला. तो म्हणाला,

'अंगराज, आज तेवढ्यावर भागणार नाही. पितामहांनी राजसभा बोलवलीय्.'

'कशासाठी?'

'आपल्या पराक्रमाचं कौतुक करण्यासाठी! भर रणांगणातून युवराजांना एकटे सोडून आपण माघारी पळून आलात...'

'ते खोटं आहे. विकर्णा, तू माझ्या बरोबर होतास ना? जेव्हा आपण गंधर्वांवर चालून गेलो, तेव्हा युवराज मागं होते.'

'ते खरं! पण राजसभेत ते कोणी ऐकून घेत नाही. पितामहांनी युवराजांना काही बोलू दिलं नाही.'

'एकंदरीत प्रकार गंभीर दिसतो.'

'आपण वेळ केलात, तर आणखी गंभीर होईल. आपण विश्रांती घेत आहा; आपली प्रकृती बरी नाही, असं सांगितलं, तर कदाचित...'

'नाही, विकर्णा, गैरसमज अधिक वाढण्याआधीच ते मिटलेले बरे! मी येतो. आणखी काही...'

'तसं विशेष काही नाही. पण असं बोललं जातं की, अंगदेशाचं राज्य आपल्या हातून काढून घेतलं जावं...'

'अस्सं! युवराजांनी सांगितलं, तर मी आनंदानं ते राज्य त्यांच्या पायांशी ठेवीन. पण कुणी काढून घेतो, असं म्हटलं, तर ते जमणार नाही, स्वपराक्रमानं ते राज्य मी मिळवलं आहे. ठीक आहे. पाहू काटा होतं, ते.'

कर्ण आपल्या महालात गेला.

थोड्याच वेळात विकर्णासह कर्ण राजप्रसादाकडे जाण्यासाठी निघाला.

विकर्णाने सांगितले, त्यात काही अतिशयोक्ती नव्हती. राजसभागृह तुडुंब भरले होते. साऱ्यांचे लक्ष कर्णाच्या आगमनाकडे लागले होते. विकर्णापाठोपाठ येणारा कर्ण पाहताच सभागृहात स्तब्धता पसरली.

कर्ण ताठ मानेने गृहात येत होता. त्याची धीट नजर सर्वांवरून फिरत होती.

कर्णाने सम्राटांना वंदन केले. भीष्म, द्रोण, विदुर यांच्या चेहऱ्यांवर कर्णाबद्दलची अप्रीती उमटली होती. दुर्योधन धृतराष्ट्रांसमोर उभा होता. कर्णाकडे मान वर करून पाहण्याची त्याची स्थिती राहिली नव्हती. दुर्योधनामागे शकुनि, दु:शासन नतमस्तक बसले होते.

कर्ण आलेला पाहताच भीष्म उद्गारले,

'सम्राट, आपल्या आज्ञेनुसार अंगराज कर्ण आला आहे.'

धृतराष्ट्र थकल्या आवाजात म्हणाले,

'पितामह, त्याच्या वर्तनानं आज कुरुराज्याची मान खाली झाली आहे. त्याबद्दल मी काही बोलावं, असं वाटत नाही. तुम्हीच माझ्या वतीनं भाग घ्या.'

'त्यात मलाही आनंद नाही.' भीष्म म्हणाले, 'जे झालं, त्यात युवराज दुर्योधनाचा दोष मला दिसत नाही. या सर्वाला एकच कारण आहे.' कर्णाकडे बोट दाखवीत भीष्म गरजले, 'हा सूतपुत्र राधेय!'

कर्णाने भीष्मांकडे पाहिले.

कर्णाच्या ओठांवर विलसणारे स्मित पाहून भीष्मांचा संताप वाढला.

'राधेया, हा दासीपरिवार नाही. ही कौरवसभा आहे. इथं हा अहंकार चालणार नाही.'

कर्णाने मान तुकवली. भीष्म बोलत होते,

'घोषयात्रेचं निमित्त तुम्ही पुढं केलंत, तेव्हाच मी विरोध केला होता; पण सम्राटांची आर्जवं करून तुम्ही संमती मिळवलीत. नको ते धाडस केलंत अन् स्वत:च्या फजितीला कारणीभूत झलात. एवढं होऊनही त्याची लाज तुम्हां कोणालाच वाटू नये, याचं आश्चर्य वाटतं.'

'आमच्या हातून असं कोणतं कर्म घडलं, की ज्याची लाज आम्ही बाळगावी, आपला संताप वाढावा? त्याचं कारण कळेल?'

भीष्म त्या प्रश्नाने अवाक् झाले.

'तुमच्या हातून काही चुकलं, असंसुद्धा तुम्हांला वाटत नाही ना? धन्य आहे! कुरुराज्याचे युवराज परिवारासह गंधर्वांकडून पकडून नेले जातात, यापेक्षा लाजिरवाणी गोष्ट कोणती? राधेया, ज्या पांडवांचा तुम्ही एवढा द्वेष करता, ज्यांना कपटानं वनवास भोगायला लावलात, त्याच पांडवांनी युवराजांच्या मदतीला धावावं, श्रेष्ठ धनुर्धर अर्जुनानं कुरुयुवराज दुर्योधनाची सुटका करावी... त्याच्या मनाच्या मोठेपणाला सीमा नाहीत. अन् तुमच्या...'

'पितामह! एवढं त्या पांडवांचं कौतुक नको. पांडव कौरवांचे दास आहेत. त्यांनी युवराजांना सोडवलं, यात कसलेच उपकार नाहीत. दासानं धन्याची सेवा करणं हा दासाचा धर्म आहे! ते भाग्य त्यांना लाभलं, असं फार तर म्हणा!'

राधेयाS S' भीष्म संतापले.

त्यांना शांत करीत द्रोण म्हणाले,

'पितामह, शांत व्हा! लज्जा सज्जन बाळगतात. ती रीत अंगराज कर्णाच्या ठायी कुठून येणार? त्याला राजसभेत बोलावू नये, असं मी तेवढयासाठी सांगत होतो.'

'फार ऐकून घेतलं!' कर्णाचे नेत्र आरक्त बनले. 'आचार्य, आम्ही कोणताही गुन्हा केला नाही. सम्राटांच्या आज्ञेचा भंग आमच्या हातून घडला नाही. आम्ही

ठरल्याप्रमाणे घोषयात्रा पुरी केली. मृगयेसाठी आम्ही द्वैतवनात प्रवेश केला. पांडवांचा आम्ही शोध घेतला नव्हता. त्यांचं दर्शनही आम्हांला घडलं नाही. युवराज जलविहाराचा आग्रह धरीत असतानाच गंधर्वांचा प्रकोप झाला.'

'अन् अंगराज महाधनुर्धर कर्ण युवराजांना एकटे सोडून, जिवाच्या भीतीनं वाट दिसेल तिकडं पळत सुटले, असंच ना?' द्रोणाचार्य हसत म्हणाले.

'हो, तसंच! फक्त थोडा गैरसमज झलाय्. मी अन् विकर्ण गंधर्वांना सामोरे गेलो, तेव्हा युवराज आमच्याबरोबर नव्हते. अन्, आचार्य, मृत मनुष्य शत्रूंना जिंकीत नसतो. प्रबळ गंधर्वांपुढं माघार घेणंच हितावह होतं.'

'अन्, अंगराज! जे तुम्हांला जमल नाही, ते त्या श्रेष्ठ धनुर्धर अर्जुनानं करून दाखविलं. गंधर्वांशी युद्ध करून त्यानं कौरवयुवराज सोडवून आणले, हे तर खरं?' भीष्मांनी विचारलं.

'सोडवून आणलं, हे खरं, पण ते युद्ध करून, की भीक मागून, ते मला माहीत नाही.'

'अंगराज!'

'पितामह! पांडवांचं कौतुक एवढं करू नका. आम्ही मृगयेला जातो काय! त्याच सरोवरात त्याच वेळी गंधर्व क्रीडेसाठी उतरतात काय! गंधर्व युवराजांना पकडून नेतात अन् अर्जुन मदतीला धावून येतो. अर्जुन एवढा पराक्रमी झाला केव्हापासून!'

'ते तुला कळायचं नाही! अंगराज, कुलानं हीन, मनानं क्षुद्र अन् वाचेनं आत्मश्लाघा करणाऱ्या पुरुषाला अर्जुनाचं खरं रूप कसं दिसेल?'

'मीही तेच म्हणतो, पितामह! ज्या गंधर्वानं युवराजांना पकडून नेलं, त्या गंधर्वाचं नाव आहे चित्ररथ. स्वर्गीची कुंडं ओस पडली, म्हणून का तो पृथ्वीवरच्या डबक्यात आपल्या परिवारासह उतरला होता? जेव्हा आमच्या दळावर चित्ररथ चालून आला, तेव्हा तो अर्जुन कौरवांच्या मदतीला का आला नाही? तेव्हा त्याचं बाहुबल कुठं गेलं होतं?'

'पांडवांच्या पराक्रमाला दर्पणाची गरज नाही.' भीष्म हसून म्हणाले, 'राधेया, पांडवांनी बाहुबलानं अन् स्वपराक्रमानं राजसूय केला, हे विसरू नकोस.'

'हां! एका रात्री राज्य वाटून देता येतं, पितामह! म्हणून काही एका रात्रीत राज्य बलशाली होत नसतं. कृष्णाच्या चतुरंग दळाच्या पाठबळावर पांडवांचा तो तथाकथित बाहुबलाचा पराक्रम सिद्ध झाला. निदान आपल्याला तरी त्याचं विस्मरण व्हायला नको होतं, राजसूय यज्ञात आपणच कृष्णला अग्रपूजेचा मान दिला होता ना?'

भीष्मांना काही उत्तर सुचेना.

विदुरांनी विचारले,

'पण अर्जुनानं युवराजांची सुटका केली, हे तर खरं ना?'

'हो! चित्ररथ अन् अर्जुनाचा जुना स्नेह. हर्षभरित होऊन त्यांनी एकमेकांना मारलेल्या मिठ्या तुम्ही पाहिल्या नसतील; पण त्या युवराजांनी पाहिल्या आहेत.'

'कर्णा, तुला काय म्हणायचंय्?' धृतराष्ट्रांनी विचारले.

'क्षमस्व! मला खूप म्हणायचंय्; पण ते ऐकतं कोण? महाराज, जे झालं, त्यामागं निश्चितपणे पांडवांचा हात आहे. चित्ररथाकरवी त्यांनीच हे कारस्थान घडवून आणलं. वनवास भोगत असूनही त्यांच्या मनांत केवढं तीव्र वैर नांदत आहे, याची ती घटना साक्ष आहे. द्वैतवनात आम्ही जाणार, हेही त्या पांडवांना आधीच कळलं असलं पाहिजे.

ती दिव्य दृष्टी त्यांच्याजवळ नसली, तरी ती प्राप्त करून देणारे आमच्या राजसभेत अनेक आहेत. पांडवांच्या त्या कृतीबद्दल संतप्त होण्याऐवजी त्यांचंच गुणगान गात बसलेले आमचे वयोवृद्ध, तपोवृद्ध उलट आमच्या माथी दोष थापण्यासाठी राजसभा बोलावीत आहेत... अन् त्याबद्दल कुणाला ना खंत, ना खेद!'

कर्णाच्या त्या बोलण्याने साऱ्या सभेचे रूप बदलले. दुर्योधनाच्या चेहऱ्यावर अभिमानयुक्त आनंद उमटला. धृतराष्ट्रांनी विचारले,

'कर्णा, तू बोलतोस, त्यात कदाचित सत्य असेलही; पण जो अपमान घडला, तो भरून येत नाही.'

'जय-पराजयाची निश्चिती कुणाला नसते. गंधर्वांकडून आमचा पराजय झाला आहे. पांडवांकडून नव्हे. त्याबद्दल कोणताही सुज्ञ आम्हांला दोष देणार नाही. एखादा महायज्ञ करूनही हा पराजय धुऊन काढता येईल.'

'महायज्ञ! कशाच्या बळावर? तुमच्या रथशाळा, गजशाळा, शस्त्रगृह सुसज्ज करण्यात कौरवांची कोषागारं रिती झाली आहेत, याची कुणाला जाणीव आहे?' विदुराने विचारले, 'राधेया, कल्पनेत रमून, असलेल्या ऐश्वर्याची उधळण करणं सोपं असतं. ती मोकळी कोषागारं भरण्याचं सामर्थ्य कुणाला?'

'मला ते सामर्थ आहे. मी एकटा दिग्विजय करून कौरवांची रत्नघरं परत समृद्ध करीन.'

'केव्हा?' भीष्मांनी विचारले.

कर्णाने आपली दृष्टी पितामहांच्या दृष्टीला खिळवली. तो म्हणाला,

'पितामह! पराक्रमाच्या लालसेनं नव्हे, तर मित्राचा कलंक धुऊन काढण्यासाठी मी लवकरच दिग्विजयासाठी बाहेर पडेन. पांडवांच्या राजसूयापेक्षाही भव्य असा यज्ञ पार पाडून दाखवीन. एकच विनंती आहे. ज्या वेळी मी दिग्विजयावरून परत येईन, तेव्हा आज माझ्या निर्भर्त्सनेसाठी जशी राजसभा आयोजित केलीत, तशीच राजसभा माझ्या स्वागतासाठी आयोजित करा. या राजसभेत परत येईन, तो सन्मान भोगण्यासाठीच येईन. येतो मी!'

'कर्णा, तुझा विजय असो.' म्हणत दुर्योधनाने भर राजसभेत कर्णाला मिठी मारली आणि कर्णाचा हात धरून तो सभेतून निघून गेला.

## २९

दिग्विजयासाठी हस्तिनापुरात कौरवदल एकत्रित होत होते. राजरस्त्यावरून अश्वपथके टापांचे आवाज उठवीत भरधाव वेगाने जाताना दिसू लागली. रथांचे धडधडाट उठू लागले. अंबाऱ्या तोलीत जाणाऱ्या हत्तींच्या पावलांनी धरणी दबू लगली. शंख, नौबतींच्या आवाजांनी वातावरण धुंदावून गेले. चंपानगरीहून कर्णदलासह चक्रधरही हस्तिनापुरात आला. दिग्विजयाची तयारी पुरी झाली होती.

मुहूर्ताच्या दिवशी कर्णाने धृतराष्ट्र-गांधारींचे दर्शन घेतले. ब्राह्मणांनी मंत्र म्हणून त्याला आशीर्वाद दिले. दुर्योधनाचा निरोप घेऊन कर्ण रथारूढ झाला. चक्रधर कर्णाचे सारथ्य करीत होता. राजरस्त्याने दळ जात असता नागरिक दुतर्फा उभे होते, कर्णाचा जयघोष करीत होते. कर्णरथ जेव्हा कर्णाच्या वाड्यासमोर आला, तेव्हा कर्णाने रथातून उतरून अधिरथ-राधाईंचे आशीर्वाद घेतले. वृषालीने कर्णाला ओवाळले आणि कर्ण परत रथारूढ झाला. हस्तिनापुराबाहेर कर्णाची वाट पाहणाऱ्या सेनासागराने कर्णरथ दिसताच कर्णाचा जयजयकार केला. त्या अपाट दळासह कर्ण दिग्विजयासाठी निघाला.

कर्णाने प्रथम द्रुपदाकडे आपले लक्ष वळवले. घनघोर संग्राम झाला; आणि शेवटी द्रुपदाचा पराभव करून कर्णाने द्रुपदाकडून सुवर्ण, रौप्य, रत्ने यांच्या राशी करभार म्हणून घेतल्या. द्रुपदाचा पराभव होताच त्या भागातले सर्वच राजे आपोआप कर्णाला शरण आले आणि करभार देऊन मोकळे झाले.

हिमालयापर्यंतचा मुलूख पादाक्रांत करून कर्ण पूर्वेकडे वळला. कर्णदळ विजय मिळवीत पुढे सरकत होते. अंग, वंग, कलिंग, शुंडिक, मगध, इत्यादी देश जिंकीत तो दक्षिणेकडे उतरला. दक्षिणेतल्या प्रबळ रुक्मीने कर्णाशी प्रखर झुंज दिली. शेवटी रुक्मीने कर्णपराक्रम पाहून युद्ध थांबवले आणि प्रचंड करभार देऊन कर्णाशी सख्य जोडले.

कर्ण-विजयाच्या वार्ता हस्तिनापुरात येत होत्या. येणाऱ्या विजयाच्या वार्तेबरोबर नगराच्या चारी गोपुरांवरून विजयनौबतीचे गंभीर आवाज उठत होते. दुर्योधन कर्ण-स्वागताची तयारी करण्यात गुंतला होता.

भर दुपारच्या उन्हात हस्तिनापुराच्या नगरवेशीबाहेर दुर्योधन आपल्या रथात उभा होता. दुर्योधनाचे रक्षक-दळ मागे उभे होते. दुर्योधनाचे डोळे समोरचा रस्ता निरखीत होते. दुर्योधनाला फार काळ तिष्ठावे लागले नाही. एक स्वार भरधाव वेगाने दौडत येत होता. स्वार नजीक आला आणि हर्षभरित मुद्रेने तो दुर्योधनाला म्हणाला,

‘अंगराज कर्ण दृष्टिक्षेपात आले आहेत.’

दुर्योधनाने आनंदाने हातातील रत्नकंकण काढले आणि स्वाराकडे फेकले. दुर्योधनरथ आपल्या दळासह दौडू लागला. एका उंचवटयावर येताच रथ थांबला. दुर्योधन एकाग्रपणे पाहत होता.

त्या विस्तीर्ण, सपाट भूमीवरून कौरवसैन्य पुढे येत होते. अग्रभागी कौरवध्वज

मानाने फडकत होता. असंख्य रथ, स्वार, सैनिकांनी ती भूमी व्यापली होती.

दुर्योधनाने रथ पुढे नेण्यास सांगितले. दुर्योधनाचा रथ ओळखला जाताच सहस्त्रमुखांनी युवराज दुर्योधनाचा जयजयकार उठला. कर्णाचा रथ दुर्योधनाला सामोरा गेला. दोन्ही रथ एकमेकांजवळ येऊन थांबले. कर्ण-दुर्योधन रथाखाली उतरले आणि आनंदभरित दुर्योधनाने कर्णाला मिठी मारली. दोघांच्या नावांचा जयजयकार आकाशाला भिडला.

दुर्योधनासह कर्णाने हस्तिनापुरात प्रवेश केला. विजयी वीरांच्या स्वागतात कोणतीच कमतरता नव्हती. सारे हस्तिनापूर राजरस्त्यावर लोटले होते. सुवर्ण-अंबाऱ्या तोलीत जाणारे गज, सुवर्णकिरणांत तळपणारे रथ, चित्रविचित्र रंगांची वस्त्रे परिधान केलेले स्वार, शिरस्त्राण-कवचधारी वीर त्या राजरस्त्यावरून जाताना पाहून नागरिकांची मने हर्षाने भरून गेली होती. कौरवध्वजाच्या मागे दुर्योधनासह कर्ण एका रथात उभा होता. दुर्योधन समाधानाने प्रजेचा आनंद पाहत होता. करभाराने सजलेले गाडे सहा-सहा बैलांनी खेचले जात होते. दुर्योधन-कर्णांवर सुगंधित पुष्पे आणि चंदनचूर्ण अखंड उधळली जात होती.

राजप्रसादाच्या द्वाराशी कर्णाला सुवासिनींनी ओवाळले. कर्णाने अंतर्गृहात जाऊन गांधारीसह धृतराष्ट्राचे दर्शन घेतले आणि पुत्राप्रमाणे धृतराष्ट्राच्या चरणांना अभिवादन केले. प्रेमभराने कर्णाला जवळ घेत धृतराष्ट्र म्हणाले,

‘राधेया! तुझ्या पराक्रमानं आज हस्तिनापुरास प्रतिष्ठा लाभली. या अंधत्वाचा आज खेद वाटतोय्. तुझं यश आणि हस्तिनापुरातील तुझं गौरवशाली आगमन पाहावयास आज दृष्टी हवी होती, असं वाटतं. राधेया, तुझ्या स्वागतासाठी राजसभा तिष्ठत आहे. तूच मला तिथं घेऊन चल.’

सम्राटांना हाताचा आधार देऊन कर्ण राजसभेकडे जात होता. राजसभेत सम्राटांसह येणाऱ्या कर्णाला सर्वांनी उत्थापन दिले.

कर्णाने अत्यंत नम्रतेने भीष्म, विदुर, द्रोणाचार्य, कृपाचार्य यांना वंदन केले. भीष्म प्रसन्न मुद्रेने म्हणाले,

‘राधेया! तुझा पराक्रम थोर आहे, तुझ्या यशानं कुरुकुलाचा अभिमान वाढला आहे. माझा तुला आशीर्वाद आहे.’

दुर्योधनाने दासींकडे पाहिले. अमूल्य रत्नालंकारांनी व मूल्यवान तलम वस्त्रे यांनी भरलेली सुवर्णतबके घेऊन दासी पुढे आल्या. दुर्योधनाचा कंठ भरून आला होता. त्याची अवस्था जाणून कर्णाने स्मितवदनाने त्या तबकांचा हस्तस्पर्शाने स्वीकार केला.

कर्ण म्हणाला,

‘हे नृपश्रेष्ठा, आज ही निष्कंटक पृथ्वी तुझी आहे. स्वर्गाचे पालन करणाऱ्या इंद्राप्रमाणे तू तिचं शासन कर.’

दुर्योधनाला राहवले नाही. प्रेमभराने त्याने कर्णाला मिठी मारली आणि भरसभेतच तो म्हणाला,

‘मित्रा, तू माझा मित्र! साह्यकर्ता आहेस. तुझ्यामुळंच आजचा भाग्याचा दिवस मला दिसतोय्. तुझं कल्याण असो. आज तुझ्यामुळं मी खऱ्या अर्थानं सनाथ आहे.’

राजसभेतला कर्णाचा सत्कार संपल्यावर दुर्योधन कर्णाला कर्णगृहापर्यंत पोहोचवायला आला. कर्णगृहाच्या दारात वृषालीने कर्णाला ओवाळले. कर्णाबरोबर आलेल्या कर्णपुत्रांचे ओवाळून स्वागत केले. चक्रधर, द्रुम त्याच सोहळ्यात गृहप्रवेश करते झाले. अधिरथ-राधाईंना आपल्या पराक्रमी मुलांना, नातवंडांना, युवराजांना येताना पाहून धन्यता वाटत होती.

बऱ्याच अवधीनंतर त्या घराला घरपण लाभले होते.

# ३०

दिग्विजयाहून कर्ण परत आल्यानंतर दुर्योधनाने राजसभा बोलविली. भीष्म, विदुर, द्रोण, कृप या सभेला उपस्थित होते. सर्व कौरवही तेथे आले होते. राजपुरोहितांना मुद्दाम पाचारण केले होते. राजसभा भरल्यानंतर दुर्योधनाने आपला हेतू सांगितला. तो धृतराष्ट्रांना म्हणाला,

'तात, अंगराज कर्णानं दिग्विजय करून आपल्या साम्राज्याचा लौकिक वाढविला आहे. ज्या हेतूनं त्यानं हा दिग्विजय केला, तो राजसूय यज्ञ करण्याची मला उत्सुकता लागली आहे.'

धृतराष्ट्राने समाधानाने संमती दिली.

कर्ण म्हणाला,

'युवराज, या क्षणी सर्व भूपाल तुला वश आहेत. तू द्विजश्रेष्ठांना सन्मानानं बोलावून घे आणि यज्ञाची सर्व उपकरणं जमविण्याची आज्ञा कर. वेदपारंगत ऋत्विजांना निमंत्रण करून त्यांच्याकडून यज्ञाचा यथाशास्त्र उपक्रम कर.'

द्रोणाचार्यांनी म्हटले,

'युवराज, मला काही सांगावंसं वाटतं.'

'आज्ञा!' दुर्योधन म्हणाला.

'सम्राट धृतराष्ट्र महाराज असताना राजसूय करण्याचा अधिकार तुला नाही.'

'तात अंध आहेत व अंधाला क्रतूचा अधिकार नाही. त्याचमुळं त्यांचं अस्तित्व माझ्या अधिकाराला प्रतिबंध करू शकत नाही.' दुर्योधन म्हणाला.

पुरोहित उठले. ते म्हणाले,

'युवराज, आपण म्हणता, ते सत्य आहे; पण त्याचबरोबर एका कुलात दोन राजसूय होत नसतात. जोपर्यंत आपण युधिष्ठिराला जिंकलं नाही, तोवर आपणांस राजसूयाचा अधिकार नाही. काही कारणानं कधी युधिष्ठिराचा पराभव झालाच, तर राजसूयाचा अधिकार लाभेल.'

'युवराजांना यज्ञच करता येणार नाही?' कर्णाने विचारले.

'तसं नाही. युवराज, राजसूयाशी स्पर्धा करणारा वैष्णवयज्ञ तुम्ही करा. त्यायोगे विपुल कीर्ती तुम्हांला मिळेल. तुम्हांला करभार देणारे भूपाल आहेत. ते तुम्हांला घडविलेलं व खाणीतून काढलेलं सुवर्ण देतील. त्या सोन्याचा नांगर करून त्यानं यज्ञभूमी नांगरून द्या आणि राजसूयाइतकंच श्रेष्ठ असं हे सत्र निर्विघ्नपणे पार पाडा!'

पुरोहितांनी सुचविलेल्या यज्ञाला सर्वांनी संमती दिली आणि सारे यज्ञतयारीसाठी विचार करू लागले.

यज्ञाची सामग्री आणण्यासाठी कुशल सेवक पाठवले होते. पार्थिवांना व ब्राह्मणांना निमंत्रण करण्यासाठी शीघ्रगामी दूत चारी दिशांना सुटले. हस्तिनापुरात सुवर्णकारागिरांकडून सुवर्ण-नांगर तयार होत होता.

त्या नांगराने यज्ञभूमी नांगरली गेली. निष्णात शिल्पकारांकडून यज्ञस्थान निर्माण

करविले आणि एका सुमुहूर्तावर दुर्योधनाने त्या सुसंस्कृत, विपुल धनयुक्त यज्ञाची यथाशास्त्र व यथाक्रम दीक्षा घेतली.

तो सोहळा पाहून विदुर, भीष्म, द्रोण, कृप, कर्ण यांना अतिशय संतोष वाटला.

विदुर म्हणाले,

'युवराज, हा यज्ञ होत असता सर्वत्र आनंद असावा. समाधान असावं.'

कर्णाकडे पाहत दुर्योधन म्हणाला,

'मी माझ्या मित्राच्या साहाय्यानं समाधानी आहे.'

'ते मी जाणतो, युवराज, आपण हा यज्ञ करीत असता पांडव मात्र अरण्यवासी आहेत. त्यांचं वास्तव्य आपणांस माहीत आहे. या यज्ञासाठी आपण त्यांना बोलवावं. त्यानं तुमचा मोठेपणा वाढेल.'

क्षणभर दुर्योधनाने विचार केला आणि त्यानं संमती दिली.

दु:शासनाने दूतास आज्ञा केली,

'हे दूता, तू सत्वर द्वैतवनात जा, अन् त्या पांडवांना व वनात राहणाऱ्या ब्राह्मणांना यथान्याय यज्ञाचं निमंत्रण दे.'

यज्ञाचा दिवस जवळ येत होता. निमंत्रित ऋषी, राजे, विद्वान हस्तिनापुरास येत होते.

द्वैतवनात गेलेला दूत परत आला. राजसभेत तो येताच दुर्योधनाने त्याला विचारले,

'दूता, पांडव यज्ञाला येतात ना?'

दूत म्हणाला,

'युवराज, पांडवांना मी आमंत्रण दिलं. युधिष्ठिरांनी आपण करीत असलेल्या श्रेष्ठ कर्तृत्वाबद्दल आनंद व्यक्त केला; पण तेरा वर्षांची प्रतिज्ञा पालन करावयाची असल्यानं येता येत नाही, असं ते म्हणाले.'

दुर्योधनाला मनातून समाधान वाटले; पण समाधान न दाखवता तो उद्गारला,

'पांडव आले असते, तर बरं झालं असतं!'

कर्ण दूताकडे पाहत होता. त्याचा अस्थिर भाव ओळखून कर्णाने विचारले,

'काही निरोप सांगितलाय्?'

'तसा काही...' दूत चाचरला.

'सांग, दूता! दूतकर्मात संकोच करू नकोस, जो निरोप असेल, तो सांग.' कर्णाने आज्ञा दिली.

भीष्म, द्रोण, विदुरांचे लक्ष दूताकडे लागले होते.

दूताने कर्णाकडे पाहत सांगितले,

'अंगराज, युधिष्ठिर महाराजांचा मनोभाव कळताच, काही निरोप आहे का, म्हणून मी विचारलं अन् त्याच वेळी भीम उठले अन् ते म्हणाले, मी निरोप सांगतो...'

'भीमानं काय निरोप पाठवलाय्?' विदुरांनी उतावीळपणे विचारले.

'भीम म्हणाले', दूत सांगू लागला, "त्या दुर्योधनाला जाऊन सांग. ज्या वर्षी प्रतिज्ञेची तेरा वर्षं पूर्ण होतील, तेव्हा नराधिपती धर्मराज रणयज्ञामध्ये शस्त्रास्त्रांच्या प्रदीप्त अग्नीमध्ये दुर्योधनाची आहुती देण्यास सज्ज होईल, तेव्हाच कुंतीपुत्र तिथं

येतील अन् जेव्हा हा धर्मात्मा युधिष्ठिर, सर्व धृतराष्ट्रपुत्र स्वत:च क्रोधानं उद्दीपित झाले असता, त्यांना अधिक प्रज्वलित करणारा क्रोधरूपी हवीचा प्रक्षेप करील, तेव्हा मीही तिथं येईन.”

सारी सभा तो निरोप ऐकून सून्न झाली.

विदुरांना काही सुचेना.

भीष्मांनी विचारले,

‘दूता, इतर पांडव काही बोलले?’

‘नाही! फक्त भीमच बोलले.’ दूताने सांगितले.

‘युवराज, तो भीम मुळातच संतापी. त्याच्या बोलण्याकडं लक्ष न देता क्षमाभाव जागृत करावा. जिथं यज्ञ होणार आहे, त्या भूमीत क्रोध, मत्सर, अपमान यांना स्थान नसतं.’ भीष्म म्हणाले.

कर्णाच्या चेहऱ्यावर उद्वेगजन्य स्मित पसरले. तो भीष्मांना म्हणाला,

‘पितामह, हा विचार योग्य आहे, तर तो शिशुपालवधाआधी कृष्णाला का दिला नाहीत? ती यज्ञभूमी सज्ज होत असतानाच त्या भूमीवर रक्त का सांडू दिलंत? का तिथं नरबलीची आवश्यकता होती?’

भीष्म काही बोलले नाहीत.

भीमाच्या त्या निरोपाने कर्णाचा संताप उसळला. तो उभा राहिला.

‘सामोपचारानं आमंत्रण पाठवलं, तर हा निरोप? वनवास भोगत असतानाही रणयज्ञात सर्व कौरवांची आहुती घालण्याचा संदेश पांडव पाठवितात अन् आमची राजसभा तो शांत चित्तानं ऐकून घेते. मित्रा दुर्योधना, यांतल्या कुणाला तुझ्या राज्याची, तुझी किंमत वाटत नसेल; पण त्याची चिंता तू बाळगू नकोस. तू आनंदानं हा यज्ञ कर. त्यानंतर ज्या दिवशी युधिष्ठिराचा पराभव करून तू राजसूय यज्ञ करशील, तेव्हाच तुझं हे कौरवसाम्राज्य सुरक्षित होईल. त्यासाठी मी आज प्रतिज्ञा करीत आहे. ती ऐक.’

कर्णाने क्षणभर उसंत घेतली.

साऱ्या राज्यसभेचे लक्ष कर्णावर स्थिरावले होते.

कर्णाने उच्च रवाने आपली प्रतिज्ञा सांगितली.

‘जोवर मी अर्जुनाचा वध केला नाही, तोवर दुसऱ्याकडून पादप्रक्षालन करून घेणार नाही. मद्य अन् मांस वर्ज्य करीन अन् कोणाही याचकाला इष्ट वस्तू देण्याचं व्रत अखंड चालवीन. या व्रताचा मी आज नियम करीत आहे.’

दुर्योधनाने अतिस्नेहाने कर्णाचा हात हाती घेतला. त्याच्या हाताची पकड कर्णाला जाणवली.

# ३१

दुर्योधनाने यज्ञ सुखरूपपणे पार पाडला. यज्ञास आलेले सर्व नृपती, महाभाग, ब्राह्मण यांचा द्रव्य व मूल्यवान वस्तू अर्पण करून यथाशास्त्र, यथाक्रम सन्मान केला अन् त्या सर्वांना निरोप देऊन दुर्योधन, कर्ण-शकुनींसह हस्तिनापुरास आले.

सायंकाळी कर्ण आपल्या गृही अधिरथ, राधा, शत्रुंजय, वृषकेतु, वृषसेन यांच्यासह बोलत असता चक्रधर अधिरथांना म्हणाला,

'ऐक आनंदाची बातमी सांगणार आहे सांगणार आहे.'

'कसली?' अधिरथांनी विचारले.

'अंग्देशाचं राज्य मला मिळणार आहे.'

'अंगदेशाचं राज्य?' सारे उद्गारले.

'हो!'

'कोण देणार?' कर्णाने विचारले.

'तुम्ही!'

सारे चक्रधराकडे पाहत होते. चक्रधराने सांगितले,

'आता कर्ण इथंच राहणार! एवढ्या वर्षांत त्याला राज्याची आठवण नाही, काळजी नाही, तेव्हा ते राज्य मलाच मिळायला नको?'

सारे हसले.

कर्ण म्हणाला,

'नाहीतरी माझ्या नावानं तूच राज्य करतोस ना? मित्रा, मला तुझं बोलणं समजलं. आता मी मोकळा झालो. तू म्हणशील, तेव्हा आपण निघू.'

'मी इथंच राहणार.' वृषसेन म्हणाला.

कर्णाने वृषसेनाकडे पाहिले.

वृषसेन आता मोठा झाला होता. शस्त्रपारंगत बनला होता. राधाई म्हणाली, 'राहू दे, रे!'

'मी कुठं नको म्हणतोय्?' राधाईमागे उभ्या असलेल्या वृषालीकडे पाहत कर्णाने विचारले,

'तू तरी येणार का?'

-आणि एकच हसणे तेथे उसळले.

कर्णाने आपला बेत दुर्योधनाला सांगितला, तेव्हा तो गंभीर झाला.

दुर्योधन म्हणाला,

'मित्रा, तू अंगदेशी जाणं आवश्यक आहे, हे मला पटतं; पण तुला फार काळ राहता येईल, असं! वाटत नाही. पांडवांचा वनवास संपताच, अज्ञातवासाच्या वर्षात त्यांना शोधायला हवं.'

'युवराज, चिंता करू नका! आपण बोलवाल, तेव्हा मी धावत येईन.'

कर्ण अंगदेशाला निघाला, तेव्हा बऱ्याच अंतरापर्यंत दुर्योधन त्याला पोहोचवायला

गेला होता...

# ३२

कर्ण-दर्शनासाठी आतुर झालेल्या अंगवासीयांनी कर्णाचे अपूर्व असे स्वागत केले. प्रजेचा तो अनंद पाहून कर्णाला समाधान वाटले. त्या प्रजेच्या कल्याणासाठी कर्णाने स्वत:ला वाहून घेतल. समृद्ध गाशाळा, तृप्त प्रजाजन पाहत कर्ण वृषालीसह अंगदेशाचे राज्य करीत होता.

रात्री अचानक कर्णाला जाग आली. हजारो भुंगे एकाच वेळी गुंजारव करावेत, तसा नाद त्याच्या कानांत भरला. कर्णाने डोळे उघडले. सारा महाल सुवर्णप्रकाशात झळाळत होता. कर्णाने वळून पाहिले, तो वृषाली शांतपणे झोपी गेली होती. तो सूर्यप्रकाश, तो अखंड उठणारा नाद ऐकत असूनही कर्णाला भीती वाटली नाही. कर्णाने सावकाश पडल्या जागेवरूनच मान वळवली.

महालाच्या मध्यभागी एक दीप्तिमान आकृती उभी होती. सुवर्णतेजाने भरलेली.

नकळत कर्ण उठून उभा राहिला.

ती तेजबद्ध आकृती दिसत होती; पण तिचे रूप त्या तेजातच लपले होते. एखाद्या खोल विहिरीतून गंभीर नाद उठावा, तसा आवाज उमटला :

'कर्णा, मी आलोय्.'

'ज्याची नित्योपासना तू करतोस, ज्याच्या तेजानं तुझं मन सदैव भरलेलं असतं, तो मी- सूर्य.'

आपल्या आराध्यदैवताच्या दर्शनाने कर्णाचे मन उचंबळून उठले. धावत जावे आणि त्या चरणांना मिठी मारावी, असे त्याला वाटले; पण त्या तेजाला स्पर्श करण्याचे धाडस कर्णाला झाले नाही. नम्र भावाने त्याचे हात जोडले गेले.

'कल्याण असो!' सूर्याने आशीर्वाद दिला. तो प्रकाश बोलत होता. 'हे कर्णा, आज मी विशिष्ट हेतूनं तुझ्यासमोर उभा आहे.'

'आज्ञा!'

'कर्णा, आता लौकरच पांडवांचा वनवास संपेल. अज्ञातवासाचं वर्ष उलटताच ते प्रगट होतील. वर्षा-ऋतूत क्षुधेनं व्याकूळ झालेले मृगेंद्र वर्षा-ऋतू संपताच मृगयेसाठी जसे बाहेर पडतात, तसे पांडव बाहेर पडतील- पृथ्वी पादाक्रांत करण्यासाठी. त्या पांडवांच्या भावी विजयासाठी प्रत्यक्ष इंद्र उद्या तुझयाकडं येईल.'

'देवेंद्र इंद्र? अन् माझ्याकडं?'

'हो! अन् तोही याचक म्हणून.'

'पण इंद्रदेवांना पांडवांसाठी कष्ट घेण्याचं कारण?'

'कारण जसा तू साझा भक्त आहेस, तसा अर्जुन इंद्राचा.'

देवेंद्र माझ्याकडं याचनेसाठी येतात, यापेक्षा जीवनाची सार्थकता कोणती? ते मी माझं भाग्य समजतो. त्यायोगे माझी तपश्चर्या फळाला आली, असंच मी समजेन. पण, देवा, देव याचक म्हणून जरी आले, तरी त्यांना तृप्त करण्याचं सामर्थ माझं कुटलं? असं

माझ्याजवळ कोणतं धन आहे की, ज्यासाठी इंद्रदेवांनी स्वर्गातून खाली उतरावं?'

'तुझी कवचकुंडल.'

'कवचकुंडलांचं काय?'

'ती मागण्यासाठी इंद्र येत आहे. जोवर कवचकुंडलं तुझा शरीरावर आहेत, तोवर तुझा पराजय नाही, हे इंद्राला माहीत आहे. उद्या कौरवपांडवांचं युद्ध सुरू झालं, तर पांडवांना विजय कसा प्राप्त होणार? कर्णा, ही दोन रत्नकुंडलं अमृतापासून निर्माण झाली आहेत. तुला जीवित प्रिय असेल, तर ती तू नीट जतन कर.'

कर्णाला काही सुचत नव्हते. बोलवत नव्हते.

ती कर्णाची अवस्था जाणून सूर्य म्हणाला,

'कर्णा, मला माहीत आहे की, तू कोणाही याचकाला कधीही विमुख पाठवीत नाहीस. याचक नेहमीच तुझ्या दानानं तृप्त होऊ माघारी जातात. माझ्या चाललेल्या अखंड प्रवासात नदीतीरावरचं तुझं पुरश्चरण अन् दान पाहणं हा सुखाचा भाग असतो; पण प्रत्येक गोष्टीला मर्यादा ही असतेच. कुटिल हेतूनं मागितलेलं दान पुरवणं हे दातृत्व नव्हे, तो अविवेक म्हणावा लागेल.'

'देवा, मी आपली अमर्यादा कशी करीन? आपण माझं कल्याण चिंतिता, यातच माझ्या जीवनाची धन्यता मानतो. त्याच जिव्हाळ्यापोटी धाडस करावंसं वाटतं.'

'कर्णा, संकोच करू नकोस मन मोकळं कर.'

'आज्ञा! देवा, आपण आपल्या तेजानं पृथ्वी प्रकाशमान करता. त्या प्रकाशात जशी पुण्यकर्मं घडतात, तशीच पापकर्मंही; पण ती पापं घडतात, म्हणून आपण आपल्या प्रकाशाला कधी आवर घातलात का? याचकाला देणं एवढंच माझ्या हाती आहे. ते कोणा, कशासाठी वापरतं, याचा विचार करण्याचा मला अधिकार नाही. तो माझा धर्मही नव्हे.'

'तुझ्या बोलण्यानं मी तुझ्यावर प्रसन्न आहे. क्षणभर तू माझं देवत्व विसर; पण एक गोष्ट लक्षात घे. मी असतो आकाशी अन् कर्म घडतं पृथ्वीवर. त्या पापपुण्यांचा मला स्पर्श नसतो. पण कुणी माझं तेज मागितलं, तर ते मी कदापिही देणार नाही. कारण तसं झालं, तर त्या वेळी मी सूर्य राहणार नाही. मी त्या तेजाला बद्ध आहे, तसाच तूही तुझ्या जन्मजात सहज कवचकुंडलांना. जोवर तुझ्या देहावर ती कवचकुंडलं आहेत, तोवर त्यांच्यायोगे निर्मल आकाशात विशाखा नक्षत्रांच्या दोन तारकांमध्ये चंद्र शोभतो, तसा तू राहशील. कवचकुंडल दान केलीस तर, फक्त कीर्ती उरेल, जीवित राहणार नाही.'

'तसल्या जगण्यापेक्षा कीर्तिरूप मृत्यू मी कवटाळीन.'

'हा कीर्तीचा अहंकार जिवंत असेपर्यंतच भोगता येतो. कर्णा, हे निष्पापा, मनुष्य जिवंत असेपर्यंतच त्याला ऐश्वर्य, स्नेह, प्रेम भोगता येतं. मृत्यूनंतर कीर्ती राहते; पण ती भोगता येत नाही.'

'जीवनातल्या निस्तेज भोगापेक्षा मी मरणोत्तर लाभणारी उदात कीर्ती मोलाची मानतो. मी त्याच जीवनाचा स्वीकार करीन. आपण माझ्या हितासाठी आलात, मला सावध केलंत, त्याचं विस्मरण मला केव्हाही होणार नाही. सामान्य मानव मी. माझ्या हिताच्या चिंतेनं साक्षात सूर्यानं धावावं, यापेक्षा धन्यता कोणती? अन् माझं यश कुणी मानवानं हिरावून घेण्यापेक्षा ते देवांनी लुटलं, तर त्यापेक्षा दुसरं भाग्य कोणातं?

'कर्णा, मला राहवलं नाही, म्हणून मी आलो. वाटलं, ते सांगितलं. त्याचा स्वीकार

अथवा अव्हेर करणं हे तुझ्याच हाती आहे.'

कर्ण त्या शब्दांनी व्यथित झाला. तो कळवळून म्हणाला,

'क्षमा! देवा, क्षमा!! आपण रुष्ट होऊ नका. मी आपला भक्त आहे. माझं सर्वस्व मी आपल्या चरणांशी नित्य वाहतो. आपल्या प्रेमभावाचा अनादर मी कसा करीन? परमेश्वरा, साक्षात तेज असं आपल रूप! मी आपल्याला प्रिय असेन, तर माझा भाव जाणून, आपण मला माझ्या व्रतापासून परावृत्त करू नये, एवढीच प्रार्थना!'

'ठीक आहे, कर्णा! मी तुझ्या व्रताआड येणार नाही. माझा आग्रह नाही. मी तुझ्यावर रुष्ट नाही. उलट, माझ्या मनात वसणारं तुझ्याबद्दलचं प्रेम तुझ्या या निर्णयामुळं अधिकच वाढलंय्. तुझ्या हितासाठी एक सांगतो. तेवढं मात्र ऐक.'

'आज्ञा!'

'इंद्र येईल. त्याला तू आपली कवचकुंडलं देशील, यात संशय नाही; पण त्या वेळी त्या देवेंद्राकडून एक अमोघ शक्ती मागून घे. तशी वेळ पडलीच, तर तुझं

'भगवान! मी इंद्राकडून शक्ती मागून घेऊ?' कर्णाने विचारले.

'आता विरोध करू नकोस! माझी आज्ञा समज.'

'जशी आपली आज्ञा! दात्या कर्णाच्या निष्कलंक जीवनावर देवाज्ञेनं याचनेचा कलंक लागणार असेल, तर तो चंद्राच्या कलंकाइतकाच शोभिवंत दिसेल. त्याचा मला अभिमान वाटेल.'

कर्ण नतमस्तक झाला. नाद मंदावता-मंदावता नाहीसा झाला. कर्णाने पाहिले; सुवर्णप्रकाश लुप्त झाला होता. पहाटेचा धूसर प्रकाश गवाक्षातून येत होता. कर्णाची दृष्टी वृषालीवर गेली. वृषाली शांतपणे झोपी गेली होती. झाला तो भास, दृष्टांत, की स्वप्न याचा विचार करीत कर्ण शय्येकडे गेला.

# ३३

**स**काळपासून कर्णाचे मन रात्रीच्या प्रसंगातच गुरफटले होते. दुसऱ्या कशात लागत नव्हते. सूर्योपासनेची वेळ नजीक येताच कर्णाने रथ सज्ज करण्याची आज्ञा केली. कर्ण दर्पणासमोर उभा असता मागे आलेल्या वृषालीकडे त्याचे लक्ष गेले. वृषालीने विचारले,

'काय पाहता?'

'रूप!'

'मग त्यात नवीन काय आहे!'

'वृषाली, आपलं रूप नित्य पाहत असूनही आपल्याला रूपाचा कंटाळा येत नाही. ते रूप अधिक मोहवीत जातं. उद्या हरवलेलं रूप पाहण्याचं बळ लाभेल ना?'

'काय हरवलं?'

'काय हरवत नाही? प्रत्येक दिवसाबरोबर वार्धक्य नजीक येत असतं, सूक्ष्मतेनं बळ हरवत असतं. शरीराबरोबर मनाचं बळ सरत असतं. पण दर्पणामध्ये दिसतं, ते तेच मोहक रूप! या मानवी रूपाचा जर एवढा मोह वाटतो, तर रूपाचं दैवत समजलं जाणाऱ्या त्या इंद्राचं रूप कसं असेल?'

'आपलं मन आज ठिकाणावर दिसत नाही.'

'का?' कर्णाने वळून विचारले.

'सकाळपासून आपलं लक्ष कशातच नाही. त्यात असलं बोलणं. प्रत्येक सरकणाऱ्या पळाकडं आपलं लक्ष गुंतलं आहे. नित्याच्या सूर्यपूजेला अद्याप अवधी असतानाच रथ सज्ज करण्याची आज्ञा दिलीत. आज पूजेसाठी मन अधीर झालेलं दिसतंय्.

'खरं आहे.' कर्ण स्मितवदनाने म्हणाला, 'वसू या पूजेसारखा भाग्यशाली क्षण नाही. देवदर्शनाची संधी कोण सोडील?'

'देवदर्शन?'

स्वत:ला सावरीत कर्ण म्हणाला,

'हो ना! नदीपात्रात उभं राहून मी सूर्यस्तुती करीत असतो, उभ्या सूर्यकिरणांचं स्नान घडत असतं, तेव्हा त्या तेजानं आपणच भारले जात आहो, असा भास होतो. ज्ञात-अज्ञातांचा वस्त्र पडून चतान्यरूपाचा साक्षात्कार म्हणजच परमेश्वरदर्शन नाही का? त्या क्षणासाठी जीव उतावीळ झाला, तर नवल कसलं?'

वृषालीचा निरोप घऊन कर्ण सूर्योपासनेसाठी महालाबाहर पडला. प्रासादासमार रथ सज्ज होता. कर्ण रथारूढ होताच सारथ्याने रथ हाकारला.

रथ नेहमीप्रमाणे नदीकाठापासून दूर, दाट वृक्षराईत थांबला. सारथी व रथ तेथेच थांबवून कर्ण एकटा नदीच्या दिशेने जाऊ लागला.

तळपत्या उन्हात नदीच्या दोन्ही बाजूंना रुंद वाळूकिनारे मोकळे होते. त्या किनाऱ्यांमधून वाहणारा निळाशार जलप्रवाह डोळे सुखावत होता. कुठेच मानवी जाग

लागत नव्हती. नदीकडे जात असता वाळूत रुतणाऱ्या पावलांचा आवाज उठत होता. कर्णा नदीपात्राजवळ आला. त्याने आपले उत्तरीय नदीकाठावर ठेवले. आपली पादत्राणे काढून वाळूवरून चालू लागला. तप्त वाळूचा पोळणारा स्पर्श त्याच्या तळव्यांना होत होता. नदीच्या पाण्यात प्रवेश करताच त्या तापल्या पावलांना थंडावा लाभला. त्या उथळ प्रवाहातून कर्ण तसाच चालून गेला. पाणी वाढत होते. कर्णाने त्या नदीप्रवाहावर आपले अंग झोकून दिले. कर्णाचे हात जलद गतीने पाण्यावर फिरत होते. थोडे पोहून गेल्यावर तो माघारी वळला. नदीकाठावरच्या जलात तो उभा राहिला. कपाळावर आलेले ओले केस मागे परतवून, तो किनाऱ्याकडे पाठ करून उभा राहिला. जलबिंदूंनी व्यापलेला त्याचा चेहरा सुवर्णकिरणांनी उजळला. कर्णाने सूर्यवंदन केले आणि दोन्ही बाहू उंचावून सूर्योपासना चालू झाली. कर्ण एकाग्र मनाने सूर्यचिंतन करीत होता.

अपराह्ण काळी कर्णाची सूर्यपूजा संपली. उन्हाने केस कोरडे झाले होते. कर्णाने वाकून नदीचे पाणी हाती घेतले. ती ओंजळ उंचावीत असता त्याच्या मनाची अधीरता वाढत होती. त्याने हाक दिली,

'कुणी याचक आहे?'

त्या हाकेला उत्तर आले नाही.

त्या शांततेने मन विचलित झाले. त्याने परत हाक दिली.

'कुणी याचक आहे?'

'आहे!' मागून आवाज आला.

'याचका, तुझं स्वागत असो! तुला काय हवं?'

'दान!'

'कसलं? माझं पौरुष आणि धर्म यांना सुरक्षित ठेवून काहीही मागा. आपलं इच्छित पुरं केलं जाईल. मी या सूर्यदेवाला साक्ष ठेवून आपलं मनोवांछित पूर्ण करण्यास बद्ध होत आहे त्या दानानं आपली मनोकामना पुरी होवो.'

कर्णाने ओंजळीतले जल नदीपात्रात सोडले आणि तो इंद्रदर्शनासाठी वळला.

इंद्राला वंदन करण्यासाठी जोडले जाणारे हात अडखळले. नदीतीरावर एक ब्राह्मण याचक म्हणून उभा होता. त्याची कृश शरीरयष्टी, त्याने परिधान केलेली जीर्ण वस्त्रे त्याच्या दारिद्र्याची ओळख करून देत होती.

कर्ण ते रूप पाहून अचंबला. त्याने आजूबाजूला पाहिले. दुसरे कोणी दिसत नव्हते.

'अंगराजाचा विजय असो!'

कर्णाने त्याला निरखून पाहिले, आपले हात जोडले व त्याला विचारले,

'हे विप्रा! सुवर्णालंकारांनी युक्त अशा तरुण रूपवान स्त्रिया किंवा गोधनानं समृद्ध असलेली गावं यांपैकी मी तुला काय देऊ?'

विप्र हसला.

'अंगराज, आपण दान दिल आहे. फक्त त्या दानाचा निर्देश करणं अन् ते आपल्या हातून घेणं एवढंच राहिलंय.'

'निर्भय मनानं मनोवांछित सांगा. ते अवश्य मिळेल. कर्णाच्या दातृत्वाबद्दल

कर्णाची दृष्टी त्या विप्राला न्याहळीत होती. कर्णाची शोधक दृष्टी टाळीत तो विप्र म्हणाला,

'अंगराज, सारीच दानं आनंददायक नसतात. काही भारी क्लेशकारक असतात.'

'अशा दानानं तुम्ही तृप्त व्हाल ना? मग आपण माझ्या यातनांची चिंता करू नका. आपणांसाठी त्या यातना मी आनंदानं सहन करीन.'

कर्णाच्या त्या निर्भय रूपदर्शनाने तो विप्र संकोचला. दानाचा उच्चार करण्याचे बळ त्याला राहिले नाही.

विप्राची ती अवस्था पाहून कर्ण मनातून आनंदला. विप्राचे बोल ऐकण्यास तो अधीर झाला असता त्याच्या कानांवर शब्द आले,

'अंगराज! मला... मला तुमची कवचकुंडलं हवीत...'

'दिली!' कर्णाने सुटकेचा निःश्वास सोडला.

विप्राच्या मुखावर स्मित उमटले; पण ते फार काळ टिकले नाही.

कर्णाच्या चेहऱ्यांवरचे हास्य विरले होते. नेत्रकडांवर अश्रु गोळा झाले होते. ते अश्रु पाहून विप्राने विचारले,

'महाराज, दानाचं दुःख होतं?'

कर्णाने अश्रू पुसले. खिन्नपणे हसत तो म्हणाला,

'कर्णाला दानाचं दुःख नाही; पण याचनेची क्षुद्रता आज जाणवली. याचनेसारखं दारिद्र्य या जगात दुसरं नाही, याचं प्रत्यंतर आज आलं. नाहीतर ऐश्वर्य आणि अधिकार यांनी संपत्र देवेंद्राला याचना करताना दरिद्री ब्राह्मणाचं रूप का घ्यावं लागलं असतं?'

तो विप्र ओशाळला. त्याने विचारले,

'आपण मला ओळखलंत?'

'आपण माझ्याकडं कवचकुंडल मागण्यासाठी येणार आहात, हे मला आधीच समजलं होतं. आपल्या दर्शनासाठी मी आतुर झालो होतो. त्यासाठी मी अधीर आहे.'

'तुला कुणी सांगितलं?'

'जसा अर्जुन आपला भक्त, तसा मी सूर्याचा.'

विप्रवेशातील इंद्राच्या मुखावर हास्य प्रगटले. कर्णाचे लक्ष इंद्राच्या पावलांकडे लागले होते.

त्या काष्ठवत पावलांचे रूप बदलले. विप्राने नेसलेल्या अंतरीयाचे पीतांबरात रूपांतर झाले.

कर्णाची दृष्टी उंचावत होती.

हिरण्यवर्णीय दीर्घबाहू इंद्राचे वज्रधारी रूप पाहून कर्ण तृप्त झाला. कर्णावर छाया पसरली. गार वाऱ्यांचा झोत अखंड वाहू लागला. कर्णाने वर पाहिले. आकाशात एक कृष्णमेघ त्या दोघांवर सावली धरून उभा होता. अत्यंत आदरयुक्त भावाने कर्णाने इंदरला वंदन केले

'कल्याण असो! राधेया, कवचकुंडलं देणार ना?'

कर्णाने आपल्या कवचाकडे पाहिले. कर्ण अद्यापि पाण्यात उभा होता. तो पाण्यातून बाहेर आला. किनाऱ्यावर उत्तरीय होते. रथ, सारथी, शस्त्र सारे दूर वृक्षराईत होते.

कर्णाची अडचण इंद्राच्या ध्यानी आली. इंद्राने आपला उजवा हात पुढे केला. त्या हातावर एक धारदार शस्त्र होते.

कर्णाने ते हाती घेतले. कर्ण त्या शस्त्राकडे पाहत होता.

'कर्णा, विचार कसला?'

कर्णाने इंद्राकडे पाहिले. तो म्हणाला,

'देवा, मी एक सामान्य मानव. सूतकुलात वाढलेला. पूर्वपुण्याईची खूण सांगणारी एवढी एकच खूण- कवचकुंडलं. एवढंच माझ्या जीवनातलं दैवी लेणं. ते आज जाणार, याची खंत वाटत नाही; पण ते जात असताना, त्याबरोबरच उरलेलं हे मानव रूप, ते विरूप होणार नाही ना, अशी भीती वाटते. आपण साक्षात रूपाचं दैवत. आपण समोर असता ज्याचा मला सदैव अभिमान वाटतो, असं माझं रूप, ते या दानानं विरूप होऊ नये, असं वाटतं.

'तथास्तु! कर्णा, तसंच घडेल! त्याबद्दल तू निश्‍चिंत ऐस.' कर्णाने ते शस्त्र पेलले. इंद्र कर्णाच्या मुखाकडे पाहत होता. पण आपल्या हातांनी आपली कवचकुंडल कापीत असता त्याच्या मनोविकारांच्या दर्पणावर दु:खाची किंचितही छटा प्रकटली नव्हती, की समाधान ढळत नव्हते. कर्ण स्मितमुखच होता. कवचकुंडले कापीत असता येणाऱ्या रुधिरापाठोपाठ शरीर पूर्ववत बनत होते.

कवचकुंडले कापून हाताच ती त्याने हातांत घेतली. इंद्राचे दोन्ही हात समोर आले होते. पद्मदलाप्रमाणे शोभणाऱ्यां त्या सुंदर हातांवर कर्णाने शस्त्रासह कवचकुंडले ठेवली आणि कर्णाच्या डोळ्यांदेखत ती त्या हातांवरच अंतर्धान पावली.

कर्णाचे लक्ष त्या रित हातांवर खिळले असता त्याच्या नेत्रांतून दोन टपोरे अश्रु ओघळले.

'दानाचं दुख वाटतं?' इंद्राने विचारले.

नकारार्थी मान हलवीत एक नि:श्वास सोडून कर्ण म्हणाला,

'नाही! दु:ख दानाचं नाही; माझ्या दुर्भाग्याचं दु:ख वाटतं.'

'कसलं दुर्भाग्य?' इंद्राने आश्चर्याने विचारले.

'माझ्या कवचकुंडलांना आपल्या हातावर विरून जाता आलं, हे त्या कवचकुंडलांचं भाग्य. त्यांचा मला हेवा वाटला. मानवी जीवनाची सार्थकता तरी दुसरी काय असते? परमेश्वररूपात विलीन होण्याचीच ना! आपण माझी कवचकुंडलं मागितलीत; पण मला मागितलं नाहीत. त्या हातांत विरून जाण्यात केवढी धन्यता वाटली असती! कवचकुंडलं हे जसं परमेश्वरी वरदान, तसंच हे शरीरही. त्या या देहाचा आत्म्यासह स्वीकार झाला नाही, याचं दुख वाटतं. देवा, आपण मलाच का मागितलं नाहीत? मी माझं सर्वस्व अत्यानंदानं आपल्या चरणी वाहिलं असतं. त्यातच जीवनाची कृतार्थता मानली असती.'

अर्जुनाच्या रक्षणासाठा कवचकुंडले हरण करण्यासाठा आलला इंद्र कर्णाच्या शब्दांनी, त्याच्या मनाच्या निर्मळ दर्शनाने वरघळला. कर्णाचे ते भाववड रूप पाहून इंद्राने न राहवून कर्णाला आलिंगन दिले.

त्या तजमय रूपान कर्ण बद्ध असतानाच त्याच्या कानांवर शब्द आले ,

'राधेया, देवांना सारंच पेलतं, असं थोडंच आहे? तुझं निर्मळ रूप सामावून घेण्याची शक्ती माझी नाही. कर्णा, तुझं दातृत्व, तुझा सद्भाव अलौकिक आहे. मी तुझ्यावर प्रसन्न आहे. तुला काही हवं असेल, तर मागून घे.'

कर्णाला सूर्याला दिलेल्या वचनाचा आठवण झाला; पण याचना करण्याच धैर्य त्याला होईना.

'काही हवं का? माग...'

कर्ण संकोचाने म्हणाला,

'आपल्या कृपादृष्टीनं पर्जन्यवृष्टी होते. शुष्क भूमीला ओलावा मिळतो. ती धनधान्यांनी संपत्र बनते. आपली कृपादृष्टी झाली, तर काय होणार नाही? आपण कवचकुंडल मागावयास याल, तेव्हा आपल्याकडून एखादी शक्ती मागून घेण्यासाठी मी वचनबद्ध होतो. आपल्या दर्शनानं सारे भाव हरपले. काही मागता आलं नाही. आता तो अधिकार ही राहिला नाही. आपली कृपा असेल, तर आपण शत्रुनाशिना अमोघ शक्ती मला द्या. बलवत्तर शत्रूपासून मला रक्षण प्राप्त होईल. बलिष्ठ शत्रूचा मला नाश करता येईल, द्यायचंच झालं, तर तेवढं द्या.'

'तथास्तु! कर्णा, तुझी इच्छा पुरी होईल. आज मी माझी वासवी शक्ती तुझ्या हाती देत आहे. या शक्तीच्या साहाय्यानं तुला एकाच शत्रूचा नाश करता येईल. या शक्तीचा वापर झाला की, त्यानंतर ती पूर्ववत माझ्याकडं येईल. एवढंच सांगावंसं वाटतं की, या शक्तीचा वापर स्वार्थप्रेरित हेतूनं करू नकोस.'

कर्णाने वासवी शक्तीचा स्वीकार केला. इंद्राला नम्र भावाने वंदन केले. आशीर्वादासाठी उंचावलेला इंद्राचा हात पाहून कर्णाने नेत्र मिटले.

डोळे उघडले, तेव्हा ते दिव्य रूप नाहीसे झाले होते. आकाशातला घनमेघ लुप्त झाला होत सूर्यकिरणांच दाह प्रगटला होता

कर्णाने उत्तरीय घेतले. ते अंगावर घेत असता त्याचे हात छातीवरून फिरले. काया तीच होती; पण लुप्त झालेल्या तेजाची जाणीव होत होती.

कर्ण प्रासादावर आला. कर्णाच्या मुखावर विलसणारा आनंद वृषालीला जाणवत होता. भोजन झाल्यानंतर कर्ण आपल्या महालात गेला. वृषाली कर्णाला निरखीत होती. कर्णाचा वाढलेला प्रसन्न भाव पाहून, का, कोण जाणे, तिला समाधान वाटत नव्हते. ते कर्णाच्या ध्यानी आले. वृषालीला जवळ घेत कर्णाने विचारले,

'काय पाहतेस, वसू?'

'काही नाही.'

'सांगा ना!'

'सूर्योपासनेहून आपण आल्यापासून मी पाहत आहे. आपण आनंदी दिसता; पण आपल्या...'

'रूपात काही तरी उणीव भासते, असंच ना?'

वृषालीने होकार दिला.

'वृषाली, तुला सांगितलें, तर खरं वाटेल? आज साक्षात देवेद्र माझ्याकडं याचक म्हणून आला होता.'

'देवेंद्र?'

'हो!'

'काय मागितलं त्यांनी?' वृषालीच्या मुखावर कौतुक प्रगटले.

'माझी कवचकुंडलं.'

वृषालीचा भाव बदलला. तिच्या चेहऱ्यांवर भीती प्रगटली. कर्णरूपाची उणीव चटकन तिच्या लक्षात आली. शरीरकांतीपेक्षा अधिक कांतीने शोभणारी कवचकुंडले तशीच दिसत होती; पण त्यांची दीप्ती लुप्त झाली होती.

‘अन् आपण ती दिलीत?’

‘कर्णानं कोणाही याचकाला विमुख पाठविलं नाही. तो तर देवेंद्र. त्याला मी नाही कसं म्हणणार?’

वृषाली दु:खाने कर्णाला बिलगली.

‘आपण त्या देवेंद्राचं काय केलं केलं होतं, म्हणून त्यानं आपली कवचकुंडलं हिरावून घेतली? कशासाठी?’

‘वृषाली, देवांनासुद्धा आपल्या अधिकाराचा, शक्तीचा अहंकार असतो. जी देवांना प्राप्त नाही, अशी शक्ती मानवाजवळ असेल, तर ते कसं खपणार? कदाचित त्याचमुळं...’

‘आपण इंद्राला विचारलं नाही?’

‘मला दान देणं एवढंच माहीत आहे. याचकाला मी कधीही कारण विचारलं नाही.’

वृषालीचे हात कर्णाच्या विशाल छातीवरून फिरत होते- जणू हरवलेले कवच ती शोधीत होती. तिच्या डोळ्यांत अश्रु उभे राहिले.

हळुवार हाताने वृषालीची हनुवटी उंचावीत कर्णाने आपली दृष्टी तिच्या डोळ्यांना भिडवली. त्या अश्रुपूर्ण डोळ्यांचे चुंबन घेत कर्ण म्हणाला,

‘वसू, तू रडतेस? माझी कवचकुंडलं गेली, म्हणून?’ कर्ण हसला, ‘वसू, माणसानं आपल्या बाहुबलावर आपला पराक्रम सिद्ध करावा. त्यासाठी दैवी लाभाचा आश्रय घेऊ नये. कवचकुंडलं गेली, याचा उलट तुला आनंद वाटायला हवा होता.’

‘आनंद?’ वृषालीने आश्र्चर्याने विचारले.

‘होय ना! तुला आठवतं? एका अपरात्री मी जागा झालो होते. तेव्हा तू जागी असल्याचं माझ्या ध्यानी आलं. कसल्या तरी भयानक स्वप्नानं तुला जागं केलं होतं. भीतीनं विहल झालेली तू माझ्या जागे होण्याची वाट पाहत होतीस. ते समजताच मी तुला म्हणालो, ‘एवढी भीती वाटत होती, तर तू माझ्या जवळ का आली नाहीस?’ तेव्हा तू काय सांगितलं होतंस, आठवतं?’

‘काय?’ वृषालीने विचारले.

‘तू म्हणालीस, रात्री कधी मी जागी झाले, तर आपल्याकडं यावं, असं वाटतं, पण आपल्याला बिलगण्याचं धाडस होत नाही. कारण रात्रीच्या काळोखात आपली कवचकुंडलं वेगळ्याचं तेजानं जाणवतात. त्यांची भीती वाटते... वसू, यापुढं तो दुरावा राहणार नाही. तुला केव्हाही नि:संकोचपणे मला बिलगता येईल.’

वृषालीला आपल्या मिठीत बद्ध करीत कर्ण म्हणाला,

‘तुलाच काय, पण यापुढं शत्रूंनासुद्धा मनात भय न बाळगता माझ्या छाताशा भिड़ता येईल.’

दुर्योधनाच्या निरोपाबरोबर कर्ण हस्तिनापुरात आला.

दुर्योधन-महालात शकुन, दु:शासन जमले होते.

कर्ण महालात जाताच दुर्योधनाने त्याचे स्वागत केले. दुर्योधन म्हणाला,

‘मी तुला तातडीनं बोलावलं, त्याचं कारण समजलं?’

‘नाही.’

'विराटाघरी कीचकाचा वध झाल्याचं निश्चितपणं कळलंय्.'

'वध?'

'हो! निर्घृण वध! अन् तोही गंधर्वांकरवी. विराटाच्या नृत्यशाळेत सेनापती कीचकाचा छित्र-विछित्र देह सापडला. रक्तामांसानं विखुरलेल्या अवयवांनी ती भूमी माखली होती. विराटाघरी सैरंध्री नामक एक रूपसंपत्र दासी होती. तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा कीचकानं प्रयत्न केला, म्हणून तिचं रक्षण करणाऱ्या गंधर्वानं कीचकाला शासन केलं.'

कर्ण विचारात गर्क होता. तो काही बोलत नाही, हे पाहून दु:शासनाने विचारले,

'अंगराज, आपण बोलत का नाही?'

'काही नाही. मी विचार करीत होतो. गंधर्वांच्या हातून असा अमानुष प्रकार होणार नाही. हे सामर्थ्य फक्त एकाचंच आहे.'

'कुणाचं?' दु:शासनाने विचारले.

'भीम!' कर्णाने सांगितले,

सारे त्याच्याकडे पाहत राहिले.

'युवराज, अज्ञातवासात राहणाऱ्या पांडवांना तू शोधतोय्स ना? मग विराटाचं घर ही एक तशी जागा आहे.'

'आम्ही तोच विचार करीत होतो.' दुर्योधन म्हणाला.

'कसला?

'पांडवांची चिंता करण्याचं काही कारण नाही. पांडवांच्या शोधार्थ पाठवलेले

दूत माघारी आले आहेत. त्यांचा कुठंही सुगावा लागत नाही. ते नि:संशय मृत झाले असावेत.'

'युवराज, एवढ्या सहजपणं पांडवांचा मृत्यू ओढवायचा नाही. तुमच्या चतुर दूतांना, भरपूर द्रव्य देऊन, चारी दिशांना पांडवांचा शोध घेत फिरू दे. अज्ञातवासातल्या पांडवांचा शोध लागला नाही, तर अज्ञातवासाचं हे वर्ष संपताच ते प्रगट होतील युद्धासाठी

'ठीक आहे. मी तशी आज्ञा देतो.' दुर्योधनाने संमती दिली व त्याने सांगितले, 'राधेया, राजधानी त्रिगतीचा राजा सुशर्मा आलाय्. कीचकाचा वध झाल्यानं विराटराजा निराश्रय व निरुत्साही झाला आहे. त्या विराटनगरीवर चालून जावं, असं त्याचं मत आहे. राजसभेला ते मान्य आहे. भीष्म, द्रोण, विदुरांनी त्याला संमती दिली आहे.विराटस्वारीत आपल्याला विपुल धन, गोधन मिळेल अन् तो शरण येताच त्याचं बळही आपल्याला लाभेल.'

कर्णाने होकार दिला.

जास्त अवधी न दवडता भीष्म-द्रोणांसह कौरव विराट राज्यावर स्वारी करण्यासाठी ससैन्य निघाले. विराटाच्या स्वारीसाठी सैन्याचे दोन भाग केले होते. एका भागाने- सुशर्म्याने गोधन लुटावे, नंतर दुसऱ्या सैन्यभागाने उरलेले गोधन पळवावे, असे ठरले होते.

सुशर्म्याने ठरल्याप्रमाणे विराटाच्या गोपाळांस पळवून लावले आणि विराटाचे त्या

भागातले गोधन घेऊन तो परतला. कौरवांच्या सेनेने गोधन पळवल्याचे कळताच विराट हतबल झाला. तो आपल्या मोजक्या सैन्यानिशी विरोधाला उभा राहिला; पण सुशर्म्याने पराभव करून त्याला पकडले. सुशर्म्याची कामगिरी पार पडताच कौरवसेनेने दुसरा लढा उभारला. विराटपुत्र उत्तराला काही सुचेनासे झाले. त्याची दयनीय स्थिती पाहून विराटाघरी आश्रयाला राहिलेले अज्ञातवासातले पांडव प्रगट झाले. तुंबळ युद्धात पांडवांनी कौरवांचा पराजय केला. विराटाला सोडवले. त्या युद्धात अर्जुनाने कर्णाचा, भीष्मांचा, द्रोणांचा पराभव केला.

पांडव प्रकट झालेले पाहताच कर्णाने दुर्योधनाला मागे फिरण्याचा सल्ला दिला. तो म्हणाला,

‘युवराज, पांडव प्रकट झाले आहेत. या युद्धात जय-पराजयाचा निर्णय लावण्यापेक्षा भावी युद्धावर लक्ष केंद्रित करावयास हवं.’

दुर्योधनाने तो सल्ला मानला आणि चिंताग्रस्त मनाने कौरव हस्तिनापुरास परतले.

# ३४

**पां**डव प्रगट झाले आणि राजकारणाचे डाव अखंड सुरू झाले. द्रुपदाचा पुरोहित कौरवांच्या सभेत सलोखा करण्यासाठी आला; पण तो हेतू साध्य झाला नाही. पांडवांनी मगितलेल्पा अर्ध्या वाटणीचा दुर्योधन, कर्ण यानी अव्हेर केला. पांडवांचा संताप वाढू नये, म्हणून धृतराष्ट्राने संजयाला समझोता घडवून आणण्यासाठी पाठविले; पण तोही हेतू सफल झाला नाही. युद्ध अटळ आहे, हे दिसत असता, एके दिवशी कृष्ण शिष्टाईसाठी हस्तिनापुरात येणार असल्याची वार्ता आली. शिष्टाईसाठी कृष्ण येणार, या वार्तेमुळे भीष्म, द्रोण, विदुर आनंदित झाले होते. कृष्णभेटीमुळे काहीतरी उपाय निघेल आणि युद्ध टळेल, असे धृतराष्ट्रांना वाटले. कृष्णाच्या स्वागतात कोणतीही उणीव राहू नये, म्हणून त्याने आज्ञा दिली. कृष्णस्वागतासाठी तयारी होऊ लागली.

कृष्ण-आगमनाचा दिवस उजाडला. हस्तिनापूरचे राजरस्ते रांगोळ्यांनी चित्रविचित्र तोरणांनी सुशोभित झाले होते. कृष्णाच्या स्वागतार्थ नगराच्या बाहेर प्रचंड जनसमुदाय तिउत होता. त्यांच्या अपभागी भीष्म, द्रोण, विदुर आपल्या रथासहित उभे होते.फक्त त्यांत दुर्योधनाची कमतरता भासत होती.

कृष्णाचा रथ हस्तिनापुराच्या परिसरात प्रवेशला. प्रजाजनांच्या मुखांतून कृष्णाचा जयघोष उमटला. भीष्म, द्रोण, विदुरानी कृष्णाचे स्वागत केले. त्या वैभवपूर्ण स्वागताचा स्वीकार करून कृष्णान नगरप्रवेश केला. सर्वांसह कृष्ण राजप्रसादात गेला. प्रासादाच्या द्वारी दुर्योधनाने कृष्णाचे स्वागत केले. धृतराष्ट्रांची भेट घेऊन प्रासादाबाहेर येत असता दुर्योधनाने कृष्णाला आपल्या आतिथ्याचा स्वीकार करण्याचा विनंती केली ती अमान्य करून कृष्ण विदुरांच्या घरी गेला.

कृष्णा निघून जाताच दुर्योधन संतापाने कर्णाला म्हणाला,

‘मित्रा, पाहिलंस, तातांनी एवढ्या मोठ्या प्रमाणात कृष्णाचं स्वागत केलं; पण त्यानं माझ्या विनंतीचा स्वीकार केला नाही.’

कर्णाने दुर्योधनाला शांत केले. तो म्हणाला,

‘युवराज, कृष्णानं सांगितलें, ते काही खोटं नव्हे . कृष्ण दूत म्हणून आला आहे. शिष्टाई सफल झाल्याखेरीज दूतानं आतिथ्याचा स्वीकार करू नये, हेच इष्ट. युवराज, या गोष्टीचा विचार करण्याआधी उद्या कृष्ण काय सांगेल, याचा विचार करावा.’

‘त्यात विचार कसला करायचा? आपल्याला कृष्णाची शिष्टाई पटली, तर मान्य करू, नाहीतर...’

‘नाहीतर काय?’ कर्णाने विचारले.

‘नाहीतर कृष्णाला पकडून ठेवू. या खेपेला एवढ्या सहजपणे त्याला कौरवसभेतून बाहेर पडता येणार नाही.’

कर्णाच्या चेहऱ्यावर साक्षात भीती प्रगटली होती; पण कर्णाकडे न पाहताच दुर्योधन वळला आणि राजप्रसादाच्या पायऱ्या चढून गेला.

# ३५

वि दुराच्या प्रासादाला उत्सवाचे स्वरूप लाभले होते. प्रासादाबाहेर कृष्णाचा सुलक्षणी रथ उभा होता. कृष्णाबरोबर आलेल्या सात्यकी व इतरजनांचे आदरातिथ्य करण्यात विदुर-प्रासाद गुंतला होता. कृष्ण आपली पूजा आटोपून कौरवसभेकडे जाण्यास तयार झाला होता. त्याच वेळी युवराज दुर्योधन तेथे गेला. त्याच्या बरोबर कर्ण शकुनीही होते कृष्णाने प्रेमभराने तिघांचे स्वागत केले.

'दुर्योधना, तुझ्या आतिथ्याचा स्वीकार केला नाही, म्हणून तू रुष्ट तर झाला नाहीस ना?' कृष्णाने विचारले.

'रुष्ट होण्याचे काहीच कारण नाही.' दुर्योधन विदुराकडे पाहत म्हणाला. 'काकांच्या घरचं आतिथ्य मी माझ्याच घरचं समजतो. त्यात काही कमतरता पडली नाही ना?'

कौतुकाने दुर्योधनाकडे पाहत कृष्ण म्हणाला,

'दुर्योधना, जिथं प्रेम, विश्वास अन् स्नेह असतो, तिथं कमतरता कसली? अंगराज, क्षेम आहे ना?'

'हो!'

'अन्, अंगराज, वृषसेन कुठाय्? त्याची आठवण मला नेहमी येते.'

'ते त्याचं भाग्य! वृषसेन इथंच आहे. सायंकाळी आपल्या दर्शनास पाठवून

महाराज!' दुर्योधन म्हणाला, 'भीष्मादी कौरव तातांसह सभेत उपस्थित झाले आहेत. स्वर्गीचे देव इंद्राची प्रतीक्षा करतात, तशी ते सर्व तुमची वाट पाहत आहेत.'

आपले उत्तरीय सावरीत कृष्ण उठला. विदुरांना म्हणाला,

'सभा तिष्ठत ठेवणं योग्य नव्हे. विदुरा, चल, आपण जाऊ.'

विदुरासह कृष्ण प्रासादद्वारी आला. द्वारात कृष्णाचा शुभ्र रथ उभा होता. विदुरासह कृष्ण त्या रथात बसला. दुर्योधन, कर्ण, इत्यादी कृष्णाच्या मागोमाग दुसऱ्या रथातून निघाले. त्यांच्या मागून सात्यकी, कृतवर्मा व इतर लोक रथ, गज, अश्व, इत्यादी वाहनांतून अनुसरत होते.

कौरवांनी परिवेष्टित असलेला रथ, यादववीरांकडून अभिरक्षित होता. प्रजाजनांचा आनंद पाहत, नगरशोभा निरखीत कृष्ण सभाद्वारी येऊन पोहोचला. मंगलवाद्यांच्या आवाजांनी सर्व दिशा व्यापल्या. कृष्णाच्या आगमनाची आकांक्षा बाळगणारी अमित तेजस्वी राजांची ती सभा हर्षाने रोमांचित झाली. कृष्ण, विदुर आणि सात्यकी यांचे हात धरून प्रवेश करता झाला. त्यांच्यापुढे दुर्योधन, कर्ण होते. कृष्णामागे कृतवर्मा व वृष्णिवीर होते.

कृष्णाचे आगमन कळताच सम्राट धृतराष्ट्र उभे राहिले. ते पाहून सर्व राजांनी कृष्णाला उत्थापन दिले. कृष्णासाठी अष्टकोनी सुवर्ण-सिंहासन ठेवले होते. कृष्ण त्या आसनावर आरूढ झाला. कृष्णाजवळ एका विशाल आसनावर कर्ण व दुर्योधन बसले. सर्व सभा आसनस्थ झाली. सर्वांचे लक्ष कृष्णाकडे लागले होते. कृष्णाने पीतांबर परिधान केले

होते. त्याची अंगकांती अतसी पुष्पाप्रमाणे नीलवर्ण होती. राजसभेत पूर्णपणे शांतता पसरली होती.

कृष्ण उभा राहिला. धृतराष्ट्राकडे पाहून तो बोलू लागला,

'हे भारता! आज या सभेत मी द्वारकाधीश म्हणून आलो नाही. मी पांडवांच्या वतीने दूत म्हणून या राजसभेत उभा आहे.

'पांडवांचा अज्ञातवास संपला आहे. ते विराटाघरी प्रगट झाले आहेत. यापूर्वी या राजसभेत द्रुपदपुरोहित पांडवांचे दूत म्हणून येऊन गेले. तसेच, पांडवांकडं कौरवांकडून संजयही दूतकार्य करून गेले; पण त्यातून काहीच निष्पन्न झालं नाही. ते पाहून मला राहवलं नाही. शक्य तो भावी अनर्थ टाळता आला, तर पाहावा, म्हणून मी इथं आलोय्.'

दुर्योधनाच्या चेहऱ्यांवर स्मित पाहून कृष्णाचा आवाज किंचित चढला.

'हे कौरववीरहो! या युद्धामध्ये पांडवांचा पराजय होईल, ही भीती माझ्या मनात नाही. पराजयापासून तुम्हांला वाचवण्याचाही माझा प्रयत्न नाही. उद्या हे युद्ध उभं राहिलं, तर त्यात पांडव आणि कौरव या दोघांचाही सर्व बलानिशी झालेला सर्वनाश मला स्पष्टपणे दिसतोय्. तो विनाश टाळता आला, तर टाळावा, हा माझा हेतू आहे. तेव्हा, हे भारता, अन् या सभेतल्या वीरश्रेष्ठांनो, मी सांगतो, ते मोकळ्या मनानं श्रवण करा अन् माझ्या विचारांचं सत्य जाणून घ्या.

'एके काळी हे कौरवराज्य पंडूनं आपल्या चारित्र्यसंपन्न राजनीतीनं जपलं, त्यांचा वाटा त्यांना मिळून, त्यांचा अधिकार त्यांना प्राप्त व्हावा, हे योग्य आहे.'

'अधिकार !' दुर्योधन उठत म्हणाला, 'अधिकार कसला? एखाद्या गोष्टीचा कौरवश्रेष्ठ धृतराष्ट्र महाराज हेच राज्याचे वारस.'

'पण ते अंध...' कृष्ण म्हणाला.

'अंध असल्यामुळं राज्याचा अधिकार नष्ट होत नाही. तसं असतं, तर पंडूंनी जे राज्य सांभाळलं, ते राज्य अंध तातांच्या हाती देऊन, मृगयेच्या निमित्तानं वनवास गाठला नसता. कृष्णा, नम्रतेनं सांगावंसं वाटतं. गोकुळात नंदाची निवड केली जाते, त्या पद्धतीनं राज्याचा वारस निवडला जात नाही. शतकौरव असले, तरी साम्राज्याचे शत तुकडे पडत नाहीत. ते एकसंधच राहतं.'

'हो ना! मग त्या शतकौरवांच्या पोषणाची जशी कौरवसाम्राज्याची जबाबदारी आहे, तशीच त्याच कुलात जन्मलेल्या पाच पांडवांचीही.'

'पाच पांडव!' दुर्योधन हसला. 'कृष्णा, या राजसभेतल्या अनेक श्रेष्ठांना तुझ्या सामर्थाचं कौतुक वाटतं. ते तुला देवगुणसंपन्न मानतात. निदान तू तरी असत्याची कास धरू नकोस. ते पाचजण फारतर कौंतेय असतील; पांडव खास नाहीत. निदान या सभेत तरी त्याचा उच्चार मला करावयास लावू नकोस.'

कृष्णाने संताप आवरला. दुर्योधनावरची दृष्टी त्याने धृतराष्ट्राकडे वळवली.

'हे भारता! मी इथं वादंग माजविण्यासाठी आलो नाही. त्या धर्माचरण करणाऱ्या पाच पांडवांचा तुझे पुत्र सदैव द्वेष करतात. विश्वासानं आलेल्या त्यांना तुझ्या पुत्रांनी लाक्षागृहात जाळण्याचा प्रयत्न केला. पुढं त्यांना तुम्हीच खांडवप्रस्थाचं राज्य दिलंत, ते त्यांनी बाहुबलावर वाढवलं. कीर्तिरूप केलं. त्या पांडवांचं वर्धमान होणारं वैभव तुझ्या पुत्रांना सहन झालं नाही. त्यासाठी त्यांनी कपटद्यूताचा अवलंब केला. त्यासाठी गर्ह्य आचरण केलं. एवढंच नव्हे; तर पांडवपत्नी पांचाली हिचाही करू नये तो अपमान केला;

पण सत्यवचनी पांडवांनी ते सारं सहन केलं. प्रतिज्ञेप्रमाणे बारा वर्षं वनवास अन् एक वर्षाचा अज्ञातवास पुरा केला, त्यांचा धर्मबुद्धीवर विश्वास आहे. हे राजा, त्यांनी तुला अत्यंत नम्र भावानं वंदन करून सांगितलंय् की, 'आम्हांला राज्य नको! वैभव नको! आमच्यांत सामर्थ्य असेल, तर गतवैभव आम्ही जरूर मिळवू. आम्हांला फक्त पाच गावं दायभाग म्हणून तू दे.'

'धृतराष्ट्रा! त्यांच्या विनयाची, धर्मबुद्धीची प्रशंसा करावी, तेवढी थोडीच आहे.'

'पांडव दायभाग मागतात फक्त पाच गावांचा! त्यात धर्मबुद्धी कसली? त्यात तर कपटनीती आहे. दायाद म्हणजे वारस... अन् वारस म्हणजे अधिकार! कृष्णा, शिष्टाईसाठी आलेल्या दूतानं एकांगी विचार करून चालायचं नाही. मी तुझं स्वागत करीत असता, तू मात्र माझी कठोर निंदाच करतोस. कारण पांडवांची श्रद्धा तुझ्यावर असल्यानं तुला आम्ही सदैव दोषी दिसतो.

'आम्ही प्रगट सभेत दयूत खेळलो. त्यात पांडव हरले. हा आमचा अपराध? वैष्णव हा यज्ञ मी केला, तेव्हा वैर विसरून यज्ञाचं आमंत्रण मी त्या पांडवांना पाठविलं. त्या वेळी भीमानं काय निरोप पाठविला, माहीत आहे? सर्व कौरवांची रणयज्ञात आहुती पडेल, तेव्हाच पांडव हस्तिनापुरास येतील! असा तो निरोप होता. कर्मानं मी भिणारा नव्हे. युद्धाच्या वल्गना तेच करीत आहेत, तर मग त्यांचीच इच्छा पुरी होऊ दे.'

'त्याचा परिणाम माहीत आहे?' कृष्णाने विचारले.

'परिणाम कसला? फार तर युद्धात मरेन मी! एवढंच ना? क्षत्रियाला त्याहून श्रेष्ठ मृत्यू नाही. युद्धात अस्त्रांनी जर मरण आलं, तर आम्ही स्वर्गालाच जाऊ. कृष्णा, वेळूप्रमाणं अस्थानीही भग्न व्हावं, पण कुणापुढं नम्र होऊ नये, हे श्रेष्ठ वचन आहे. माझ्या पित्याकडून जो राज्यांश मला मिळालाय्, तो मी जिवंत असेपर्यंत कुणाला परत देणार नाही. जोवर राजा धृतराष्ट्र प्राण धारण करीत आहेत, तोवर आम्ही व ते पांडव यांतील कोणत्या तरी एका पक्षानं क्षत्रिय धर्माचा त्याग करून, भिक्षुकाप्रमाणं आयतं सिद्ध असलेलं अत्र भक्षण करूनच जिवंत राहिल पाहिजे.

'कृष्णा, मी बाल असल्यामुळं पराधीन होऊन पूर्वी अज्ञानानं पांडवांना अदेय असलेलं राज्य देऊ दिलं; परंतु आता परत तीच चूक करणार नाही. ते राज्य परत पांडवांना प्राप्त होणार नाही. कृष्णा, त्या पांडवांना माझा एकच निरोप सांग. म्हणावं, मी जिवंत असेपर्यंत पाच गावंच काय, पण सुईच्या तीक्ष्ण अग्रानं छेदली जाईल, एवढी मातीही मी पांडवांना देणार नाही.'

कृष्ण दुर्योधननिर्णयाने संतप्त झाला. धृतराष्ट्राकडे पाहत तो म्हणाला,

हे सम्राट! तुझ्या पुत्रानं घेतलेला निर्णय तू ऐकला आहेसच. आता अदृष्टातला विनाश टाळायचा एकच मार्ग तुला उरला आहे.'

'कोणता?' धृतराष्ट्राने विचारले.

दुर्योधनाकडे बोट दाखवीत कृष्णाने स्पष्ट शब्दांत सांगितले,

'तो म्हणजे दुर्मती पुत्र दुर्योधन अन् त्याचे सल्लागार शकुनि, कर्ण अन्! दुःशासन यांना बद्ध करून पांडवांच्या स्वाधीन कर.'

कृष्णाचे ते शब्द ऐकून दुर्योधन चकित झाला.

दुःशासन त्वेषाने उठला आणि तो गरजला,

'अन् हेच युवराजांनी तुमचं करायचं ठरवलं, तर?'

कृष्णाच्या हास्याने सारे सभागृह भरून गेले. कृष्णाचे हास्य थांबले. आपली कुद्ध दृष्टी सभागृहावर टाकीत कृष्ण म्हणाला,

‘दु:शासना, दुर्योधनाला ते करायला जरूर सांग. मूख, अशा प्रसंगी शिष्टाईसाठी जे दूत येतात, ते कधी एकटे आणि असावधपणे शत्रुगोटात शिरत नाहीत. आपल्या सर्व बळानिशीच ते आलेले असतात.’ दु:शासनाकडे तुच्छतेने पाहत तो ‘कसलं बळ?’दुर्योधनाने तुच्छतेने विचारले.

‘बळ? माझं! दुर्योधना, शिष्टाईसाठी येताना हस्तिनापूरच्या सीमेवर माझं चतुरंग दळ उभं करूनच मी इथं आलोय्. या क्षणी हस्तिनापूर कृतवर्म्याच्या सेनेनं वेढलं आहे. या राजसभेत सात्यकी, कृतवर्मा माझ्या बाजूनं उभे आहेत. एवढंच नव्हे, तर माझ्यासह आलेलो हजारो वृष्णिवीर आपल्या बाहुबलाच्या प्रत्यंतरासाठी उभे आहेत. मला बद्ध करण्याचा जरूर प्रयत्न कर. जे युद्ध उद्या होणार आहे, ते याच क्षणी उद्भवेल अन् अपरिमित विनाश न होता याच क्षणी संपून जाईल.’

कृष्णाने आपल्या शक्तीचे केलेले ते विराट दर्शन पाहून दुर्योधन क्षणभर भान हरपला. अपमानाने त्याचा संताप उफाळला आणि काय घडते, ते समजायच्या आत तो सभागृहाबाहेर निघून गेला.

त्याच्या पाठोपाठ कर्ण, शकुनि आणि दु:शासन बाहेर पडले.

सभा नि:स्तब्ध, शांत होती. कृष्ण उभा राहिला. शांत भाव ढळू न देता तो म्हणाला,

‘हे भारता! तुझ्या पुत्रानं सभात्याग केलाय्. मी तो अपमान मानीत नाही. युद्ध तर अटळच दिसतंय्. तुझ्या पुत्राला या अविवेकापासून वाचवता आलं, तर पाहा. मी आज विदुराघरीच आहे. सामोपचार झाला, तर मला आनंद आहे. नाहीतर युद्ध निश्चित आहे, असं समजून मी माघारी जाईन.’

कृष्ण सभेबाहेर जात होता.

त्याच्यामागून विदुर, कृतवर्मा, सात्यकी जात होते.

कृष्ण गेला आणि सभागृहात एकच कुजबूज सुरू झाली.

## ३६

**स्व**गृही कृष्णाला पोहोचवून विदुर परत आला. धृतराष्ट्र-महालात भीष्म आले होत राजमाता गांधारीदेवी धृतराष्ट्रांपासून थोड्या अंतरावर उभी होती. विदुर आलेले समजताच धृतराष्ट्र म्हणाले,

'विदुरा, त्या दुर्योधनाची समजूत काढायला हवी. तेही सत्वर व्हायला हवं. तू असाच जा अन् युवराजांना इथं घेऊन ये. कृष्णाच्या मनात काही नाही ना?'

'श्रीकृष्णाचं मन स्फटिकासारखं निर्मळ आहे. त्याच्या मनात काही वैरभाव नाही; पण झाल्या प्रकाराचं दु:ख त्यांना जरूर झालं. हे बंधो, हा प्रकार मला ठीक दिसत नाही. युद्ध बोलण्याइतकं सोपं नसतं, ज्या बाजूला कृष्णाचं नेतृत्व आहे, पाच पांडवांसारखे पराक्रमी, धर्मनिष्ठ आहेत, त्याच बाजूला जय आहे. तू आपल्या पुत्राला आवर घालावा, हेच मला योग्य दिसतं.'

'ते मलाही कळतं. विदुरा, सत्वर जाऊन त्या दुर्योधनाला इथं घेऊन ये.'

विदुर गेला.

नि:श्वास सोडून गांधारी म्हणाली,

'पितामह, तुम्हीच त्याला आवर घालायला हवा होता. तो तुमचा अधिकार आहे.'

'वयाचा अधिकार सज्जन जाणतात अन् बळाचा अधिकार गाजवण्याइतपत माझं या सभेत बळ राहिलं नाही. अंध सम्राटांचं युवराजांच्यावरचं अंधप्रेम युवराजांचे दोष पाहत नाही.'

'पितामह, तुम्ही माझ्यावर राग करू नका. अंध दृष्टीला जेवढं जाणवेल, तेवढंच मी करू शकतो. ती माझी मर्यादा आहे.'

त्याच वेळी दुर्योधन कर्णासह आत आला. दोघांमागून विदुर आत येत होता ते आल्याचं कळताच धृतराष्ट्र म्हणाला,

'बाळ दुर्योधन, तुझ्या संतापाला थोडा आवर घाल. विवेक जागृत कर अन् तुझी माता काय सांगते, ते ऐक.'

दुर्योधनाचे नेत्र आरक्त झाले होते.

कर्णाने गांधारीकडे पाहिले होते.

निळे रेशमी वस्त्र नेसून ती उभी होती. डोळ्यांवर काळी पट्टी बांधली होती. भव्य, आतिगौर कपाळ, धारदार नासिका, पातळ गुलाबा ओठ, त्या रूपाच सौंदर्य दर्शवीत होते. त्या उंच आकृतीचा हात पुढे झाला. घंटेचा नाद हेलावावा, तशी राजमाता बोलत होती :

'दुर्योधना, मी आजवर तुला काही सांगितलं नाही. तुझ्या पित्याच्या तुझ्यावरच्या उत्कट प्रेमामुळं ते तुला सदैवच माझ्यापेक्षा जवळचे वाटले. पुत्र म्हणून नव्हे, युवराज म्हणून तू वाढलास, वाढवला गेलास. ज्या राज्याच्या हितासाठा तुला वाढवलं, ते राज्य आज तुझ्या निर्णयामुळ संकटात पडलंय्

'माते, तुझी काय आज्ञा आहे?'

'वत्सा! भीष्म-विदुरांच्या मते कृष्ण व अर्जुन अजिंक्य आहेत. तू युद्ध वचन तू मान्य कर. तुझ्या पित्यांनी, भीष्मांनी व विदुरांनी गृहकलहाच्या भीतीनं त्यांचा राज्यांश दिला, हे तू जाणतोसच. पंडुपुत्रांचं अर्धं राज्य त्यांना परत दे. अर्ध्या राज्यावर तू सुखानं राज्य कर.'

दुर्योधनाने खित्र हास्य केले. त्याने एकदा भीष्म, द्रोण, विदुर यांकडे पाहिले.तो म्हणाला,

'माते, निदान तुझ्याकडून तरी ही आज्ञा मी अपेक्षिली नव्हती. एका अंधाबरोबर आपला विवाह होणार, हे ऐकताच जी तेजस्विनी आपल्या नेत्रांना पट्टी बांधते, त्या मातनं असला दुबळा सल्ला द्यावा? राजमात, प्रत्येक माणसाच्या जीवनात त्यानं अशीच एक पट्टी आपल्या ज्ञानचक्षूंवर बांधलेली असते.'

'अन् तुझ्या पट्टीचं नाव!' विदुरांनी विचारले.

'आहे! युवराज म्हणून ज्या संस्कारानं मी वाढली, त्या पट्टीचं नाव आहे राजनिष्ठा! माते, आज जे घडलं, त्याबद्दल तू मला दोष देऊ नकोस, या पितामहांना, विदुरांना, आचार्यांना दोष दे. कारण गृहकलहाच्या भीतीपोटी यांनी स्वनिर्णयानं त्या पांडवांना खांडवप्रस्थाचं राज्य दिलं. एकसंध साम्राज्याची प्रतिष्ठा त्यांनीच जाणली नाही.'

'नुसत्या उदात्त कल्पना बाळगून वास्तवात जगता येत नाही, युवराज!' विदुर म्हणाला, 'अजूनही वेळ गेलेली नाही. भगवान श्रीकृष्ण तुमच्या निरोपाची वाट पाहत आहेत. पांडव आता राज्यही मागत नाहीत. त्यांना फक्त पाच गावं हवी आहेत.'

'याचक म्हणून नव्हे. विदुरकाका, ते मागतात दायाद म्हणून. कौरवसाम्राज्याचे वारस म्हणून. एकदा ती चूक केलीत अन् पांडवांची मजल तात जिवंत असता राजसूय यज्ञ करण्यापर्यंत गेली. तुम्हांला सवड असेल, पण परत ते पाहण्याचं बळ मला नाही.

'बाबा, रे! त्या पंडूनं थोर पराक्रम करून माझ्याकरवी अश्वमेध यज्ञ करवला, त्याचंच फळ म्हणजे हे राज्य!' धृतराष्ट्र म्हणाले.

'तात, तुम्ही अगदी सत्य सांगितलंत!' दुर्योधन कर्णाकडे पाहत म्हणाला 'एवढा पराक्रम काकांनी केला, मग या भीष्मांनी, विदुरांनी त्यांनाच अश्वमेधाचा अधिकार का दिला नाहीं? या कर्णानं दिग्विजय करून राज्याला कीर्ती प्राप्त करून दिली, म्हणून याला का यज्ञाचा अधिकार नाही?'

'अरे, त्या थोर पंडुपुत्रांची या राधेयाशी तुलना करू नकोस.' विदुर कळवळले.

'कोण पंडुपुत्र? विदुरकाका, राजसभेत मी संयम पाळला. खूप पाळला. ते पंडुपुत्र असते, तरी मी त्यांना राजपुत्र संबोधून त्यांचं स्वागत केलं असतं. ते पंडुपुत्र तर नाहीतच, पण ते एका बापाचेही नाहीत. ते राज्याचे वारस कसे होतील?'

'दुर्योधना ऽ' गांधारी किंचाळली.

'क्षमा, माते! या काकांच्या अज्ञानामुळंच त्याचं स्पष्टीकरण करण्याची पाळी माझ्यावर आली.'

'कसलं स्पष्टीकरण? नीतीची मर्यादासुद्धा पाळता येत नाही, त्यानं ज्ञान-अज्ञानाच्या गोष्टी बोलाव्यात?'

'काका ऽऽ 'दुर्योधन उसळला. 'मी बोललो, ते कटू असेल, पण सत्य आहे, हे तुम्हांलाही मान्य करावं लागेल. स्पष्टोतीबद्दल आपली भारी ख्याती आहे. सत्यानं व्यापलेली स्पष्टोती केवढी जिव्हारी लागते, याचं प्रत्यंतर तुम्हांला घ्यायचं आहे? ते

बळ आहे?'

'बोल, दुर्योधना, तुला कोण अडवणार?' विदुर म्हणाले.

कर्ण पुढे झाला. दुर्योधनाच्या खांद्यावर हात ठेवीत तो म्हणाला,

'युवराज, शांत व्हा!'

त्या स्पर्शाने दुर्योधन शांत होण्याऐवजी जास्तच उफाळला,

'राधेया, ज्यांना नीतीची बंधने पाळता येत नाहीत, त्यांनी ती नीती दुसऱ्यांना शिकवू नये.'

'युवराज!' विदुर ओरडले.

'शांत बसा.' दुर्योधनाच्या शब्दांत कठोरता होती, 'काका, पांडव वनवासी झाले. अज्ञातवासात गेले. या तेरा वर्षांत कुंतीचं तुमच्या घरी वास्तव्य का?'

विदुरांचा चेहरा पडला. त्यांनी दोन्ही हात कानांवर ठेवले, तरी दुर्योधनाचे शब्द कानी आलेच.

'नीती सामाजिक नियम अनुसरते. त्या नियमात हे बसत नाही.'

'दुर्योधना! अरे, तू किती जणांना दुखवणार आहेस? तुझ्या हट्टी स्वभावामुळं तू युद्ध उभारलंस, तर पांडवप्रेमानं सदैव त्यांचं हित चिंतणारे हे भीष्म, द्रोण, कृप तुझ्या बाजूनं लढतील का? फार झालं, तर तुझ्या अन्नावर वाढल्यामुळं ते कौरवांच्या बाजूनं आपलं जीवित अर्पण करतील; पण त्या युधिष्ठिराकडं क्रोधानं पाहण्यासही धजणार नाहीत.'

'माते! अन् त्यासाठी पांडवांना अर्धं राज्य देऊ? नाही, माते! ते माझ्या हातून होणार नाही.'

भीष्म हताशपणे म्हणाले,

'युवराज! युधिष्ठीर, अर्जुन, भीम, नकुल, सहदेव पांडव म्हणूनच ओळखले जातात. नसत्या प्रतिष्ठेपायी कुलक्षयाला तुम्ही कारणीभूत होऊ नका.'

'पितामह! तुम्ही हे सांगता? आश्चर्य आहे! पितामह, कोणत्या थोर कारणासाठी तुम्ही कुरुराज्यावरील तुमचा हक्क सोडलात, ते सांगाल? पितामह, प्रतिष्ठेचा आकार लहान-मोठा नसतो. फक्त तेजस्वी असावा लागतो.'

भीष्म निरुत्तर झाले. ते म्हणाले,

'पण, बाबा, रे! निदान या वयानं घेतलेल्या अनुभवाचा तरी विश्वास बाळग. मी सांगतो, ते सत्य आहे. कृष्णाचा पराजय होणार नाही.'

'ते मला माहीत आहे.' दुर्योधन म्हणाला.

'तरीही हा निर्णय घेतलास?'

'हो! उद्या पांडवांनी जिंकलं, तरी लोक ते कृष्णानं जिंकलं, असं म्हणतील. त्यापेक्षा तुमच्या दैवी गुणसंपन्न कृष्णाशी आम्ही लढलो, हे मला यशापेक्षा जास्त आहे.'

'पण त्या पांडवांशी स्पर्धा...'

'पितामह! गवत समानतेनं वाढतं. तालवृक्ष आकाशाला स्पर्श करण्यासाठी एकमेकांशी स्पर्धा करीतच असतात, वाढतात. जे पाच पांडवांना जमतं, ते शतकौरवांना का जमू नये?'

गांधारीने नि:श्वास सोडला.

'राधेया, हाच तुझाही विचार आहे?'

‘राजमाते! युवराज बोलतो, ते सत्य आहे. माझंही तेच मत आहे.’
धृतराष्ट्र उद्गारले,
‘कृष्ण म्हणाला, तेच खरं आहे सर्वनाशी युद्ध अटळ आहे.’
तात, तुम्ही चिंता करू नका, ‘दुर्योधन म्हणाला. ‘त्या पांडवांनी रणांगणात पराभव केला, तरी ते तुमच्याकडं सांत्वनासाठी येतील. अश्रु ढाळतील. सम्राट म्हणाला तुम्हांलाच गौरवतील.’
‘बोलू नकोस, दुर्योधना! त्या तसल्या सांत्वनाचा मी धिक्कार करीन. दुर्दैवानं तसं घडलंच, तर मी रानावनाचा आश्रय करीन. तसल्या जगण्यापेक्षा ते जीवन मी आनंदानं पत्करीन.’
दुर्योधनाने विदुराकडे तुच्छतेने पाहिले. तो म्हणाला,
‘जा! त्या कृष्णाकडं जा. त्याला सांगा, युद्ध अटळ आहे. हाच माझा अंतिम निरोप आहे.”
विदुर महालातून निघून गेला.

दुर्योधनाने धृतराष्ट्राला वंदन केले. गांधारी चरणाना स्पर्श केला. दुर्योधनापाठोपाठ कर्णाने अनुकरण केले. गांधारी म्हणाली,
‘राधेया, तुझ्या अहंकाराची सोबत माझ्या मुलाला कोणत्या अवस्थेला नेणार आहे, याचा कधी विचार केला आहेस? एकदा तरी डोळे मिटून स्वस्वरूपाची ओळख करून घे.’
कर्ण हसला. तो निर्धारपूर्वक म्हणाला,
‘राजमाते! या कर्णानं उभ्या आयुष्यात कसलीच भीती बाळगली नाही. बाळगली, ती एकाच गोष्टीची! या कर्णाला डोळे उघडे ठेवून हवं ते पाहण्याचं, सोसण्याचं बळ आहे. डोळे मिटून स्वत:कडं पाहण्याचंच तेवढं नेमकं बळ नाही. आपण नेमकं तेच सांगत आहा. येतो मी. आशीर्वाद असावा.’
कर्णा-दुर्योधन महालातून निघून गेले.
गांधारी उभ्या जागी बसली. तिला हुंदका फुटला.
धृतराष्ट्र म्हणाले,
‘दुर्योधनमाते! रडू नकोस. माझं थकलेलं मन तुझ्या अश्रुंनी अधिकच विकल होत आहे.’
गांधारीने श्वास घेतला. अश्रु आवरीत ती म्हणाली,
‘नाथ, अजूनही उशीर झाला नाही. या दुर्योधनाला हवं ते करू दे. आपण पांडवांकडं जाऊ या.’
‘नाही, गांधारी, ते होणार नाही.’ धृतराष्ट्र नि:श्वास सोडून म्हणाला, ‘ज्याला देवानं टाकलं, त्याला मला टाकता येणार नाही. मी बाप आहे ना त्याचा.’

दुर्योधनाचा निरोप घेऊन कर्ण स्वगृही गेला. अधिरथाने विचारले,
‘कर्णा, कृष्णशिष्टाई यशस्वी झाली?’
‘कृष्णशिष्टाई झाली.’
‘कायं झाल? काय ठरलं?’

‘युद्ध! सर्व-विनाशी युद्ध!’

अधिरथाकडे पाहण्याचे धैर्य कर्णाला नव्हते. तो अधोवदन झाला आणि थकल्या शरीराने पायऱ्या चढू लागला.

## ३७

**स**काळी कर्ण बाहेर जाण्याच्या तयारीत होता. वृषसेन त्याच वेळी आला. त्याने कर्णाला वंदन केले. त्याने विचारले,

'आपण कृष्णमहाराजांना पोहोचवायला जाणार ना?'

'हो!'

'आपली आज्ञा असेल, तर...'

'जरूर ये. माझा रथ तयार आहे...'

'हो खाली चक्रधर रथ तयार आहे...'

'मग, वसू, असं कर. तू घोड्यावरून सरळ नगरसीमेवर जा. मी विदुरांच्या गृही जाऊन द्वारकाधीशांबरोबर येईन.'

'जशी आज्ञा!' वृषसेनाने गळ्यातला मोत्यांचा सर काढला. मोती टपोरे तेजस्वी होते. त्यांच्या शुभ्रपणावरही एक निळसर झाक प्रगटत होती. तो सर कर्णापुढे करीत वृषसेन म्हणाला, 'कृष्णमहाराजांनी काल हा मला दिला, आपल्या आज्ञेप्रमाणे मी काल तिथं गेलो होतो.'

कर्ण तो सर निरखीत होता. वृषसेन सांगत होता,

'आपल्या गळ्यातला सर काढून त्यांनी माझ्या गळ्यात घातला आणि ते म्हणाले, 'वसू, हे जातिवंत मोती आहेत. खाऱ्या पाण्यात समुद्राच्या तळाशी वाढलेले. हे मोती अत्यंत कठीण असतात. त्यांना जे वेज पाडलं जातं, ते केव्हाही लहान-मोठं होत नाही.''

वृषसेन हसला.

'का?' कर्णाने विचारले,

'कृष्णमहाराज म्हणाले, हे मोती तुझ्यासारखे आहेत- तेजस्वी! अन्, तात, तिथं राजमाता कुंतीही होत्या. त्यांना मी वंदन करावयास गेलो, तर त्यांनी मला जवळ घेतलं आन् माझ्या मस्तकाचं अवघ्राण केलं

'मोठी माणसं ती मोठीच असतात नं, वसू! तो साध्या मोत्यांचा सर नाही, तो एका मोठ्या माणसाचा आशीर्वाद आहे. तो श्रद्धेनं गळ्यात बाळगीत जा. चल, जाऊ आपण...''

वृषसेन नगरवेशीबाहेर गेला, तेव्हा तो भाग नागरिकांनी आधीच भरून गेला होता. सारे आतुरतेने कृष्णाची वाट पाहत होते. थोड्याच वेळात शिगांचा आवाज गोपुरद्वारातून घोडेस्वार दौडत आले. खंदकाच्या फळीवर त्यांच्या टापा घुमल्या. पाठोपाठ एकएक रथ नगराबाहेर येऊ लागले. भीष्म, विदुर, कृतकर्मा यांच्या रथांमागे कृष्णरथ होता. त्यांच्यामागून कर्णाचा रथ येत होता. जनसमुदायात कर्णाचा जयघोष उठला. कृष्णाने रथ थांबवून सर्वांना दर्शन दिले. वृषसेनाकडे लक्ष जाताच वृषसेनाने वंदन केले. कृष्णाने त्याला जवळ बोलावले. वृषसेन नजीक जाताच कृष्णाने प्रेमभराने त्याचा निरोप घेतला. भीष्म-विदुरांचा निरोप घेऊन कृष्ण रथारूढ होत असता त्याने कर्णाला जवळ बोलावले.

'अंगराज, माझ्याबरोबर काही अंतर तू यावंस, असं मला वाटतं.'

'जशी आज्ञा!' कर्णा म्हणाला.

कृष्णाने सारथी दारुकाकडे पाहिले. सूत उतरला. कृष्णाने सारथ्याची जागा घतला. मागच्या बाजूला हात करात कृष्ण म्हणाला,

'कर्णा, बैस.'

'आपणा सारथ्य करणार?'

कर्ण रथात बसला. शंखनाद उमटला. कृष्णदळ रथाच्या मागेपुढे दौडत होते. रथ वेगाने धावत होता. सूर्यकिरणे आकाशात चढत होती. हळूहळू हस्तिनापूर वाजत होते. रथाला जुंपलेले पांढरे शुभ्र जातिवंत अश्व एका चालीने दौडत होते.

वृक्षहीन, मोकळ्या माळावरून रथ जात होता. चारी बाजूंना दूरवर पसरलेली भूमी दृष्टिपथात येत होती. अचानक कृष्णान मागे पहिले. पाठीमागून थणाऱ्या दळाची धाव मंदावली. कृष्णान स्मितवदनाने समोर पाहिल. रथाबरोबर दौडणाऱ्या सात्यकान घोड्याला टाच दिली. क्षणात सात्यकासह पुढच दळ भरधाव उधळल. काही वेळात कृष्णा-कर्णांचा रथ एकाकी पडला. रथाची धाव अगदी मंदावली, कृष्णाने अश्वांचे वेग रथाच्या सुवर्णदंडाला अडकवले. कृष्णाने तिरकी बैठक घेतली. तो कर्णाला म्हणाला,

'अंगराज, युद्ध निश्चित झाल्याचं कळलं ना?'

'हो! आपली शिष्टाई असफल झाल्याचा खेद वाटतो. युद्ध निश्चित झाल्याचा झाल्याचा आनंद आहे

ते मला माहीत आहे, कर्णा! आता भेट घडेल, ती रणभूमीवरच, शत्रू म्हणून! त्याआधी बोलावं, भेटावं, असं वाटलं, म्हणूनच तुला मी येण्याचा आग्रह धरला.'

'आपली कृपा!'

'कर्णा, युद्धात कौरव विजयी होतील?'

'जयपराजय दैवाधीन!'

'ते माहात असता, माझ्या मुखातून वदवण्याचं क्राहाच प्रयाजन नाही.'

'अन् तरीही तुम्ही युद्ध स्वीकारलंत?'

'क्षमा! पराजयाच्या भीतीनं मी सत्याकडं कधीच पाठ फिरवली नाही.'

'काही वेळ सत्यदेखील विदारक असतं, त्याकडं पाहवत नाही.'

'आपल्या कृपेनं ते बळ माझ्याकडं आहे.'

कृष्ण हसला. कर्णावर दृष्टी टाकीत तो म्हणाला,

'कर्णा, तू कोण आहेस, माहीत आहे?'

'मी! सूतपुत्र!'

'नाही.'

'ते खोटं आहे.'

'जन्मत: मला मातेनं टाकलं असलं, तरी पण, माझी कवचकुंडलं माझ्या कुलाची साक्ष आहेत.'

'कोणतं कुल?'

'माधवा! ज्या शंकेनं सारं जीवन ग्रस्त झालं, तीच शंका मला कशाला विचारतोस? उभं आयुष्य मी कोण? कुठून आलो? मला का टाकलं गेलं? याच प्रश्नांनी व्यापलंय्. माझ्या ज्ञानानं, तपश्चर्येनं त्याचं उत्तर मिळालं नाही. ते सांगणारा कुणी भेटेल, असंही

आता वाटत नाही'

'सांगणारा भेटेल; पण ऐकण्याचं बळ राहणार नाही.'

'कृष्णा, तुला माझं जन्मरहस्य माहीत आहे?'

कृष्णाने होकारार्थी मान हलवली.

कर्णाचे सारे अंग रोमांचित झाले.

रथ सावकाश चालत होता. रथाच्या घुंगुरमाळ किणकिणत होत्या.

कर्ण अधीर बनला होता.

'सांग, मधुसूदना! मी कोण? कोणत्या अपराधास्तव माझ्या मातेनं माझा त्याग केला?'

'कर्णा, मी सांगतो, ते दृढ मनानं श्रवण कर- तू कौंतेय आहेस!'

'मी... कौंतेय?? महाराज, थट्टेलासुद्धा मर्यादा असाव्यात.' कर्ण हसून म्हणाला.

'कर्णा, मी थट्टा करीत नाही.' कृष्ण निश्चयी स्वरात म्हणाला, 'कर्णा, तू कौंतेय आहेस तू माता कुंतीला कौमार्यावस्थेत मिलालेलं सूर्याचं वरदान आहेस हे कर्णा, कन्येला कानीन अन् सहोढ असे दोन प्रकारचे पुत्र मानले जातात. कौमार्यावस्थेत झालेला कानीन ठरतो. विवाहानंतर झालेला सहोढ किंवा औरस

ठरतो. शास्त्रानुसार ज्या पुरुषाशी त्या कन्येचा विवाह होतो, त्याचेच ते पुत्र मानले जातात. त्यामुळं तूही पांडवच ठरतोस. सूर्याचा अथवा अधिरथाचा नव्हे.'

कर्णाने पाहिले. भूमी वेगाने मागे सरकत होती. रथाला धक्के बसत होते.रथाच्या चाकांच्या आऱ्यांतून दिसणारी भूमी खंडित भासत होती. कर्णाच्या कपाळावर दरदरून घाम फुटला होता. सारे अंग बसल्याजागी थरथरत होते.

'मी राधेय नाही... सूतपुत्र नव्हे... वसुषेण नव्हे...
मी कर्ण... कौंतेय... पंडुपुत्र...'

'कर्णा! सावध हो!' कृष्णाचे शब्द उमटले.

कर्णाने त्याच्याकडे पाहिले,

'कर्णा, तू नुसता कौंतेय नाहीस! तू ज्येष्ठ अन् श्रेष्ठ पांडव आहेस. धर्मशास्त्राप्रमाणे पांडवांच्या राज्याचा तूच राजा होशील.'

'अन्...'

'कर्णा, तुझं भाग्य मोठं आहे. तुझ्या पितृपक्षाकडं पार्थ आहे व मातृपक्षाकडं वृष्णी आहेत. तुझं स्थान कौरवांकडं नाही.'

'माझं स्थान!' कर्ण सावध होत होता.

'हो! तुझं स्थान पांडवांकडं आहे. मानाचं! ऐश्वर्याचं! हे श्रेष्ठ कौंतेया, तू माझ्याबरोबर पांडवांकडं चल. ते तुझे धर्मनिष्ठ, वीरबाहू पाची भ्राते तुझ्या चरणांना आनंदानं मिठी घालतील. सर्व पांडवपुत्र अन् त्यांचे सहायक राजे तुझ्यापुढ नतमस्तक होतील. अन् द्रौपदी तुला सहावा पती म्हणून स्वीकारील. एवढंच नव्हे, यादवकुलाचा प्रमुख म्हणून मी तुलाच अनुसरीन. दाशार्हांसह दाशार्ण तुझे अनुयायी होतील!'

'एवढ्याचसाठी मला बरोबर आणलंत?'

'हो, युद्ध अटळ दिसताच या सत्यामागं दडलेली भयानकता मला जाणवली. कर्णा, तू निव्वळ योद्धाच नव्हेस, तू वेदविद्येतही पारंगत आहेस. सनातन सिद्धांत तुला माहीत आहेत. सूक्ष्म धर्मशास्त्रावर तुझी निष्ठा आहे. उद्या रणांगणात तू उभा राहिलास, तर तुला तुझ्या भ्रात्यांच्याच वधासाठी उभं राहावं लागेल. कदाचित तुझ्या हातून एखाद्या पांडवाचा वध घडला, तर ज्येष्ठाकरवी घडलेली ती कनिष्ठ भावाची हत्या पुत्रहत्येचं महापाप ठरेल. तुझ्या हातून कुलक्षय होऊ नये, म्हणूनच मला तुझं जन्मरहस्य सांगणं भाग पडलं. कर्णा, तुझ्यासारख्या चारित्र्यसंपन्न, दातृत्वशील पुरुषाला...'

'दातृत्व! माझं? नाही, कृष्णा, तू तरी त्याची थोरवी वर्णू नकोस. मधुसूदना! कंस, जरासंधासारख्या सम्राटांचा तू पराभव केलास. तुझ्या पराक्रमानं, तुझ्या आदेशानं अन्यायी राज्यं उलथून पडली; पण ती राज्यसंपदा, तो अधिकार न स्वीकारता सहजपणे तू ती राज्यं दुसऱ्यांच्या हाती देऊन मोकळा झालास. ते दातृत्व केवढं मोठं! स्वार्थापोटी केलेलं दातृत्व त्यापुढं किती टिकणार?'

'स्वार्थ?'

'हो, स्वार्थ! कृष्णा, माझं जन्मरहस्य तू सांगितलंस, तसंच माझं स्वभावरहस्य सांगू दे. ज्याचं जीवन सूतकुलामुळं डागळलंय् व ज्याचा पुरुषार्थ, पराक्रम याच कारणानं सदैव बंदिस्त राहिला, तो दुसरं काय करणार? ती जीवनातली पोकळी भरून काढण्यासाठीच चारित्र्याची जोपासना करावी लागली. तपश्चर्येच्या द्वारे ब्रह्मास्त्राची इच्छा केली. कीर्तीसाठी दातृत्वाचा आधार शोधावा लागला.'

'कर्णा, पण त्यानंच तुझं जीवन उजळून निघालं. सत्य-असत्याचा विचार करून तू निर्णय घे.'

कर्ण खित्रपणे हसला. म्हणाला,

'कृष्णा, जे माहीत असतं, ते सत्य मानतो. जे माहीत नसतं, ते असत्य समजतो अन् त्याला मर्यादा स्वत:च्या अनुभूतीची. कैक वेळा असत्य बोलायचं ठरवलं, तरी सुद्धा भविष्यातलं सत्यच वदलं जातं. भगवान परशुरामांनी माझा स्वीकार करावा, म्हणून मी त्यांना भृगुकुलोत्पन्न ब्राह्मण आहे, असं खोटं सांगितलं. ते भृगुकुलच त्या वेळी का आठवावं? पृथ्वीतलावर प्रथम अग्री निर्माण करणारा तो भृगु आज माझ्या हातूनच हे रणकुंड पेटवलं जाणार आहे, हे त्या वेळी असत्य बोलताना माझ्या ध्यानी आलं नाही.'

'हे रणकुंड पेटणार, की नाही, हे तुझ्याच हाती आहे.'

'माझ्या हाती?'

'हो! तू पांडवांना मिळालास, तर युद्धाला उभं राहण्याचं धाडस दुर्योधनाला होणार नाही.'

'नाही, कृष्णा, ते धाडस माझ्या हातून होणार नाही.'

'कर्णा, माझं ऐक! अजून वेळ गेलेली नाही.'

'नाही, रे कृष्णा! ती वेळ केव्हाच हरवली. शस्त्र-स्पर्धेच्या वेळी माझा अपमान झाला. कृपाचार्यांनी माझं कुल विचारलं, तेव्हा कुंती मातेनं सांगायला हवं होतं. ती वेळ होती. भर स्वयंवरात द्रौपदीनं माझा सूतपुत्र म्हणून उपहास केला होता, तेव्हा तू सांगायला हवं होतंस. ती वेळी होती...'

'पण अजून काही घडलं नाही.'

'असं आपल्याला वाटतं. पांडवांचं हित पाहत असता, दुर्योधनाकडं मात्र आपलं

दुर्लक्ष होतं.'

'मला त्याच्याकडं पाहायचं कारण?'

'काही नाही; पण मला तसं वागता येईल? बाळपणापासून स्नेह लाभला, तो त्याचा. त्यात कधीही दुरावा आला नाही. शस्त्र-स्पर्धेच्या वेळी जे मातेला जमलं नाही, ते त्यानं केलं. माझ्या लज्जारक्षणार्थ अंगदेशाची प्रतिष्ठा त्यानं माझ्या पाठीशी उभी केली. द्रौपदीस्वयंवरात तो माझ्या बाजूनं उभा राहिला. महाराज, घोषयात्रेत गंधर्वांकडून मी पराजित झालो, विराटनगरीत अर्जुनानं माझा पराभव केला, ते माहीत असूनही त्याची माझ्यावरची निष्ठा, प्रेम तसूभरही कमी झालं नाही. जय-पराजयांत ज्याची निष्ठा ढळत नाही, असा तो माझा मित्र! उद्याचा रणयज्ञ त्यानं माझ्याच दिग्विजयाच्या आधारावर रचलाय्. त्या माझ्या मित्राला, सुहृदाला मी कसा विसरू? कोणत्या मोहासाठी?'

'कल्पिताच्या मोहात पडून सत्याचा विसर पडू देऊ नकोस, कर्णा.? कृष्ण म्हणाला.

'ते सत्यच मी अधिक निरखून पाहतोय्. मी कौंतेय असेन; पण वाढलो, तो राधाईच्या हातांनी, अधिरथांच्या प्रेमानं. ते सूतकुळाचे संस्कार घेतच मी लहानाचा मोठा झालो. सूतकन्यांनी माझा संसार सावरला, वाढविला. क्षत्रियाचे संस्कार मला कधीच लाभले नाहीत. आता जीवनाच्या अखेरच्या पर्वात ती जाणीव होते, तेव्हा, निदान एक तरी क्षत्रिय-संस्कार मला पाळता येतो का, ते मी पाहतो.'

'कोणता संस्कार?'

'क्षत्रिय कधी मैत्रीला पारखा होत नाही, असं म्हणतात. तो संस्कार जपत असतानाच माझ्या जीवनाचा शेवट होऊ दे.'

कर्णाच्या त्या तेजस्वी दर्शनानं कृष्ण भारावून गेला होता.

कर्ण म्हणाला,

'कृष्णा, एक विनंती आहे.'

'बोल!'

'कृपा करून हे रहस्य असंच राहू दे. त्या युधिष्ठिराला हे सांगू नका. तो धर्मनिष्ठ, भावनाविवश, माझा जुगारी बंधू धर्म, माझं-त्याचं नातं कळलं, तर माझ्यासाठी आपल्या बांधवांसकट सर्वस्व पणाला लावील अन् कृतहस्त, अतिदेवी अशा त्या दैवा च्या अधीन मला एकट्याला करून तो आनंदानं वनवासी होऊन जाईल.'

कर्णाचा आवाज दाटला होता

कृष्णाची तीच स्थिती झाली होती.

कष्टाने कृष्ण म्हणाला,

'कर्णा, तुझी इच्छा मी आज्ञा समजेन. तुझ्या या उदात्त रूपदर्शनानं तुला तो अधिकार प्राप्त झाला आहे.'

कर्ण एकदम म्हणाला,

'रथ थांबवा! माझा विवेक आणि विचार जोवर माझ्या कह्यात आहे तोवरच मला रथाखाली उतरू दे.'

कृष्णाने रथ थांबवला, कर्ण रथाखाली उतरला. कृष्ण रथातून जवळ आला.

'कर्णा, निदान वृक्षच्छाया पाहुन तरी रथ थांबवला असता.'

'छाया?' कर्णाने पडलेल्या प्रखर उन्हाकडे पाहिले, 'महाराज, छाया लाभणं दैवी

असावं लागतं. तो अर्जुन इंद्रभक्त ना? त्याला जीवनात आपल्या कृपेची सावली लाभली. मी सूर्यभक्त तेजात होरपळून जाणं, दाहात सदैव उभं राहणं, एकाकी, हेच माझं जीवन. त्यात सावली अवतरेल कशाला?'

'कर्णा, तुझं लोभस रूप मी कधीही विसरणार नाही. आता भेट घडेल, ती रणांगणी, तुला काही हवं?'

कर्णाने दीर्घ श्वास घेतला. त्याचा आवाज प्रगटला,

'युद्धभूमीवर अर्जुनाचं सारथ्य करीत आपण सामोरे याल, तेव्हा धनुष्याची प्रत्यंचा खेचण्याचं बळ राहावं.'

'आणि...'

'जीवन निष्कलंक राहावं,.. मृत्यू वीरोचित यावा.'

कर्ण कृष्णदृष्टी टाळीत म्हणाला,

'आप्तस्वकीयांचा वध माझ्या हातून घडू नये...' काही क्षण उसंत घेऊन कर्ण म्हणून, 'आणखी एक इच्छा होती...'

कृष्णाच्या गालांवरून अश्रू ओघळले. ते पुशीत कृष्णाने विचारले,

'कसली इच्छा?'

'केव्हातरी आपली बासरी परत ऐकायला मिळावी, असं वाटत होतं. पण ते जमायचं नाही.'

'नाही, कर्णा! तुला जरूर मी बासरी ऐकवीन. त्यात कृतार्थता सामावलेली असेल.'

टापांच्या आवाजाने दोघे भानावर आले. कृष्णदळ आले होते. काही न बोलता कृष्णाने कर्णाला आवेगाने मिठी मारली. दारुकाने सारथ्याची जागा घेतली होती. कृष्ण रथात चढत असतानाच तो दारुकाला म्हणाला,

'रथाला वेग दे! जेवढया वेगानं जाता येईल, तेवढा वेग दे.'

रथ उधळला. कृष्णरथ दळासह दिसेनासा झाला. दळाबरोबर आलेला कर्णरथ तेवढा उभा होता.

चक्रधर कर्णाची वाट पाहत होता

# ३८

भर उन्हातून कर्णाचा रथ हस्तिनापूरच्या दिशेने जात होता. चारी बाजूंना विस्तीर्ण उघडी भूमी त्या सूर्यदाहात होरपळत होती. चक्रधर सारथ्य करीत होता. काही न बोलता कर्ण आपल्याच विचारात गर्क होता. चक्रधराच्या हाकेने तो भानावर आला.

'अंगराज!'

'काय, चक्रधर?'

'ते पाहा!'

कर्णाने पाहिले, तो एक रथ दौडत येत होता. सूर्यकिरणांत तो सुवर्णरथ झळाळत होता. कर्णाने रथ निरखला. तो म्हणाला,

'युवराजांचा रथ ना?'

चक्रधराने असूड उंचावला. रथाला गती लाभली. दोन्ही रथ एकमेकांजवळ येऊन पोहोचले. कर्ण रथाखाली उतरला. कर्णाजवळ जाणाऱ्या दुर्योधनाचा चेहरा म्लान होता. ती चर्या पाहून कर्णाच्या चेहऱ्यावर स्मित प्रगटले. जवळ येणाऱ्या दुर्योधनाला तो म्हणाला,

'युवराज! तेवढी चिंता करण्याचं काहीच कारण नव्हतं. कृष्णानं मला पळवून नेलं नसतं.'

दुर्योधनाने आवंढा गिळला. कर्णाचा दंड धरीत तो म्हणाला,

'माणसानं पळवलेली माणसं परत प्राप्त करून घेता येतील; पण मृत्युनं पळवलेला माणूस माघारी कसा मिळणार?'

'मृत्यू? मित्रा S S'

दुर्योधनाचे नेत्र अश्रूंनी भरले. त्याचा श्वास अवघडला. सारे बळ एकवटून त्याने सांगितले,

'तुमच्या तातांचा... अधिरथांचा काळ झाला.'

'अशक्य! सकाळी मी त्यांना पाहिलं,...' कर्ण उद्गारला.

'मित्रा! त्यांना अपघाती मृत्यू आला.'

'अपघात?'

'तुम्ही इकडं आलात आणि अधिरथ रथशाळेकडं गेले. तिथं एक नवीन रथ सज्ज झाला होता. त्याची परीक्षा पाहण्यासाठी...'

कर्णाचे उभे अंग शहारले. तो म्हणाला,

'नको, युवराज, काही सांगू नका. सारं मला माहीत आहे.'

कर्णाच्या डोळ्यांसमोर ते भयानक दृश्य तरळत होते. तो बोलत होता :

'... तात रथारूढ झाले. रथाच्या कुण्या त्यांनी काढून घेण्याची आज्ञा केली. आसूड उंचावला गेला आणि रथ उधळला. रध भरधाव धावत होता... समतोल धावत होता; पण अचानक रथाचं चाक रस्त्याच्या खड्डयात फसलं. रथ उचलला गेला आणि रथचक्र रथाच्या कण्यापासून वेगळं झालं. रथ कलंडला अन् त्याखाली तात सापडले.

उधळलेल्या अश्वांकडून रथ तसाच फरफटत गेला. तेव्हा तातांची प्राणज्योत विझून गेली होती... हेच सांगणार ना, युवराज?'

'हो!' चकित झलेला दुर्योधन म्हणाला, 'पण, मित्रा, हे तुला कसं समजलं कुणी सांगितलं?'

'हे! तातांच्या रथपरीक्षेची पद्धत मला माहीत नाही, असं कसं होईल? तातांना समतोल रथ सिद्ध करण्याची कला संपूर्ण अवगत होती, पण तेवढंच ज्ञान रथपरीक्षेला पुरं होत नाही, हे कधीच त्यांच्या लक्षात आलं नाही. सुसज्ज, समतोल रथ बलवान अश्वांकडून जरी ओढला जात असला, तरी रथचक्र दैवगतीनंच फिरत असतं, हे कधीच त्यांच्या मनाला स्पर्शलं नाही. जीवनरथाचंसुद्धा असंच असतं. विद्या, व्यासंग आणि अनुभवानं जीवनरथ असाच सिद्ध होत असतो. केव्हातरी अहंकारापोटी संयमाच्या कुण्या काढून रथपरीक्षा करण्याची इच्छा होते; अन् सामान्य मोहाचा खळगासुद्धा जीवनावर मात करण्यास समर्थ ठरतो.'

कर्णाचे मन त्या धक्यातून सावरले गेले. त्याने विचारले,

'तात कुठं आहेत?'

नदीकडं नेल आहे. सारे तुझी वाट पाहत आहेत... चल.'

दुर्योधनाच्या आधाराने कर्ण रथात बसला. सारे बळ संपले होते. अधिरथांच्या आठवणी उचंबळत होत्या. कष्टाने आवरलेले अश्रू गालांवरून झरत होते. पाठीवर विसावलेल्या दुर्योधनाच्या हातामुळे ते अश्रू आवरले जाण्याऐवजी वाढत होते.

सर्व क्रियाकर्म आटोपून सारे परत आले. वाडा तोच होता. माणसेही तीच होती. पण एका जिवाच्या जाण्याबरोबर त्या वास्तूवर अवकळा पसरली होती. अश्रू ढाळणाऱ्या द्रुमाला कर्णाने सावरून आत नेले.

मन शक्य तेवढे कठोर करून वर्णाने आत पाऊल टाकले. आत शुभ्र आच्छादन पसरले होते. एका कोपऱ्यात राधाई गुडघ्यांत मान घालून बसली होती. कर्ण येताच वृषाली व इतर स्त्रिया उभ्या राहिल्या. त्यांचे मूक रुदन कर्णाला जाणवत होते. पांढरे अंतरीय धारण केलेला तो कर्ण सरळ आइसमोर जाऊन उभा राहिला. राधाईने गुडघ्यांतली मान वर केली, तिची दृष्टी कर्णावर स्थिरावली.

मातेच्या त्या दर्शनाने कर्णाच्या मनाला तडा गेला. त्या रूपात केवढा फरक पडला होता. कपाळावरची एक कुंकवाची खूण नाहीशी झाली, तर केवढे तेज हरवते! त्या डोळ्यांची वलये उजाड, भकास वाटत होती. त्या दर्शनाने कर्णाच्या पायांतले बळ हरले. तो सावकाश खाली बसला आणि वाही न बोलता त्याने राधाईला आपल्या मिठीत घेतले.

# ३९

कुरुक्षेत्र ही युद्धभूमी ठरली. पांडव आणि कौरव आपापली दळे एकत्रित करू लागले. कौरवसेनेकडील राजे आपापल्या सैन्यानिशी हस्तिनापुराकडे येत होते. कौरव-पांडव दोन्ही पक्षांकडून कुरुक्षेत्रावर भव्य शिबीरे उभारली जात होती. कुरुक्षेत्रावरचे जुने प्रासाद सर्व सुखसोयींनी तयार झाले होते. कुरुक्षेत्राकडे जाण्यासाठी निघालेल्या पांडवांच्या प्रबळ चतुरंग सेनेचा तळ हस्तिनापूरच्या नदीच्या पैलतीरावर विसावला होता. त्या सेनेची भव्यता पाहून, कर्ण, दुर्योधन अधिक जबाबदारीने तयारी करीत होते. कर्णपुत्र शत्रुंजय, वृषकेतु, वृषसेन आणि कर्णबंधू द्रुम, द्रोण आधीच आपल्या दळासह कुरुक्षेत्राकडे गेले होते.

रात्रीच्या वेळी राधाई दासीसह घराबाहेर जात असलेली पाहून कर्णाला आश्चर्य वाटले. अधिरथ गेल्यापासून ती आपल्या खोलीतून बाहेर पडली नव्हती.

कर्णाने विचारले,

‘आई, बाहेर निघालीस?’

‘हो! नदीची पूजा करावयाची आहे.’

‘मी येऊ?’

‘नको! काही व्रतं अशी असतात, की ती एकांतामध्येच पुरी केली जातात.’

कर्णाकडे न पाहता राधाई वाडयाबाहेर पडली. दासीसह ती नदीकिनारी आली. रात्र काळोखी होती. चांदण्या लुकलुकत होत्या. नदीकाठावर एक नाव उभी होती. नावेच्या पलित्याचे प्रतिबिंब नदीच्या पाण्यात थरथरत होते. राधाईची नजर पैलतीराकडे गेली. पांडवांच्या शिबिरावरच्या शेकोटया, पलिते दृष्टीत भरत होते.

राधाईने विचारले,

‘तीच ना नौका?’

‘हो!’

‘चल.’

दोघी त्या नौकेजवळ गेल्या. त्या चढताच नौका हळूहळू पैलतीराकडे जाऊ लागली.

कृष्ण-शिबिरात कृष्ण एकटाच उभा होता. चंदनाचा सुवास सर्वत्र दरवळत होता. भावी युद्धाच्या विचारात कृष्ण शिबिरात नकळत येरझारा घालू लागला, त्याच वेळी सेवक आत आला. कृष्णाने त्याच्याकडे पाहिले. सेवकाने सांगितले,

‘एक वृद्धा आपल्या दर्शनाच्या इच्छेनं आली आहे.’

‘या वेळी?’

‘हो! आपल्याला भेटणं आवश्यक आहे असं म्हणते ती.’

‘पाठव तिला आत.’ कृष्णाने अनुमती दिली.

अशा भररात्री कोण आले असावे, याचा विचार कृष्ण करीत होता. विदुराघरून कुंती

कालच शिबिरात आली होती. ती या वेळी भेटावयास येणे शक्य नव्हते. कृष्ण विचार करीत असतानाच राधाई शिबिरात प्रवेश करती झाली.

राधाईने कृष्णाला एवढया जवळून कधीच पाहिले नव्हते. राधाईने अत्यंत नम्र भावाने कृष्णाला वंदन केले. हात जोडीत कृष्ण म्हणाला,

'मातांनी आशीर्वाद द्यावा. वंदन करू नये.'

'कृष्णमहाराज, आपण राजा म्हणूनच नव्हे, तर गुणांनीही श्रेष्ठ आहात. आपल्याला वंदन करणं ह साझा धर्मच आहे.'

'माते, कोण तू? तुझा परिचय...'

'सामान्याचा परिचय कसला? मी एक माता. स्त्रीला जीवनात पतीचा आधार असतो. दुर्दैवानं मी तो नुकताच गमावला आहे. बालपणीच माझा विवाह झाला. बाल्य सरलं. तारुण्य आलं. तेही हळूहळू उलटू लागलं, पण माझी कूस उजवली नाही. पुत्रप्राप्तीसाठी पूजाअर्चा, उपासतापास सारं केलं. तीर्थयात्रा केली. नवससायास केले; पण काही फळाला आलं नाही... अन् एके दिवशी भल्या पहाटे गंगेच्या काठावर स्नानासाठी आम्ही पति-पत्नी गेलो असता त्या नदीतून वाहत जाणारी एक पेटी माझ्या दृष्टीला पडली. त्या पेटीच्या संरक्षणार्थ तिला दूर्वा-कंकणादिरूप नाडा-दोरा बांधला होता. ती पेटी कुंकुमाच्या हातांनी चिह्नित केली होती. कुतूहलाने मी ती पेटी धरून ठेवली. माझ्या पतीने ती पेटी अलगद किनाऱ्यावर आणली. ती पेटी जेव्हा उघडली, तेव्हा त्यात नवजात अर्भक दिसलं. पुत्रहीन आम्हांला ते परमेश्वरी दान वाटलं.'

'पुढं काय झालं?' कृष्णाने विचारले.

'खरोखरच तो मुलगा वरदान होता. त्याच्या पावलांनी आमचं जीवन आनंदित बनलं. जीवनात दु:ख उरलंच नाही. तो मुलगा घरी आला अन् त्यानंतर मलाही मुलं झाली. तो मुलगाही मोठा गुणसंपन्न. विद्याव्यासंगांत त्यानं खूप कीर्ती मिळवली. ज्ञानी, वीर, योद्धा, दाता म्हणून त्याची कीर्ती त्रिखंडात पसरली...'

'दाता!' कृष्ण सावध झाला. 'माते, तू कोणाबद्दल बोलत आहेस? कोण तू?'

'मी राधा, महारथी, दात्या कर्णाची आई.'

'तुला काय हवं, माते?' कृष्णाने विचारले.

राधा हसली. ती म्हणाली,

'महाराज, ज्या मातेच्या कपाळी सौभाग्य-लेणं राहिलं नाही, जिचा मुलगा उद्या रणांगणावर जाणार आहे ती माता दुसरं काय मागणार? मला माझा मुलगा हवा-सुरक्षित.'

'आणि त्यासाठी तू माझ्याकडं आलीस?'

'नाहीतर कुठं जाणार?' राधाईने विचारले, 'कृष्णा, माझ्या मुलाच्या तोंडून मी अनेक वेळा तुझ्या अलौकिक गुणांची, स्नेहशील भावाची, तुझ्या ठायी वसत असलेल्या दैवगुणसंपन्न योगाची अनेक वर्णनं ऐकली आहेत. कर्ण नेहमी म्हणतो, 'पांडवांची शक्ती एकच आहे : कृष्ण!' आपली कृपा झाली, तर माझा मुलगा सुरक्षित राहील, हे मला माहीत आहे.'

'नाही, माते, ते आता माझ्या हाती राहिलं नाही.'

'मग कुणाच्या?'

'नियतीच्या!'

राधाईच्या मुखावर उमटलेले स्मित पाहून कृष्णाला नवल वाटले. त्याने विचारले,

‘खोटं वाटतं?’

‘नाही.’

‘मग हसलात का?’

‘महाराज, माझा मुलगा कर्ण एक सामान्य मानव, सूतकुलात वाढलेला; पण त्याचं दातृत्व एवढं मोठं की, आजवर त्याच्याकडून कोणीच याचक विमुख परत गेला नाही. पांडवांच्या विजयासाठी साक्षात इंद्र त्याच्याकडं कवचकुंडलं मागावयास आला. भावी पराजय पत्करून, आपल्या वचनाला कलंक लागू नये, म्हणून ती कवचकुंडलं आनंदानं त्यानं इंद्राला दिली. ही सामान्य मानवाची कथा. आपण तर दैवी गुणसंपन्न, आपण नियतीचा विश्वास द्यावा!’

कृष्णाला काही सुचेनासे झाले. त्याचे प्रसन्न हास्य विरले. कृष्णाचा चेहरा व्याथित बनला. तो म्हणाला,

‘माते, तुझा भाव मला कळतो. त्या कर्णावर माझाही लोभ आहे. पण...’

‘नको, कृष्णा, तू आमच्यासाठी व्यथित होऊ नकोस. मीही दात्या कर्णाचीच आई आहे. जे दान देत असता दुःख होतं, ते दान कितीही श्रेष्ठ असलं, तरी याचकानं ते स्वीकारू नये, असं कर्ण नेहमी सांगतो. तू आमच्याकरिता कष्टी होऊ नकोस. त्यापेक्षा जे दैवी लिहिलं असेल, ते आनंदानं आम्ही सहन करू.’

‘माते! संतापात...’

‘नाही, कृष्णा! मी संतापले नाही. तो आमचा अधिकार नाही. येते मी.’

राधाईचे सारे बळ संपले होते. थकल्या पावलांनी आणि थकल्या मनाने ती नौकेत बसली.

पांडवांचे पसरलेले शिबिर बसल्या जागेवरून दिसत होते. असंख्य शेकोटयांचे अस्तित्व पृथ्वीतलावर अवतरलेल्या अग्निकुंडांप्रमाणे भासत होते.

किनारा सुटला होता. नाव हेलकावे घेत होती...

# ४०

पहाटेच्या वेळी कर्ण रथशाळेकडे गेला. रथशाळेसमोर कर्णाचा रथ सिद्ध केला जात होता. हवेत गारवा वाढला होता. दूरवर नदीकिनारा दिसत होता. पहाटेचे विरळ धुके धरतीवर उतरत होते. आपला सुवर्णरथ कर्ण निरखीत होता. कारागीर त्या रथावरून हात फिरवीत होते.

कर्णाने विचारले,

'रथाची परीक्षा घेतली?'

'हो! कालच.'

'तातांची परीक्षेची पद्धत अगदी भिन्न होती.'

'ती त्यांनाच जमत असे.' कारागीर म्हणाला, 'पण तो अपघात कसा घडला, याच नवल वाटतं.'

कर्ण काही बोलला नाही. कारागीर आपल्या सहायकांसह रथशाळेत निघून गेला. कर्ण रथाशेजारी एकटा उभा होता. रथाचे काळे घोडे फुरफुरत एका जागी सूर नाचवीत होते.

पाठीमागून आलेल्या पावलांच्या आवाजाने कर्ण सावध झाला. त्याने मागे पाहिले.

राधाई उभी होती.

'आई, तू! अन् बरोबर कुणी नाही?'

'कशाला कोण हवं! पूजा आटोपली. तुझी चौकशी केली. कळलं, तू रथशाळेकडं गेला आहेस.'

'तू चालत आलीस? एवढया दूर!'

राधाई प्रसन्न हसली.

'केवढी काळजी करतोस, रे? अरे, अंगराज राधेयाची आई बनण्याआधी मी सूतकुलाचीच कन्या होते.'

अभिमानाने आपल्या रथाकडे पाहत कर्णाने सांगितले,

'बघ, आई, रथ कसा झाला आहे, तो!'

'रथ सुरेख झाला आहे, त्यात नवल नाही. सारथ्य अन् रथपरीक्षा हे आपले कुलाचे गुणच आहेत!'

राधाई रथशाळेकडे जात होती. कर्ण तिच्या पाठोपाठ जाऊ लागला. रथशाळेच्या भव्य प्रवेशद्वारातून राधाईने प्रवेश केला. समोरचा मोठा चौक त्यात उभे असलेले रथ, सारे पाहत असता राधाई म्हणाली,

'हे रथशाळेचे प्रमुख असूनही कधी मी इथं आले नव्हते.'

राधाईचे लक्ष शुभ्र चौथऱ्यावर ठेवलेल्या सुबक चंदनी आसनावर गेले. एक व्यथा तिच्या चेहऱ्यावर उमटली. तिकडे बोट दाखवीत तिने विचारले,

'ते आसन...'

'तातांचं! जेव्हा महत्त्वाची पाहणी नसेल, तेव्हा ते तिथंच बसत. तिथून सारी

रथशाळा दिसते. आता ते आसन मोकळंच आहे. नजीकच्या काळात त्यावर बसण्याची योग्यता कुणाला लाभेल, असंही वाटत नाही. तातांचा रथपरीक्षेचा अधिकार मोठा होता.'

नि:श्वास सोडीत राधाई त्या आसनाजवळ गेली. त्या आसनावरून हळुवारपणे हात फिरवीत ती म्हणाली,

'माणसं जातात. माघारी राहतं, ते त्यांचं आसन. ते तसंच मोकळं राहतं. राहावं! तरच जीवनाला अर्थ! कर्णा, माणसानं एवढं कीर्तिवंत व्हावं की, त्याच्या माघारी त्याचं आसन बराच काळ तसंच मोकळं राहावं ती जागा व्यापण्याचं धाष्टर्य कुणाला होऊ नये.'

राधाई सावकाश रथशाळेबाहेर आली. त्या सज्ज झालेल्या रथाकडे ती पाहत होती. एकदम ती वळली. तिचे नेत्र अश्रूंनी भरले होते.

कर्ण तिच्याजवळ जात म्हणाला

'आई! तुझ्या डोळ्यांत अश्रू!'

डोळे पुशीत, स्मित करीत ती म्हणाली,

'कुणी सांगितलं, की दु:खाच्याच वेळी डोळ्यांतून अश्रू झरतात, म्हणून! आनंदाच्या वेळीही ते येतात.'

'कसला आनंद?'

'तुझा हा रथ बघ ना! उद्या युवराजांबरोबर सुवर्णरथातून तू जाशील, भीष्म, द्रोण, कृप यांच्या मालिकेत रणांगणात उभा राहशील. सूतकुलात वाढलेल्याचं आणखी भाग्य कोणतं? कर्णा, जरा वाक, रे.'

कर्ण वाकला. राधाईचे हात उंचावले गेले. ती थरथरती बोटे कर्णाच्या गालांवरून फिरत होती.

कर्ण राधाईच्या कृतीने चकित झाला होता. भारावला होता.

'आई, असं का करतेस?'

तुझं रूप डोळ्यांत साठवून घेते. कर्णा, मी तुझा निरोप घ्यायला आले आहे.'

'कसला निरोप?' कर्ण कासावीस झाला.

'मुला, दु:खानंतर सुखाचे दिवस आले, तर आनंद वाटतो. पण आनंदानंतर दु:ख आलं, तर ते सहन करणं कठीण होतं, तुझ्या पावलांनी आनंद, समाधान पुरेपूर लाभलं. उद्या तू रणांगणावर जाणार. रणांगणाचं भवितव्य कुणी सांगावं? कदाचित सुखरूप माघारी येशील वा न येशील. रणांगणात विजयी होऊन आलास, तर तुझं स्वागत करण्यात आनंदच वाटेल, पण नाही आलास, तर... ते दु:ख सहन करण्याची आता शक्ती राहिली नाही. ते त्राणही आता नाही.'

कर्णाच्या डोळ्यांतले अश्रू पाहताच राधाईने त्याला जवळ घेतले.

'तू वीर आहेस. ज्ञानी आहेस. त्यागाची महती तुला कळली आहे. आता माझ्या जिण्याला अर्थ नाही. सारी कर्तव्यं संपली आहेत. येणाऱ्या अकल्पित दु:खाखाली सापडण्यापेक्षा केव्हा ना केव्हा तू जिथं जाणार आहेस, तिथंच तुझ्या स्वागतासाठी आधी जावं, असं वाटतं. तुझ्या तातांनाही एकटं वाटायचं नाही.'

'तुझा विचार काय आहे? काय करणार आहेस, आई, तू?'

'अरे, असा भिऊ नकोस. ज्या नदीच्या लाटांनी तुला सुखरूप माझ्या हाती दिलं, त्याच लाटा मला चिरविश्रांती मिळवून देतील. नदीला आपण आई मानतो, ते का

उगीच! ती जरूर मला आपल्या कुशीत घेईल. येते मी. वसूला जप!’

कर्ण एकदम गुडघ्यांवर बसला. त्याने राधाईच्या चरणांवर मस्तक ठेवले तिची पावले अश्रूंनी भिजवीत तो म्हणाला,

‘माते, आशीर्वाद दे!’

‘मी कसला आशीर्वाद देऊ? माझा प्रत्येक श्वास हा तुझ्यासाठी सोडलेला आशीर्वादच होता.’

‘जयाची आकांक्षा माझ्या मनात नाही. पराजयाची भीती मुळीच राहिली नाही. माते, एकच आशीर्वाद देऊन जा. ज्या सहजपणे तू मृत्यूला सामोरी जात आहेस, ते बळ मला लाभावं. मृत्यूचं भय मला वाटू नये.’

कर्ण उठला. त्याच्या नेत्रकडांवर गोळा झालेले अश्रू राधेने आपल्या बोटांनी निपटले. तिच्या ओठांवर स्मित उमटले आणि काही न बोलता, वळून न पाहता ती धुक्यातून नदीकडे जाऊ लागली. क्षणा-क्षणाला दूर जाणाऱ्या राधाईला पाहून कर्णाला वाटत होते की, धावत जावे, तिला माघारी वळवावे; पण तसे करण्याचे सामर्थ कर्णाठायी राहिले नव्हते. राधाई पाहता-पाहता धुक्यात हरवून गेली.

कर्णाच्या कानांवर रथाचा गडगडाट आला. रथशाळेकडे दुर्योधनाचा रथ भरधाव वेगाने येत होता. कर्णाजवळ येऊन रथ थांबला. दुर्योधन आनंदाने रथाखाली उतरला. कर्णाने त्याला वंदन केले. कर्णाजवळ जात असता दुर्योधनाचे हास्य विरले. कर्णाच्या डोळ्यांत अश्रू तरळत होते. त्याची घायाळ मुद्रा पाहून दुर्योधनाने चिंतेने विचारले,

‘मित्रा, तुझ्या डोळ्यांत अश्रू! काय झालं?’

कर्ण हसला. अश्रू न पुसता म्हणाला,

‘युवराज, दु:खाच्या वेळीच अश्रू येतात, असं नाही. आनंदाच्या वेळीही ते येतात.’

‘आनंद?’

‘यापेक्षा आनंदाचा क्षण कोणता सूतकुलात मी वाढलेला, तुमची मैत्री लाभली. अंगदेशाचं आधिपत्य आलं. यापेक्षा सामान्यांचं आणखी काय भाग्य असतं?’

‘मित्रा, तुला आनंदाची बातमी सांगायला धावत तुझ्या गृही गेलो होते. तिथं कळलं की, तू इथं आहेस. म्हणून तसाच इकडं आलो.’

‘कसली आनंदाची बातमी?’

‘शल्यराज आपल्या विपुल दळासह पांडवांच्या मदतीला जात होते. त्यांना मी वळवून आपल्या बाजूला आणलंय्.’

‘पण ते पांडवांचे आप्त...’

‘तरीही शल्यराज लढतील, ते आपल्याच बाजूनं! नगराच्या उत्तरेला कौरवदळ एकत्रित होत आहे. आज ते युद्धभूमीकडं जाणार आहे. त्या दळाला निरोप देण्यासाठी आपल्याला तिकडं जायला हवं,’

‘युवराज, रथारूढ व्हा! आता युद्धाखेरीज राहिलंय् काय?’

दुर्योधनापाठोपाठ कर्ण आपल्या रथात चढला. रथाचे वेग हाती घेतले आणि दोन्ही रथ भरधाव दौडू लागले.

# ४१

न दीच्या विशाल प्रवाहावर मध्यान्हीच्या सूर्याचे किरण उजळले होते. सूर्यदाहाची तमा न बाळगता पूर्वकडे, मुख करून, गंगेच्या पात्रात उभा राहून कर्ण आपली सूर्योपासना करीत होता. आदित्याच्या तेजाशी तद्रूप झालेल्या मुखातून वेद स्त्रवत होते. त्याचे विशाल बाहू उंचावले होते. मान कलल्यामुळे मानेवर उतरलेला केशसंभार अधिक स्पष्टपणे दिसत होता. अपराह्ण काळी आपली पूजा संपवून कर्णाने सूर्यवंदन केले. गंगेची ओंजळ हाती घेतली आणि ती उंचावत कर्णाची हाक उमटली,

'कोणी याचक आहे?'

काही क्षण तसेच गेले. हाकेला उतर येत नाही, हे पाहून कर्णाने ती ओंजळ मस्तकी लावली आणि गंगेच्या चमकणाऱ्या पाण्यात त्या ओंजळीचे पाणी मिसळने. कर्ण शांतपणे वळला. नदीकाठावर ठेवलेली आपली पादत्राणे घातली आणि जेथे उत्तरीय ठेवले होते, तिकडे चालू लागणार, तोच त्याची पावले थांबली.

वाळूकिनाऱ्यावर जेथे उत्तरीय ठेवले होते, त्या जागी एक श्वेतवस्त्रधारी व्यक्ती कर्णाचे निळे उत्तरीय घेऊन त्याचीच छाया आपल्या मस्तकावर करून उभी होती. त्या व्यक्तीचे श्वेतवस्त्र वाऱ्यावर हेलावत होते. दोन्ही हातांनी मस्तकावर धरलेल्या फडफडणाऱ्या उत्तरीयामुळे त्या व्यक्तीचा चेहरा सावलीने झाकाळला होता. विशाल वाळवंटाच्या समईवर आपली काजळी फडकावीत सुवर्णज्योत उभी ठाकावी, तशी ती व्यक्ती भूमीवरून अलगद वावरत आहे, असा भास होत होता.

स्थिर पावले टाकीत कर्ण चालू लागला. पायांखालच्या वाळूचा आवाज पावलागणीक उठत होता. किनाऱ्यावरील ती व्यक्ती न्याहाळण्याचा तो प्रयत्न करीत होता. श्वेतवस्त्राने ती आकृती रेखाटली होती. पण चेहरा, ती जागा तशीच मोकळी होती. भर उन्हात धरलेल्या छायेमुळे ते रूप दिसत नव्हते. कर्णाच्या मनात विचार तरखून गेला :

'मृत्यूचं दर्शन घडलं, तर ते असंच असेल का? रूपहीन, श्वेतवस्त्रधारी, शांत, स्थिर...'

जरा नजीक जाताच त्या व्यक्तीने डोक्यावरून पदर घेतला आहे हे कर्णाच्या ध्यानी आले. ती स्त्री आहे, हे ध्यानी येताच उन्नत असलेली कर्णाची दृष्टी पायांशी खिळली. उत्तरीयाचा विचार न करता तो त्या व्यक्तीजवळून जाऊ लागला. त्याच वेळी, त्याच्या कानांवर शब्द आले,

'जरा थांब, कर्णा!'

'कोण?' म्हणत कर्णाने मान वर केली.

त्या व्यक्तीने मस्तकी घेतलेले उत्तरीय खाली घेतले होते. त्या व्यक्तीची ओळख पटताच कर्ण जागच्या जागी थिजून गेला.

अर्जुनाची आई कुंती! शत्रुपक्षाची माता! अन् तीही एकाकी!!

भारल्यासारखा कर्ण कुंतीचे सात्त्विक सौंदर्य डोळ्यांत साठवीत होता. त्या रूपाने

अनेक वेळा त्याला भारले होते. ते रूप एवढ्या जवळून तो प्रथमच पाहत होता.

कुंतीच्या चेहऱ्यावर क्षीण हास्य उमटले. तिनेच शांततेचा प्रथम भंग केला :

'ओळखलंस?'

कर्णाला तिचा आवाज कंपित वाटला. भानावर येत हात जोडीत तो म्हणाला,

'आपल्याला कोण ओळखत नाही? पांडवांची माता! वीर अर्जुनाची आई! राजमाता कुंतीदेवी, अधिरथ सूतपुत्र आपल्याला वंदन करतोय्.'

त्या नतमस्तक कर्णाला पाहून कुंती व्यथित झाली...

'कर्णा, तुला एवढीच का माझी ओळख आहे?'

कर्णाने कुंतीकडे पाहिले, त्याने विचारले,

'राजमाते! वीरपत्नी, वीरमाता, एवढा लौकिक पुरेसा नाही का? उद्या रंगणाऱ्या रणांगणाच्या छायेत कशासाठी हे दर्शन? कोणता हेतू आपल्याला ह्या भर माध्यान्ही, एकाकी इथवर घेऊन आला?'

कुंतीच्या चेहऱ्यावरचे उरलेले स्मित लोपले. ती निश्चयपूर्वक म्हणाली,

'कर्णा, तुझ्या लौकिकानं मला इथवर आणलं. तुझ्या दातृत्वाला जोड नाही, असा लौकिक. तो खरा, की खोटा, हे अजमावण्यासाठी मी इथवर आले.'

'मी समजलो नाही.'

'त्यात न समजण्यासारखं काय आहे? आता मी तुझ्या समोर राजमाता म्हणून उभी नाही. आज मी एक सामान्य याचक म्हणून उभी आहे.'

कुंतीच्या बोलण्याने चकित झालेला कर्ण स्वतःला सावरीत म्हणाला,

'याचक! आपण? राजमाता, आपण थट्टा तर करीत नाही अपूर्णता भरून काढण्यासाठी याचना करावी लागते; पण जे जीवन मुळातच समृद्ध आहे त्यानं याचना कशासाठी करावी? शक्तिशाली भीम, धनुर्धर अर्जुन, धर्मबुद्धी युधिष्ठिरासारखी आपली पुत्रसंपदा आहे. कृष्णासारखा महापुरुष आपल्या पाठीशी असता, पांडवांच्या राजमातेनं सूतपुत्राकडं काय मागायचं? साक्षात अग्नीला प्रसन्न करून घेऊन, त्याच्या कृपेनं गांडीव धनुष्य हस्तगत करण्यासाठी अर्जुनाची माता, सूतपुत्र कर्णाकडं याचक म्हणून येते; यावर कुणी विश्वास ठेवील का? आपण राजमाता आहा. राजमाता म्हणूनसुद्धा ही कृती योग्य होणार नाही. या दुर्दैवी कर्णाच्या निष्कलक दातृत्वाची अशी क्रूर थट्टा तुम्ही तरी करू नका.'

'कर्णा! थट्टा मी करीत नाही. करतो आहेस तू! मी कोण, हे तुला ज्ञात नाही का?'

कर्ण आवंढा गिळीत म्हणाला,

'राजमाता, कुंतीदेवी... अर्जुनजननी...'

'पुरे झालं!' कुंती थकून म्हणाली, 'कर्णा, हे अज्ञानाचं खोटं आवरण किती काळ घेणार आहेस? तुला सारं माहीत आहे. कृष्णानं तुला सारं काही सांगितलय्, हे मी जाणते. तुझं-माझं नातं तुला माहीत नाही का?'

तिच्या व्याकूळ बोलांनी कर्णाचे मन घायाळ झाले. खिन्नपणे तो हसला.

'नातं! जे नातं प्रत्यक्ष मातेला सहन झालं नाही, त्याचा उच्चार करण्यात तरी काय अर्थ आहे?'

'कर्णा, मी सांगितलं ना, याचक म्हणून मी उभी आहे.'

'राजमाते, तुला काय हवं? माझं पौरुष अन् धर्म वगळून, हवं ते माग. मी आनंदानं ते

तुझ्या चरणी अपर्ण करीन.'

'खरं?' कुंतीने साशंकपणे विचारले.

कर्ण निश्चयी स्वरात म्हणाला,

'आजवर कोणीही याचकानं कर्णाकडं येताना मनात शंका बाळगली नाही. पांडवांच्या भावी विजयासाठी साक्षात देवेंद्र माझ्या कवचकुंडलांच्या याचनेसाठी आला होता, तो माझ्या दातृत्वाच्या विश्वासावरच. त्यालासुद्धा हवं ते मिळालं.'

'तुझ्या शत्रूंना तुझा पराभव हवा असेल. त्यांनी तुझ्याकडून कवचकुंडलं नेली असतील. तुझ्या पराजयासाठी मला तुझं दान नकोच आहे. तुझ्या यशाच्या इच्छेनं मी याचक बनले आहे. मला तुझं यश पाहायचं आहे त्यासाठी मी अतृप्त आहे.'

'जे हवं, ते मागा! दात्या कर्णानं याचकाला कधीही कारण विचारलं नाही. हा सूर्यदाह तुम्हांला सहन व्हायचा नाही. या उन्हात तुम्ही फार काळ उभं राहणं योग्य होणार नाही.'

'ज्या दाहानं उभं जीवन करपून गेलं, त्या सूर्यदाहाची मला भीती नाही. माझी चिंता करू नकोस.'

माझं ऐकावं.' कर्णाचे लक्ष नदीतीरापासून थोडया अंतरावर, त्या परिसरात एकाकी उभ्या असलेल्या कदंब वृक्षाकडे गेले. तिकडे बोट दाखवीत कर्ण म्हणाला, 'कृपा करून आपण त्या छायेखाली चलावं. तिथं आपल्याला निवांतपणे बोलता येईल.'

कुंतीच्या होकाराची वाट न पाहता कर्ण कदंबाच्या छायेकडे जाऊ लागला. मागून कुंती चालत होती. दोघे वृक्षच्छायेत आले आणि कुंतीने आपल्या हातचे उत्तरीय कर्णाच्या हाती दिले. विचारात गढलेल्या कर्णाने कुंतीकडे पाहिले आणि त्याने विचारले,

'आपल्याला काय हवं?'

कुंती निश्चयी स्वरात बोलली,

'मला तू हवास, कर्णा! तुला नेण्यासाठी मी आले आहे.'

'मला नेण्यासाठी? कुठं?'

कर्णाने नदीकाठी निरखले.

नदीच्या पात्रात दूरवर एक नाव उभी होती. एकाकी.

ती पाहत असतानाच कुंतीचे शब्द कानांवर आले,

'आई मुलाला कुठं नेणार? हृदयाखेरीज दुसरी जागा आहे कुठं?'

'महादेवी! मी असं ऐकलंय् की, सहवासापोटी जिव्हाळा निर्माण होतो. आता मला नेऊन तो जिव्हाळा लाभेल का?'

त्या शब्दांनी कुंतीचे मन घायाळ झाले. आपली स्वाभिमानयुक्त नजर वळवीत ती म्हणाली,

'कर्णा, तुला हे कुणी सांगितलं? युधिष्ठिर, भीम, अर्जुन माझे. नकुल, सहदेव माद्रीचे, त्या दोघांना तू विचार, त्या तिघांना जे मातृप्रेम मिळालं, तेच त्या दोघांनाही मिळालं, असंच ते सांगतील.'

'गैरसमज होतोय्! मी सापत्नभावाबद्दल बोलत नव्हतो. जिव्हाळ्याबद्दल बोलतोय्.'

'रक्ताचं नातं एवढं दुर्बल नसतं.'

'नातं!' कर्ण हसला, 'सांगून का नाती कळतात? नातंदेखील सहवासानंच वाढतं,

तुझ्या कुशीत मी वाढलो असतो, तुझ्या स्तनातून स्त्रवणाऱ्या दुग्धधारेवर माझं पोषण झालं असतं, तरच आई या शब्दाचा खरा जिव्हाळा कळला असता. नदीपात्रातून वाहणाऱ्या ओघवत्या पाण्याला किनाऱ्याची ओढ कुठून कळणार? तो हट्ट किनाऱ्यानं धरला, तर तो प्रवाह तर थांबत नाहीच, उलट, किनाऱ्याला तडे जातात. एवढया प्रौढपणी ते नातं जाणून, आईला मिठी मारण्याचं बळ कसं येणार?'

'कर्णा, मातृत्व कधीही पराधीन नसतं,'

'नसेलही! मातृत्वाचा अपमान मी कसा करू धजेन नदीपात्रावरून वाहत असलेल्या एका अर्भकाला पाहून जर पुत्रहीन राधेला पान्हा फुटत असेल, तर जन्मदात्या मातेची थट्टा मी कशी करीन? मला पाहून तुमचं मन उचंबळून येत असेलही.' कर्णाने काही क्षण उसंत घेतली. कुंतीला निरखीत तो म्हणाला, 'पण मला तू... तुम्ही... अर्जुनाची. माझ्या शत्रूची माताच दिसता.'

'कर्णा!' कुंती उद्गारली.

'राजमाते! तू देऊ केलेल्या जिव्हाळ्याबद्दल मी तुझा सदैव ऋणी राहीन! मर्यादेनं ज्ञात असलेलं ज्ञान माणसाला वरदायी ठरतं; पण अमर्यादेतून अवतरलेलं ज्ञान माणसाला विनाशाकडंच नेतं.'

'अमर्यादा... कर्णा, मातृप्रेमाला मर्यादा नसते. तिला फक्त आपलं एवढंच माहीत असतं. कर्णा, तू... तू माझा आहेस. तुझ्यावर दुसऱ्या कोणाचाही हक्क नाही. पहिल्या मुलाबद्दल आईला काय वाटत असेल, ते फक्त माताच...'

'नको! त्या कलंकित मातृत्वाचा तुम्ही तरी उच्चार करू नका.'

'कर्णा, मातृत्व कधीच कलंकित नसतं.'

'ते तुम्ही सांगता?' कर्णाचा संयम ढळत होता, 'तो दिवस आठवा! नुकत्याच जन्मलेल्या अश्राप जीवाला नदीच्या विशाल प्रवाहावर सोडून दिलं, तो दिवस आठवा! अद्याप ज्याला आपल्या इवल्याशा मुठी उघडण्याचं बळ लाभलं नाही, त्याला लाटांचा आधार दिला. ज्याच्या दृष्टीला अद्यापि रूपाची ओळख नाही, त्याला नक्षत्रमाळांशी खेळण्याचं सुख दिलंत. त्या जीवानं कोणता अक्षम्य अपराध केला होता? त्या जीवाला लाटांच्या स्वाधीन करताना हे वात्सल्य कुठं गेलं होतं? मातृप्रेमानं ओथंबलेलं हे मन त्या वेळी कठोर का झालं? पाण्याच्या चार थेंबांनीही ते जीवन समाप्त झालं असतं, त्याची जाणीव का नव्हती?' कर्णाने नि:श्वास सोडला. 'सुदैवानं तसंझालं असतं, तर किती बरं झालं असतं! या कर्णाच्या जीवनाचं पोरकेपणा, येईल त्या लाटेवर तरंगत राहणं, ते तरी संपलं असतं. माते! कोणत्या अपराधास्तव मी ही शिक्षा भोगतोय्?'

डोळ्यांतले अश्रू थोपवीत कुंती म्हणाली,

'अपराध तुझा नाही. माझा आहे. नाहीतर तुझे ते कठोर बोल ऐकण्याचं बळ मला राहिलं नसतं. कर्णा, तू पुरुष आहेस. तुइत तर्क तुझ्या पिंडाला साजेसा आहे; पण माझी मर्यादा भिन्न. मी स्त्री आहे. माझी बंधनं मला पाळावीच लागली.'

कर्णाच्या ओठांवर कटू हास्य विसावले.

'कसली बंधनं... पापाचं समर्थन करता कशाला? उलट, बंधनं पाळली नाहीत, म्हणूनच...'

'हां कर्णा! मर्यादा!!' कर्णावर नजर स्थिरावत कुंती बोलत होती, 'स्त्रीची बंधनं माझ्या कर्माला कारणीभूत आहेत. तुझ्या ध्यानी येत नाही. स्त्री ही सदैव परनिष्ठेवर

जगणारी. ती तुम्हां पुरुषांसारखी कधीच स्वतंत्र नसते. विवाहापर्यंत तिची निष्ठा पितृगृहाशी निगडित असते. विवाहानंतर ती पतिगृहाला जखडली जाते. तिचं स्वतंत्र अस्तित्व असतंच कुठं?'

'कोणत्या निष्ठेच्या भयाखाली माझा त्याग केला गेला, ते तरी सांगाल?' कर्णाने आव्हानपूर्वक विचारले.

शांतपणे कुंती म्हणाली,

'जरूर सांगेन.' नदीच्या पैलतीरावर आपली नजर जडवून कुंती भारल्यासारखी बोलत होती. 'जरूर सांगेन! फार वर्षांपूर्वी माझा पिता कुंतिभोज यांच्या दारी कठोर तपस्वी दुर्वास आले. त्यांना एक उग्र अनुष्ठान करायचं होतं. ज्या तपश्चर्येद्वारा पंचमहाभूतांच्या तेजाचा साक्षात्कार धरतीवर व्हावा, अस ते उग्र अनुष्ठान होतं, त्यात कसलाही व्यत्यय येऊन चालणार नव्हतं. त्यासाठी ऋषिवरांचं मन सदैव प्रसन्न ठेवील, असा कुणीतरी सेवक हवा होता. दुर्वासांचा कोप जगजाहीर. त्यांच्या हातांखाली सेवा करण्यास कोण धजणार? माझ्या पित्यापुढं मोठं संकट उभं राहिलं. ऋषिवरांचा कोप झाला, तर त्यांच्या एका शापानं पित्याचं आयुष्य भस्मसात होईल, हेही मी जाणत होते. माझ्या पित्याची मी लाडकी. दुर्वासांच्या सेवेसाठी माझी निवड करण्यात आली. महान महर्षीला रिझवण्यासाठी अल्लड बालिकेची निवड झाली. कर्णा, त्या लहरी, कोपिष्ट तपस्व्याचा अहंकार सुखविण्यात मला केवढे कष्ट पडले, ते काय सांगू? दुर्वासांचं अनुष्ठान पार पडलं. त्यांनी अंतरीक्षातील देवतांना गुलाम बनविलं. दुर्वास माझ्या सेवेवर प्रसन्न झाले. आपल्या अनुष्ठानाच्या फलाची प्रचीती पाहण्यासाठी त्यांनी माझीच निवड केली. अवगत झालेले दिव्य मंत्र मला देऊन, तो तपस्वी आला तसा निघून गेला.'

कुंतीने उसंत घेतली.

'जिज्ञासा माणसाला स्वस्थ कुठं बसू देते! मोह टाळण्याचं ते वयही नव्हतं. एके दिवशी जिज्ञासा प्रबळ झाली. एकांती असता नकळत तो मंत्रोच्चार झाला.. अन् एक देदीप्यमान पुरुष माझ्या स्वीकारासाठी समोर उभा ठाकला.'

कुंतीने लज्जेने आपले हात आपल्या चेहऱ्यावर घेतले. तिच्या कानांवर कर्णाचे अधीरे शब्द पडले,

'थांबू नकोस, माते! मला सर्व सांगून टाव.'

नतमस्तक झालेली कुंती बोलू लागली,

'त्या प्रकाशानं माझ्या विनवणीला जुमानलं नाही. त्याच्या तेजात मी कधी बद्ध झाले, तेही मला कळलं नाही. तू माझ्या उदरी वाढत होतास. रात्रंदिवस जिवाला सुख नव्हतं. कुमारी माता! पितृकुलाला केवढा कलंक लागला असता! मी विश्वासू सखीसह आश्रमात राहू लागले. ऋषींच्या सेवेत रमलेल्या मुलीचा छंद म्हणून पित्यानंही ते सहन केलं. तुझा जन्म झाला. भर रात्री अश्व नदीच्या लाटांवर तुला सोडलं, ते उरीचा पान्हा आटला होता, म्हणून नव्हे. त्या पितृगृहाच्या निष्ठेनंच ते बळ दिलं. आई होण्याचं दुर्दैव काय असतं, हे तुला कळणार नाही. तू चालू लागला असशील, बाबडे बोल बोलत असशील अन् ते पाहण्याचं सुख दुसरा कोणीतरी भाग्यवती भोगीत असेल, या कल्पनेचं दु:ख फक्त माताच जाणू शकते.'

कुंतीच्या त्या बोलण्याने कर्णाचे कठोर बनलेले मन कोमल बनले.

'ठीक आहे, माते! मी तुला दोष देत नाही. दोष असलाच, तर तो आपल्या दैवाचा. नाहीतर माझ्या नशिबी असलं पोरकेपण का आलं असतं! ती जाणीव फार भयानक असते.'

'तोही अनुभव मला आहे, कर्णा! मी कुंतिभोजाची कन्या नव्हे. शूर राजाची मी कन्या. माझ्या पित्यानं आपल्यअपत्यहीन आतेभावाला, कुंतिभोजाला मला देऊन टाकलं. मातृपितृच्छायेला मी पण अशीच मुकलेली आहे. निष्ठेखेरीज माझ्या जीवनात काही नाही. तीच मला जगण्याचं बळ देते.'

कर्ण हसला.

'माते! तुला निदान निष्ठेचं तरी बळ आहे. पण माझ्या माथी काय? वाहत जाणं! येईल त्या प्रवाहाबरोबर वाहत जाणं... एवढंच ना? तू ज्या क्षणी या मुलाला नदीप्रवाहाबरोबर सोडलंस ना, त्या दिवसापासून मी वाहतच आहे. नियतीच्या लाटांवर वाहण्याखेरीज पोरकं पोर दुसरं काय करणार?'

त्या व्याकूळ बोलण्याने कुंतीचे सारे अवसान सरले. पुढे होऊन तिने कर्णाला एकदम मिठीत घेतले.

'नको, कर्णा! निदान मातेच्या समोर तरी पोरकेपणाचा उच्चार करू नकोस. मला ते सहन व्हायचं नाही.'

पाठीवर फिरणारे कुंतीचे हात कर्णाला जाणवत होते. त्या हातांत केवढा विश्वास होता. केवढे उदंड प्रेम दडले होते. भीम, अर्जुनांचे बळ कशात आहे, हे चटकन कर्णाच्या ध्यानी आले.

नतमस्तक कर्णाच्या गालांना अश्रूंनी भिजलेल्या गालांचा स्पर्श झाला. उष्ण श्वास जाणवले. गुलाब-पाकळ्यांचा अलगद स्पर्श व्हावा, तसा कंपित ओठांचा स्पर्श गालाला जाणवला. कर्णाचा जीव त्या दिव्य मिठीत सुखावला. गुदमरला. तटस्थ राहिलेल्या बाहूंनी पराजय स्वीकारला आणि क्षणात कुंती कर्णाच्या मिठीत सामावली गेली. कुंतीच्या मस्तकावर कर्णाचे अश्रू ओघळत होते.

काही क्षणांत कर्ण भानावर आला. कुंतीच्या मिठीतून तो अलग झाला. अपराह्ण कालाच्या, पानांतून उतरलेल्या तिरप्या सूर्यकिरणांत कर्णाच्या गालांवरचे अश्रू चमकत होते. कुंतीने आपल्या बोटांनी ते अलगद निपटले. हसण्याचा प्रयत्न करीत कर्ण म्हणाला,

'आई, आज मी हरलो. आजवर तुझ्या ह्या मुलानं सारं सोसलं, दुख सोसलं, अपमान झेलले, पण कोणत्याही प्रसंगात मनातल्या झरणाऱ्या अश्रूंनी नेत्राची कड गाठली नव्हती. तुझं भाग्य मोठं की, प्रथम भेटीतच तुला तुझ्या मुलाचे अश्रू पाहायला मिळाले. तुला तुझ्या मुलाची, या पृथ्वीतलावरची पाहिली अडखळणारी पावलं पाहायला मिळाली नसतील, बोबडे कोवळे बोल तुझ्या श्रवणी पडले नसतील, पण स्वपराक्रमानं अंगराज बनलेल्या, दातृत्वानं साक्षात देवेंद्रालाही याचक बनविणाऱ्या, उद्याच्या कुरुक्षेत्राच्या रणांगणाची धुरा वाहणाऱ्या पुत्राचे अश्रू पाहायला मिळाले, ही का सामान्य गोष्ट आहे? माते! माझ्या उजाड, एकाकी जीवनात अवतरलेली ही एक मिठी मला शेकडो मरणांना सामोरं जायचं बळ देईल.'

कुंतीने गडबडीने कर्णाच्या ओठांवर बोट ठेवले.

'अशुभ बोलू नये. कर्णा, यापुढं मृत्यूचा विचार करू नकोस. आई मुलाला भेटते, ती

जीवन देण्यासाठी!'

स्वप्नातून जागे व्हावे, तसे कर्णाचे परिवर्तन झाले. सावध होऊन त्याने विचारले,

'जीवन! कसलं जीवन?'

'हक्काचं! मानाचं! कर्णा, मी तुला न्यायला आले आहे.'

'कुठं?'

'पैलतीरावर! जिथं पांडवांची शिबिरं उभारली आहेत, तिथं. तुझे पराक्रमी भाऊ जिथं आहेत, तिथं. ज्या कुळाशी तू नात्यानं, रक्तानं बांधला गेला आहेस, तिथं...'

'का?' कर्णाने विचारले.

'का! आई मुलाला का नेते? तो तिचा असतो, म्हणून. कर्णा, तू माझा आहेस, म्हणून!'

'आई, खरंच का मी तुला हवा आहे?'

'कर्णा, तू शंका धरतोस? जन्मदात्या आईच्या हेतूबद्दल! कर्णा, मी तुझ्यासाठी हवं ते करीन. मी सांगितलं, तर माझी मुलं तुझा जरूर स्वीकार करतील, प्रेमानं, आदरानं करतील. एवढंच नव्हे, ज्येष्ठ पांडव म्हणून तू राहशील आणि...'

'बोल! थांबलीस का?' कर्णाने शांतपणे विचारले, 'द्रौपदी सहावा पती म्हणून माझा स्वीकार करील- हेच ना? हे सारं मी कृष्णाकडून ऐकलंय्. ते परत सांगण्याची मुळीच गरज नव्हती. मला त्याच्याशी काही कर्तव्यही नाही. तुला मी हवाय् ना?'

'हो!'

'मग त्याला एकच मार्ग आहे.'

'सांग, कर्णा!' कुंती आनंदाने अधीर होऊन म्हणाली, 'मी तुझ्यासाठी हवं ते मान्य करीन.'

भर उन्हातही गार वाऱ्याची झुळूक कर्णाच्या अंगाला स्पर्शून गेली. सारे अंग शहारले.

'आई, पांडवांना तू जपलंस, वाढवलंस, त्यांना मातृसुख खूप लाभलं. त्या सुखापासून वंचित झालो, तो फक्त मी. तू माझ्याबरोबर चल ना! जे दिवस राहिले असतील, ते तरी मातृसुखानं भरून निघतील.'

'कुठं?' कुंतीने आश्चर्याने विचारले.

'माझ्याबरोबर! या ऐलतीरावर... जिथं मी आहे, तिथं. राजमाता म्हणून कदाचित तिथं तुझा गौरव होणार नाही; पण कर्णाची आई म्हणून कौरवश्रेष्ठ दुर्योधन तुझ्यापुढं नतमस्तक होईल, हे मी अभिमानानं सांगू शकतो.'

कर्ण असे काहीतरी बोलेल, असे कुंतीला स्वप्नातही वाटले नव्हते. कर्णाच्या बोलण्याने ती चकित झाली. तिला उत्तर सुचत नव्हते. कुंतीच्या त्या मुग्धतेने कर्ण खिन्न बनला. 'पाहिलसं, माते! मी तुला नकोय्. तुला हवीत तुझी मुलं- जी तुझ्या प्रेमाखाली सहवासात वाढली, तुला चिंता आहे त्यांची. माझ्यापासून त्यांच्या जीवनाला धोका आहे असं वाटतं, म्हणूनच तू आज इथं येण्याचं धाडस केलंस.'

'कर्णा S'

'मी तुला दोष देत नाही. तुझ्या हेतूबद्दल शंका बाळगत नाही. मी तुझ्याबरोबर येऊनही तुला हवं ते साध्य होणार नाही. पंडुपुत्र सूर्यपुत्राचा स्वीकार करतील कसा? मातृरक्तानं जात ओळखली जात नाही. पांडवांचा राजमुकुट सूर्यपुत्रावर अभिषिक्त

करण्यास ते कदापिही तयार होणार नाहीत. पांडवांच्या घरी मी गेलो, तर हरणांच्या कळपात सिंह शिरावा, असं ते होईल. पांडवांकडं या कर्णाला जागा नाही. मी कुणालाच नकोय् तसं पाहिलं, तर मला कुठंच जागा नाही. नदीप्रवाहावर सोडलेल्या या तुझ्या मुलाचा प्रवास असाच चालू राहील. एक ना एक दिवस सारे प्रवाह त्या अथांग सागराला मिळतात, असं मी ऐकतो. केव्हातरी तो सागर आपल्यात मला सामावून घेईल. हा माझा अधांतरी प्रवास कुठंतरी काठावर मध्येच थांबू नये. तो सागरापर्यंत सरळ जावा, एवढाच आशीर्वाद तू दे.'

थकलेली कुंती कष्टाने म्हणाली,

'कर्णा, केवढया आशेनं मी आले होते...'

कर्णाच्या चेहऱ्यावर परत स्मित उजळले. त्याची छाती रुंदावली. निश्चयपूर्वक तो बोलला,

'मी तुझी मुळीच निराशा करणार नाही. ज्या कर्णानं प्रत्यक्ष शत्रूला सुद्धा कधी रिक्त हस्तानं माघारी जाऊ दिलं नाही, तो कर्ण आपल्या जन्मदात्रीला निराश कसा करील? माते, तू चिंता करू नकोस. तुझं इच्छित सफल होईल, माते! मी मातृ-ऋणाला बद्ध आहे पण मित्र-ऋणातही माझं पुरं जीवित गुंतवलंय् त्यासाठी मी तुझ्या पुत्रांशी युद्ध करीन. तुझे पुत्र वस्तुत: वधार्ह आहेत. मला त्यांचा संहार करणं शक्य आहे. अर्जुन हीच पांडवांची खरी शक्ती आहे. मी युद्ध त्याच्याशीच करीन. हे यशस्विनी, आम्हां दोघांपैकी कोणीही मृत्यू पावला, तरी तुझे पाच पुत्र शिल्लक राहतील, यापेक्षा दुसरं वचन मी तुला देऊ शकत नाही. ती अपेक्षाही तू करू नकोस.'

कुंतीच्या नेत्रांतून अश्रू ओघळत होते. ती गुदमरल्या आवाजात म्हणाली,

'तू सारं दिलंस, पण माता असूनही मी तुला काही दिलं नाही.'

तुझा आशीर्वाद काय कमी मोलाचा आहे! माते, तुझ्या या मुलाला आशीर्वाद दे. ज्याच्या आकांक्षेनं, यशाच्या आशेनं, कीर्तीच्या लोभानं मी धर्मापासून विचलित होणार नाही, एवढाच आशीर्वाद तू दे!'

कुंतीने प्रेमभराने आपला उजवा हात कर्णाच्या उघडया खांद्यावर ठेवला. ती म्हणाली,

'कर्णा, तुझ्याकडं येताना तुझ्याबद्दल जे चित्र माझ्या मनात कोरलं होतं, त्यात तसूभरही फरक पडला नाही. त्याचमुळं थोडं आश्चर्य वाटतं. ज्याचा धर्मभाव चुकूनही ढळत नाही, अशा माझ्या पुत्राच्या हातून ते अघोरी कृत्य घडलं असेल, असं वाटत नाही.'

'कसलं अघोरी कृत्य? काय बोलतेस तू, माते?'

'पुन्हा कधी भेट होईल, का नाही, हे सांगता येत नाही. त्यामुळं आजच मनात राहिलेलं शल्य तुझ्यापुढं मोकळं करावं, असं वाटतं, कर्णा, विचारलं, तर खरं सांगशील?'

'माते! या कर्णानं एकदाच असत्याची कास धरली- गुरुदेव परशुरामांकडून ब्रह्मास्त्र मिळवण्यासाठी.'

'कर्णा, मी ऐकलंय् की, द्रौपदी राजसभेत दासी म्हणून गेली, तेव्हा तिच्या वस्त्रहरणाचा सल्ला तू दिलास. मला ते खरं वाटत नाही. माझ्या कुशीत जन्मलेलं पोर असल्या अधर्माला प्रवृत्त होईल, यावर माझा विश्वास बसत नाही. ते शल्य माझ्या मनाला सदैव बोचतं. सांग, कर्णा, ते खोतं आहे हे ऐकायला मी आतुर झाले आहे.'

कर्ण क्षणभर त्रस्त झाला. त्या आठवणीबरोबर साऱ्या भावना उफाळून आल्या. 'अगदी खरं! ते मी सांगितलं, हे अगदी खरं आहे.'

कुंतीला ते उत्तर ऐकून धक्का बसला. खचल्या आवाजात ती म्हणाली,

'दोष तुझा नाही. तो संगतीचा दोष आहे!'

गैरसमज होतोय् माते! तो दोष संगतीचा नाही. माझी संगत निर्दोष आहे. दोष असलाच, तर तो माझ्या पुरुषार्थाचा आहे.'

'हं! याला कसला पुरुषार्थ म्हणतात? रजस्वला अबला, असहायपणे राजदरबारी येते, अन् तिला विवस्त्र करण्याची आज्ञा दिली जाते, यात पुरुषार्थ कसला!

'माते, क्षमा कर! पण ते तुला या जन्मी कळायचं नाही. त्याला पुरुष म्हणून जन्माला यावं लागतं. त्या रूपाबरोबर अहंकार जाणून घ्यावा लागतो.'

'अहंकार! दुर्बलावर सत्ता गाजवणारा?'

कर्ण हसला.

'कोण दुर्बल! द्रौपदी? हं! माते, ती तुझी सून असूनही, तुला तिची अहंता, तेज, अस्मिता कळली नाही. द्रौपदी आणि दुबळी? अशक्य...' आकाशी तळपणाऱ्या सूर्याकडे बोट दाखवीत कर्ण म्हणाला, 'त्या सूर्याचा प्रकाश कोमल आहे असं म्हणण्यासारखं होईल. त्याच कोमल हातानं घातलेले घाव केवढे प्रचंड असतात, हे एक कर्णचं जाणू शकतो.'

'कसला घाव? काय बोलतोस तू?'

'माते, तुला माहीत नाही. द्रौपदी स्वयंवराला उभी होती. मत्स्यभेदाचं आह्वान स्वयंवराला सामोरं होतं, ते आह्वान मी स्वीकारलं. मी विश्वासानं धनुष्याला प्रत्यंचा जोडली अन् त्याच वेळी तुझी ती विनयशील, लज्जायुक्त स्वयंवरासाठी अधीर झालेली अबला त्या राजसभेत काय बोलली, माहीत आहे? आजही ते शब्द तप्त रसाप्रमाणे माझ्या कानांत उसळत आहेत. ती म्हणाली...'

कर्णाचा चेहरा अस्ताचलाला जाणाऱ्या सूर्यबिंबासारखा लालेलाल झाला होता. दीर्घ श्वास घेऊन कर्ण म्हणाला,

'ती म्हणाली, कावळ्यानं राजहंसीकडं पाहू नये, सूतपुत्रानं राजकन्येची अपेक्षा करू नये.

'सारा संताप आवरून मी माघारी परत आलो. त्या वेळी साऱ्या अंगावर उठलेला अंगार मी तुला कसा सांगू?'

कुंती काही बोलणार, तोच तिला थांबवीत क्रोधयुक्त बनलेला कर्ण सांगू लागला,

'थांब, एवढयावरच हे थांबलं नाही. राजसूय यगासाठी आम्ही आमंत्रित होतो. भोजनाची पंगत बसली होती. द्रौपदी पंक्तीमध्ये वाढीत होती. ती वाढीत असता माझी नजर वर गेली अन् दुर्दैवानं त्याच वेळी द्रौपदीचा पदर ढळला. माझ्या नजरेत वासनेचा लवलेशही नव्हता; पण ती उद्दाम रूपगर्विता ती संधी सोडील कशी? ती भर पंक्तीमधो कडाडली,

"याचकानं दात्याकडं पाहू नये."

आपल्या विशाल छातीवर बुक्की मारीत कर्ण म्हणाला,

'माते, या कर्णाला- ज्याचं दातृत्व, शील साऱ्यांना ज्ञात आहे त्या कर्णाला ती सांगत होती... याचकानं दात्यांकडं पाहू नये, कशासाठी तिनं हा अपमान केला? तिचा मी कोणता

गुन्हा केला होता? मी सूतकुलात वाढलो, हाच ना?

'तीच द्रौपदी दासी म्हणून कौरव राजसभेत आली, तेव्हा तिचं मी लावण्य पाहत नव्हतो. असहाय स्थिती मी जाणत नव्हतो. दिसत होता फक्त तिचा अमर्याद अहंकार. वासनेचा तिथं लवलेशही नव्हता. आठवत होते फक्त तिचे कठोर शब्द. सारा अहंकार उफाळून आला अन् मी ती आज्ञा दिली. सामान्य स्त्रीपेक्षा राजहंसी काय वेगळी असते, हेच मला पाहायचं होतं...'

आपल्या मुलाचं वेगळं रूप पाहण्यात मंत्रमुग्ध झालेल्या आईवर दृष्टी खिळवीत कर्ण म्हणाला,

'आई, तुझं-माझं नातं माहीत नसतं, माझ्या अहंकाराला डिवचण्याची आगळीक तुझ्या हातून घडली असती अन् दुर्दैवानं तुला राजसभेत यावं लागलं असतं, तरी पुरुषार्थाच्या अहंकारापोटी मी तीच आज्ञा दिली असती. तिथं तुझं वार्धक्य, तुझं स्त्रीत्व याचा मी विचारसुद्धा केला नसता.

'द्रौपदीबद्दल माझ्या मनात एवढी प्रबळ वासना असती, तर ती राजसभेत आली, तेव्हाच दुर्योधनाला टाकलेल्या एका शब्दानं ती माझ्या अनेक दासींपैकी एक दासी बनली नसती का? वासनेला मर्यादा नसते. तिला फक्त आपलं उद्दिष्ट माहीत असतं. कृष्णाच्या एका विनंतीचा स्वीकार करूनही मी तिचा सहावा पती बनलो असतो. माझ्या कृतीबद्दल तू मला दोष देऊ नकोस. दोष द्यायचाच झाला, तर तुझ्या धर्मबुद्धी युधिष्ठिराला दे. अंध धर्म भावस्वरूपही पारखा करतो, हे त्याला समजावून सांग. नाहीतर एकवस्त्रा स्त्री, रजस्वला द्रौपदीला त्या अवस्थेत दरबारी येण्याचा आग्रह त्यानं धरला नसता.'

कुंतीने वर्णावडे पाहिले.

त्याचा अभिमानयुक्त आवेश पाहून तिला कौतुक वाटले. चांदण्यासारखे नाजूक हास्य तिच्या ओठांवर उमलले.

ते पाहून कर्ण सावरला.

कुंती हसून म्हणाली,

'कर्णा, मी तुला दोष देत नाही; पण सांगावंसं वाटतं, तू द्रौपदीला ओळखलं नाहीस. ती तशी का वागते, हेही तुला कळायचं नाही. कारण तू पुरुष आहेस. स्त्रीमत्सर कसा व्यक्त होतो, तुला तरी कसं कळणार? संयम आणि असूया एकाच ठिकाणी कसे नांदणार? सूर्य-चंद्र एकाच वेळी आकाशात राहू शकत नाहीत. जरी राहिले, तरी एकाला तेजोहीन व्हावंच लागतं. कर्णा, येते मी. फार वेळ झाला.'

कर्णाने आजूबाजूला पाहिले.

चारी बाजूंना उन्हाचा रखरखाट पसरला होता.

'माते! अशा भर उन्हातून एकटी जाऊ नकोस. वास्तविक पाहता, पुत्र हे मातेचं छत्र. आता तुला सावली देण्याचं बळ माझ्या ठायी राहिलं नाही. तुला दिलेल्या वचनातच मी माझं सारं सामर्थ्य हरलोय्. माते, सूर्यदाह कमी करण्याचसाठी कृष्णमेघाची सावली उपयोगी पडत. जन्मदात्या धारित्राचा तृषार्त भाव पाहून तो मेघ आपलं सर्वस्व तिला अर्पण करतो, तेव्हा त्या कृतीनं त्याची मलिनता नष्ट होऊन तो शुभ्रधवल बनतो; पण पुण्यसंचयानं विशुद्ध बनलेल्या त्या रूपात सूर्याचे किरण थोपविण्याचं बळ राहत नाही. माझं जीवन आता असंच बनलेल्या. त्या माझ्या उत्तरीयाचा तू आधार घेतलास, तेच उत्तरीय परत स्वगृहा जात असता तू घेऊन जा. माझा आठवण म्हणून जतन कर.

परत कधी काळी माझी गरज भासलाच, तर तेच उत्तराय कोणाहा सवकाकडून पाठवून दे. मला माझ्या वचनाची, तुझी आठवण येईल. जिथं असशील, तिथं मी तुला भेटायला येईन.'

कर्णाने आपले उत्तरीय परत कुंतीच्या हाती दिले. एकदम वाकून त्यान मातांचा पावले धरली. कर्ण मातृवंदन करून उठत असता, कुंतीने परत त्याला मिठात बद्ध केले, तिला हुंदका फुटला. आपले मन आवरत कर्ण म्हणाला,

'आई, चिंता करू नकोस, तुझ मन व्यथित होईल, असं मी काहीही करणार नाही. ज्या माझ्या वचनाचा आज तू स्वाकार करात आहस, त्यात तुला आनंद नाही, हे मी जाणता. माझ्यासाठा फक्त एकच कर. जव्हा तुझ्या या मुलाचा प्रवास संपेल, तो सागराला मिळाल्याचं तुला समजेल, तेव्हा मात्र त्याच्यासाठी दोन अश्रु ढालव समाधानचे...सुटकेचे. कारण...

कर्णाला बोलणे जड जात होते. कष्टाने तो म्हणाला,

'कारण... त्या वेळी पृथ्वीतलावर या दुर्दैवी कर्णासाठी फार थोडे अश्रु ढळतील. वृषाली. दुर्योधन, यांच्या डोळ्यांत माझ्या मृत्यूनं अश्रु तरळतील खरे, पण त्यांनाही स्वार्थाचा स्पर्श असेल. पण तुझे निखळ अश्रुः स्वर्गाची वाटचाल करण्यास मला बळ देतील.'

कुंतीला काही बोलवत नव्हते. दिलेल्या उत्तरीयाने आपले हुंदके आवरीत ती वळली.

# ४२

कुंती कर्णापासून दूर जात होती. कर्णाने दिलेले निळे उत्तरीय तिने उंचावलेल्या उजव्या हाती धरले होते. ते दूर जाणारे श्वेतधारी पाठमोरे रूप कर्ण स्थिर नजरेने पाहत होता. प्रखर उन्हाचे त्याला भान नव्हते. आठवत होते फक्त कुंतीमातेचे रूप.

लहानपणी पंडूपुत्रांबरोबर कर्ण राजमहाली जात असे, तेव्हा अनेक बेळा या कुंतीने कर्णाला जवळ घेतले होते. गोंजारले होते. तिच्या दृष्टीतल्या अनोळखी जिव्हाळ्याने कर्णाला मोहित केले होते. पाडंवांच्या राजसूय यज्ञाच्या प्रसंगी दुर्योधनाबरोबर कर्ण कुंतीसमोर गेला होता, तेव्हा तिने दूर्योधनाच्या मस्तकाचे अवघ्राण केले होते; पण त्यानंतर कर्णाकडे पाहून आशीर्वादाचा हात उंचावताना त्या मातेला किती कष्ट पडले असतील! द्रौपदीला जिंकून पांडव स्वगृही गोले असतील, तेव्हा कर्णाच्या अपमानाची वार्ता ऐकून कुंतीला काय वाटने असेल? शस्त्रस्पर्धेच्या वेळी कर्णाचा अपमान झालेला पाहून जिला मूर्च्छा येते, त्या मातेने वैरभावाने चाललेली कर्णनिंदा कशी ऐकून घेतली असेल?

कर्ण त्या विचाराने व्यथित झाला. नकळत त्याचा डावा हात गालावर अलगद स्थिरावला. कुंतीने कर्णाला मिठीत घेतले, तेव्हा तिच्या ओठांचा स्पर्श कर्णाच्या गालाला झाला होता.

कर्णानं पाहिलं.

कुंती नदीकाठावर पोहोचली होती

मग आजच का त्या मातेचं दर्शन घडावं! जे रहस्य आजवर कुंतीनं लपवून ठेवलं तो प्रगट करायला हीच वेळ होती का? कुंतीन मर्यादापालनात खूप सोसलं. तो संयम आजच का दुबळा ठरावा? पुत्रप्रेमासाठीच का तिनं ही मर्यादा ओलांडली!

कर्णाच्या चेहऱ्यावर वेगळाच भाव प्रगटला.

पुत्रप्रेमापोटीच पण, कर्णा, त्यात तुझा समावेश नाही तू फक्त एक निमित्त? पुत्ररक्षणासाठी उभारलेले कर्णाचे नाते कुणी मानले नाही. जाणले फक्त त्याचे दातृत्व

त्या विचाराने कर्णमुखावर एक खिन्न स्मित प्रगटले.

कुंतीने नौकेचा आश्रय घेतला होता. नौकेने किनारा सोडला होता...

पुत्रहीन राधाईला प्रवाहपतित कर्ण सापडला आणि तिचे मातृत्व जागे झाले तिला पुत्रप्राप्ती झाली, ती कर्णाच्या पायगुणामुळेच, अशी अधिरथ-राधाईची श्रद्धा. आज माता कुंतीने

आपली ओळख दिली आणि त्याच मातेच्या अधिकारात आपली पुत्रसंपदा सूरक्षित राखली. दोघींचीही घर खऱ्या अर्थाने संपन्न बनले आणि मातेचे दर्शन घडूनही कर्ण पोरकाच राहिला मृत्युखेरीज कर्णाला कोणीच का आपले म्हणणार नाही ?

मी कोण? हा प्रश्न कर्णाला सदैव छळीत आला त्या एका शोधात जीवनाची प्रतिष्ठा, कर्णाचे ध्येय कर्णाला आकांक्षा गुतल्यासारख्या वाटल्या आणि ज्या क्षणी तो गुंता सुटला, त्याच क्षणी जीवनाचे सारे आधारही सुटले. तो क्षण जीवनसमाप्तीचा ठरला आत्मशोधाची परिणती हीच असते का?

कृष्णाने जन्मरहस्य सांगितले त्या वेळी असली विफलता कर्णाला जाणवली शत्रूवर मात करण्याची ईर्ष्या जरी हरवली तरी कर्णाला जपलेले पौरुष चैतन्य, निर्भयता स्वभिमान तसाच टिकून राहिला कर्णाने सहज ठोकरून लावले होते; पण कुंतीच्या दर्शनानंतर ते बळ खचल्यासारखे वाटले होते आत्मसमर्पणाचे सामर्थ देणारे असले मतदर्शन आजवर कोणाला घडले असेल का?

मातेच्या दर्शनाने कर्णाच्या तेजस्वी जीवनाची सांगता घडवली. त्याच्या पौरुषाला, चैतन्याला, निर्भयतेला आता एकच आव्हान लागणार होती. त्यानं कष्णा समाधान पावेल. पांडव सूरक्षित राहतील कुंतीमातेचे प्रचीती येईल. तो कतार्थ मृत्यू पाहून दुर्योधनाला मित्रप्रेमाची प्रचीती येईल. तो कृतार्थ मृत्यू गाठण्यापलीकडे कर्णाच्या हाती आता काहीही उरले नाही कर्ण कुणाचाच नाही. कर्ण कुणाचाच नव्हता. तो एकाकी आहे. सूर्यपुत्राच्या प्राक्तनी हेच असायचं!

कर्ण आपल्या विचारातून सावध झघला. त्याने आजूबाजूला पाहिलें.

उन्हाचा दाह चारी बाजुंना जाणवत होता. नदीपात्रात एक नाव दूरवर एक पैलतीर गाठीत होती.

कर्ण एलतीरावरुन ती नाव निरखीत होता.

नाही तरी जीवन या नावेससारखेच असते जीवनप्रवाहावर केव्हातरी एक नाव साडेली जाते. ऋणतबंधाची दोन दुबळी वल्ही हाती दिली जातात. अहंकाराचे शिड उभारलेले असते. पण तेवढयावर थोडाच पैलतीर गाठला जातो? अनुकूल दैवाचे वारे लाभले, तरच पैलतीर गाठता येतो, नाही तर प्रवाहपतित होऊन येईल त्या लाटेवर डोलत राहण्याखेरीज काहीही उरत नाही.

कर्ण आपल्या विचारातून सावध झाला आणि तो रथाकडे चालू लागला. सूर्याच्या दाहात सारे शारार कव्हाच कोरडे झाले होते. नदीकाठावरून चालत असता उष्ण नि:श्वास त्याला जाणवत होते. तापल्या किनाऱ्यावरून येणारी वाऱ्याची झुळूक कासावीस करीत होती.

कर्ण रथाजवळ पाहाचला. त्या वृक्षसावलात प्रवश करताच कर्णाला सावलीची शीतलता जाणवली. कर्णाने रथाचे वेग हाती घेतले, ती शीतलतासुद्धा कर्णाला असह्य वाटू लागली. कर्णाने रथाला गती दिला. रथ भरधाव वगान कर्णप्रासादाकडे जाऊ लागला.

कर्णाने प्रासादात प्रवेश केला, तेव्हा वृषाली सामोरी आली. तिने कर्णाला विचारले,

‘आज बराच वेळ झाला?’

‘हां!’ कर्णाने विचारले, ‘आज कोणीच कसं दिसत नाही? शत्रुंजय, वृषसेन कुठं आहेत?’

‘ते शस्त्रगृहात गेले. त्यांची शस्त्रं तयार करवून घेत आहेत. त्याखेरीज काही सुचत नाही, जसे काय दागिनेच आहेत ते.’

‘अगदी खरं! वसू, शस्त्रं हीच पुरुषाची खरी लेणी असतात.’

‘पण... आज बराच वेळ झाला?’

कर्णाच्या मुखावर स्मित उजळले. कुंतीचे दर्शन डोळ्यांसमोरून तरळून गेले.

‘आज परमेश्वरदर्शन घडलं.

‘खरं?’

‘हो?’

‘मग काय दिलं परमेश्वरानं?’

‘दिलं काहीच नाही, उलट, जे शिल्लक होतं, तेही तो घेऊन गेला.’

मग तो देव कसला?’ वृषाली म्हणाली, ‘देव देतो, घेत नाही.’

‘तसं नाही, वृषाली...देवानं देऊनच माणसाचं जीवन समृद्ध होता नाही ती कल्पना चुकीची आहे. सामान्यांच्या जीवनात थोडी जरी देवकृपा अवतरली, तरी ते जीवन समृद्ध बनतं. ते खरं असलं, तरी या पृथ्वीतलावर असेही काही महाभाग जन्मतात की, ज्यांच्याकडं परमेश्वर घेण्यासाठी येतो. हक्कानं. त्यातूनच ते जीवन सफल होतं. उजळून निघतं. आज जीवन सफल झाल्याचा आनंद मी भोगीत आहे. सारं ओझं कमी झालं. मनावर काही दडपण राहिलं नाही. वसू, आज मी तृप्त आहे. कृतार्थ आहे.’

वृषालीला त्या बोलण्यातल काही कळत नव्हत; पण कर्णाच्या मुखावर प्रगटलला तृप्ततचा भाव ती अतृप्तपणा न्याहाळत होती. कर्णाचे समाधाना रूप तिने आजवर कधी पाहिले नव्हते.

पण कर्णाच्या दृष्टीसमोर तरळत होते कुरुक्षेत्र. मृत्यूच आह्वान दणार. त्या रणक्षेत्राची चिंता आता कर्णाला राहिली नव्हती. निर्भयतेने तो ते कुरुक्षेत्र पाहत होता.

## ४३

कुरुक्षेत्र हे एक पवित्र क्षेत्र हिरण्यवतीच्या तीरावर वसलेले. एके काळी कौरवांचा मूळ पुरुष कुरु याने तेथे तप केले होते. जेवढी भूमी मी नांगरीन, तेवढी धर्मक्षेत्र ठरावी, असा वर त्याने इंद्राकडून मागून घेतला होता. त्याच क्षेत्रावर कौरवपांडवांची दळे रणसंग्रामासाठी जमा होत होती. ज्या क्षेत्रावर सूर्यग्रहणप्रसंगी कौरव, पांडव, यादव, गोपाळ एके काळी जमले होते, ते आज एकमेकांना ग्रासण्याच्या बलवत्तर हेतूने सर्व बळानिशी कुरुक्षेत्रावर गोळा झाले होते. मंदिरातल्या घंटांच्या नादांनी आणि मंत्रोच्चारांनी जी भूमी सदैव भारावत असे, तीच भूमी शंखनादांनी, हत्तींच्या चीत्कारांनी, रथांच्या घरघराटाने, घोडयांच्या खिंकाळ्यांनी व्यापली होती. ज्या भूमीवर अखंड यज्ञ चालावयाचे, त्याच भूमीवर रात्री-अपरात्री आपल्या ज्वाळांनी धडधडणाऱ्या शेकोटया दिसत होत्या. हिरण्यवतीच्या पैलतीरावर पांडवांचे चतुरंग दळ विस्तारले होते. ऐलतीरावर कौरवांची सेना विसावली होती. सर्वसंहारक मुहूर्त नजीक येत होता.

कौरवांच्या सर्व सेना-प्रमुखांची सभा भरली होती. कौरवसेनेचे आधिपत्य कुणाकडे जावे, याची चर्चा चालली होती. भीष्म वयाने सर्वांत वडील. सेनापतिपद त्यांच्याकडेच जाणे इष्ट होते. सभेमध्ये भीष्म अत्युच्च स्थानी बसले होते.

दुर्योधन उठला. भीष्माचार्यांसमोर जाऊन हात जोडून म्हणाला,

‘पितामह, पांडवांची सेना युद्धास सज्ज झाली आहे. आपण ज्येष्ठ आणि श्रेष्ठ. आपण माझ्या सेनेचं आधिपत्य हाती घ्यावं. युद्धात आम्हांला विजय प्राप्त करून द्यावा.'

सर्व सभेने आनंद व्यक्त केला. ते पाहून भीष्म म्हणाले,

‘दुर्योधना, मला पांडव आणि कौरव दोघेही सारखेच; पण तू विनंती करतोसच, म्हणून मी सेनापतिपद जरूर स्वीकारीन, पण त्याला दोन अटी आहेत.’

‘कोणत्या? मी त्या आनंदानं मान्य करीन.’ दुर्योधन म्हणाला.

‘मी दररोज दशसहस्त्र योद्भयांना मारीन.’

आनंदाने दुर्योधन भीष्णाचार्यांकडे पाहत होता.

‘...पण पांडवांचा मी वध करणार नाही.’

सारी सभा भीष्मांच्या बोलण्याने अस्वस्थ झाली.

दुर्योधन स्वत:ला सावरीत म्हणाला,

‘पितामह, आपलं नेतृत्व हेच मोलाचं! ते आपण स्वीकारलंत, याबद्दल धन्यता वाटते.’

सभा स्थिर झाली. कौरवपक्षाकडील अतिरथी, महारथी यांची गणना चालू झाली. साऱ्या श्रेष्ठ वीरांची भीष्मांनी प्रशंसा केली; पण कर्णाच्या नावाचा उल्लेखही भीष्मांनी केला नाही.

दुर्योधनाने विचारले,

'पितामह, महारथी कर्णाबद्दल आपण काहीच बोलत नाही.'

पितामहांच्या चेहऱ्यावर उपहास प्रगटला. ते म्हणाले,

'राधेयाचं नाव या वीरसभेत घेतोस कशाला? तो राधेय साधा रथीही नाही, मग महारथी कुठला?'

'पितामह?' कर्ण संतापाने उठला.

त्याच्याकडे बोट दाखवीत पितामह म्हणाले,

'तो अर्धरथी आहे.'

सारी सभा गोठून गेली. कर्णाचा चेहरा लालबुंद झाला. अधिरथ-राधाई वियोगापेक्षाही तो घाव मोठा होता. आपल्या साऱ्या भावना संयमित करीत कर्ण म्हणाला,

'पितामह, कशाच्या आधारावर मला अर्धरथी समजत आहात?'

'चारचौघांत ते कारण समजून घ्यायचं असेल, तर माझी ना नाही.'

'पितामह!' दुर्योधन म्हणाला, 'कर्णाचा काही अपराध नसता, याच्यावर असलं दूषण?'

'नाही, राजन्! मी वृथा दोष देत नाही. कर्ण तुझा प्रिय सखा आहे, हे मला माहीत आहे. त्याच्या प्रोत्साहनानंच हे युद्ध उभं राहिलं आहे, हेही मी जाणतो. त्याच्या अंगी तापसांचं तेज आहे; पण त्याचबरोबर तो मत्सरयुक्त आहे, हे त्याचं लांछन आहे. तो स्वभावानं अभिमानी आहे अन् तुझ्या सल्ल्यानं तो चढून गेला आहे. या कारणांमुळं तो अर्धरथी बनला आहे. युद्धात अर्जुनाची गाठ पडेल, तेव्हा तो वाचणार नाही.'

'पितामह! मी तुमचा काहीच अपराध केला नसता, तुम्ही माझा द्वेष करता. आपल्या वाग्बाणांनी मला प्रहार करीत असता. तुम्ही अतिरथी भीष्म, ज्या कौरवांच्या आश्रयानं राहता, त्यांचं अहित चिंतीत राहता. राज्याचा त्याग करूनही, सत्तेची लालसा सदैव तुमच्या ठायी प्रगटते. पांडवांविरुद्ध उभ्या ठाकलेल्या युद्धाचं सेनापतिपद स्वीकारीत असता, पांडव सुरक्षित राखण्याची इच्छा करता. शिखंडीविरुद्ध शस्त्र धरणार नाही, म्हणून सांगता... अन् पांडवांचं हित चिंतून, कौरववीरांत रथी, महाराज, दीर्घायुष्य अन् पिकलेले केस यांमुळं क्षत्रियांना महारथी समजत नाहीत. ज्यांचं बळ अधिक असतं, तेच श्रेष्ठ समजले जातात.'

कर्ण थांबताच द्रोणाचार्य क्रोधाने उभे राहिले. ते भीष्मांना म्हणाले,

'हे गांगेया! या निंदकाचं भाष्य ऐकू नकोस. माझं मत तुझ्याप्रमाणंच आहे. प्रत्येक युद्धात प्रौढी मिरवतो... अन् प्रत्येक रणांगणापासून पळून जात असलेला दृष्टोत्पत्तीस येतो. तो प्रमादी आहे. अर्धरथी आहे. युवराज दुर्योधनाची मैत्री एवढाच त्याचा गुण.'

'मैत्री!' कर्ण उसळला, 'आचार्य, मैत्री काय असते, माहीत आहे? प्रत्येक पूजेबरोबर बदलणाऱ्या मंत्राइतकी मैत्री अस्थिर नसते. निदान तुम्ही तरी मैत्रीचा उच्चार करू नका. तुमची अन् द्रुपदाची मैत्री सर्वांना माहीत आहे. एकाला राजैश्वर्याचा अहंकार, तर दुसऱ्याला ज्ञानाचा विश्वास. खडग म्यानयुक्त असतं, तरी जेव्हा खड्गाला प्रगटावं लागतं, तेव्हा आवरण फेकूनच द्यावं लागतं त्या आवरणाचं अन् खड्गाचं साहचर्य असतं, म्हणून कुणी त्याला मैत्री समजू नये. मैत्रीचा अर्थ तुम्हांला कधी कळला नाही. द्रुपदाबद्दल स्नेह असता, तर मित्रानं केलेली चूक क्षम्य ठरली असती. पण तिथं उद्भवला अपमान, खोटा अहंकार, अन् त्याच अहंकारापोटी आपलं तेज, तपश्चर्या

अधीन करून शिष्याकरवी गुरुदक्षिणा म्हणून मित्राचा पराजय अपेक्षिला गेला. ही मैत्री नव्हे, आचार्य! हा मैत्रीचा साक्षात उपहास!'

'राधेया ऽ!

'थांबा, मला अजून सांगायचंय् युवराजांच्या प्रतिष्ठेसाठी जरासंधाशी मीच युद्ध केलं अन् विजयी झालो, तेव्हा मदतीला तुम्ही तिथं नव्हता. युवराजांसाठी मी दिग्विजय केला, तेव्हा माझ्या पारिपत्याची वाट पाहत बसलात. गंधर्वानं माझा पराभव केला असेल; पण विराटाच्या प्रसंगी तुम्ही होता ना, पितामह? तेव्हा उत्तरेच्या बाहुल्यांना नेसवण्यासाठी नेलेली तुमची वस्त्रं हे कोणत्या शौर्याचं प्रतीक होतं? हेच अतिरथी-महारथींचं वर्णन असेल, तर त्या मालिकेत माझं नाव नसलं, तरी चालेल. त्यात मला धन्यता वाटेल.'

भीष्म उभे राहिले. ते दुर्योधनाला म्हणाले,

'युवराज, उद्या युद्ध असता, मला इथं कलह वाढवायचा नाही; पण एक निर्णय मी घेतला आहे. मी जोवर जिवंत आहे, तोवर हा कर्ण माझ्या सैन्यात नको. एक त्यानं तरी युद्ध करावं किंवा मी करीन. तो नित्य माझ्याशी स्पर्धाच करतो.'

'ठीक आहे. तसंच होईल! युवराज, तुम्ही चिंता करू नका. या भीष्मांनी आपल्या नेतृत्वानं विजय मिळवला, तर तुमचा विजय पाहून माझे नेत्र तृप्त होतील. ते झालं नाही, तर जे यांच्या हातून घडलं नाही, ते मी साध्य करून घेईन. भीष्म जिवंत असेपर्यंत मी युद्ध करणार नाही. ते मारले गेल्यावरच मी अर्जुनाशी लढेन.'

कर्ण उठला आणि राजसभेतून निघून गेला.

# ४४

प हाटेला खूप अवकाश असता कर्णप्रासाद जागा झाला होता. रणांगणी जाण्यासाठी शत्रुंजय, वृष्षकेतु, वृषसेन, द्रुम तयार होत होते. प्रासादासमोर रथ उभे होते. कर्णमहालात चौघांनी प्रवेश केला. वृषालीने चौघांनी ओवाळले. ते पाहत असलेल्या कर्णाने विचारले,

'अन् पाचवा कुठं आहे?'

'आहे इथंच!' म्हणात चक्रधराने प्रवेश केला.

'वहिनी, रणांगणातून तुम्हांला काय आणू?'

'तुम्ही सारे सुखरूप मागे या. आणखी काही नको.'

साऱ्यांनी कर्णाला वंदन केले आणि ते युद्धभूमीकडे निघून गेले.

वृषालीने कशीबशी आरती खाली ठेवली अन् ती रडू लागली.

कर्णाने तिला जवळ घेतले. तो म्हणाला,

'वसू, रणांगणी जाताना रडाटाचं नस, चल.'

वृषालीसह तो प्रासादाच्या सज्जावर आला. रणांगणाकडे जाणाऱ्यां रथांचे पलिते दिसत होते. गार वारा वाहत होता. वृषाली-कर्ण त्या सौधावर बराच वेळ उभे होते. हळूहळू पहाट होऊ लागली. आकाशातील नक्षत्रे कोमेजू लागली. असंख्य पक्षयांच्या नानाविध आवाजांनी वातावरण गजबजून उठळे. कुठेतरी दूरवर वृषालीचे भयभीत डोळे त्या दिशेने वळले. काही दिसत नव्हते. कुरुक्षेत्रावरच्या सात वनांपैकी सूर्यवनाचा भाग दिसत होता. त्या वनात, वनापलीकडे कुठेतरी ते रणांगण जोडले गेले. सूर्यवंदन करून तो म्हणाला,

'वसू, युद्ध सुरु झालं.'

दोघे संथ पावलांनी प्रासादात आली.

कौरव-पांडवांचे तुंबळ युद्ध क्यू होते, इ दिवसामागून जात होते. भीष्मांच्या सेनापतिपदाखाली नऊ दिवस झाले, तरी युद्धाचा निर्णय निश्चितपणे सांगता येत नव्हता. या नऊ दिवसांत शकुंजय, वृष्षकेतु हे दोघे मात्र रणांगणावर हरवले गेले. बसल्या जागी युद्धाची वार्ता ऐकत, पुत्रवियोगाचे दु:ख सहन करीत राहणे कर्णाला असह्य झाले होते.

नवव्या दिवशी सायंकाळी युवराज दुर्योधन कर्णाच्या भेटीला आला, युद्धात थकलेल्या त्या युवराजाचे कर्णाने स्वागत केले.

दुर्योधन म्हणाला,

'कर्णा, तुझ्या निश्चयापासून परावृत्त करण्यासाठी मी आलो आहे.'

'कारण ?'

'कारण? मित्रा, नऊ दिवस हे युद्ध चाललं; पण त्याचं फळ काय? माझी सेना आहुती जाते आहे.'

'पण भीष्मप्रतिज्ञेनुसार दररोज दहा हजार शत्रू मरतात ना?'

'त्या प्रतिज्ञेनुसार पांडवही सुरक्षित आहेत.'

'युवराज', कर्ण हसून म्हणाला, 'त्या दशसहस्र हत्येची गणना करण्यासाठी पितामहांना एखादा चांगला सहायक द्या. नाही तर कुठंतरी मोजण्यात चूक घडली, तर प्रतिज्ञाभंगाचं पाप पितामहांना वाटायचं."

'मित्रा, रणांगणाच्या या दर्शनानं माझं मन त्रस्त झालं असता, तुला थट्टा सुचावी?'

'युवराज, तुमची चिंता मला कळते; पण माझा नाइलाज आहे. पितामह थोर योद्धे आहेत, पण ते मनापासून लढायला हवेत.'

'कर्णा, या नऊ दिवसांत फक्त श्वेताचा वध भीष्मांनी केला. दुसरा कोणताही उल्लेखनीय पराक्रम घडला नाही.'

'कृष्णाला हाती शस्त्र घ्यावं लागलं, हा का थोडा पराक्रम?'

'कृष्णानं ते वापरलं असत, तरी मला समाधान वाटलं असतं.... दुर्योधन उद्वेगाने म्हणाला

'युवराज, असे निराश होऊ नका. ज्या पितामहांनी गुरुदेव परशुरामांना युद्धाचं आह्वान दिलं, त्यांच्या पराक्रमाबद्दल शंका घेऊ नका. मनापासून ते युद्धाला उभे राहतील, तर त्यांच्या पराक्रमाला तोड राहणार नाही.'

दुर्योधनाने नि:श्वास सोडला.

'पण ते होणार कसं?'

'करायचं ठरवलं, तर जरूर होईल.'

दुर्योधनाने कर्णाकडे आशेने पाहिले.

कर्ण म्हणाला,

'युवराज, उठा! असेच भीष्मांकडं जा. त्यांना सांगा, हातून पराक्रम होत नसेल, तर सेनेच्या नाशाला कारणीभूत न होता शस्त्रसंन्यास घ्या अन् युद्धातून निवृत्त व्हा.'

'अम् त्यांनी तसं केलं, तर?'

कर्ण समाधानाने हसला.

'नाही, युवराज! पितामह केव्हाही शस्त्रसंन्यास घेणार नाहीत. ते क्षत्रिय आहेत अन् क्षत्रियाला शस्त्रसंन्यासाइतकं दु:ख नाही. तुमच्या त्या नुसत्या सूचनेनं त्यांचा सारा अहंकार जागृत होईल अन् ते युद्धाला उभे राहतील. युवराज, तसं घडलं, तर रणांगणात त्यांच्यासारखा योद्धा राहणार नाही. हा माझा अंदाज तिळमात्र चुकायचा नाही.'

दुर्योधन आशेने उठला आणि त्याने कर्णाचा आनंदाने निरोप घेतला.

रात्री कर्ण आपल्या शय्यागृहात जात असता युवराज आल्याचे त्याला समजले. कर्ण दिसताच दुर्योधन आनंदाने म्हणाला,

'कर्णा, तुझी मात्रा लागू पडली. शस्त्रसंन्यास सुचवताच एखाद्या नागानं फणा

उंचवावा, तसं पितामहांचं रूप प्रखर बनल अन् त्यांनी घोर प्रतिज्ञा केली.'

'खरं! कसली प्रतिज्ञा ?'

'ते म्हणाले, दुर्योधना, माझं वचन ऐक. उद्या सूर्यास्त व्हायच्या आत पृथ्वी निष्पांडव करीन.'

कर्णाने आवेगाने दुर्योधनाला मिठी मारली. तो म्हणाला,

'युवराज, उद्या विजय तुमचाच आहे.'

आनंदित दुर्योधन सांगत होता,

'पितामहांनी ती प्रतिज्ञा केली अन्? मी त्यांना विचारलं...'

'काय विचारलंत, युवराज?' कर्ण भीतीने म्हणाला.

'मी विचारलं... अन् असं झालं नाही, तर?... पितामहांनी माझ्याकडं रागानं पाहिल अन्? ते म्हणाले. तसं झालं नाही, तर भीष्म राहणार नाही.'

जागच्या जागी खिळलेला कर्ण उद्‌गारला,

'कशाला विचारलंत? भावनेआहारी जाऊन केवढी घोर प्रतिज्ञा त्यांनी केली होती. तुमच्या शंकेनं त्यांनी आपली सुटका करून घेतली. जा, युवराज, विश्रांती घ्या. उद्या पितामहांचा पराक्रम मला पाहायला मिळणार नाही, याचं दुःख वाटतं.'

दुर्योधन जाताच कर्ण शय्यागृहाकडे जाऊ लागला. त्याचे मन थकले होते, पण कुठेतरी समाधान वाटत होते. ते समाधान त्याला बेचैन करीत होते...

# ४५

**म**हालात कर्ण अस्वस्थपणे फेऱ्या घालीत होता. काही न बोलता वृषाली पतीचे ते रूप पाहत होती. बाहेरच्या भर दुपारच्या प्रखर उन्हाच्या प्रकाशाने सारा महाल अधिकच प्रकाशमान झाला होता. अचानक कर्ण थांबला. एक दीर्घ निःश्वास त्याच्या मुखातून बाहेर पडला. त्याचे लक्ष वृषालीकडे गेले.

'काय पाहतेस?'

'तुम्हांला!' वृषाली म्हणाली.

'वसू, आज युद्धाचा दहावा दिवस. तिकडं घनघोर युद्ध चालू असता, येईल ती वार्ता ऐकत स्वस्थ बसून राहायचंती प्रतिज्ञा मी केली नसती, तर फार बरं झाल असतं, असं वाटतं.'

'त्यात आपला काय दोष? पितामह भीष्मांनी आपला अपमान केला नसता, तर...'

'अपमान काय नव्यान केला होता? ते नेहमीचंच होतं. तेवढ निमित मी साधलं अन् प्रतिज्ञा करून रणांगण चुकवलं; पण जीवनातलं रण टाळून टळत नाही. ते माझ्या दैवी लिहिलं आहे. आज, नाहीतर उद्या.'

'रणांगण टाळलं?' आश्चर्याने वृषालीने विचारले.

कर्ण एकदम सावध झाला. खोटे हसत तो म्हणाला,

'वसू आपली सेना, मुलं, भाऊ, रणांगणावर लढत आहेत अम् मी इथं स्वस्थ बसून आहे. याचा अर्थ तोच नाही का? मी रणांगणावर नसलो, म्हणून काय झालं? आज दहावा दिवस. आज तो कुरुपुंगव अजोड पराक्रम करील. कुणास माहीत, आज युद्धही संपून जाईल... अन्..'

बोलता-बोलता कर्ण थांबला. त्याची मुद्रा चिंतातुर बनली. आपले उत्तरीय सावरून तो सौधाकडे धावला. पाठोपाठ वृषाली गेली. तिला कारण विचारावे लागले नाही. युद्धभूमीकडून शंखनाद, रणभेरींचा आवाज उठत होता. कर्णाने सूर्याकडे पाहिले. मस्तकावरचा सूर्य ढळला होता.

'वसू, कसल्या विजयाचा हा नाद आहे? कोणी विजय मिळविला? कोणाच्या मृत्यूनं कोण वाचलं? कोणाच्या पराजयानं कुणाचं यश वाढवलं?'

कर्ण युद्धभूमीच्या दिशेने पाहत होता आणि त्याच वेळी कर्णनिवासाच्या दिशेने एक रथ भरधाव येताना दिसला. द्रुम, चक्रधर, वृषसेन युद्धावर गेले होते. अशुभाच्या कल्पनेने कर्ण सौधावरून माघारी आला. धावत तो प्रासादद्वारी गेला. तोवर रथ तेथे येऊन पोहोचला होता. त्या रथातून द्रुम, चक्रधर, वृषसेन उतरत होते. त्या तिघांना सुखरूप पाहून कर्णाचे मन स्थिरावले.

सर्वांच्या पुढे आलेल्या चक्रधराला कर्णाने विचारले,

'आज पितामह पराक्रमाची शर्थ करतात ना?'

'हो! त्यांच्या पराक्रमाला तोड नव्हती. आजचा सूर्यास्त पांडवांनी पाहिला नसता.'

'चक्रधर!'

'भीष्मांच्या समोर पांडवांनी शिखंडीला आणलं. भीष्मांनी शस्र खाली ठेवलं अन् शिखंडीमागून अर्जुनानं...'

'भीष्मांचा वध केला?

'नाही. पितामह धारातीर्थी पडले आहेत. ते स्वेच्छामरणी आहेत. सध्या दक्षिणायन सुरू आहे. उत्तरायणापर्यंत जीव धारण करण्याचा त्यांचा निग्रह आहे.'

'पितामहांना शिबिरात आणलं?'

'नाही. रणांगणावर जिथं ते पडले, तिथंच ते विश्रांती घेत आहेत. शरीरात घुसलेले बाणही काढण्यास त्यांनी नकार दिला आहे. दुर्योधन महाराजांनी त्यांना सुखशय्या देऊ केली; पण तीही त्यांनी नाकारली आहे.'

'ते उघड्या भूमीवर पडून आहेत?'

'त्यांनी कुरुक्षेत्राभोवती उगवणाऱ्या शरगवताची शय्या अंथरायला सांगितली आहे. त्यावरच ते विश्रांती घेत आहेत. पितामहांच्या पतनानं आपली सारी सेना धैर्य गमावून बसलीय्.

'युद्ध थांबलं?'

'नाही! द्रोणाचार्य सैन्याला आवर घालीत आहेत. पांडवांच्या बाजूनं रणाच्या जयभेरी वाजवल्या जात आहेत.'

'जय! त्यांचा पितामह पडला अन् त्यात ते जय मानतात? जय तर खराच; पण त्या जयाला जोडलेली पराक्रमाची किनार कशी त्यांच्या ध्यानी येत नाही? पितामह पडले, यावर माझा अजूनही विश्वास बसत नाही.'

भीष्मपतनाच्या वार्तेबरोबर कर्णाच्या डोळ्यांसमोर ती मूर्ती उभी राहिली. भीष्मांबद्दलचा सारा संताप विरून गेला, आठवण राहिली, ती त्या तेजस्वी जीवनाची. आठवला त्यांचा त्याग, अजोड पराक्रम. कुरुवंशाचा सर्वांत श्रेष्ठ पुरुष, सर्वांना वाढवणारा. नीती, कर्तव्य आणि कर्तृत्व यांचा अधिकारवाणीने पाठ देणारा. आपल्या शान्त-दान्त वृत्तीने असीम त्यागाचा भार पेलणारा गांगेय ढासळला. मृत्यूचं भय बाळगून सदैव त्यापासून दूर पळण्यात जीवित खर्चणारे जीव कोठे आणि दारी आलेल्या मृत्यूला तिष्ठत ठेवून शरपंजरी विश्रांती घेणारा हा भीष्म कोठे!

रथाच्या आवाजाने कर्णाची तंद्री भंग पावली. रणवेश धारण केलेला अश्वत्थामा प्रासादाच्या पायऱ्या चढून येत होता. आपल्या नेत्रांतले अश्रु कष्टाने आवरीत अश्वत्थामा म्हणाला,

'कर्णा, पितामहांनी...'

अश्वत्थाम्याच्या खांद्यावर हात ठेवीत कर्ण म्हणाला,

'मला सारं कळलंय्.'

'अंगराज! भीष्मपतन पाहताच साऱ्या सैन्यात एकच हाहाकार उडाला. सेनेला आवर घालण्यात तात अन् युवराज गुंतले आहेत. आपल्या वीरांना आता फक्त तुझ्या दर्शनाची ओढ लागली आहे. ते तुझ्या नावाचा ध्यास धरून बसलेत. तुम्हांला

'हां, मित्रा! युद्धभूमीची आतुरता मला कळते. तिच्याही सहनशक्तीला मर्यादा आहेत चक्रधर, माझा रथ सिध्द कर.'

कर्णाची मुद्रा क्षणात पालटली. प्रासादात जात असता तो आज्ञा देत होता,

'चक्रधर, आता अवधी नाही. माझं रत्नजडित अन् सूर्यतुल्य शिरस्त्राण,सुवर्णाचं

उज्ज्वल कवच घेऊन ये अन् ते माझ्या अंगावर चढव. रथामध्ये माझे सोळा भाते तयार ठेव. रथ माझ्या सर्व शस्त्रांनी सुसज्ज कर. शुभ्र, शीघ्रगामी अश्व रथाला जुंप अन् शस्त्रांनी भयभीत करणारा माझा सुवर्णशृंखला आणि कमलचिन्हांकित जयध्वज रथावर फडकू दे. कौरवांच्या रक्षणार्थ अन् पांडवांच्या नाशार्थ मी या घोर युद्धात स्वतःचे प्राणही अर्पण करण्यास आज युद्धभूमीवर प्रवेश करणार आहे.

काही वेळात कर्ण रणभूमीसाठी तयार झाला. त्याच्या छातीवर रत्नखचित सुवर्णकवच होते. मस्तकी शिरस्त्राण झळकत होते. उजव्या खांद्यावर दिव्य धनुष्य शोभत होते.

वृषाली निरांजनाचे तबक घेऊन आली. तिने कर्णाला तिलक लावून ओवाळले निरांजनाचे तबक खाली ठेवून वृषालीने शेला हाती घेतला. स्मित वदनाने कर्णाने आपले हात उंचावले. कर्णाच्या कमरेला शेला बांधून वृषाली म्हणाली,

'मी वाट पाहते.'

'निश्चित बघ! माझ्या पराक्रमाची महती सांगण्यासाठी मीच तुझ्या समोर येईन वृषाली, माझा शंख...'

देव्हाऱ्यावर ठेवलेला, सुवर्णाने आलंकृत केलेला शंख वृषालीने कर्णाच्या हाती दिला. तो शंख अत्यंत आदरभावाने मस्तकी लावून कर्णाने तो उजव्या हाती घेतला.

कर्ण प्रासादाबाहेर आला, तेव्हा रथ सिद्ध झाला होता. पायऱ्यांवर उभ्या असलेल्या वृषालीकडे त्याने पाहिले. त्याच्या ओठांवर स्मित प्रकटले. रथारूढ होत कर्णाने सारथ्याला आज्ञा केली,

'युवराज दुर्योधनाच्या शिबिराकडं रथ जाऊ दे.'

रथ चालू लागला. पाठोपाठ अश्वत्थामा आणि चक्रधर यांचे रथ होते. रथ शिबिराकडे वेगाने जात होता. कौरवांनी आकाशी फडकत येणारा कर्ण-ध्वज पाहताच भीष्मपराभवाचे दुःख विसरून कर्णाचा जयजयकार करण्यास सुरुवात

दुर्योधन कर्णाला सामोरा आला. कर्णाचे स्वागत करून तो कर्णाला सन्मानाने शिबिरात घेऊन गेला. तेथे कौरववीर गोळा झाले होते. युद्धभूमीवर युद्ध चालूच होते. दुर्योधन कष्टाने म्हणाला,

'मित्रा, पितामह.'

'त्यांच्या जीवनाचं सार्थक झालं; पण त्यांनी आरंभलेलं हे युद्ध...'

'पुढं चालेल... दुर्योधन निश्चयाने म्हणाला, 'मित्रा, आता पितामहांच्या नंतर सेनापतिपद तू स्वीकारावंस, असं साऱ्यांना वाटतं.'

'नाही, युवराज. तसं झाल, तर फार मोठी चूक होईल. आता जबाबदारी मोठी आहे. भीष्म पतन पावले असतानाही, या क्षणी रणभार उचलून युद्ध करीत आहेत, ते द्रोणाचार्यच या पदाला योग्य आहेत. गुरुवर्य द्रोण उपस्थित असता तू अन्य कोणास सेनापती केलंस, तर या कीर्तिवंत योद्ध्यांना ते खपायचं नाही.'

'पण तू...'

'मित्रा, माझी चिंता करू नकोस. गुरुवर्य द्रोणाचार्यांच्या आधिपत्याखाली राहण्यात मला आनंद आहे. तू निश्चिंत ऐस. तुझ्यासाठी मी पराक्रमाची शर्थ करीन.'

'दुर्योधन, कर्ण सर्व वीरांसह सैन्याच्या मध्यभागी असलेल्या द्रोणांकडे गेले. द्रोणाचार्यांना सेनापतिपद स्वीकारण्याची विनंती केली. द्रोणाचार्यांनी संमती देताच

दुर्योधनाने यथाशास्त्र द्रोणाचार्यांना सेनापतित्वाचा अभिषेक केला. वाद्यांच्या प्रचंड घोषाने आणि शंखनादाने नव्या सेनापतीची द्वाही रणभूमीवर पसरवली. नव्या त्वेषाने कौरवसेना पांडवांना सामोरी गेली. सूर्यास्तापर्यंत युद्ध चालले.

सूर्यास्ताला युद्ध थांबले. श्रमाने व जखमांनी थकलेले योद्धे आपल्या शिबिरात परतले. कर्णदुर्योधन-शिबिरात आला. दुर्योधनाचा निरोप घेत असता कर्ण म्हणाला,

'युवराज, एक चूक घडली आहे. तिचं परिमार्जन मला कराटाला हवं,'

'कसली चूक?'

'रणभूमीवर जाण्याआधी पितामह भीष्मांचा आशीर्वाद घ्यायला हवा होता. तेवढी उसंत मिळाली नाही. तेच मी आता करणार आहे.'

'मी येऊ?

'नको, मी एकटाच जाईन.'

सूर्यास्त होऊन बराच अवधी झाला होता. चंद्रप्रकाशात सारे वातावरण गूढ वाटत होते. कर्ण एकटाच रथारूढ झाला. त्याने रथाचे वेग होती घेतले. रथ चालू लागला. लावलेले पलिते पूर्वेच्या गार वाऱ्यावर फरफरत होते. रथ रणभूमीकडे जात होता. हत्तींचे चीत्कार, घोडयांची खिंकाळणी, रथांच्या चाकांचा भेदक आवाज, शंखनाद, रणवाद्यघोष, आर्त किंकाळ्या या आवाजांनी गजबजून उठणारी रणभूमी शांत वाटत होती. धारातीर्थी पडलेल्या वीरांच्या प्रेतांना चुकवीत रथ कष्टाने पुढे सरकत होता. युद्धभूमीच्या दक्षिणेला एक पलित्यांची माळ पेटली होती. त्या दिशेला कर्ण जात होता. ते स्थान नजीक येताच कर्णाने रथ थांबवला. सेवक पुढे आले. थोडया अंतरावर उभ्या असलेल्या दुसऱ्या रथाकडे पाहत कर्णाने विचारले,

'जवळ कुणी आहे?'

'द्वारकाधीश कृष्ण महाराज...' सेवकाने नम्रपणे सांगितले.

'आणि?

'कोणी नाही सारे येऊन गेले.'

कर्णाने आपला किरीट उतरून रथात ठेवला. तो सावकाश भीष्मांजवळ गेला. भीष्म शरशाय्येवर झोपले होते. त्यांच्याजवळ कृष्ण अधोवदन बसला होता. शेजारी प्रज्वलित असलेल्या मशालीचा प्रकाश भीष्मांच्या अध्या चेहऱ्यावर पडला होता. त्यांचे डोळे मिटलेले होते. आपल्या रणावेषासहित धारातीर्थी विश्रांती घेणारा तो योद्धा पाहून कर्णाचे नेत्र भरून आले. त्या महापुरुषाच्या छातीवर शुभ्र दाढी रुळत होती. घायाळ होऊनही चेहऱ्यावरचे तेज लोपले नव्हते. जखमांची व्यथा दिसत नव्हती. आपल्या श्वेत कांतीमुळे नवोदित चंद्राप्रमाणे दिसणारे भीष्म शांतपणे झोपी गेल्यासारखे वाटत होते. कर्ण भीष्मांच्या पायांजवळ बसला आणि त्याने दोन्ही पाय हाती घेऊन, त्यांवर मस्तक टेकवून तो अश्रु ढाळू लागला. ज्या भीष्मांनी त्याला अनावर का व्हावेत, हेच कर्णाला कळत नव्हते. त्याच वेळी भीष्मांची हाक उमटली.

'कोण आहे? माझे पाय धरून कोण अश्रु ढाळतंय्?'

'हे कुरुश्रेष्ठा! अंगराज कर्ण आपल्या दर्शनास्तव आला आहे.'कृष्णाने उठत सांगितले, 'मी येती. आज्ञा?'

भीष्मांनी होकार दिला.

कर्णाकडे पाहून कृष्ण जाण्यासाठी वळला.

कर्ण त्वरेने उठला. त्याने हाक मारली,

'कृष्णा S S'

कृष्ण थांबला. वळला. तो कर्णाकडे पाहत होता.

त्या कृष्णरूपाला निरखीत कर्ण पुढे झाला. कर्णाचे अश्रु तसेच गालांवरून ओघळत होते, ते भरले नेत्र टिपण्याचेही भान कर्णाला नव्हते.

कृष्णाच्या मुखावर मंदस्मित उमटले. त्याचा उजवा हात उंचावला गेला. त्या हाताने कर्णाचे अश्रु हळुवार निपटले गेले.

कृष्णकृतीने कर्णाला अधिकच उमाळा दाटून आला आणि त्याच वेळी तो कृष्णाच्या मिठीत बद्ध झाला. क्षणभर कृष्णाचे हात कर्णाच्या पाठीवर विसावले. दुसऱ्या क्षणी कृष्ण मिठीतून दूर झाला. त्याचा उजवा हात कर्णाच्या खांद्यावर स्थिरावला. डोळे कर्णावर खिळले होते. त्यांत एक अतीव दु:ख तरळत असल्याचा कर्णाला भास झाला. दृष्टी कर्णाच्या परिचयाची होती. द्रौपदीवस्त्रहरण प्रसंगी द्वारी उभ्या असलेल्या कृष्णाचे दर्शन घडले, तेव्हा हाच भाव डोळ्यांत प्रगटला होता.

काही क्षण तसेच गेले आणि काही न बोलता कृष्ण आपल्या रथाकडे चालू लागला. मंदगतीने दूर जाणाऱ्या रथाकडे पाहत असता त्याच्या कानांवर हाक आली,

'कर्णा!'

कर्ण भीष्मांच्या जवळ गेला. आपले अश्रु आवरीत तो म्हणाला,

'हे महाबाहो, आपण ज्याचा सदैव द्वेष करीत होता, तो सूतपुत्र मी कर्ण, आपली क्षमा मागण्यासाठी आलोय्.'

'क्षमा? कशाबद्दल?'

'आपल्या दर्शनासाठी मी यापूर्वीच यायला हवं होतं, पण उसंत मिळाली नाही. आपल्या दर्शनाला यायला वेळ झाला.'

'नाही, कर्णा, जे उचित होतं, तेच तू केलंस. वीर रणनीतीला बद्ध असतो. तुझ्यापूर्वीच अश्वत्थामा येऊन गेला. त्यानं सर्व वृत्तांत सांगितला. आचार्य द्रोणाचार्यांना तू सेनापतिपद दिलंस, ते योग्यच झालं त्या वार्तेनं मला समाधान लाभलं. महारथी कर्णा, जवळ ये.' भीष्मांनी आज्ञा केली.

त्या संबोधनाने कर्णाचा जीव उभ्या जागी गुदमरला. तो भीष्मांच्या जवळ गेला. भीष्म त्याच्याकडे पाहत होते. त्यांच्या चेहऱ्यावर प्रसन्नता प्रगटली होती.

'मी तुझी वाट पाहत होतो. तू आलास, हे फार बरं झालं. तुझा मानी, अहंकारी स्वभाव. मी केलेला तुझा ठायीठायी अपमान स्मरून, तू येशील, की नाही, याची मला शंका होती. तू आला नसतास, तर मी बोलावलं नसतं. कारण त्यामुळं माझा अहंकार दुखावला असता ना! पण हुरहूर मात्र मागं राहिली असती.'

भीष्म क्षणभर थांबले. आपल्या शुष्क ओठांवरून जीभ फिरवीत ते म्हणाले,

'मी तुझा खूप अपमान केला. तुझी उपेक्षा केली. तुझ्या मनात माझ्याबद्दल कटुता निर्माण होणं स्वाभाविक आहे.'

नाही. लाझ्या मनात काही नाही. तो आपला अधिकार होता.'

भीष्म समाधानाने म्हणाले,

'कर्णा, तुझं मन स्वच्छ आहे, हे मी जाणतो. नाही तर मी शरपंजरी पडलेला पाहून तुझ्या नेत्रांतून अश्रू ओघळले नसते. तू अहंकारी असशील, पण खोटा नाहीस, हे मी

जाणतो. ज्या ज्या वेळी मी तुझा अपमान करीत असे, त्या त्या वेळी तुझा प्रगटणारा संताप पाहून मला समाधान वाटत असे. तुझ्या रूपाचं कौतुक वाटत असे.'

भीष्मांच्या त्या बोलण्याने कर्ण चकित झाला. त्याचा आश्चर्यभाव निरखीत भीष्म म्हणाले,

'तुला अहंकारी, अभिमानी म्हणून मी नेहमीच दूषणं देत असे; पण त्या नाही. दूषणांना फारसा अर्थ नव्हता. वीराला नुसतंच कवच आणि शिरस्त्राण असून चालत नाही अभेद्य मनाची गरज असते. अभिमान, अहंकार, ईर्ष्य ही वीराची खरी कवचं. वीराच्या ठायी प्रगटणारे हे गुण शत्रूंना नेहमीच दुर्गुण वाटतात. अरे वत्सा, मीही क्षत्रियच आहे. माझ्यासारखा अजोड योद्धा या पृथ्वीतलावर नाही, हा अहंकार मीही बाळगतो. त्या अहंकाराला डिवचण्याचं सामर्थ्य फक्त तुझं होतं तुझ्या रूपात होतं त्यामुळं माझा मत्सर भडकत असे. तुझ्या ध्यानी यायला हवं होतं. मी केलेला तुझा अपमान हा खरा तुझा सन्मान होता.'

'पितामह, मी एक सूतपुत्र...'

'कर्णा, आजूबाजूला कोणी आहे?'

कर्ण त्या प्रश्नने चपापला. त्याने आजूबाजूला पाहिले.

सारे रक्षक दूरवर बसले होते. कर्णाने सांगितले,

'कोणी नाही.'

'कर्णा, तू सूतपुत्र नाहीस. राधेय नाहीस. तू कौंतेय आहेस.'

कर्णाच्या सर्वांगावर रोमांच उठले. तो कपऱ्या आवाजात कष्टाने बोलला,

'पण आपल्याला हे कसं कळलं?'

'तुला हे माहीत होतं?'

'माहीत झालं; पण फार उशिरा. कृष्णानंच प्रथम ते मला सांगितलं... पण आपल्याला...'

भीष्मांनी दीर्घ निःश्वास सोडला. ते म्हणाले,

'अंगराज, विदुर जे रहस्य कृष्णापासून लपवू शकला नाही, ते तो माझ्यापासून कसं दूर ठेवील? कर्णा, तुला तुझ्या रूपाची ओळख झाली आहे. वीरश्रेष्ठा! ज्ञानाला अनेक वाटा सापडतात; पण अज्ञानाला वाट नसते. हे खोटं आवरण चालवणं कठीण आहे. त्या मोहात तू पडू नकोस.'

'मी काय करू?' कर्णाने रूक्षपणे विचारले.

'काय करू? पांडवांशी सख्य कर. ते तुझे भ्राते आहेत. तू नुसता कुन्तीपुत्र तू ज्येष्ठ कौंतेय आहेस. तुला स्वीकारण्यात पांडवांना धन्यता लाभेल. एका संयमी मातेला सुख लाभेल. कृष्णाला अत्यानंद होईल. मी सदैव शमाची इच्छा बाळगली, ती तुझ्या हातून पुरी होऊ दे. बाबा, रे, माझ्याबरोबरच या वैराची समाप्ती होऊ दे आणि सर्व राजे निरामय होऊन स्वगृही परतू देत.'

'आणि धृतराष्ट्रपुत्र दुर्योधन... त्याची वाट कोणती?' कर्णाच्या आवाजात रूक्षता प्रगटली.

'अं!'

'पितामह, ज्यानं माझ्या भरवशावर हे युद्ध उभं केलं, त्या दुर्योधनाला कोणती वाट मिळेल? मी पांडवांना मिळालेलं कळताच त्या माझ्या मित्राची उभ्या जागी छाती

फुटेल. माझ्या जीवनात मला फक्त एकच जिव्हाळा, एकच धन लाभलं, ते म्हणजे मित्रप्रेम. त्या प्रेमाला मी तडा जाऊ देणार नाही. यापुढं माझं जीवन मला तृणमात्र वाटतं'

भीष्मांनी काही क्षणांची विश्रांती घेतली आणि ते म्हणाले,

'धन्य आहेस, कर्णा! तुझी मित्रनिष्ठा पाहून मी खरोखरीच धन्य झालो. माझा तुला आग्रह नाही. इतक्या सहजपणे निष्ठेची उकल मलासुद्धा करता आली नाही. अंधळ्या प्रीतापेक्षा डोळस प्रीतीनंच आम्ही आकर्षित झालो. पंडूबद्दल वाटणारा जिव्हाळा मनातून दूर झाला नाही. पुढ पंडुपुत्र आले. पितृछत्र हरवलेल्या मुलांची आम्हांला अनुकंपा वाटली. ज्याचा आश्रय धरला, त्याच्याकडं दुर्लक्ष झालं. पंडुपुत्रांचं रक्षण करण्यासाठी अधिक दक्षता बाळगली आणि त्यातून नकळत द्वेषभाव निर्माण झाला. कर्तव्यनिर्णयानं आम्ही सदैव अंधळ्या निष्ठेला बद्ध राहिलो. पण नुसत्या कर्तव्यापुरतेच. यांतली भक्ती कोणती, निष्ठा कोणती, याचा निर्णय करता आला नाही. मी दुर्योधनाचं काही प्रिय करू शकलो नाही. निदान तुझी निष्ठा तरी त्याला सुख देऊ दे. तुझं जन्मरहस्य कळूनही, तू ज्या निर्भयतेनं मित्रप्रेमाला एकनिष्ठ राहिलास, ती तुझी निष्ठा सफल होवो!'

'नाही, पितामह, ती निष्ठा आता माझ्याजवळ नाही. माझी जन्मकथा मला कळली नसती, तर फार बरं झालं असतं, कृष्णानं प्रथम मला जन्मरहस्य सांगितलं, ते शिष्टाई असफल झाल्यानंतर. त्यानंतर जिचा आयुष्यभर शोध घेत होतो, त्या मातेचं दर्शन युद्धाच्या उंबरठ्यावर घडलं. माझी खरी कवचकुंडलं हरवली, ती त्या वेळी. दोघांनीही माझ्यापासून पांडव सुरक्षित करून घेतले आहेत. आता खोटा उत्साह देण्यासाठी वल्गनेखेरीज माझ्याजवळ काहीही राहिलं नाही. गुरुदेवांचा शाप खरा होवो. ब्रह्मास्त्र आठवलं, तरी ते माझ्या भावांवर कसं सोडता येईल? मी थोरला आहे ना!' आपले अश्रु पुशीत कर्ण म्हणाला, 'माझ्या मैत्रीला केव्हाच तडा गेला. आता दुर्योधनाच्या दृष्टीला भिडण्याचं बळ राहिलं नाही. त्याची मिठी माझा जीव गुदमरून टाकते. माझ्या हाती काही यश राहिलं नाही, पितामह!'

'शांत हो! तुझा दोष नाही. असलाच, तर तो नियतीचा आहे. जे होणार असेल, ते होऊन जाईल. तू निर्भय मनानं रणांगणात जा. तू अतिरथी आहेस. सूर्यपुत्र आहेस. तू शत्रूला रणांगणात दु:सह आहेस, हे मी जाणतो. भगवान परशुरामांना प्रसत्र करून घेणं ही सामान्य गोष्ट नव्हे. तुझी ब्राह्मणभक्ती, तुझं अजोड शौर्य, दानातलं पराकाष्ठेचं औदार्य मला माहीत आहे. तुझ्या योग्यतेचा या जगतात एकही मनुष्य नाही. तू देवतुल्य आहेस. कर्णा, शरसंधान, हस्तलाघव अन् आत्मबल या सर्वांत तू अर्जुन आणि कृष्ण यांच्या तुल्य आहेस, यात मला शंका नाही.'

कर्णाच्या मुखावर उमटलेले स्मित पाहून भीष्म म्हणाले,

'कर्णा, मी खोटी स्तुती करीत नाही. कुरुराजाला वधू प्राप्त करून देण्यासाठी तू काशिराजाच्या नगरीत एकटा सर्व नृपांच्या विरोधी उभा राहिलास. तुझ्या पराक्रमानं तू दुर्योधनाला भानुमती प्राप्त करून दिलीस. तो पराक्रम सामान्य? त्या पराक्रमाचं रूप काय असतं, हे मी एकदा अनुभवलं आहे. महापराक्रमी जरासंधाचा पराभव करून मालिनी नगराचा अधिपती बनलास ना? अंगराज म्हणून तुझी वर्तणूक सदैव आदर्श होती. ज्ञानानं, चारित्र्यानं, दातृत्वानं आदर्श राजा म्हणून तुझा लौकिक सदैव वृद्धिंगत

होत असलेला मी पाहिला. सुसंस्काराची जपणूक तुझ्याइतकी कुणीच केली नाही.'

'पुरे, पितामह! अधिक ऐकण्याचं सामर्थ्य माझ्या ठायी नाही. आता त्या कीर्तीला काही अर्थ राहिला नाही. मी कौंतेय, सूर्यपुत्र असूनही कुलहीन म्हणून माझी उपेक्षा केली. कुलामुळं माझी प्रतिष्ठा पणाला लागली असता, त्या माझ्या मातेला आणि माझं कुल ज्ञात असलेल्या कुरुश्रेष्ठांना माझ्या कुलाचा उच्चार करण्याचं धैर्य लाभलं नाही. उलट, त्यांनीच माझ्या सूतकुलाचा उच्चार करून माझ्या मनावर घाव घातले. चारित्र्याची मी सदैव जपणूक केली; पण माझ्या अहंकाराला डिवचण्यानं त्या संतापाच्या भरात द्रौपदीवस्त्रहरणाची आशा दिली अन् एका कृतीने माझं चारित्र्यसंपन्न जीवन पार विटाळून गेलं. ज्या दातृत्वानं माझी कीर्ती वाढवली, तेच माझं दातृत्व माझी कवचकुंडलं हिरावून घ्यायला कारणीभूत झालं. माझी गुरुभक्ती! गुरूंची निद्रा भंग पावू नये, म्हणून मी क्लेश सोसले आणि त्यासाठी मला काय मिळालं? भयानक शाप! जन्मभर मी संस्कारांना जपली. त्यांच्या साहाय्यानं जीवन समृद्ध होतं, असं म्हणतात. पण ते संस्कारही मला उपयोगी पडले नाहीत. कृष्ण आणि माता कुंती यांना त्याच संस्कारापायी हवं होतं ते देऊन टाकलं आणि माझा पराजय निश्चित केला. जीवनात फक्त एकच मोलाचा स्नेह लाभला होता, त्यालाही अर्थ उरला नाही. जीवनाचं साफल्य पाहण्याचं माझ्या नशिबी नाही.'

मंदस्मित करीत भीष्म म्हणाले,

'तुझ्याइतकं जीवनाचं साफल्य भोगलंय् कुणी? कर्णा, साफल्य म्हणजे तुला काय हवं होतं? द्रुपद, विराट, शल्य या नरेंद्रांनी ऐश्वर्य, सत्ता भोगली; पण त्यांची नावं मागं राहणार आहेत? मी जन्मभर ब्रह्मचर्य पाळलं, साऱ्या मनोविकारांशी अखंड झुंज दिली, राजत्याग केला अन् अखेर या शरशय्येवर वाट पाहत धारातीर्थी पडून राहिलो, ते कशासाठी?

'कर्णा, या जगात जे मानव ऐश्वर्यसंपत्र जीवन जगतात, भोगतात, त्यांची आठवण मागं राहत नाही. पूर्वसंचित खर्चिण्यासाठी ते या पृथ्वीतलावर अवतरलेले असतात, त्यांची इतिकर्तव्यता त्यांच्या मृत्यूबरोबरच संपते. पण काही जीव अक्षय संचित उभारण्यासाठी जन्मास येतात. आपल्या त्यागानं, सोसण्यानं दुसऱ्यांना जीवन अधिक संपत्र करतात, तेच कीर्तिरूप बनतात. त्यांच्या आठवणीनं श्रेष्ठता भोगात नाही, त्यागात आहे, सोसण्यात आहे. ध्रुवाला अढळपद प्राप्त झालं असेल, पण ते अंतरीक्षातलं. मृत्युलोकातलं ते स्थान प्राप्त करून घेणं एवढं सोपं नाही. ते असाध्य तू साध्य केलंस. तुझ्यासारखं जीवनसाफल्य पाहायला मिळणं कठीण!'

'पितामह, क्षमा. माझ्या उभ्या जीवनानं माझ्याशी प्रतारणा केली असली, तरी मला त्याचं दुःख नाही; पण त्यासाठी मी माझ्या एकनिष्ठ मित्राशी...'

कर्ण अडखळला.

भीष्म म्हणाले,

'काही सांगायची आवश्यकता नाही. कर्णा, ते मी जाणतो. ते शल्य मी भोगलं आहे भोगतो आहे... थोडे वेगळ्या अर्थानं, एवढाच फरक. हे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ कौंतेया, मी तुझ्यावर प्रसन्न आहे. हवा तो वर मागून घे.'

'वर!" कर्णाने क्षणभर विचार केला. क्षणात तो हर्षभरित झाला. तो अधीरतेनं म्हणाला,

'पितामह! वर द्यायचाच झाला, तर एक द्या. मृत्यूला हवं तेव्हा सामोरं जाणारं आणि प्रसंगी मृत्यूलाही तिष्ठत ठेवणारं आपलं बळ मला द्या. तेवढा एकच वर मला द्या. कारण, माझ्या एकमेव मित्राला द्यायला माझ्या प्राणांखेरीज माझ्याजवळ काहीही राहिलेलं नाही. रणवेदीवरील आत्मसमर्पण एवढंच आता शिल्लक राहिलं आहे. ते बळ मला लाभावं.'

भीष्मांनी आपला थरथरता हात उंचावला. कर्णाने तो हाती घेतला, ती लांबसडक बोटे कर्णाच्या हातावर विसावली होती. भीष्म म्हणाले,

'कर्णा, मी शरपंजरी नसतो, तर तुला छातीशी कवटाळून तुझं कौतुक केलं असतं. वीरा, तुझं कल्याण असो! हे ज्येष्ठ कौंतेया, तुझं इच्छित तुला प्राप्त होवो. मृत्यूचं आगमन तुला सहज कळेल. त्याला हसतमुखानं सामोरं जाण्याचं बळ तुला लाभेल. सूर्यपुत्रा, तुझा मृत्यू तुझ्या लौकिकाला कारणीभूत होईल. तुझं तेज अखंड राहो, हा माझा आशीर्वाद आहे. जा, निर्भय मनानं जा. तुझं कल्याण असो.'

कर्णाने भीष्माचा हात अलगद त्यांच्या छातीवर ठेवला. भीष्मांवरची दृष्टी न काढता तो तसाच चार पावलं माघारी आला.

भीष्मांनी नेत्र मिटले होते.

भीष्मचरणांना स्पर्श करून कर्ण माघारी वबला. कर्ण रथाकडे जात होता.कर्णाच्या मनात एक वेगळीच तृप्ती नांदत होती.

## ४६

**क**र्णरथाने रणभूमी ओलांडली. नकळत कर्णाने रथाचे वेग ओढले. रथ थांबला. रथावर उभा राहून कर्ण पाहत होता.

सर्वत्र शांतता नांदत होती. निरभ्र आकाशात प्रशांत चंद्रमा आपल्या प्रभावळीसह प्रवास करीत होता. कार्तिक मासाचे शुभ्रधवल चांदणे धरतीला न्हाऊ घालीत होते. निशेचे रूप गंभीर व भव्य बनले होते. पूर्वेचा गार वारा सुखदायक वाटत होता. रात्र हळुवार पावलांनी चढत होती.

भीष्मभेटीने एकाकी बनलेल्या मनाला ती गूढता जाणवत होती. कर्णाला स्वगृही जावे, असे वाटत नव्हते.

कर्णाने रथ हाकारला. कौरवशिबिराला टाळून तो नदीकडे रथ नेऊ लागला. नदीकिनारी रथ थांबताच कर्ण रथातून उतरला.

विस्तीर्ण वाळू-किनाऱ्यांमधून जाणारा हिरण्यवतीचा प्रवाह चांदण्यात चमकत होता. नदीपलीकडे धूसर अंधारात पांडवांचे शिबिर विस्तारले होते. त्या शिबिरात असंख्य पलिते-मशालींच्या खुणा रत्नशिडकाव्यासारख्या पसरल्या होत्या.

कर्ण नदीपात्राकडे वळला. तो जात असता त्याची पादत्राणे वाळूत रुतत होती. प्रत्येक पावलागणीक करकर नाद उठत होता. किनाऱ्याच्या मध्यभागी जाऊन कर्ण उभा राहिला. त्याचे लक्ष हिरण्यवतीच्या चंदेरी पठठयावर खिळले होते.

... या नदीची ओढ एवढी का वाटावी? पूर्वी अनेक वेळा नदीकाठावर उभे असता मी त्या जीवनदात्रीला विचारीत असे,

'हे जननी, कोणाच्या हातून मी तुझ्या प्रवाहावर सोडलो गेलो? त्या जीवानं तुला काही सांगितलं का? ते सुकुमार कोमल हात तुझ्या पात्रात भिजत असता निखळलेल्या अश्रुबिंदुंनी तुझ्या मनात वलयं निर्माण केली का ?'

आज त्या प्रश्नांची उत्तरं मिळूनही तुझ्या दर्शनाची ओढ कमी होत नाही. ज्याला उद्या रणांगणाचं रौद्र दर्शन घ्यायचं आहे, त्या रणयज्ञात आहुती टाकायची सूडानं आकर्ण खेचलेल्या प्रत्यंचेतून सुटलेल्या बाणांच्या शिळांनी कान तप्त करायचे आहेत, क्षमा, दया, शांती, यांना, अवसर न देता ईर्ष्या, अहंकार, घात, अपघात यांचा आश्रय शोधावयाचा आहे, अशा वेळी रणभूमीचं चिंतन करण्याऐवजी या नदीतटाकडं कशला यावं एवढी ओढ का वाटावी? ...

त्या विचारानी कर्णाच्या मुखावर प्रगटले.

प्रवाहपतिताला प्रवास करायचा असेल, तर प्रवाहाची सोबत कशी सोडेता येईल? सारं जीवन तर या नदाकीठावर बांधलेलं जीवनाचा प्रवास याच प्रवाहावरून सुरू झाल?: जीवनातली महादानं याच काठावर दिली आणि तशीच स्वीकारली आणि आता शेवटचं

दान इथंच दिलं जाणार.

कर्णाचे अंग त्या विचाराने शहारले. त्याने आपले उत्तरीय अंगाला लपेटून घेतले.

मृत्युचे भय मला वाटत नाही. जगण्यासारखं काहीच उरलंच नाही; मग मृत्युचं भय का वाटावं? सारेच प्रवाह एक ना एक दिवशी सागराला मिळतात, असं. ऐकतो. हा प्रवाह त्या रूपात विलीन होईल, तव्हा त्या प्रवाहाचं स्वतंत्र राहील का? नशिबी स्वर्ग असो, नाहीतर रौरव; पण तो कोणत्या रुपानं भोगायला मिळतो?
हं! भोगाची आसक्ती म्हणजेच जीवन. भोगांचा त्याग म्हणजेच मृत्यू. त्या मृत्यूची वाट चालत असता भोगाची आठवण का व्हावी? ज्यांनी जीवनमरणाच्या कक्षा सहजतनं ओलांडल्या आहेत, त्या पितामहांनाच हा प्रश्न विचारायला हवा होता. मृत्यूला शरण जणं सर्वांत सोपं; पण दरी आलेल्या मृत्यूला तिष्ठत ठेवून, त्यावर दृष्टी बांधून राहणं केवढ कठीण असेल!
मरणापेक्षा वृद्ध होत जाणं अधिक कठीण मृत्यूबरोबर सारं संपुन जातं. पण वृद्ध होता जाणं म्हणजे रोज काही ना काही त्याग करणं. आपलं मरण आपण रोज पाहणं. आपला क्षय आपण सहन करणं. हे माहीत असून, इच्छामरणी भीष्मांनी जीवनाची आसक्ती का धरली? कोणत्या इच्छेसाठी? पितृनिष्ठेपायी
पाळलेलं खडतर ब्रह्मचर्य आणि केलेला राजत्याग. त्या त्यागाचं फळ भोगण्यासाठी? परोक्ष सत्ता गाजवण्यासाठी का जीवनाची धडपड होती? त्याचा विचार मी का करावा? तो माझा अधिकारही नाही. दारी मृत्यु तिष्ठत असता, याचा विचार करण्याची मला उसंत तरी कुठं आहे?
मृत्यु! सर्व यातायात संपवणारा जीवनातल्या धडपडत्कि विश्राम देणारा तो मृत्यु केवढा कल्याणकारक कटावयास हवा; पण मनात मृत्युचा विचार आला की, त्या ओगळवाण्या किडयाचा स्पर्श जाणवतो- आपल्या कठोर नांग्यांनी मांडी पोखरणारा.

त्या विचाराने कर्णाचे अंग गारठले. साऱ्या अंगाला कापरा भरला. आपले उत्तरीय झटकून त्याने त्वरेने ते अंगाभोवती लपेटून घेतले. ती कृती करीत असता किनाऱ्यावर विसावलेली एक टिटवी भीतीने उडाली. आपल्या कर्कश आवाजाचा दीर्घ साद घालीत ती कर्णाच्या मस्तकावरून निघून गेली.

कर्णाने मनातले विचार झटकले. तो रथाकडे जाण्यासाठी वळला. त्याच वेळी त्याची पावले जमिनीला खिळली. कर्णाच्या चेहऱ्यावर आश्चर्य प्रगटले. तो सावकाश वळला. तो भास नव्हता. नदीच्या पैलतीरावरून बासरीचे गोड सूर कानांवर येत होते.

अशा अपरात्री बासरी कोण वाजवतेय्? एवढी सुरेल! उद्या रणसंग्राम सुरू, त्या रणभूमीवर प्रवेश करण्याआधी बासरीचे सूर ऐकू येतात. वचनपूर्तीसाठी कृष्ण बासरी वाजवतोय् की, मनाची व्यथा टाळण्यासाठी बासरीचा आश्रय घेतोय्?

शरपंजरी पडलेल्या भीष्माजवळ अधोवदन बसलेल्या कृष्णाचे रूप कर्णाला आठवले. त्याने प्रथम मान वर केली, तेव्हा त्याच्या रूपावर प्रगटलेली व्यथा कर्णाच्या दृष्टीसमोरून तरळून गेली.

पितामह भीष्म! एक वयोवृद्ध, तपोवृद्ध तापस. कुरुकुलाचा ज्येष्ठ. याच भीष्मांनी पांडवांच्या राजसूय यज्ञप्रसंगी कौरवांचा रोष पत्करून कृष्णाला अग्रपूजेचा मान दिला होता. त्याला ईश्वरी अंश मानले होते. त्याच भीष्मांच्या समोर शिखंडीला उभा करून, अर्जुनाच्या हातून भीष्मपतन घडवीत असता, कृष्णा, तुझ्या मनाला केवढे क्लेश झाले असतील?

कर्णाने पैलतीर न्याहाळण्याचा प्रयत्न केला; पण चांदण्याच्या धूसर पडद्याखेरीज काही दिसत नव्हते. वाऱ्यावरून बासरीचा साद अखंड लहरत येत होता.

कर्ण उभ्या जागी बसला. मागे घेतलेल्या डाव्या हातावर विसावून तो ती बासरी ऐकत होता.

केवढा गोड आवाज! सारी चिंता दूर करण्याचे सामर्थ्य त्या बासरीत आहे. पहिल्या सूर्यकिरणांबरोबर शांत सरोवरातील कमल उमलावे आणि गुंजारव करीत तृप्ततेने भुंगा बाहेर पडावा, तसे ते सूर उमटत होते. बासरीचे केवढे हे सामर्थ्य.

त्या बासरीत काही नसते, म्हणे! ती एक शुष्क वेळूची नळी. छिद्रांकित. महत्त्व असते, ते सावधानतेत. त्या नळीत फुंकरीलेल्या फुंकरीला, हळूवार बोटांनी छिद्राना जपण्याला. त्यातूनच मनाचे सूर उमटतात.

कृष्णाने सांगितले होते :

फुंकर! निर्जीवाला सजीव करणारी, सूर भरणारी फुंकर.

साऱ्यांनाच जीवनात अशी फुंकर थोडीच लाभते?

अग्नी प्रज्वलित करण्याला फुंकर मारावी लागते तीच फुंकर समईची ज्योत शांत करते.

तसं पहिलं, तर मानवी देह हीच एक विधात्यानं घडवलेली बासरी आहे. त्याच्या एका फुंकरीन सजीव बनलेल्या देह. मातेच्या श्वासानी जपलेला. त्या बोटाच्या जपणूखाली सुखावलेला.

बाल्यावस्थेतल्या अवखळ सुरांना केव्हातरी प्रौढत्वाचा स्थिर सूर सापडतो. तारुण्यानं घातलेल्या फुंकरीनं उन्मादक सुरांची आठवण याच बासरीतून होते. आणि वार्धक्याच्या विकल श्वासांनी तीच बासरी अस्थिर सुरांची धनी बनते. तो सुर केव्हा तुटले कशानं तूटेल, याची भीती बाळगीत असता, कालाच्या एका धीट फुंकरीनं सारे सूर विरून जातात: कायमचे, उरतं, ते देहाचं शुष्क काष्ठ, तेही मूळ स्वरूपात विलीन होऊन जातं, मागं रहते, ती आठवण सुरेल बासरीची आठवण रेगाळणाऱ्या सुरांचं स्वप्न!!

फुंकर मारणारा कधीच का ध्यानी येत नाही?

कर्णाने वर पाहिले.

आकाशातला चंद्र एका शुभ्र विरळ ढगाआडून सरकत होता. पाहता-पाहता त्या ढगाचे वस्त्र दूर झालेले आणि चंद्र मूळ तेजात प्रकाशु लागला.

.... काळांचं अस्तित्व जाणवत नाही कस? ते तर सदैव जाणवत असतं. निदान मला तरी जाणवलं या लगात येताच नदीप्रवाहावरचा प्रथम प्रवास घडला तो त्याच्या सोबतीनं शस्त्रस्पर्धेच्या बेली तरुण मनात याचंच स्वान रेगाळत होतं, द्रौपदीस्वयंवराच्या वेळी याच मृत्युनं मला हिणवलं. जरासंधाच्या द्वद्वात याच काळाची छाया माझ्यावरून फिरत होती.

कृष्णानं जन्मरहस्य सागितलं तेव्हा मृत्युच्या अस्तित्वाची जाणीव झाली सूर्याच्या आशीर्वादानं ते रूप जपता आलं इंद्रच्या कृपेनं त्या रौद्र रूपाला गोंजारता आलं:.. आणि जन्मदात्रीच्या भेटीत त्या मृत्युचं साक्षात दर्शन झालं मृत्युचं हे रूप माझ्याइतकं पाहिलंय् कुणी त्या परिचित मृत्यूचं' भय का वाटावं ?
मृत्यु म्हणजे सर्वनाश नव्हे मृत्यु म्हणजे रुपांतर. ग्रीष्मकाली सूर्यकिरणांत हिमालयाचे हिमखंड वितळतात, म्हणजे का त्या बर्फाच नाश झाला म्हणायचं? मग गंगेचा पूर. ते रूप कोणतं? तीच गंगा सागराला मिळते म्हणजे का ती नाहीशी होते? ते सागररूप तिचंच नव रूप नाही का? या रूपांतराचं भय वाटतं म्हणूनच मृत्युचं

त्या विचाराने कर्णाची मान ताठ झाली. एक निराळाच विश्‍वास त्याच्या मनात प्रगटला.

रूपांतराचं भय! परिचितातून अपरिचितात जायता एवढी भीती वाटते? प्रत्येक क्षणाला रूपांतरातून जाणाऱ्या मानवाला अंतिम रुपांतराची भीती का वाटावी? आश्चर्य आहे जीवनातलं बाल्य केव्हा सरलं, तारुण्यानं, जीवनात केव्हा पदार्पण केलं, वार्धक्याचा स्पर्श झाला, तो क्षण कोणता? ही रुपांतरं घडत असता भीती का वाटावी? आतृप्तता हेच कारण आसवं!
माझ्या जीवनानं मला भरपूर संपन्नता दिली.जन्मदात्रीनं मला प्रवाहावर सोडलं म्हणून काय झालं?जलप्रवाहानं जिव्हाळयात का कमतरता होती? त्या मायेच्या उबाऱ्यात वाढत असता दुर्योधनासारखा मित्र लाभला. त्याच्या प्रेमामुळं राज्याधिकार उपभोगता आला. पराक्रमाला अवसर मिळाला. वृषालीसारखी जीवनाची सोबत लाभली.गुणी पुत्रांचा पिता म्हणून समाधान अवतरलं. संपन्न जीवन म्हणजे आणखी काय असतं?
ऐहिक ऐश्वर्य व्याहरिक समाधान वासना-तृप्ती म्हणजेच का साफल्य! ते प्राण्यांनाही भोगत येतं मानवी जीवनचं साफल्य ऐहिक तृतृप्तीत नाही. या तृप्तीखेरीज आणखी एक तपती असते. ती मी संपादन केली आहे. माझ्या मृत्यूबरोबर ती तृप्ती लुप्त पावणारी नाही. परमेश्वारनं सूर भरलेल्या या बासरीतून जसे तीव्र सूर उमटले तशीच आसंख्य कोमल सुरांचीही पखरण झाली. चारित्र्य जपता आलं. उदंड स्नेह संपादन करता आला. मित्रच नव्हे, तर शत्रूही तृप्त झालेले पाहिलेले. वैरभाव पत्करला, तोही परमेश्वररुपाशी. जीवनचं यश यपेक्षा वेगळं काय असतंय़

त्या विचारानी कर्णाला प्रसन्नता लाभली. एकदम तो सावध झाला. त्याने पैलतीराकडे पाहिले
बासरीचा सूर थांबला होता. सर्वत्र नीरव शांतता पसरली होती.
कर्णाच्या चेहऱ्यांवर स्मित उमटले.

बासरीचा सुर विरला होता आता परत फुंकर मारीपर्यंत छिद्रांकित पोकळ काष्ठ एवढंचं बासरीचं रूप शिल्लक राहिल होतं. केव्हातरी त्याच जागत्या निःश्वासानं शेवटी फुंकर मारलो जाईल. या देहाच्या बासरीचा सूर विरून जाईल. मागं राहील, आठवण. एका

एकाकी जीवनाची. त्याच्या सफल दातृत्वाची. अजोड सोसण्याची: बस्स! तेवढं राहिलं, तरी खुप झालं... .

जगायला पात्र आहेत ते जगू देत. आपल्या मृत्युनं त्यांचं जीवन संपत्र होवो. त्याच्या साऱ्या इच्छाआकांशा सफल होवोत. त्यानंच आपल्या मृत्युला अर्थ लाभेल.

कर्ण विचारातून भानावर आला. शांत मनाने तो उभा राहिला.

सर्वत्र शांतता होती.

कर्णाने पांडवशिबिराकडे पाहून हात जोडले.

कर्ण आपलत रथाजवळ आला. रथाच्या दोन्ही मशाली शांत झाल्या होत्या. कर्ण तसाच रथारूढ झाला. त्यागे मागे वळून पाहिले.

धुके दाट बनू लागले होते.

त्या धुक्याच्या पडद्यामागे पैलतीर झाकला गेला होता.

# ४७

**कृ**ष्ण थकल्या पावलांनी आपल्या शिबिराकडे जात होता. आकाशातल्या वाढत्या चंद्राबरोबर रात्र चढत होती. उतरणाऱ्या धुक्याने अंग थंडावत होते. कृष्णाचे लक्ष शिबिराबाहेर शेकोटीच्या उबाऱ्यात तिष्ठणाऱ्या सेवकांकडे गेले. कृष्ण जवळ जाताच सेवकांनी कृष्णाला वंदन केले. काही न बोलता शिबिराचा पडदा दूर सारून कृष्णाने आत प्रवेश केला. कृष्णाची पावले द्वारीच थबकली. शिबिरात धूपाचा वास दरवळत होता. समईचा प्रकाश शिबिरात पसरला होता. कृष्णाचे लक्ष आसनावर बसलेल्या विदुरावर खिळले होते. अशा अपरात्री विदुराला पाहून कृष्णाच्या मुखावर आश्चर्य प्रगटले. कृष्णाची वाट पाहणारा विदुर बसल्या जागी पेंगत होता. त्या वयोवृद्ध, सात्विक पुरुषाच्या दर्शनाने कृष्णाच्या उद्विग्न मनाला किंचित समाधान लाभले. विदुराचा निद्राभंग होऊ नये, म्हणून कृष्ण अलगद पावलांनी जात असता कृष्णाच्या हातातल्या बासरीचा स्पर्श समईला झाला. विदुराचे नेत्र उघडले गेले. कृष्णाला पाहताच तो गडबडीने आसनावरून उठला.

विदुर, बैस. संकोच करू नकोस.'

आसनस्थ होत असता विदुरच्या मुखातून एकच दीर्घ श्वास बाहेर पडला. विदुर कृष्णाकडे पाहत असता त्याचे लक्ष कृष्णाच्या हाती असलेल्या बासरीकडे गेले. न राहवून विदुराने विचारले

'कृष्णा, एक विचारू?'

कृष्णाच्या मुखावर उदास स्मित प्रगटले.

'अशा अपरात्री बासरी घेऊन कुठं गेलो होतो, हेच तुसा मनात आलं ना?' विदुराने होकारार्थी मान डोलावली

'मित्रा! हरवलेली मन:शांती मिळवायला माझ्याजवळ एवढा एकच आधार आहे. थकल्या मनाला विरंगुळा वाटावा, म्हणून नदीकाठचा एकांत शोधायला गेलो होतो. शांती दूरच राहिली. उलट, मन अधिकच अशांत बनलं. माझी ही अवस्था, तर त्याची अवस्था काय असेल, कोण जाणे!'

'कुणाची?' विदुराने विचारले.

कृष्णाचे चेहऱ्यावर एक निराळाच भाव उमटला. तो म्हणाला,

'आज माझी बासरी ऐकाटाला असाच एव थकला-भागला श्रोता लाभला होता.'

'कोण होता तो?'

'ते मला कसं कळणार ऐलतीरावर मी बासरी वाजवीत होतो, पैलतीरावरून तो ती ऐकत होता. मधून हिरण्यवतीचा प्रवाह वाहत होता. आमच्यांतलं अंतर हळूहळू धुक्यानं आच्छादलं जात होतं,

विदुराला कृष्णाच्या डोळ्यात अश्रु तरळल्याचा भास झाला.

स्वत:ला सावरीत कृष्णाने विचारले,

'अशा अपरात्री तू बरा आलास

विदुर आसनावरून उठला. त्याचे अंग कृष्णाका प्रश्नाने शहारले. अग्निकुंडाजवळ जाऊन त्यावर आपली शुष्क बोटे चाळवीत विदुर उभा राहिला.

विदुरच्या पाठमोऱ्या आकृतीकडे कृष्ण पाहत होता. विदुराचे शब्द उमटले,

‘कृष्णा, पितामह पडले. शरपंजरी पडलेल्या त्या वृद्ध तापसाचं दर्शन घेतल्यापासून मन भडकून उठलंय्? बोलूनचालून मी दासीपुत्र. मान, अपमान, अवहेलना सोशीत माझं आयुष्य गेलं. धृतराष्ट्राचं सख्य आणि आश्रय लाभला, तरी खऱ्या अर्थानं मी भीष्मांच्या स्नेहामुळं जगलो. माझ्या ज्ञानोपासनेला अर्थ लाभला. कृष्णा, मी तुझ्या इतका ज्ञानी नाही, पण चारी पुरुषार्थांचं ज्ञान असणारा एकच क्षत्रिय मला माहीत आहे. तो अधिकार फक्त भीष्मांचाच आहे. त्या भीष्माला शरपंजरी पडलेलं पाहिल्यापासून माझ्या जिवाचा थारा उडाला आहे. आयुष्यात प्रथमच मला पोरकेपण जाणवतंय् काही सुचेना, कळेना, तेव्हा अशा अपरात्री तुझ्याकडं...

विदुर बोलता-बोलता थांबला. त्याच्या खांद्यावर कृष्णाचा हात स्थिरावला होता. त्या स्पर्शातला स्नेह विदुराला जाणवत होता. विदुर वळला. विदुराचे सुरकुतलेले गाल अश्रूंनी भिजले होते. विदुराचे ते विकल रूप पाहून कृष्णाचा जीव उभ्या जागी गुदमरला. सारी शक्ती एकवटून विदुराने विचारले,

‘कृष्णा, कशासाठी हे युद्ध? यातून काय प्राप्त होणार?’

‘सर्वनाश!’ कृष्णाने शांतपणे सांगितले.

‘कशासाठी?’

‘पुरुषार्थाचा अहंकार अन् सत्तेची लालसा हेच कारण.’

‘कृष्णा, यात तुला आनंद आहे?’ आश्चर्याने विदुराने विचारले.

‘दु:ख अन् सुख यांच्या मर्यादा ओलांडून मी हा निर्णय घेतला आहे.’ कृष्ण खिन्नपणे हसला. ‘विदुरा, ही नुसती सुरुवात आहे. यानंतर मला खूप पाहायचं आहे, सोसायचं आहे. ज्यांनी पांडवांना शस्त्रविद्या दिली, त्या द्रोणाचार्यांचा मृत्यू पांडवांकरवी घडलेला मला पाहावा लागेल. ज्याच्या दातृत्वानं पांडव निर्भय झाले, त्या कर्णाचा मृत्यू त्याच्याच भावाच्या हातून होत असलेला मला पाहावयाचा आहे. ते घडवायला पांडवांचं बळ अपुरं आहे. ते मलाच करावं लागेल. भीष्माचा वध शिखंडीला पुढं करून साधता आला. अशाच अन्य मार्गांनी पांडवांना विजय प्राप्त करून घ्यावा लागेल अन् ते माझ्याचकरवी घडेल. विदुरा, तू युद्धभूमीपासून दूर आहेस. जे घडतं, ते तुझ्या परोक्ष. पण मला हे सर्व पाहावं लागणार आहे. ते बळ मिळविण्याचा मी प्रयत्न करीत आहे.’

कृष्णाची दृष्टी टाळीत विदुर म्हणाला,

‘हे बळ मिळवण्यापेक्षा हे थांबवीतच का नाहीस?’

‘काय?’

‘हे सर्वनाशी युद्ध!’

‘त्यात मला आनंद का आहे? विदुरा, प्रत्यंचेतून बाण सुटण्याआधी त्याचा विचार करायचा. सुटलेला बाण नंतर अडवता येत नाही. तुला उपाय सुचतो?’

‘एकच उपाय आहे.’ विदुर म्हणाला

‘कोणता?’ कृष्णाने आशेने विचारले.

‘त्या कर्णाला त्याचं जन्मरहस्य सांगितल, तर...’

‘कर्णाला त्याचं जन्मरहस्य कळलेलं आहे.’

कृष्णबोलानी विदुर चकित झाला. त्याने विचारले,

कुणी सांगितलें?'

'मी... भीष्णानं, एवढंच नव्हे तर त्याच्या आईनसुद्धा...'

'अन् ते त्यानं मान्य केलं नाही?' विदुराचे ताठरलेले अंग सैल पडले.

'नाही, विदुरा, त्यानं रक्ताचं नातं आनंदानं मान्य केलं; पण ते करीत असता त्याचं कर्तव्याकडं दुर्लक्ष झाल नाही.'

'कसलं कर्तव्य ?'

'त्याच्या जीवनात एकच कर्तव्य उरलं आहे. मित्रप्रेम! तेवढं तो निष्ठेनं पाळीत आहे.'

'अधर्माशी जोडलेलं सख्य, त्याला का निष्ठा समजायची?'

'धर्म आणि अधर्म! त्याच्या मर्यादा सांगायच्या कुणी? विदुरा, सूक्ष्मपणे सांगायचं झालं, तर धर्म हा स्वार्थप्रेरितच असतो. जेव्हा त्या स्वार्थाला तडा जातो, असं दिसतं, तेव्हा ते कारण अधर्मी भासतं.'

'कृष्णा, तू हे सांगतोस?'

'त्यात आश्चर्य कसलं? विदुरा, तू ज्ञानी आहेस. तत्वज्ञानी आहेस. नित्य नवं ज्ञान मिळवण्यात तुइया जीवनाचा आनंद. तोच तुझा छंद. सत्ताविहीन चांगुलपणा आणि स्वार्थनिरपेक्ष तत्वज्ञान हे तुझं बळ आहे. तुला मी स्पष्टपणे विचारू?'

'विचार ना!'

'कौरवांची बाजू एवढी अधर्मी होती, तर तू पितामह द्रोणाचार्य, कृपाचार्य 'कौरवांची बाजूनं का उभे राहिलात?'

'कौरवेश्वरांना सोडून आम्ही कुठं जाणार? त्याखेरीज आम्हांला गत्यंतर नव्हतं.'

'हे उत्तर खरं आहे?' कृष्णाच्या चेहऱ्यावर स्मित उमटले.

विदुराची दृष्टी वळली.

'विदुरा, अशी फसवणूक करून चालत नाही. तुम्ही मनात आणलं असतं, तर युद्ध टाळता आलं नसतं, तरी यातून स्वत:ची सुटका सहज करून घेता आली असती.'

'सुटका?'

'हो!' विदुराच्या दृष्टीला दृष्टी भिडवीत कृष्ण म्हणाला, 'भीष्म बोलूनचालून पितामह. त्यांचा अधिकार मोठा. त्यांना आपल्याच कुलाचा संहार पाहण्याची सक्ती नव्हती. युद्ध अटळ दिसताच वानप्रस्थाला जातो, असं ते म्हणाले असते, तर त्यांना कुणी अडवलं असतं? मी पांडवांच्या बाजूनं उभा राहिलेलं पाहताच, दुर्योधनाबद्दल प्रीती बाळगणाऱ्या माझ्या ज्यष्ठ भावानं- बलरामदादानं या युद्धातूनआपलं अंग काढून घेतलं नाही का? त्यांना कुठं मी सत्ती करू शकलो? तुम्हां सर्वांचा तर वयाचा, ज्ञानाचा, मानाचा अधिकार होता; पण तुम्ही त्याचा आधार घेऊ शकला नाही. कारण....'

'बोल, कृष्णा! मी त्या कल्पनेनंच अस्वस्थ आहे. मला ते कारण ऐकायचं आहे.'

कृष्णाने विदुरावरची दृष्टी न काढता स्पष्टपणे सांगितले,

'कारण, कौरवांची निष्ठा हा तुम्हांला धर्म वाटत होता. मनात असलेली पांडवप्रीतीसुद्धा त्या निष्ठेपुढं कमी पडली. कौरवनिष्ठेपासून पळून जाणं तुम्हांला जमणारं नव्हनं, तुमच्या ज्ञानाला तो भयानक शाप होता'

विदुराचा चेहरा कृष्णबोलांनी आणखीच फिका पडला. त्याचे ओठ थरथरू लागले.

निश्चयी स्वरात तो म्हणाला,

'कृष्णा! हेच मलासुद्धा म्हणता येईल. हेच सत्य असेल, तर तू पांडवांच्या बाजूनं का उभा राहिलास?'

'त्याचं उत्तर मी शोधतोय्, विदुरा... निष्ठा स्नेहानं बांधली जाते. नुसत्या माझ्या पित्याची बहीण. पांडव माझ्या आत्याचे पुत्र. या नात्यानंच आम्ही जवळ आलो, असं नाही. या पांडवांच्या गुणांनी मी त्यांच्याकडं आकर्षित झालो. द्रौपदीशी पांडवांचा विवाह झाला, तेव्हा पांडवांच्या बाजूनं तिथं कोणी नव्हतं. मी ती उणीव भरून काढली. पांडवांना मी अगणित संपत्तीचा अहेर केला. त्यांच्या सहवासात अभेद्य स्नेह निर्माण झाला. त्यांना कुणाचा आधार नव्हता. त्यासाठी मी पुढ झालो. अरण्यातसुद्धा त्यांचं राज्य वसवलं. खांडवप्रस्थाचं रूपांतर घडवलं. मझ्या सेनेच्या बळावर त्यांना दिग्विजयी बनविलं. मी कृतार्थ झालो, असं मला भासलं; पण तो भासच होता. मानवी जीवन हाच मोठा जुगार आहे, हे त्या वेळी माझ्या ध्यानी आलं आलं नाही. निष्ठा एकदाच बांधली जाते. त्याला कारण असावंच लागतं, असं नाही. तुम्हीच काय, पण ज्या यादवकुळाचं संरक्षण मी केलं, त्यांतले मोजके अनुयायी सोडले, तर सारं यादवकुळ आज कौरवांच्या बाजूनंच उभं राहिलं आहे. जी तुमच्या निष्ठेची व्यथा, तीच माझ्या निष्ठेची कथा बनली आहे.'

'कृष्णा, तू हे बोलतोस?' विदुर आश्चर्यानं म्हणाला, 'युद्ध सुरू होण्याच्या दिवशी स्वजनांना पाहून गर्भगळीत झालेल्या अर्जुनाला तूच उपदेश केलास ना! ज्या धर्मज्ञानानं अर्जुनाला हरवलेलं बळ सापडलं, त्या वक्त्याच्या तोंडी हे उद्गार शोभत नाहीत.'

कृष्ण शुष्कपणे हसला.

'मित्रा! धर्म, पांडित्य हे दुसऱ्यांना सांगायला सोपं; पण ते स्वत: आचरणं भारी क्लेशकारक होतं. कर्मफलाची अपेक्षा न धरता युद्धाला उभा राहा, असं सांगत असता, अर्जुनानं युद्धाला प्रवृत्त व्हावं, हे फल माझ्या मनाशी नव्हतं का? माझ्या उपदेशानं अर्जुन युद्धाला उभा राहिला; पण मी सांगितलेलं कितपत आचरलं जाईल, याची मला शंकाच आहे. सूडभावनेनं पेटलेला भीम नित्य नव्या प्रतिज्ञा करतोय्. अर्जुन अहंकारापोटी स्वत:ला श्रेष्ठ धनुर्धर समजतो. युधिष्ठिर, जीवनातलं यश कोणत्या क्षणी द्युतपटावर फेकील, याचा भरवसा नाही. भरवसा फक्त एकाच गोष्टीचा आहे.'

'कोणत्या?'

'पांडवांचा माझ्यावरचा विश्वास. कोणत्याही प्रकारे मी त्यांना इच्छित फल मिळवून देईन, ही त्यांची निष्ठा अढळ आहे... अन् त्या निष्ठेसाठी सारं उघडाया डोळ्यांनी मला सोसायला हवं. हे युद्ध आता अटळ आहे. या युद्धामुळं पदरी कीर्ती येवो वा अपकीर्ती; पण त्याचं श्रेय फक्त आम्हां दोघांनाच राहील.'

'दोघे कोण?'

'एक मी, अन् दुसरा कर्ण! दैव तरी केवढं विचित्र! मी उपदेश केला अर्जुनाला, अन् नकळत आचरला जातो, तो कर्णाच्या हातून. सुख आणि दु:ख, लाभ अन् हानी, जय अन् पराजय ही दोन्ही सारखी मानून युद्धात उतरणारा कर्णाखेरीज दुसरा वीर कोणता? उद्या रणांगणात तो सूर्यपुत्र अवतरेल, तेव्हा त्याचं तेज प्रसन्न करणारं भासेल. कोणता स्वार्थ आता त्याच्याजवळ राहिलाय्? जीवितसुद्धा त्यानं सुरक्षित राखलं नाही. निर्विकार बुद्धीनं स्नेहासाठी सर्वस्व अर्पण करणारा तो कर्ण धन्य होय. पांडव मला दैवगुणसंपत्र

समजतात. आपल्या यशासाठी अर्जुनानं माझा आधार शोधला. देवत्वाचा आधार घेऊन विजय संपादन करणारा अन् मित्रप्रेमासाठी उघडचा डोळ्यांनी माझ्याशी वैर पत्करणारा, यांतला श्रेष्ठ कोण, हे ठरवणं अवघड आहे. अर्जुनाची माझ्यावर श्रद्धा आहे; पण असं निर्व्याज प्रेम ते फक्त कर्णच करू जाणे! उद्या रणांगणातला त्याचा मृत्यू माझ्याच आज्ञेनं घडणार आहे; ही कल्पनाही मला सहन होत नाही.'

विदुराचे रूप पालटले. निश्चयी सुरात तो म्हणाला,

'कृष्णा, त्याची चिंता करू नकोस. उद्या हे युद्ध थांबेल, थाबवावंच लागेल. त्यासाठी मी उपाय शोधलाय्.'

'कसला उपाय?' कृष्णाने अधीरतेने विचारले.

'उद्या पांडवांना, कर्ण कोण आहे ते कळेल.'

'विदुरा!'कृष्ण उद्गारला.

'ते सात्विक वृत्तीचे पांडव आपल्या भावाचा वध कदापिही करू धजणार नाहीत.'

मूर्तिमंत भीती कृष्णाच्या मुखावर प्रकटली. विदुराचा हात हाती धरीत तो म्हणाला,

'नाही, विदुरा. तुला हे करता येणार नाही.'

'का ?'

'का?' कृष्णाने कुंडात प्रज्वलित झालेल्या अग्नीकडे पाहिले. तिकडे बोट दाखवीत तो म्हणाला, 'ते फुललेले निखारे पाहिलेस? त्यांवर आता पाणी टाकलं, तर ते जागच्या जागी विझुन जातील; पण परत ते पेट घेणार नाहीत. त्यांचं जीवन तेजोहीन होऊन जाईल, ते संपूर्ण पेटूनच शांत व्हायला हवेत. त्यातूनच जीवनाचा दाह शांत करणारं भस्म निर्माण होतं'

'भस्म!'

'विदुरा, आता ती संधी राहिली नाही. पांडवांना कर्णाशी असलेलं नातं कळलं, तर ते क्षणात शस्त्रसंन्यास करतील, यात मला तिळमात्र शंका नाही; पण त्यामुळं कर्ण पांडवांना मिळणार नाही. त्याचा दुर्योधनस्नेह तसाच अखंड राहील अन् पांडवांनी स्वीकारलेला पराजय कर्णहस्ते दुर्योधनाच्या सुपूर्द केला जाईल. पांडवांच्या निष्ठेला, पितामहांनी स्वेच्छेनं स्वीकारलेल्या पतनाला अर्थ राहणार नाही. ते करण्याचं धाडस तू करू नकोस. तुझ्याइतकंच माझंही दुःख तीव्र आहे. आता हे युद्ध फार काळ चालणार नाही. जेव्हा हे युद्ध संपेल, तेव्हाच आपलं दुःख हरण होईल.'

'युद्धानं?'

'युद्धानं नव्हे! जय-पराजयांतील अर्थ ज्यानं आधीच गमावला आहे; पण तरीही कर्तव्यावर जो अखेरपर्यंत दृढ राहिला, तो भीष्मच आपलं दुःख समजू शकेल. आपलं सांत्वन करण्याचं सामर्थ्य फक्त त्याचंच राहील. सध्या सोसण्याखेरीच आपलत हाती काहीही राहिलं नाही.'

कृष्णाच्या बोलण्याने विदुर विचारात गढला.

त्या विचाराहा भानावर येत विदुर म्हणाला,

'कृष्णा, रात्र फार झाली. उद्या तुला परत सारथ्य करायचं आहे. मी येतो.'

'कसा आलास ?'

'नौका आणली आहे.'

'चल! मी येतो.'

विदुरापाठोपाठ कृष्ण शिबिराबाहेर आला. बाहरचा गारवा एकदम दोघांना जाणवला. विदुराच्या अंगावर नुसत उत्तरीय होते. ते लपटून घऊन विदुर नदीच्या दिशेने जात होता. मागून कृष्ण चालत होता. नदीकाठावर दोघे आले. नदीपात्रात एक हंसाकृती नाव उभी होती. आजूबाजूच्या धुक्यामुळे सारे वातावरण गूढ बनले होते. विदुर वळला. तो कष्टाने म्हणाला,

'कृष्णा, येतो.'

कृष्णान आपल्या अंगावरचे उबदार वस्त्र काढल. ते वस्त्र विदुराच्या खांद्यावर लपेटीत कृष्ण म्हणाला,

'मित्रा, तू जाण्याआधी मला तुझा आशीर्वाद हवा.'

'आशीर्वाद!' विदुर उद्गारला.

'हो! विदुरा, कौरवसभेत तुझी दासीपुत्र म्हणून सदैव अवहेलना होत आली. तुझं पांडित्य, तुझी राजनीती यांकडं सदैव त्यांनी दुर्लक्ष केलं; पण असं असताही तू सत्याचा कास कधाहा साडला नाहास. तुझ्या तत्वज्ञानाचा, सांगण्याचा काही उपयोग होत नाही, हे माहीत असतानाही तू थांबला नाहीस. हरघडीचा पराजय सोशीत असताही उपदेश करीत राहण्याचं तुझं बळ अलौकक. आजवर तुझ्याकडं कुणी आशीर्वाद मागितला नसेल; पण तो मी आज मागतोय्. उद्या पांडवांच्या विजयासाठी द्रोणाचार्य, कृपाचार्य, कर्ण यांसारख्या वीरांचा पराजय मला घडवून आणावयाचा आहे. उद्या माझ्याच आज्ञेनं सद्भावाचा पराजय घडेल. ते सोसण्याचं बळ मला हवंय्. तो आशीर्वाद देण्याचं सामर्थ फक्त तुझंच आहे.'

कृष्णाने आपला मस्तक वाकवल. दवबिंदूंनी भिजलेल्या कृष्णकुंतलांवर विदुराचा हात स्थिरावला. विदुराला काही बोलवत नव्हते. कंठ दाटून आला होता. तो एकदम वळला आणि नावेकडे जाऊ लागला.

कृष्णाने मान वर केली.

विदुर नावेत बसला होता. नाव मंद गतीने जात होती.

हळूहळू नाव दिसेनाशा झाला. या शांत वातावरणात नावेच्या वल्ह्यांचा 'चुबक सळ्' असा आवाज उमटत होता.

तो नाद ऐकू येईनासा होईपर्यंत कृष्ण तिथेच उभा होता.

# ४८

**प** हाटे कर्ण कौरव-शिबिरावर आपल्या रथातून आला. कर्णाचे दुर्योधनाने स्वागत केले. कर्ण दुर्योधनासह द्रोणाचार्यांकडे गेला. युद्धास सज्ज झालेला तो वृद्धयुवा दुर्योधन-कर्णाचे स्वागत करून म्हणाला,

'कर्णा, युधिष्ठिराला जिवंत पकडून देण्यासाठी मी दुर्योधनाला वचनबद्ध झालोय्. आजच्या युद्धाची मी आखणी केली आहे. युद्ध सुरू होताच मी योजल्याप्रमाणे संशप्तकांकडून अर्जुनाला आह्वान दिलं जाईल. अर्जुन या युद्धात गुंतला असता, मी दुसरीकडं चक्रव्यूहचा मांडलेला असेल. त्या व्यूहाच्या मध्यभागी तुम्ही श्रेष्ठ वीर राहाल. अर्जुन युद्धात गुंतल्यानं युधिष्ठिर चक्रव्यूहाचा भेद करण्यासाठी येईल. त्याला सहजपणे आपल्याला पकडता येईल. आज मी रचलेल्या चक्रव्यूहाचा भेद करण्याचं सामर्थ्य फक्त अर्जुनाखेरीज एकाही पांडववीरात नाही, हे मी निश्चितपणं सांगतो.'

द्रोणाचार्यांच्या त्या बोलण्याने उत्साहित झालला दुर्योधन सर्व वीरांसह रणांगणावर गेला. द्रोणाचार्यांनी रचलेला चक्रव्यूह खरोखरच अलौकिक होता. त्या चक्राच्या आरांच्या ठिकाणी श्रेष्ठ राजकुमारांची योजना केली होती. कर्णदुर्योधनासह व्यूहाच्या मध्यभागी पोहोचला. तेथे दु:शासन, कृपाचार्यांनी त्यांचे स्वागत केले.

सूर्योदयाला रणभूमीवर शंखनाद उमटले. युद्ध सुरू झाले. आचार्यांनी योजल्याइमाणे अर्जुनाला संशप्तकांनी गुंतवले. चक्रव्यूह भेदण्यास कोण येतो, याची सारे आतुरतेने वाट पाहत असता पांडवसेना व्यूहावर चालून येत असलेली दिसली. तुंबळ युद्ध सुरू झाले. कर्ण चाललेले युद्ध पाहत होता. चक्रव्यूहाची एक एक कडी फुटत होती आणि त्याच वेळी मध्यभागीच्या चक्रात पांडवरथाने प्रवेश केला. भीमदर्शनाच्या अपेक्षेने कर्णाने रथाकडे पाहिले; पण त्या रथात भीम नव्हता. कर्णाच्या आश्चर्याला पारावार राहिला नाही. रथावर कोवळ्या वयाचा अर्जुनपुत्र अभिमन्यू उभा होता. सुवर्णकवच धारण केलेला तो बालक शरवर्षावाची भीती न बाळगता त्वेषाने आपली प्रत्यंचा खेचीत होता. सुटलेले बाण आपले लक्षय अचूक हेरीत होते. अभिमन्यूने आपल्या पराक्रमाने अर्जुनपुत्र नाव सार्थ केले होते. द्रोणाचार्यही कर्णासह ते युद्ध कौतुकाने पाहत होते. अभिमन्यूचा पराक्रम वाढत होता. त्याने शल्यराजाला घायाळ केले. त्याच्या भावाचा वध केला. दु:शासनाला मूर्च्छा आली. कौरववीरांची ती वाताहत पाहून कर्ण पुढे झाला. अभिमन्यूच्या चेहऱ्या वरचे तेज, त्या रणभूमीतही त्याच्या मुखावर विलसणारे स्मित पाहून कर्णाला त्या बालयोद्धयाचे कौतुक वाटत होते. कर्णाच्या प्रत्यंचेला सूडाची धार येत नव्हती. आकर्ण बाण खेचताना समोरचे लक्षय चित्त वेधून घेत होते. अचानक एक बाण सणसणत आला आणि त्याने कर्णाच्या हातचे धनुष्य छेदले. त्यापाठोपाठ कर्णरथावरचा ध्वजही ढासळला. चकित झालेला कर्ण मागे वळला. त्याने दुसरे धनुष्य उचलले. त्याच वेळी कर्णाचा भाऊ अभिमन्यूला सामोरा गेला. कर्णाने भात्यातले बाण काढून प्रत्यंचेला लावला, त्याच वेळी अभिमन्यूच्या बाणाने कर्णाच्या भावाच्या कंठाचा वेध घेतला होता. भावाचा वध पाहताच कर्णाच्या मुखावर विलसणारे

कौतुक लुप्त पावले. त्याने आकर्ण प्रत्यंचा खेचून बाण सोडला आणि अभिमन्यूच्या हातचे धनुष्य मोडून पडले. अभिमन्यूच्या हाती गदा होती. दु:शासनपुत्र गदा घेऊन अभिमन्यूला सामोरा गेला. दोघे गदायुद्ध खेळत होते. शेवटी दोन्ही वीर एकमेकांवर प्रहार करून मूर्च्छित पडले. प्रथम दौ:शासनी सावध झाला. त्याने आपली गदा उचलली आणि सावध होत असलेल्या अभिमन्यूच्या मस्तकावर प्रहार केला. कर्णाला ते पाहण्याचे बळ राहिले नव्हते. कौरवांकडून जयशंख फुंकले जात असता सेनेतून वाट काढीत कर्ण शिबिराकडे जात होता.

अभिमन्यूच्या मृत्यूने आणखी एक दिवस संपला होता.

दुसऱ्या दिवशी कौरवश्रेष्ठांच्या मुखावर चिंता प्रगटली. अर्जुनाने सूर्यास्ताच्या आत जयद्रथवध करण्याची प्रतिज्ञा केली होती. कर्णाला ते दुर्योधनाने सांगताच कर्ण चकित झाला. कर्णाने विचारले,

'जयद्रथवधाची प्रतिज्ञा! का?'

'अभिमन्यूवधाचा सूड, म्हणून!' दुर्योधनाने सांगितले.

तशा स्थितीतही कर्णाच्या चेहऱ्यावर हसू प्रगटले.

'छान! अभिमन्यूवधाच्या वेळी जयद्रथ तिथं नव्हता. तरीही त्याच्या वधाची प्रतिज्ञा!

'ते काही असो. पण जयद्रथाला वाचवायला हवं. तो भयभीत झालाय्.'

सर्वांनी जराद्रथाला संरक्षण दिले. सारे कौरववीर एका जयद्रथाचे रक्षण करीत होते. अर्जुनाने पराक्रमाची मर्यादा गाठली, तरी कौरवरक्षित जयद्रथाचे दर्शन घडले नाही. दिवसभर तुंबळ युद्ध चालले होते. सूर्य पश्चिमेला सरकत होता. कार्तिकात कधीही न उमटणारे काळेकभिन्न ढग क्षितिजावर येत होते. पाहता-पाहता सूर्य त्या ढगांच्या आड गेला. वेळेचा अंदाज कुणालाही कळेनासा झाला. रणभूमीवर सायंच्छाया पसरली. धोका न पत्करता कौरववीर युद्ध करीत असता कुणीतरी शंखनाद केला. सूर्यास्त झाल्याची ती द्वाही समजून उतावीळ जयद्रथ हर्षाने रक्षककडयातून बाहेर आला आणि त्याच वेळी अर्जुनाचा रथ सामोरा आला. ढगांच्या आडून उमटलेले पिवळे सूर्यकिरण हळद उधळीत होते. त्या सूर्यकिरणांकडे पाहत असलेल्या जयद्रथाला सावध होण्याची संधी मिळाली नाही. अर्जुनाच्या बाणाने आपले लक्षय साधले होते. कौरवांचे सारे श्रम वाया गेले होते.

जयद्रथवध झाल्याचे पाहताच दुर्योधन संतापाने म्हणाला,

जयद्रथ पडला! चिंता नाही. हे अपघातानं चालू झालेलं युद्ध आता थांबणार नाही. हे युद्ध दिवसरात्रीचा, काळवेळाचा, जीवनमृत्यूचा विचार न करता असंच चालू द्या.'

- आणि सूर्यास्त झाला असताही राजाज्ञेने युद्ध सुरू राहिले. दिवसभराच्या युद्धाने थकलेली ती सैन्ये पुन्हा त्या रात्री एकमेकांशी भिडली. असंख्य पेटलेल्या पलित्यांनी ते सर्व रणांगण उजळून निघाले. वीरांची शस्त्रे त्या प्रकाशात तळपू लागली. वाढत्या रात्रबिरोबर युद्धही वाढत होते. कर्ण आवेगाने शत्रूशी झुंजत असता, कौरवसेनेत पळापळ दिसू लागली. सर्वत्र हाहाकार उडाला. कर्ण त्या दिशेला पाहत असता, दुर्योधन कर्णाला शोधीत तेथे आला. तो कर्णाला म्हणाला,

मित्रा, घात झाला! पांडववीर घटोत्कच रणात उतरला आहे. त्यानं अलायुधाचा वध केला. कौरवसेनेचा मोड करीत तो पुढं येत आहे.'

‘मी त्याला सामोरा जाऊ का?’ कर्णाने विचारले.

‘हो! तुझ्याखेरीज कोणीही ते संकट निवारू शकणार नाही. तुझ्याकडं एक शक्ती आहे, असं मी ऐकतो. त्या शक्तीनं त्या घटोत्कचाच वध कर.’

कर्णाने शांतपणे विचारले,

‘मित्रा, तुला घटोत्कच हवा, का अर्जुन?’

‘काय?”

‘मित्रा, माझ्याजवळ वासवी शक्ती आहे, हे खरं. ती अमोघही आहे; पण ती शक्ती एकदाच वापरता येईल. ती मी अर्जुनाकरिता राखून ठेवली आहे.’

‘कर्णा, अर्जुनाचं नंतर पाहता येईल. या घटोत्कचाला आवर घातला नाही, तर सूर्योदयाच्या आतच कौरव पराभूत होतील. मला घटोत्कच हवा.’

‘ठीक! तसं होईल.’

कर्णाचा रथ वळला. पळणाऱ्या सैन्यातून वाट काढीत तो घटोत्कचाजवळ पोहोचला. कर्णाने वासवी शक्तीचे स्मरण करून एक दिव्य बाण धनुष्याला जोडला. बाण घोंगावत सुटला. पर्वताचा कडा आपल्या नादाने आसमंत भेदून टाकीत कोसळावा, तसा घटोत्कच कौरववीरांवर ढासळला. कर्णाच्या विजयाने उत्साहीत झालेली कौरवसेना कर्णाचा जयघोष करू लागली. पांडवसेनेत हाहाकार उडाला.

त्या दोन्हींची क्षिती न बाळगता कर्ण शिबिराकडे जात होता.

# ४९

**पा**चव्या दिवसाचा तापदायक रणसंग्राम संपवून कर्ण आपलत निवासाकडे आला. कर्णापाठोपाठ वृषसेन, चक्रधरही आले होते. निवासावर येताच कर्ण आपल्या शय्यागृहात गेला. रणवेश उतरवून नित्यवस्त्रे परिधान करून तो उभा असता वृषाली महालात आली. कर्णाने वृषालीकडे पाहिले. कर्णाजवळ जात वृषालीने विचारले,

'आज द्रोणवध झाला, म्हणे. वृषसेन सांगत होता.'

'हां!"

'धृष्टद्यूम्नानं अपघाती ते कृत्य केलं, म्हणे.'

'अपघाती! मानलं, तर अपघात; नाही तर सारं धर्मनिष्ठच.'

'तो अपघात नव्हता?'

कर्णाच्या मुखावर स्मित प्रकटले. वृषालीचा हात हाती घेऊन तो आपल्या हाताने थोपटीत कर्ण म्हणाला,

'वसू! द्रोणाचार्यांनी खूप पराक्रम केला. युद्धाच्या सुरुवातीलाच त्यांनी विराटाचा आणि द्रुपदाचा वध केला. फार वर्षांपासून मनात रुजलेलं द्रुपदाचं वैर साधलं गेलं. पित्याच्या वधानं धृष्टद्युम्न खदिरांगारासारखा पेटला. तो द्रोणाचार्यांना रणभूमीवर शोधीत होता अन् त्याच वेळी अश्वत्थामा पडल्याची वदंता उठली.'

'अश्वत्थामा पडले?'

'तो मृत्युंजय! त्याला कोण मारणार? भीमानं अश्वत्थामा नावाचा हत्ती मारला ती बातमी स्वत: जाऊन द्रोणांना सांगितली. अश्वत्थामा मारला गेला, एवढंच सांगितलं. द्रोणांनी सत्यवता म्हणून युधिष्ठिराला विचारलं अन् सत्यवक्त्या युधिष्ठिरानं असत्याची कास धरून ती वार्ता खरी असलतची ग्वाही दिली. पुत्रशोकान द्रोणांनी शस्रत्याग केला अन् त्या संधीची वाट पाहत असलेला धृष्टद्यूम्न वेगानं पुढ झाला. द्रोणाचार्यांच्या रथावर जाऊन नि:शस्त्र झालेल्या त्या वयोवृद्धाचे पिकले केस हाती धरून खड्गानं त्यांचा शिरच्छेद केला.'

'हा अधर्म नाही?' वृषालीने विचारले.

'मानलं, तर! वसू, द्रोणाचार्यांना, आपला पुत्र अश्वत्थामा मृत्युंजय आहे, हे का माहीत नव्हतं? त्याला साक्ष कशाला हवी होती? शिखंडी सामोरा आला, तेव्हा भीष्मांना परतता आलं नसतं? ते का परतले नाहीत?'

'पण का?'

'का?' कर्ण हसला. 'मरणासाठी उतावीळ झालेले जीव मारण्यासाठी जगू इच्छीत नाहीत. फक्त कीर्तिरूप मरण ते शोधीत असतात.'

'मग आता?'

'हे युद्ध अखेरपर्यंत असंच चालू राहणार. संपूर्ण विनाशाखेरीज हे थांबणार नाही. वसू, जयासाठी युद्ध खेळलं जातानाही अहंकार हे एकच त्याचं कारण असतं. पराजयानं अहंकार शामत नाही. त्याची धार अधिक वाढते.'

'मग उद्याचा सेनापती...'

'हा तुझ्या समोर उभा आहे ना! अश्वात्थामा आणि दुर्योधनांनी मलाच सेनापती करण्याचं ठरवलंय् वसू हा तुझत पती अंगराज कर्ण उद्या कुरूचा सेनापती बनेल त्याच्या आधिपत्याखाली उद्या भयानक रणसंग्राम सुरू होईल.'

'आपण विजयी व्हाल, यात मला शंका नाही.'

'मलाही नाही.' कर्ण क्षणभर गंभीर झाला. दुसऱ्यांच क्षणी तो गंभीरपणे म्हणाला, 'वृषाली, जे यश भीष्मांना, द्रोणाचार्यांना मिळवता आलं, ते सहज मलाही मिळवता येईल.'

वृषालीच्या चेहऱ्यांवर चिंता प्रगटली. ते पाहून कर्ण हसत तिला म्हणाला, 'चल. उद्याच्या युद्धभूमीची चिंता आज नको. आज वृषसेनानं सूप पराक्रम केलाय्. तो त्याच्याच तोंडून ऐकू. चक्रधर-वृषसेनांसह वार्ता करू, आजच्या भोजनावर चिंतेची फुंकर पडाटाला नको.'

भोजन आटोपून, सर्वांचा निरोप घेऊन कर्ण शय्यागृहात आला, तेव्हा तेथे काणा नव्हत. पुरुषभर उंचीच्या सुवर्णसमयांच्या प्रकाशान शय्यागृह प्रकाशात झाले महालात रेंगाळत होता. पलंगानजीक हस्तिदंती तिवईवर ठेवलेल्या सुवर्णतबकात दोन गेदेदार विडे शोभत होते. शयनगृह प्रकाशित असूनही कर्णाच्या मनात अंधकार रेंगाळत होता. त्या दालनातील प्रकाशापेक्षा बाहेरचा अंधार, नि:स्तब्ध शांतता जवळचा वाटत होती. जीवनातल्या नव्या रूपाला आता सिद्ध व्हायचे होते.

नव रूप? कसलं?

सूतपुत्र राधेयाचा अंगराज कर्ण बनला. त्या कर्णाचा कौंतेय झाला तोच कौंतेय उद्या कुरुसेनेचा सेनापती म्हणून जाणारः एका जीवाची कोण ही स्थित्यंतरं!

सेनापती!

कोणतं आधिपत्य सांभाळावं लागणार! स्वत:ला सुरक्षित राखून जे जगु इच्छितात त्यांना मृत्युच्या खोल दरीत लोटून छायचं. ते साधलं, तर विजय सेनापतीचा; नाही साधलं, तर, तो दोष सेनेच?: दळाच्या कमी पडलेल्या निष्ठेचा! .

निष्ठा बाळगायलादेखील बळ असावं लागतं.

उद्या समोर भीम येईल बळाचा विश्वास बाळागणारा तो योद्धा. मला पाहताच त्याचे बाहू स्फूरण पावू लागतील. रणासाठी अधीर होऊन, रथावर उध्या ठाकलेल्या त्या वीराचा आवेश दृष्ट लागण्याजोगा असेल. त्याच्या पुढं जाणारा मी, रक्ताचं नातं ओळखलेला. माझ्या निष्ठेचं रूप त्या वेळी कोणतं असेल?

कृष्णानं अर्जुनाला आजवर माझ्यापासून दूर ठेवलं, म्हणून काय झालं? कदाचित उद्या तो अर्जुनही माझ्या समोर येईल. त्याच्या रथाचं सारथ्य कृष्ण करीत असेल. शुष्क काष्ठालाही आपल्या फुंकरीनं धुंदावणाऱ्या कृष्णाच्या मुखावर मला पाहून स्थित उमटले. त्या स्मिताला प्रत्पुरुर देण्यासकी भात्यातला बाण मला निवडावा लागेल, माझ्या निष्ठेला ते बब लाभेल?

कशासाठी हे युद्ध? यात कुणाचा विजय होणार?

जय, पराजय!

हर्ष, खेद!!
जीवन, मृत्यु!!!
अंतर केवढं थोडं! केवढा लहान पल्ला!
जीवन! गर्भातून येतानाच अहंकाराचा आक्रोश करणारा हा जीव, वाढत्या वयाबरोबरच आत्मश्र्लाघा, आत्मरूप, दातृत्व, पुरुषार्थ अशा अनेक काल्पनिक भावनांची पुटं आपल्याच हातानी अखडं लपेटून घेणारा हा जीव.
अन् मृत्युनं होणारा त्याचा शेवट!
-याची जाणीव या जिवाला झाली असती, तर ही वळवळ केव्हाच थांबली असती.

कानांवर आलेल्या चाहुलीने कर्णाची विचारधारा खंडित झाली. त्याने मागे वळून पाहिले. महालात वृषाली येत होती. तिच्या हाती अनंताच्या शुभ्र फुलांनी भरलेले तबक होते. त्या फुलांचा दरवळ महालात पसरत होता. तिवईवरचे विड्यांचे तबक उचलून त्या जागी अनंताचे तबक वृषालीने ठेवले. विडयांचे तबक कर्णापुढे करीत वृषाली म्हणाली,

'विडा घेतला नाहीत?'

'तुझी वाट पाहत होतो.'

कर्णाने विडा उचलला. आपला विडा उचलून वृषालीने तबक खाली ठेवले. विड्यांचा आस्वाद घेत, कर्ण वृषालीचा हात हाती घेऊन सौधावर गेला.

सर्वत्र चांदणे पसरले होते. गार वारा वाहत होता. दूरवर रणभूमीवरील पलित्यांच्या बिंदूंनी आखलेले कौरवांचे शिबिर दिसत होते.

तिकडे बोट दाखवीत कर्ण म्हणाला,

'पाहिलंस? केवढ्या शांतपणे, निर्धास्तपणानं सेना विश्रांती घेत आहे. त्या शिबिरापासून थोड्या अंतरावर पांडवांचं शिबिर त्या हिरण्यवतीच्या काठावर ठाकलं आहे; पण उद्याच्या रणांगणाची चिंता वाटत नाही. ही शांतपणां विस्तारलेली शिबिरं उद्या एकमेकांवर जीवनमृत्यूच्या ईर्ष्येनं तुटून पडणार आहेत, हे सांगितलं, तर खरं वाटेल?'

'ते आपण शिकायला हवं!' वृषालीने उत्तर दिले.

'अं!'

कर्णाने पाहिले, तो वृषालीच्या चेहऱ्यावर अवखळ भाव उमटला होता. ती म्हणाली,

'आपल्या सेनेला चिंता वाटत नाही. दिवसा दळ सेनापतीला अनुसरत असलं, तरी रात्री सेनापतीनं दळाला अनुसरावं.'

कर्णाने मान वाकवली आणि अत्यंत नम्रतेने तो म्हणाला,

'चलावं, राज्ञी! आपली आज्ञा आम्हांला शिरसावंद्य आहे.'

वृषालीपाठोपाठ मोकळेपणाने हसत कर्ण महालात गेला.

## ५०

**प**हाटेचा समय होता.

प्रासादप्रवेशाच्या विस्तीर्ण पायऱ्याच्या दोन्ही कडांनी मशालींचे टेंभे वाऱ्यावर फरफरत होते. प्रासादासमोर दीन रथ सज्ज होते. एका रथाला पांढरे शुभ्र अश्व जोडले होते. दुसऱ्या रथाला खेर रंगाचे उमदे घोडे जुंपले होते. रथसारथी व सेवक धन्याची वाट पाहत रथाजवळ उभे होते.

युद्धभूमीला सरावलेली ती उमदी जनावरे भावी रणसंग्रामाच्या उताविळीने उभ्या जागी खूर नाचवीत होती. रथरक्षक त्या जनावरांच्या ओठाळ्या धरून त्यांना आवरण्यात गुंतले होते. पायऱ्यांवरचे रक्षक सावध झाले. साऱ्यांचे लक्ष प्रासादद्वारावर खिळले होते. प्रासादातून महारथी कर्ण आपला पुत्र वृषसेनासह बाहेर येत होता.

कर्ण आणि वृषसेन दोघांच्याही शरीरांवर रणवेश होता. दोघांच्या शरीरांवर रत्नांकित रौप्य शरीरस्त्राणे, अभेद्य कवचे शोभत होती. मनगटाजवळ आवळलेली बाहुबंदांची निमुळती टोके कोपरांपर्यंत गेलेली होती. धनुष्य, खड्ग या आयुधांनी सज्ज झालेल्या त्या पितापुत्रांच्या पाठीला बाणांचे भाते शोभत होते. त्या दोघांच्या मागून कर्णपत्नी वृषाली येत होती. कर्णाने हास्यवदनाने वृषालीचा निरोप घेतला,

'आम्ही येतो.'

वृषसेनावर लक्ष ठेवावं.' न राहवून वृषाली म्हणाली.

कर्णाने वृषालीकडे पाहिले. हसत वृषसेनाच्या खांद्यावर हात ठेवीत तो म्हणाला, 'वसूवर लक्ष ठेवायची मुळीच गरज नाही. तो योद्धा आहे. युद्धकलेत निष्णात आहे. स्वत:ला सावरण्यात तो समर्थ आहे. मी आज सेनापती म्हणून रणावर जातोय्. युद्धभूमीवर सेनापतीला सारेच वीर सारखे असतात.'

त्याच वेळी मागून चक्रधर आला. तो वृषालीला म्हणाला,

'वहिनी, माझ्यावर लक्ष ठेवायला सांगा ना!'

वृषाली हसली. कर्णाकडे पाहत ती म्हणाली,

'मुळीच नाही. आज ते सेनापती आहेत. त्यांच्यावर लक्ष ठेवायला कुणी तरी तुमची जबाबदारी. त्यांच्यावर लक्ष ठेवा.'

'छान! माझ्यावर लक्ष ठेवायला योग्य निवड केलीस.' कर्ण म्हणाला, 'आता वेळ नको. दुर्योधनमहाराज माझी वाट पाहत असतील.'

वृषसेन मातृवंदन करण्यासाठी वाकला. वृषालीने अत्यंत प्रेमभराने वृषसेनाचे अवघ्राण केले. आपल्या डाव्या हातावर घेतलेला रक्तवर्णीय शेला उंचावला. ते पाहताच कर्णाने आपले हात वर घेतले. वृषालीने कर्णाच्या कटिप्रदेशावर शेला बांधला. डाव्या कमरेवर शेल्याची गाठ मारण्यात गुंतलेल्या वृषालीला कर्ण म्हणाला,

'रणांगणावर जाताना असले बंध चालत नाहीत. ऐनवेळी ते सुटता सुटत नाहीत.'

'त्यासाठीच तर हे बंध बांधलेले असतात.' वृषाली म्हणाली.

उत्तर देण्याच्या विचारात असलेला कर्ण थांबला. दुरून रणनौबतींचा गंभीर आवाज

कानांवर येत होता. रणभूमीचे दळ एकत्रित होण्याची ती खूण होती. वृषसेनाला खुणावून कर्ण पायऱ्या उतरला. दोघेही वीर आपापल्या रथावर आरूढ झाले. रथ चालू लागला. रथाला गती लाभली. रथांच्या चाकांच्या आवाजातून उठणारा टापांचा आवाज घुमू लागला.

प्रासादाच्या वरच्या पायरीवर असलेली वृषाली तो आवाज ऐकू येईनासा पसरलेल्या शांततेने भयाकुल झालेली वृषाली अश्रु टिपत प्रासादात निघून गेली.

कौरवशिबिरात सारे कर्णाची वाट पाहत असता, कर्ण-वृषसेनांचे रथ दौडत शिबिरावर आले. कर्णरथ पाहताच दुर्योधन आनंदाने कर्णाला सामोरा गेला. शिबिरात सैनापत्याचा अभिषेक करण्याची सर्व तयारी झाली होती. सर्व कौरवश्रेष्ठ तेथे उपस्थित होते. दुर्योधनाने रेशमी वस्त्रांनी आच्छादलेल्या आसनावर कर्णाला बसवले. कर्णावर यथासांग अभिषेक चालला. शेवटी दुर्योधनाने गव्याच्या व गेंडयाच्या, सुवर्णाने मढविलेल्या शिंगांतल्या अभिमंत्रित जलाचा शिडकावा कर्णाच्या मस्तकावर केला. तो अभिषेक होत असता कर्णाचे मन कृतज्ञतेने भरून आले. शस्त्रस्पर्धेच्या वेळी अपमान झाला असता, याच दुर्योधनाने कर्णाला अंगदेशाचा अभिषेक केला होता.

अभिषेक होताच कर्ण उठला. त्याने नम्र भावाने दुर्योधनाला वंदन केले. दुर्योधनाने त्याला मिठी मारली. दुर्योधन म्हणाला,

'मित्रा, तुझयामुळ मला विजरतची खात्री आहे.'

कर्ण सर्व वीरश्रेष्ठांसह रणांगणात गेला. नव्या सेनापतीला पाहायला उत्सुक असलेल्या सेनेने उत्साहभरित गगनभेदी जयघोष केला. सैन्याच्या अग्रभागी जाऊन कर्णाचा रथ उभा राहिला. कर्णरथाजवळ दुर्योधनरथ होता. कर्णाने सर्व श्रेष्ठांना रचनेच्या आज्ञा दिल्या. त्या आज्ञेनुसार सैन्यदळे आकार घेऊ लागली. कर्ण-दुर्योधन रथाखाली उतरून तो हेलावणारा दळसागर पाहत होते. त्याच वेळी दुर्योधनाचे लक्ष वृषसेनाकडे गेले. वृषसेन पुढे झाला. त्याने दुर्योधनला वंदन केले. दुर्योधनाने मोठया प्रेमाने वृषसेनाला जवळ घेतले.

'वृषसेना, सांभाळून बरं!' दुर्योधन म्हणाला.

'महाराज, आपल्या विजयासाठी मला प्राणांचं मोल वाटणार नाही.'

कर्ण अभिमानाने आपल्या पुत्राकडे पाहत असता, दुर्योधनाने आपल्या गळ्यातला मोत्यांचा सर काढून वृषसेनाच्या गळ्यात घातला, आशीर्वाद दिला,

'विजयी हो!'

वृषसेन कर्णाकडे वळला. त्याने कर्णाला वंदन केले.

कर्ण प्रतिबिंब निरखीत होता. ते रूप डोळ्यांत साठवीत होता. कर्ण स्थिर आवाजात म्हणाला,

'पुत्रा, तुझा पराक्रम लोकोत्तर ठरावा! जय-पराजय यांचं गणित वीर कधीही मनात बाळगीत नाहीत. पराभव झाला, तर तो अशाच्या हातून व्हावा की, ज्याच्या शौर्याला पृथ्वीतलावर तोड नसेल. ते यश तुला लाभावं, हा माझा तुला आशीर्वाद आहे.'

कर्णाचा आशीर्वाद घेऊन वृषसेन आपल्या रथासह आपल्या पथकाकडे निघून गेला. कर्ण रणभूमीकडे पाहत होता.

रणभूमीवर शेकडो रथांच्या अश्वाची खिकाळणी, अंबारी-हौद्यांनी सजलेल्पा हत्तींचे चीत्कार, हातांतल्पा खड़ाग, गदा, आदी शस्त्रांनी वीरश्रीला आह्वान करणारे दळातून

उठणारे आवाज यांनी रणभूमी जागी होत होती.

कर्ण, दुर्योधन रथारूढ झाले. हत्तींनी वेढलेल्पा राजगोटात दुर्योधनाचा रथ पोहोचवून कर्णाने सारथ्याला आपला रथ सैन्याच्या अग्रभागी न्यायला सांगितले.

सैन्याच्या अग्रभागी कर्णाचा सुवर्णशृंखलाचिह्न असलेला रथ उभा राहिला. पूर्व दिशेला प्रकाश उमटू लागला होता. क्षितिजकडा आरत बनल्या होत्या. निरनिराळ्या पथकांचे शंखनाद उमटत होते. कर्णाचे लक्ष समोर उभ्या असलेल्या पांडवसेनेकडे लागले होते. त्याच वेळी अर्जुनाचा कपिध्वजांकित रथ पांडवांच्या अग्रभागी दिसू लागला. त्या रथावर कर्णाची दृष्टी जडली. त्याला कृष्णाचा आशीर्वाद आठवला:

...कसल्याही जयपराजयानं तुझं पराक्रमी जीवन झाकाळलं जाणार नाही. ते तुझ्या पित्यासारखंच सदैव तेजस्वी राहील. त्या प्रकाशाला स्पर्श करण्याचं धाडस देवांनाही होणार नाही....

त्या कृष्ण-आठवणीनं कर्ण मोहरला. अर्जुनरथाकडे पाहत त्याने कृतज्ञतेने मान नमविली. चेहऱ्यावर स्मित उजळले. कर्णाची छाती विस्तारली गेली. त्याने मागे वळून पाहिले. पूर्वक्षितिजावर सूर्यबिंब उमटत होते. कर्णाने दोन्ही हात जोडून सूर्याला वंदन केले. रथात ठेवलेला विजयी शंख उचलला आणि दोन्ही हातांत तो सुवर्णमंडित शंख घेऊन मुखाला लावला. गाल फुगले. गळ्यातील शिर तणावली आणि एक दीर्घ नाद उमटला. कर्णाने त्रिवार शंखनाद दिला. शंख रथावर ठेवीत असतानाच पांडवांच्या बाजूने कृष्णाच्या पांचजन्य शंखाचे गंभीर उत्तर आले. कर्णाने हात उंचावला. त्याबरोबर संकेतबद्ध दळभार पुढे सरकू लागला. जयघोष करीत जाणारी सेना शत्रूला भिडली. उंटांवरून उठणारे रणनौबतींचे आवाज अखंड वाजू लागले. तुंबळ युद्धाला सुरुवात झाली.

कर्ण आपल्या रथातून ते युद्ध पाहत होता. त्याच्या रथ दळाला प्रोत्साहन देत युद्धातून फिरत होता. कर्णाच्या रथाबरोबर रथरक्षक धावत होते. कर्णाच्या चारी बाजूंनी आपापल्या रथात बसलेले चार वीर कर्णाच्या रथाबरोबर त्याचा मार्ग मोकळा करीत पुढे जात होते. कर्णाला आह्वान करणारा तुल्यबळ वीर समोर येताच कर्ण त्याच्याशी युद्ध करीत असे.

मध्याह्न टळत आली, तरी युद्धाचा निर्णय लागत नव्हता. त्याच वेळी एक तेजस्वी रथ कर्णाच्या दिशेने दौडत आला. क्षणभर अर्जुनरथ आला, की काय, असे कर्णाला वाटले. पण रथ दृष्टिपथात येताच कर्णाची दृष्टी रथाच्या ध्वजाकडे गेली. तेथे कपिध्वज नव्हता. ध्वजावर सुवर्णपुच्छ शरचिह होते. त्या रथात कर्णाला नकुलाचे दर्शन घडले. चंद्र प्रगटावा, तसे त्याचे रूप कर्णाला भासले. अत्यंत देखणा, रूपसंपन्न नकुल कर्णाकडे पाहत आपल्या रथावर उभा होता. त्याच्या रूपाने तेजस्वी बाण. रथामध्ये उभा असल्याचा भास कर्णाला झाला. नकुलाला टाळून जाण्याच्या विचारात कर्ण असतानाच नकुलाच शब्द त्याच्या कानांवर पडले,

'थांब, सूतपुत्रा! पळून जाऊ नकोस. हा मी तुझ्या समोर युद्धार्थ सिद्ध आहे. या सर्वनाशाचं, कलहाचं कारण तूच आहेच. हे अधमा, आज तुझा वध करून मी

कर्णाच्या चेहऱ्यांवर हसू उमटले. तो हसत म्हणाला,

'नकुला, राजपुत्राला शोभतील, असे तुझे उद्‌गार आहेत; पण नुसत्या बोलण्यानं योद्धा सिद्ध होत नाही. तू माझ्यावर प्रहार कर. तुझा पराक्रम पाहावा, अशीच माझी इच्छा आहे.'

कर्ण नकुलाचा मारा आपल्या बाणांनी माडून काढात होता. तवढ्यापुरताच तो प्रतिकार करात होता. नकुल त्या प्रातकारान संतापून आवगान प्रखर युद्ध करात होता. बराच वेळ कर्णाने ते युद्ध कौतुकाने चालवले, युद्धाला आवर घालण्यासाठी कर्णाने आपले धनुष्य वापरल. त्यान नकुलाच धनुष्य छदल. त्याचा ध्वज पाडला. नकुल हताश्व, विरथ व विगतकवच झाला. नकुलाला त्या परिस्थितीत काय करावे, हे क्षणभर कळेनासे झाले. रथावरून उडी टाकून तो पळू लागला. ते पाहून कर्णाने आपल्या रथातून उडी मारली आणि पळणाऱ्या नकुलाला गाठले. त्याच्या गळ्यात आपले धनुष्य अडकवून कणाने त्याची गती रोखली. पराजयाचा क्षोभ अनावर झालला, अपमानान थरथरू लागलला नकुल कर्ण पाहत होता. त्याच आरक्त बनलेले मुखकमल पाहून कर्णाला वाटले की, या आपल्या कनिष्ठ भ्रात्याला उराशी कवटाळावे. मायन त्याच्या पाठीवरून हात फिरवावा. कष्टाने त्या विचारापासून परावृत्त होत कर्ण म्हणाला,

'वीरश्रेष्ठा! भिऊ नकोस. माझं तुला अभय आहे. हे सुकुमारा! आपली कुवत लक्षात घेऊन वैरी पत्करावा. या भयाण रणांगणावर असा एकाकी फिरू नकोस. युद्धाची मौजच पाहायची असेल, तर तुझे भ्राते भीम, अर्जुन यांच्या निवाऱ्यान जा. सुखानं आपल्या शिबिरात परत जा.'

नकुलाच्या गळ्यात अडकवलेले आपले धनुष्य कर्णाने काढून घेतले आणि नकुलाच्या नेत्रांतले अश्रू पाहावे लागू नयेत, म्हणून तो माघारी रथाकडे वळला.

मध्याही उलटली होती. तळपत्या सूर्याचे तेज रणांगणाला आले होते. ते सूर्यास्तापर्यंत तसेच चालले.

सूर्यास्तानंतर कौरवशिबिरात कर्ण विसावला असता, दुर्योधन तेथे आला. त्याची मुद्रा चिंतेने व्यग्र बनली होती. युद्धात झालेल्या जखमांची त्याला जाणीव नव्हती. कर्णाला तो म्हणाला,

'मित्रा, हे रणांगण मला यशदायी वाटत नाही.'

त्या बोलण्याने सावध झालेल्या कर्णाने विचारले,

'का? आजचा माझा रणांगणावरचा पराक्रम सामान्य नव्हता. पांडवांच्या सेनेला माझं आजचं दर्शन निश्चित रुचल नसेल!"

'मी तुझ्या यशाबद्दल म्हणत नाही.'

'मग?'

'मित्रा, आज केवढी अपरिमित हानी झाली आहे, ते बघ ना! क्षेमधृतीचा भीमानं वध केला. सात्यकीनं विन्द अन् अनुविन्द यांना परलोकवास घडविला. चित्र आणि चित्रसेन धारातीर्थी पडले. आजच्या युद्धात अनेक वीर पडले. अनेक विद्ध झाले. नष्ट झालेल्या कवचांची अन् आयुधांची तर गणनाच करणं कठीण!'

'पण त्यात माझा काय दोष?' कर्णाने विचारले.

दुर्योधन खिन्नपणे हसला.

'कर्णा, दोष तुझा नाही, तर कुणाचा? तू सेनापती आहेस ना? रणांगणावरील प्रत्येक जयपराजयाला सेनापतीच जबाबदार असतो. यशाबरोबर पराजयाचं धनीपण त्याला स्वीकारावं लागतं.'

कर्ण काही बोलला नाही. दुर्योधनाच्या बोलण्यातील सत्य त्याला जाणवत होते.

दुर्योधन म्हणाला,

कर्णा, आज सोळा दिवस झाले. या सोळा दिवसांत आपल्या सेनेची अपरंपार हानी झाली. प्रत्येक दिवसाला असं बळ खचत चाललं, तर कठीण. मित्रा, शक्य तेवढ्या लौकर विजय आपल्या घरी येईल, असं काहीतरी करायला हवं. त्या अर्जुनाचा तू पराभव करशील, तर क्षणात सारं साध्य होईल.'

कर्ण त्या बोलण्यानं हसला.

'युवराज, त्याइतकी सोपी गोष्ट कुठली! अर्जुनाचा पराभव इतका सोपा आहे का?'

'मित्रा, तू हे बोलतोस? अरे, तूच तर अर्जुनवधाची प्रतिज्ञा करीत होतास ना?'

'हो; पण तो अर्जुन माझ्यासमोर येईल तर ना? तो कृष्ण सदैव माझ्यापासून अर्जुनाला दूर ठेवतो. त्या अर्जुनाची मला भीती वाटत नाही. शरीरबल, मानसबल आणि अस्रकौशल्य या गुणांत अर्जुन माझ्या तुल्यबळ नाही. अर्जुनाच्या गांडीव धनुष्यापेक्षाही श्रेष्ठ असं माझं विजयी धनुष्य आहे. भगवान परशुरामांचं ते धनुष्य. त्यांनीच मला आशीर्वादपूर्वक दिलंय्...'

'मग दुसरी कसली कमतरता?' आनंदाने दुर्योधनाने विचारले.

'फार मोठी कमतरता आहे. हे कौरवेश्वरा! श्रेष्ठ रथी नुसत्या आपल्या शस्त्रनैपुण्यावर जय मिळवीत नाहीत. तो जय प्राप्त करण्यासाठी तसाच श्रेष्ठ सारथी लागतो. कृष्णासारखा सर्वश्रेष्ठ सारथी अर्जुनाला लाभला आहे. तसा सारथी माझ्याजवळ नाही.'

'आपल्याजवळ कृष्णासारखा तुल्यबळ असा सारथी नाही?'

'आहे ना!'

'कोण??

मद्रराज शल्य! तो अजोड सारथी आहे. शल्यराज कृष्णाइतकाच अश्वावद्याकुशल आहे. तो माझं सारथ्य करील, तर तुझं मनोवांछित पूर्ण व्हायला फार अवधी लागणार नाही.'

दुर्योधन उत्साहाने उठला. तो कर्णाला म्हणाला,

'मित्रा, तू चिंता करू नकोस. उद्या शल्यराज तुझं सारथ्य करील.'

कर्ण त्यावर काही बोलला नाही.

कर्णाचा निरोप घेऊन शल्यनिवासस गाठण्यासाठी दुर्योधन रथारूढ झाला.

# ५१

**दु**सऱ्या दिवशी पहाटे कर्ण कौरवशिबिरात आला, तेव्हा दुर्योधन आनंदाने पुढे आला. 'कर्ण रथाखाली उतरताच तो म्हणाला,

'कर्णा, तुझं इच्छित सफल झालं.'

'कसलं?'

'मद्रराज शल्यांनी तुझं सारथ्य करण्यास मान्यता दिली आहे.'

'युवराज, आता माझ्या पराक्रमाबद्दल चिंता करू नका.'

'चल, कर्णा, मद्रराज तुझी वाट पाहत आहेत.'

कर्ण दुर्योधनासह शिबिरात प्रवेश करता झाला. आसनावर बसलेला मद्रराज उठलाही नाही. तो बसल्या आसनावरूनच कर्ण व दुर्योधन यांच्याकडे पाहत होता. कर्ण शल्याच्या समोर गेला.

'मद्रराज, अंगराज कर्ण आपल्याला वंदन करतोय्'

'सूतपुत्र राधेया, तुझा विजय असो.' शल्याने बसल्या जागेवरून कर्णाचे स्वागत केले.

कर्णाने दुर्योधनाकडे पाहिले.

कर्णाच्या चेहऱ्यावर उठलेला अपेक्षित संताप पाहून, आनंदाने शल्याने विचारले,

'राधेया, माझं संबोधन आवडलं नाही, वाटतं?'

शल्यराज! राधेय म्हणवून घेण्यात मी धन्यता मानतो; पण त्या नावानं हाक मारण्याचा अधिकार फार थोडयाना आहे. तेवढी जवळीक आपली नाही. तो आपला अधिकारही नाही.'

'ठीक! सूतपुत्र म्हणूनच यापुढं मी तुला हाक मारीन. झालं?'

'मी सूतपुत्र आहे, तसाच अंगदेशचा अधिपतीही आहे.'

'हं! अंगाराज! कर्णा, ती उपाधी आहे. राज्य देऊन कोणी राजा होत नसतं. तसं झालं, तर सारेच राजे होतील. कुलवंत होतील.'

'शल्यराज!' कर्ण खड्गावर हात ठेवीत म्हणाला,

शल्य आसनावरून एकदम उठला. कर्णाच्या दृष्टीला भिडवत तो म्हणाला,

'खड्गावरचा हात मागं घे! कर्णा, माझं सारथ्य हवं असेल, तर माझं अप्रिय बोलणं तुला ऐकून घ्यावंच लागेल. त्याच अटीवर मी तुझं सारथ्य मान्य केलं आहे. अन् लक्षात ठेव, शूद्रांच्या भावनेला मी किंमत देत नसतो.'

कर्णाने आश्चर्याने दुर्योधनाकडे पाहिले.

दुर्योधनाच्या डोळ्यांत आर्जव उमटले होते. तो म्हणाला,

'मित्रा, शल्यराज म्हणतात, ते खरं. माझ्यासाठी एवढं तू सहन कर. तुझ्या तुइया संतापाला माझ्यासाठी आवर घाल.'

कर्णाने आवंढा गिळला.

'ठीक आहे. ' कर्ण म्हणाला, शल्यराज, तुम्ही माझं सारथ्य करता, यात मला धन्यता

वाटते. कृष्णापेक्षाही श्रेष्ठ असलेल्या आपल्या सारथ्याचा अनुभव घेण्याला मी उत्सुक आहे. त्यासाठी मी आपली दूषणं भूषणावह मानीन.'

कर्ण, दुर्योधन, शल्य शिबिराबाहेर आले. कर्णासाठी शल्याने खरोखरच एक सुरेख रथ सिद्ध केला होता. तो रथ अवलोकन करून, महारथा कर्णाने रथाची पूजा करून, त्याला प्रदक्षिणा घातली. एकाग्र चित्ताने सूर्याचे स्मरण करून तो शल्यराजाला म्हणाला,

'शल्यराज, प्रथम आपण रथारूढ व्हावं.'

शल्याने दुर्योधनाकडे पाहिले. दुर्योधन शल्याला म्हणाला,

'हे मद्रेशा, कर्णाच्या दिव्य रथाचं तू सारथ्य कर. तुझं पाठबळ असेल, तर कर्ण धनंजयाला सहज जिंकील.'

दुर्योधनाची आज्ञा स्वीकारून शल्य रथावर आरूढ झाला. त्यापाठोपाठ कर्ण रथावर आरूढ झाला. शल्याने वेग हाती घेतले आणि रथ रणभूमीकडे चालू लागला. कर्ण स्तब्ध बसलेला पाहून शल्य मागे वळून म्हणाला,

हे सूतपुत्रा, युद्धाच्या कल्पनेनं घाबरला तर नाहीस? अद्याप सूर्योदयाला खूप अवधी आहे. तोवर निर्णय बदलला, तर सांग. मी तुला आनंदान शिबिरावर नेईन. त्यातच तुझ हित आहे.'

संयमपूर्वक कर्ण म्हणाला

'शल्यराज, आज रणांगणावर मी माझ्या धनुष्याला प्रत्यंचा जोडीन, तेव्हा तुला माझं शौर्य दिसेल. माझ्या दर्शनानं आज पांडव भयभीत झालेले तुलाच दिसतील. ते पाहीपर्यंत थोडी उसंत घे.'

त्या बोलण्याचा शल्यावर काहीच परिणाम झाला नाही. तो मोठ्याने हसला. कर्णाने विचारले,

'हसायला काय झालं? माझा पराक्रम सिद्ध करण्याइतपत निश्चित माझं बाहुबल आहे.'

राधेया, मृगेंद्राची आणि कोल्ह्याची गाठ पडल्यानंतर कोल्हा जिवंत सुटल्याचं मी ऐकलं नाही. महाधनुर्धर अर्जुन भेटेपर्यंत त्या वल्गना चालतील बरं!

शल्यराज, तुम्ही माझे सारथी आहात.'

'सारथ्य मी करतोच आहे.'

'अन् अपमानही!'

'त्या एकाच अटीवर मी सारथ्य स्वीकारलंय्.'

कर्ण उद्विग्नपणे हसला. न राहवून तो म्हणाला,

'आपण मद्रराज ना! त्या देशाच्या कीर्तीनुसारच आपण वागता आहात. ज्या देशामध्ये व्यसन श्रेष्ठ मानलं जातं, अनीती हीच नीती मानली जाते, पापाचरण हाच तिथला धर्म आहे, त्या मद्रदेशाचे आपण सुपुत्र. आपल्याकडून चांगल्या गोष्टींची अपेक्षा करणंच चूक,'

'तस नाही हं! काही बेला चांगल्या गोष्टीही मला सांगता येतात. एकदा समुद्रतीरावर एक संपत्र वैश्य राहत होता...'

'शल्यराज, मला कथा ऐकायची नाही. रथ हाका.'

'रथ नीट जाईल. त्याची चिंता नको. पण कथा तर ऐक.' शल्य सांगू लागला, 'त्या वैश्याच्या घराशेजारी असलेल्या एका झाडावर एक कावळा राहत होता. वैश्याघरचं

उच्छिष्ट खाऊन तो भलताच माजला होता. एकदा मानससरोवराकडं जाणारा एक हंस त्या झाडावर विसावला. त्या हंसाला पाहून वैश्यपुत्र थट्टेनं कावळ्याला म्हणाले,

“बाबा, रे! या हंसापेक्षा तूच आम्हांला श्रेष्ठ वाटतोस.’

‘परान्नावर वाढलेला तो मूख कावळा. त्याला ते खरंच वाटलं. त्यानं सरळ हंसाला उडडाणाचं आह्वान दिलं. हंस हसून म्हणाला,

“बाबा, रे! खरंच तू श्रेष्ठ आहेस. ते आम्हांला मान्य आहे.’

‘पण कावळा कुठलं ऐकायला! तो म्हणाला,

“ते उड्डाणानंच सिद्ध झाल पाहिजे.’

‘कावळ्याच्या मूर्ख आग्रहास्तव हंसानं पंख पसरले अन् आकाशात झेप घेतली. कावळा त्याच्या पुढं नाना तऱ्हांनी उडू लागला. हंस राजगतीनं उड्डाण करीत होता. पुढं समुद्र लागला. समुद्राचा काठ दिसेनासा झाला. कावळ्याच्या पंखांतलं त्राण कमी होत होतं. लाटांवर हेलावणारा तो सागर पाहून त्याचं बळ खचत होतं. शेवटी कावळा अगदी पाण्याच्या पृष्टभागावरून थकलेले पंख फडफडवीत जाऊ लागला. हंसानं विचारलं,

‘कावळ्या, तू अनेक उडडाणं दाखवलीस; पण या उडडाणाचं नाव नाही सांगितलंस. असं पंखांनी पाणी फडफडवीत पाण्यावरून चालल्यासारखं उडडाण करणं अलौकिक आहे. या उडडाणाचं नाव काय?’

‘कावळा प्राणभयानं म्हणाला

"हे उड्डाण नाही. ही माझी दैवगती आहे. माझ्या मृत्यूनंच माझ्या पापाचं प्रायश्चित मला घडेल.’

‘हंसाला कावळ्याची दया आली. आपल्या पंखावर कावळ्याला घेऊन हंसाने त्याला परत त्याच्टत ठिकाणी आणून सोडल.

‘कथा संपवून शल्य म्हणाला,

‘कौरवांच्या अन्नावर वाढलेला तू कावळा. तुला ही कथा सांगणं आवश्यक होतं.

‘शल्यराज! हंस ते, की, जे बुडणाऱ्याला आपल्या पंखांवर तोलतात. पैलतारावर नऊन सुराक्षत पोहचवितात आपल्या म्हणण्याप्रमाणे मी कावळा असेनही; पण त्याचबरोबर बुडत असलेल्याला वाचविणारा हंस मला दिसत नाही.’

कर्णाचा रथ युद्धभूमीवर आला. तेव्हा, वृषसेन-चक्रधरांनी त्याचे स्वागत केले. कर्णाचा आशीर्वाद घेऊन वृषसेन आपल्या गोटाकडे चक्रधरासह गेला. पूर्वेला उजाडू लागले होते. कर्णाने सेनेची पाहणी केली. तोवर तेथे दुर्योधन येऊन पोहोचला. सूर्योदयाबरोबरच कर्णाने युद्धाला सुरुवात केली. कर्णाचा रथ आपल्या सेनेला आपला पराक्रम दाखवून उत्साहभरित करीत रणांगणावर संचार करीत होता. त्याच्या रूपाने रणांगणावर सूर्य प्रकटल्याचे भासत होते.

अचानक शल्यराजाने रथाला गती दिली. रथ भरधाव सुटला. शल्याने रथ त्वरेने का हाकारला, याचा विचार करणाऱ्या कर्णाला त्याचे उत्तर गवसले. त्याच्यासमोर युधिष्ठिराचा रथ येत होता. शल्याने त्या रथासमोर आपला रथ थांबवला. युधिष्ठिराच्या सुवर्णमय ध्वजावर नंद-उपनंद नावाचे दोन मृदंग लावलेले दिसत होते. युधिष्ठिराकडे बोट दाखवीत शल्य म्हणाला,

‘कर्णा, हा बघ प्रथम पांडव. ज्येष्ठ कौंतेय...’

कर्णाच्या मुखावर स्मित उमटले.

तो प्रथम पांडव ...ज्येष्ठ कौंतेय .मग मी कोण?

कर्ण शल्याला म्हणाला,

'शल्यराज, रथ वळवा. मला याच्याशी युद्ध करायचं नाही. मला फक्त अर्जुन हवा.'

'राधेया! या युधिष्ठिराला पाहून...'

पण शल्याला पुढं बोलायला अवसर मिळाला नाही. एक बाण घोंगावत आला आणि जेथे कर्णाचा हात रथाच्या कडेवर विसावला होता, त्यापासून थोडया अंतरावर रुतून बसला. कर्णाने संतापाने पाहिले. युधिष्ठिर प्रत्यंचेला दुसरा बाण जोडीत होता. कर्णाची नजर वळताच तो उच्चरवाने म्हणाला,

'सूतपुत्रा कर्णा, मी तुलाच पाहत होतो. आज तुझा वध करून तुझी युद्धपिपासा मी नष्ट करीन. युद्धाला तयार हो '

युधिष्ठिराच्या शरवर्षावाला कर्ण सहजपणे उत्तर देत होता. बराच वेळ दोन्ही वीर एकमेकांना पराभूत करण्यासाठी झुंजले.

शेवटी कर्णाने युधिष्ठिराचे धनुष्य तोडले. त्याचे रक्षक मारले, सारथी मारला आणि युधिष्ठिराचा रथ उद्ध्वस्त केला.

त्या कर्णपराक्रमाने भ्यालेला युधिष्ठिर नजीक आलेल्या दुसऱ्या रथाच्या आश्रयाने पळून जाऊ लागलेला पाहताच कर्ण त्वरेने धावत जाऊन त्या रथावर चढला. युधिष्ठिराच्या खांद्यावर हात ठेवीत तो म्हणाला,

'युधिष्ठिरा! निश्चिंत मनानं परत जा. ही युद्धभूमी आहे. द्यूतपटाइतकी ती सोपी नाही. रण हे तुझं क्षेत्र नव्हे. परत या युद्धभूमीवर पाऊल टाकू नकोस. टाकलंस, तरी माझ्यासमोर येऊ नकोस.'

कर्ण समाधानाने रथातून उतरला आणि परत आपल्या रथावर चढला.

कर्णपराक्रमाने चकित झालेल्या शल्याने विचारले,

'कर्णा, अरे, त्या युधिष्ठिराला सोडलंस, तेच बरं केलंस! तू त्याला सोडशील, अस वाटल नव्हत.'

'शल्यराज मी कावळा नाही राजहंस आहे असं मला वाटू लागलंय् शल्यराज, अर्जुनाचा रथ गाठू दे. त्या रथाला भिडण्यासाठी माझा जीव उतावीळ झालाय्.'

मध्याह्न उलटली, तरी रणांगण तसेच चालू होते. कर्णपराक्रमाने पांडवसेना अस्थिर बनली होती. युद्धाचा निर्णय लागत नव्हता. असंख्य वीरांच्या विखुरलेल्या प्रेतांतूल युद्धाचा धुमळा चालू होता. रथांच्या आणि बाणांच्या आवाजानी कान बधिर होत होते. हत्तींच्या पायांनी भूमी कंप पावत होती. कपिध्वजांकित अर्जुनरथ शोधीत असता कर्णाचा रथ थबकला. मध्याह्न टळत आली होती. गदाचिह्न धारण केलेला भीमाचा रथ समोर येताना दिसला. ते पाहताच कर्ण शल्यराजाला म्हणाला,

शल्यराज, भीम चालून येतोय्, आपला रथ बगल देऊन बाजूला काढा.'

'भीमापुढं निभाव लागणार नाही, म्हणून?'

त्याचं नाव कशाला घेतोस? भीमाच्या दर्शनानं एवढं गर्भगळीत व्हायला होतं, तर अर्जुनाचं नाव घेतोस कशाला?'

'शल्यराज, ते क्षणभर गृहीत धरा; पण त्याचबरोबर आपण माझं सारथ्य करीत आहा, हे कृपा करून विसरू नका. रथ बाजूला घ्या.'

शल्याने रथ वळवला. कर्णाचा रथ वळत आहे, हे पाहताच भीमाने आपल्या सारथ्याला सावध केले. भीमाच्या रथाला गती लाभली आणि भीमरथ कर्णाच्या

'कर्णा, भिऊन पळून जात होतास? अरे, कौरवांचा सेनापती ना तू!'

कर्णाने तशा स्थितीत एक श्वास सोडला. कर्ण भीमाला पाहत होता.

ज्याचे बाहू स्फुरण पावत आहेत, वीरश्रीने ज्याच्या चेहऱ्यावरचे तेज शतपटींनी वाढले आहे, असा तो शक्तिशाली भीम पाहून कर्णाचे नेत्र तृप्त झाले. त्याचे कवच रुधिराने डागळले होते. नेत्र आरत बनले होते. दाट वनातून मत गजराज वृक्षशाखा मोडीत बाहेर यावा, तसा तो रणांगणावर भासत होता.

द्रौपदीवस्त्रहरणाच्या वेळी प्रतिज्ञाबद्ध हाणारा हाच एक पांडव. द्रुपदाच्या शीलरक्षणार्थ यानेच कीचकाचा वध केला. भीमाचे दर्शन म्हणजे साक्षात पुरुषार्थाचे दर्शन, असे कर्णाला वाटले.

कानाजवळून घोंगावत गेलेल्या बाणाने कर्ण भानावर आला. त्यान पाहल, भीम शरवर्षाव करीत होता. कर्णाने आपल्या बाणांना हात घातला. भीम-कर्ण प्राणपणाने लढू लागले. जणू रणभूमीवर साक्षात अग्नी आणि सूर्यच प्रगटले होते. कर्ण प्रतिकारापुरतेच बळ वापरीत होता; पण भीम प्राणपणाने लढत होता. भीमाच्या आघातांनी कर्ण थकत होता. भीमाला कसा आवर घालावा, हेच कर्णाला कळत नव्हते. कर्णा थकत आहे, हे ध्यानी येऊन भीम अधिक उत्साहभरित होऊन लढत होता. एक उग्र बाणा सणसणत आला आणि कर्णाच्या खांद्यात रुतला. त्या वदनेने कासावास हाऊन कर्णाने रथाच्या हस्तकक्षाचा आधार घेतला. शल्य चिंतातुर होऊन म्हणाला,

'कर्णा, रथ माघारी नेऊ?'

आपल्या डाव्या हातान रुतलला बाणा काढत कर्ण म्हणाला,

'नको! साऱ्याच इच्छा सफल होतात, असं नाही. या भीमाच्याच हातून ते होणार असेल, तर होऊ दे.'

कर्णाने आपले धनुष्य उचलले आणि परत युद्धाला सुरुवात केली. त्याच वेळी मध्याही टळू लागलला होती. 'मामाला आवर घालण्यासाठी कर्ण आपल्या प्रत्यंचला हात लावीत असतानाच त्याच्या कानांवर हाक आली,

'मित्रा, अंगराज...'

युद्धाच्या कोलाहलातून उठलेली ती आर्त हाक ऐकून कर्णाने मागे वळून पाहिले. दूरवरून चक्रधर हात उंचावून येत होता. चालताना अडखळत होता, आपला रथ सोडून पायी येणारा चक्रधर दिसताच कर्ण शल्याला म्हणाला,

'शल्यराज, रथ वळवा.'

'हौस फिटली?"

'शल्यराज, तू माझा सारथी आहेस. मी सेनापती आहे. मुकाटयानं रथ वळवा.'

कर्णाचे ते उग्र रूप पाहून शल्याने रथ वळवला. रथ वळलेला पाहताच भीमाने आवाज टाकला,

'भ्याडा! रणातून पळून जातोस?'

उद्विग्नपणे हसून कर्णाने उत्तर दिले,

'आपल्यासारख्या पराक्रम योद्धयासमोर कोण टिकेल?'

भीम काय म्हणाला, ते कर्णाला ऐकू आले नाही. रथ वळला होता.

चक्रधर जवळ येताच कर्णाने रथ थांबवला. रथाखाली उडी टाकून तो धावत चक्रधराकडे गेला. चक्रधराच्या चेहऱ्यावर वेदना प्रगटली होती. त्याच्याजवळ जात कर्णाने विचारले,

'मित्रा...'

'अंगराज, दुःशासनाचा वध झाला.'

'कुणी केला?'

'ज्याच्याशी युद्ध करीत होतास, तोच भीम. दुःशासनाचा वध करूनच तो आला होता.'

'ते सांगण्यासाठीच आलास? अन् तुझा रथ कुठय्?'

'आहे तिकडं, मित्रा, दुःशासनाचा वध विचित्रपणे झाला.'

'बोल!'

'दुःशासन भीमाच्या गदाप्रहारानं रणांगणावर पडला असता, भीम त्याच्याजवळ गेला, अत्यंत विकल अवस्थेत पडलेल्या दुःशासनाला 'द्रौपदीच्या वस्त्राला कोणत्या हातानं स्पर्श केलास' म्हणून विचारलं. त्या प्रश्नानं सावध झालेल्या दुःशासनानं तशा स्थितीतही आपला उजवा हात उंचावला अन् म्हणाला,

"हाच तो हात! भीमा, हाच तो हात, की ज्या हातानं मी सहस्र गाईंचं दान केलंय्. हाच तो हात की, ज्यानं खड्गच पेललं. रमणींच्या वक्षस्थळांना स्पर्शलं. याच हातानं याज्ञसेनीचे केस मी तुम्हां सर्वांदेखत ओढले. नाही, भीमा, या हातांनी कधीही परघरच्या उच्छिष्टांनी लिप्त झालेली पात्रं विसळली नाहीत. हाच तो विजयी हात!'

'दुःशासनाच्या उत्तरानं अधिकच क्रोधिष्ट झालेल्या भीमानं दुःशासनाच्या छातीवर पाय देऊन तो उंचावलेला हात आपल्या बळानं उखडून काढला अन् छातीवर बसून आपल्या नखांनी दुःशासनाचं वक्षस्थळ विदारून सर्व वीरांदेखत भीम त्याचं रक्त प्याला.'

कर्णाच्या अंगावर शहारे आले.

'मित्रा, जातो मी...' म्हणत चक्रधराने पाठ फिरवली अन् कर्णाचे नेत्र उभ्या जागी विस्फारले गेले- चक्रधराच्या पाठीत उभी कुऱ्हाड रुतली होती. चक्रधराने चार पावले टाकली आणि तो पालथा पडला. कर्ण धावला. चक्रधराला आपल्या हातांनी सावरीत तो ओरडला,

'मित्रा, हा पाठीत वार कुणी केला?'

चक्रधराने डोळे उघडले. त्याच्या चेहऱ्यावर हसू उमटले.

'दुःशासनाला वीरशय्या देत होतो. त्याच्यावर शेला झाकीत असता कुणीतरी मागून हा वार केला. कर्णा, हे रणांगण खरं नाही. इथं धर्माला, नीतीला अवसर नाही. इथं धर्माची वल्गना चालते. कृती अधर्माचीच असते. भीष्म द्रोण, साऱ्यांची कथा तीच. या रणभूमीत तुला यश नाही. मित्रा, सावध राहा. जप. मी जातो.'

बोलता-बोलता चक्रधराचा मान कर्णाच्या मांडीवरून कलंडली. कर्णाला श्वस घेणेसुद्धा जड वाटत होते. डोळ्यांत भरलेल्या अश्रूमुळे चक्रधर दिसत नव्हता. कर्णाने डोळे पुसल. तो सावकाश उठला. चक्रधराकडे पाहत त्याने आपल्य कमरेचा शाला

काढला. तो चक्रधरावर झाकून, कर्ण आपल्या रथाकड आला. रथावर चढत तो म्हणाला,

‘शल्यराज! या रणभूमीपासून रथ दूर न्या. निदान या क्षणी तरी मला या रणभूमीकडे पाहवणार नाही.

'शल्याने कर्णाचा रथ सरळ शिबिराकडे नेला.

# ५२

कर्णाचा रथ रणभूमीतून शिबिराकडे गेला, हे कळताच दुर्योधन शिबिराकडे आला. कर्ण मंचकावर विसावला होता. शिरस्त्राण बाजूला ठेवले होते. मंचकावर मस्तक ठेवून, डोळे मिटून कर्ण बसला होता. शिबिरात प्रवेश करताच दुर्योधन म्हणाला,

'मित्रा, तू घायाळ होऊन आलास, असं कळलं, म्हणून मी आलो.'

'नाही, युवराज. मी ठीक आहे. थोडा थकलोय् एवढंच.'

कर्णाच्या दंडावरच्या घावाकड पाहत दुर्योधन म्हणाला,

'निदान लेपण तरी करून घ्यायचं होतंस.'

'सारेच घाव लेपणानं बरे होत नसतात, युवराज. काही घाव आयुष्याच्या अखेरपर्यंत तसेच राहतात.'

'अंगराज, काल नकुल तुझ्या हाती सापडला होता?'

'हो'

'अन् त्याला सोडून दिलंस?'

'हो'

'आज युधिष्ठिर तुझ्या हाती मिळाला होता, म्हणे!'

'हो'

'त्यालाही सोडून दिलंस!'

'हो'

'भीमानं तुझा पराभव केला?'

'हो'

दुर्योधनाचा संताप प्रगट झाला.

'हो काय? कर्णा, शत्रू हाती सापडतो अन् तू त्याला सोडून देतोस?'

'त्यांना मारून का युद्ध थांबणार होतं?'

'मारून नाही. जिवंत पकडून.' दुर्योधन म्हणाला, 'कर्णा, द्रोणाचार्यांना मी एकच विनंती केली होती. मला युधिष्ठिर हवा होता. जे आचार्यांना जमलं नाही, ते तू केलं होतंस. मला युधिष्ठिर हवा होता, हे माहीत असूनही तू त्याला सोडून दिलंस'

'तो तुझ्या हाती मिळाला असता, तर युद्ध कसं संपलं असतं?' कर्णाने विचारले.

'निश्चित संपलं असतं.' दुर्योधन म्हणाला, 'कर्णा, या रणात यश नाही, हे मला स्पष्ट दिसू लागलंय्. तो युधिष्ठिर सापडला असता, तर मी त्याला परत द्यूताचं आह्वान दिलं असतं. त्या द्यूतलंपटानं ते मान्य केलं असतं. द्यूतातला विजय आमचा होता. पांडव परत वनवासाला गेले असते.'

दुर्योधनाचे ते भाषण ऐकून कर्णाला हसू आवरले नाही.

दुर्योधनाने रागाने विचारले,

'का? खोटं वाटतं? शकुनींच्या साहाय्यानं...'

'युवराज!' कर्ण थकल्या आवाजात म्हणाला, 'एका द्युताचा केवढा भयानक परिणाम

झाला, ते पाहत असता दुसऱ्या द्युताचं स्वप्न बाळगता? पांडव वनवास भोगायला जातील आणि बारा वर्षांनी परत हेच रण उभं राहील; पण ते झुंजायला एक माणूस तरी राहील का?'

'त्याची मला पर्वा नाही. पृथ्वीतलावर त्या वेळी दोनच जीव असले, तरी चालतील, एक मी आणि दुसरा युधिष्ठिर. त्यासाठी पृथ्वीनाश उभारण्याची माझी तयारी आहे.'

'युवराज, तुम्हांला या युद्धातून हवं तरी काय?' कुरूंचा सेनापती हे विचारतो? अंगराज, मला विजय हवा. निखळ विजय हवा.' दुर्योधनाने उसंत घेतली. 'पण तो विजय तुमच्या हातून मिळेल, असं वाटत नाही.'

'युवराज, माझ्या निष्ठेवर तुमचा भरवसा नसेल, तर हे सेनापतिपद तुम्ही दुसऱ्यांला द्या. मी त्यात अपमान मानणार नाही.'

'मित्रा!'

'मी रागानं म्हणत नाही. युवराज, मी पितामहांसारखा क्षत्रिय थोडाच आहे, की ज्यानं शस्त्रसंन्यास घ्या, म्हणताच अपमान मानावा! बोलूनचालून मी सूतपुत्र. तुमच्या विजयासाठी मी हवं ते सोशीन. अखेरपर्यंत कुणाच्याही हाताखाली तुमच्यासाठी लढेन. लढता-लढता मरून जाईन.'

दुर्योधन त्या शब्दांनी गहिवरला. कर्णाला मिठी मारीत तो म्हणाला,

'असं बोलू नकोस, मित्रा. निदान तू तरी बोलू नकोस. तुझ्याविना आलेल्पा विजयापेक्षा तुझ्यासह मी आनंदानं पराभव स्वीकारीन तुला वगळून मला काणत्याच विजयाचं मोल नाही.'

कर्णाच्या मिठातून बाजूला होत दुर्योधन वळला. जाता-जाता म्हणाला,

'तू विश्रांती घे. मी रणभूमीवर जातो.'

दुर्योधन गेला. कर्णाने आपला किराट उचलला. शाल्याला तो म्हणाला,

'शल्यराज, चला!'

'राधेया! हवी तर विश्रांती घे!'

'आता विश्रांतीला थारा नाही. रणभूमीखेरीज ती इतरत्र लाभायचीही नाही.'

कर्ण, शल्य रथारूढ होऊन, चाललेल्पा युद्धात सामील इतले. कर्ण अर्जुनरथ शोधीत होता. पण त्या रणधुमाळीत अर्जुनरथ दृष्टीस पडत नव्हता. सूर्य पश्चिमेकडे झुकला असता कर्णरथाला एक रथ येऊन भिडला. कर्णाने पाहिले, तो अश्वत्थामा आला होता. तो उच्च रवाने म्हणाला,

'कर्णा, उत्तर दिशेला तुझ्या पुत्राला अर्जूनानं गाठलंय्.

दिवसभर कर्ण ज्याचा शोध घेत होता, तो अर्जुन उत्तरेला वृषसेनाला भिडला होता.अद्यापि सूर्यास्ताला बराच अवधी होता. कर्णाने अर्जुनाचा रथ गाठण्याचा आज्ञा शल्याला केली.

शल्यराजाने तत्परतेने रथ वळवला.

कर्णाचा रथ भर वेगाने दौड़त होता. रणांगणावरून गडगडाट करीत वायुवेगाने येणारा रथ पाहून युद्धामध्ये गुंतलेले वीर क्षणभर युद्ध विसरून भावचकित मुद्रेने त्या रथाला वाट करून देऊन आपले प्राण रक्षण करीत होते. कर्णाची दृष्टी युद्धक्षेत्रावरून फिरत होती. अर्जुनरथाचा कपिध्वज दिसू लागला.

अर्जुनाने आपल्या रक्षकदळासह वृषसेनाला वेढले होते. वृषसेनाने नुकताच पराभव

केला होता. त्या युद्धात जखमी, घायाळ झालेला वृषसेन जखमांची क्षिती न बाळगता आवेशाने अर्जुनाबरोबर लढत होता. कर्ण तेथे पोहोचला, तेव्हा वृषसेन आपल्या भात्यातला बाण खेचीत होता. वृषसेनाचे लक्ष क्षणभर पित्याकड गेले. त्याच्या चेहऱ्यावर स्मित उमटले. वृषसेन आपल्या प्रत्यंचेला बाणा जोडीत असतानाच आकर्ण प्रत्यंचा खेचलेल्या अर्जुनाचे शब्द कर्णाच्या कानांवर आले,

'राधेया, योग्य वेळी आलास. मी उपस्थित नसता, तुम्ही सहा वीरांनी माझा अभिमन्यू मारला. आज मी तुझ्या पुत्राचा वध करतो, बघ. सामर्थ्य असेल, तर वाचव त्याला.'

त्या शब्दाबरोबरच तो अघोरी बाण अर्जुनाच्या धनुष्यातून सुटला होता. कर्णाच्या विचाराला अवधी मिळण्याआधीच त्या बाणाने आपले लक्षय अचूक टिपले होते. बाणाच्या झोताबरोबरच, प्राजक्ताचे फूल गिरक्या घेत भूमीवर उतरावे, तसा सुकुमार वृषसेन रथाखाली ढासळला.

कर्णाच्या जीवाचा थरकाप झाला. कर्णाने रथाखाली उडी घेतली. तो धावत पुत्राजवळ गेला. वृषसेनाने जगाचा केव्हाच निरोप घेतला होता. त्याच्या नाजूक कंठातून आरपार गेलेल्या बाणाच्या पात्यावरून रक्ताचे थेंब धरतीवर पडत होते. रक्षणार्थ धावून आलेल्या पित्याला पाहून चेहऱ्यावरचे उमटलेले हास्य तसेच होते. त्या बाणाने वृषसेनाच्या गळ्यातला मोत्याचा सर छेदला होता. मोती ओघळले होते. कर्ण भानविरहित होऊन ते पाहत होता. एका जातिवंत तेजस्वी मोत्याला वेज पडले होते. आता कोणत्याही प्रयत्नाने ते लहान होणार नव्हते.

कर्णाने कंपित बोटांनी वृषसेनाचे उघडे डोळे मिटले. आता वृषसेन झोपी गेल्यासारखा भासत होता. कुठल्यातरी स्वप्नात तो गुरफटला होता, त्या चिरविश्रांतीतून त्याला जागे करणे पाप होते.

कर्णाच्या मागे पावलांचा आवाज येत होता; पण कर्णाने मागे वळून पाहिले नाही. पेटती लाख जळत ओघळवी, तसे शब्द कानांवर आले,

'पुत्रवियोगाचं दु:ख एवढं वाटतं? अभिमन्यूच्या वेळी मझ्या कोण यातना झाल्या असतील, हे आज तुला कळेल. माझ्या कोवळ्या मुलाचा निर्घृण वध करण्याआधी विवेक सुचला असता, तर आज तुझ्यावर ही पाळी आली नसती. आज मी पुत्रवधाचा सूड उगवून कृतार्थ झालोय्.'

वृषसेनाच्या मृत्यूने डोळ्यांत गोळा झालेले अश्रु त्या शब्दांच्या दाहात कुठच्या कुठे आटून गेले. त्याने संतापाने वळून पाहिले. त्या आरक्त विशाल नेत्रांत प्रज्वलित झालेली आग अर्जुनाला जाणवली. कर्णाने कृष्णाकडे पाहिले. कृष्ण रथात अधोवदन बसून होता. तशा परिस्थितीतही कर्णाच्या चेहऱ्यावर कटू हास्य प्रगटले. उभ्या धनुष्याला उजवा हात विसावून पराक्रमाच्या अहंकाराने उभ्या राहिलेल्या अर्जुनाला कर्ण म्हणाला,

'अर्जुना, कृतार्थ तू नाहीस. आज कृतार्थ मी झालो. आज माझ्या मुलाचा वध करून तू सूड उगवला नाहीस, उलट, मला उपकारबद्ध केलंयस. त्याबद्दल तुझा मी ऋणी आहे. बालवयाचं कौतुक घरी करायचं- रणांगणावर पाठवण्याआधी. रणांगण बालवयाचा, तारुण्याचा, वार्धक्याचा कधीच विचार करीत नाही. ते फक्त शत्रूहातचं खड्ग जाणतं. माझ्या मुलाचं कोवळं वय लक्षात घेऊन तू त्याला सोडून दिलं असतंस, तर या कर्णाला

या पृथ्वीतलावर उभं राहायला जागा मिळाली नसती. माझ्या मुलाला स्वर्गाचं द्वार कधीही उघडलं नसतं. मी आज तुझा उपकृत आहे.'

अर्जुनाच्या चेहऱ्यावर उमटलेला आश्चर्यभाव पाहून कर्ण उदासपणे हसला,

'जा, अर्जुना! मी काय म्हणतो, ते तुला समजायचं नाही. ते तू तुझं सारथ्य करणाऱ्या कृष्णाला विचार. तो तुला नीट समजावून देईल.'

वृषसेनाकडे दृष्टी वळवीत कर्ण अर्जुनाला म्हणाला,

'जा, अर्जुना! जा! उद्या निर्णायक युद्ध होईल. तोवर उसंत घे. आज खूप पराक्रम केलाय्स, जा!'

वृषसेनावरची आपली दृष्टी ढळू न देता कर्णाने त्याचा शेला अलगद काढला. वृषसेनाचे पडलल धनुष्य त्याच्या नजाक ठेवले. मुलावर शेला झाकात असता कर्णाचे हात थांबले. थरथरत्या हाताने कर्णाने वृषसेनाच्या मस्तकावरून हात फिरविला. कष्टाने मन आवरात त्याणे पुत्राचे अखेरचे दर्शन घेतले आणि शेला झाकला. साकळलेले अश्रु निपटल. रथाकड जात असता वृषसेनाचे पडलेले शिरस्राण दिसले. ते शिरस्राण उचलून घेऊन कर्ण रथारूढ झाला. कष्टाने म्हणाला,

'शिबिर...?'

सूर्यबिंब अस्ताचलाला गेले होते. क्षितिजावर अनेक रंगांची दीप्ती रेंगाळत होती.

रणांगणावर युद्ध संपल्याच्या नौबती झडत होत्या.

शिबिरावर जाताच शल्यराज रथातून उतरला. कर्णाच्या सारथ्याने रथाचा ताबा घेतला. कर्ण काही न बालता डाव्या हातान शिरस्त्राण छातीशी कवटाळून उजवा हात रथाच्या हस्तिकक्षेवर ठेवून रथात उभा होता. शल्यराजाला राहवले नाही. शाक्रमग्र अवस्थत उभ्या असलेल्या कर्णाच्या उजव्या हातावर शल्याने हात ठेवला. कर्णाने शल्याकडे शल्यराज गाहवरल्या आवाजात म्हणाला,

'राधेया! माणसानं एवढं सोसू नये.'

'शल्यराज! काही माणासं परनिंदेसाठीच जन्माला आलला असतात. तशाच काही नुसतं सोसण्यासाठीच जन्मलेली असतात. माझ्या दैवी तेवढंच आहे. तेवढंच! सारथी ऽ ऽ'

शल्याचा हात मागे आला. रथ कर्णनिवासाकडे जात होता. कर्णरथामागून ध्वजहीन धावणाऱ्या रथाकडे कर्णाचे लक्ष नव्हते.

# ५३

संध्याच्छायेतून कर्णाचा रथ निवासाकडे जात होता. कर्णाचे लक्ष कुठेच नव्हते. आपल्या दु:खाला आवर घालण्याचा प्रयत्न करीत तो रथात उभा होता.

अचानक रथ थांबला. कर्णाने विचारले,

'रथ का थांबला?'

मागे पाहत सारथी म्हणाला,

'मागून रथ येतोय्.'

कर्णाने मागे पाहिले.

पाठीमागे वृषसेनाचा रथ होता. त्यामागून तिसरा रथ येताना दिसत होता. वृषसेनाच्या रथाला बगल देऊन तो रथ पुढे आला. दुर्योधनाचा रथ ओळखताच कर्ण रथाखाली उतरला. दुर्योधन रथातून उतरलेला पाहताच कर्णाच्या मनाचे बांध फुटले. कर्णाचे एवढे विकल रूप दुर्योधनाने केव्हाही पाहिले नव्हते. त्याने कर्णाला जवळ घेतले. भरल्या आवाजात दुर्योधन म्हणाला,

'कर्णा, शिबिरावर येताच ते कळलं. तोवर तू शिबिर सोडलं होतंस. राहवलं नाही, म्हणून धावत आलो. त्या अर्जुनाला प्रायश्चित जरूर भोगावं लागेल.'

दुर्योधनमिठीतून दूर होत कर्ण म्हणाला,

'युवराज, माझ्या मनात सूड नाही. मृत्यू टळतो कुणाला? जन्माबरोबरच त्याची गाठ मारलेली असते. वृषसेनानं कृतार्थ मृत्यू मिळवला आहे. योद्धयाला त्यापेक्षा श्रेष्ठ मरण नाही. युवराज, वृषसेन गेला, त्याचं दु:ख मला नाही; पण त्याचबरोबर माझ्या जीवनाचा मृत्यू झाला, त्याचं दु:ख आहे.'

'तुझा मृत्यू?..'

'हो, युवराज! मुलं ही आपला वारसा. त्यांच्या रूपानं आपलं जीवन पुढं जात असतं. आपलं जीवन संपलं, तरी आपल्या पाठीमागंही आपलं जीवन अखंड चालणार आहे, याची जाणीव मृत्यूचं अस्तित्व विसरायला लावते. वृषसेनाच्या मृत्यूनं तो जीवनप्रवाह खंडित झाला, याची वेदना मोठी आहे. एक वेळ मी गेलो असतो, तरी चाललं असतं, पण तो राहायला हवा होता.'

अंधार दाट बनत होता.

कर्ण दुर्योधनाला म्हणाला,

'युवराज, रात्र होत आहे आपण शिबिरावर चला. युवराजांनी रात्रीअपरात्री युद्धभूमीवर वावरू नये.'

'मी तुला पोहोचवायला येईन.'

'नको! वृषालीसमोर मी एकटा जाणंच इष्ट. उद्या निर्णायक युद्ध होईल. मित्रा, उद्या हे भयानक युद्ध संपून जाईल.'

'खरं?'

'हो! उद्या संपायलाच हवं.'

दुर्योधनाने कर्णाचा निरोप घेतला. कर्ण आपल्या रथातून निवासाकडे जात होता. त्याच्या डोळ्यांसमोर वृषाली दिसत होती. ती वार्ता सांगायला घरी जाण्यापेक्षा हा रथ घेऊन असेच कुठेतरी दूर निघून जावे, असे कर्णाला वाटत होते.

रथ थांबला, कर्णाने पाहिले. निवासाच्या प्रवेशद्वाराच्या वरच्या पायरीवर वृषाली उभी होती. कर्ण रथाखाली उतरला. वृषालीकडे पाहावयाचा धीर त्याला होत नव्हता. वृषाली कर्णाकडे पाहत होती. पायऱ्या चढत येणाऱ्या कर्णाकडे पाहत असता त्याच्या कमरेला शेला नाही, हे वृषालीच्या ध्यानी आले. कर्णरथामागून आलेला ध्वजहीन मोकळा रथ आणि अधोवदन पायऱ्या चढणारा कर्ण पाहून वृषालीच्या मनाचा धीर सुटला. कष्टाने ती म्हणाली,

‘नाथ ऽऽ’

कर्णाने एकदम वर पाहिले. वृषालीची अवस्था पाहून तो झरझर पायऱ्या चढला. वृषालीने विचारले,

‘आपण आलात, पण माझा वसू कुठाय्?’

वृषालीच्या अस्थिर, भयशंकित दृष्टीला पाहणे पण कठीण होते. बळ एकवटून कर्ण म्हणाला,

‘आपला वृषसेन आज अमर झाला. रणांगणात, अर्जुनाच्या हातून त्याला वीरगती मिळाली. वृषाली, त्याच्यातर पराक्रमाला जोड नाही.’

डोळ्यांत भरलेले अश्रु सांडत असता थरथरणाऱ्या ओठांनी ती उद्गारली,

‘कसला पराक्रम? जिवंत राहून पराक्रम सिद्ध होत नाही का?’

कर्णाने वृषालीला कवटाळले. वृषाली अश्रु ढाळीत होती. आपल्या नेत्रांत गोळा झालेले अश्रु आवरीत कर्ण म्हणाला,

‘वसू, रडू नकोस. ज्यात आनंद वाटावा, असं मरण आपल्या वृषसेनानं जिंकलंय्. पराक्रम दाखवूनही जिवंत राहता येतं, पण त्यानं आयुष्याच्या अखेरीला वीरगती मिळेल, असं सांगता येत नाही. वीरगती मिळणं दुर्लभ असतं. वृषसेनासाठी दुबळे अश्रु ढाळू नकोस. आजवरच्या युद्धात कमी का जिव्हाळे हरवले? रणभूमीचा पष्ट मांडला आहे, लागणाऱ्या विलंबाबरोबर अधिक मोहरी खर्च पडणार आहेत. वाढत्या रणांगणाबरोबर दु:ख सोसण्याचं बळही वाढायला हवं.’

‘नाथ ऽऽ’ वृषाली पुढे बोलू शकली नाही.

‘सावध हो, वृषाली! शोक आवर. या रणांगणावरची मोहरी आज जरी वेगवेगळी उधळली गेली, तरी त्या विधात्याच्या एकाच संदुकीतील ती सोबती आहेत. कुणास ठाऊक, कदाचित याच वेळी स्वर्गात अभिमन्यू आणि वृषसेन सोंगट्यांचा पट मांडून बसले असतील.’

कर्णाने वृषालीला सावरले. आपल्या हाताचा आधार देऊन कर्ण वृषालीसह शय्यागृहात आला. वृषसेन गेला, यावर वृषालीचा विश्वास बसत नव्हता. दोनच दिवसांपूर्वी त्याच वृषसेनान आपल्या पराक्रमाची कथा सांगितली होती. ती सांगताना त्याच्या चेहऱ्यावर विलसणारा अभिमान केवल मोहक होता! होता! न राहवून वृषालीन विचारले,

‘पण हे झालं कसं?’

‘मी रणांगणावर दुसऱ्या बाजूला गुंतलो होतो. आपल्या वृषसेनानं नकुलाचा पराभव

केला आणि त्याच वेळी अर्जुन सामोरा आला. अर्जुनाच्या रूपाला आपला वृषसेन थोडाही घाबरला नाही. त्याच बलानं तो युद्ध करीत होता. अर्जुनानं वृषसेनाला वेढल्याचं कळताच मी तिकडं धावलो; पण फार वेळ झाला होता. माझ्या डोळ्यांदेखत अर्जुनाचा सुटलेला बाण मी पाहला. रणभूमावर चिरानिद्रा घेणाऱ्या आपल्या वृषसनाजवळ मी गेलो. त्याच्या रूपात कोणताच बदल पडला नव्हता. मला आलेलं पाहून चेहऱ्यावर उमललेलं स्मित तसंच त्याच्या ओठांवर विलसत होतं

'काही बोलला नाही?' गुदमल्या स्वरात वृषालीन विचारल.

नकारार्थी मान हलवीत कर्णा म्हणाला,

'नाही! तेवढी उसंत त्याला मिळाली नाही. अर्जुनाचं शरसंधान अचूक असतं. क्लेशविरहित असतं. जाणाऱ्याची क्लेशापासून सुटका होते; पण मागं राहणारे... नुसत्या वृषसेनाचं दु:ख घेऊन मी आलो नाही...'

वृषालीने वर पाहिले.

कर्णाचे नेत्र भरून आले होते.

'वसू, या सोसण्याचा मला उबग आला आहे. माझ्या मनाला वेदना होत नाहीत, असं का तुला वाटतं? आज एकटया मुलाचंच दु:ख घेऊन आलो नाही.

'भावोजी ऽऽ'

'हो, वसू! आज माझा कटिबंध हरवला. त्याच्या पाठीत कुणीतरी उभी कुऱ्हाड घातली. तशा स्थितीत मला शोधीत तो आला. वसू, हसतमुखानं, अतीव दु:खसुद्धा कसं सहन करावं, हे त्यानंच मला शिकवलं. वृषसेन गेला, त्या वेळी अर्जुनाच्या कृत्याचा संताप आला नाही. अभिमन्यूच्या वेळी त्यानं कोणतं दु:ख भोगलं असेल, त्याची तीव्र कल्पना मला त्या वेळी आली. दात्या कर्णाच्या जीवनातलं एक सर्वांत मोठं देणं दिलं गेलं, असंच त्या क्षणी मला वाटलं. वसू, आता अश्रूंना थारा नाही मी अर्जुनाला निर्णायक युद्धाचं उद्याचं आह्वान दिलंय्. उद्या एक कर्ण तरी राहील किंवा अर्जुन. उद्याचा सूर्यास्त कुणीतरी एकच पाहील. दुसरा साक्षात सूर्याच्या तेजात मिसळून जाईल.'

त्या शवटच्या वाक्यान वृषालीच नेत्र कोरडे बनले. भीतीने कर्णाला ती अधिकच बिलगली.

'असं बोलू नये. आपण विजयी व्हाल! त्या अर्जुनाचा पराभव तुम्ही सहज कराल.'

'ती माझी योग्यता असेलही; पण, वृषाली, नुसत्या योद्धयाच्या कौशल्यावर युद्ध जिंकलं जात नाही. सारथ्याला तेवढंच बळ असावं लागतं. दुबळ्यांनाही वज्रबळ मिळवून देणारा सारथी तो कृष्ण कुठं अन् आपल्या निंदेनं सूर्यालाही झाकळू पाहणारा शल्य कुठं! वृषाली, मी उद्या नसलो, तरी चालेल. माझ्यामागं मला जाणून घेणारं कुणी भेटेल, असं वाटत नाही. मला संपूर्ण समजून घेणारी तू....तू तरी मागं राहशील, त्याचा आनंद मला आहे.'

'नाहीऽ नाथ... जगण्याला अर्थ राहायचा नाही.'

'वसूऽऽ' कर्णाने वृषालीला एकदम कवटाळले. तिचा चेहरा उंचावून त्या नेत्रांचे अश्रू आपल्या ओठांनी टिपीत कर्ण म्हणाला,

वसू निदान माझ्यासाठी एक कर. तेवढं वचन दे मला.

'कसलं वचन!'

'मी उद्या परतलो नाही, तर... तर... मागं राहील, त्याला निदान शाप देऊ नाकोस.

ते सोसण्याचं बळ त्याला राहणार नाही. त्यापासून त्याला वाचवणं कृष्णालाही जमायचं नाही’

रात्री वृषाली कर्णाच्या मिठीत झोपी गेली होती. झोपेतसुद्धा वृषालीचे हुंदके उमटत होते. तिच्या मिठीची तीव्रता कर्णाला जाणवत होती. कर्णाचे नेत्र सताड उघड़े होते.

# ५४

**प** हाटेच्या वेळी कर्ण एकटाच प्रासादसौधावर उभा होता. वातावरणात नीरव शांतता नांदत होती. आकाशातील नक्षत्रे पहाटेच्या चाहुलीने निष्प्रभ होत होती. ती शांतता निरखीत कर्ण उभा होता. तशा थंड वेळीही मस्तकीचे शिरस्त्राण, छातीवर रौप्यकवच यांमुळे तो गारवा जाणवत नव्हता. काही वेळाने निर्णायक युद्धाचा दिवस चालू होणार होता

निर्णायक युद्ध! केव्हा आणि कुठं घडणार! युद्धाचा शेवट ठरलेला होता. पण तो कसा होणार? पण आता ते अधिक लांबणीवर जाऊ नये. आता अधिक सोसण्याचं बळ राहिलं नाही जितक्या लवकर ते घडेल, तेवढं बरं: शस्त्रस्पर्धेच्या वेळी अर्जुनाला दिलेलं आह्वान! त्या अपमानातून उद्भवलेली ईर्ष्या.. अर्जुनवधाचं अखंड चिंतन करीत जीवन वाढलं. कवचकुंडलं दान करताना ते भंगेल, असं वाटलं नाही उलट, त्या वेळी आत्मबलाच सक्षात्कार झाला दुर्योधनाला युद्ध अटळ असल्याची जाणीव मीच करुन दिली अर्जूनानं कृष्णाचं सख्य पत्करल्याचं कळलं तेव्हाही प्रतिज्ञापूर्तीत खंड पडले, असं वाटलं नाही. पण कृष्णानं जन्मरहस्य सांगितलं आणि वज्राघात झाला.
ते आधीच कळलं असतं, तर?
कृष्णाला माहीत होतं तर त्यानं आधी का सांगितलं नाही?.
भीष्म-विदुरांना ते माहीत होतं योग्य वेळी हा विनाश टाळण्याचं त्यांच्या हाती होतं मी कोण? कुणाचा? कुठून आलो? कुठं जाणार? या प्रश्नांनी जीवनभर उच्छाद मांडला त्या प्रश्नांनी उत्तर मिळताच शांतता लाभण्याऐवजी भयानक अशांतता पदरात यावी? आत्मशोध म्हणजेच का जीवनाचा अंत आहे? नाहीतर कृष्णानं जन्मरहस्य सांगताच ती अखंड धगधगत राहिलेली सुडाची आग विझली नसती. यशची आकांक्षा जिथल्या तिथं विरली नसती. उदंड कीर्तीच्या रुपाला तडे गेले नसते राहिली फक्त पराजयाची जाणीव अटळ पराक्रमाची! दैवानं असला जीवघेणा खेळ खेळायला नको होतं...
खेळ मी मांडला नाही देवानंच मांडला एवढा भयानक खेळ अन्यत्र दिसणं कठीण! एकाच मातेच्या उदरी जन्मलेले जीव; पण त्यांची जन्मत:च ताटातूट झाली एकमेकांच्या प्रेमभावांत ज्यांनी वाढावं, ते भाऊ एकमेकांशी वैरभावानं पाहत वाढले दैवाला हा खेळ अपुरा वाटला, म्हणून की काय, त्या भावांच्या हाती प्राणघातक शस्त्रास्त्रं देऊन रणांगणावर एकमेकांच्या समोर उभं करण्यात आलं अन् आता शेवट ठरलेला...दैवानं तरी संयम पळायला उभं करण्यात आलं अन् आता शेवट ठरलेला... दैवानं तरी संयम पाळायला हवा होता.

कर्णाचे लक्ष आकाशतल्या नक्षत्रांवरून फिरत होते आणि अचानक एक तेजस्वी तारा वेगाने खाली येताना दिसला.
कर्णाच्या ओठांवर एक स्मित उमटले.

लक्ष ताऱ्यांतील एक तारा ढळला, म्हणून तारांगण थोडंच मोकळं पडणार? त्यात उणीव थोडीच राहणार? आकाशात जडवलेल्या ताऱ्यांनासुद्धा एक ना एक दिवस निखळावं लागतं. त्यांनी कोणतं पाप-पुण्य केलं? शुद्ध तेज असा अग्नि शांत का होतो? सदैव मर्यादा पाळणाऱ्या समुद्राला गंगाजलाची चव का नसावी अचल पर्वतांना भूकंप का जाणवावा त्यांनी कोणती पापं केली हे पाप-पुण्य आहे तरी काय?

अपमानाचा सूड! निर्मळ जीवनाची इच्छा; पराभवाचं दुःख हेच का पाप! कुणीतरी आपलं असावं, कुणाला तरी आपलं मनोगत कळावं, कुणाच्या तरी मायेच्या हातांनी डोळ्यांतल्या अश्रूंनी जगण्याचं बळ लाभावं, असं वाटलं, तर तो का स्वार्थ? परमार्थाला सुद्धा स्वार्थाचं बळ असावं लागतं.

मानवरूपाला कधीच मुक्तपणे जगता येत नाही. अवयवांनी जेवढं शरीर बद्ध असतं. तेवढंच मनही. नेत्रांना दिसलेलं सौंदर्य मनाला मोहवतं. हाताला झालेला स्नेहमय स्पर्श लक्ष वीणांसारखा मनाच्या गाभाऱ्यात झंकारत राहतो. दानासाठी पुढं केलेल्या हाताबरोबरच संकटनिवारण केल्याचा आनंद उद्भवतो. दान तरी कुठं एकांगी असतं? दिलेल्या मित्रप्रेमासाठी या जीवनात ऐश्वर्य लाभलं, सत्ता हाती आली सूतपुत्राच्या हाती आधिपत्य आलं; पण त्याच वेळी उभं जीवन त्या प्रेमात गुंतून गेलं जीवनाची बद्धता वाढविण्यासाठीच का दातृत्वाचा उपयोग मग त्याच मनात सौंदर्याची अभिलाषा दातृत्वाचा अहंकार स्नेहमय अखंड दास्य आलं तर आश्चर्य कसलं तृषार्त असणं हे पुण्य तृप्त होणं हे पाप! जरूर काही तरी गल्लत आहे.

दर्पणासमोर उभं राहून रणवेष धारण करीत असता स्वतःच्या रूपाकडं पाहण्याचा धीर कर्णाला झाला नाही डोळ्यांसमोर येत होता वृषसेन!

रणांगणावर चिरनिद्रा घेणारा, गाढ झोपी गेलेला! जे रूप हाताखांद्यांवर खेळत मोठं झालं, ते रूप तसचं होतं. अनेक वेळा निद्राधीन झालेला वृषसेन तसाच दिसत होता. रूप होतं तेच परिचित शरीर. मग गेलं ते काय? ते चैतन्य! त्याची कधीच जाणीव झाली नाही. ती ओळख कधी घडणार होती का? हे जाणं म्हणजे कुठं जाणं, हे कळलं असतं, तर या मृत्यूची भीती वाटली नसती. रूपाच्या मोहात माणूस एवढा बद्ध झाला नसता. चैतन्यानं केलेला जडत्वाचा त्याग म्हणेच का मृत्यू! मग या रूपाचा मोह कशासाठी?

रूप! ते तरी नेहमीच कुठं सहन होतं? अश्रुपूर्ण नजरेनं पाहणाऱ्या बालकाकडं कुठं पाहवतं? राधाईच्या मोकळ्या कपाळाकडं कुठं पाहता आलं? दृष्टी असूनसुद्धा माणसाला फार थोडं पाहता येतं पाहण्याचा मोह टाळणं म्हणजेच जगणं.

जगणं! त्याचा विचार आता फार काळ करावा लागणार नाही.

कर्णाचे लक्ष पूर्वक्षितिजाकडे गेले.

धूसर प्रकाशक उमटली होती अंधार प्रकाशात मिसळत होता. मोरांचा आर्त आवाज कानांवर येत होता.

कर्ण वळला मागे उभ्या असलेल्या वृषालीला पाहून तो भानावर आला

'वृषाली! केव्हा आलीस?'

'बराच वेळ झाला. आपण कसल्यातरी विचारात होता. आपल्याला हाक मारावी, अस वाटल नाही.'

'रणांगणावर जाणारा वीर दुसरा कसला विचार करणार रणांगणावर समोर येणारा शत्रू कोण असेल? कोणत्या ऋणानुबंधानं ती गाठ पडते? हे अगात शत्रूबद्दल वाटतं. मग ज्याचा ऋणानुबंध माहीत आहे, त्या शत्रूशी युद्ध कराया ला जाताना केवढा मनाचा गोंधळ वाढत असेल?'

'कसला ऋणानुबंध?'

गडबडीने कर्ण म्हणाला

'माणुसकीचा! दुसरा कसला वृषाली, युद्धात ज्या ज्या वेळी कृष्ण समोर आला, तेव्हा चंपानगरीतला कृष्णभेटीचा दिवस आठवत असे. तो शत्रुपक्षाचा सारथी, अस कधीच वाटलं नाही.'

वृषाली काहीच बोलली नाही. तिने हातावरचा शेला उचलला.

कर्णाने ते पाहताच आपले हात उंचावले. पण वृषालीने नेहमीप्रमाणे कमरेला शेला बांधला नाही. तो शेला तिने कर्णाच्या हातात दिला.

आश्चर्याने कर्णाने विचारले

'आज शेला हाती दिला?'

'ते बळ आता राहिलं नाही.' वृषालीला हुंदका फुटला.

कर्ण पुढे इतला. त्याने वृषालीला जवळ घेतले. आपल्या भावना आवरीत तो म्हणाला,

'वृषाली, या कर्णाच्या जीवनात राधाईच्या हातची माया आणि तुझा सहवास सोडला, तर फार थोडे सुखाचे क्षण लाभले. तुझ्या रूपाच्या द्वारा माझं सुख अवतारनलं, अस वाटतं. आज रणांगणावर जात असता जीवनातील कुठलीच इच्छा अपुरी राहिली आहे, असं वाटत नाही. वृषाली, ते अश्रु आवर. रणांगणावर जाणाऱ्या पतीच्या बाहूंना निर्धृण बबाची आवश्यकता असते. अनुकंपेला तिथं अवसर नसतो. मी जातो.'

कर्णाच्या शेवटच्या वाक्याने ती भयभीत झाली.

'रणांगणावर जाताना नेहमी 'मी येतो' अस आपण म्हणता, मग आजच....'

'चुकून बोलून गेली असेन. तू खाली येऊ नकोस. कृष्णानं सांगितलं, ते अगदी सत्य आहे. निरोप मंद गतीनं घेऊ नरी. तो चटकन संपवावा. वृषाली, रणांगणावरून परत येणं यातच जीवनाची कृतकृत्यता थोडीच असते? युद्धभूमीवरून माघारी आलो, तर पराजय ठरेल. रणभूमीवर हरवलो गेलो, तर विजयी झालो, असं निश्चितपणं समज. वृषाली, तू इथंच थाब. तो बघ, पृथ्वीचा अंधकार दूर होऊ लागला आहे. साऱ्या दिशा प्रकाशमान होत आहेत. त्या अंधाराच्या नाहीसं होण्याबरोबर उगवत्या सूर्यकिरणांत साऱ्या सृष्टीला नवं रूप लाभेल, चैतन्य प्रगटेल. गेला काळोखानं दिलेल्या विश्रांतीचं भान कुणालाही उरणार नाही. वृषाली, हा चमत्कार बघत तू उभी राहा.'

# ५५

कर्णाने पाठ फिरवली आणि तो जाऊ लागला. वृषाली पाठमोऱ्या कर्णाकडे पाहत होती. तिचा श्वास गुदमरला होता. भान हरपत होते. वृषालीचे नेत्र भीतीने विस्फारले गेले आणि ती किंचाळली,

'नाथ S'

त्या हाकेबरोबर कर्णाचे पाय उभ्या जागी थिजले. मनात असूनही त्याला पुढे पाऊल टाकता आले नाही. त्या हाकेच्या सामर्थ्याने कळसूत्री बाहुलीप्रमाणे तो वळला. झंजावाती वारे शरीराला भिडावे, तशी वृषाली रणवेष धारण केलेल्या कर्णाला भिडली होती. कर्णाचे हात तिच्या पाठीवरून नकलत फिरत होते. शक्य तेवढया कठोरतेने कर्णाने हाक मारली,

'वृषाली...'

वृषालीने मान वर केली आश्रूंनी भरलेले तिचे नेत्र अस्थिर बनले होते. एक प्रचंड अनोळखी भीती त्या दृष्टीत तरळत होती. साऱ्या अंगावर कापरा खेळत होता. भिजल्या गालांवर, विस्फारलेल्या' केसांच्या बटा चिकटाल्या होत्या. ती घायाळ नजर, शुष्क थरथरणारे ओठ, स्फूरण पावणारी नासिका पाहून कर्णाने मन विरघळून गेले. वृषालीचे एवढे विकल, घायाळ रूप त्याने कधीही पाहिले नव्हते. कर्णाने दोन्ही हातांत तिचा चेहरा घेतला. ते गाल कुरवाळीत कर्ण म्हणाला,

'प्रिये, स्वतःला सावर. तुझ्या या दर्शनानं माझं बळ सरत आहे. योद्धयाच्या हाती निर्धृण बळ असावं लागतं. दिगंत कीर्तीसाठी रणांगणी जाणाऱ्या वीराला असला निरोप साह्यकारी होत नाही. तू वरिपत्नी आहेस. तुला हे शोभत नाही...

'वृषालीला वाचा फुटली. ती कर्णाला बिलगत म्हणाली.

नाही, नाथ! मला सोडून तुम्हांला जाता येणार नाही. ती कीर्ती मला माहीत नाही. दातृत्व मी जाणत नाही. मला दिसतात, ते फक्त पाय. तुम्हांला तुमचं शौर्य कीर्ती मिळवून देईल. तुमने दातृत्व अजरामर राहील. संसारात जे लाभलं नाही, ते जीवनसाफल्य तुम्हांला रणांगणी लाभेल. पण माझ्या नशिबी काय?'

वृषाली!' कर्ण उद्गारला

'नाथ! तुम्ही असेपर्यंत माझ्या जीवनाला अर्थ आहे. रणांगणावर माझे भाऊ, मुलं हरवली. ते दुःख मी धीरानं सोसलं. आता ते बळ राहिलं नाही. वैधव्यानंतर स्त्रीच्या जीवनाला अर्थ राहत नाही. नाथ! आयुष्यभर साऱ्यांचं भलं केलंत. काही अपराध नसता मला माझ्या जीवनाक उठवण्याचा तुम्हांला अधिकार नाही. नाथ, मी तुम्हांला जाऊ देणार नाही.'

वृषालीच्या त्या व्याकूळ बोलांनी कर्णाचे बळ सरले. त्याने आवेगाने वृषालीला मिठीत घेतले. क्षणभर कर्णाचे आरक्त नेत्र पाणावले; पण क्षणभरच. दुसऱ्याच क्षणी मिठीतून दूर होत तो म्हणाला

'वृषाली, असलं वेडेपण मी तुझ्याकडून अपेक्षिलं नव्हतं, तुझी-माझी सोबत

असल्या मृत्युनं तुटणारी नाही. ती अखंड राहील. वेडे, उजव्या हाती शस्र पेलून मृत्यूचं आह्वान स्वीकारीत शत्रूला भिडत असता, वीराचा डावा हात वमरेच्या शेल्याचा आधार शोधीत असतो. पती, पत्नी ही का दोन रूपं? दोन भिन्न रूपांत काया, वाचा, मनानं गुंतलेला एकच आत्मा असतो, म्हणून तर पत्नीला अर्धांगी म्हणतात. आज मृत्यूचं भय न बाळगता मी रणांगणी जातोय्. म्हणूनच मी तुला आवडतोय् ते भय बाळगून मी घरी बसलो, तर तुला माझ्याकडं पाहवणारही नाही. खोटया भीतानं तू व्याकुल होऊ नकोस.'

'नाथ... पण...'

'काही बोलू नकोस. असली ताटातूट फार काल राहणार नाही. सप्तवनांनी वेढलेली ही कुरुक्षेत्राची पुण्यभूमी आहे. या भूमीवर अनेकांची तप सफल झाली आहेत. गुरुदेव परशुरामांनी याच भूमीवर स्वमंतपंचक नावाचा जलाशय निर्माण केला. वृषाली हीच ती भूमी, की जिथं पुरूरवा-उर्वशींची विटालोनंतरची भेट घडली. दीन जीवाची ताटातूट करणारी ही भूमी नाही. आपली ताटातूट करण्याचं बळ विधात्यालाही होणार नाही. वसू, मला पोहोचवायला तू खाली येऊ नकोस. तू इथंच सौधावर उभी राहा. दूर जाईपर्यंत मला तुझं दर्शन घडेल. आजवर मी तुला कधी आज्ञा केली नाही. ही माझी आज्ञा समज.'

कर्णाने बोलने केंव्हा संपवले आणि तो केव्हा गेला, हेही वृषालीला समजले नाही. कर्णाला परत हाक मारण्याचे बळ वृषालीला राहिले नाही. कर्ण गेलेल्या मोकळ्या द्वाराकडे पाहत ती तशाच उभी राहिली. रथाच्या आवाजाने तिला सावध केले. ती सौधाच्या काठावर धावली. कर्णरथ भरधाव वेगाने जात होता.

कर्णाने मागे वळून पाहिले

पहाटेच्या प्रकाशात पश्चिमक्षितिजाकडे वर निस्तेज चंद्रकडा उभी ठाकावी, तशी सौधावर वृषाली उभी होती

# ५६

**क**र्ण कौरवशिबिरात आला. शल्यराज कर्णाचीच वाट पाहत होता. कर्ण आपलत रथातून उतरला. दुर्योधनाला भेटून तो शल्याकडे वळला. शल्यराज नव्या रथाकडे पाहत म्हणाला,

'कर्णा, बघ, रथ कसा सज्ज केलाय्. तो! हा रथ तेजानं अभिमंत्रित केला आहे. राधेया, या रथाला जुंपलेले शुभ्र घोडे जातिवंत आहेत. विजेचा वेग आणि चपलता त्यांच्या खुरांत दडलेली आहे. या रथाला लावलेल्या सुवर्णदंडावर तुझा कमलचिह्नांकित, सुवर्णशृंखलायुक्त यशोध्वज माध्याह्नाच्या सूर्यतेजाप्रमाणं झळाळतो आहे. हे सुतपुत्रा, रथपरीक्षेत तू निपुण आहेस, असं मी ऐकतो. तुलादेखील या सुवर्णसंपन्न रथात दोष काढणं कठीण आहे. कर्णा, तुझा रथ सज्ज झाला आहे.'

कर्णाने रथाकडे पाहिले. त्याच्या मुखावर वेगळेच स्मित उमटले.

खरंच रथ सिद्ध झाला होता. नियतीनंच तो सिद्ध केला होता! गुरुकपेनं लाभलेल्या दोन उमद्या, जातिवंत शापांचे अश्व जीवनरथाला जोडले होते. दैवचक्राच्या कुण्या केव्हाच खेचून घेण्यात आल्या होत्या. ज्याला परमेश्वरी अंश मानले, त्यानेच एक कुणी काढून घेतली होती, तर दुसरी जन्मदात्या आईनं. दिल्या वचनाचा दुबळा आसूड हाती आला होता. आता कोणत्या क्षणी दैवचक्र फसते आणि कलंडलेल्या रथाखाली किती काळ फरफटत जावे लागते, तेवढेच शिल्लक होते. बाकी सर्व रथ सिद्ध झतला होता.

'अंगराज!' शलतने हाक मारली.

'अं!' कर्णाचा विचार तुटला. त्याने शलतकडे पाहिले. 'शल्यराज, खरोखरच रथ सुरेख सिद्ध झाला आहे. रणभूमीची नौबत वाजत आहे. आता वेळ नाही. या रथाचं चापल्य पाहायला मीही उतावीळ आहे. शल्यराज, रथारूढ व्हा.'

कर्ण-दुर्योधन रथ युद्धभूमीवर पोहोचले. कर्ण रणभूमीचे अवलोकन करीत होता. शल्य म्हणाला,

'सूतपुत्रा! तुला वजय मिलावा, म्हणून मी तुझा रथ सिद्ध केला. माझ्या सारथ्यातही कसलीच कमतरता पडणार नाही, पण एवढं होऊनही तुला विजय मिळेल, असं वाटत नाही. त्या अर्जुनाच्या पुढं तुझ्या पराक्रमाला जागा नाही.'

कर्णाने संतापाने शलतकडे पाहिले. न राहवून तो म्हणाला,

'शल्यराज! ते भाकीत सांगायला तुमच्यासारखा ज्योतिष्याची गरज नाही. रणांगणाची कुंडली मी जाणतो. अर्जुनाला विजय मिळेल, हेच ज्याचं उद्दिष्ट आहे, असा तो सारथी कृष्ण कुठ अन् माझ्या पराजयाचं स्वप्न पाहणारे तुम्ही कुठं!'

'तुझा पराजय माझा काय फायदा?'

'शल्यराज! माझा तेजोभंग करण्यासाठी पांडवांच्या वतीनं तुम्ही सारथ्य पत्करलंत, हे का मला माहीत नाही? मी सेनापती बनताच ते पांडव तुला भेटले, हे मला माहीत आहे.'

शल्याचे हास्य विरले, त्याने वळून कर्णाकडे पाहिले.

'शल्यराज, मी कुरूचा सेनापती आहे. असल्या गोष्टी समजाबून घेणं फारसं अवघड नाही.'

'अन् तरीही माझं सारथ्य स्वीकारलंस?' शल्याने विचारले.

'हो! माझ्या दृष्टीनं ते अन् तुमच्यांत काही फरक नाहीं. शल्यराज! तुम्ही कुळाचा अहंकार बाळगता. विश्वासधात, असत्याचरण अन् परनिंदा हेच त्या श्रेष्ठ कुळाचे गुण असतील, तर ते कुल तुम्हांला लखलाभ होवो! शल्यराज, तुमचा हेतू सफल होणार नाही, कारण सूर्यपुत्राचा तेजोभंग होत नसतो.'

कर्णाने शांतपणे आपला शंख उचलला आणि युद्धाला सुरुवात झाल्याचे सांगण्यासाठी तो शंख तोडाला लावला.

सूर्यबिंब प्रगटले होते. युद्धाला सुरुवात झघली होती...

कुरुक्षेत्रावर भयंकर रणसंग्राम चालू होता. कौरव-पांडवांकडचे शेकडो हत्ती, घोडे, स्वार, हजारो रथ, पारादळांनी व्यापलेल्या रणभूमीत संचार करीत होते. ते रणांगण खवळलेल्या सागरासारखे दिसत होते. मत्त गज आणि रथांचे ध्वज मेघांसारखे रणभूमीवर फिरत होते. वीरांनी धारण केलेली शिरसत्राणे लाटांसारखी रणसागरावर उसळत होती. तळपत्या सूर्यकिरणांत खड्ग, तोमर, नाराच यांची टोके दृष्टीच्या कक्षेपर्यंत विस्तारलेल्या युद्धभूमीवर चमकत होती. रणभेरींच्या आवाजाबरोबर उठणारे हत्तींचे चीत्कार, रथांच्या गर्जना, खड्गांचे आवाज यांच्या नादावर हेलावणारा तो रणसागर अतर्क्य भासत होता.

सूर्योदयापासून युद्ध करण्यात गुंतलेला कर्ण त्या रणभूमीत आपल्या रथावर स्थिर उभा राहून वीरश्रीने तुटून पडणाऱ्या आपल्या सैन्याकडे पाहत होता. पांडवांच्या अनेक वीरांचा पराभव वरूनही त्याचे मन शांत झाले नव्हते. त्याची गरुडदृष्टी अर्जुनासाठी रणांगणावरून फिरत होती. युद्धामध्ये अंगावर झालेल्या जखमांची पर्वा न करता रणांगण पाहत तो उभा होता. रणामध्ये मेरु पर्वतासारख्या उभ्या ठाकलेल्या त्या कर्णाच्या मुखावर दिसणारे वेगळे तेज पाहून शल्यराज म्हणाला,

कर्णा, आज तुझ्या पराक्रमानं शर्थ केली. सुसाट वाऱ्यानं पालापाचोळा उधळावा, तशी तृझ्या पराक्रमानं पांडवांच्या दलाची अवस्था झाली आहे. रुधिरस्नान घडलेली ही भूमी मला पूर आलेल्दा नदीची आठवण करून देते. यामध्यो तरंगणारी रथछत्रं जलौघात पोहणाऱ्या हंसनावांसारखी भासतात. धारातीर्थी पडलेले योद्धे त्या तामजलावरून वाहणाऱ्या महान वृक्षासारखे वाटतात. ते योद्धयांचे विखुरलेले हार बघ. या संहारकारी प्रवाहावर ते कमलासारखे दिसत नाहीत का? ही विखुरलेली शिरोभूषणं जणू या जलावरचा फेसच आहेत. ही भयंकर नदी निर्माण करण्याचं साहस फक्त तुझंच आहे. हे तुझच कर्तृत्व आहे.'

शलास्तुतीने कर्ण सुखावला नाही.

'शल्यराज! हा पराक्रम मला समाधान देत नाही. मी काल अर्जुनाला निर्णायक युद्धाच आह्वान दिलं आहे. युद्ध सुरू झाल्यापासून माझी दृष्टी त्याचा कपिध्वज शोधते आहे; पण तो दिसत नाहीं., मध्याह्नकाळाचा समय जवळ येऊनही अर्जुनभेटीचा योग दिसत नाही. शल्यराज, तुम्ही खरोखरच माझ्या पराक्रमावर प्रसन्न असाल, तर त्या अर्जुनाचा रथ गाठा. त्या अर्जुनाचा वध करून मला आज या संहारयज्ञाची समाजी करावरतची आहे.'

‘हे राधेया, तुझी इच्छा मी जाणतो, पण तू धर्मराजाला विरथ करून घायाळ केलंस. शिखंडी, सात्यकी, युधामन्यू, नकुल, सहदेव यांसह त्यात शक्तिशाली भीमालाही जर्जर केलंस. हा तुझा पराक्रम पाहून अर्जुनाचं सारथ्य करणारा कृष्ण नेहमीच अर्जुनाचा रथ दूर ठेवण्याची सावधगिरी बाळगतो. तू आता उत्तरेला युद्धात गुंतलेला पाहून कृष्णानं अर्जुनाचा रथ दक्षिणेला नेला आहे. ते मी हेरून ठेवलं आहे. कर्णा, समुद्राची सीमा त्याचा विरोध करते, तसा क्रोधायमान अर्जुनाला विरोध करण्यास समर्थ असा तुझ्याविना एकही वीर या लोकांत मला दिसला नाही.’

शल्यराज! हे साधायचं असेल, तर विलंब करू नका. शक्य तेवढया लौकर माझा रथ अर्जुनरथाला भिडवा.’

‘कर्णा, माझ्या सारथ्याकलेवर विश्वास ठेवूनच तू माझ सारथ्य स्वीकारलंस ना? मग माझ्या वचनावर विश्वास ठेव! चाललेलल्या रणघुमाळीतून वाट काढीत युद्धभूमीच्या दुसऱ्या टोकावर असलेल्या अर्जुनरथाला गाठणं एवढ, सोपं नाही. तो प्रयत्न करीत असता अर्जुनरक्षणार्थ सदैव सावध असलेले पांडववीर तुझ्या मार्गी आडवे येतील. त्या सर्वांचा पराजय करीत तुला जावं लागेल. केवढा अवधी मोडणार, हे कोण सांगणार?’

कर्ण-शल्य यूद्धभूमीचा पसारा पाहत होते. कर्णाची दृष्टी दक्षिणेला जडली असता तो म्हणून,

‘शल्यराज, युद्धभूमीला वळसा देऊन बाहेरून रथ नेता येणार नाही का?’

‘अंगराज! आपण सेनापती आहात! युद्धभूमीवरून साखळदंड चिह्न असलेला रथध्वज दिसेनासा झाला, तर त्या बळावर लढणाऱ्या या कौरवसेनेच धाष्टर्य निघून-जाईल, त्याचा विचार केला आहेस का?’

‘शल्यराज, त्याची चिंता करू नका. हा कर्ण रणभूमी सोडून पळाला, अस शत्रलाही वाटणार नाही. कौरवसेनेच्या अग्रभागी वीरश्रेष्ठ दुर्योधनाचा गजचिह्नांकित ध्वज फडकत असता कौरववीरांच धाष्टर्य कधीच खचणार नाही. ती शंका मनात न बाळगता रथ वळवा अन् अर्जुनरथाला गाठा.’

शल्यराजाने रथ वळवला, रक्षकदल बरोबर न घेता रथ युद्धभूमीबाहेर रोताच रथाने वेग घेतला. कुरुक्षेत्रावरच्या सीमेवर वालुकामय प्रदेशावरून तो भर वेगाने दौडत होता. रथाच्या ध्वजस्तंभाचा आधार घेऊन कर्ण रणसंग्राम न्याहाबीत होता. दक्षिणेला युद्धात फिरणाऱ्या अर्जुनरथावर कर्णाची दृष्टी पडली. साऱ्या अंगावर एक रोमांच खेळून गेला. सुवर्णाने मढवलेल्या बळकट धनुष्याच्या माष्यावर ठेवलेला हात त्या आवेगाने दाबला गेला. तणावलेली प्रत्यंचा दुबळी बनली. कर्णाचे लक्ष पायांशी ठेवलेलत सुवर्णभात्याकडे गेली. निवडला तीक्षा बाणांनी ते भाते भरलेले होते. क्षणाक्षणाला अंतर कमी होत होते. अर्जुनरथ स्पष्ट दिसू लागला होता.

काळ्यान भुसघुशीत जमिनीत नांगर घुसावा, तसा आवाज उठला. रथ किंचित कलंडल्यातचा भास झाला आणि रथाची गती थांबली. शल्यराजाने आसूड उंचावला. आसुडाचे आवाज उठत होते. बळकट अश्वांच्या पाठीवर फुटत होते. त्या वेदनेने उसळणाऱ्या त्या उमद्या जनावरांचे स्नायू ताठरले होते, पण रथ तसूभरही हलत नकता.

कर्णाच्या मनात धस्स झाले. भयशंकित होऊन त्याने विचारले,

‘शल्यराज! रथ का थांबला? काटा झालं?

‘जे घडू नये, तेच घडलय् रथाचं डावं चक्र भूमीत रुतलं आहे.’

तशा स्थितीतही कर्णाच्या चेहऱ्यावर खिन्न हास्य प्रगटलं,

'जीवनाचे बंध तोडता येतात, तसे नियतीचे बंध तोडता येत नाहीत. गुरुदेव परशुरामांकडं ब्रह्मास्र ग्रहण करण्यासाठी गेलो असता, एके दिवशी एका ऋषींची गाय माझ्या हातून मारली गेली. ऐन रणांगणावर तुझ्या रथाचं चक्र पृथ्वी ग्राशील, असा त्यांनी दिलेला शाप आज खरा होत आहे. रक्षक दळ जवळ असतं, तर चाक सहज काढता आलं असतं. शल्याराज, आपण मला मदत कवलीत, तर वाळूत रुतलेलं हे चाक आपण काढू.'

शलतने बसल्या जागी निःश्वास सोडला. शल्य रथाखाली उतरलेला पाहताच कर्णाला आनंद झाला. गडबडीने रथातून उतरण्याच्या तयारीत असतानाच शल्याचे शब्द त्याच्या कानांवर पडले,

'राधेया! खाली उतरण्याचा त्रास घेऊ नकोस. तुला एकटयाला ते खोल रुतलेलं अवजड चक्र निघणार नाही.'

'पण आपण मला मदत कराल, तर...'

'तरी मी त्या दुर्योधनाला सांगत होतो. त्याच्या आग्रहास्तव मी तुझं सारथ्य पत्करल. हीन कुलाच्या संगतीचा दोष असाच प्रगट व्हाराचा. नाहीतर, मी शल्यराज आहे, हे विसरून तू मला ही विनंती केली नसतीस.'

कर्ण विस्फारित नेत्रांनी पाहत होता. शल्यराज रथाचे घोडे सोडीत होता.

'शल्यराज! आपण काय करत आहात?'

कर्णाकडे पाहत शला म्हणाला

'जे योग्य, तेच करतोय्, मी रथाची घोडी घेऊन जात आहे. रथाचं चाक काढण्यात तुला यश लाभलं, तर शंखनाद कर. मी अश्वासह येऊन परत तुझं सारथ्य करीन. दुर्दैवी राधेरघ, तुझ्या जीवनाची गती खुटली आहे, असं मला दिसतंय् रथाला वेग लाभण्याचं आता प्रयोजन दिसत नाही. तो बघ, अर्जुनाचा कपिध्वजावित सुवर्णरथ तुझ्याच्या शोधार्थ येत आहे.'

कर्णाकडे न पाहता मद्रराज घोडी घेऊन जात होता. ते दृश्य हताशपणे पाहत असता कानांवर आलेल्या घनगंभीर आवाजाने कर्णाला सावध केले. त्याने पाहिले, तो अर्जन-रथ कर्ण-रथाच्या दिशेने येत होता. कर्णाने क्षणात स्वतःला सावरले आणि त्याने रथाखाली उडी घेतली. रथचक्राच्या आऱ्यांना हात घातला. सारी शक्ती पणाला लाबून तो चक्र वाढण्याचा प्रयत्न करू लागला. दंडाचे स्नायू तटतटले, पण चक्र तसूभरही हलले नाही

कर्णाचे मन व्याकुल झाले. त्याच्या कोणत्याच प्रयत्नाला यश येत नव्हते. तप्त वाळूत रुतलेले चक्र तसेच अचल होते. कर्णाने डोळे सुवर्णकाम केलेल्या त्या चक्रावर खिबले होते

रथचक्र!

या धर्मचक्राला काहीतरी अर्थ आहे का? धार्मिक पुरुषाला धर्म राखतो. त्याचं रक्षण करतो, असं म्हणतात. आयुष्यभर धर्माचं पालन केलं असत्याची कास धरली नाही. दातृत्वात कधीही हात मागं आला नाहीं. चारित्र्यसंपन्न जीवन कंठलं, ते याच विदारक क्षणासाठी? रक्षण तर दूरच राहिलं. उलट, मी पाळलेला धर्मच आज माझा नाश करण्यासाठी येत आहे.

या धर्माबद्दल मला शंका येते.

वाळूचा भयानक करकरणारा आवाज येत होता. संतापाने त्याने मागे पाहिले. अर्जुनरथ दौडत येत होता.

कर्ण सावध झाला. त्याने मागे पाहिले. तो अर्जुनरथ समोर आला होता. त्या रथाच्या शुभ्र अश्वांच्या मुखांतून फेस उसळत होता. अश्वांचा वेग आवरण्यासाठी कृष्ण मागे कलला होता. अर्जुनाने आपल्या धनुष्याला घातलेला हात पहुन कर्ण म्हणाला,

'अर्जुना, थोडा थांब! माझ्या रथाचं चक्र या भूमीत फसलंय्?, ते काढण्याचा अवधी मला दे. रथचक्र भूमीनं ग्रासलं असता युद्ध करणं हा धर्म नव्हे! माझा रथ सज्ज होऊ दे. म्हणशील त्या आयुधानं आपण युद्ध करू. ते युद्ध धर्ममान्य असेल. त्यात लाभलेला जय अथवा पराजय कीर्तिरूपच होईल.'

कर्णाची ती अवस्था अर्जुनाला दिसत होती. त्या नि:शस्त्र कर्णावर शरसंधान करण्याचं धाष्टर्य अर्जुनाला होईना.

कृष्णाने अर्जुनाची ती अवस्था जाणली. प्रसंगाचे गांभीर्य ध्यानी आले. कर्णाला तो उच्चरवाने म्हणाला,

'राधया, फारर लौकर तुला धर्माची आठवण झाली! जव्हा एकवस्त्रा द्रौपदी राजसभेत खेचून आणली, तेव्हा विवस्त्र करण्याचा संकेत करताना ही धर्मबुद्धी कुठं गेली होती?

...कपटद्युतामध्ये धर्मराजाला जिंकलं, तेव्हा हा धर्म कुठं लपला होता?

...द्रौपदीला कुलटा म्हणताना त्या जिव्हेला धर्माचं भान राहिलं होतं?

...अभिमन्यूचा वध करताना धर्माचं बळ सरलं होतं?'

कर्ण ऐकत होता. कृष्णाचे ते आसुडासारखे शब्द कर्णावर पडत होते. कर्णाने संतापाने कृष्णाकडे पाहले. कृष्णाच्या अग्निस्फुलिंगाप्रमाणे प्रगटणाऱ्या शब्दांनी कर्णाच्या मनाचा दाह वाढत होता. कर्णाची मन:शांती ढळत होती. मनात अनेक ऊर्मी उठत होत्या. पण त्यांना शब्दरूपाने प्रगट होता येत नव्हते.

कृष्णाकडे पाहत असता मनात कल्लोळ माजला होता.

हे कृष्ण बोलतो? मला?

कृष्णा त्या दुबळ्या अर्जुनाच्या हातांना बळ यावं म्हणून हे आरोप?

कृतहस्त आणि अतिदेवी असा लौकिक असणाऱ्या कपटनीतमिध्ये अत्यंत कुशल अशी कीर्ती लाभलेल्न्या शकुनबिरोबर द्यूतठ खेळला जाणार आहे, हे का त्या युधिष्ठीराला माहीत नव्हतं? तरीही त्यानं द्यूताचं आह्वानं स्वीकारलं, हा धर्म; अन् द्यूतात तो सर्व हरला, हे मात्र आमचं पाप..

रजस्वला द्रौपदिला राजसमेत येण्याचा आग्रह युधिष्ठिरानं धरला, ते त्याच्या धर्मस्वभावाचं प्रतीक, अन् पाची पाडवांत वाटल्या गेलेल्या द्रौपदीला दासी बनल्यानंतर संतापाच्या भरात विवस्र करण्याची आज्ञा दिली, तर ते मात्र धर्माचं अध:पतन

रजस्वला द्रौपदिला राजसमेत येण्याचा आग्रह युधिष्ठिरानं धरला, ते त्याच्या

धर्मस्वभावाचं प्रतीक, अन् पाची पाडवांत वाटल्या गेलेल्या द्रौपदीला दासी बनल्यानंतर संतापाच्या भरात विवस्र करण्याची आज्ञा दिली, तर ते मात्र धर्माचं अध:पतन

कृष्णा, भीष्माच्या् अंगावर सुदर्शन धेऊन धाबून जाताना तुलाच आपल्या प्रतिज्ञेचा विसर पडला असा तुझा संयम, मग ज्याला पतित कुलामुळं सदैव आघात सोसावे लागले, त्या माझ्या स्वाभिमानानं काय करावं?

अभिमन्यूचा मृत्यु हे आमच्या हातून घडलेलं अघोरी कर्म! संपन्न कुलात जन्म घेऊनही दैवगतीनं पोरकं जीवन कंठणाऱ्या या कर्णान, आपल्या हातांनी वाढलेली मुलं रणागणांच्या वेदीवर अर्पण करताना कुणाला शाप दिले नाहीत. अभिमन्यूचं बालवय अनुकंपेला पात्र होतं अन् माझ्या मुलाचं वय ते का पराधीन होतं? नाहीं कृष्णा, निदान असले खोटे आरोप करण्याचं तू तरी धाष्टर्य दाखवू नकोस.

विजय हवा ना? अर्जुनाला सुरक्षित राखून विजय हवा ना? तो तुमचाच आहे. विजयाची राजवैभवाची वासनापूर्तीची आसक्ती असती, तर तुझ्या एका विनंतीचा स्वीकार करून मी सारं मिळवलं नसतं का? ज्येष्ठ म्हणून जगता आलं असतं, सम्राटपदाचा अभिषेक माझ्या मस्तकावर झाला असता अन् द्रौपदीवर माझा प्रथम अधिकार राहिला असता हे तूच सांगितलं होतंस ना? जीवनाच मोल मला वाटत असे; पण तूच फुंकर घातलीस अन् त्यानंच ते नाहीसं झालं: मृत्युचं भय मला वाटत नाही, जीवरक्षण करायचं असेल तर ते या क्षणीही करता येईल सहज करता येईल त्या अर्जुनाला मी जर सांगितल 'हे पार्था तुझ्या धनुष्याची प्रत्यंचा खेचण्याआधी त्या कृष्णाला तुझं-माझं नातं विचार,'तर तेवढ्यानसुद्धा हा संहार थांबेल नाही, कृष्णा, मी थकलो जगण्याची इच्छा मला मुळीच राहिली नाही. फक्त एकच इच्छा आहे. मृत्यु यावा... वीराला साजेसा. लढता लढता..

कर्णाच्या कानांवर कृष्णाचे शेवटचे शब्द पडले.

'अर्जुना, पाहतोस काय; ज्यानं भरसमेत द्रौपदीचं लज्जाहरण करण्याचा प्रयत्न केला, तोच हा राधेय! पाच वीरांच्या मदतीनं तुझ्या पुत्राचा वध केला, तोच हा सूतपुत्र! या कुरुक्षेत्राच्या रणाला सर्वस्वी कारणीभूत असलेला, हाच तो कर्ण! इथं विचाराला अवधी नाही. क्षमेला थारा नाही, दयेला वाव नाही. इथं तुझं एकच कर्तव्य आहे. याचा वध! या पाप्याचा वध करून विजयी हो!'

'पापी?" कर्णाची मुद्रा उग्र बनली.

अर्जुनाचा बाण कानाजवळून घोंगावत गेला. कर्णाचा सारा संताप उसळला. कृष्णवर्ण मेघाआडून सूर्य प्रगटावा, तसं त्याचं तेज भासलं. रथचक्र ग्रासलेल्या त्या रथावर कर्ण आरूढ झाला. त्वेषाने त्याने आपले धनुष्य पेलले आणि अर्जुनाच्या शरवर्षावाला तो उत्तर देऊ लागला. रत्नखचित सुवर्णालंकारांनी, रक्तचंदनाची उटी दिलेले कर्णाचे बाहू मोठ्या वेगाने बाण सोडीत होते. अर्जुन भयाण अस्त्रांचा वापर करीत होता. कर्णही तसेच प्रत्युतर देत होता. त्या भयानक युद्धात अर्जुनाचे शिरस्त्राण पडले. कर्णाचे कवच विच्छिन्न झाले. दोन्ही वीर असंख्य जखमांनी पीडित झाले होते. भर मध्याहनीच्या सूर्यकिरणांत फुललेल्या रक्तवर्ण पालाशवृक्षांसारखे ते दोन्ही योद्धे

आपल्या जखमांची, त्यांच्या वेदनांची दिक्कत न बाळगता सर्वस्व पणाला लावून लढत होते. वाढत्या जखमांबरोबरच कर्णाचा त्वेष वाढत होता. बाहुबलांत अघोरी ईर्ष्या वाढत होती.

कर्णाने एक अत्यंत तीक्ष्ण असा बाण निवडला. तो साक्षात अग्री भासणारा बाण आपल्या धनुष्याला जोडून कर्णाने आकर्ण प्रत्यंचा खेचला, अर्जुनाच्या छातीचे लक्षय धरून कर्णाने बाण सोडला. वारुळात नाग शिरावा, तसा तो बाण अर्जुनाच्या छातीत शिरला. त्या आघाताने अर्जुन आतावाद्ध होऊन उभ्या जागा कापू लागला. त्याच्या हातचे गांडीव धनुष्यही गळून पडले आणि तो रथात ढासळला.

कर्णपराक्रमाने चकित झालेल्या कृष्णाने कर्णावर एकदा क्रुद्ध दृष्टी टाकला आणि मूर्च्छित पडलेल्या अर्जुनाला सावध करण्यासाठी तो वळला.

कर्णाने आपल्या भात्यातला दुसरा बाण खेचला. प्रत्यंचा खेचीत असता त्याचे लक्ष अर्जुनावर स्थिरावले,

अर्जुनाच्या कमरचा शेला काढून कृष्ण त्याने वारा घालात होता. तो नीलवर्ण शेला कर्णाला परिचित होता. कुंतीला दिलेला तो शेला अर्जुनाच्या कमरेला....

ब्रह्मास्त्राचा विसर पडावा, असाच तो क्षण होता.

त्या शल्याच्या दर्शनाने कर्णाचे सारे बळ सरले. संताप नाहीसा झाला. दिल्या वचनाची आठवण झाली.हाताने धनुष्य केव्हा सुटले,हेही त्याच्या ध्यानी आले नाही.

अहंकाराच्या अभिमानापोटी कसलं भयानक कृत्य हातून घडणार होतं..,
माते! योग्य वेळी सावध केलंस!
तू निवडलेले पाचच तुला मिळतील सहावा पाचवा कसा बनेला पहिला असूनही,
सहावा बनण्याचा पराजय मी तुझ्यासाठी आनंदाने पत्करीन.

कर्णाचा सारा त्वेष नाहीसा झाला. असंख्य जखमांनी जर्जर बनलेल्या कर्णाच्या मुखावरचे सारे भाव पालटले. भर रणांगणातही शांत जलाशयावर कमल उमलावे, काढण्याचा प्रयत्न कला. दोन्ही हात जमिनीला टेकवून रथाच्या कण्याला त्याने मान दिली. सारे बळ एकवटून तो रथ उचलण्याचा प्रयत्न करीत असता अर्जुन सावध झाला. कृष्णाने शेला टाकला आणि मागे वळून न पाहता कर्णरथाकडे बोट दाखवीत तो म्हणाला,

'अर्जुना, सावध हो! त्या राधेयाचा वध करण्याची हीच वेळ आहे, जर का कर्णानं रथ काढण्यात यश मिळविलं, तर तुझ्यासह माझाही भरवसा देणं कठीण! सावध हो, अर्जुना....'

जखमांनी त्रस्त झालेला, मूर्च्छा येऊन पडल्यामुळे अपमानित झालेला अर्जुन उचलले. एक तीक्षण बाण निवडून त्याने धनुष्याला लावला.

रथचक्र काढण्यात गुंतलेल्या कर्णाने ते पाहिले. अर्जुन प्रत्यंचा खेचीत होता. कर्णाच्या मुखावर स्मित झखकले. त्याने पाहिले....

मध्यान्ह ढळली होती. अशा अपराह्मण काळी कर्ण नदीतीरावर पुरश्चरण संपवून दानाला उभा राहत असे. याचकांच्या बाबतीत शत्रू, मित्र असा भेद त्याने कधी मानला नव्हता. जीवनातल सर्वात मोठे दान करण्यासाठी कर्ण सिद्ध झाला होता. अर्जुनाचा नेम

चुकू नये, म्हणून त्याने आपली रुंद छाती किंचित कलती केली.

'स ऽ प्ऽ ऽ'

विद्युल्लता दिसावी, तसे त्या बाणाचे क्षणदर्शन झाले. एक भयंकर वेदना मानतून आरपार गेली. रथ उचलण्यासाठी जमिनीला टेकवून तणावलेले हात सैल पडले. रथछायेत पडलेल्या कर्णाने पाहिले, तो अर्जुनाचा रथ वेगाने दूर जात होता. निळा शेला वाऱ्यावर तरंगत रणभूमीवर उतरत होता.

त्या शेल्याकडे पाहत-पाहत थकलेल्या कर्णाने नेत्र मिटले.

# ५७

**म**ध्याह्नकाळचा सूर्य आकाशात तळपत असता रणभूमीवर शंखनाद उठला. जयभेरी वाजू लागल्या. आनंदाने भानरहित झालेल्या पांडव वीरश्रेष्ठांच्या शंखनादांनी आकाश व्यापून गेले. कौरवसेना भयचकित मुद्रेने पांडवसेनेचा आनंद पाहत होती. युद्धाचे भान कुणालाच राहिले नव्हते. पांडवांकडील बाजूने अचानक उठलेले शंखनाद, रणभेरी ऐकून दुर्योधनाचा रथ थांबला. दक्षिण-दिशेला ते नाद प्रकर्षाने उठत होते. भीतिग्रस्त अंत:करणाने दुर्योधनाने तिकडे रथ वळविण्याची आज्ञा केली.

रथ वेगाने जात होता. पराजयाच्या भीतीने कौरवसेना धावत सुटली होती. दुर्योधन सुत्र होऊन ते रणभूमीचे परिवर्तन पाहत असता त्याचे लक्ष स्थिरावले. शल्यराज दोन अश्व धरून येत होता. कर्णरथाचे ते अश्व पाहताच दुर्योधनाचा धीर सुटला. त्याने विचारले,

शल्यराज! अजिंक्य कर्णाचे घोडे घेऊन कुठं निघालात? कर्णरथ कुठं आहे?' शल्यराजाचे डोळे भरून आले.

'दुर्योधना, धीर धर!' दक्षिण दिशेला हात दाखवीत तो म्हणाला, 'पराजिताला दिशा एकच! तुझ्या मित्राला अर्जुनानं गाठलं.'

पुढे ऐकण्याची दुर्योधनाला शक्ती राहिली नाही. त्याने सारथ्याच्या हातचे वेग खेचून घेतले आणि रथ पूर्ण वेगाने दक्षिणेकडे जाऊ लागला. ज्या ठिकाणी कर्णरथ दिसला, तेथे दुर्योधनाचा रथ येऊन थांबला. जेथे कर्ण उभा असायला हवा होता, ती रथामधली जागा मोकळी होती. सदैव विजयाने तळपणारा, साखळदंड चिह्न असलेला रथध्वज त्या रथावर दिसत नव्हता. अश्वहीन, एकाकी पडलेला रथ पाहून दुर्योधनाच्या मनाचे बांध फुटले. डोळ्यांतून अश्रू ओघळणाऱ्या दुर्योधनाने रथाखाली उडी घेतली आणि त्या रणरणत्या उन्हात तो कर्णरथाकडे धावला.

रथाजवळ जाताच दुर्योधनाची पावले मंदावली. कर्णाचा गौर देह पालथा पडला होता. कर्पुरगौर रुंद पाठीवर एकही जखमेचे चिन्ह दिसत नव्हते. गाढ निद्रेत गेल्यासारखा कर्ण अचल झोपी गेला होता. मस्तकीचे शिरस्त्राण पडल्याने त्याचे काळेभोर केस मानेभोवती विखुरलेले होते. दुर्योधन सावकाश जवळ गेला. अश्रु आवरण्याचा प्रयत्न करीत त्याने रथाखाली पडलेल्या कर्णाचे दोन्ही खांदे पकडले. कर्णाला त्याने रथाबाहेर ओढले. कर्णाला उताणे करताच त्याच्या मुखातून दु:खोद्गार निघाला. कर्णाच्या मानेतून आरपार गेलेल्या बाणावर त्याचे डोळे जडले होते. आपल्या शेल्याने कर्णाचे मुख स्वच्छ करीत असता तो कर्णाला पाहत होता. असामान्य दीप्तिमान रूप लाभलेला तो कर्ण पाहून दुर्योधनाचा संयम सुटला.

'कर्णा! तू गेलास! या मित्राला सोडून! काय केलंस हे? मित्रा, तुझ्याविना हा दुर्योधन पोरका झाला, रे! अंगराजा, तुझ्या बळावर मी कुरुक्षेत्रावर रणांगण उभारलं. तूच मला विजयाची ग्वाही दिली होतीस ना? मग, मृत्युंजया, दिल्या वचनाची आठवण विसरून कुठं गेलास? तुझ्याविना मी पराजित झालो, रे! शत्रूच्या नावाच्या

उच्चारानंदेखील तुझ्या अंगाचा दाह होत होता. मग आज तुझ्या पतनाचा विजयोत्सव साजरा करणारे पांडव तुला दिसत नाहीत का?'

कर्णाचे मिटलेले विशाल नेत्र कमलदल उमलावे, तसे उघडले. ते पाहून दुर्योधनाच्या तोंडून आश्चर्योद्गार बाहेर पडला. गडबडीने हळुवार हातांनी त्याने कर्णाचे मस्तक मांडीवर घेतले. आवंढा गिळत तो म्हणाला,

'मित्रा, तू जिवंत आहेस? तू आहेसऽऽ!'

अश्रूंनी भरलेल्या नेत्रकडांवर उमटलेला आनंद पाहून कर्णाच्या ओठांवर स्मित उमटले. तो कष्टाने म्हणाला,

'मित्रा, तू आलास. मी तुझीच वाट पाहत होतो. तुला भेटल्याखेरीज मी जाईन कसा ?'

दुर्योधनाचे अश्रू गालांवरून ओघळले.

'अंगराज! मी हरलो! पराजित झालो. तुझ्या पतनानं माझं सारं यश हिरावून नेल.

कर्णाला बोलताना जड जाते, हे पाहून दुर्योधनाने हळुवार हाताने गळ्यातरुतलेल्या बाणाला स्पर्श केला. एक वेदना कर्णाच्या मुखावर उठली. तो म्हणाला,

'नको, युवराज! तो तसाच राहू दे. मला बोलायचं आहे.'

कर्णाने श्वास घेतला. दुर्योधनाच्या काव-याबावच्या नेत्रांना डोळे भिडवीत कर्ण बोलू लागला.

'दुर्योधना, या रणभेरी, शंखनाद होतो ना, तो त्यांच्या विजयाचा नाही. तो आपल्या विजयाचा आहे.'

'सर्वनाशी हा कसला विजय?'

'हाच खरा विजय! मित्रा! वृद्धापकाळी, शय्येवर, कुठल्यातरी असाध्य रोगांशी झगडत या नश्वर जगाचा निरोप घेणं म्हणजे का कृतार्थ जीवन! रणांगणावरची वीरशय्या हेच खरं सफल जीवन. ते आपण मिळवलंय्. आपल्या विजयाला 'अंगाराज!' 'मित्रा, असा व्यथित होऊ नकोस. तुला लौकिक विजयच हवा का? तोही आता दूर नाही.'

'अंगरज!'

'मित्रा, असा व्यथित होऊ नकोस. तुला लौकिक विजराच हवा का? तोही आता दूर नाही.'

'कर्णा, गेल्या सतरा दिवसांत भीष्माचार्य, द्रोणाचार्यासारखे असंख्य योद्धे मी गमावले. माझ्या उरलेल्या सैन्याचं बळ तुझ्या पतनाबरोबरच ढासळलं. ते सैरावैरा वाट फुटेल तिकडं धावत सुटलंय्. आता विजय कुठला?'

'नाही, दुर्योधना! असा भयव्याकूळ होऊ नकोस. अजूनही वेळ गेलेली नाही. तुला हाच विजय हवा असेल, तर...'

'तर काय?

'माझ्यानंतर शल्याऐवजी अश्वत्थाम्याला सेनापती कर. तोच तुला हा विजय प्राप्त करून देईल.'

'जे भीष्म-द्रोण-कर्णाना जमल नाही, ते तो अश्वत्थामा काय करणार?'

'लक्ष देऊन ऐक. सेनापतीच्या ठायी निष्ठा असावी लागते. राजाच्या कल्याणाची चिंता असावी लागते. तू मोठा दुर्दैवी आहेस. तुझ्याशी निष्ठा बाळगणारा सेनानी तुला मिळाला नाही. भीष, द्रोण दोघांचीही मन पांडवप्रीतीनं, त्यांच्या कल्याणानं भरलेली.

त्यांच्या संहाराला रिपुसंहाराची धार कोठून येणार?'

'कर्णा, पण तू तरी...'

'नाही! दुर्योधना, मीही त्यांतलाच. त्या निष्ठेत माझ्याकडूनही कमतरताच पडली. केव्हा ना केव्हा तरी तुला ते समजेल. तो शल्यराज पांडवांचा आप्त. त्याच्या हाती सूत्रं न देता अश्वत्थाम्याला युद्धाचा सेनापती कर. विजय तुलाच मिळेल.'

'नाही, अंगराज, ते होणार नाही. मी शल्यराजाला वचनबद्ध आहे. एक वेळ मी पराजय स्वीकारीन; पण वचनभंग अशक्य!'

'दुर्योधना, हे मी जाणलं होतंच. धर्माची भावना आम्हांला कधी सोडता आली
नाही अन् शत्रूनं ती कधी पाळली नाही.'

कर्णाची मूठ मिटली गेली. दुर्योधनाकडे पाहत तो म्हणाला,

'युवराज! तुसा डोळ्यांतले अश्रु पाहत मृत्यू येतो, यापरत दुसरे भाग्य नाही.जीवनात माझ्या कुलामुळं मी पुष्कळ अवहेलना सोसली. माझा पराक्रम, माझं दातृत्व, माझं चारित्र्य मला उपयोगी पडलं नाही. जीवनात ताठ भावनेनं जगता आलं, ते फक्त तुझ्या स्नेहामुळं. त्या स्नेहाचा मी सदैव कृतज्ञच राहीन. मित्रा, एक काम करशील?'

कर्णाने थकव्याने डोळे मिटले

'सांग, मित्रा, बोल S'

कर्णाने कष्टाने डोळे उघडले

'अवधी फार थोडा आहे. तिथं शेला पडला आहे. निळा. तो घेऊन ये अन् मला वीरशय्या प्राप्त करून दे.'

दुर्योधनाने पाहिले.

कर्णापासून ब-याच दूरवर एक निळा शेला वा-यावर हेलकावे घेत होता.

दुर्योधनाने कर्णाचे मस्तक अलगद खाली ठेवले.शेला उचलीत असता त्याने पाहिले.

शेला भारी होता. त्यावर सुवर्णधाग्यांचा कशिदा विणला होता.

दुर्योधनाने आणलला शाला पाहून कर्णाची प्रसन्नता वाढली.

तो शेला दुर्योधनाने पायापासून पांघरीता गळ्यापर्यंत आणला. सारे बळ सरूनन तो अश्रु ढाळीत कर्णाजवळ गुडघ्यांवर बसला.

'युवराज, मी तृप्त आहे. माझ्यासाठी अश्रु ढाळू नका.'

कर्णाची दृष्टी आकाशातल्या सूर्याकडे गेली. डोळे ताठरले गेले. सारे बळ एकवटून तो म्हणाला,

'युवराज! भर मध्याह्नकाळी सूर्यास्त होताना कधी तुम्ही पाहिलात का?'

दुर्योधनाने भीतीने आकाशातल्या सूर्याकडे पाहिले. सूर्य तळपत होता. त्याचा दृष्टी कर्णाकडे वळली.

कर्णाचे डोळे तसेच उघडे होते. सूर्यबिंबाकडे पाहत.

दुर्योधनाची मान खाली झाली. कर्णाने मिटलेली उजवी मूठ उघडली होती...

दुर्योधनाचे अश्रु त्या हातावरून ओघळत होते. कर्णाच्या उघडचा तळहातावर पडणारे अश्रु जमिनीकडे ओघळत होते.

- जणू त्या मोकळ्या हाताने कर्ण शेवटचे दान देत होता.

**उमद्या, दिलदार मनाचा एक थोर साहित्यिक.**
**रणजित देसाईंचे साहित्य म्हणजे वाचकांशी उच्च**
**भावनिक स्तरावर साधलेला कलात्मक संवाद.**

# ॥ स्वामी ॥

## रणजित देसाई

**महाराष्ट्रातल्या जनतेला जिने मंत्रमुग्ध केले,**
**जी प्रत्येक घरात भक्ति भावाने पुजली गेली**
**अशी मराठी सारस्वतातील अजरामर साहित्यकृती**

शिवचरित्राचे भव्योदात्त उत्कट चित्रण
करणारी महाकादंबरी.

# श्रीमान योगी

## रणजित देसाई

निश्चयाचा महामेरू। बहुत जनांसी आधारू
अखड स्थितीचा निर्धारु। श्रीमंत योगी।
यशवन्त, कीर्तिवन्त। सामर्थ्यवन्त, वरदवन्त
पुण्यवन्त, नीतिवन्त। जाणता राजा।

अफजखान आणि शिवाजी महाराज या दोन
राजकारणधुरंधरांनी खेळलेला डाव

# लक्ष्यवेध

## रणजित देसाई

शिवचरित्रातील प्रत्येक प्रसंग म्हणजे स्वतंत्र कादंबरीचा विषय.
या चरित्राइतके सर्वांगसुंदर चरित्र आजवर इतिहासाने पाहिलेले नाही.
असा या चरित्राचा लौकिक.
बारा मावळांत स्वराज्याचे रोपटे रुजते न रुजते, तोच
अफझलखानाचे संकट अवतरले.
वाईपासून प्रतापगडापर्यंतच्या हिरव्यागर्द रानावर राजकारणाचा पट
मांडला गेला.
चढे घोडियानिशी राजांना पकडून नेण्याची अफझलखानाची गर्वोक्ती
होती; आणि खानास मारल्याविना राज्य साधणार नाही, हे राजे पुरे
जाणून होते.
या दोन राजकारण-धुरंधरांनी खेळलेला डाव म्हणजेच 'लक्षयवेध'.



मी योध्दा आहे.
जखमांची भिती बाळगून
भागायचं नाही.
जन्माबरोबरच सुरु झालेलं
हे युध्द
अखेरच्या क्षणापर्यंत मला
चालवलं पाहिजे.
यातच माझ्या जीवनाचं
यश सामावलं आहे ”








कादंबरी

ISBN-
9788177667462

Follow us

e-Book Available
9788184988055

www.mehtapublishinghouse.com